रामायणावर नवा प्रकाश

वाल्मीकी रामायणावरील संशोधनात्मक लेख

• भास्करराव जाधव



महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई

रामायणावर नवा प्रकाश

लेखक
भास्करराव विठोजीराव जाधव

*

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई : ४०० ०३२

अनुक्रमणिका

पहिली आवृत्ती, २६ जून, १९५१
प्रकाशक
आप्पासाहेब भा. जाधव, कोल्हापूर : ३

पुनर्मुद्रण, नोव्हेंबर, १९९१

प्रकाशक
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई : ४०० ०३२
© १९९१

या आवृत्तीचे अधिकार प्रकाशकाधीन

पुनर्मुद्रण — २००३
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय पुणे — १

किंमत : रुपये १४५ /-

अनुक्रमणिका

निवेदन

भास्कररराव विठोजीराव जाधव (१८६७–१९५०) हे सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीचे एक अग्रगण्य नेते होते. विद्यालयीन तसेच विद्यापीठीय परीक्षामध्ये त्याची कोणाच्याही नजरेत भरावे असे यश मिळविल्याने कोल्हापूरच्या राजर्षी शाहू छत्रपतींनी त्यांची १८९५ मध्ये प्रथम महसूल खात्यात नेमणूक केली. त्यानंतर १९२१ सालापर्यंत विविध अधिकार पदे भूषवून ते निवृत्त झाले आणि त्यांनी निवडणुकीच्या राजकारणात उडी घेतली. मुंबई कायदेमंडळाचे तसेच मध्यवर्ती कायदेमंडळाचे सभासद म्हणून काम करताना आणि काही काळ मंत्रीपद भूषवितानाही त्यांचा व्यासंग सुरुच होता भास्कररावांचा पिंड हा ज्ञानोपासकाचा होता वेदासकट सर्व महत्वाच्या संस्कृत ग्रंथाचे त्यांनी सूक्ष्म परिशीलन केले असल्याने आणि बुद्धिप्रामाण्यवादी चिकित्सक दृष्टीकोणातून त्यांनी आपल्या सास्कृतिक वारशाचा अभ्यास केला असल्याने त्यांची त्यासंबंधीची मते खळबळ माजवीत असत.

रामायण व महाभारत या काव्य ग्रंथांना भारताच्या सांस्कृतिक संचितामध्ये अनन्यसाधारण स्थान लाभले आहे. त्यातील व्यक्तीरेखांनी कोट्यवधी माणसाच्या मनावर इतकी मोहिनी घातली आहे की त्यांच्या दृष्टीने राम किंवा कृष्ण या केवळ ऐतिहासिक व्यक्ती राहिलेल्या नसून ती श्रद्धास्थाने बनली आहेत. सर्वसामान्य भारतीय त्यांना अवतारी पुरुष मानतो आणि त्यांच्या मूर्तीची पूजा करतो. इंग्रजी राजवटीत पाश्चात्य पंडितांनी रामायण व महाभारत हे ग्रंथ होमरच्या इलियड व ऑडिसीवरून रुपांतरित केले असावेत असे प्रतिपादन करण्यास सुरुवात केली. तेव्हा न्यायमूर्ती काशीनाथ त्र्यंबक तेलंगानी त्याचे सप्रमाण खंडन केले. तरीही रामायणाचे मूळ इजिप्तमध्ये असल्याचे मत मल्लादि वेंकटरत्नम यांच्यासारखे विद्वान पुढील काळातही व्यक्त करीत असताना दिसतात. रामायणासंबंधी पंडितांमध्ये चाललेल्या या वादात १९३४ ते १९३६ या काळात भास्कररराव जाधवही हिरीरीने उतरले. रामायणासंबंधी भास्कररावांनी त्या काळात "ज्ञानमंदिर", "महाराष्ट्र शारदा" या नियतकालिकांमध्ये लेख लिहून टीकेचे मोहोळ उठवले होते. "रामायणावर नवा प्रकाश" या पुस्तकात त्याचे हे लेख एकत्रित करण्यात आले आहेत.

मार्च, १९८४ मध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने भास्कररावांच्या या ग्रंथाचे पुर्नमुद्रण करण्याचा निर्णय घेतला. रामायणासंबंधी भास्कररावांनी व्यक्त केलेली मते पन्नास वर्षापूर्वी जितकी विवाद्य ठरली तितकीच ती आजही ठरण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षणखात्याच्या अखत्यारात येणाऱ्या महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने भास्कररराव जाधवांच्या या गाजलेल्या ग्रंथाचे पुनर्मुद्रण करण्याचे ठरवले याचा अर्थ भास्कररावांची मते मंडळास, शिक्षण खात्यास किंवा महाराष्ट्र शासनास मान्य आहेत असा करणे योग्य होणार नाही. शासनातर्फे प्रकाशित केल्या जाणाऱ्या ग्रंथातील ओळीन् ओळीशी शासन सहमत असते किंवा ते शासनाचे मत असते असे समजणे चुकीचे ठरेल.

य. दि. फडके

मुंबई :
८ जानेवारी, १९९१

अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

अनुक्रमणिका

पहिल्या आवृत्तीचे निवेदन

श्री. भास्कररराव विठोजीराव जाधव यांच्या पहिल्या पुण्यतिथीला "रामायणावर नवा प्रकाश" हा त्यांच्या वाल्मीकी रामायणावरील संशोधनात्मक लेखांचा संग्रह वाचकांच्या हाती देताना आम्हास अत्यंत आनंद होत आहे. श्री भास्कररराव जाधव यांच्या दुःखद निधनानंतर महाराष्ट्रातील बऱ्याच विचारवंत मडळींकडून त्यांच्या लेखांचा संग्रह प्रसिद्ध करण्याबद्दल जाहीरपणे व वैयक्तिकरीत्या आम्हास विनंती करण्यात आली. चाहत्या मंडळींच्या सदिच्छेनुसार अशा लेखसंग्रहाच्या प्रकाशनाच्या खर्चाची जबाबदारी श्री. भास्कररराव जाधव यांच्या सुपुत्रांनी मोठ्या आनंदाने स्वीकारली.

श्री. भास्कररराव जाधव यांचे विविध विषयांवरचे लेख सुमारे २०–२५ वर्षांच्या कालात निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध होऊन गेले होते. त्यापैकी काही नियतकालिकाचे प्रकाशन सध्या बंद आहे. प्रसिद्ध होऊन गेलेल्या लेखांची कात्रणे संग्रही नव्हती. अशा परिस्थितात लेख गोळा करण्याचे कार्य अवघड होते. विविध विषयांवरचे लेख बऱ्याच मंडळींच्या साहाय्याने गोळा झाले. त्यातून एका स्वतंत्र विषयावरचे लेख निवडून "रामायणावर नवा प्रकाश" हा ग्रंथ प्रसिद्ध करण्यात येत आहे.

श्री. भास्कररराव जाधव बुद्धिप्रामाण्यवादी होते. तसेच त्यांना देव आणि भक्त याप्रमाणेच इतर कोणत्याही बाबतीत मध्यस्थाची जरूरी वाटत नसे. यामुळे प्रस्तुत लेखसंग्रहाचे महत्त्व आम्ही प्रतिपादन न करता वाचकांनी बुद्धीच्या कसोटीनेच या संग्रहातील लेखांविषयी स्वतंत्रपणे मते बनवावीत असे आम्हास वाटते.

श्री. भास्कररराव जाधव यांचे जीवन सर्वदृष्टीने चारित्र्यसंपन्न व शीलसंपन्न असे एखाद्या तपस्व्यासारखे होते याची जाणीव त्याच्या निकटवर्तीयांखेरीज इतर कोणासही असणे शक्य नव्हते. म्हणून ते सारांशरूपाने या लेखसंग्रहाच्या प्रारंभी देण्यात येत आहे.

रामायण व इतर विषयांवरील बरेच लेख "ज्ञानमंदिर" मासिकातून प्रसिद्ध झाले होते या मासिकाच्या जुन्या फाईली दैनिक "पुढारी" चे संपादक श्री. गणपतराव जाधव यांनी मिळवून दिल्याबद्दल व त्यां याना लेखसंग्रहाच्या प्रकाशनाच्या सुरुवातीपासून निरनिराळ्या प्रकारे मार्गदर्शन व साहाय्य केल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. श्री. भास्कररराव जाधव यांचे लेख प्रसिद्ध झालेल्या जुन्या मासिकांचे अंक शोधून काढणे, ते लेख उतरून घेणे, जीवनवृत्ताची माहिती गोळा करणे हे काम जितके जिकीरीचे तितकेच अवघड होते. ही जबाबदारी श्री. गोविंदराव वि. जाधव, श्री. बापूसाहेब भा. जाधव व श्री. आप्पासाहेब भा. जाधव यांनी आपल्या निरनिराळ्या व्यवसायांतून वेळ काढून, जर पार पाडली नसती तर हा संग्रह श्री. भास्कररराव जाधव यांच्या पहिल्या पुण्यतिथीला वाचकांच्या हाती देणे अशक्य झाले असते. हे कार्य त्यांनी कृतज्ञताबुद्धीने जरी केले असले तरी त्यांच्या परिश्रमाचे महत्त्व कमी होत नाही.

या लेखसंग्रहाच्या प्रकाशनाच्या कामी ज्या मंडळींनी आपुलकीने साहाय्य केले त्यांचा उल्लेख करणे जरूरीचे आहे. मुंबईचे श्री. र. गो. सरदेसाई, श्री. श्री. रा. टिकेकर, श्री. अनंत हरि गद्रे, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचे व्यवस्थापक, श्री. जी. एस्. सबनीस (कोल्हापूर बँक, मुंबई शाखा), श्री. पु. श्री. काळे (आर्टिस्ट) व श्री. बाबूराव मालपेकर, 'दीनमित्र' कार श्री. मुकुंदराव पाटील, कोल्हापूरचे श्री. वि. स.

अनुक्रमणिका

खांडेकर, भाई माधवराव बागल, डॉ. पा. सी. पाटील, श्री. दिनकर. द. पाटील या मंडळींनी जे हरप्रकारे साहाय्य केले त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. तसेच "ज्ञानमदिर", "महाराष्ट्र शारदा", 'किर्लोस्कर", "स्त्री" व "मनोहर" या मासिकांच्या संपादकांनी व संबंधित मडळींनी लेख पुनर्मुद्रित करण्यास परवानगी दिल्याबद्दल त्यांचेही आम्ही आभारी राहोत. आमचे मित्र श्री. सी. गो. सरदेसाई यांनी श्री. भास्कररराव जाधव यांच्या जीवनवृत्ताची सजावट, लेखसंग्रहाची प्रुफे तपासणे या बाबतीत जे साहाय्य केले त्याबद्दल आम्ही त्याचेही आभारी आहोत. श्रीज्ञानेश्वर प्रेसचे मालक श्री. भाऊसाहेब सहस्त्रबुद्धे यांनी पुस्तकछपाई व बांधणी सुबक व मुदतीत करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानण उचित होईल.

"रामायणावर नवा प्रकाश" या लेखसंग्रहाच्या वाचकवर्गाकडून होणाऱ्या स्वागतावरच श्री. भास्कररराव जाधव यांच्या इतर लेखांचे प्रसिद्धीकरण अवलंबून आहे, एवढेच निवेदून श्री. भास्कररराव जाधव यांच्या सुशील पत्नी व त्याचे सुपुत्र यांच्या वतीने श्री. भास्कररराव जाधव यांच्या पहिल्या पुण्यतिथीला हा लेखसंग्रह आदरपूर्ण भावाने सुहृद वाचकांपुढे आम्ही सादर करतो.

कोल्हापूर — **सि. रा. तावडे**

ता. २६ जून, १९५१ — **केशवराव आ. भोंसले**

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

निवेदन ४

पहिल्या आवृत्तीचे निवेदन ५

१ रामायणापासून हिंदुस्थानने गिरविलेला धडा ११

२ टीकाकारांस उत्तर १४

३ रामभक्त हनुमंत व धर्मात्मा बिभीषण ३३

४ धर्मात्मा बिभीषण ४४

५ रामायणाचा वाद ६२

६ इतिहासदृष्टीने रामायण काव्याची योग्यता ६४

७ रामायणाची ऐतिहासिक योग्यता ७४

८ ब्रह्मचारी हनुमान ८१

९ रामायणातील आणखी काही स्थळे १०३

१० रामायणाचे मूळ ११०

११ रामराज्यातील प्रजानन ११८

१२ दाशरथी राम अनार्य होता? १२४

१३ राम अनार्य होता! १३२

१४ रामाचे अनार्य वर्तन! १४०

१५ रामाचे अनार्यत्व १५१

१६ रामायणातील काही अनार्य चाली १६०

१७ रामायणकर्ता वाल्मिकी १६७

१८ रामाच्या एकपत्नित्वाचे थोतांड १७६

१९ सीता चरित्र १९१

२० वाल्मीकी रामायणातील विमानविहार २०८

२१ वाल्मीकी आणि होमर २१४

२२ करू नये थट्टा, भल्याभल्यांसी लागला बट्टा २१९

२३ दिवेकरशास्त्री X भास्करराव जाधव २२२

२४ आणखी काही आक्षेप २३१
२५ जीवनवृत्त २३७

अनुक्रमणिका

नामदार भास्करराव जाधव

जन्म :-

जेष्ठ शु. पौर्णिमा
सोमवार १७ जून १८६७

मृत्यु :-

आषाढ शुक्लपक्ष एकादशी शके १८७२
सोमवार २६ जून १९५०

अनुक्रमणिका



Sir K. V. Reddy was making enquiries about you. He leaves here tomorrow for Madras where he is appointed an Executive Councillor, His son has also come here.

Yours affectionately
Br Jacob

" सर्व मनुष्यें एकाच ईश्वराचीं लेंकरें आहेत, त्यांचें व माझें बंधुत्वाचें नातें आहे हें जाणून वागण्याचा मी नित्य प्रयत्न करीन; देवाची भक्ति, पूजा, उपासना वगैरे करितांना तसेंच धर्मविधी करितांना मी कोणाही मध्यस्थाची जरूर ठेवणार नाहीं; व असें वागण्या विषयीं इतरांचें मन वळविण्यास मी झटेन; माझ्या मुलामुलींस विद्या शिकविल्या शिवाय मी राहणार नाहीं; राज्यकर्त्यांशीं राज्य निष्ठेनें वागेन; अशी सर्वसाक्षी सत्यस्वरूप परमात्म्याला स्मरून मी प्रतिज्ञा करितों. हा माझा पवित्र उद्देश सिद्धीस नेऊन जन्माचे सार्थक करण्यास परमात्मा मला साह्य देवो "

[illegible]

श्री. भास्कररावांचें हस्ताक्षर

अनुक्रमणिका

१ रामायणापासून हिंदुस्थानने गिरविलेला धडा

रामायण व महाभारत हे आर्यांचे मोठे आवडते इतिहास आहेत यांत जसे लिहिले आहे तसे घडून आले, असे पुष्कळ लोक मानतात. भारती युद्धापूर्वी राम होऊन गेला, अशी समजूत आहे. तसे असल्यास रामायणाची शिकवण भारती वीरांनीही घेतली असावी.

रामायणापासून बंधुप्रेमाचा धडा घ्यावा, असे सांगण्यात येते. राम, भरत, लक्ष्मण, शत्रुघ्न, हे चार बंधू; यांचे परस्पर प्रेम अति गाढ होते. राम वडील म्हणून तोच राज्यास अधिकारी, यासाठी आईने आपणाकरिता मिळविलेल्या राज्याचाही त्याग भरताने केला. लक्ष्मणाने रामाची व शत्रुघ्नाने भरताची सेवा एकनिष्ठेने केली, वगैरे उदाहरणे दाखवून बंधुप्रेम हाच रामायणाचा मुख्य विषय असे प्रतिपादिले जाते.

यांतील लक्ष्मण व शत्रुघ्न हे सुमित्रेपासून दशरथास झालेले पुत्र. सुमित्रा ही राज्यकन्या नव्हती म्हणजे ती हलक्या कुलातील होती तिचे पुत्र राज्यास अधिकारी नव्हते म्हणून राज्यास अधिकारी अशा राजपुत्रांची सेवा त्यानी करावी, हे उचितच होते. आजच्या कालीही खानजाद अनौरस पुत्र, औरस पुत्रांची सेवा करणारे राजकुलात व सरदार घराण्यात आढळून येतात.

आता भरत-राम याचे प्रेमच शिल्लक राहते. पण रामायणात प्रसिद्ध अशा भावांच्या आणखी दोन जोड्या आहेत. पहिली वाली व सुग्रीव यांची आणि दुसरी रावण व बिभीषण यांची. यांना कुंभकर्ण हा तिसरा भाऊ होता.

वालीने सुग्रीवाच्या बायकोचा अभिलाष धरला, असे एक कारण उभयतांतील वादाचे सांगण्यात येते. पण त्या काळी भावाच्या बायकोवर एक प्रकारे हक्कच चालत होता. वालीला मारल्यावर सुग्रीवाने वालीची बायको आपल्या जनानखान्यात ठेवली हे रामायणच सांगते. भावाच्या मालमत्तेवर धाकट्या भावाचा वारसा साहजिकच येतो; व बायकोची योग्यता मालमत्तेइतकीच होती. रावणाच्या पश्चात् मंदोदरीला बिभीषणाने आपल्या जनान्यात दाखल केली, ती याच न्यायाने.

सुग्रीव व वाली यांचे मुख्य भांडण राज्याच्या वाटणीचे होते. वाली वडील; त्याचा हक्क श्रेष्ठ. सुग्रीव धाकटा; त्याला हिस्सा कसा मिळावा? हिस्सा मिळत नाही, तर वालीचा काटाच काढून टाकल्यास आपणास सबंध राज्य मिळेल, हे सुग्रीवास पटले. या कामी मारुतीसारख्या त्याच्या मंत्र्याचा संमती होती.

सुग्रीव, वाली, मारुती वगैरे सर्व अनार्य मंडळी; व राम–लक्ष्मण हे आर्य. आपल्या भावास मारणेसाठी अनार्य सुग्रीवाने आर्य रामाची मदत घेतली. त्याचे हातून वालीस मारवून रामाचा हस्तक, सेवक वगैरे नाते पत्करून वालीचे राज्य सुग्रीवाने बळकाविले.

रामाची बायको सीता रावणाने जबरदस्तीने आणली म्हणून रामाने लंकेवर स्वारी केली. त्या कामी सुग्रीव व त्याचे सेवक रामासाठी फार झटले व युद्धात त्यांनी मर्दुमकी केली. त्यावेळीं रावणाचा भाऊ बिभीषण हा रामाच्या पक्षास मिळाला व लंकेतील सर्व भेद त्याचेकडून झाला आहे. रामाची बायको आणली हे अनीतीचे कृत्य रावणाने केंले म्हणून बिभीषण रामाकडे गेला, असे कारण देण्यात येते. पण ते कारण समाधानकारक नाही. दुसऱ्याची बायको जबरदस्तीने नेणे, यात अनीतिकारक किंवा अधर्म्य असे त्याकाळी

अनुक्रमणिका

मानले जात नसे. बरे, तशी गोष्ट गैर आहे असे त्याकाळी मानीत, असे वादाकरिता घेऊन चालले तरी शत्रूला फितूर होण्याचे काम जे विभीषणाने केले आहे, ते तर अगदीच अयोग्य व असमर्थनीय आहे. परदेशच्या परक्या शत्रूस मिळून त्याचेकडून आपल्या भावास मारविणे हा देशद्रोह आहे. या द्रोहाचे पातक बिभीषण व सुग्रीव या दोघांच्याही शिरावर येत आहे.

हनुमान ऊर्फ मारुती याने रामाची सेवा एकनिष्ठने केली आहे. याबद्दलही रामायणात मोठे रसभरित वर्णन केलेले आहे.

राम हा विष्णूचा अवतार आहे असे मानण्यात येते व यामुळे मारुती हा भक्तश्रेष्ठ समजला जातो. पण रामास अवतारांत अलीकडे घातले आहे. त्यापूर्वी तो केवळ माणूस होता. तो वीर, शूर मोठा नेता होता. पण सुग्रीव, मारुती वगैरेंच्या दृष्टीने तो परदेशी होता. त्याची मदत घेऊन सुग्रीवाने जसा देशद्रोह केला तसाच रामाची सेवा करून मारुतीने देशद्रोहच केला असे म्हणावे लागते.

आपल्या दायादांची खोड मोडण्यासाठी परक्यांची मदत बेशक घ्यावी, असा आचार सुग्रीव व बिभीषण यांनी सुरू केला. त्याचा कित्ता प्रथमतः पांडवांनी कौरवांशी लढताना गिरविला. पुढील इतिहासात तर या देशद्रोह्यांची फारच मोठी सेना नजरेस पडते अलेक्झांडर ऊर्फ शिकंदर याच्या काबूल येथील छावणीत हिंदुस्थानातील बऱ्याच देशचे राजपुत्र नजराणे घेऊन हजर होते; व 'हिंदुस्थानावर स्वारी करा, आम्ही मदत देतो,' असे विनवीत होते. त्यांची यादी इतिहासात आहे. मुसलमानांच्या वावटळीस या सुग्रीव – बिभीषणानुयायी देशद्रोह्यांनीच जोर आणिला आहे. हिंदुस्थानचा सर्व इतिहास देशद्रोहाच्या काळ्या काजळाने माखला आहे. आमच्या देशाचा व लोकांचा अधःपात मुख्यत्वे या कारणाने झाला आहे.

आपल्या देशावर स्वारी करून येणाऱ्या बलिष्ठ राजाची सेवा करण्यात गैर काही नाही, उलट ते काम चांगले, अशी शिकवण हनुमानाच्या वर्तनापासून आमच्या या हिंदुस्थानातील सर्व देशांनी व प्रांतांनी व लोकांनी घेतली आहे. परकियांच्या स्वाऱ्यांस सुग्रीव व बिभीषण यांच्या अनुयायांनी केवळ क्षुद्र स्वार्थासाठी मदत केली व परकियांचे पाय आमच्या देशात रोवले. त्यानंतर ते पाय चिरस्थायी करण्यास व त्याची सत्ता जास्त जास्त फैलावण्याचे कामी हनुमान–मारुतीचे अनुयाया पुढे सरसावले. पूर्वीचा काळ सोडून देऊन अगदी अलिकडील काळ घेतला तरी मुसलमान बादशहास रजपूत, मराठे वगैरे लढाऊ जातींच्या सरदारांचा कधीही तुटवडा पडला नाही. परकिय धन्याची सेवा अत्यंत इमानाने केली पाहिजे, हा परमभक्त मारुतीने घालून दिलेला धडा यांनीही अतिशय इमानाने गिरवून आपल्या स्वामिभक्तीचे प्रदर्शन मोठ्या दिमाखाने करून, आपला देश जिंकण्याच्या परकियांच्या उद्योगास उत्साहाने हातभार लाविला आहे. सर्व हिंदुस्थानच्या नकांशास तांबडा रंग देण्याच्या कामी प्रथम सुग्रीव व विभीषणाच्या पावलांवर पाऊल टाकणारे व त्याचेबरोबरच मारुतीचे शिष्य असे पुढे आले. अशा लाखो हिंदी सैन्याच्या मदतीवरच मुसलमान बादशहास किंवा इंग्लंडच्या राजास आपले साम्राज्य वाढविता व राखता आले आहे.

आपल्या भावावर परक्याची स्वारी झाली आहे; आपला धाकटा भाऊ बिभीषण केवळ स्वार्थाने शत्रूस फितूर झाला आहे, हे पाहून आपले कर्तव्य म्हणून देशाच्या स्वातंत्र्यरक्षणासाठी व बंधुप्रेमाने लढणारा, निःस्वार्थी देशभक्त कुंभकर्ण नजरेस येतो. पण आजपर्यंतच्या पुराण सांगणाऱ्यांनी किंवा कथा करणाऱ्या हरिदासांनी या देशभक्तीची व त्याच्या बंधुप्रीतीची वाखाणणी केव्हाच केली नाही. उलट तो झोपाळू म्हणून त्याची टवाळी करून त्याला तिरस्कारार्हच केले आहे. याउलट फितुरी, स्वार्थी, देशद्रोही

अनुक्रमणिका

अशा बिभीषणास व परकियांची सेवा एकनिष्ठेने करणाऱ्या हनुमानास, चिरंजीव करून त्यांच्यासारखे भगवद् भक्त व्हावे, असाच उपदेश आज हजारो वर्षे आमच्या अडाणी लोकांस केला जात आहे. या उपदेशाचा परिणाम सर्व देशांतील व प्रांतांतील लोकांवर किती झाला आहे, हे विस्ताराने सांगणेची जरूरी नाही. केवळ मराठ्यांचाच अलिकडला इतिहास चाळल्यास कुंभकर्णाचा कित्ता गिरविणारा बंधुभक्त व देशभक्त एखादा सापडेल, पण बिभीषणाचे अनुयायी निदान दहा तरी मिळतील.

रामायणाची ही शिकवण आमच्या देशाच्या ऱ्हासाचे मुख्य कारण आहे, इकडे फार थोड्यांचे लक्ष जाते; व त्याबद्दल स्पष्टपणे बोलण्यास पुढे येणारा फार विरळा. रामाचे व रामभक्तांचे असतील नसतील ते गुण गाऊन, त्यांच्या वाईट कृत्यांचे लंगडे समर्थन करून आपल्या रामभक्तीचे प्रदर्शन करणारे रावापासून रंकापर्यंत आढळतील!!

'ज्ञानमंदिर', जानेवारी, १९३५

अनुक्रमणिका

२ टीकाकारांस उत्तर

'रामायणापासून हिंदुस्थानने गिरविलेला धडा' या मथळ्याखाली 'ज्ञानमंदिरा' च्या जानेवारीच्या अंकात मी एक लहानसा लेस लिहिला होता. त्यावर टीका करणारे एकंदर ११ लेख संपादकांकडे आले. त्यांतील महत्त्वाचे तीन लेख (श्री. सरवटे, बी. ए. एल्एल् बी., श्री. महादेव भिकाजी केळकर व श्री. भी. ना. धारवाडकर, गुलबर्गा यांचेकडून आलेले) मार्चच्या अंकात प्रसिद्ध करण्यात आले आहेत या तिहींतही माझ्या लेखावर सडकून टीका केली आहे. सदर लेखांची प्रूफे माझ्या नजरेखाली घालण्यात आली व मी उत्तरही तयार केले. सदर तीन लेखांबरोबरच हे माझे उत्तरही प्रसिद्ध करावे असा प्रथम विचार होता; पण एकाच विषयाकडे जवळ जवळ निम्मा अंक खर्ची पडल्यास वाचकांस विषयवैचित्र्य चाखण्यास मिळणार नाही, असे दिसल्यावरून माझा लेख एप्रिलच्या अंकासाठी मागे ठेवण्यात आला. हे माझे उत्तर वाचण्यापूर्वी तिसरे अंकात प्रसिद्ध झालेले तीनही लेख वाचकांनी पुनः वाचून पहावेत अशी विनंती आहे.

माझ्या टीकाकारांपैकी दोन तरी वकील आहेत. प्रतिपक्षाच्या पुराव्यात खोडून टाकण्यासारखे फारसे नसल्यास त्यावर अपशब्दांचा भडिमार करण्याची बऱ्याच वकिलांची रीत आहे. या कामी श्री. सरवटे यांनी ती स्वीकारली असे मी म्हणत नाही; परंतु त्यांनी योजिलेली विशेषणे तसा भास उत्पन्न करतात. पहिल्याच पारिग्राफात माझ्या शोधास 'अपूर्व', विधानास 'निराधार', अनुमानास 'सदोष', दाखल्यांस 'भ्रामक' आणि विचारसरणीस 'विकृत' अशी शेलकी विशेषणे लावूनही त्यांच्या मनास समाधान वाटले नाही. 'ठोकून देतो ऐसाजे' रीतीने लिहिणारा, स्वतःकडे स्पष्टवक्ते—शहाणपणाचा मक्ता घेणारा व विरुद्ध मत असणाऱ्यांची मूर्ख व असमंजस म्हणून टवाळी करणारा, अशी मजविषयी निराधार विधाने करणे त्यांना योग्य दिसले. इतक्यानेही त्यांची तृप्ती झाली नाही म्हणून 'त्यांच्या म्हणण्याचा भाव 'सर्वस्वी चुकीचा', 'बुद्धिपुरःसर विपर्यास' असेही आरोप करण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे. 'एकदा डोळ्याला कावीळ झाली म्हणजे सर्वच विपरीत दिसू लागून मनुष्य कसे बहकत बोलू लागतो याचा हा नमुना आहे' अशी माझी कीव करण्याचा उदारपणाही त्यांनी दाखविला आहे. आपल्या पत्राच्या अखेर 'रा. जाधव यांनी जाणूनबुजून इतिहासाचा विपर्यास व वाचकांचा बुद्धिभेद केला आहे' असे लिहून आपल्या त्वेषाचा पारा बऱ्याच अंशांनी वर चढविला आहे. माझा लेख त्यांच्या सात्त्विक त्वेषास कारणीभूत झाल्याबद्दल मी दिलगीर आहे.

श्रीयुत महादेव भिकाजी केळकर यांनी अपशब्दांचा प्रयोग केला नाही व आपले म्हणणे शक्य तितक्या जोरदार, पण साध्या भाषेत मांडले आहे, याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. टीका तत्त्वशोधनाकरिता असावी, ही मर्यादा त्यांनी चांगली पाळली आहे. पण रामायणाचे त्यांचे वाचन बरेच दिवसांचे जुने दिसते; त्या वाचनाने मनावर झालेले संस्कार त्यांनी आपल्या टीकेत दिले आहेत.

श्री. भी. ना. धारवाडकर यांचा मूळचा लेख फारच मोठा होता. त्यात संपादकांनी पुष्कळच छाटाछाट केली आहे. या छाटाछाटीत बरेचसे अपशब्द निघून गेले. त्यांचा उल्लेख व त्यावर चर्चा मी करू इच्छित नाही. तथापि उरलेल्या भागांतही अपशब्दांचा भरणा बराच आहे. या शिव्यांचा मासला म्हणून न छाटलेले एक वाक्य देणे येथे अयोग्य होणार नाही. 'आर्यांच्या आवडत्या राष्ट्रीय इतिहासावर निरर्थक काळी शाई ओतणाऱ्या कुंभकर्णपक्षपाती श्री. भास्करावांनी मूळ रामायणांतील ती कथा पुनः एकवार लक्षपूर्वक वाचावी. सबंध पत्र छापले गेले नाही, हे वाचकांवर संपादकांचे उपकारच आहेत.

अनुक्रमणिका

'कुंभकर्णपक्षपाती जाधव' अशी नवीन शिवी आपल्या कल्पनेने योजून रा. धारवाडकर यांनी तिचा प्रयोग बरेच वेळ केलेला, छाटाछाट करून राहिलेल्या भागात आहे. 'जाधवप्रिय कुंभकर्ण' असाही प्रयोग रुचिवैचित्र्याने एकवेळ केलेला आढळतो.

तीनही टीका मुळाकडे पुनः शांतपणे न पाहता सात्विक त्वेषात पूर्वीच्या वाचनाच्या आठवणीवरून लिहिलेल्या दिसतात. या उत्तरात मी जे मुळातील श्लोक दिले आहेत, त्यांवरून पुनःविचार करून पाहिल्यास या तिघांस व बाकीच्या टीकाकारांस माझ्या म्हणण्यास मुळात चांगलाच भक्कम आधार आहे, असे दिसून येईल, असा भरवसा आहे.

माझ्या लेखावरची बरीचशी टीका गैरसमजूतीची आहे. माझ्या लेखाचा मथळा 'रामायणापासून हिंदुस्थानने गिरविलेला घडा' हा आहे. रामायणाची शिकवणच तशी आहे, असा आरोप मी केलेला नाही. हिंदुस्थानच्या लोकांच्या मनोरचनेतील काही दोषांमुळे त्यांना सुग्रीव, बिभीषण व हनुमान यांचे अनुकरण करावेसे वाटले असे माझे म्हणणे. ते बरोबर आहे की नाही याचा निर्णय प्रसिद्ध झालेल्या तीन टीका, त्यांतील मुद्दे व त्यांवरील उत्तर ही पाहून सूज्ञ करतीलच.

रामचरित्र समजण्यास वाल्मिकी रामायण हा महत्त्वाचा ग्रंथ आहे हे खरे. पण त्याबाहेर काही पहाता कामा नये असे म्हणता येणार नाही. अगोदर या रामायणाचे प्रामाण्य किती अंशापर्यंत मानावे हा प्रश्न प्रथम पुढे येतो. रामायणात जे जे सांगितले आहे ते ते पूर्णपणे जसे घडले तसेच लिहिले आहे, असे म्हणणारे काही आहेत. मला हे मत मान्य नाही, हे मी स्पष्टपणे प्रथमच नमूद करतो. माझ्या विचारशक्तीला पटेल ते व इतरत्र उपलब्ध असलेल्या पुराव्यावरून खरे ठरेल तेवढेच मला मान्य आहे. विचारशक्तीला न पटणारी गोष्ट रामायणात कितीही विस्ताराने सांगितलेली असो, ती मान्य करणे योग्य दिसत नाही.

वाल्मिकीला रामचरित्राची प्रथम काहीच माहिती नव्हती. ती त्याला नारद मुनीकडून कळली. त्याचा विचार करीत ते शिष्यांसह स्नानास गेले असता, पारध्याने क्रौंच जोडप्यांतील नरास मारल्यामुळे मादीचा आक्रोश ऐकून वाल्मिकीला शोक झाला व श्लोकबद्ध शापवाणी त्याच्या मुखातून बाहेर पडली. पुढे ब्रह्मदेव भेटीस आले य रामचरित्र वर्णन करण्यास त्यास आज्ञा झाली.

तच्चाप्यविदितं सर्व विदितं ते भविष्यति ।
न ते वागनृता काव्ये काचिदत्र भविष्यति ॥

असा वरही दिला. नंतर

ततः पश्यति धर्मात्मा तत्सर्व योगमास्थितः ।
पुरा यत्तत्र निर्वृत्तं पाणी आमलकं यथा ॥
तत्सर्व तत्त्वतो दृष्ट्वा धर्मेण स महामतिः ।
अभिरामस्य रामस्य तत्सर्वं कर्तुमुद्यतः ॥

योगसामर्थ्याने त्याला मागील हकीगत जशी घडली तशी दिसली, असे लिहिले आहे ही गोष्ट काहीना खरी वाटेल. माझ्यासारखे ती अक्षरशः मान्य करीत नाहीत. वाल्मीकी हे श्रेष्ठ कवी असल्याने त्यांनी आपल्या कल्पनेने एकेक प्रसंग आपलेपुढे उभा केला व हकीगत वर्णिली हे कबूल आहे. उदाहरणार्थ, महाभारतातील लहानशा कथेच्या आधाराने भारवी कवीने 'किरातार्जुनीय' हे महाकाव्य लिहिले.

अनुक्रमणिका

कविकल्पनेने वर्णिलेली गोष्ट घडली असेल किंवा नसेल. वास्तविक प्रकार काय हे अन्य बाहेरच्या पुराव्यावरूनच ठरवावे लागेल.

रामायणात लिहिलेली सर्व हकीगत अक्षरशः खरी आहे, असे मानणाऱ्यांना माझे मत रुचणार नाही, हे उघडच आहे; व त्यांचेकरिता हे उत्तरही नाही.

माझे विचार त्यांचे मताने पाखंडीच. पण श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधीसारखे पुराणसंस्कृतीचे व सनातनधर्माचे अभिमानीही या पाखंडमतास अनुसरणारे आहेत. ही आश्चर्याची, तशीच अभिनंदनीय गोष्ट आहे. 'ज्ञानमंदिरा' च्या पहिल्याच अंकात श्रीमंतांचा 'राष्ट्रोन्नतीचा एकच उपाय' या मथळ्याचा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यात पान १० वर म्हटले आहे : 'दशरथ राजाला मुले होत नव्हती, तर कुलोपाध्याय वसिष्ठमुनीनी अरण्यातील दिव्य वनस्पतींचे ज्ञान असणारा ऋष्यशृंग आणवून पुत्रकामेष्टि यज्ञ केला व त्याने पायस म्हणजे दुधातून घेण्याचे औषध तयार केले. त्यायोगाने साठ वर्षांवर वय गेलेला दशरथ व त्याच्या तीन राण्या, यांची प्रकृती मूल होईल अशी केली. बलशुद्धी, वीर्यशुद्धी व गर्भाशयशुद्धी केली आणि योग्यकाळी त्या तीनही राण्यांना मुले झाली.'

मुले होत नव्हती ती झाली, येवढी कथा श्रीमंतांस मान्य, पुत्रकामेष्टी यज्ञाच्या प्रभावाने मुले झाली. ही रामायणातील अद्‌भुत कथा श्रीमंतांस पटली नाही. त्यांनी काय झाले असावे हे आपल्या विचारशक्तीने ठरवून बलशुद्धी, वीर्यशुद्धी व गर्भाशयशुद्धी करणारे औषध तयार केले असे प्रतिपादिले आहे.

अहिल्येच्या कथेचा विचार श्रीमंतांनी कसा केला आहे पहा : (पान : ११) 'वाटेने गौतमाश्रम उजाड पडलेला पाहून रामानी विश्वामित्रास कारण विचारले. तेव्हा विश्वामित्रांनी अहिल्येच्या इंद्रकृतघर्षणाची हकीगत सांगितली. एकवार कळून न कळून पातक झाले. त्याच्या प्रायश्चित्तार्थ अनेक वर्षे अत्यंत खडतर तपाचरण करणाऱ्या अहिल्येला रामानी पाहिले. असली तेजस्वी स्त्री समाजकार्य सोडून केवळ स्वपूनीतीसाठी तप करते, हे पाहून रामानी गौतम ऋषींची प्रार्थना करून पतिपत्नीचा एकोपा घडवून आणला. हा लोकसंग्रह तेजस्वी माणसाचे हातून चूक झाली तरी त्यांना पश्चात्ताप झाल्यावर समाजात मिळवून घेऊन समाजकार्य करावयास लावणे, हे राष्ट्रातील नेत्यांचे कार्य रामायण काळी होत होते ते, या कथेवरून स्वच्छ दिसते.'

'इतर कसल्याही प्रकारचा आहार न करिता केवळ वायुभक्षण करून व राखेत पडून राहून तू हजारो वर्षे स्वतःच्या रूपाने कोणत्याही प्राण्याच्या दृष्टोपत्तीस न येता या आश्रमात पडून राहशील' असा शाप होता. रामदासासारखे या स्थितीला 'शिळेची स्थिती' म्हणतात. 'अहल्या शिळा राघवे मुक्त केली.' शाप हजारो वर्षे पडून राहण्याचा होता, इत्यादी विचारास न पटणारी गोष्ट बाजूला सारून समाजकार्यावर मुख्य दृष्टी ठेवून अहिल्योद्धाराचे तत्त्व श्रीमंतानी निर्भयपणे प्रतिपादिले आहे, याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करितो. तात्पर्य, रामायणासारखे ग्रंथ वाचताना भाविकपणा जरा बाजूस सारून विचारशक्तीला वाव दिला पाहिजे, हे तत्त्व श्रीमंतांस मान्य आहे.

या उत्तरात वाल्मीकी रामायणातील पुष्कळच श्लोक माझ्या म्हणण्याच्या पुराव्यासाठी मला द्यावे लागले व संस्कृत न समजणाऱ्यांकरिता मराठी भाषांतरही बहुतेक ठिकाणी दिले आहे. या कामी कै.

अनुक्रमणिका

काशीनाथ वामन लेलेशास्त्री, वाईकर यांनी 'मोदवृत्ता' ची पुरवणी म्हणून प्रसिद्ध केलेल्या भाषांतराचा उपयोग केला आहे.

माझ्या लेखाचा मुख्य रोख सुग्रीव व बिभीषण यांनी राज्यलोभाने बंधुद्रोह करून परक्याच्या मदतीने आपल्या भावांचा नाश करविला व हनुमानाने या कामी सुग्रीवास साह्य करून आणि परकियाची सेवा करून जे देशघातकी उदाहरण घालून दिले त्यावर होता. श्री. सरवटे यांनी सुमित्रेच्या गौण प्रश्नावर बराच खल केला आहे. तिचे वकिलपत्र घेऊन 'जशी कौसल्या व कैकेयी तशीच सुमित्रा ही राजकन्या होती' असे विधान ते ठासून करतात. कौसल्या व कैकेयी या राजकन्या होत्या हे मला मान्य आहे. कारण त्यांच्या नावाचाच तो अर्थ आहे. कोसल देशच्या राजाची पुत्री ती कौसल्या, केकय देशच्या राजाची पुत्री ती कैकेयी. त्याचे राजकन्यात्व सिद्ध करण्यास अन्य पुरावा नको. पण सुमित्रा कोणत्या राजाची मुलगी हे श्रीयुत सरवटे सांगण्याचे टाळतात. उलट 'सुमित्रा राजकन्या नसून हलक्या कुळातली होती हा शोध श्री. जाधव यांस कोठे लागला?' असा सवाल करतात; व श्रीवाल्मीकी रामायणात तर कोठेही असा उल्लेख नाही' असा निर्वाळा देतात.

हा शोध मला रामायणातच लागला. सुमित्रा हे नावच सांगते की, ती राजपुत्री नव्हती. कौसल्या व कैकेयी या दोन राजकन्या-राजपत्नीना पायस निमेनिम वाटून दिल्यावर प्रत्येकीच्या वाटणीतील चौथा हिस्सा सुमित्रेस दिला आहे. यावरून ती त्यांच्यापेक्षा कमी दर्जाची, पण यज्ञकर्मात भाग घेण्याच्या योग्यतेची होती, असे उघड होते. बालकांडाच्या १४ व्या सर्गात, ३३ व ३४ पर्यंत श्लोकांत अश्वमेध यज्ञात कौसल्येने तीन तलवारींनी घोड्याला मारून त्याजवळ एक रात्र काढली असा आशय आहे. पुढील ३५ वा श्लोक

होताध्वर्युस्थोद्गाता हयेन समयोजयन् ।
महिष्या परिवृत्यार्थ वावातां अपरां तथा ॥

असा आहे. महिषी, परिवृत्ती व वावाता अशा तिघींना होता, अध्वर्यु व उद्गाता यांनी 'समयोजयन्' केले (अश्लील असल्याने भाषांतर न देणेच बरे). येथे परिवृत्ती व वावाता या दोन स्त्रिया शूद्र जातीच्या, असे विनायक जनार्दन ओकांच्या 'गीर्वाण लघुकोशात' याच श्लोकाचा आधार देऊन सांगितले आहे. पण हे बरोबर दिसत नाही. परिवृत्ती व वावाता, या भिन्नभिन्न पारिभाषिक शब्दांचा भिन्न अर्थ असणेच योग्य आहे. जास्त शोध करिता रामायणाच्या टीकेत ऐतरेय ब्राह्मणभाष्याचा उतारा घेतला आहे, त्यावरून उलगडा झाला. वावाता ही शूद्रजातीय नसून मध्यमजातीय द्वितीय भार्या आहे.

'राज्ञां हि त्रिविधा स्त्रियः उत्तममध्यमामजातीयः । उत्तम जातेः क्षत्रियाया महिषीति नाम मध्यजातेः वेश्याया वावातेति अधमजातेः शूद्राया परिवृत्तिरिति ।'

यातील सुमित्रा ही वावाता होती. तिला २/८ हिस्सा पायसातील मिळाला. पण कौसल्या व कैकेयी यांतील प्रत्येकीस १/८ मिळाला आहे. सुमित्रेला पायस कमी मिळाले व तेही प्रत्येकीच्या वाट्यातले. यावरून त्या दोघींपेक्षा तिची योग्यता कमी होती, हे स्पष्ट आहे. या पायसाच्या वाटणीवरून राम हा तीन अष्टमांशाचा व लक्ष्मण हा एक अष्टमांशाचा असे होते. तसाच संबंध भरत शत्रुघ्न यांचा, म्हणूनच लक्ष्मण हा रामाची व शत्रुघ्न हा भरताची सेवा करीत होता. १८ वे सर्गात ३१ । ३२ श्लोक पाहा:

अनुक्रमणिका

'यदा हि हयमारूढो मृगयां याति राघवः ।
अथैनं पृष्ठतोभ्येति सधनुः परिपालयन् ॥'

तसाच

'भरतस्यापि शत्रुघ्नो लक्ष्मणावरजोहि सः ।
प्राणैः प्रियतरो नित्यं तस्य चासीत्तथा प्रियः ॥'

'सुमित्रेचे पुत्र लक्ष्मण, शत्रुघ्न हे वडील बंधू विद्यमान असता राज्यास अधिकारी नव्हते.....वडील बंधू जिवंत असता धाकट्याचा राज्यावर अधिकार नसतो, ही गोष्ट निराळी. त्या रीतीने भरताचाही राज्यावर अधिकार नव्हता.' असे श्री. सरवटे म्हणतात. पण भरताने लक्ष्मणाप्रमाणे रामाची कधी सेवा केली नाही. उलट त्याचीच सेवा शत्रुघ्न करीत होता. यावरून लक्ष्मणशत्रुघ्नांचा दर्जा रामभरताच्या बरोबरीचा नव्हता इतकेच माझे सांगणे.

राम व लक्ष्मण यांची बरोबरीची योग्यता आहे असे दुसरेही मानीत नसत. हे दोघे भाऊ सुग्रीवाचे पाहुणे असताना किष्किंधाकांडाच्या ८ व्या सर्गातील १२। १३। १४ श्लोकांत यासंबंधाने महत्त्वाचा उल्लेख आहे. राम व महाबलाढ्य लक्ष्मण उभे राहिलेले पाहून

'स ददर्श ततः सालं अविदूरे हरीश्वरः ।
सुपुष्पमीषत्पत्राढ्यं भ्रमरैरुपशोभितम् ॥
तस्यैकां पर्णबहुलां शाखां भंक्त्वा सुशोभितम् ।
रामस्यास्तीर्य सुग्रीवो निषषाद स राघवः ॥
तावासीनौ ततो दृष्ट्वा हनुमानपि लक्ष्मणम् ।
शालशाखां समुत्पाट्य विनीतमुपवेशयत् ॥'

पानांनी भरलेली एक फांदी मोडून सुग्रीवाने जमिनीवर टाकली व ते दोघे (राम व सुग्रीव) तीवर बसले. (लक्ष्मणाला बसण्याला सुग्रीवाने आसन दिले नाही.) त्याचा सेवक हनुमान याने एक फांदी मोडून तीवर ते दोघे, त्या दोघांचे सेवक बसले. सुग्रीव रामाला बरोबरीच्या नात्याने वागवितो. लक्ष्मणास तसे वागवीत नाही. त्याला विनीत हे हेतुगर्भ विशेषण वाल्मिकीने योजिले आहे. तो रामाचा सेवक म्हणून समजून सेवकाकडून त्याची सरबराई होत आहे, ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. पाचव्या सर्गात राम–सुग्रीवाची प्रथम भेट होऊन सख्य झाले, त्या वेळीही असेच घडल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. यावरून हे वर्तन जाणूनबुजून होते असे म्हणणे भाग पडते.

'लक्ष्मण व शत्रुघ्न औरस असता त्यांना अनौरस पुत्रांच्या सेवेचा दाखला कसा देता येईल?' असा सरवटे यांचा प्रश्न आहे. त्यास उत्तर 'साधर्म्यमुपमा भेदे.' भेद असून साधर्म्य असेल तेव्हा उपमा म्हणावी हे आहे. दृष्टांत देताना साधर्म्य पाहिजे, पण भेदही पाहिजे. नसेल तेथे उपमा होत नाही.

माझ्या मागच्या लेखाने बऱ्याच इसमांस धक्का बसला असे दिसते. याही लेखाने तसाच एक धक्का देतो. कौसल्या म्हणजे कोसल देशाची राजपुत्री. दशरथ हा कोसलचा राजा. यावरून कौसल्या ही त्याची सख्खी, सावत्र किंवा निदान चुलत तरी बहीण असावी, असा तर्क पुष्कळ विद्वानांनी केला आहे. सूर्यवंशात सख्ख्या बहिणीशी विवाह करण्याचा आचार होता. जैन व बुद्ध यांच्या ग्रंथात दशरथ व कौसल्या आणि राम

अनुक्रमणिका

व सीता ही भावंडे असल्याविषयी स्पष्ट उल्लेख मोठ्या अभिमानाने केलेला आहे. या आधारावरून सीता व राम ही बहीणभावंडे होती, असे डॉ. सरकार यांनी प्रतिपादन केले आहे. याच आधाराने 'प्राचीन आर्य संस्कृती' या मथळ्याचे माझे दोन लेख फेब्रुवारी व मार्च, १९३४ च्या 'समाजस्वास्थ्या'त प्रसिद्ध झाले आहेत.

इजिप्तमध्ये राजघराण्यात बहिणीला पट्टराणी करण्याची परंपरा पुष्कळ शतके चालू होती.

'उत्कट बंधुप्रेमाचा धडा भरताच्या द्वारे तर रामायण देते की नाही?' असा प्रश्न श्री. सरवटे यांनी केला आहे. ही गोष्ट पहिल्या लेखातच मला कबूल आहे. भरताच्या प्रेमाविरुद्ध एक अक्षरही त्या लेखात मिळणार नाही. पण आता ओघानेच आले म्हणून सांगावे लागते. आजही बंधुप्रीतीचे उदाहरण देताना रामलक्ष्मणाची जोडी असे म्हणतात. हे दोघे भाऊ रामभरतासारखे आहेत असे बंधुप्रीती वर्णिताना कोणीही म्हणत माहीत.

अरण्यकांडाच्या ४५ व्या सर्गात, राम कांचनमृगाच्या मागे गेल्यानंतर 'हा सीते, हा लक्ष्मणा' अशी आर्तवाणी ऐकून रामाच्या सुरक्षिततेची सीतेला काळजी लागली व 'त्याच्या मदतीस जा' असे तिने लक्ष्मणास सांगितले. तो जाईना, तेव्हा ती त्यास कठोर वचन बोलली. ते २२–२७ या सहा श्लोकात दिले आहे. ती म्हणते,

नैव चित्रं सपत्नेषु पापं लक्ष्मण यद्भवेत् ॥ २३ ॥
त्वद्विधेषु नृशंसेषु नित्यं प्रच्छन्नचारिषु ।
सुदुष्टत्वं वने राममेकमेकोऽनुगच्छसि ॥ २४ ॥
मम हेतोः प्रतिच्छन्नः प्रयुक्तो भरतेन वा ।
तन्न सिध्यति सौमित्र तवापि भरतस्य वा ॥ २५ ॥

अर्थ : हे लक्ष्मणा, नेहमी आपले स्वरूप गुप्त ठेवून वागणाऱ्या तुझ्यासारख्या दुष्ट शत्रूचे ठिकाणी अशी पापबुद्धि असणे हे काही आश्चर्य नव्हे. तू अत्यंत दुष्ट आहेस आणि माझ्या (प्राप्ती) करिता, अथवा भरताने सांगितले असल्यामुळे, आपले स्वरूप गुप्त ठेवून वनामध्ये असलेल्या एकट्या रामाच्या मागोमाग तू एकटा जात आहेस; परंतु हे लक्ष्मणा, तुझे अथवा त्या भरताचे ते मनोरथ सिद्धीस जाणार नाही. (२३।२४।२५)

यावरून सीतेच्या मनात लक्ष्मण व भरत या उभयतांच्या शुद्ध हेतूविषयी किल्मिष होते, ते या प्रसंगाने तिच्या तोंडून बाहेर पडले. तिच्या दृष्टीने तरी या बंधुप्रीतीविषयी संशय होताच.

आता सुग्रीवाच्या कथेचा विचार करू : श्री. सरवटे यांनी त्याचे वकिलपत्र घेऊन त्याची बाजू फारच उचलून धरली आहे. 'वाली किष्किंधेत राज्य करीत असता मायावी नामक राक्षसाशी त्याचे द्वंद्वयुद्ध झाले. त्यात तो राक्षस भिऊन पळाला. तेव्हा त्याच्या पाठलागास वाली व सुग्रीव हे बंधू गेले. पुढे मायावी एका विवरात शिरला. तेव्हा त्या विवराच्या मुखाशी सुग्रीवाला बसवून, मी परत येईपावेतो येथेच माझी वाट पाहत बैस; असे त्यास बजावून वाली विवरात शिरला. पुढे बराच काळ लोटला पण वाली परतला नाही, व एक रक्ताचा लोंढा विवरातून बाहेर वाहत आला; त्यावरून वाली आत मारला गेला, अशी सुग्रीवाची समजूत होऊन, तो किष्किंधेस परत आला. वाली मेल्याचे वर्तमान ऐकून मंत्र्यांनी सुग्रीवास राज्यावर

बसविले. काही काळानंतर मायावी व त्याचा बंधुवर्ग यांस मारून वाली विवराबाहेर आला; तो तेथे त्यास सुग्रीव आढळला नाही. तो किंष्किंधेस परत येतो तो, तो राज्य करीत असल्याचे त्यास दिसून आले. तेव्हा सुग्रीवाने आपणाशी कपट केले असे वाटून तो क्रोधाने संतप्त झाला.' अशी थोडक्यात हकीगत श्री. सरवटे देतात.

रामायणात जसे लिहिले तसेच घडले असले पाहिजे. सुग्रीव रामभक्त, त्याचेकडे दोष कसा असणार? वगैरे विचारसरणी ज्याची असेल त्यास वालीच लबाड, भांडखोर, आततायी, त्याला झालेले शासन योग्य, असे वाटेल. पण थोडा विचार केल्यास सुग्रीवाच्या वर्तनावर काही दुसरा प्रकाश पडतो का पाहू.

रक्ताचा लोंढा विवरातून बाहेर वाहत आला, तेव्हा वाली आत मारला गेला अशी सुग्रीवाची समजूत झाली. का? वालीने मायावीला मारणे जास्त संभवनीय नाही काय? 'बराच काळ लोटला तरी वाली परत आला नाही' अशा वेळी भावाच्या मदतीस विवरात शिरणे हे सुग्रीवाचे कर्तव्य होते. वालीच्या हुकुमाप्रमाणे बाहेर राहिला म्हणावे तर तो परत येईपर्यंत तेथेच रहावयाचे होते. वाली मेल्याची खात्री करून न घेता व त्याच्या प्रेताच्या दहनाची काही तजवीज न करिताच विवराचे दार बंद करून सुग्रीव पळून गेला व राज्यावर बसला हेही गैरच. वालीला अंगद नावाचा पुत्र होता. त्याला गादीवर न बसविता आपणच राज्याचा अधिकारी झाला. यामुळे वाली क्रोधाने संतप्त होणे साहजिक होते. श्रीयुत सरवटे यांनी दिलेल्या हकीगतीवरूनच सुग्रीवाचा कावा दिसून येत आहे. ही हकीगत सुग्रीवानेच रामाला आपला चांगुलपणा दिलावा म्हणून स्वतःच्यातर्फे सांगितली आहे. तेव्हा खऱ्या हकीगतीतील काही मुद्दे गाळायचेच.

सुग्रीवाची व रामाची भेट कशी झाली ते विस्ताराने सांगण्याची आवश्यकता नाही. रामलक्ष्मण आलेले पाहून सुग्रीव घाबरला व हे कोण याची चौकशी करण्यास त्याने हनुमानास पाठविले. हनुमानाने त्या दोघांची पुष्कळ स्तुती करुन भावाने हाकून लावलेला सुग्रीव नावाचा धर्मात्मा वीर आहे, त्याने पाठविलेला मी हनुमान आहे, तो आपणा दोघांबरोबर सख्य करू इच्छितो, असे त्यास कळविले. रामाच्या सांगण्यावरून लक्ष्मण हनुमानाशी भाषण करू लागला. तो म्हणाला, 'आम्हाला सुग्रीवाचे गुण माहीत आहेत. आम्ही त्यालाच हुडकीत आहोत तू सांगशील त्याप्रमाणे आम्ही वागू.' हे ऐकून हुनुमान हर्षित झाला.

ततः प्रहृष्टो हनुमान्कृत्यवानिति तद्वचः ।
श्रुत्वा मधुरभावं च सुग्रीवं मनसा गतः ॥
भाव्यो राज्योगमस्तस्य सुग्रीवस्ययो महात्मनः ।
यदयं कृत्यवान्प्राप्तः कृत्यं चैतदुपागतम् ॥
(कि. कां. : सर्ग ४, श्लोक १ । २)

अर्थ : तदनंतर सुग्रीवासंबंधाने रामाचे सौम्य भाषण श्रवण करून व सुग्रीवाचे रामाशी काही कार्य आहे असे जाणून सुग्रीवाचे मनोरथ आता परिपूर्ण होईल असे मनामध्ये आल्यामुळे हनुमानाला हर्ष झाला आणि तो मनामध्ये म्हणाला, 'त्या महात्म्या सुग्रीवाला राज्यप्राप्ती अवश्य होणार. कारण, हा महापुरुष काही कार्याच्या उद्देशाने येथे आला आहे.' पुढे लक्ष्मणाकडून रामाचे काम म्हणजे सीतेचा शोध करणे हे समजल्यावर हनुमानानेही सुग्रीवाचे काम सांगितले :

अनुक्रमणिका

‘ स हि राज्याच्च विभ्रष्टः कृतवैरश्च वालिना ।
हृतदारो वने त्रस्तो भ्रात्रा विनिकृतो भृषम ॥
करिष्यति स साहाय्यं युवयोर्भास्करात्मजः ।
सुग्रीवः सह चात्माभिः सीतायाः परिमागंणे ॥ (सर्ग ४, श्लोक २७।२८).

अर्थ : तो सुग्रीव भ्रात्या वालीशी वैर बांधून असल्यामुळे राज्यापासून भ्रष्ट झालेला आहे व स्त्रीचा अपहार करून भ्रात्याने त्याला अत्यंत दुःख दिले असल्यामुळे तो आता त्रस्त होऊन वनात वास्तव्य करीत आहे. ॥ २७ ॥ तस्मात् तो सूर्यपुत्र सुग्रीव सीतेच्या शोधासंबंधाने आम्हासहवर्तमान तुमचे साहाय्य करील. ॥ २८ ॥

हनुमानाच्या शिष्टाईची सुनावणी रामाकडे करताना लक्ष्मण म्हणाला :

कपिः कथयते हृष्टो यथाऽयं मारुतात्मजः ।
कृत्यवान्सोऽइपि संप्राप्तः कृतकृत्योसि राघव ॥ ४।३१ ॥

‘हे रघुवंशजश्रेष्ठा रामा, हा वायुपुत्र वानर आनंदित होऊन सांगत आहे, त्याप्रमाणे त्या सुग्रीवाचेही कार्य व्हावयाचे आहे, ह्यामुळे आपले कार्य झाल्यासारखेच आहे.’ पहिल्याच भेटीस सुग्रीव रामाकडून वचन मागतो :

रोचते यदि मे सख्यं बाहुरेष प्रसारितः ।
गृह्यतां पाणिना पाणिर्मर्यादा वध्यतां ध्रुवा ॥

‘एकमेकांचे कार्य शेवटास नेण्याविषयी कधीही न फिरणाऱ्या अशा निश्चयाची प्रतिज्ञा होऊ द्या.’ हे सख्य पुढे अग्निसाक्षिक झाल्यावर सुग्रीव आपले कार्य सांगत आहे. (कि. कांड : सर्ग ५, श्लोक २३ । २४)

वालिना निकृतो भ्रात्रा कृतवैरश्च राघव ॥
वालिनो मे महाभाग भर्यार्त्तस्याभयं कुरु ।
कर्तुमहंसि काकुत्स्थ भयं मे न भवेद्यथा ॥ २४ ॥

भ्रात्या वालीने माझा पराजय केलेला आहे, आणि मी त्याच्याशी वैर बांधलेले आहे. तस्मात् हे ककुत्स्थकुलोत्पन्ना महाभाग्यवान रामा, भयग्रस्त झालेल्या मला वालीपासून फिरून भीती न राहील अशा रीतीने आपण माझ्या भयाचा नाश करा’ तात्पर्य, वालीला स्वर्गास पाठवा.

माझी बायको मला परत मिळवून द्या. व माझा भावाशी समेट करा, असे सुग्रीव सांगत नाही. सुग्रीवाचे मागणे स्पष्ट आहे. माझा भाऊ मारून माला गादीवर बसवा. राम त्याच्या भाषणाचा भावार्थ समजला व सुग्रीवाला हसत हसत म्हणाला,

एवमुक्तस्तु तेजस्वी धर्मज्ञो धर्मवत्सलः ।
प्रत्यभाषत काकुत्स्यः सुग्रीवं प्रहसन्निव ॥ २५ ॥

अनुक्रमणिका

उपकारफलं मित्र विदितं मे महाकपे ।
वालिनं तं वधिष्यामि तव भार्यापहारिणम् ॥ २६॥

अर्थ : याप्रमाणे सुग्रीवाने सांगितले असता धर्मवेत्ता व धर्मवत्सल असा राम सुग्रीवाला हसत हसत म्हणाला, 'हे महावानरा, उपकाररूप फल प्राप्त करून देणाऱ्याला मी मित्र समजत असतो. तस्मात्, तुझी भार्या हरण करून नेणाऱ्या त्या वालीचा मी वध करीन.'

रामाचे भाषण ऐकल्यावर सुग्रीवाने अतिशय संतुष्ट होऊन आपला मुख्य मनोरथ रामाला उघडपणे कथन केला तो म्हणाला,

तव प्रसादेन नृसिंह वीर ।
प्रियां च राज्यं व समाप्नुयामहम् ।
तथा कुरु त्वं नरदेव वैरिणं ।
यथा न हिंस्यात्स पुनर्ममाग्रजम् ॥

'हे पुरुषश्रेष्ठा वीरा, तुझ्या कृपेमुळे प्रिया व राज्य ही मला प्राप्त होतील. यास्तव मला तो पुनरपि दुःख न देईल अशा रीतीने त्या माझ्या वैरी ज्येष्ठ भ्रात्यांची, हे. प्रजाधिपते, आपण व्यवस्था लावा. अशा रीतीने स्पष्ट शब्दात राज्य मिळविण्याच्या इराद्याने वालीला मारण्याचा बेत झाला होता. पण श्री. सरवटे म्हणतात, 'त्याच्या सर्व भाषणात कोठेही राज्यलोभाचे चिन्ह दिसत नाही;' डोळे मिटल्यावर दिसणे शक्य नाही.

इतक्यावरच न थांबता 'वालीचा सूड घेण्यासाठी रामाचे साहाय्य घेण्यात सुग्रीवाने अति निंद्य वर्तन केले,' ह्या आपल्या मताच्या पुष्टीकरणासाठी त्यांच्या भांडणाचीही उपपत्ती श्री. जाधव यांनी कल्पनेने काढली आहे म्हणून 'सुग्रीवाचे वर्तन निंद्य दाखविण्यासाठी त्याच्या पदरी राज्याचा लोभ बांधणे ... अवश्य होते. म्हणूनच ते मुळात आधार नसता केले आहे,' असा मजवर आरोप केला आहे सुग्रीवाला राज्यलोभ होता असें मीच म्हणत नाही. राम व लक्ष्मण तसे समजतात, हनुमान तसेच सांगतो व खुद्द सुग्रीव 'मला राज्य मिळवून द्या, माझा वैरी मारा,' असे पाचदहा वेळ तरी विनवून मागतो. सुग्रीवाला जिवानिशी मारण्याचा वालीचा केव्हाही विचार नव्हता. (कि. सर्ग १६, श्लो. ७।८) वाली म्हणतो,

दर्प चास्य विनष्यामि न च प्राणैर्वियोक्ष्यते ॥
अहं ह्याजिस्थितस्यास्य करिष्यामि यदीप्सितम् ।
वृक्षैर्मुष्टिप्रहारैश्च पीडितः प्रतियास्यति ॥ ८ ॥

अर्थ: 'हे तारे, त्यांचा गर्व नाहीसा करीन, तू भय बाळगू नको; तो काही माझ्या हातून प्राणाला मुकणार नाही. सारांश, संग्रामामध्ये स्थित असलेल्या ह्या सुग्रीवाची व्यवस्था मी तुझ्या इच्छेप्रमाणेच करीन, म्हणजे वृक्ष आणि मुष्टिप्रहार ह्यांनी ताडित होऊन तो परत जाईल.'

वाली रामाच्या बाणाने मरणपंथास लागला असता त्याचे सेवक सैरावैरा पळू लागले; त्यास तारा म्हणते,

अनुक्रमणिका

‘राज्यहेतोः स चेद् भ्राता क्रूरेण पातितः :
रामेण प्रसृतैर्दू रान्मार्गणैदूरिपातिभिः ॥’

‘लांबून वेध करणाऱ्या व दूर उभे राहून रामाने सोडलेल्या बाणांनी जर क्रूर भ्रात्या सुग्रीवाने राज्याकरिता भ्रात्याचा वध केला असेल तर पळून काय उपयोग?’

वाली मरण पावल्यावर सुग्रीवाला स्मशानवैराग्य आले व तो शोक करू लागला. त्यात त्याच्या अंतःकरणापासून पश्चात्तापाचे निघालेले उद्‌गार या प्रकरणावर चांगलाच प्रकाश पाडतात. (सर्ग २४)

‘क्रोधादमर्षाददतिविप्रघर्षाद्भ्रातुर्वधो मे ऽ नुमतः पुरस्तात् ’ (६)

भ्रात्याने माझा अतिशयच पराभव केला असल्याकारणाने क्रोधामुळे व असहिष्णुतेंमुळे पूर्वी मला त्याचा वध होणे बरे वाटले होते.

‘न त्वां जिघांसामि चरेति यन्मामयं महात्मा मतिवानुवाच ।
तस्यैव तद्राम वचोनुरूपम् । इदं वचः कर्मच मेऽनुरूपम् ॥ ८ ॥

‘मी तुझा घात करणार नाही, तू चालता हो’ असे जेव्हा विचारी महात्मा मला म्हणाला, ‘ते त्याचे म्हणणे त्यालाच योग्य असून, हे माझे वधरूप कर्म व तो वध घडवून आणणारे भाषण मात्र मलाच योग्य आहे.’ आणखी काही अवतरणे देण्याची जरूरी नाही.

राज्याचा लोभ सुग्रीवाच्या पदरी आधाराशिवाय बांधला, हा श्री. सरवटे यांचा आरोप खरा का खोटा याचा निर्णय वाचक करतीलच.

भावाला मारण्यासाठी रामाची मदत घेतली व क्षत्रियांच्या युद्धनियमांस झुगारून देऊन रामाने वालीला मारले यातही काही गैर नाही, असे ज्यांस वाटते त्याची खात्री करण्याचे सामर्थ्य आमच्या अंगी नाही. क्षत्रियाचा धर्म न्यायाने युद्ध करणे हा आहे पदातीबरोबर पदातीने, स्वाराबरोबर स्वाराने, रथीबरोबर रथीने युद्ध करावयाचे. दोघे युद्धात गुंतले असता तिसऱ्याने शस्त्र टाकावयाचे नाही. असे असताही सुग्रीव व वाली द्वद्वयुद्ध करीत असता रामाने दुरून अंतरावरून झाडाआडून बाण मारून वालीचा प्राण घेतला, हे कृत्य अगदी अधर्म्य झाले आहे. इतकेच नव्हे तर दोघे भाऊ सारखे दिसत असल्याने (सर्ग १२, श्लो ३८। ३९)

अभिज्ञानं कुरुष्व त्वमात्मनो वानरेश्वर ।
येन त्वामभिजानीयां द्वंद्वयुद्धमुपागतम् ॥
गजपुष्पीमिमां फुल्लां उत्पाट्य शुभलक्षणम् ।
कुरु लक्ष्मण कण्ठेऽस्य सुग्रीवस्य महात्मनः ॥
ततोगिरितटे जातामुत्पाट्य कुसुमायुताम् ।
लक्ष्मणो गजपुष्पीं तां तस्य कण्ठे व्यसर्जयत् ॥

अनुक्रमणिका

अर्थ : 'हे वानरराज, तू स्वतःविषयी काही तरी ओळखता येण्यासारखी खूण करून ठेव, म्हणजे द्वंद्वयुद्धामध्ये गुंतलेल्या तुला मी ओळखून काढीन. हे लक्ष्मणा, शुभलक्षणांनी युक्त अशी ही प्रफुल्लित झालेली नागपुष्पी ळता उपटून तू या महात्म्या सुग्रीवाच्या कंठामध्ये घाल.' असे रामाने सांगितल्यावरून लक्ष्मणाने तसे केले.

यावरून वालीला कसे मारावे, याविषयी राम, सुग्रीव व मारुती यांचा कट झाला होता, व रामाने केवळ मारेकऱ्याचे काम केले, असे दिसून येते. सुग्रीवाची बायको परत दे नाही तर माझ्याशी युद्ध कर, असे आव्हान रामाने दिलेंले नाही. तसे केले असते तर रामावरचा दोष काही तरी गेला असता. असा समेट जमवून आणून भावाभावांचे ऐक्य करून दिले असते तर रामाची कीर्ती झाली असती. पण असा समेट सुग्रीवास पसंत नसावा. तसा प्रयत्न करण्यास त्याने सुचविलेही नाही. त्यास वालीचा काटा काढून टाकावयाचा होता.

रामालाही सुग्रीवाचे साह्य सीताशुद्धीच्या व पुढील कामासाठी पाहिजे होते. सुंदरकाण्ड श्लोक ७ – ११ यांत अशोकवनात सीता हनुमानाच्या दृष्टीस पडल्यावर त्याचे मनात आलेले विचार दिले आहेत. त्यात वालीवधासंबंधी दोन आहेत :

अस्याः हेतोर्विलाक्ष्या हतो वाली महाबलः ॥ ७ ॥
ऐश्वर्य वानराणां च दुर्लभं वालिपालितम् ।
अस्या निमित्ते सुग्रीवः प्राप्तवाँल्लोकविश्रुतः ॥ ११ ॥

विशाल नेत्रांनी युक्त असलेल्या या सीतेकरिताच महाबलाढ्य वालीचा वध झाला. ॥ ७ ॥ जगद्विख्यात सुग्रीवालाही वालीने रक्षिलेले वानरांचे दुर्लभ ऐश्वर्य हिच्यामुळेच प्राप्त झाले आहे. ॥ ११ ॥

सुग्रीवाला राज्याभिलाष नव्हता असे म्हणणारांनी त्याचे पुढील वर्तन विचारात घ्यावे. वालीला एक वयात आलेला पराक्रमी व वकीली करण्याच्या लायकीचा सुबुद्ध असा पुत्र होता. त्यास राज्यावर न बसविता तो आपणच राज्यावर बसतो. यावरून राज्य बळकावणे हा त्याचा हेतू मूळापासून होता असे सिद्ध होते.

भावाच्यां बायकोवर हक्क मानीत असत असे मी लिहिले, ते 'ठोकून देतो ऐसाजे' या प्रकारातील असा मजवर आरोप आहे. यासंबंधाचा दाखला महाभारतातून देण्याचा मी प्रयत्न करणार आहे कारण महाभारत हा पाचवा वेद आहे.

वेदः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ।
एतच्चतुष्टयं प्रोक्तं साक्षाद्धर्मस्य लक्षणम् ॥

असे मनूचे वचन आहे. तसेच याज्ञवल्क्याचेही आहे. वेदातील किंवा स्मृतीतील वचन आढळत नसेल व सदाचाराचा म्हणजे थोर लोकांनी एखादी गोष्ट आचरल्याचा दाखला असेल तर ती गोष्ट धर्म्य समजावी. सद्गृहस्थांनी आचरणात आणलेली गोष्ट इतरांस मान्य होते व थोड्याच काळात सर्वत्र रूढ होते.

अनुक्रमणिका

देवांचे गुरु बृहस्पती हे मोठे थोर, विद्वान, सर्वमान्य गृहस्थ होते. ते अन्याय्य, अधार्मिक असे कृत्य करतील असे म्हणणे धाष्ट्र्याचे आहे. त्यांच्या कृत्याचा कोणी निषेधही केलेला नाही; इतकेच नव्हे तर त्यांच्या कृत्यात अडथळा करणाऱ्या गर्भास त्यांनी दिलेला शापही अमलात आला, असे महाभारतकार कंठरवाने सांगत आहेत. (महाभारत, आदिपर्व अध्याय १०४)

उतथ्यस्य यवीयांस्तु पुरोधास्त्रि दिवौकसाम् ।
बृहस्पतिर्बृहत्तेजा : ममतामन्वपद्यत ॥ १० ॥

(नानासाहेब वैद्यांचे भाषांतर). 'उतथ्याचा धाकटा भाऊ मोठा तेजस्वी बृहस्पती देवांचा पुरोहित होता, तो संभोगाच्या इच्छेने ममतेपाशी गेला.'

उवाच ममता तं तु देवरं वदतां वरम् ।
अंतर्वत्नी त्वहं भ्रात्रा ज्येष्ठेना ऽऽरम्यतामिती ॥ ११ ॥

तेव्हा वक्त्यांमध्ये श्रेष्ठ असलेल्या आपल्या दिराला ममता म्हणाली, 'तुझ्या ज्येष्ठ बंधूच्या (समागमापासून) मी गरोदर आहे, म्हणून तू मागे सर.' ॥ ११ ॥

'अमोघरेतास्त्वं चाऽपि द्वयोर्नास्त्यत्र संभवः ।
तस्मादेवं गते त्वद्य उपारमितुमर्हसि ॥ १३ ॥

'तुझे वीर्य फुकट जाण्याचे नाही, आणि दोन गर्भांची सोय (माझ्या उदरामध्ये) होणे शक्य नाही. यासाठी तू आता परत जावेस हेच तुला योग्य आहे.' ॥ १३ ॥

दिराचा हक्क तिला मान्य होता. गर्भवती आहे एवढीच तिची हरकत; 'मी तुझ्या भावाची बायको, तू माझेकडे का येतोस?' असे ती म्हणत नाही हे ध्यानात घ्यावे.

एवमुक्तस्तदा सम्यग्बृहस्पतिरुदारधीः ।
कामात्मानं तदःऽऽत्मानं न शशाक नियच्छितुम्
संबभूव ततः कामी तया सार्धमकामया ॥ १५ ॥

असे तिने योग्य सांगितले असता बृहस्पती जरी उदार मनाचा होता, तरी तो कामातुर झालेला आपले मन आवरू शकला नाही. ॥ १४॥ कामातुर असलेला बृहस्पती इच्छा नसताही तिच्याशी रत झाला. ॥ १५ ॥

व्यासमहर्षीनी या कथेत बृहस्पतीची निंदा केली नाही. त्याला बृहत्तेजा, वदतांवर, महाभाग, उदारधी, भगवान्, ऋषि इत्यादी सन्मानाची विशेषणे लावली आहेत. यावरून बृहस्पतीचे कृत्य अधर्म्य असे भगवान् व्यासास किंवा इतर कोणासही वाटले नाही. देवसभेतील त्याच्या गुरुत्वास हानी आली नाही.एकंदरीत भावाच्या बायकोवर दिराचा हक्क सर्वसंमत होता असे स्पष्ट होते.

अनुक्रमणिका

वालीला मारून राज्य बळकाविल्यावर सुग्रीवास राज्याभिषेक झाला. त्यासमयी त्याने रुमीचा आनंदाने स्वीकार केला. बालीच्या जनानखान्यात राहिल्याने तिला काही भ्रष्टपणा आला असे त्याने किंवा दुसऱ्या कोणी मानले नाही. यावरून भावाच्या बायकोवर दिराचा हक्क मान्य होता असे अनुमान निघते.

सुग्रीवाची बायको रुमी ही वालीने बळकाविली म्हणून तो वध्य झाला असे काही प्रतिपादितात. पण असे करण्यास वालीसही काही कारण होते की नाही, याचा विचार करीत नाहीत. तसे कारण घडले असावे असा तर्क होतो. वालीच्या वधानंतर सुग्रीव राज्यावर बसल्यावर हनुमान त्याचेकडे गेल्याचे २९ वे सर्गात आहे. त्यातील चौथा श्लोक....

स्वां च पत्नीं अभिप्रेतां तारांचापि समीप्सितां ।
विहरन्तमहोरात्रं कृतार्थं विगतज्वरम् ॥

असे सुग्रीवाचे वर्णन आहे. यावरून तारा ही त्याला मिळून बरेच दिवस झाले होते असे दिसते. राज्याभिषेकानंतर थोड्याच दिवसांत ही गोष्ट घडली असावी. म्हणजे मृत भावाच्या बायकोवर हक्क सर्वमान्य असल्याने रुमीसारखीच तीही झाली. हा साहजिक आचार लक्षात घेतला तर प्रथमतः वाली मेल्याची बातमी घेऊन सुग्रीव किष्किंधेस आला आणि त्याला राज्याभिषेक झाला तेव्हाही तारा त्याच्या उपभोगात असणे साहजिक आहे. पुढे वाली परत आल्यावर त्याने सुग्रीवास हाकून देताना त्याच्या बायकोस ठेवून घेतली; असा हा मोबदला असण्याचा संभव आहे.

तर्काने संभवनीय ठरविलेला तारेचा उपभोग खराच होता, असा पुरावा रामायणात किष्किंधा कांडाच्या ४६ व्या सर्गात मिळतो. वालीचे व आपले वैर कसे उत्पन्न झाले ही हकीगत तेथे सुग्रीवाने आणखी एक वेळ रामास सांगताना,

'राज्यं च सुमहत्प्राप्य तारां च रुमयासह ।
मित्रैश्च सहितस्तस्य वसामि विगतज्वरः ॥'

अर्थ : 'आणि अतिशय मोठे वानरराज्य व रुमेसहवर्तमान तारा प्राप्त झाल्यावर त्या वालीच्या मित्रांसह मी निर्भय होऊन तेथे राहू लागलो.' असे नववे श्लोकात सुग्रीवाने कबूल केले आहे. हा पूर्वीचा व्यवहार लक्षात घेतला म्हणजे वालीने सुग्रीवाची बायको ठेवून घेतली म्हणून त्याने मोठा अपराध केला असे म्हणणे योग्य नाही. हा त्यांचा आचारच होता.

वानरांच्या सैन्याची मदत सीतेच्या शोधासाठी व लंकेवर स्वारी करण्यासाठी रामाला पाहिजे होती. वाली राज्यावर असेपर्यंत ही मदत मिळणे शक्य नव्हते. कारण आपली हजारो किंवा लाखो प्रजा दुसऱ्याच्या कामासाठी कोणता राजा युद्धात मारण्यासाठी देईल? ज्याच्यावर मोठे उपकार झाले आहेत असाच ताटाखालचे मांजर झालेला राजा उपयोगी पडेल, हे लक्षात घेऊन रामलक्ष्मणांनी सुग्रीवाचे सख्य संपादिले व आपल्या कामाकरिता वालीचा खून पाडला. म्हणूनच हनुमान म्हणतो,

'अस्या हेतोर्विशालाक्ष्याः हतो वाली महाबलः ॥'

अनुक्रमणिका

एखाद्या राजाच्या अंतर्गत राजकारणात शेजारच्या राजाने हात घालता कामा नये अशी राजनीति आहे. पण स्वार्थ साधण्यासाठी राजांनी कोणती पातके करण्याचे वर्जिले आहे?

'नाहं जानामि केयूरे' या श्लोकाच्या आधारावर लक्ष्मणाने सीतेच्या तोंडाकडे कधीही पाहिले नव्हते अशी ग्वाही देताना ही गोष्ट शक्य आहे काय, याचा विचार झाला नाही. कैक वर्षे अरण्यात एकत्र रहात असता सीतेच्या मुखाचे चुकूनही अवलोकन करण्याचा प्रसंग येऊ नये हेच आश्चर्य! पण ही गोष्ट खरी मानल्यास लक्ष्मणाचा आपल्या चारित्र्यावर भरंवसा नव्हता असे म्हणावे लागते. मी तिचे मुख पाहिल्यास काममोहित होईन अशी भीती असल्यानेच त्याने मुद्दाम मुखावलोकन टाळले असले पाहिजे. या बाबतीत हनुमान श्रेष्ठ ठरेल. 'माझे मन शुद्ध असल्यामुळे परस्त्रीनिरीक्षणापासून मला दोष लागणार नाही' असे हनुमंतांनी आपल्या शंकेचे समाधान केले, असे सरवटेच म्हणतात.

श्री. सरवटे म्हणतात, 'वस्तुतः सुग्रीवाने रामाची मदत घेतली यात गैर काय केले? एका राजाने दुसऱ्या राजाची किंवा व्यक्तीची आपल्या भावाविरुद्ध मदत घेऊ नये, असा राजनीतिशास्त्राचा त्रिकालाबाधित सिद्धांत आहे काय?' प्रश्न योग्य आहे. तसा त्रिकालाबाधित सिद्धांत नाही. पण स्वाभिमानी राष्ट्रांत तसा आचार आहे. आमचा शेजारी अफगाणिस्तान देश पहा. तेथील राज्यावर कोणी बसावे याच्याविषयी तंटे होतात; लढाया होतात; खूनही पडतात. त्यांत शेजाऱ्याला हात घालण्यास वाव मिळत नाही. कोणत्याही पक्षातर्फे परकी इसम लढाईत मिळावयाचा नाही. कारण कोणीही परक्याची मदत घेता कामा नये, असा त्यांचा आचार आहे. तसा आचार नसता तर कोणत्या तरी एका पक्षास इंग्रजांनी मदत दिली असती व आज काबूलवर युनियन जॅक फडकले असते. आमच्या या दुर्दैवी राष्ट्रात खासगी द्वेषाचा सूड घेण्यासाठी पाहिजे त्याची मदत घ्यावी असे प्रतिपादणारे महात्मे प्राचीन काळापासून आजपर्यंत पुढे येत आहेत; म्हणूनच आम्ही आज हजारो वर्षे परक्यांच्या लाथा खात आहोत.

सुग्रीव व विभीषण यांनी रामाची मदत घेतल्यानंतर त्यांच्या देशावर रामाच्या साम्राज्याचे जू बसून त्यांना परतंत्रता आली नाही' अशा एक मुद्दा पुढे आला आहे.

'सुग्रीवाने रामाचा हस्तक सेवक हे नाते पत्करिले असे म्हणण्यासही कारण नाही. दोघांचा मित्रत्वाचा तह झाला... सुग्रीवापासून रामाने खंडणी घेतली नाही' असे श्री. सरवटे म्हणतात. श्री. केळकर म्हणतात, 'राम नेहमी त्यास बरोबरीच्या नात्याने संबोधित.' श्री. धारवाडकरही म्हणतात, 'वालीला मारून मित्रकार्य केल्यानंतर किष्किंधेला (Protectorate) संरक्षणाखालचे संस्थान बनवून गोड घास रामाने बाजूस काढून ठेवला नाही.'

पण आजपर्यंत स्वतंत्र असलेले किष्किंधेचे वानरराज्य यापुढे परतंत्र झाले असे वाल्मीकी वर्णित आहे. वाली व सुग्रीव यांचा बाप मरण पावल्यावर कोणाही दुसऱ्या राजाच्या परवानगीशिवाय वाली गादीवर बसला. पण सुग्रीवाच्या इच्छेप्रमाणे वालीला मारल्यावर पुढे राजा कोणास करावे, याविषयी रामाची मंजुरी घेण्यात आली. पहा : सर्ग २६, श्लोक ४ मध्ये मारुती रामास विनंती करितो :

'भवत्प्रसादात् काकुत्स्थ पितृपैतामहं महत् ।
वानराणां सुदंष्ट्राणां संपन्नबलशालिनाम् ॥
महात्मनां सुदुष्प्रापं प्राप्तं राज्यमिदं प्रभो ।

अनुक्रमणिका

भवता समनुज्ञातः । ... ...
अर्चयिष्यति माल्यैश्च रत्नैश्च त्वां विशेषतः ।
कुरुष्व स्वामिसंबंधं वानरान्संप्रहर्षय ॥'

अर्थ : उत्तम दष्ट्रा आणि समृद्ध बल यांनी युक्त असलेल्या महात्म्या, वानरांचे परंपरागत सुग्रीवाला दुष्प्राप्य राज्य आपल्या प्रसादाने त्यास प्राप्त झाले आहे. आपल्या परवानगीने तो नानाप्रकारचे सुगंध, औषधी व पुष्पे आणि रत्ने यांनी तुझे यथाविधी पूजन करील. स्वामी या नात्याने सुग्रीवाचा वानरांशी संबंध घडवून तू त्यांना आनंद दे.' हनुमानाला राम म्हणाला,

'सुग्रीवो वानरर्षभः ।
प्रविष्टो विधिवद्वीरः क्षिप्रं राज्यैऽभिषिच्यताम्' ॥ ११ ॥

या वानरश्रेष्ठ सुग्रीवाला राज्याभिषेक व्हावा. पुढे

'रामः सुग्रीवमब्रवीत् ॥
वृत्तज्ञो वृत्तसंपन्नमुदारबलविक्रमम् ।
इममप्यंगदं वीरं यौवराज्येऽभिषेचय ॥'

राम सुग्रीवाला म्हणाला, 'या अंगदालाही युवराज कर.' ॥ १२ ॥

वानरांचे राज्य स्वतंत्र राहिले नाही. त्यांचा राजा कोण व्हावा, हे रामाने ठरविले व सुग्रीवाचे पश्चात् कोण राजा होणार हेही मुक्रर केले. किष्किंधेचे स्वातंत्र्य कायम राहते तर रामाचा हुकूम मागण्याची व रामाने हुकूम देण्याची जरूरी नव्हती व मग सुग्रीव राजा न होता अंगद राजा झाला असता. पण नुसत्या मंजुरीवरच किष्किंधेचे पारतंत्र्य सिद्ध झाले असे मी म्हणत नाही. किष्किंधा कांडाच्या ४ थ्या सर्गात रामलक्ष्मणांशी सुग्रीवाचा मंत्री हनुमान याचे प्रथमच भाषण होते. त्यात लक्ष्मणाने १७ व २४ श्लोकांमध्ये मी व राम सुग्रीवाला शरण आहो, तो नाथ असावा असे राम इच्छितो, असे आठ श्लोकांत सात वेळा विनविले आहे. पाचव्या सर्गात हनुमानाने रामलक्ष्मणांची सुग्रीवाबरोबर ओळख करून देताना

'तस्यास्य वसतोऽरण्ये नियतस्य महात्मनः ।
रावणेन हृता भार्या स त्वां शरणमागतः' ॥ ६ ॥

हा तुला शरण आला आहे असे त्यांचे समक्ष बोलतो. मग त्यांचे सख्य बरोबरीचे नाते जमते व ते वालीवधापर्यंत एकासनावर बसतात. वालीचा वध होऊन रामाज्ञेने सुग्रीव राजा झाल्यावर नात्यात कसा फरक पडला ते पाहू.

पाऊसकाळ संपल्यावर वचन दिल्याप्रमाणे सीताशुद्धीचा प्रयत्न सुग्रीव अगत्याने करीत नाही म्हणून त्यास धमकी देण्यासाठी लक्ष्मणास पाठविताना (सर्ग ३०, श्लोक ८१) राम म्हणतो,

अनुक्रमणिका

'न स संकुचितः पंथा येन वाली हतो गतः ।
समये तिष्ठ सुग्रीव मा वालिपथमन्वगाः ॥'

'वाली वध पावून ज्या मार्गाने गेला तो मार्ग काही अगदी संकुचित नाही. तस्मात् हे सुग्रीवा, आपल्या वचनाविषयी खबरदार रहा आणि वालीच्या मार्गास जाऊ नकोस.' हा तर निर्वाणीचा निरोप आहे. पुढील श्लोक तर दयाळु, अवतारी रामाचे हृदय व न्यायबुद्धी स्पष्टपणे उघडे करीत आहे:

'एक एव रणे वाली शरेण निहतो मया ।
त्वां तु सत्यादतिक्रांत हनिष्यामि सबांधवम्'॥ ८२ ॥

'अरे, संग्रामात बाणाने मी वालीचा एकट्याचा वध केला; परंतु तू सत्यापासून भ्रष्ट झाल्यामुळे मी तुझा मात्र बांधवांसह वध करीन.' बिचाऱ्या बांधवांचा काय अपराध? किष्किंधेचे हे राजकारण केवळ रामाच्या कार्यासाठी असल्याने सुग्रीवाला मारून अंगदाला गादीवर बसवून त्याचेकडून कार्य उरकून घ्यावे असाही बेत त्या दोघां भावांत चालला होता. पहा सर्ग ३१, श्लो. ४. लक्ष्मण रामास म्हणतो :

'न धारये कोपमुदीर्णवेगं निहन्मि सुग्रीवमसत्यमद्य ।
हरिप्रवीरै : सह वालिपुत्रो नरेंद्रपुत्र्या विचयं करोतु ॥'

'झालेला हा क्रोध आवरून धरण्यास मी समर्थ नाही. या सत्यभ्रष्ट सुग्रीवाचा मी आजच वध करणार. वानरश्रेष्ठांसहवर्तमान वालीपुत्र अंगद जानकीचा शोध लावील.' पुढे लक्ष्मण किष्किंधेस निरोप सांगण्यास गेला, तेव्हा हनुमान सुग्रीवास सल्ला देतो : (सर्ग ३२ । १७)

कृतापराधस्य हिते नान्यत्पश्याम्यहं क्षमम् ।
अन्तरेणांजलि बध्द्वा लक्ष्मणस्य प्रसादनात् ॥'

'तुझ्या हातून अपराध झाला असल्यामुळे हात जोडून लक्ष्मणाची कृपा संपादन केल्याशिवाय तुला गत्यंतर नाही असे मला दिसते.' आणखी पुनः म्हणतो,

'तस्य मूर्घ्ना प्रणम्य त्वं सपुत्रः ससुहृज्जनं ।
राजंस्तिष्ठ स्वसमये भर्तुर्भार्येव तद्वशे'॥ ३२ । २१ ॥

'यास्तव हे राजा, तू त्याला मस्तकाने प्रणाम कर आणि आपल्या संकेताला धरून राहून भार्या ज्याप्रमाणे भर्त्याच्या आधीन होऊन राहते, त्याप्रमाणे पुत्र व सुहृद्‌गण यांसह तू त्याच्या आधीन होऊन रहा.'

इंग्रजांनी हिंदुस्थानावर आपली सत्ता हळूहळू पसरविली त्याचा इतिहास हेच सांगतो! जॉन कंपनीचे वकील आपल्या इंग्रजी चालीरीती बाजूस ठेवून, बूट काढून व टोपी घालून प्रथमतः दरबारास जात व सेवक म्हणून भेट घेत. पेशवे दरबारच्या चित्रात मालेटसाहेब असेच बसलेले काढले आहेत. दरबारातील सुग्रीव–बिभीषणाचे कोणी अनुयायी त्याच्याकडे येतील त्यास हाताशी धरून, मदत करून, बरोबरीचा, स्नेही, दोस्त असा चंद्रसूर्य असेपर्यंतचा करार करीत. पण याच स्नेही–दोस्तांचे वंशज आज

अनुक्रमणिका

कोणत्या स्थितीत आहेत हे आपण पहातच आहो. त्याना पोलिटिकल एजंट किंवा रेसिडेंट व फॉरीन सेक्रेटरी यांच्या इशाऱ्याप्रमाणे नाचावे लागत आहे. आजच्या राजाचे दिवाण त्यांना पोलिटिकल एजंट किंवा ए. जी. जी. ची मर्जी संभाळण्यास शिकवीत असतात. किष्किंधेच्या राजकारणाचा इतिहास चांगले प्रकारे अभ्यासण्यासारखा आहे. रामलक्ष्मणांनी जे बीज पेरले, त्याचा हा मोठा वृक्ष झाला आहे. त्या इतिहासाची सुधारून वाढविलेली ही पुनरावृत्ती आहे. लक्ष्मण हा अधिराजाचा निरोप सांगणारा पोलिटिकल एजंट किंवा फॉरीन सेक्रेटरी म्हणा, असा आहे. या श्लोकात दिलेला भार्येचा दृष्टांत मोठा समर्पक आहे.

परकियांच्या बाहुबलावर भावाला मारवून राज्यावर बसलेले राजे कसे वागत होते हे सर्ग ३३ यात सांगितले आहे :

रुमा तु वीरः परिरभ्य गाढं वरासनस्थो वरहेमवर्णः।
ददर्श सौमित्रमदीनसत्त्वं विशालनेत्रः स विशालनेत्रम् ॥

(तारा लक्ष्मणाला आत घेऊन आली तरी) उत्कृष्ट सुवर्णासारखी कांती आणि विशाल नेत्र यांनी युक्त असलेला तो वीर सुग्रीव रुमेलाच दृढ आलिंगन देऊन सिंहासनावर बसला होता व त्याने तेथूनच विशालनयन महाशय लक्ष्मणाला अवलोकन केले.

आर्यावर्तातील सुग्रीव व त्याच वंशज यांना आजच्या कालीही हे वर्णन लागू होण्यासारखे असे नाही. लक्ष्मणाला साहजिकच क्रोध आला; तेव्हा सुग्रीवाची घाबरगुंडी उडून तो सिंहासनावरून गडबडीने उतरला व हात जोडून त्याचेपुढे उभा राहिला. लक्ष्मणाने त्याला चांगलाच धाक घातला. (सर्ग ३५, श्लोक १८) 'वालीच्या भेटीला तुला पाठवू', 'वाली ज्या वाटेने गेला ती वाट संकुचित नाही' इत्यादी. सुग्रीवाने क्षमा मागितली. (सर्ग ३६। ११)

'प्रेष्यस्य क्षमितव्यं मे न कश्चिन्नापराध्यति ।'

'या दासाचा काही अपराध झाला असल्यास तो क्षमा करावा.'

लक्ष्मणाच्या सूचनेप्रमाणे सुग्रीव रामाकडे जावयास निपाला तेव्हा तो म्हणाला, (सर्ग ३८।५)

'एवं भवतु गच्छाम स्थेयं त्वच्छासने मया ।'

'ठीक आहे, आम्ही चलतो; मला तुझ्या आज्ञेप्रमाणे वागलेच पाहिजे.'

नंतर दोघे रामाकडे निघाले.

पूर्वी लक्ष्मण व सुग्रीव एका आसनावर बसत नव्हते असे वर दाखविलेच आहे. लक्ष्मणाला त्याचेकडून आसनही मिळत नव्हते. पण आता

अनुक्रमणिका

तामुपस्थापितां दृष्ट्वा शिबिकां वानराधिपः ।
लक्ष्मणारुह्यतां शीघ्र इति सौमित्रिमब्रवीत् ॥ ३८। ११ ॥

तेव्हा ती पालखी आणलेली पाहून 'हे लक्ष्मणा, सत्वर आरोहण कर'असे म्हणाला. ते दोघे एकाच यानातून गेले. (श्लोक. १२). रामाजवळ जाऊन हात जोडून उभा राहिला. (३८। १७). इतकेच नव्हे, तर पूर्वी बरोबरीने बसणाऱ्या सुग्रीवाला

पादयोः पतित मूर्ध्ना तमुत्याप्य हरीश्वरम् ।
प्रेम्णा च बहुमानाच्च राघवः परिषस्वजे ॥ ३८॥ ॥१९॥

नंतर चरणी मस्तक ठेविलेल्या त्या वानराजाला उठवून बहुमानपूर्वक त्याला सप्रेम आलिंगन दिले. ॥ १९॥

परिष्वत्य च धर्मात्मा निषीदेति तथोऽब्रवीत् ।
निषण्णं च ततो दृष्ट्वा क्षितौ रामोऽब्रवीत्तथा ॥

व आलिंगन दिल्यावर 'बैस' असे तो धर्मात्मा त्याला म्हणाला आणि तो जमिनीवर बसला. सुग्रीवाची केवढी अधोगती झाली ती पहा. एका आसनावर बसणे गेलेच. पण आसन न मिळता धुळीत बसावे लागले. मांडलिक राजाकडून खंडणी किंवा मुलूखच घेतला पाहिजे असे नाही आजच्या ७०० हिंदी संस्थानिकांमधील फारच थोड्यांकडून खंडणी मिळते व त्यांचीही थोडंच दिवसात माफ होईल. पण त्यामुळे साम्राज्यसत्तेचा जाच कमी होणार नाही.

तात्पर्य : सुग्रीवाला राज्याची हाव होती. वालीला मारल्याशिवाय राज्य मिळणार नाही हे पाहून, रामाशी सख्य करून त्याचेकडून त्याने वालीस मारविले. सुग्रीवाचा स्नेह करून रामालाही आपले कार्य साधावयाचे होते या दोन स्वार्थात वाली बळी पडला व सुग्रीवास राज्य मिळाले. सुग्रीवाच्या अभिषेकास रामाची परवानगी लागू लागली. रामाच्या पायावर मस्तक ठवावे लागून आसनाशिवाय जमिनीवर बसावे लागले, इतका तो परतंत्र झाला. बरोबरीचे नाते गेले.

रामाने किष्किंधेच्या राजाकडून खंडणी घेतली नाही किंवा मुलूखही तोडून घेतला नाही. तरी त्याचे स्वातंत्र्य नष्ट होऊन त्याचा रामाशी बरोबरीचा दर्जाही गेला. रामाच्या लंकेवरील स्वारीत आपल्या लक्षावधी वानरसेनेस व अमित युद्धास सुग्रीवाला रामाच्या पायी अर्पावे लागले. ही भारी किंमत रामाकडूनभावाचा खून करवून आपणास राज्य मिळवून दिल्याच्या उपकारासाठी द्यावी लागली.

सुग्रीवाच्या या बंधुद्रोहात त्याचा मुख्य सल्लागार, साह्यकारी हनुमानच होता. त्याचेवरही सुग्रीवाइतकीच जबाबदारी येते.

सुग्रीवाच्या अधःपाताचे चित्र वाल्मीकीनी मोठ्या कुशलतेने काढले आहे व त्यांचा उद्देश बंधुद्रोह्याला पुढे किती जबर किंमत द्यावी लागते व तो केवळ आपलाच अधःपात करत नाही, तर सर्व राज्याचेही मोठे नुकसान करतो हे दाखविण्याचा असावा. हे काम त्यांनी उत्तम रीतीने केले आहे.

अनुक्रमणिका

ज्ञानमंदिर, एप्रिल १९३५

अनुक्रमणिका

३ रामभक्त हनुमंत व धर्मात्मा बिभीषण

हा धडा आमच्या राजेरजवाड्यांनी घेतला असता तर सुग्रीवाचे वर्तन निंद्य ठरून बंधुद्रोहास आळा पडला असता. पण रामास विष्णूचा अवतार मानल्यावर, सुग्रीव, हनुमान, बिभीषण, वगैरे त्यास साह्य करणारे व मित्र झालेले, यांची गणना परम भागवतात होऊ लागली. त्यांनी केलेले आचरण खरोखर पाहता निंद्यच. पण ते इतर देवांच्या या अवतारांनी राम या ईश्वरी अवताराच्या भूभार—हरण करण्याच्या कामी साह्य म्हणून केले असल्याने ते चांगलेच असले पाहिजे, अशी भाविक लोकांची समजूत होणे स्वाभाविक आहे. अशी समजूत झाल्याने हे वर्तन इतरांस आदर्श आहे असे प्रतिपादन करण्यात येऊ लागले व तेच वर्तन इतरांस अनुकरणीय ठरले. याचा दोष वाल्मिकीकडे नाही. आमच्या खुळ्या श्रद्धेकडे आहे.

श्रीयुत सरवटे यांचे हनुमद्भक्तीवरील प्रवचन अपूर्व आहे. हनुमद्भक्त स्वार्थाला पारखा असतो व इतर देवांचा भक्त स्वार्थी असतो, असा त्यांच्या प्रतिपादनातून आशय निघतो. यासंबंधाने सरवटे म्हणतात, 'हनुमंताच्या रामचंद्राशी जडलेल्या संबंधाला गुणांवरील अनुरक्ती हे कारण असून त्यापासून हिंदुस्थानातील लोकांनी घेतलेला धडा भगवद्भक्तीचा आहे. त्या संबंधाला देशद्रोहाचा रंग श्री. जाधवांच्या दृष्टीने दिला आहे. हनुमंताचे शिष्य होण्याने महाराष्ट्राची स्वधर्मावरील भक्ती दुणावली; स्फूर्ति प्रदीप्त झाली; शक्ती संघटित झाली आणि ऐक्यभावना उदित होऊन दृढीभूत झाली. त्याचीच फलश्रुती स्वराज्य प्राप्तीत झाली. मोगलांना मिळालेले, इंग्रजांना फितूर झालेले, किंवा त्यांच्या सैन्यात सामील झालेले लोक, या हनुमद्भक्तीला पारखे असल्यामुळेच तिकडे गेले होते. या भक्तांचे त्यांच्याठायी असलेले धर्माविषयीचे औदासिन्य हे त्यांचे शत्रूला मिळण्याचे कारण होते. स्वार्थ किंवा लोभ त्यांना शत्रूला मिळण्यास लावीत होता. तो स्वार्थ व लोभ हनुमद्भक्तीने इतरांमधून नाहीसा केला होता;' इत्यादी.

समर्थ रामदासांनी हनुमद्भक्तीचा प्रसार केला व शिवाजी महाराजांच्या हस्ते स्वराज्याची स्थापना केली अशी श्री. सरवटे यांची समजूत दिसते त्यांचे मते शहाजीराजापासून पूर्वीचे देवगिरीच्या यादवांपर्यंतचे सर्व लोक हनुमद्भक्तीस पारखे होते पण शिवाजीनंतरचे मराठे हनुमद्भक्त झाल्याने त्यांच्या ठिकाणी स्वदेशाभिमान व स्वधर्माभिमान संचरून स्वराज्याची स्थापना झाली. याला पुरावा म्हणून प्रत्येक गावी मारुतीची स्थापना श्रीरामदासांनी केली असा जो समज पसरवून देण्यात येत आहे, त्याचा आधार देण्यात येईल असे वाटते.

हनुमंत हा पूर्वीपासून द्राविडाचा एक प्रख्यात देव आहे. व त्याची देवळे पूर्वीपासूनची होती. श्रीरामदासांच्या पूर्वीची होती. श्रीरामदासांच्या शिष्यवर्गापैकी कोणीतरी आपल्या परमगुरूचे महत्त्व वाढविण्यासाठी रामदासांनी ही देवळे स्थापिली असा समज पसरवून दिला आहे. इ. स. १६७२ पर्यंत श्रीशिवाजी व श्रीरामदास यांची भेटच झाली नव्हती, हे आता सिद्ध झालेले आहे. त्यावरून स्वराज्य स्थापण्याच्या कामी श्रीरामदास व हनुमद्भक्ती यांचा संबंध नव्हता व त्या स्थापनेचे श्रेय हनुमद्भक्तीकड देणे केवळ अंधश्रद्धेचे होईल. भोसल्यांचे घराणे रामभक्त झाले नाही. शिवभक्तच राहिले. शिखरशिंगणापूरचा महादेव हा त्याचा कुलदेव आहे व त्या देवाचे भगवे निशाण श्रीशहाजीने आपला झेंडा केला व श्रीशिवाजीने तोच चालू ठेवला म्हणून तंजावरच्या राजवाड्यावर तो आजही फडकत आहे. श्रीरामदासांस शिवाजीने राज्य अर्पण केले व राज्य दिल्याची चिठी झोळीत टाकली व आपली छाटी म्हणून निशाण भगवे करण्यास समर्थांनी आज्ञा दिली, असा समज रामदासी पंथाने पसरविला आहे. पण हे राज्यदान कल्पित आहे. भगवे निशाण करण्यास रामदासाने सांगितले ही गोष्ट बनावट आहे. श्रीरामदास हे

अनुक्रमणिका

ब्रह्मचारी असल्याने त्याची कफनी व छाटी हुरमुजी रंगाची असे; भगव्या रंगाची नसे. मराठ्यांचे निशाण भगव्या रंगाचे आहे; हुरमुजी नाही. यावरून त्या निशाणाचा संबंध श्रीरामदासांशी लावणे म्हणजे वडाची साल पिंपळास लावण्यासारखेच आहे.

श्रीयुत सरवटे यांचे हे प्रवचन उत्कृष्ट गद्याचा मासला म्हणता येईल. पण त्यातील विचार फोल आहेत. त्या विचाराचा आधार डळमळीत आहे. मराठ्याच्या उत्कर्षाचे सर्व श्रेय हनुमद्भक्तीला देणे म्हणजे निव्वळ अंधश्रद्धा आहे.

श्रीवाल्मीकी रामायणातील हनुमान स्वतः स्वार्थी होता. स्वार्थी सुग्रीवाची तो सेवा करीत होता व बंधुद्रोहाच्या त्याच्या प्रयत्नात त्याने फारच सहाय्य केले आहे. हा हनुमान चतुर, मुत्सद्दी, धोरणी व दुसऱ्याचे हृद्गत बरोबर जाणणारा आहे. यानेच वालीच्या खुनाचा घाट जुळवून आणला व सुग्रीवास राज्य मिळवून दिले सीताशुद्धीच्या कामी व लंकादहनात आणि पुढे युद्धात त्याने अप्रतिम कामगिरी केली आहे व अयोध्येस श्रीराम जाऊन सिंहासनाधिष्ठित झाल्यावर प्रत्येकाची कामगिरी पाहून बक्षिसांची वाटणी झाली तेव्हा हनुमानास पहिल्या प्रतीचे बक्षीस सीतेच्या हस्ते रामाने देवविले आहे. रामाच्या यशाची व आगमनाची प्रिय वार्ता आपणास कळविली म्हणून भरतानेही त्यास मोठी देणंगी दिली आहे.

गवां शतसहस्रं च ग्रामाणां च शतं परम् ।
सकुंडलाः शुभाचारा भार्याः कन्यास्तु षोडश ॥
हेमवर्णाः सुनासोरूः शशिसौम्याननाः स्त्रियः ।
सर्वाभरणसपन्नाः संपन्नाः कुलजातिभि ॥

(यु. कांड सर्ग १२५, श्लो. ४५।४६)

एक लक्ष गाई, शंभर उत्कृष्ट गावे आणि कुंडले व भूषणे यांनी युक्त असलेल्या कुलीन, जातिवंत व शुभ आचरण, उत्कृष्ट नासिका व मांड्या, चंद्राप्रमाणे सौम्य मुखे व सुवर्णतुल्य कंठ यांनी संपन्न असलेल्या सोळा कन्या, भार्या म्हणून मी तुला अर्पण करतो. ही देणगी परत केल्याचा उल्लेख नाही; यावरून तिचा स्वीकार केला असेच दिसते.

वाल्मीकीने हनुमानाची योग्यता फार मोठी वर्णिली आहे.

तेजो धृनियंशो दाक्ष्यं सामर्थ्य दिनयो नयः ।
पौरुषं विक्रमो बुद्धिः यस्मिन्नेतानि नित्यदा ॥

(यु. कां. सर्ग १२८, श्लोक ८२)

तेज, धैर्य, यश, दक्षता, विनय, न्याय, पौरुष, पराक्रम, आणि बुद्धी हे गुण सर्वदा त्या वायुपुत्र हनुमानाचे ठिकाणी वास्तव्य करीत होते.

आज आमचे लोक तो रामाचा एकनिष्ठ सेवक व भक्त या दृष्टीनेच त्याचेकडे पाहात आहेत. त्याची अक्कल, तीक्ष्ण बुद्धी, विद्वत्त्व याची जाणीव फारच थोड्यांस आहे.

अनुक्रमणिका

धर्मात्मा बिभीषण

आता बिभीषणाविषयी विचार करू. हिंदूच्या स्मरणात भागवतासंबंधीचे दोन श्लोक येतात. एकात चौदांची नावे आहेत. दुसऱ्यात निवडक सहाच सांगितले आहेत. यांतील दोघे पूर्वीच्या थोरल्या यादीत नाहीत, तेव्हा ते आदीन् या पदाने घ्यावे लागतील

प्रल्हादनारदपराशरपुण्डरीकव्यासांबरीषशुकशौनकभीष्मदाल्भ्यान् ।
रुक्मांगदार्जुनवसिष्ठबिभीषणादीन्पुण्यानिमान्परमभागवतान्स्मरामि ॥

बलिर्बिभीषणो भीष्मः प्रल्हादो नारदो ध्रुवः ।
षडैते वैष्णवास्तषां स्मरणं पापनाशनम् ॥

या दोनही यादींत बिभीषणाचे नाव आहे.

उत्तरकांड म्हणून वाल्मीकी रामायणात अखेरचे एक कांड आहे. ते सर्वच प्रक्षिप्त आहे, असे पुष्कळ देशी–परदेशी विद्वानांचे मत आहे. पण ते कांडही वाल्मीकीकृत मूळचेच आहे, असे मानणारेही पुष्कळ आहेत. त्यातील कथेत रावण–कुंभकर्ण–बिभीषणांची उत्पत्ती दिली आहे. या तिघांची माता कैकसी ही आपल्या बापाच्या आज्ञेप्रमाणे विश्रवस पौलस्त्याकडे गेली. माझ्यापासून तुला मुले पाहिजेत हे मी समजलो, असे तो म्हणाला. या क्रुर वेळेला तू आलीस म्हणून, तुला स्वभावाने व रूपानेही भयंकर, क्रूर बांधव आवडणारे आणि क्रूर कर्म करणारे राक्षस होतील; असे तिला त्याने सांगितले. तेव्हा ती प्रणिपात करून म्हणाली, 'भगवन्, आपणासारख्या ब्रह्मवेत्त्यापासून अशा प्रकारचे अत्यंत दुराचारी पुत्र प्राप्त होण्याची माझी इच्छा नाही. यास्तव आपण मजवर कृपा करा.' तेव्हा तिजवर प्रसन्न होऊन तो म्हणाला, 'तुझा जो शेवटला पुत्र होईल तो माझ्या वंशाला अनुरूप व धर्मात्मा होईल.' (उत्तराकांड सर्ग ९, श्लो. २७) कैकसीचा शेवटचा पुत्र धर्मात्मा बिभीषण जन्माला आला, तेव्हा 'पुष्पवृष्टी झाली; अंतरिक्षात देवांच्या नौबदी झडू लागल्या आणि 'उत्तम, उत्तम' अशी आकाशवाणी झाली.' (श्लो. ३६, ३७) मोठे झाल्यानंतर कुबेरापेक्षा श्रेष्ठ होण्याच्या इच्छेने आईच्या सांगण्याप्रमाणे रावण व त्याचे धाकटे भाऊ तप करू लागले. ब्रह्मदेव त्यांच्यावर संतुष्ट झाले. ब्रह्मदेव बिभीषणाला म्हणाले,

'बिभीषण त्वया वत्स धर्मसंहितबुद्धिना ।
परितुष्टोऽस्मि धर्मात्मन्वरं वरय सुव्रत ॥'

'वत्सां बिभीषणा, धर्माविषयी मन तत्पर ठेवलेल्या तुझ्यावर मी संतुष्ट झालो आहे. हे सदाचरणसंपन्न धर्मनिष्ठा, तू वर माग.' त्याने वर मागितला तो,

'परमापद्गतस्यापि धर्मे मम मतिर्भवेत् ॥ ३० ॥
आशिक्षितं च ब्रह्मास्त्रं भगवन् प्रतिभातु मे ।
या या मे जायते बुद्धिर्येषु यैष्वाश्रमेषु च ॥ ३१ ॥
सा सा भवतु धर्मिष्ठा तं तं धर्म न पालये ।
एष मे परमोदार वरः परमको मतः ॥ ३२ ॥
न हि धर्माभिरक्तानां लोके किंचन दुर्लभम् ।'

अनुक्रमणिका

अर्थ : 'पराकाष्ठेच्या विपत्तीत जरी मी सापडलो तरी धर्माकडेच माझी मती असावी. (३०) भगवन्, उपदेशावाचून ब्रह्मास्त्राची मला स्फूर्ती व्हावी आणि जी जी बुद्धी ज्या ज्या आश्रमामध्ये मला होईल (३१) ती ती धर्माला अनुसरून असावी व त्या त्या धर्माचे मी परिपालन करावे. हे परम उदारा, हा वर मला अतिशय प्रिय आहे (३२) कारण धर्मनिष्ठांना जगतामध्ये काही दुर्लभ नाही.'

'पुनः प्रजापति प्रीतो बिभीषणमुवाच ह ॥ ३३ ॥
धर्मिष्ठत्वं यथा वत्स तथा चैतद्भविष्यति ।
यस्माद्राक्षसयोनै ते जातस्यामित्रनाशन ॥ ३४ ॥
नाधर्मे जायते बुद्धिरमरत्वं ददामि ते ॥'

अर्थ : यावर प्रसन्न झालेला ब्रह्मदेव बिभीषणाला म्हणाला, (३३) 'हे धर्मिष्ठा, हे वत्सा, तू जशी इच्छा करीत आहेस तसे हे होईल आणि हे शत्रुनाशका, राक्षसयोनीमध्ये जन्म झाला असूनही ज्या अर्थी तुझी मती. अधर्माकडे जात नाही, त्या अर्थी मी तुला अमरत्व देतो.' (उत्तरकांड सर्ग १०. श्लोक ३३–३५).

बापाच्या इच्छेने व आशीर्वादाने आणि ब्रह्मदेवाच्या वराने सिद्ध असा हा धर्मात्या बिभीषण जे जे आचरण करील ते ते धर्माला अनुसरून असलेच पाहिजे असे सकृद्दर्शनी कोणालाही वाटेलच. परंतु आपल्या भावाला सोडून बिभीषण रामाकडे आला व लंकेच्या युद्धात त्याने रामास मदत केली हे त्याचे वर्तन स्वार्थी होते की निःस्वार्थी होते, धर्मी होते की अधर्मी होते, सुष्ट होते की दुष्ट होते याचा विचार करू. मुख्य प्रश्नास हात घालण्यापूर्वी श्री. सरवटे यांनी मला एक सवाल टाकला आहे त्याला जबाब देणे बरे!

मार्चच्या अंकातील १६२ वे पृष्ठावर 'आपल्या भावास मारविणे हा देशद्रोह आहे?' असे श्री. सरवटे यांनी विचारणे केले आहे. साध्या व्यक्तींमध्ये असा प्रकार झाल्यास तो देशद्रोह होत नाही, पण त्या गुन्ह्यास खून किंवा मनुष्यवध म्हणतात. भाऊ रांजा असता त्याचे राज्य मिळविण्याच्या लोभाने परक्या राजाची मदत घेऊन, भावास मारून राज्य मिळविणे यास देशद्रोह म्हणणे भाग आहे. कारण दुसऱ्याच्या उपकारामुळे त्याच्याशी स्वामिसेवकाचे नाते जुळणे टळत नाही, व यामुळे देश परतंत्र होतो. धर्मात्मा म्हणविला जाणारा बिभीषण आपल्या भावाच्या शत्रूस मिळून त्याचेकडून भावाला मारवून त्याचे राज्य बळकावितो. या कारणाने त्याचेवर देशद्रोहाचा आरोप करणे योग्यच आहे. 'परदारापहरण रावणकालात अनीतिकारक व अधर्म्य मानले जात नसे या विधानाला बिलकूल आधार नाही,' असे श्री. सरवटे पृ. १६३ वर म्हणतात; व याच्या पुराव्यासाठी कुंभकर्ण, मंदोदरी, भरत, जटायू वगैरेच्या भाषणांतून उतारे देतात. हे उद्गार व्यक्तींचे आहेत. जबरदस्तीने ज्याची बायको नेली तो व त्याचे हितचिंतक हे कृत्य अधर्म्य असेच म्हणणार, पण या कामी थोर पुरुषांचे विचारच प्रमाण मानावे लागतील.

परदाराहरण जबरदस्तीने केल्यास तो धर्मच आहे, अधर्म नाही; असे धौम्य ऋषींचे मत महाभारतात आहे. (पाहा, वनपर्व अ. २६४). पांडव वनवासात काम्यक वनात असताना ब्राह्मणांच्या भोजनाकरिता शिकार मारून आणण्यास चौघे चार दिशांस पृथक् गेले. ॥ ४ ॥ पुरोहित धौम्याच्या आश्रमात द्रौपदीला ठेवली होती. सिंधूचा राजा जयद्रथ हा तिकडून जात असता द्रौपदी त्याच्या नजरेस पडली. ती अतिसुंदर असल्याने तिलाच घेऊन जावे, असे त्याला वाटले. कोणाची कोण ही चौकशी त्याने एक राजपुत्र पाठवून केली. जयद्रथ तिच्याकडे गेला व म्हणाला, (अध्याय २६७, श्लोक २०)

'भार्या मे भव सुश्रोणि त्यजैनान्सुखमाप्नुहि'॥

'हे सुंदरी, या पाचांना सोडून माझी भार्या होऊन सुख भोग.' यावरून विवाहित स्त्रियांनाही पहिला नवरा किंवा नवरे सोडून अन्याची भार्या होता येत असे, असे अनुमान निघते. तिने हे नाकबूल केल्यावर जयद्रथ जबरदस्तीवर आला. तेव्हा तिने त्याची निर्भर्त्सना केली व मला शिवू नको, असे सांगून भीतीने पुरोहित धौम्याला हाक मारली. जयद्रथाने तिचा पदर धरला तिने त्याला झिडकारून टाकले. 'बलाने धरल्यावर धापा टाकणारी ती राजपुत्री ओढली गेली व धौम्याचे पाय वंदून रथावर चढली.' ॥ २६८ । २५ ॥ तेव्हा धौम्य म्हणाले,

'नेयं शक्या त्यया नेतुं अविजित्य महारथान् ।
धर्म क्षत्रस्य पौराणमवेक्षस्व जयद्रथ'॥ २६ ॥

महारथी (अशा इच्या पतींना) जिंकल्यावाचून हिला नेणे तुला शक्य नाही. हे जयद्रथा, क्षत्रियांच्या पुराण धर्माकडे तू लक्ष दे' पतीला जिंकल्यावर त्याच्या पत्नीला जबरीने नेणे, हा धर्म; आणि न जिंकता नेणे हा अधर्म; असा धौम्याच्या सांगण्याचा अर्थ आहे. या बाबतीत रावणाचे एक वचन येथे देणे युक्त आहे. (अरण्यकांड सर्ग ५५, श्लो. ४३)

अलं व्रीडेन वैदेहि धर्मलोपकृतेन ते
आर्षोऽपं दिवि निष्पंदो यंस्त्वाभिविष्यति ॥

हे सीते, (स्वभर्तृत्यागपूर्वक परपुरुष स्वीकाररूप) धर्मलोपामुळे उत्पन्न झालेली लज्जा आता पुरे. हे देवी तुझा माझा जो संबंध झाला आहे व जो होणार आहे, तो वेदमूलकच आहे. (कारण, बलात्काराने स्त्री हरण करून आणणे हा राक्षसविधी विवाहविधीमध्ये उक्त आहे.)

रावणाचे वर्णन करताना शूर्पणखा ही त्याच्या 'परदाराभिमर्शनाचा' उल्लेख करते. लेलेशास्त्री याचे भाषांतर परस्त्रीवर लक्ष ठेवणारा असे गुळमुळीत करतात. कोषात स्पर्श, बलात्कार, हल्ला, वगैरे अर्थ अभिमर्शन या पदाचे दिले आहेत. त्याच्या या वर्तनाचे एक मोठे महत्त्वाचे उदाहरणही ती देते—

पुरीं भोगवती गत्वा पराजित्य व वासुकीम् ।
तक्षकस्य प्रियां भार्या पराजत्य जहार यः॥

(अरण्यकांड सर्ग ३२, श्लो. १३—१४)

त्याने एकदा पाताळात भागवती नगरीला जाऊन आणि वासुकीचा पराजय करून तक्षकाची प्रिय भार्या जिंकून आणली होती. सीताशुद्धीसाठी हनुमान लंकेस गेला. त्याने रावणाचा वाडा प्रथम शोधला त्यात त्याला रावणाने आणलेल्या अनेक स्त्रिया दिसल्या.

राजर्षिविप्रदेत्यानां गंधर्वाणां च योषिताः ।
रक्षसां चाभवत् कन्याः तस्य कामवशंगताः ।

अनुक्रमणिका

युद्धकामेन ताः सर्वाः रावणेन हृता स्त्रियः ॥

(सुंदरकांड सर्ग ९, श्लोक ६८, ६९)

असे रावणाचे एकूण वर्तन परस्त्रियांबावत पूर्वीपासूनच जबरदस्तीचे होते. बिभीषणासारख्या धर्मात्म्यास याबद्दल काही गैर वाटले नाही. तसे वाटले असते, तर अशा दुष्ट भावास सोडून तो पूर्वीच दुसरीकडे गेला असता. पण तसा न जाता तो लंकेतच राहिला; यावरून रावणाने नवऱ्यांना जिंकून त्यांच्या बायका आणणे, हे कृत्य धर्मास अनुसरून होते, असाच धर्मात्मा बिभीषणाचा समज असावा.

बापाने आपल्या थोरल्या मुलास (कुबेरास) लंकानगरी दिली असता, रावणाने ती त्याचेकडे मागितली. भावाशी तंटा नको म्हणून बापाच्या संमतीने कुबेराने ती सोडून देऊन कैलास पर्वतावर दुसरे नगर वसवले; तेथेही जाऊन त्याच्याशी लढाई करून त्याचे पुष्पक विमान रावणाने जिंकून आणले. हे रावणाचे कृत्य, धर्मात्मा बिभीषण यास न्यायाचेच वाटले असावे. कारण यानंतरही कैक वर्षे तो रावणाच्या दरबारात मोठ्या मानाने व इतमामाने राहिला होता. याशिवाय रावणाने तिन्ही लोक जिंकण्यासाठी म्हणून ज्या स्वाऱ्या केल्याचे उत्तरकाडांत वर्णन आहे त्यात त्याने सर्वांवरच जुलूमजबरदस्ती करून अनेक पापे केली. पर्ण धर्मात्मा जो बिभीषण त्याला या क्रूर वर्तनाचा वीट आला नाही. तो लंकेतच राहिला.

उंट सहज गिळता येतो, पण लहानसा डास गिळताना आयास पडतात अशी इंग्रजी म्हण आहे. त्याचप्रमाणे धर्मात्मा बिभीषणास दुसऱ्याची बायको जबरदस्तीने आणण्याच्या दुष्कृत्यांसुद्धा रावणाचा निर्दयपणा, कामांधपणा उद्दामपणा, वगैरे सर्व दोष खपले. त्या वेळी त्याला सोडून दुसरीकडे जाण्याची इच्छा होत नाही. पण सीतेला जबरदस्तीने आणल्यावर मात्र त्याची धर्मबुद्धी जागी होते, हे आश्चर्च करण्यासारखे आहे.

सीतेला रावणाने जबरीने आणून अशोक वनात ठेवली तेव्हा तिला सांगितले की, तुला बारा महिन्यांची मुदत देण्यात येत आहे. त्या मुदतीत तू मजकडे राहण्यास कबूल झालीस तर बरेच झाले; तशी कबूल झाली नाहीस तर तुला मारून तुझे मांस न्याहारीसाठी घेण्यात येईल. हनुमान लंकेस गेला त्या दिवशीच रावण सीतेकडे गेला होता व मुदतीपैकी १० महिने होऊन गेले, आता फक्त दोनच राहिले आहेत, असे त्याने तिला बजाविले. हीच गोष्ट सीतेनेही हनुमानाला सांगितली आहे. सीता आणखी त्याला सांगते :

'बिभीषणेन च भ्रात्रा मम निर्यातनं प्रति ।
अनुनीतः प्रयत्नेन न च तत्कुरुते मतिम्' ॥ ९ ॥

(सुंदरकांड स. ३७)

'भ्रात्या बिभीषणाने मला परत पाठवण्याविषयी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याप्रमाणे वागण्याची बुद्धी त्यात होत नाही.' 'हें तुला कसे कळले?' असा हनुमानाने प्रश्न केला असेल म्हणून किंवा त्याला येणारी शंका घालवण्यासाठी सीता सांगते,

'जेष्ठा कन्या कला नाम बिभीषणसुता कपे ।
तया मामेतदाख्यातं मात्रा प्रहितया स्वयम्'॥ ११ ॥

अनुक्रमणिका

'हे वानरा, बिभीषणाची कला म्हणून ज्येष्ठ कन्या आहे. त्या कन्येला स्वतः तिच्या मातेने पाठविले असता तिने मला सांगितले,' 'परस्त्री आणलेली परत दे,' असा उपदेश बिभीषणाने रावणास केला, हे योग्यच होते परंतु 'आपण असा सल्ला दिला असता रावण ऐकत नाही' ही बातमी सीतेला देण्याची काही जरुरी नव्हती. तशी नसताही आपण तर बाजूला राहून, बायकोकडून वडील मुलीला सीतेकडे पाठवून, सीतेला बिभीषणाचा चांगुलपणा पटवून देण्याचे जे काम करविण्यात आले आहे, त्यात त्याचा कावा उघडउघड दिसत आहे. बिभीषणाचा हा उपक्रम नुकताच हनुमानाच्या भेटीपूर्वी थोडे दिवसांचा दिसतो. यावरून सीतेला आणून ९–१० महिने झाल्यावर या धर्मात्म्याला या पापाची टोचणी सुरू झाली असावी. वाली रावणापेक्षाही बलवान होता व त्याचे व रावणाचे फार दाट सख्य होते. रामाच्या हातून वाली मारला गेल्याची बातमी लंकेत गेली असणारच. राजे व राजपुरुष यानी अशी बातमी ठेवणे आवश्यकच आहे. ती बातमी ऐकल्यावरच धर्मात्म्या बिभीषणाचा सीता रामास परत दे, असा सल्ला देण्याचे काम सुरू झाले असावे आणि लगेच त्याची खबर सीतेपर्यंत पोचवण्याची खबरदारी घेतली असावी.

सीतेचा निरोप घेतल्यावर आपले काम झाले असतानाही हनुमानाने अशोकवनाचा विध्वंस करून कलागत उत्पन्न केली. पुष्कळसे राक्षस मारले व अखेर इंद्रजिताने त्याला पकडून रावणापुढे उभे केल्यावर 'मी रामाचा दूत आहे, असे समजून माझे हे हितकर भाषण श्रवण कर' असे सांगितले. सीताशुद्धी हे त्याला नेमून दिलेले काम! त्यापुढील सर्व कृत्ये हनुमानाने आपल्या जबाबदारीवरच केली आहेत. त्याचे खरे काम हेराचे आहे. वकिलाचे नव्हे. असे असतानाही मी वकील आहे असे तो खोटेच सांगत आहे. युद्धाच्या वेळी हे सर्व प्रकार क्षम्यच असल्याने यात हनुमानाकडे मुळीच दोष येऊ शकत नाही.

पण त्याचे वास्तविक स्वरूप काय आहे हे ओळखण्याची व त्याप्रमाणे त्याला वागविण्याची जबाबदारी रावण व त्याचे मंत्री यांवर पडते. सुग्रीवाने पाठविलेला दूत म्हणून हनुमान रावणापुढे उभा राहून, तुझ्या सुग्रीव नामक बंधूने कुशल प्रश्न केला आहे, असे सांगून अखेर तो त्याला राम–सुग्रीवाच्या सख्याची व वालीच्या वधाची हकीगत सांगतो. नंतर सीतेचा शोध करण्यास आपण आलो व रावणाच्या घरी सीता दिसली आहे, असे सांगून पुढे रामाचे गुणवर्णन करून, धर्माचरण कर असा उपदेश करून, तो रावणाला भीती पडेल असे भाषण करतो.

स तस्य वचनं श्रूत्वा वानरस्य महात्मनः ।
आज्ञापयद् वधं तस्य रावणः क्रोधमूर्च्छितः ॥

(सुंदरकांड सर्ग ५२, श्लोक १–२५)

महात्म्या वानराचे भाषण श्रवण केल्यानंतर क्रोधाने व्याप्त झालेल्या रावणाने त्याच्या वधाची आज्ञा केली. पण ही गोष्ट बिभीषणाला आवडली नाही. तो म्हणाला,

'क्षमस्व रोषं त्यज राक्षसेंद्र प्रसीद मे वाक्यमिदं श्रुणुष्व ।
वधं न कुर्वंति परावरज्ञा दूतस्य संतो वसुधाधिपेंद्राः ॥ ५ ॥

'हे राक्षसाधिपते, क्षमा असावी; आपला क्रोध सोडून द्या आणि कृपा करून माझे हे भाषण श्रवण करा. सन्मार्गाने वागणारे सदसद्विचारी राजाधिराज दूतांचा वध करीत नाहीत. ॥ ५ ॥ याच एका मुद्यावर आणखीही त्याने सांगितले. ते सर्व ऐकून रावण अतिशयच क्रुद्ध झाला व म्हणाला, 'हे शत्रुनाशक, पाप्याचा

अनुक्रमणिका

वध करण्यात पातक नाही. यास्तव मी या पापी वानराचा वध करीत आहे' तरीही बिभीषणाने आपला आग्रह सोडला नाही व मोठे मुत्सद्दीगिरीचे असे भाषण करून हनुमानाचा वध न करिता त्याला काहीतरी विरूप करण्याची शिक्षा व्हावी, असा हूकूम मिळवला; व तो रावणाने केवळ भावाचे मन मोडू नये म्हणून दिला असावा. उत्तरकांडात १३ वे सर्गात कुबेराने रावणाकडे पाठवलेल्या दूताची हकीगत आहे. पहा उ. कां. सर्ग १३, श्लोक ११–४१. (विस्तारभयास्तव श्लोक न देता फक्त भाषांतर देत आहे.) 'रावणाचे इत्यंभूत वर्तमान धनाधिपती कुबेराला समजून आल्यावरही, आपल्या कुलाला अनुरूप असे आपले योग्य वर्तन कोणते याचा त्या धर्मवेत्त्या कुबेराने विचार केला. आणि खरे खरे भ्रातृप्रेम दर्शविण्याकरिता रावणाला हिताची गोष्ट कळवावी या उद्देशाने त्या कुबेराने लंकेमध्ये एक दूत पाठवला. लंका नगरीमध्ये गेल्यानंतर तो दूत बिभीषणाकडे गेला असता, त्याने त्याचे यथाविधी आदरातिथ्य करून आगमनाचे कारण विचारले आणि वैश्रवण राजासंबंधाने आपल्या नातेवाईकासंबंधाने कुशल प्रश्न केल्यानंतर सभेमध्ये बसलेला रावण बिभीषणाने त्या दूताला दर्शविला. आपल्या तेजाने झळकत असलेल्या राजाला तेथे अवलोकन करून आणि तुझा 'जयजयकार असो' या शब्दाचा मान देऊन (क्षणभर) स्वस्थ उभा राहिला' आणि त्याने निरोप सांगितला, त्यातील महत्त्वाचा भाग ३१–३२ श्लोकांत आहे; तो असा : 'मी परत आलो असता तुझा दुष्ट हेतू मी ऐकला. तस्मात् कुलाला ज्याच्या योगाने बट्टा लागणार आहे अशा अत्यंत पापकर्मापासून तू निवृत्त हो! ऋषिगणासह देव तुझ्या वधाच्या उपायाविषयी विचार करीत आहेत. 'रावणाला क्रोध आला, त्यामुळे दूताचा वध केला आणि दुरात्म्या राक्षसांना तो दूत त्याने खावयास दिला.' या वेळी दूत अवध्य आहे, त्यास मारू नये, असे बिभीषण बोलल्याचा उल्लेख नाही. खरा दूत असल्यास तो राजाला कसा भेटत असे, हा आचार येथे दिसून येत आहे. कोणातरी दरबारी माणसास भेटून त्याचेमार्फत राजास भेटावयाचे असते व मग राजास निरोप नम्रपणे कळवावयाचा असतो.

मारुतीचा दूतपणा अगदी निराळ्या स्वरूपाचा. गुप्त रीतीने तो सर्व लंकेची पाहणी करतो, सर्व माहिती मिळवितो, सीतेला भेटून निरोप पोचवितो, उलट निरोप घेतो आणि गुपचुप आल्याप्रमाणे निघून न जाता मुद्दाम भांडण काढून राजाच्या सेवकांस मारतो. पकडून आणल्यावर सुग्रीवाने आपणास निरोप सांगितला आहे. तो सांगून आपण दूत आहे असे म्हणतो. बिभीषणासारख्या धर्मात्म्यास व शहाण्या माणसास हनुमानाचे वर्तन खऱ्या दूतास शोभण्यासारखे नाही हे समजले नाही, भोळेपणाने त्याला हनुमान दूत आहे असे वाटले, असे दिसत नाही. त्याच्या एकंदर वर्तनावरूनच तो दूत नसून हेर होता हे प्रत्येकास कळण्यासारखे आहे. असा हेर वध्यच असतो. हनुमानाचा वध झाला असता तर पुढील ग्रंथच आटोपला असता. सीतेची बातमी न लागल्याने लंकेवर स्वारी झाली नसती. पण बिभीषणाच्या पुढील वर्तनावरून त्याला ही स्वारी होणे इष्ट होते व म्हणून त्याने हनुमानास वाचविण्यासाठी पराकाष्ठा केली. भावाची भीड रावणाने ऐकिली व स्वल्प शिक्षेवर हनमानास सोडले. पुढे त्याने लंका जाळली तेव्हा बिभीषणाचे उपकार स्मरून त्याचे तेवढे घर पेटविले नाही; वाचविले.

वर्जयित्वा महातेजा बिभीषणगृहं प्रति ।
क्रममाणः क्रमेणैव ददाह हरिपुंगवः ॥

(सर्ग ५४, श्लो १६)

यावेळी धर्मात्म्या बिभीषणाने भावाच्या हिताविरुद्ध त्याच्या शत्रूला साह्य होईल असा सल्ला दिला आहे. लंकादहन करून हनुमान गेल्यावर रावणाने पुढे काय करावे, याचा विचार करण्याकरिता मंत्रिमंडळ भरविले. मंत्र्यांनी त्याच्या सामर्थ्याची स्तुतीच केली व युद्ध करावे असा सल्ला दिला. प्रहस्त सेनापती

अनुक्रमणिका

लढाईवर जाण्यास सिद्ध झाला. दुर्मुख, वज्रदंष्ट्र यांनीही तसेच सांगितले. वज्रदंष्ट्राने तर शत्रूला आपल्या मुलुखावर चालून येऊ देऊ नये, त्याचेवरच आपण जाऊन पडावे व त्याच्या सैन्यात भेद करावा असा सल्ला दिला. याप्रमाणे अनेकांची भाषणे झाल्यावर सर्वांना थोपवून धरून खाली बसवून बिभीषण हात जोडून भाषण करू लागला. 'साम, दाम आणि भेद यांनी जी गोष्ट असाध्य आहे ती प्राप्त करून घेण्यास पराक्रमाचा उपयोग योग्य.' रामाच्या पराक्रमाचे भडक वर्णन करून 'सीता आणण्याचे कृत्य रावणाने गैर केले आहे, खराला त्याने मारले यात त्याचा अपराध नाही. त्याला सीता देऊन टाक; तुला आपण होऊन जर सीता द्यावयाची नसेल तर मी तुझी प्रार्थना करीत आहे आणि बंधुत्वामुळे तू माझे म्हणणे ऐक!' इत्यादी प्रकारे त्याने विनविले... 'तात्पर्य, तू प्रसन्न होऊन दशरथपुत्र रामास मैथली अर्पण कर; म्हणजे पुत्र व बांधव यांसहवर्तमान आपण जिवंत राहू.' असे म्हणून त्याने भाषण संपविले. रामाची स्तुती व त्याच्यापासून राक्षसकुलाचा होणारा नाश, यावर बिभीषणाने जोर दिला होता व त्यामुळे रावणासारख्या पराक्रमी, जगज्जेत्या अभिमानी पुरुषाला क्रोध येणे साहजिक होते. तथापि क्रोध न करता 'सर्वांना जाण्याची अनुज्ञा देऊन रावण स्वगृहामध्ये प्रविष्ट झाला.' (सर्ग ९)

तदनंतर प्रातःकाल झाल्यावर बिभीषण रावणाच्या घरी गेला. यावेळी रावणाने त्यास बोलाविले नव्हते; आपण होऊन तो जात आहे. बंधुप्रीतीमुळे पुन्हा उपदेश करण्यास गेला असे म्हणता येईल. (सर्ग १०)

'बिभीषणाने रावणाला वंदन केले व रावणाने नजरेच्या खुणेने दाखवलेल्या आसनावर तो बसला.' त्याने सीता आणल्यापासून आम्हाला सर्व प्रकारची दुश्चिन्हे होत आहेत, यासाठी रामाला सीता देऊन टाकावी; हीच निष्कृती मला योग्य दिसते... माझ्या सांगण्याचा योग्य रीतीने विचार करून त्याप्रमाणे तू वाग' असे सांगितले. ते ऐकून रावणाला संताप आला व तो म्हणाला, 'मला कसलेही भय वाटत नाही आणि रामाला सीता कधीही प्राप्त होणार नाही. कारण इंद्रासहवर्तमान देवांचे सहाय्य असले तरीसुद्धा संग्रामामध्ये राम माझ्यासमोर उभा राहील कसा?' नंतर त्याने बिभीषणास जाण्याची परवानगी दिली. (सर्ग १०, श्लोक २८)

आणखी थोड्याच दिवसात रावणाने फौज जमा करण्यास हुकूम देऊन मोठी सभा केली. तेथे बिभीषणासह सर्व मंत्री आले. सर्व आपआपल्या आसनांवर बसले. (सर्ग ११.) या सभेत कुंभकर्णही होता. त्याने सीता आणल्याबद्दल भावास दोष दिला; पण भावासाठी लढण्याचीही प्रतिज्ञा केली. इतरांनीही युद्धात लढण्याचे आश्वासन दिले. नंतर बिभीषण बोलू लागला. त्याच्या भाषणात शत्रूची स्तुती व 'सीता देऊन टाक' हा उपदेश! याशिवाय अन्य मुद्दाच नाही. कुंभकर्ण, इंद्रजित हे रामापुढे टिकाव धंरू शकणार नाहीत व तू इंद्राच्या किंवा मृत्यूच्या अंकावर बसलास तरी रामाच्या हातून जिवंत सुटणार नाहीस असे म्हणण्यास त्याने माघार घेतली नाही. वास्तविक अशा प्रकारे कुंभकर्ण, इंद्रजित किंवा खुद्द रावण यांचा इतका अपमान करणे योग्य नव्हते. रावणास क्रोध येऊन त्याने अत्याचार करावा व आपणास लंका सोडून जाण्यास काहीतरी सबब मिळावी असाच त्याचा कावा दिसत आहे. पण रावण शांत राहिला. पुढे प्रहस्त म्हणाला, 'देवांपासून किंवा दानवांपासून आम्हास भय असल्याचे मुळीच माहीत नाही. तेव्हा रामापासून आम्हाला भय कुठले?' बिभीषणाची भाषणाची पाळी संपली असताही त्याने पुन्हा भाषण केले. त्यात रामाचा पराक्रम पुन्हा वर्णिला असून त्याच्यापुढे प्रहस्त, कुंभकर्ण, इंद्रजित, रावण वगैरे कोणाचाही टिकाव लागणार नाही; यासाठी रामाला सीता देऊन टाकावी; हेच मी आपणा सर्वांच्या हिताचे बोलत आहे असे तो म्हणाला. यातही कोणीकडून तरी चिडून आपणास जाण्याची संधी मिळावी हाच उद्देश दिसतो. कारण त्याच्या

अनुक्रमणिका

सल्ल्याप्रमाणे सीता परत दिली असती, तर रामाचा पराक्रम मोठा म्हणून त्याला भिऊन आपला जीव व राज्य वाचावे या उद्देशाने परत दिली असे सिद्ध झाले असते.

आपण भ्यालो, आपण पराभव पावलो, ही गोष्ट मानधन रावण केव्हाही कबूल करणार नाही, ही बिभीषणाची खात्री होती. धर्मशास्त्राचीच लटपट करून अमुक करणे योग्य, अमुक अयोग्य, असे समजून दिल्यास रावण आपले ऐकतो. हनुमान दूत आहे म्हणून अवध्य आहे, ही गोष्ट रावणाने मान्य केली; यावरून बिभीषणास तो अनुभव होताच. म्हणून दुसऱ्याची बायको चोरून आणणे हे पाप आहे वगैरे मुद्यांवर तो जोर देत नाही. तर रामाचे सामर्थ्य थोर आहे, तो आम्हाला मारील, आम्हाला दुश्चिन्हे होत आहेत वगैरे चीड वाढण्याच्या गोष्टींवर जास्त जोर देत आहे. हा या धर्मात्मा म्हणविला जाणाऱ्या बिभीषणाचा कावा आहे. त्याला हे युद्ध पाहिजे. पण आपण शांततापिय हा लौकिकही पाहिजे, शिवाय भावाला सोडून जाण्यासाठी सबबही पाहिजे. अशा धोरणाने तो बोलत आहे असे दिसते.

इंद्रजिताला या भाषणाची सहजच चीड आली व त्याने बिभीषणाची चांगलीच खरड काढली. यावर बिभीषणाने पुन्हा तिसरे भाषण केले. यात त्यांनी इंद्रजिताला पुष्यळच शिव्या दिल्या आहेत. तो म्हणतो,

पुत्र प्रवादेन तु रावणस्य त्वमिंद्रजिन्मित्रमुखोऽसि शत्रूः ।
यस्येदृशं राघवतो विनाशं निशम्य मोहादनुमन्यसे त्वम् ॥ १० ॥
त्वमेव वध्यश्च सुदुर्मतिश्च स चापि वध्यो य इहानयत्त्वाम् ॥ ११ ॥
मूढोऽप्रगल्भोऽविनयोपन्नः तीक्ष्णस्वभावोऽल्पमतिर्दूरात्मा ।
मूर्खस्त्वमत्यंतसुदुर्भतिश्च त्वमिंद्रजिद्बालतया ब्रवीषि ॥ १२ ॥
को ब्रह्मदंडप्रतिमप्रकाशानर्चिष्मतः कालनिकाशरूपान् ।
सहेत बाणान्यमदंडकल्पान् समक्षयुक्तान्युधि राघवेण ॥ १३ ॥
धनानि रत्नानि सुभूषणानि वासांसि दिव्यानि मणींश्च चित्रान् ।
सीतां च रामाय निवेद्य देवी वसेम राजन्निह वीतशोकाः ॥ १४ ॥

'पुत्र म्हणून प्रसिद्ध असलेला तू इंद्रजित मित्रासारखा जरी भासत आहेस तरी रावणाचा शत्रू आहेस. कारण रावणाचा अशाप्रकारे रामापासून नाश होईल हे श्रवण करूनही मोहामुळे पुनरपि त्या रावणाला (पापबुद्धीपासून परावृत्त न करिता) अनुमोदनच देत आहेस. अत्यंत दुर्बुद्धी असलेल्या तुझाच वध करणे योग्य असून ज्याने तुला येथे आणले तोही वधास पात्र आहे. हे इंद्रजिता, तू मूढ, अप्रगल्भ, उद्धट, स्वभावाने क्रूर, अल्पमती, दुरात्मा, मूर्ख व अत्यंत दुर्मती असून बालपणामुळे भाषण करीत आहेस. अरे, ब्रह्मदंडासारखे ज्याचे तेज आहे आणि प्रलयकालाच्या अग्नीप्रमाणे ज्यांचे रूप आहे असे, राघवाने युद्धामध्ये समक्ष सोडलेले यमदंडतुल्य व उज्ज्वल बाण सहन करण्यास कोण बरे समर्थ आहे?

हे राजा, संपत्ती, रत्ने, उत्कृष्ट भूषणे, दिव्य वस्त्रे, अद्‌भुत मणी आणि सीतादेवी रामाला अर्पण करून आपण येथे निर्भय राहू.'

एखादा लिलावातला जिन्नस घेण्याची जरुरी असली म्हणजे गरजू माणूस चढवीतच जातो; त्याप्रमाणे या तीन वेळच्या भाषणाचा प्रकार आढळेल. पहिल्या भाषणात रामाची स्तुती केलेली होती. ती निष्फळ झाल्यावर दुसऱ्या भाषणात रामाची स्तुती तर केलीच आहे, पण वर प्रहस्त, कुंभकर्ण, इंद्रजित,

अनुक्रमणिका

रावण यांचा टिकाव लागणार नाही, असे म्हणून त्या सर्वांचा तेजोभंग केला आहे. येवढ्यानेही त्याचा कार्यभाग झाला नाही. रावणाने त्याला हाकून दिले नाही. म्हणून इंद्रजिताचे भाषण झाल्याबरोबर दरबारात अगदी मर्यादा सोडून व सभ्यतेस फाटा देऊन भाषण केले आहे. इंद्रजित हा रावणाचा थोरला मुलगा, मोठा पराक्रमी, इंद्राला त्याने जिंकले; अशा पुत्रास भर दरबारात शिव्या देऊन तुझा वध करणे योग्य आहे, असे म्हणणे व तुला येथे आणले त्याचाही वध करणे योग्य आहे, म्हणजे पर्यायाने रावणाच्या सहनशीलतेचा अंत पहाणे आहे. पण इतक्यानेही आपला कार्यभाग साधणार नाही, अशी भीती पडूनच की काय, बिभीषणाने आपला अखेरचा डाव टाकला आहे. आतापर्यंत सीतेला परत दे, इतकेच त्याचे सांगणे असे. त्यात काही विशेष नव्हते. दुसऱ्याची लाटलेली बायको परत देण्यात फारसा कमीपणा नाही. बृहस्पतीची भार्या तारा ही चंद्राचे घरी बरेच दिवस हौसेने राहिली होती, ती ब्रह्मदेवाच्या मध्यस्थीने चंद्राने परत दिली. तशी सीता परत दिली असती, तरी त्यात रावणाचा मोठासा अपमान नव्हता. पण तिच्याबरोबर रत्ने, उत्कृष्ट भूषणे, दिव्य वस्त्रे, अद्‌भुत मणी वगैरे संपत्तीचा नजराणाही दे, असे सांगणे म्हणजे रावणासारख्या मानधन राक्षसाचा मोठाच अपमान आहे. असा नजराणा पाठविणे म्हणजे मी तुला शरण आलो आहे, तू मला जिंकशील अशी मला खात्री वाटत आहे, वगैरे कबुली देणे आहे. अशा प्रकारे रावणाला चिडविण्याचा बिभीषणाचा हा अखेरचा डाव आहे.

ज्ञानमंदिर १ – ५ – ३५

अनुक्रमणिका

४ धर्मात्मा बिभीषण

बिभीषणाचे भाषण ऐकल्यानंतर त्याच्या (बिभीषणाचा) अपेक्षेप्रमाणे रावणाला राग आलाच. शूर व पराक्रमी मुलाचा अपमान व स्वतःचाही अपमान कोण सहन करील? म्हणून त्याने क्रोधाने बिभीषणाची निंदा केली यात आश्चर्य नाही. पण रावण थोर मनाचा होता व भावावर त्याचे खरे प्रेम होते. त्याने त्याला दुष्ट इतकेच विशेषण लावले व धिक्कार केला. पण शारीरिक क्लेश देण्याची किंवा जीव घेण्याची भीती घातली नाही.

रावण म्हणाला,

'योऽन्यस्त्वेवंविधं ब्रूयाद्वाक्यमेतन्निशाचर
अस्मिन्मुहूर्ते न भवेत् त्वां तु धिक्कुलपांसन ॥'

(यु. कां. स. १६, श्लोक २६)

अर्थ : 'हे निशाचरा, दुसऱ्याने जर कोणी अशा प्रकारचे भाषण केले असते तर या क्षणामध्येच तो कायम राहिला नसता. परंतु हे कुलपांसना बिभीषणा, तुला धिक्कार असो.' याचा अर्थ अस्पष्ट आहे. 'तू जे भाषण केलेस तसे करणाराला वधाचीच शिक्षा योग्य; पण तू माझा भाऊ आहेस यासाठी तुला मी ती शिक्षा देत नाही. फक्त तु कुळाला बट्टा लावणारा आहेस. तुला धिक्कार असो, असे मी म्हणतो.'

याप्रमाणे रावणाने बिभीषणाची फक्त कडक निर्भर्त्सना केली. त्यास देहांतशासनाची भीती घातली नाही. किंवा दुसराही कसलाही प्रतिबंध केला नाही. रावणाचे हे भाषण त्याला सोडून जाण्यास बिभीषणास पुरेसे कारण वाटले. (युद्धकांड सर्ग १६, श्लोक १७)

इयुक्तः परुषं वाक्यं न्यायवादी बिभीषणः ।
उत्पपात गदापाणिश्चतुर्भिः सह राक्षसैः ॥

याप्रमाण रावणाने कठोर भाषण केले असता न्यायाला अनुसरून भाषण करणारा तो गदापाणी बिभीषण चार राक्षसांसहवर्तमान तेथून अंतरिक्षात उडाला. तेथून तो आपल्या भावाला बोलला :

"स त्वं भ्रांतोसि मे राजन् ब्रूहि मां यद्यदिच्छसि ।
ज्येष्ठो मान्यः पितृसमो न च धर्मपथे स्थितः ॥
इद हि परुषं वाक्य न क्षमाम्यग्रजस्य ते"॥ १९॥

'हे राजा, तू भ्रांतिग्रस्त झाला आहेस. त्याची ज्याची तुला इच्छा असेल, ते तू मला सांग. (हे भाषांतर बरोबर नाही. तुझ्या मनाला येईल ते तू मला म्हण असे पाहिजे.) तू जेष्ठ भ्राता असल्यामुळे पित्याप्रमाणे मला पूज्य आहेस परंतु धर्ममार्गाने वागणारा नाहीस. यास्तव तू ज्येष्ठ भ्राता असलास तरी या तुझ्या कठोर भाषणाची मी तुला क्षमा करणार नाही.' तो आणखी म्हणतो,

अनुक्रमणिका

“दीप्तपावकसंकाशैः शितैः कांचनभूषणै ।
न त्वामिच्छाम्यहं द्रष्टुं रामेण निहत शरैः ” ॥ २३ ॥

‘सुवर्ण भूषणांनी युक्त, तीक्ष्ण व प्रदीप्त अग्नीसारखे दैदीप्यमान अशा रामाने सोडलेल्या बाणांनी तुझा वध झाला आहे असे पाहण्याची माझी इच्छा नाही.’

“तन्मर्षयतु यच्चोक्तं गुरुत्वाद्वितमिच्छता ।
आत्मानं सर्वथा रक्ष पुरी चेमा सराक्षसाम् ॥ २५ ॥
स्वस्ति तेऽस्तु गमिष्यामी सुखी भव मया विना” ॥ २६ ॥

‘तू ज्येष्ठ भ्राता असल्यामुळे तुझे हित व्हावे या इच्छेने जे काही मी भाषण केले त्याची तू क्षमा कर. आणि आपले व राक्षसांसहवर्तमान या लंकानगरीचे सर्व प्रकारे रक्षण कर. ॥ २५ ॥ तुझे कल्याण असो; मी जातो माझ्यावाचून तू सुखाने रहा.’ ॥ २६॥

सीतेला रामाकडे परत पाठवून संधी करण्याबद्दल बिभीषणाने रावणास सल्ला दिला. तो त्यास पटला नाही व त्याने उलट बिभीषणाची निर्भर्त्सना केली. तेव्हा तू भ्रांत झाला आहेस व धर्माचा मार्ग सोडून दिला आहेस, तेव्हा तुजजवळ रहाणे युक्त दिसत नाही. यासाठी मी आता जातो, असे उघडपणे सांगून आपल्या चार अमात्यांसह बिभीषण रामास येऊन मिळाला असे श्री. सरवटे म्हणतात. रावणाला चीड येण्यासारखे व त्याने अमान्य करणेच’ भाग असा सल्ला दिला असता रावणाने निर्भर्त्सना करणे क्रमप्राप्तच होते हे वर दाखविलेच आहे. बिभीषण जातो म्हणून उघडपणे सांगून गेला आहे हे खरे, पण आपण रामाच्या आश्रयास जातो असे त्याने सांगितले नाही, इतकेच नव्हे, तर रामाच्या बाणाने तुझा वध झालेला मला पाहवणार नाही म्हणून मी जातो असे बोलून आपल्या कोमल अंतःकरणाचे प्रदर्शन केल्यावर तो रामाकडे तरी जाणार नाही अशी रावणाची व इतरांची समजूत त्याने मुद्दाम करून दिली. त्या कारणानेच त्याचा कोणी पाठलाग केला नाही. याप्रमाणे रावणाला फसवून तो लंकेतून निसटला आहे.

रावण अधर्मी म्हणून या धर्मात्म्या बिभीषणाला त्याचेकडे राहावयाचे नव्हते. तर त्याला रामाशिवाय कोठेच थारा नव्हता असेही नाही. पाताळात त्याचे आजोळ होते. तिकडे किंवा कैलासावर कुबेर हा थोरला भाऊ होता. त्याच्या आश्रयास जाण्यास त्याला सवड होती. तसे केले असते तर रामाच्या बाणाने थोरल्या भावाचा वध झालेला आपणास पाहवणार नाही, हे म्हणणे मनापासूनचे होते असे सिद्ध झाले असते. आश्रयाच्या अशा जागा असताना तिकडे न जाता शक्य तितकी जलदी करून बिभीषण रामाकडे येतो व रावणाचा आणि त्याच्या सर्व कुळाचा नाश आपल्या डोळ्यांनी पाहण्याची हौस फेडून घेतो. यापेक्षा अन्य पुरावा त्याचा नीचपणा शाबीत करण्यास नको. ‘रावणाची म्हणजे दायादाची खोड मोडण्याकरता’ कसले तरी भांडण उकरून काढून आपला साळसूदपणा राखून व सर्वांस फसवून तो रामाकडे आला आहे.

‘बिभीषणाच्या वर्तनात—श्री जाधव आरोप करतात त्याप्रमाणे स्वार्थ नाही. राज्याचा अभिलाष किंवा सूड उगविण्याची बुद्धी, हा त्याच्या वर्तनाचा हेतू किंवा प्रवर्तक कारण नाही’ असे श्री. सरवटे म्हणतात. ह्याचा विचार आता करू.

अनुक्रमणिका

चार अमात्यांसह बिभीषण आकाशमार्गे आलेला पाहून सुग्रीव म्हणाला, 'हे पाच आमचा वध करण्यास येत आहेत.' इतर वानरही त्यांच्यावर तुटून पडण्यासाठी हुकमाची अपेक्षा करीत राहिले. तेव्हा बिभीषण खाली न उतरता आकाशातूनच ओरडून म्हणाला, 'राक्षसांचा वाईट चालींचा राजा रावण याचा मी धाकटा भाऊ आहे, त्याने जटायूला मारून जनस्थानातून सीता जबरीने आणून अटकेत ठेवली आहे. सीता परत दे, असे मी वारंवार सांगितले असता त्याने मान्य केले नाही.

'सोऽहं परुषितस्तेन दासवच्चवमानितः ।
त्यक्त्या पुत्रांश्च दारांश्च राघवं शरणं गतः ' ॥ १७ । १६ ॥

'त्याने माझ्याशी कठोर भाषणे केली. दासाप्रमाणे माझा अवमानही केलेला आहे आणि म्हणूनच पुत्र व भार्या यांचा त्याग करून मी शरण आलो आहे, हे रामाला कळवा.'

सुग्रीव रामाकडे गेला व त्याने 'हा शत्रूकडून आलेला आहे, कदाचितं फितुरी पसरवील, विश्वास दाखवून घात करील तेव्हा याला कैद करावा' असा अभिप्राय कळविला. रामाने जवळच्या लोकांचा सल्ला घेतला. अंगद म्हणाला, 'आपणाला या बिभीषणाविषयी तर्कच करता येत नाही. एकाएकी त्यावर विश्वास ठेवू नये, पण त्याच्या गुणदोषांचा विचार करून गुणाधिक्य असल्यास स्वीकार करावा. त्यानंतर शरम, जांबवान, मैंद यानी आपापला अभिप्राय गुळमुळीतच दिला. या सर्वांत हनुमान दूरदर्शी, धोरणी व बुद्धिमान. याचे सर्वच भाषण महत्त्वाचे व मननीय आहे. अखेर त्याने काढलेला सारांश बिनचूक असाच आहे. तो म्हणतो :

'उद्योगं तव संप्रेक्ष्य मिथ्यावृत्तं च रावणम् ।
वालिनं च हतं श्रुत्वा सुग्रीव चाभिषेचितम् ॥ ६६ ॥
राज्यं प्रार्थयमानस्तु बुद्धिपूर्वमिहागतः ।
एतावत्तु पुरस्कृत्य विद्यते तस्य संग्रहः ' ॥ ६७ ॥

आपला उद्योग पाहून, रावण दुर्वृत्त आहे असे अवलोकन करून आणि आपल्या हातून वालीचा वध होऊन सुग्रीवाला अभिषेक झाल्याचे श्रवण करून **राज्याच्या आशेने** हा समजून उमजून येथे आलेला आहे, आणि म्हणूनच त्याचा संग्रह करणे मला योग्य दिसत आहे.' यावर राम म्हणाला, 'त्याचे (बिभीषणाचे) ठिकाणी काही दोष असला तरी तो जर मित्रभावाने प्राप्त झाला असेल तर मी त्याचा त्याग करणार नाही.' तेव्हा सुग्रीव म्हणाला, 'तो हा राक्षस दुष्ट असो किंवा नसो, त्याचा स्वीकार का करता येणार आहे? अहो! अशा प्रकारच्या संकटात सापडलेल्या भ्रांत्याचा जो त्याग करीत आहे तो कोणाचा बरे त्याग करणार नाही? 'संकटकाली भावाला सोडून जाणे गैरच. त्यातून भावाच्या शत्रूकडे जाणे अत्यंत निंद्य असे या बंधुहत्यारी सुग्रीवाचे देखील मत आहे. याप्रमाणे सर्वांचे मत ऐकल्यावर श्रीरामचंद्राने अखेरचा निर्णय दिला आहे. त्यातील एक दोन महत्त्वाचे श्लोक देणे युक्त आहे. (यु. कां. सर्ग १८)

अमित्रास्तत् कुलीनाश्च प्रातिदेश्याश्च कीतिता; ।
व्यसनेषु प्रहर्तारस्तस्मादयमिहागतः ॥ १० ॥
न वयं तत्कुलीनाश्च राज्यकांक्षी च राक्षसः ।
पंडिता हि भविष्यंति तस्माद्ग्राह्यो बिभीषणः ॥ १३ ॥

अनुक्रमणिका

न सर्वे भ्रातरस्तात भवंति भरतोपमाः ॥

'राजांना दोन प्रकारचे शत्रू असतात, एक आपल्या कुलातील व दुसरे शेजारच्या देशातील. हे दोघेही संकट पाहून प्रहार करणारे असल्यामुळे हा येथे आला आहे. (१०.) आम्ही त्याच्या (बिभीषणाच्या) कुलातील नव्हे, या राक्षसाला राज्यप्राप्तीची इच्छा आहे व स्वार्थ साधण्यासाठी निपुण असलेले पुरुष सर्वत्र असावयाचेच. तस्मात् बिभीषणाचा स्वीकार केला पाहिजे. 'बाबारे, सर्वच भ्राते भरतासारखे नाहीत.' हनुमान व राम या उभयतांचीही खात्री बिभीषण हा **राज्यलोभाने** आला आहे अशी आहे. तरीही बिभीषणांला आपल्या गोटात घेऊ नये असा आपला हट्ट सुग्रीव सोडीना. तेव्हा रामाने त्याची समजूत घालण्यासाठी सांगितले की, तो शरण आलेला आहे. त्याला अभय न दिल्यास आपले यश मलीन होईल.

'सकृदेव प्रपन्नाय तवास्मीति च याचते ।
अभयं सर्वभूतेभ्यो ददाम्येतद्व्रतं मम ॥ ३३ ॥
आनयैनं हरिश्रेष्ठ दत्तमस्याभयं मया ।
विभीषणो वा सुग्रीव यदि वा रावणः स्वयम्'॥ ३४ ॥

'जो एकदा शरण येऊन मी तुझा आहे म्हणून याचना करू लागला, त्याचे सर्वापासून रक्षण करणे हे माझे व्रत आहे. ॥ ३३ ॥ तस्मात्, हे वानरश्रेष्ठा सुग्रीवा, हा बिभीषण असो अथवा प्रत्यक्ष रावणच त्याचे रूप घेऊन आलेला असो, मी याला अभय दिले आहे.' ॥ ३४ ॥ थोर मनाच्या रामाचा अखेरचा हुकूम झाल्याबरोबर त्या सम्राटाच्या दरबारातला एक सरदार असा झालेला सुग्रीव, आपले स्वतःचे मत ताबडतोब बदलून एकदम स्तुतिपाठक बनून 'होस हो' कसे ठोकून देतो पहा. तो म्हणतो,

'किमत्र चित्रं धर्मज्ञ लोकनाथ शिखामणे ।
यत्त्वमार्य प्रभार्षेथाः सत्त्ववान्सत्पथें स्थितः ' ॥ ३६ ॥

'हे धर्मवेत्त्या, नृपश्रेष्ठा, सत्त्वगुणाचेच अवलंबन करून जर तू सन्मार्गानेच वागणारा आहेस, तर सज्जनांना अनुरूप असे भाषण तू केलेस यात काही आश्चर्य नाही.'

राजेमहाराजांपुढे लाळघोटे त्यांची जशी स्तुती करतात, तशीच ही आहे. तो पुढे म्हणतो,

'मम चाप्यन्तरात्माऽयं शुद्धं वेत्ति बिभीषणम् ।
अनुमानाच्च भावाच्च सर्वतः सुपरीक्षितः ' ॥ ३७ ॥

'शिवाय, माझा हा अंतरात्माही बिभीषणाला शुद्ध समजत आहे. तेव्हा याची हालचाल आणि माझे अनुमान या दोहोंच्या योगाने सर्वप्रकारे याचे चांगले परीक्षण झाले आहे.'

(युद्धकांड स. १८ । ३७)

बिभीषण येऊन रामाच्या पायावर लोटांगण घेऊन म्हणतो, (सर्ग १९)

अनुक्रमणिका

'अनुजो रावणस्याहं तेन चास्म्यवमानितः ॥ ४ ॥
भवन्तं सर्वभूतानां शरण्यं शरणं गतः ।
परित्यक्ता मया लंका, मित्राणि प धनानि च ॥ ५ ॥
भवद्गतं हि मे राज्यं जीवितं प सुखानि च ॥ ६ ॥

'मी रावणाचा धाकटा भाऊ त्याने अपमान केल्याने आपणाला शरण आलो आहे. लंका, मित्र व धन सोडून दिलें. **माझे राज्य**, जीवित व सुखे ही आपल्या हाती आहेत.' **राज्य मिळण्याच्या आशेने** मी आलो आहे असे हा पहिल्याच भेटीत स्पष्ट सांगत आहे. या बिभीषणाला भावाचा द्वेष करण्याला सुग्रीवाइतकेही कारण नव्हते. तरी श्री. सरवटे म्हणतात, 'राज्याचा अभिलाष त्याला नव्हता.' राज्यलोभाने तो आला आहे असे मारुतीला दिसते. रामालाही दिसते. तोही स्वतः आपल्या तोंडाने कबुली देतो, तरी त्याच्या भक्तांस या गोष्टी वाल्मीकींनी उघड उघड मांडलेल्या असताही दिसत नाहीत, हेच आश्चर्य! श्री. सरवटे पुढे म्हणतात, 'रावणाच्या धर्मबाह्य व नाशकारक वर्तनाने मन विटून गेल्यामुळे व रामाच्याच पक्षाला सत्य, नीती व धर्म आहे अशी खात्री झाल्यामुळे तो रामाला जाऊन मिळाला.' या विधानास आधार वाल्मीकी रामायणात मिळेल असे मला वाटत नाही, पण तो मला दाखविल्यास फार आभारी होईन.

रावणाचे धर्मबाह्य वर्तन पूर्वीपासून होते पुष्कळांच्या बायका जबरदस्तीने त्याने आणल्याचे पुरावे वर दिलेच आहेत. त्यावेळी या नीतिबाज आणि धर्मनिष्ठ बिभीषणाचे मन विटले नाही. पण हनुमान येऊन आपले सामर्थ्य दाखवून व वालीचा वध व सुग्रीवाला रामाच्या कृपेने राज्यप्राप्ती झाली या गोष्टींची घोषणा करून गेला ती ऐकून रावणाला सोडण्याचा त्याचा निश्चय पक्का झाला असे स्पष्ट मलाच दिसत नाही तर हनुमान व राम यांसही दिसून आले. 'बंधू आणि धर्म यांचा विरोध आला असता कोणाचे पालन करावे?' असा प्रश्न श्री. सरवटे करतात. या ठिकाणी तसा पेच बिभीषणास पडलेला नाही. भाऊ अधर्मी म्हणून त्याच्याजवळ राहवत नसल्यास रामाच्या आश्रयास जाऊन मला राज्य मिळवून द्या, अशी याचना करण्यास नको होती. दुसरीकडे म्हणजे पाताळात किंवा कुबेराकडे राहिला असता तरी त्याला आश्रय मिळण्यासारखा होता. पुढे ते म्हणतात, अलेक्झांडरच्या छावणीतील राजपुत्र व मोगल बादशहास मदत करणारे रजपूत 'या लोकांचा देशद्रोह स्वार्थमूलक होता, बिभीषणाचा बंधुविरोध सत्यभक्तिप्रेरित होता.' पण हे विधान चुकीचे आहे. बिभीषणाचा बंधुविरोध निखालस स्वार्थप्रेरित होता व सत्यभक्तीचे निव्वळ सोंग करून लंका सोडून जाण्यास कसली तरी पुचाट सबब त्याने काढली होती.

रामाने त्याचेकडून राक्षसांचे बलाबल काढून घेतले व

'अहं हत्वा दशग्रीवं सप्रहस्तं सहात्मजम् ।
राजानं त्वां करिष्यामि' ॥

असे आश्वास दिले. या आश्वासनात बिभीषणाला ज्याचे ज्याचे म्हणून भय होते त्यांचा त्यांचा वध करण्याची प्रतिज्ञा रामाने केली आहे. (यु. कां. सर्ग १९। १९)

पुढे बिभीषणाची आणखी खात्री करण्याकरिता राम प्रतिज्ञा करितो, (सर्ग १९ श्लो. २१)

अनुक्रमणिका

‘अहत्वा रावणं संख्यें सपुत्रजनबांधवम् ।
अयोध्या न प्रवेश्यामि त्रिभिस्तैर्भ्रातृभिः शपे’ ॥

‘पुत्र, स्वजन आणि बांधव यांसहवर्तमान संग्रामामध्ये रावणाचा वध केल्यावाचून मी अयोध्या नगरीत प्रवेश करणार नाही, हे त्या तीन भ्रात्यांची शपथ वाहून मी तुला सांगतो.’ वास्तविक पहाता रामाचे वैर केवळ एकट्या रावणाशी होते. बाकीच्यांनी त्याचा कसलाही अपराध केलेला नव्हता. रावणाबरोबर होणाऱ्या युद्धात रावणातर्फे ते लढाईस आल्यास त्यांचे मरण प्रसंगानुरोधाने ओढवणार. मग रामाने रावणाचे पुत्र, त्याचे स्वकीयजन व त्याचे बांधव यांना मारल्याशिवाय अयोध्येस जाणार नाही, अशी घोर प्रतिज्ञा का करावी? अशी प्रतिज्ञा करण्याचे एकच कारण दिसते. सुग्रीवाचे साह्य मिळविण्यास वालीचा खून अन्यायाने देखील करण्याचे काम रामाने पत्करले, तसेच बिभीषणाचे साह्य मिळविण्यासाठी त्याच्या राज्य मिळविण्याच्या मार्गातील काटे, म्हणजे रावणाचे पुत्र, स्वजन, बंधु प्रहस्तादि सेनापती वगैरे सर्वांस मारण्याची प्रतिज्ञा रामाने केली व खात्री पटविण्यासाठी तिघाही भावांची शपथ घेतली. तेव्हा हा फितुरी म्हणतो,

“राक्षसानां वधे साह्य लकायाश्च प्रधर्षणो ।
करिष्यामि यथाप्राणं प्रवेक्ष्यामि च वाहिनीम्” ॥ २३ ॥

‘राक्षसवधाच्या कामी व लंकेवर हल्ला करताना जीव तोडून सहाय्य करीन व रावणाच्या सैन्यातही मी शिरेन.’ एकंदरीत राज्यलोभाने स्वजनांचा घात करण्यासही हा देशद्रोहो व बंधुद्रोही मागे हटणार नाही. त्याच बैठकीत बिभीषणाला समुद्रजलाने लंकेचा राजा म्हणून अभिषेक केला गेला.

राज्यलोभाने काही तरी भांडण मुद्दाम काढून भावाला सोडून रामाकडे येऊन तेथील भेद बिभीषणाने दिला. इंद्रजिताचा वध व दुसरे अनेक प्रकार या योगानेच रामलक्ष्मणाला सोपे झाले. लंकेतील रावणाच्या व त्याच्या सैनिकांच्या हालचालींची बातमी काढण्याचे काम बिभीषणाचे सेवक करीत. हे सर्व बिभीषणाचे वर्तन निंद्यच आहे. त्याचा नीचपणा कोणत्या कोटीचा होता याची कल्पना सर्ग ९१, श्लो. ६ वरून होईल.

रावणेस्तु शिरश्छिनं लक्ष्मणेन महात्मना ।
न्यवेदयत् रामाय तदा हष्टो बिभीषणः ॥

महात्म्या लक्ष्मणाने इंद्रजिताचे शिर तोडले असे रामाला सांगताना बिभीषणास हर्ष झाला! याच्या पूर्वीच्याच श्लोकात हा हर्ष त्याच्या मुद्रेवरूनच दिसत होता, असे सांगितले आहे. ज्याने आपले केव्हाही वाईट केले नाही व जो इंद्रालाही जिंकणारा असा पराक्रमी, अशा सख्या पुतण्याच्या मृत्यूने हर्ष पावणाऱ्या बिभीषणाला कशाची उपमा घ्यावी हेच कळत नाही. आपल्या राज्यप्राप्तीच्या मार्गातला एक काटा गेला याचाच त्याला आनंद झाला असला पाहिजे.

रावणाने बिभीषणाला चांगल्या प्रकारे वागविले होते, त्याचा इतमाम मोठा होता. सल्लागार मंत्रिमंडळात तो होता. रावण त्याच्या भिडेखातर बऱ्याच गोष्टी करीतही असे. असताही त्याचा पुत्रपौत्रांसह नाश करून राज्य उपटण्याची हाव बिभीषणास झाली.

अनुक्रमणिका

करून कपटी व मायावी भाषण भुरळ पाडण्याची कला त्याला अवगत होती म्हणूनच रामाच्या बाणानें तुझा वध झाला हे मला पाहवणार नाही म्हणून मी जातो, तुझे कल्याण असो, असे सांगून लंका सोडून बिभीषण निर्वेधपणे निघून गेला.

रामाकडे जाऊन भावाविरुद्ध सर्व प्रकारची मदत करून त्याचे सर्व पुत्र मारवून अखेर जगत्जेता, थोर, पराक्रमी भाऊ रामाच्या हस्ते लढाईत पडला तेव्हा मोठ्या हर्षाने सुग्रीव अंगदाबरोबर रामाची पूजा करिता झाला, असे वर्णन १०८ सर्गाच्या अखेरीस आहे. १०९ वे सर्गात बिभीषणाचा कृत्रिम विलाप दिला आहे. पण या विलापातही रावणाच्या गुणाचे वर्णन लक्षात ठेवण्यासारखे आहे.

गतः सेतुः सुनीतानां गतो धर्मस्य विग्रहः ॥ ६ ॥

धर्मनिष्ठांची मर्यादा नाहीशी झालेली आहे. धर्माचे स्वरूप (धर्माची मूर्ति) नष्ट झाले आहे असे तो म्हणतो. 'चित्रभानुः प्रशांतार्चिर्व्यवसायो निरुद्यमः' अग्नी ज्वालारहित झाला आहे आणि प्रवृत्तीरूप धर्मालाही प्रतिबंध झाला आहे.

रावण मोठा धर्मनिष्ठ होता, ही केवळ त्याची स्तुती नव्हती, तो तसाच होता. मारुती लंकेत सीताशुद्धीसाठी गेला तेव्हा तोही त्याचे तसेच वर्णन करतो. लंकेत त्याला सर्वत्र वेदमत्र्यांचा घोष ऐकू आला व वेदाध्ययनाविषयी रत असलेले राक्षस दिसले. यथा राजा तथा प्रजा. रावण स्वतः मोठा वेदवेत्ता होता हे प्रसिद्ध आहे. अशा धर्मनिष्ठाने दुसऱ्यांच्या बायका जबरदस्तीने का आणाव्या याचे उत्तर उघड आहे. हा राक्षसांचा आचार होता. त्याची साक्ष 'राक्षसविवाह' हा शब्दच देतो. 'विवाह' हा शब्दच जबरदस्तीचा वाचक आहे व वधू शब्दाचा मूळचा अर्थ ओढून किंवा उचलून आणलेली असा आहे. म्हणूनच वधू शब्दाचा प्रयोग (१) नवरी (२) पत्नी (३) सून (४) स्त्री अशा भिन्न भिन्न अर्थी केला जातो.

रावणाचे वर्तन राक्षसांच्या आचाराप्रमाणे धर्मबाह्य नसल्याने तो मरण पावल्यावर त्याच्या धर्मनिष्ठतेविषयीचे उद्गार बिभीषणाच्या मुखातून बाहेर पडले आहेत.

या बाबतीत सुग्रीव हा बिभीषणापेक्षा पुष्कळ बरा. त्याचे वालीवधानंतरचे उद्गार अंतःकरणापासून पश्चात्तापाचे आहेत.

बिभीषणाचा शोक सारा १३ श्लोक आहे. नंतर रामाने ६ श्लोकांनी त्याचे समाधान केले. त्यांत हा रावण मृत्यूची पर्वा न करिता दैवाने वध होऊन पडला. अभ्युदयाची इच्छा धरणारे जे पुरुष रणात पडतात, ते क्षात्रधर्मात तत्पर असल्याने त्यांचे आप्तजन शोक करीत बसत नाहीत. ज्या बुद्धिवान पुरुषाने इंद्रासहवर्तमान तिन्ही लोक युद्धात त्रस्त करून सोडले तो हा पुरुष मृत झाला असता शोच्य नाही. सारांश, संग्रामामध्ये वध पावलेल्या क्षत्रियाबद्दल शोक करणे योग्य नाही हे निश्चित आहे. म्हणून अंतःकरणामध्ये निश्चय करून तू स्वस्थ हो, आणि पुढे काय करणे योग्य आहे याचा विचार कर. उदार रामाचे हे भाषण त्या वीराला शोभण्यासारखेच आहे. तेव्हा बिभीषणाने आणखी शोक केला. तो पुन्हा रावणाचे गुण वर्णितो. 'याने याचकांना दाने दिली आहेत. भोग भोगले आहेत दासांचे पोषण केले आहे. मित्रांनाही द्रव्ये अर्पण केली आहेत. आणि शत्रूंशी याने वैरेही बांधली आहेत. हा अग्निहोत्री आहे. हा महातपस्वी आहे. याने उपनिषदांचे अध्ययन केलेले आहे. आणि अग्निहोत्रादि कर्मांचे अनुष्ठान करणाऱ्यांमध्ये हा मुख्य आहे. यास्तव परलोकी

अनुक्रमणिका

गेलेल्या याचे जे और्ध्वदेहिक कर्म ते आपल्या प्रसादाने करण्याची माझी इच्छा आहे.' युद्धकाण्ड सर्ग १०९, श्लोक २३–२४. त्या उदारबुद्धी राजपुत्र रामाने त्या रावणाचे और्ध्वदेहिक कर्म करण्याविषयी त्याला आज्ञा दिली. आणि तो म्हणाला,

'मरणांतानि वैराणि निवृत्तं नः प्रयोजनम् ।
क्रियतां अस्य संस्कारो ममाप्येष यथा तव' ॥ २६ ॥

'वैरे मरणापर्यंतच कायम रहात असतात आणि सांप्रत आपला (उभयतांचाही) कार्यभागही उरकला आहे. यास्तव, याचा आता तू संस्कार कर. सांप्रत हा जसा तुझा आहे, तसाच माझाही आहे.' ॥ २६ ॥ नंतर ११० सर्गात रावणपत्नीचा शोक आहे. १११ चे सुरवातीस मंदोदरीचा शोक हा ९१ श्लोकापर्यत आहे. इतक्यामध्ये राम बिभीषणाला म्हणाला, 'भ्रात्याचा और्ध्वदेहिक संसार कर आणि स्त्रीसमुदायाचे सांत्वन कर.' यावर

तमुवाच ततो धीमान् बिभीषण इदं वचः ।
विमृश्य प्रश्रितं बुद्धया धर्मार्थसहितं हितम् ॥ ९२ ॥
त्यक्तधर्मव्रतं क्रूरं नृशंसमनृतं तथा ॥ ९३ ॥
नाहमर्हामि संस्कर्तु परदाराभिमर्शनम् ।
भ्रातृरूपो हि मे शत्रूरेष सर्वहिते रतः ॥ ९४ ॥
रावणो नार्हते पूजां पूज्येऽपि गुरुगौरवात् ।
नृशंस इति मां राम वक्ष्यंति मनुजा भुवि ॥ ९५ ॥
श्रुत्वा तस्यागुणान्सर्वे वक्ष्यंति मनुजा सुकृतं पुनः ॥

अर्थ : ह्यावर विचारी बिभीषण बुद्धिपूर्वक विचार करून धर्मार्थसहित, हितावह व विनययुक्त असे भाषण त्या रामाशी करू लागला. (तो म्हणाला), 'धर्माचा व व्रताचा ज्याने त्याग केला असा जो क्रूर, दुष्ट, खोटा, (९२, ९३) आणि परस्त्रीवर हात टाकणारा त्याचा और्ध्वदेहिक संसार करणे मला योग्य नाही. सर्वांच्या अकल्याणाविषयी तत्पर असलेला हा रावण माझा भ्रातृरूप शत्रूच होय. (९४), 'जेष्ठ भ्राता' ही महत्वाची गोष्ट लक्षात घेतली असता रावण जरी पूज्य आहे तरी माझ्या हातून पूजा होण्यास तो पात्र नाही. हे रामा, (संस्कार न केला तर) भूतलावरील मला प्रथमतः दुष्ट म्हणतील (९५) परंतु त्याचे दोष श्रवण केल्यानंतर सर्वही पुनरपि चांगले केले असेच उद्‌गार माझ्यासंबंधाने काढू लागतील.'

थोड्याच वेळापूर्वी आपण लटकाच का होईना शोक केला, रामाकडे और्ध्वदेहिकाची परवानगी मागितली, त्याने रावणाचे शौर्य, धैर्य इत्यादी गुणांचे वर्णन करून मरणापर्यंतच वैर असते असे म्हणून परवानगी दिली; याचे विस्मरण पडून रावणाविषयीचा दीर्घ द्वेष बिभीषणाचे मनात कसा उसळी मारून उठला हे यावरून स्पष्ट होत आहे. बिभीषणाचे धर्मात्मापण आपमतलबाचे अतएव खोटे आहे. राज्याची हाव त्याला मोठी तिच्या तृप्तीसाठी त्याचे सारे प्रयत्न, तो अगदी हलक्या मनाचा व दुष्ट, दिलदारपणा त्याचे ठिकाणी नाही, इत्यादी दाखविण्यासाठी महाकवि वाल्मीकीनी व्याजस्तुतिरूपाने त्याला अनेक ठिकाणी धर्मात्मा वगैरें वरून स्तुतिवाचक विशेषण दिलेली आहेत. व तो अर्थ वाचकांच्या लक्षात येण्यासाठी त्याचे काळेकुट्ट हृदय उघडे पडणारे उद्‌गार दिले आहेत. भरताची बंधुभक्ती उज्ज्वल. ती खुलून दिसावी यासाठी बंधूघाती सुग्रीव व त्यापेक्षाही दुष्ट बिभीषण ही लोभी जोडी पुढे ठेवली आहे. व यासाठीच बिभीषण

अनुक्रमणिका

प्रथम रामाकडे आला, तेव्हा 'भरतासारखे सर्वच भ्राते नाहीत' असे उदगार रामाच्या तोंडी घातले आहेत. आद्य महाकवीच्या काव्यात व्यंग्यार्थ पुष्कळच ठिकाणी आहे.

पापी रावणाचा संपर्क नको अशी धर्मात्मा बिभीषणाची उक्ती रामाला पसंत पडणे शक्यच नव्हते. त्याने मागीलच मुद्दे 'मरणाबरोबर वैरांचा शेवट होतो व आपला कार्यभाग झालेला आहे' वगैरे सांगून रावणाचा संस्कार करण्यास आज्ञा केली.

फोडिले भांडार वाल्मिकीचा माल । मी तंव हमाल भार वाही ॥

रामान रावणास मारल्यामुळे रिकाम्या झालेल्या लंकेच्या सिंहासनावर रामाच्या आज्ञेने लक्ष्मणाने बिभीषणास अभिषेक केला.

'बिभीषणमिमं सौम्य लंकायामभिषेचय ।
अनुरक्तं च भक्तं च तथा पूर्वोपकारिणम्॥ '

(युद्धकांड सर्ग ११२, श्लो. १०)

'हे सौम्या, बिभीषणाला लंकेमध्ये अभिषेक कर. हा आपणावर प्रेम करणारा असून आपला भक्त आहे व प्रथमतः याने आपणावर उपकार केला आहे.' नंतर लक्ष्मणाने वानरांकडून समुद्राचे जल आणविले.

ततस्त्वेकं घटं गृह्य संस्थाप्य परमासने
घटेंन तेन सौमित्रिरभ्यषिंचद्विभीषणम् ॥ १५॥
लकायां रक्षसां मध्ये राजानं रामशासनात्
विधिना मंत्रदृष्टेन सुहृद्गणसमावृतः ॥ १६॥
अभ्यषिंचत्तदा सर्वे राक्षसा वानरास्तथा
प्रहर्षमतुल गत्वा तुष्टुवू राममेव च ॥ १७ ॥

अर्थ : तदनंतर त्यांपैकी एक घट घेऊन आणि बिभीषणाला सिंहासनावर बसवून सुहृद्गणांनी परिवेष्टित असलेल्या सुमित्रापुत्र लक्ष्मणाने रामाच्या **आज्ञे**प्रमाणे राक्षसांमध्ये त्यांचा राजा म्हणून समंत्रक विधीने त्याला लंकेत अभिषेक केला. (१५ । १६) तेव्हा सर्व राक्षसांनी व वानरांनी त्याला अभिषेक केला व अतिशय हर्षयुक्त होऊन ते रामाची स्तुती करू लागले. (१७) पुढे प्रजाजनांचे सांत्वन करून तो रामासमीप आला तेव्हा –

दध्यक्षतान्मोदकांश्च लाजाः सुमनस्तथा
आजहुरथ संहृष्टाः पौरास्तस्मै निशाचराः ॥ २०॥
स तान्गृहीत्वा दुर्धर्षो राघवाय न्यवेदयत्
मागल्यं मंगलं सर्व लक्ष्मणाय च वीरतान् ॥ २१ ॥

अनुक्रमणिका

दही, अक्षता, मोदक, लाह्या व पुष्पे घेऊन आनंदित झालेले लंकानगरवासी राक्षस त्या बिभीषणाकडे आले असता त्या दधिप्रभृती पदार्थांचा स्वीकार करून त्या अजिंक्य व वीर्यवान बिभीषणाने ते सर्व मंगलदायक व मंगलरूप शुभ पदार्थ रामाला व लक्ष्मणाला निवेदन केले.

सन १७३९ साली नादिरशहाने दिल्लीवर स्वारी करून मोठी कत्तल करून व मोठी लूट मिळवून महंमदशहाला पुन्हा गादीवर बसविले आणि तो आपले मुलखास परत गेला. त्यावेळी याच इतिहासाची पुनरावृत्ती झाली. दोन बादशहा (एक जेता व दुसरे बाहुले) एकत्र असता नजराणा घेऊन आत येण्याचा प्रसंग वजिरावर आला. महंमदशहापुढे तो नजराणा ठेवावा तर नादिरशहाचा अपमान होऊन तो कदाचित डोके उडवील ही भीती; बरे एकदमच नादिरशहापुढे ठेवल्यास आपल्या धन्याचा अपमान आपल्या हाताने होतो अशी अडचण आली. तेव्हा त्याने धूर्तपणाने महंमदशहापुढे तो ठेवून 'या बड्या पाहुण्याचा आपणच सत्कार करावा, माझी ती योग्यता नाही' असे विनविले. वजिराचा हा धूर्तपणा नादिरशहाने ओळखला व तो संतुष्ट झाला. तशीच ही कथा आहे. राम हा जेता आहे; बिभीषण हा केवळ निष्प्रभ, त्याच्या हातातील बाहुले आहे.

नंतर रामाने हनुमानास सीतेला आणण्यास पाठविले; तेव्हा बिभीषणाची आज्ञा घेऊन जा, असे सांगितले. पण यावरून बिभीषणाचा दर्जा वाढला असे होत नाही. रामाने गादीवर बसविलेल्या बाहुल्याचा बोज रामाने व त्याच्या नोकरांनी राखला नाही तर इतर राक्षसही राखणार नाहीत म्हणून तसा हुकूम दिला आहे. आजही कोणत्याहि संस्थानच्या हद्दीत इंग्रज सरकारचा हुकूम प्रत्यक्ष अमलात येत नाही. सर्व गोष्टी राजे, महाराजे, नवाब, सुलतान यांच्याच हुकमाने घडून येतात.

सीतेला पालखीतून आणली त्यावेळी वानर ऋक्षांची व राक्षसांची दाटी झाली. ती मागे सरताना काही दंडादंडी बिभीषणाच्या आज्ञेने झाली. ती पाहून रामाला क्रोध आला व बिभीषणाला तो रागे भरला.

संरंभाद्याब्रवीद्रामश्चक्षुषा प्रदहन्निव ।
बिभीषणं महाप्राज्ञं सोपालंभमिदं वचः ॥ २५ ॥
'किमर्थ मामनादृत्य क्लिश्यत्येऽयं त्वया जनः ।
निवर्त्तयैनमुद्वेगं जनोऽयं स्वजनो मम' ॥ २६ ॥

अर्थ : आणि क्रोध आल्यामुळे दुष्टीने दग्ध करीत करीतच की काय, तो राम त्या महाबुद्धिमान बिभीषणाला रागे भरून म्हणाला, ॥ २१ ॥ 'माझी पर्वा न करता तू या लोकांना कशाकरता त्रास देत आहेस? ही दाणादाण बंद कर; हे लोक माझे आहेत.' ॥ २६॥

वानर व ऋक्ष हे सुग्रीवाच्या सैन्यातील. ते आपले आहेत असे रामाचे म्हणणे योग्य आहे. पण या गर्दीत राक्षसही आहेत. त्यांनाही राम आपले म्हणत आहे. यावरून लंकेचे राज्य आपल्या शासनाखाली आले व सर्व राक्षस आपली प्रजा झाले, असे रामाच्या म्हणण्यावरून ठरते. नुकत्याच श्रीमच्छत्रपती महाराज कोल्हापूर यांनी आजरा प्रकरणी दिलेल्या ठरावात इचलकरंजी जहागिरीतील प्रजेस आपली प्रजा म्हटले आहे. तेथेही हाच प्रकार आहे. संस्थानिकाची प्रजाही साम्राज्य सरकारचीच आहे.

अनुक्रमणिका

यावरून त्यांचे नाते बरोबरीचे राहिले नाही. रामाच्या आज्ञेत बिभीषणाला राहणे भाग होते. राम अधिराजा होता.

याच वेळी रामाच्या मताने स्त्रियांनी पाळावयाच्या पडद्याची मर्यादा कशी होती हे त्यानेच सांगितले आहे.

न गृहाणि न वस्त्राणि न प्राकारस्तिरस्क्रिया ।
नेदृशा राजसत्कारा वृत्तमावरणं स्त्रियः ॥ २७ ॥
व्यसनेषु न कृच्छ्रेषु न युद्धेषु स्वयंवरे ।
न क्रतौ न विवाहे वा दर्शन दूश्यते स्त्रियः ॥ २८ ॥
सैषा विपद्गताव कृच्छ्रेण च समन्विता ।
दर्शने नास्ति दोषोऽस्या मत्समीपे विशेषतः ॥ २६ ॥
विसूज्य शिबिकां तस्मात्पद्भयामेवापसर्पतु ।
समीपे मम वैदेही पश्यन्त्वेते वनौकसः ॥ ३० ॥

गृहे, वस्त्रे व कोट ही स्त्रीची आवरणे नसून (लोकाना मागे हटविणे, धक्काबुक्की करून त्यांना मागे सारणे) अशा प्रकारचे राजसत्कारही स्त्रीचे वास्तविक आवरण नव्हे. सदाचरण हेच स्त्रीचे वास्तविक आचरण होय । २७ । संकट, विपत्ती, युद्ध, स्वयंवर, यज्ञ आणि विवाह याप्रसंगी स्त्रिया इतरांच्या दृष्टी पडणे दोषावह होत नाही । २८ । ज्याअर्थी सीता विपत्तीमध्ये व संकटामध्ये सापडलेली आहे त्याअर्थी इतरांच्याही दृष्टी पडणे दोषावह होत नाही आणि विशेषतः मी जवळ असताना दोषावह नाहीच नाही. । २९ । यास्तव पालखीतून उतरून पायांनीच तिला इकडे येऊ दे आणि माझ्यासमीप या वानरांच्या ती खुशाल दृष्टी पडू दे. राम पुष्पक विमानात बसून सीतेसह निघाला तेव्हा,

'स्वराज्ये वस लंकायां मया दत्ते बिभीषण ।
न त्वां घर्षयितुं शक्ताः सेंद्रा अपि दिवौकसः ' ॥

(यु. कां. सर्ग १२२, श्लो. १६)

'हे बिभीषणा, तूही आपल्या लंकेत वास्तव्य कर. इंद्रासहवर्तमानही देव तुझा पराभव करण्यास समर्थ नाहीत.' या भाषांतरात शास्त्रीबुवांनी 'मया दत्ते' या पदाचा अर्थ का सोडला समजत नाही!! 'मी दिलेल्या' आपल्या राज्यात रहा, माझ्या भीतीने तुझ्या वाटेस कोणी जाणार नाही, असा रामाचा आशय आहे. पुढे राम अयोध्येस गेला तेव्हा रामाची मिरवणूक निघाली, तीत राम रथावर, आरूढ झाला होता.

जग्राह भरतो रश्मीञ्शत्रुध्नश्छत्रमाददे ।
लक्ष्मणो व्यजनं तस्य मूर्ध्नि सजीवयंस्तवा ॥ २८ ॥
श्वेतं च बालव्यजन जगृहे परितः स्थितः ।
अपरं चंद्रसंकाशं राक्षसेंद्रो बिभीषणः ॥ २९ ॥

अनुक्रमणिका

त्यावेळी भरताने रश्मी धरल्या होत्या, शत्रुघ्नाने छत्र धरिले, लक्ष्मण त्याच्या मस्तकावर विंझोणा वारीत होता. ॥ २८॥ आणि राक्षसाधिपती बिभीषणं दुसरी श्वेतवर्ण व चंद्रतुल्य चवरी घेऊन त्याच्यासमीप उभा होता. ॥ २९ ॥ (शास्त्रीबुवांनी भाषांतरात परितः शब्द सोडला) तो चवरी वारू लागला असे पाहिजे.

रामाच्या दरबारात सुग्रीव हा बिभीषणापेक्षा लाडका होता. त्याचे सर्व वानर रामाने पुष्कळ विमानातून आणले; बिभीषणाचे फक्त चारच अमात्य आणले. सुग्रीवाच्या व थोर वानरांच्या बायकाही सीतेने बरोबर बसविल्या. पण बिभीषण तुझ्याविषयी रदबदली करितो हा निराप त्याची ज्येष्ठ कन्या इच्या तोंडी बिभीषणाच्या सरमा नामक पत्नीने पोचविला. त्या कन्येला किंवा तिच्या आईला अयोध्येस आणले नाही. दोघांमध्ये केलेला हा फरक लक्षात घेण्यासारखा आहे.

या मिरवणुकीत शत्रुजय या नावाच्या थोरल्या हत्तीवर सुग्रीवाला बसविले होते. (३१) रामाने मंत्र्यांना

सख्यं च रामः सुग्रीवे प्रभावं चानिलात्मजे ।
वानराणां च तत्कर्म ह्याचचक्षेऽथ मंत्रिणाम् ॥ ३९ ॥

'नंतर सुग्रीवाशी झालेले आपले सख्य, वायुपुत्र हनुमानाचे ठिकाणी असलेले सामर्थ्य आणि वानरांचे ते कर्म रामाने मंत्र्यांना कथन केले.' यात बिभीषणाविषयी किंवा त्याच्या पराक्रमाविषयी काही सांगितलेले नाही. ४१ वे श्लोकात राम वानरांसह नगरात शिरल्याचा उल्लेख आहे. ४४वे श्लोकात वानरांना तू आत ने व कौसल्या, सुमित्रा व कैकेयी यांस त्याच्याकडून नमस्कार करव, असे राम भरतास सांगतो. पुढल्याच श्लोकात सुग्रीवाच्या राहण्याची व्यवस्था 'मोत्यें व वैडूर्यमणी यानी गजबजून गेलेले ते माझे प्रचंड श्रेष्ठ गृह अशोकवनासहवर्तमान तू सुग्रीवाला निवेदन कर.' (४५) ते त्याचे भाषण श्रवण केल्यानंतर सत्यपराक्रमी भरत सुग्रीवाला हाती धरून, त्या गृहात प्रविष्ट झाला. (४६) बिभीषणाला उतरण्यास जागा दिली असलीच पाहिजे, पण त्याचा उल्लेख करण्याची आवश्यकता वाल्मीकीस भासली नाही. यावरून त्याचे महत्त्व विशेष मानले गेले नव्हते असे दिसते. सुग्रीव व बिभीषण यांमध्ये राम सुग्रीवालाच विशेष मान देत आहे. बिभीषण हा खिजगणतीतही नाही. शेवटच्या पाठवणीतही 'प्रजाधिपती रामाने सुग्रीवाला एक दिव्य माला दिली; तिची कांती सूर्यकिरणाप्रमाणे होती व ती रत्नमाला सुवर्णाने गुंफिलेली होती.' अंगदाला व हनुमानाला काय काय दिले याचीही नोंद आहे. पण तसा स्वतंत्र उल्लेख बिभीषणाला दिलेल्या आहेरासंबंधाने नाही. ८५–८६ श्लोकांत—

बिभीवषणोऽथ सुग्रीवो हनुमान जांबवांस्तथा ।
सर्वे वानरमुख्याश्च रमेणाक्लिष्टकर्मणा ॥ ८५ ॥
यथार्ह पूजिताः सर्वे कामै रत्नैश्च पुष्कलैः ।
प्रहृष्टमनसः सर्वे जग्मुरेव यथागतम् ॥ ८६ ॥

सर्वांबरोबर योग्यतेनुरूप पूजन केले व रत्ने वगैरे दिली. रामाने मुद्दाम दरबार भरवून सुग्रीव, अंगद, हनुमान वगैरे वीरांस त्यांच्या कामगिरीबद्दल विशेष बक्षिसे त्यांच्या पराक्रमाचे वर्णन करून दिली त्यावेळी बिभीषणास काही मिळाले नाही सर्वांची पाठवणी करण्याच्या दरबारात ८५–८६ श्लोकांत

अनुक्रमणिका

सांगितल्याप्रमाणे सर्वांचाच सन्मान करून त्यांना आहेर दिले आहेत. यावेळी थोर पाहुण्यांना तर आहेर मिळतातच, पण त्यांच्या हुजऱ्यापर्यंतच्या नोकरांनाही देण्यात येतात. रामाच्या दरबारातही तसेच झाले.

सुग्रीव व बिभीषण या दोघांबरोबरची रामाची वागणूक भिन्न आहे. राम बिभीषणापेक्षा सुग्रीवासच जास्त मानतो, प्यार करतो. त्याचे कारण काय? या प्रश्नाचे उत्तर या दोघांच्या मनःस्थितीत आहे.

सुग्रीवाचे व त्याच्या भावाचे वैर पडलेले होते व ते उघड होते. त्यासाठी सुग्रीवाने वालीचा वध करविला हे गैर खरे, पण बिभीषणाच्या वर्तणुकीच्या मानाने ते क्षम्य आहे. बिभीषणाशी रावणाने वैर केले नाही. त्याने दिलेला भलताच सल्ला ऐकला नाही म्हणून तो खोटेच रागावून लंका सोडून गेला. राम, हनुमान वगैरे सर्वांनी त्याचा कावा ओळखला. त्याच्या नीचपणाचा त्यांना तिटकारा आला. सुग्रीवाने तर तो बोलूनही दाखविला. रामास त्याच्या फितुरीची जरूर होती म्हणून त्याला ठेवून घेतला व लंकेचे राज्य त्याला दिले. पण तो स्वार्थी, बंधु घातकी अशीच सर्वांची खात्री होती. म्हणून रामाचे दरबारी त्याची मोठींशी मान्यता झाली नसावी, सुग्रीवाबरोबर रामाने अग्निसाक्षिक सख्य केले व त्यामुळे तो त्याचा परम मित्र व बंधू झाला. म्हणूनच त्याला आयांकडे पाठवून त्यांचे दर्शन करविले आहे. बिभीषण हा रामाच्या आश्रयास स्वार्थ साधण्याच्या हेतूने आला. त्याच्याबरोबर तसे सख्य झाले नव्हते. तो केवळ आश्रित होता.

नगर प्रवेशात सुग्रीवाला मोठ्या इतमामाने थोरल्या हत्तीवर बसविले व राहाण्यास थोरला राजवाडा दिला. याप्रमाणे त्याचा दर्जा वाढून आपण बरोबरीचे अशी भावना होऊन त्याचे डोके फिरेल अशी भीती रामाचे दरबारी लोकांस पडली असावी. म्हणूनच राज्याभिषेक झाल्यावर

किरीटेन ततः पश्चाद्वसिष्ठेन महात्मना ।
ऋत्विग्भिर्भूषणैश्चैव समयोक्षत राघवः ॥ ६७ ॥
छतं तस्य च जग्राह शत्रुन्घः पांडुरं शुभम् ।
श्देत च बालव्यजन सुग्रीवो वानरेश्वरः ॥ ६८ ॥
अपरं चंद्रसंकाशं राक्षसेद्रो बिभीषणः ॥ ६९ ॥

नंतर महात्म्या वसिष्ठ मुनीनी राघवाचे मस्तकी किरीट चढविला व ऋत्विजांनी त्याला अलंकार घातले (६७) शत्रुघ्नाने त्या रामावर शुभ्रवर्ण व शुभ छत्र धरिले; वानराधिपती सुग्रीव श्वेतवर्ण चवरी वारू लागला (६८), आणि राक्षसराज बिभीषण चंद्रासारखे दुसरे चामर वारीत राहिला (६९). चवरी, मोरचेल, छत्र वगैरे राजचिन्हे अभिषिक्त राजावर धरण्याचा मान मोठमोठ्या सरदारांचा असतो. पण त्यायोगे ते सेवक आहेत असे स्पष्ट ठरते. कोल्हापुरासही श्रीमन्महाराज छत्रपती हत्तीवर बसून जातात त्यावेळी त्यांचे मागे खवासखान्यात बसण्याचा मान श्रीमंत पंतप्रतिनिधी विशाळगडकर व श्रीमंत पंतअमात्य बावडेकर यांचा आहे, व त्यावेळी त्यांना मोरचेल हाती धरावे लागते. हे दोन दरबारचे मुख्य सरदार आहेत. तसेच रामाच्या दरबारचं सुग्रीव–बिभीषण हे झाले, असे श्रीवाल्मीकींनी शब्दाने न सांगता त्यांच्या हातात चवऱ्या देऊन दाखविले आहे.

किष्किंधा व लंका यांचे स्वातंत्र्य नष्ट झाले यात संशय नाही. लंकेवर तर प्रोटेक्टरच स्थापन झाले असे रामाच्या बोलण्यातच स्पष्ट आहे. मी तुला राज्य दिले आहे, तुला इंद्र किंवा देव यांपासून भय नाही.

अनुक्रमणिका

म्हणजेच मी तुझे रक्षण करीन असे वचन दिले आहे. हिंदुस्थानातही इंग्रजांनी हीच नीती अवलंबिली. इतर शत्रूंपासून रक्षण हीच इंग्रजी राज्यनीतीची गुरुकिल्ली.

श्री. सरवटे यांच्या एका आक्षेपास उत्तर देण्याचे राहून गेले, त्याबद्दल थोडेसे लिहिणे जरूर आहे. ते म्हणतात, 'बिभीषणाने मंदोदरीला आपल्या जनानखान्यात दाखल केल्याचे हे दुसरे उदाहरण श्री. जाधवांनी कोठून मिळविले न कळे. श्रीवाल्मीकी रामायणात असा उल्लेख नाही. प्रचलित कथांतूनही तसे सांगण्यात येत नाही.'

हे उदाहरण माझ्या नजरेस प्रथमतः Prof. S. C. Sarkar's 'some Aspects of the Earliest Social History of India (Pre–Budhistic Ages)' या पुस्तकावरून आले. त्यात पृष्ठ १८६–१८९ या दोन ठिकाणी हा उल्लेख आहे. तारेच्या संबंधाने वाल्मिकी रामायणात जसा स्पष्ट उल्लेख आहे तसा मंदोदरीसंबंधाने नाही हे खरे; पण याचे कारण निराळे आहे. तारा विधवा होऊन सुग्रीवाच्या ताब्यात गेल्यावर रामलक्ष्मणाचा मुक्काम बरेच दिवस किष्किंधेच्या समीप होता. रावणवध झाल्यावर एक दोन दिवसांतच रामाचा मुक्काम लंकेतून हालला. यामुळे मंदोदरीसंबंधाने उल्लेख करण्यास अवकाशच मिळाला नाही. पण शास्त्रविहित जो आचार त्या काली होता त्याप्रमाणे घडून आले असले पाहिजे असे अनुमान होते. भावाचा सबंध जनानाच त्याच्या पश्चात् त्याच्या धाकट्या भावास मिळावा असा आचारच होता. रावणवधानंतर स्त्रियांचा शोक पहा. बिभीषणाने रामाकडे जाऊन त्याला आणून युद्ध करून रावणाला व त्याच्या सर्व पुत्रांस मारविले. याप्रसंगी स्त्रीस्वभावाप्रमाणे या शोकात बिभीषणावर शिव्यांचा व शापांचा भडिमार पाहिजे. रामावरही त्यांचा राग झाला पाहिजे. लक्ष्मण, सुग्रीव यांचीही हजेरी घेतली जावयाची. पण या शोकात बिभीषणाचे ऐकले नाहीस, सीतेला आणलीस, म्हणून तुला मरण आले; असाच आशय ११० सर्गात रावणपत्न्यांच्या शोकाचा आहे. पुढील सर्गात मंदोदरीचा शोक त्याच प्रकारचा आहे. त्यात उलट बिभीषणाची वाखाणणीच आहे. त्याच्या फितुरीबद्दल शब्दही नाही. सर्व दोष रावणावरच टाकला आहे.

असल्या शोकाची उपपत्ती लावणे कठीण नाही. या सर्व स्त्रियांना बिभीषणाच्या आश्रयाने त्याच्या बायका होऊन जन्मभर राहावयाचे असल्याने त्याला क्रोध येईल किंवा वाईट वाटेल असे शब्द न उच्चारण्याची खबरदारी त्यांनी घेणे स्वाभाविक आहे.

रावणाच्या मृत शरीराचे दहन यथाविधी झालेले आहे. त्याचे अग्निहोत्र होते तो अग्नि नेऊन सर्व क्रियाकर्म स्मशानात झाले. त्याचा सर्व जनानखाना स्मशानात गेला होता. (१११ श्लोक, १११ सर्ग)

ताः स्त्रियोऽनुनयामास सान्त्वयित्वा पुनःपुनः ।
गम्यतामिति ताः सर्वा विविशुर्नगरं ततः ॥ १२२ ॥

बिभीषणाने गोड शब्दांनी त्यांचे वारंवार सांत्वन केले आणि त्याने जा असे सांगितल्यावर त्या नगरात प्रविष्ट झाल्या.

यासंबंधाने वैदिक काळचा आचारही लक्ष्यात घेण्यासारखा आहे. त्यासाठी श्री. पांडुरंग वामन काणे याच्या 'धर्मशास्त्रविचार' या ग्रंथातून एक लहानसा उतारा येथे देतो. (पृ.१००) त्यावेळी (ऋग्वेदकाळी) स्त्रियाही मृताबरोबर स्मशानात जात. मृताला चितेवर ठेवल्यावर त्याच्या स्त्रीला उत्तर बाजूस बसवीत.

अनुक्रमणिका

उत्तरतः पत्नी संवेशयंति । धनुश्च क्षत्रियस्य ॥ तामुत्थापयेद्
देवरः पतिस्थानीयोऽन्तेवासी जरद्दासो वा उदीश्वनार्यभि जीवलोकं
गतासुमेतमुप शेषा एहि । हस्तग्राभस्य दिधिषोस्तवेदं पत्युर्ज
नित्वमभिसंबभूथ। (ऋ. १८, ८)

नंतर पतीचे स्थान घेणारा तिचा दीर किंवा दुसरा कोणी 'हे स्त्रिये, या मृताजवळ तू शयन केले आहेस, तरी ऊठ आणि या जीवलोकाकडे (घराकडे) चाल. तुझा हात धरू इच्छिणाऱ्या दुसऱ्या पतीला पुन्हा संतती होऊ दे.' भावजयीला स्मशानातून दिराने हात धरून उठवून आणावयाची व पुढे त्यांनी नवराबायकोप्रमाणे राहावयाचे, हा पूर्वीचा आचार आहे. आश्वलायन गृह्यसूत्रात हा विधी वर्णिला आहे. त्याप्रमाणे पुढे मंदोदरी बिभीषणाजवळ आपल्या इतर सवतींसह राहिली असणार यांत संशय घेण्याचे कारण नाही.

आमच्या महाराष्ट्रात ही चाल नाहीशी झाली आहे हे खरे; पण या आर्यावर्तातून ही चाल अजिबात नष्ट झाली असेही नाही. पंजाब व आग्रा यांत जाट म्हणून एक कोट लोकसंख्येची जात आहे. तशीच गुजर या नावाचीही जात मोठी आहे. या दोहींतही नवरा मेल्यावर त्याच्या विधवेने त्याच्या धाकट्या भावाबरोबर नेवता लावावयाचा अशी सर्रास रूढी आहे. यात विधवेच्या किंवा तिच्या दिराच्या वयाचा किंवा पूर्वीच्या बायका असण्याच्या अडचणीचा प्रश्न बिलकुल नाही. हीच चाल नाशिक व खानदेश जिल्ह्यांतील वंजारी लोकांच्या तांड्यातही सर्रास आढळते.

श्री. केळकरांच्या एका विधानासंबंधाने थोडे लिहिणे भाग आहे. कारण तसे न केल्यास गैरसमज वाढण्याची भीती आहे. ते म्हणतात, (पृ. १६८) 'अशी मित्राची मदत घेण्याची चाल हल्लीही प्रचलित आहे. १८५७ झाली इंग्रजांनी अशी मदत नेपाळची घेतली. पण त्यास **कोणीही इंग्रजाने** देशद्रोही ठरविले नाही.' प्रजेत बंड झाल्यावेळी नेपाळची मदत इंग्रजांस इष्टच होती. म्हणून कोणीही इंग्रजाने नेपाळला द्रोही ठरविणे शक्य नाही पण नानासाहेब पेशवे, झाशीची राणी, तात्या टोपे वगैरेंच्या दृष्टीने पाहाणारास नेपाळचे कृत्य स्वार्थी, देशद्रोही, धर्मद्रोही वाटले पाहिजे.

रामायण ही कथा ऐतिहासिक आहे का कल्पित आहे, राम या देशातील किंवा इजिप्तचा, वगैरे वादात शिरण्याचे कारण नाही. रामायण हे उत्कृष्ट व फार मोठ्या दर्जाचे काव्य आहे. यात राजनिती उत्तम रीतीने वर्णन केलेली आहे. परंतु रामायणात प्रक्षिप्त भाग पुष्कळसा घुसडला गेला आहे. अगदी सुरवातीला वाल्मीकीला रामाचे नाव देखील माहीत नव्हते, असे स्पष्ट असता उत्तर कांडात ते जवजवळच्या प्रांतात राहणारे समकालीन वर्णिले आहेत. उत्तर कांड असे प्रक्षिप्त तसाच रामाला विष्णूचा अवतार व सुग्रीव, हनुमान बिभीषणादींस देवांचे अवतार ठरविणाऱ्या कथा प्रक्षिप्तच आहेत. कबीरादी संतांची कविता पाहता माझा राम दशरथाच्या पोटी जन्मास आला नाही. कौसल्येचे स्तनपान त्याने केले नाही असेच ते कठरवाने सांगत आहेत. लघुयोग वासिष्ठाच्या प्रस्तावनेत आपला राम कसा आहे हे

रमंते योगिनोऽनंते नित्यानंदे चिदात्मनि ।
इति राम पदेनासौ परं ब्रह्माभिधीयते ॥

अनुक्रमणिका

या श्रुतीने रंगनाथ वर्णन करतात, आणि मग योगवासिष्ठाच्या अनुरोधाने पुढील ग्रंथ लिहितात. राम हा विष्णूचा अवतार असे ठरविल्यामुळे रामायण या महाकाव्याची दैना उडाली आहे.

पठन्द्विजो वाग्ऋभत्वमीयात्स्यात्क्षत्रियो भूमिपति त्वमीयात् ।
वणिग्जनः पण्यफलत्वमीयात् जनश्च शूद्रोऽपि महत्त्वमीयात ॥

(बालकांड स. ११, श्लो. १००)

अशी खरोखर या महान ग्रंथाची योग्यता आहे. पण ती भाविकपणे केलेल्या ग्रंथश्रवणापासून नाही. राम अवतार मानला गेल्यामुळे या भाविकपणास ऊत आला व विचारशक्ती कुंठित झाली. विचारपूर्वक या ग्रंथाचे अध्ययन केल्यास बुद्धीचे क्षेत्र वाढेल. पण विचारशक्ती कुंठित झाल्याने राम व त्याचे साह्यकारी सेवक यांची प्रत्येक कृती वंदनीय ठरली, व त्यामुळे बुद्धीला शिक्षण घेण्यास वावच उरला नाही. राम हा इतर माणसांसारखाच एक माणूस होता. तो शूर, वीर, शहाणा, सत्यनिष्ठ असा होता. पण तो स्वार्थीही होता. सीतेला त्याने योग्य प्रकारे वागविले नाही, वालीवध अन्यायाने केला, वगैरे गोष्टींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

रामायणास, इतिहआस, या अर्थाने इतिहास म्हणतात. या शब्दाचा अर्थ—गोष्टी, उपदेश इत्यादिकांनी युक्त जुना वृत्तांत असा ओकांनी केला आहे. यातील उपदेश करताना सांगितलेल्या पुष्कळशा गोष्टी कल्पित असावयाच्याच. वृत्तांतातही पुष्कळसा भाग कल्पित असतो. रामायणानीच गोष्ट घेऊ. रावणाने हरण केलेली सीता रावणास मारून परत आणणे हा या रामायण कथेचा मुख्य भाग. या कामी किष्किंधेच्या वानरराजाचे व वानरसैन्याचे साह्य फारच मोठ्या महत्त्वाचे. हे वानर फार सामर्थ्यवान व मोठे पराक्रमी असे वर्णन केले आहे. इतकेच नव्हे तर ते व लंकेतील सर्व राक्षस हे कामरूपी होते म्हणजे त्यांस इच्छेस येईल ते रूप घेता येत असे, असे त्यांचे वर्णन केलेले आहे. एखादी व्यक्ती योगाभ्यासाने आणिमादिक सिद्धी संपादन करू शकेल असे कबूल करू. पण तीही व्यक्ती विरक्त असावी लागते. सबंध राष्ट्रच्या राष्ट्र व तेही शेपटीवाल्या कपींचे. हे कपी जन्मापासून कामरूपी. तसेच अनेक प्रकारची निर्दय कृत्ये करणाऱ्या व नरमांस भक्षिणाऱ्या राक्षसांचे सबंध राष्ट्र कामरूपी, हेही विश्वास ठेवण्यासारखे नाही. बरे, कपी कामरूपी नव्हते, साधी माणसे होती असे म्हटल्यास मग त्यांचे पृथ्वीपर्यटण, लंकेचा शोध व अखेरची लढाई यांत बरेच टक्के बाद करावे लागतील. यावरून या काव्यातील पुष्कळच गोष्टी घडलेल्या नसून काल्पनिक आहेत असे म्हणणे भाग पडते.

तसेच युद्धाच्या शेवटी महादेव व इतर देव येणे, दशरथाची भेट व सर्व मेलेले वानर जिवंत करणे, वगैरे कथा अगदीच काल्पनिक आहेत. त्यावर विश्वास ठेवणे मला तरी शक्य वाटत नाही.

हा उत्तराचा भाग मूळच्या अपेक्षेपेक्षा फारच वाढला आहे. तेव्हा आता लेखणी आटोपती घेणे बरे. माझा मूळचा लेख जेमतेम दोन पाने होता. त्यावर एकट्या श्री. सरवटे यांची टीका साडेचार पानांची आहे. दुसऱ्या दोन टीका सवापाच पाने आहेत. याला उत्तरही तसेच विस्तृत द्यावे लागले. सर्व उत्तर एकदमच प्रसिद्ध न करता आल्याने अभ्यास करून जास्त पुरावे देण्यास सवड मिळाल्याने उत्तर जास्तच वाढले आहे. मजवर केलेले आरोप भयंकरच होते.

'फोडिले भांडार धन्याचा माल । मी तंव हमाल भार वाही ॥'

अनुक्रमणिका

असे श्री तुकाराम म्हणतात. याहून मी तरी जास्त काय सांगणार? श्री. वाल्मीकीचा माल रामायणरूप भांडारात साठविला आहे. ते भांडार फोडून मी हमाल होऊन तो बोजा वाहून 'ज्ञानमंदिरा' च्या वाचकांपुढे मांडला आहे. यास जे काही आहे ते आद्यकवि वाल्मीकीचे आहे. मांडण्यात जे दोष झाले असतील त्याची जबाबदारी माझे शिरावर आहे. मी तरी 'अपूर्व' शोध लावले नाहीत; वाल्मीकीने सांगितलेलेच पुढे केले आहे. माझ्या विधानास मी रामायणातून भरपूर, 'आधार' दिले आहेत. यामुळ माझी अनुमाने 'सदोष' नाहीत असे मी नम्रपणे म्हणतो उत्तरात दिलेल्या दृष्टांतासारखे दाखले श्री. सरवटे यांस 'भ्रामक' वाटल्यास मुख्य विषयाचे मानाने ते दाखले अगदीच गौण असल्याने ते बाजूस ठेवल्यास माझी काही हरकत नाही. 'ठोकून देतो ऐसाजे' रीतीने लिहितात, सुग्रीवाचे वर्तन निंद्य दिसण्यासाठी त्याच्या पदरी राज्याचा लोभ बांधणे व उलटपक्षी वालीचे वर्तन निर्दोष, निदान क्षम्य दिसावे म्हणून त्या कालात 'भावाच्या बायकोवर एक प्रकारे हक्कच चालत होता' हे अवास्तव विधान करणे, अवश्य होते म्हणूनच ते मुळात आधार नसता केले आहे' असा श्री. सरवटे यांचा मजवर आरोप आहे. मी सत्यशोधक आहे रामायणातील कोणतीही लहानमोठी व्यक्ती माझा शत्रू किंवा मित्र नाही. मला जे दिसले ते मी पुढे ठेविले आहे. सुग्रीवाला राज्यलोभ होता हे पुराव्यानेच सिद्ध आहे. भावाच्या बायकोवर हक्क चालत होता, याला महाभारताचा आधार देऊन शाबित केले आहे. मुळात म्हणजे रामायणातलाच आधार पाहिजे असा आग्रह असल्यास तसाही देता येईल. इतकेच विस्तारभयास्तव आज पुरे.

श्री. सरवटे यांनी पांडवांचा पक्ष घेऊन मजवर झोड उडविली आहे. त्याला मी उत्तर देत नाही. कारण त्यामुळे महाभारताचे मंथन करावे लागेल. माझा मुख्य मुद्दा सुग्रीव–बिभीषण या उभयतांनीही राज्यलोभाने बंधुद्रोह व देशद्रोह केला, परक्याकडून आपल्या भावांस मारण्याच्या कामी साह्य घेतले व स्वतः जेत्याच्या उपकारात व आज्ञेत राहिले. आपल्या स्वतःच्या राज्याभिलाषाच्या पूर्ततेसाठी आपल्या प्रजेचा फार मोठा संहार होऊ दिला, हा आहे. तो रामायणातील पुराव्याने सिद्ध झाला आहे असा मला भरवसा आहे. पांडवांनी तसे केले की नाही हा स्वतंत्र विषय आहे. त्याची चर्चा येथे नको.

'देशद्रोहाची निंदा करण्यासाठी रामायणातून नसती उदाहरणे धुंडून काढण्याच्या व त्याबरोबर निराधार दोषारोपांची विधाने करण्याच्या खटाटोपात पडण्याचे त्यांना कारण नव्हते' असे श्री. सरवटे लिहितात. मी असली उदाहरणे दिली आहेत व साधार दोषारोप केला आहे.

रा. केळकर यांच्या टीकेस उत्तरे वर येऊन गेलीच आहेत. बिभीषण हा आर्य व अनार्य यांची मिश्रसंतती होती असे ते म्हणतात. राक्षस हे अनार्य होते असे उ. कांड सर्ग २–४ वरून दिसत नाही. यक्ष व राक्षस हे प्रथम भाऊ भाऊ होते. रावणाचा थोरला भाऊ कुबेर हा यक्षांचा राजा होता. शिवाय–

विद्याधराप्सरोयक्षरक्षोगंधर्वकिन्नराः ।
पिशाचो गुह्यकः सिद्धो भूतोऽमी देवयोनयः ॥

या आधारे राक्षस हे देवयोनी असल्याने त्यांना अनार्य म्हणता येणार नाही. तेव्हा आर्याचे गुण व अनार्याचे गुण वगैरे चिकित्सा उपयोगी नाही. बिभीषणात आर्याचे सात्विक गुण उतरले होते असे ते म्हणतात. बिभीषण हा मोठा कावेबाज, निष्ठुर, लबाड, लोभी वगैरे गुणांनी पूर्ण होता. यांनाच आर्यांचे सत्विक गुण म्हणावयाचे असल्यास तसे म्हणावे

अनुक्रमणिका

विद्वद्वर्य नानासाहेब वैद्य यांचा 'भारतीय वीरकथा' हा ग्रंथ अलीकडेच माझे पहाण्यात आला. भारतीय वीर भीष्म यांच्यावरच्या आक्षेपाचा विचार करताना त्यांनी तुलनेसाठी बिभीषणाच्याही वर्तनाचा विचार केला आहे. (पहा, भारतीय वीरकथा, पृष्ठ १९१) 'भीष्म नोकर किंवा मंत्री खरे आणि ते हस्तिनापुरी राहिले हेही योग्य, पण उत्पन्न झालेल्या परिस्थितीत सन्मंत्र्याचे कर्तव्य काय, हा प्रश्न येथे उद्‌भवतो, आणि तो प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण त्यातच राष्ट्रभक्तीचे एक अत्युदात्त तत्त्व भरले आहे. अन्याय मार्गाने चालणाऱ्या राजास पदच्युत करावे किंवा ठार मारावे. हा श्रीकृष्णाने एक नवा मार्ग राजनीतीत सुचविला आहे; किंबहुना प्रत्यक्ष कंसवध करून आचरिला आहे. तसे करावे किवा 'राजा पर दैवतमित्युवाच' या व्यासोक्तीप्रमाणे, राजास परंम दैवत मानून, तो जी ठरवील ती पूर्वदिशा धरून, राजनिष्ठपणे भीष्म वागले तसे वागावे हा प्रश्न येथे आहे. तिसरा मार्ग म्हणजे शत्रूस जाऊन मिळावे. हा भीष्म व कृष्ण या दोहोंच्याही मताने त्याज्य व दुष्ट ठरतो. अर्थात बिभीषणाने जे आचरण केले, ते त्यास कितीही भगवद्‌भक्त म्हटले तरी, राजनीतिदृष्ट्या सर्वथैव निंद्य होय, यात शंकाच नाही. असे बिभीषण हिंदुस्थानच्या पुढील इतिहासात अनेक निघून, त्यांनी या भरतखंडाचे अत्यंत नुकसान केले आहे, हे सांगावयास नको अन्यायी राजाशीही राजनिष्ठ राहून मनाने सेवा करणे हेच जास्त कठीण व श्रेयस्कर, असे म्हटले पाहिजे.' (पृष्ठ २४४). 'आपला राजा जर अन्यायाने परराष्ट्राशी युद्ध करील तर सरदार, मंत्री, नोकर, या नात्याने आपले कर्तव्य आपल्याच राजाच्या वतीने लढण्याचे आहे, यांतच खरी स्वामिभक्ती आहे. किंबहुना राजनिष्ठाही यातंच आहे आणि निमकहलालीही यांतच आहे. 'अर्थस्य पुरुषो दासः' ही क्षुद्रबुद्धी नव्हे. ज्याचे आपण अन्न खाल्ले आणि ज्यापासून आपण संपत्ती मिळविली त्याची सेवा आपण योग्य प्रसंगी केली नाही आणि ऋण फेडले नाही, तर हा कृतघ्नपणा होईल. ही निमकहरामी होईल. शिवाय अशी कुचराई प्रसंगी केल्याने आणि अंग बाजूस काढल्याने हल्लीच्या दृष्टीने बोलता आपल्या राष्ट्राचेही नुकसान होईल, ही गोष्टच विस्ताराने सांगणे जरूर नाही.' श्रीयुत नानासाहेबांनी हे आपले मत दहा वर्षांमागे प्रसिद्ध केले आहे. नानासाहेब वैद्य हे सर्वमान्य भारताचार्य. त्यांच्यावर टीका करण्याची हिंमत कोणास झाल्याचे ऐकिले नाही. माझ्यासारख्या गरिबावर अकराजणांनी लेखणी चालविली. हा माझा त्यांनी गौरव केला आहे म्हणून मी त्यांचे उपकार मानतो.

श्री. धारवाडकर यांच्या टीकेतील मुद्यांच्या गोष्टीसंबंधाने उत्तरे वर येऊन गेलीच आहेत. त्यांच्या बाकीच्या टीकेस व विधानांस आणि शिव्यांस उत्तरे देण्याची योग्यता माझे अंगी नाही. 'जाधवप्रिय कुंभकर्ण भावाच्या दुष्कृत्याला दुष्कृत्य ठरवून तण बंधुप्रेमाने लढून रणात मृत्यू पावला व त्याने आपले कर्तव्य बजावले. 'मरणांतानि वैराणि' हा रामाचा उपदेश श्री. धारवाडकरांस पटलेला दिसत नाही. 'कुंभकर्णप्रिय जाधव' हा सत्यशोधक आहे. कोणाची भीडमुर्वत न ठेवता व 'सत्यअसत्यासी मन केले ग्वाही, मानीयले नाही बहुमतां' या श्री. तुकोबारायांच्या तत्त्वांप्रमाणे वागून सत्याचा शोध करीत अखेरपर्यंत तो झटेल. या कामी श्री वाल्मीकी त्याचा पाठीराखा आहे.

या तीनही टीकाकारांचा मी फारफार ऋणी आहे. रामायणाचे माझे वाचन प्रथम फारसे खोल नव्हते; अगदीच उथळ होते. टीकाकारांस उत्तरे देण्याकरिता रामायणाचा बराच अभ्यास करावा लागला. त्यातली काही रत्ने, मोती या उत्तरात दिली आहेत. आणखीही मौल्यवान रत्ने मिळाली आहेत. यथावकाश तीही प्रसिद्धीला येतील. पण या सर्वांचे श्रेय टीकाकारासच दिले पाहिजे. त्यांनी आपला सात्त्विक संताप टीकारूपाने व्यक्त केला नसता तर वाल्मीकीच्या काव्याची खरी योग्यता व रामायणाचा खरा आस्वाद मला मिळाला नसता. म्हणून मी त्यास धन्यवाद देतो.

ज्ञानमंदिर : १५–५–३५ /१–६–३५

अनुक्रमणिका

५ रामायणाचा वाद

'ज्ञानमंदिर' च्या जुलैच्या अंकात रा. रा. रा. ना. पुसाळकर, कोलापूर यांचा 'रामायण असे वाचावे काय?' या मथळ्याचा लेख प्रसिद्ध झाला आहे. जानेवारीच्या अंकात 'रामायणापासून हिंदुस्थानने गिरविलेला धडा' या मथळ्याचा माझा लेख प्रसिद्ध झाला होता. त्यावर तीन टीका प्रसिद्ध झाल्या व त्यावर माझे उत्तर जूनच्या अंकात पूर्ण झाले. यांस उद्देशूनच रा. रा. पुसाळकर यांचा लेख असल्याने माझे विचार मी थोडक्यात देत आहे.

रा. रा. पुसाळकर यांच्या मते 'रामायण महाभारतासारख्या काव्यांचा उपयोग इतिहास म्हणून जर करणे असेल तर तो उपयोग फारच मर्यादितपणे करणे युक्त ठरेल.' हे मलाही मान्य आहे. 'रामायणकाली भावाची बायको दुसऱ्या भावाने घेणे, ही गोष्ट विद्यमान कालमानपरिस्थितीशी सर्वस्वी विरुद्ध आहे. अशा बाबतीत हा मुद्दा शाबीत करण्याचा अट्टाहास का?' असा त्यांनी प्रश्न केला आहे. सुग्रीवाची बायको वालीने बळकावून त्याला हाकून दिल्याने तो वध्य झाला, म्हणून वालीवधाचे रामाचे कृत्य न्याय्य होते, असा टीकाकारांचा आशय होता. त्याला उत्तर देताना त्या काळचा आचार काय होता हे दाखवून वालीचे वर्तन वध करण्यासारखे नव्हते, असे दाखविण्यासाठी पुसाळकरांनी आक्षेप घेतलेला मुद्दा शाबीत करणे जरूर पडले.

जुन्या ग्रंथांचा अभ्यास समाजसुधारणेच्या दृष्टीनेही इष्ट बसतो. आज विवाहाचे कामी सगोत्राची अडचण बरेच ठिकाणी येते. ती दूर करण्याकरिता शास्त्राला संमत नसलेली परगोत्रात दत्तक देण्याचा विधी करून समारंभ उरकला जातो. सगोत्र विवाह निषेध हा अलिकडचे अंमलात आहे. पूर्वी असे विवाह बहिणभावापर्यंत होत असत. ही गोष्ट पटली म्हणजे सगोत्राचा प्रतिबंध झुगारून देण्यास हिंमत येईल. हा एक उद्देश कौसल्या ही दशरथाची बहीण होती या प्रतिपादनात आहे. श्रीजोतिबाच्या डोंगरावर चैत्र शु ॥ १५ स श्रीजोतिबा व त्याची बहीण यमाई यांचा विवाह दरसाल लागतो, ही गोष्ट रा. पुसाळकर यांस माहीत असेलच. तो पूर्वीचा आचार आहे. हे प्रसिद्ध होणे नुकसानीचे नाही.

'येशू ख्रिस्ताचे अमके चुकले अथवा मोझेस अधिक शहाणा असता तर फार बरे झाले असते, अशी चर्चा केव्हाच होत नाही' असे श्री. पुसाळकर प्रतिपादितात. माझेही मत तसेच आहे व रामायणाच्या चर्चेत मी असेच वर्तन ठेविले आहे.

रामायण, महाभारत हे ग्रंथ जुने असले तरी त्यांत घुसडाघुसड पुष्कळच झाली आहे; आणि अनेक मतवाद्यांनी आपआपल्या मतांच्या पुष्टीसाठी त्यांत आपल्यास अनुकूल अशा गोष्टी दडपून दिल्या आहेत. रामास देवपण देऊन त्याला ब्राह्मणांचा आज्ञाधारक बनवून समाजात ब्राह्मणांचे महत्त्व वाजवीपेक्षा फाजील वाढविले आहे. त्याची चर्चा न केल्यास समाजात धर्मभोळेपणा जो बोकाळला आहे, त्याला चिरस्थायी करावयाचे की काय? तो जर कमी करावयाचा असेल तर प्रचलित समजुतीस धक्का देणे क्रमप्राप्तच आहे. पुरातन थोर पुरुषांस कोणाचा तरी अवतार बनवल्याशिवाय आमच्या पुराणकारांस न इरतिहासकारांस आपले ग्रंथच लिहिता आले नाहीत. तेव्हा त्या त्या पुरुषांची खरी योग्यता चिकित्सकांनी समाजापुढे मांडणे इष्टच आहे. या योगाने त्या त्या पुरुषावर आरोपिलेले अवतारत्व गेले तर ते फायद्याचेच होईल. श्रीशिवाजी महाराज छत्रपती यांस शिवाचा अवतार कल्पून लिहिलेली पोथी आम्ही पाहिली आहे. या अवतारकल्पनेने

अनुक्रमणिका

श्रीशिवाजी महाराजांची योग्यता न वाढता उलट कमीच होते. यासाठी या अवतारकल्पनेवर हल्ला चढविणे योग्यच होईल.

श्रीशिवाजी महाराजांच्या भगव्या निशाणाच्या वादात रा. रा. पुसाळकर का शिरले, कळत नाही. श्री रामदासांच्या शिकवणीने त्यांनी भगवे निशाण घेतले असे वारंवार प्रतिपादण्यात येते, त्याच्या खंडनासाठी या निशाणाच्या रंगाच्या वादात पडावे लागते. रा. रा. पुसाळकर पाहतात त्या दृष्टीने सर्वच पाहतील तर बरे.

'रामाने वालीला मारण्यात काय हेतू असावा, सुग्रीवाने भावाशी कपट केले, रावणाने केले ते चूक नव्हते, पण बिभीषणाचे वर्तन गर्हणीय झाले, इत्यादी सिद्धांत आज प्रतिपादन करून आपण काय मिळवू?' असा रा. पुसाळकर सवाल टाकतात. आम्हास धर्माचे ज्ञान पाहिजे, म्हणून आमच्या राष्ट्रीय संपत्तीचा अभ्यास केला पाहिजे, असे प्रतिपादन करणाऱ्याने तो अभ्यास चिकित्सक बुद्धीचा असू नये, हे म्हणणे थोडे विसंगत होईल. ग्रंथ वाचावयाचा तर त्यात चिकित्सक बुद्धी असणेच इष्ट. नाहीतर सात दिवसांत भागवताचे पारायण एकणाऱ्यास जसा काल्पनिक फायदा, तसाच प्रकार येथे होणार.

'रामायण – महाभारतासारख्या ग्रंथांवर सध्याच्या लखाप्रमाणे पूर्वपक्ष, उत्तरपक्ष करीत बसून विचारांचा प्रसार केल्यास, कालवशात या अशा वादाने समाजाची मानसिक बैठकच उखडून टाकली जाईल. अशा प्रसंगी समाजापुढे अधिक चांगला आदर्श ठेवण्यासारखा आपल्याजवळ असावयास हवा, याचा विचार व्हावयास नको काय? आपल्या समाजातील यच्चयावत व्यक्तींत बीजरूपाने का होईना – या ग्रंथांतील शिकवणूक रुजली आहे. त्या ज्ञानाचा नायनाट झाल्यास प्रसंग बिकट येणार खास.' हे विचार रा. रा. पुसाळकरांनी मांडले आहेत व ते पुष्कळांस पसंत पडतील यात शंका नाही.

आजच्या बहुजनसमाजाच्या समजुतीमुळे ज्यांचा फायदा आहे, त्यांना ही स्थिती पालटू नये असे वाटणे साहजिक आहे. पण खाली दडपल्या गेलेल्या वर्गाच्या दृष्टीने ही समजूत पालटणे अगदी अवश्य आहे. भगवान् बुद्धाच्या पूर्वी यज्ञयागाचे फार मोठे प्रस्थ होते; वेदावर लोकांची फारच श्रद्धा होती; पण त्यामुळे बहुजनसमाज अज्ञानात व थोडे वेद जाणणारे व यज्ञ करणारे सुखात अशी स्थिती होती. भगवान बुद्धांनी यज्ञकांडावर व वेदावर हल्ला चढविला. त्यावेळच्या पुसाळकरांनी समाजावर, 'बिकट प्रसंग येणार' अभी ओरड केली असणारच. नवीन विचारांनी समाज अधोगतीला जाईल ही भीती व्यर्थ आहे. समाज स्थिर राहणार. पुढील साधुसंत, समाजसुधारक यांनीही धर्मभोळेपणावर झोड उठविलीच आहे.

रा. रा. पुसाळकर यांचा सर्वच लेख शांतपणे लिहिलेला व पक्षाभिमानापासून मुक्त आहे. त्यात तत्त्वशोधनाची तीव्र इच्छा आहे. रा. पुसाळकर शांततापिय व समतोल मनाने लिहिणारे आहेत. अशांनी केलेल्या वादापासून तत्त्वबोध होईल. त्यांचे विचार माझ्या विचारांशी पुष्कळ जुळतात, पण विचारांची खळबळ समाजसुधारणेस अवश्य आहे, असे मला वाटते.

ज्ञानमंदिर, १ ऑगस्ट, १९३५

अनुक्रमणिका

६ इतिहासदृष्टीने रामायण काव्याची योग्यता

इतिहास कोणता?

संस्कृत वाङःमयात रामायण व महाभारत हे मोठे काव्यग्रंथ आहेत; त्यांस इतिहास असेही म्हणतात. संस्कृत भाषेत इतिहास या शब्दाची इति + ह + आस. अशी पदे पडतात त्यावरून कोणत्याही खऱ्या, खोट्या, काल्पनिक गोष्टीस इतिहास म्हटले जाते. आजच्या मराठी भाषेतील इतिहास शब्दाची व्याख्या निराळी आहे हकीगत जशी घडली तशी ज्या ग्रंथात लिहिली असेल त्यासच सांप्रत इतिहास ग्रंथ म्हणतात. पूर्वीच्या म्हणजे उपनिषत्काली इतिहास शब्दाचा प्रयोग छांदोग्य व बृहदारण्य या दोन उपनिषदांत आढळतो बृहदारण्यात महाभूताच्या निश्वसितापासून उत्पन्न झालेल्या ज्ञानाच्या यादीत इतिहास सांगितला आहे. पण तो ब्राह्मणांतर्गतच घेतला पाहिजे असे शांकरभाष्यात सांगितले आहे; कारण त्यास निश्वसित म्हटले आहे. येथे महाभारत व रामायण हे इतिहास या सदराखाली येत नाहीत. छांदोग्याच्या सातव्या अध्यायात नारद—सनत्कुमार संवादात हा शब्द तीन वेळ एकाच अर्थी आला आहे. आपण काय शिकलो याची यादी देताना 'इतिहासपुराणं पंचमं,' 'इतिहासपुराणः पंचमः' असे प्रयोग आढळतात. भाष्यकारांनी 'वेदानां भारतपंचमानाम्' असे भाष्य केले आहे त्यावरून भारतग्रंथाला इतिहास म्हणणे श्रीशंकराचार्यांस कबूल असावे. पण ते रामायणास इतिहास म्हणत नाहीत. तसेच रामायण पढण्याचे महत्त्व नारदाच्या दृष्टीनेही नव्हते, असे दिसून येते.

छांदोग्याच्या काली व पुढेही श्रीशंकराचार्यांच्या वेळी भारत हा इतिहास आहे असे मान्य होते. महाभारतास तो शब्द लावीत नसत. कसेही असले तरीरामायणास इतिहास म्हणण्याचा संप्रदाय पूर्वी नव्हता. अलीकडेच म्हणू लागले असावेत.

कथा कोणी चोरली?

'महाराष्ट्र—शारदे' च्या फेब्रुवारी, मार्च व मे महिन्यांच्या अंकांत मल्लादि वेंकटरत्नम् या विद्वानाच्या ग्रंथाधाराने 'वाल्मीकीचे वाङमयाचौर्य व रामायणांचे मूळ इजिप्तमध्ये' या मथळ्याचे लेख प्रसिद्ध झाले. त्यावरून जिज्ञासा उत्पन्न होऊन वेकटरत्नम् यांच्या ग्रंथाचे दोन्ही भाग वाचून पाहिले. त्यांतील सर्वच सिद्धांत सर्वमान्य होण्यासारखे नाहीत. तथापि रामायणकथेचा विचार करणे जरूर आहे इतके तरी कोणासही पटण्यासारखे आहे.

मल्लादि वेंकटरत्नम् यांचे म्हणणे इजिप्तच्या राजवंशापैकी एका वंशाचा रामेसु (रामेसिस) हा मोठा पराक्रमी राजा होता. त्याची कथा ऐकून कोणी कवीने त्या कथेवर आपल्या कल्पनेच्या जोराने रामायण हे काव्य लिहिले.

परभाषेतील पुस्तकाचे भाषांतर करण्याची प्रथा पूर्वीपासून आहे. पैशाची भाषेतील बृहत्कथेचे संस्कृतीकरण केल्याचे प्रसिद्धच आहे. परकीकथा व वंशावळी भाषांतरित करून आपल्या ग्रंथात दडपून देण्याचा संप्रदाय भविष्यपुराणात ढळढळीत दिसतो. जुन्या करारांतील राजांच्या वंशावळी जशाच्या तशा त्या पुराणात उतरून घेतलेल्या आढळतात. कोणी कोणापासून चोरल्या हा संशयही उरत नाही. कारण त्या वंशावळीतील नावे इकडे अपरिचित आहेत. कशाचे भाषांतर केले हे स्पष्ट सांगण्याचा प्रामाणिकपणा व

अनुक्रमणिका

थोरपणा फारसे कोणी दाखवीत नाहीत. जो तो सर्व श्रेय आपणाकडेच घ्यायचा प्रयत्न करतो. रामायणातील कथेचे मिसरी मूळ झाकून व तिकडील काही नावांस संस्कृतरूप देऊन व काहींची पूर्णपणे बदलून हा ग्रंथ तयार झाला असे त्यांनी प्रतिपादिले आहे.

आजच्या कालीही परदेशी किंवा परप्रांतीच्या गोष्टींना मराठी पेहराव देऊन आपल्या स्वतंत्र कल्पनेच्या म्हणून दडपून देण्याची उदाहरणे पुष्कळच आहेत. हा संप्रदाय अलीकडच्या या कलियुगातच सुरू झाला किंवा त्रेतायुगात रामकालीही तो जारी होता हा मुद्दा मल्लादि वेंकटरत्नम् यांनी सर्वांपुढे मांडला आहे. इजिप्तची कथा आमच्या वाल्मीकीने संस्कृतात भाषांतरिली का आमची संस्कृतातील कथा इजिप्तात दगडावर खोदली गेली हाही विचार करण्यासारखाच प्रश्न आहे, याचा विचार समतोल बुद्धीने केला पाहिजे. यात पक्षाभिभान् किंवा देशाभिमान किंवा धर्माभिमान यांस वाव न देता केवळ सत्य काय आहे याचा शोध करणे योग्य होईल.

मल्यादि वेंकटरत्नम् यांच्या म्हणण्याप्रमाणे राम तर आमचा नव्हेच; तसेच रामायणातील इतर पात्रे, रावण व त्याचे घराणे, वाली व सुग्रीव हीही परदेशीय; इतकेच नव्हे तर वाल्मीकीही तिकडचाच. अगस्त्य हा रोमन बादशहा आगस्टस, लोपामुद्रा ही त्याची पत्नी लिविया अशाप्रकारे त्यांच्या शोधात पुष्कळच अतिशयोक्ती झालेली आहे. यासाठी त्याची छाननी करणे अवश्य आहे.

आद्य काव्याची छाननी

रामायणाची अशी छाननी करण्याने त्या ग्रंथाविषयी व त्यात वर्णिलेल्या व्यक्तींविषयी अश्रद्धा उत्पन्न होण्याचा संभव असल्याने हे काम करूच नये, असे म्हणणारे कोणी 'न बुद्धिभेदं जनयेवज्ञानां कर्मसंगिनाम्।' हे गीतावचन आमच्या अंगावर टाकतील. कोणी, 'रामायण असे वाचावे काय?' असा बुद्धिवाद करून चिकित्सक प्रयत्न करूच नये असे प्रतिपादितील. आमच्या दृष्टीने आमचा मार्ग स्पष्ट आहे. जे सत्य असे दिसेल ते लोकांपुढे मांडावयाचे. घेणारे घेतील. असत्याला चिकटून राहणाऱ्यांनी खुशाल डोळें मिटून व कानांत दडे घालून आपल मार्ग क्रमावा. विचाराचे प्राबल्य केव्हा तरी होणारच.

रामायण हे आद्य काव्य व वाल्मीकी हा आदिकवी असे मानले जाते. या काव्याचा आरंभ अगदी साधेपणाने झाला आहे. याला मंगलाचरण नाही. वाल्मीकीला काव्य करण्याची कल्पना कशी सुचली हेच प्रथम सांगितले आहे. त्यातील पहिलाच श्लोक पहा :

तपःस्वाध्यायनिरतं तपस्वी वाग्विदांवरम् ।
नारदं परिपप्रच्छ वाल्मीकिर्मुनिपुंगवम् ॥

बालकांड सर्ग श्लोक १

अर्थ : वेदाध्ययनरुप तपश्चर्येचे ठिकाणी तत्पर अशा वाल्मीकी मुनीनी शब्दब्रह्मवेत्त्यांमध्ये श्रेष्ठ आणि मुनींमध्ये वरिष्ठ अशा नारदांना प्रश्न केला.

सदरचा प्रश्न २ ते ५ श्लोकांपर्यंत आहे. वाल्मीकी विचारतात, 'वर्तमानकाळी या भूलोकावर बहुगुणसंपन्न असा कोण आहे? अर्थात् वीर्यवान, धर्मरहस्यवेत्ता, कृतज्ञ, सत्यवचनी, धर्माकरिता

अनुक्रमणिका

स्वीकारलेल्या व्रताचा आपत्कालीही त्याग न करणारा, सदाचारसंपन्न, प्राणिमात्रांच्या हिताविषयी तत्पर समर्थ, दर्शन झाले असता लोकांना अत्यंत आनंद देणारा, मनोनिग्रही, क्रोधादिकांचे संयमन करणारा, तेजस्वी, परोत्कर्षाविषयी मत्सर न धरणारा आणि युद्धकाली क्रुद्ध झाला असता देवांनाही भीती उत्पन्न करणारा असा कोण आहे हे श्रवण करण्याची माझी इच्छा आहे; इतकेच नव्हे परंतु, ते श्रवण करण्याविषयी मला पराकाष्ठेची उत्सुकता आहे. आणि हे महर्षे, आपणही अशा प्रकारचा पुरुष कोण आहे हे जाणण्यास समर्थ आहात.' हा प्रश्न ऐकून तिन्ही लोकांतील वृत्तान्त जाणणारे नारदमुनी आनंदित झाले व ऐकावे तसे वाल्मीकीस म्हणाले. 'आपण विचारलेले गुण बहुत असून दुर्लभच आहेत; तथापि हे मुने, त्या गुणांनी संपन्न कोण आहे याचे स्मरण करून मी आपणाला कथन करतो, आपण त्या त्या गुणांनी युक्त पुरुष कोण तो श्रवण करा.' असे ७ व्या श्लोकात सांगून ८ ही १९ अशा १२ श्लोकांनी नारदांनी रामाचे वर्णन केले. पूढे २०–८९ श्लोकांपर्यंत ७० श्लोकांनी रामाचे चरित्र वर्णिले आहे येंथपर्यंतची क्रियापदे भूतकाली आहेत. पुढील ९०–९७ पर्यंत आठ श्लोक रामराज्याच्या वर्णनपर असून त्यांतील क्रियापदे भविष्यकाळी आहेत. पुढील तीन श्लोक रामायणपठणाच्या फलश्रुतीचे आहेत. पहिल्या सर्गात इतका विषय आला आहे.

यावरून पुढील अनुमाने निघतात :

१. राम, वाल्मीकी व नारद हे समकालीन होते.

२. नारदाला रामचरित्राची चांगलीच माहिती होती.

३. वाल्मीकीला रामाची काहीच माहिती नव्हती. राम आर्यावर्तातील राजा असता तर त्याची माहिती त्यास असावयास पाहिजें होती.

४. नारद तिन्ही लोकात फिरणारा म्हणून त्यास माहिती झाली.

परदेशात प्रवास करून आलेल्या बहुश्रुताजवळ वाल्मीकीने चौकशी केली; अशी चौकशी करणे साहजिक आहे.

यावरून राम व वाल्मीकी समकालीन असले तरी ते भिन्न देशांतील होते. रामायण काव्याचा कर्ता एतद्देशीय होता यात संशय नाही. त्यावरून राम हा दूरवरच्या देशातील पुरुष असला पाहिजे असे अनुमान होते.

आता नारदाने सांगितलेल्या रामचरित्राचा विचार करू.

रामचंद्राला चिकटविलेले गुण

वाल्मीकीला रामाची काही माहिती नव्हती ती त्यास नारदाने दिली. यावरून राम हा परदेशातील असावा व नारद हा तिकडून आला होता म्हणून ती त्याला सांगता आली असे अनुमान काढले आहे. आता नारदाने रामाविषयी काय सांगितले ते पाहू. कारण या माहितीचाच विस्तार पुढील ग्रंथांत केलेला आहे.

८ वे श्लोकापासून १८ श्लोकांपर्यंत फक्त रामाच्या गुणाचे, शरीराचे वगैरे वर्णन आहे. यात त्याला नियतात्मा म्हटले आहे. म्हणजे तो मनोनिग्रही होता; पण रामाच्या एकपत्नीत्वाचा उल्लेख यात मुळीच नाही दशरथाला साडेतीनशे बायका होत्या; त्यांत तीन प्रमुख होत्या. भरत–लक्ष्मणालाही अनेक भार्या होत्या.

अनुक्रमणिका

अशा या काळी रामास बहुपत्नी असणे स्वाभाविक होते. तसे नसून त्यास एकच पत्नी असती तर ती गोष्ट अजब म्हणून नारदाने स्पष्टपणे सांगणे योग्य झाले असते.

कैकेयीला पूर्वी वर दिले होते त्याप्रमाणे रामाचा वनवास व भरताला राज्य हे तिने मागितले. सत्यवचनी दशरथाने आपल्या प्रियपुत्र रामाला वनामध्ये पाठविले, कैकेयीचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी राम वनामध्ये गेला. त्याचेबरोबर लक्ष्मण स्नेहामुळे गेला सीताही रामाबरोबर गेली येथे सीतेचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे

रामस्य दयिता भार्या नित्यं प्राणसमा हिता ।
जनकस्य कुले जाता देवमायेव निर्मिता ॥
सर्वलक्षणसंपन्ना नारीणामुत्तमावधूः ।
सीताप्यनुगता रामं शशिनं रोहिणी यथा ॥

वा. रा. बा. कांड १ । २५ । २६ । २७ । २८

अर्थः जनकाच्या कुलामध्ये उत्पन्न झालेली, देवमायेप्रमाणे निर्माण झालेली, सर्व लक्षणांनीं संपन्न असलेली, स्त्रियांमध्ये उत्कृष्ट असलेली आणि रामाला प्राणासमान प्रिय असून त्याचे हित करण्याविषयी तत्पर असलेली जी रामाची भार्या तीही चंद्राच्या मागोमाग जाणाऱ्या रोहिणी नक्षत्राप्रमाणे रामाच्याबरोबर गेली.

सीता ही रामाची एकुलती एक पत्नी होती असे सांगितले नाही. इतकेच नव्हे तर ती फार आवडती होती असे सांगितल्याने दुसऱ्याही बायका होत्या असा ध्वनी निघतो. त्यांत सीता ही सर्वांत लाडकी होती. चंद्ररोहिणीचा दृष्टांत रामसीतेला दिला आहे; त्यावरून रामाच्या बहु पत्नीकत्वाच्या अनुमानाला बळकटी येते. चंद्राला २७ बायका असून रोहिणी ही त्याची सर्वांत आवडती बायको आहे असे वर्णिले जाते.

भौगोलिकदृष्ट्या पाहणी

राम अयोध्येहून निघून रथाने शृंगवेरपुरापर्यंत गेला. तेथून त्याने रथ परत पाठविला व गुह नामक निषादांच्या पत्तीच्या साह्याने गंगा नदी त्यांनी ओलांडिली नंतर भरद्वाज मुनीच्या आज्ञेवरून चित्रकूट पर्वतावर पर्णकुटी करून राहिले. इतक्यात दशरथ राजा पुत्रशोकाने मरण पावला. तेव्हा वसिष्ठ प्रभृती द्विज भरताला राज्याचा स्वीकार करण्याविषयी सांगू लागले. भरताने ते मान्य केले नाही. तो रामास आणण्यास चित्रकूटावर गेला. रामाने परत येण्याचे नाकबूल केले व भरतास पादुका दिल्या. भरत परत येऊन नंदिग्रामात राहून राज्य करू लागला. पुढे राम दंडकारण्यात जाऊन राहिला. तेथे त्याने विराध राक्षसाचा वध केला. नंतर शरभंग, सुतीक्ष्ण, दोघे अगस्त्य बंधू यांची भेट घेतली. ऋषीच्या विनंतीवरून राक्षसांचा वध करतो असे वचन रामाने दिले. पुढे रामाने जनस्थानात राहणारी शूर्पणखा विरूप केली. तिने उठविलेले खर, त्रिशिरा व दूषण या राक्षसांचा व आणखी चौदा हजार राक्षसांचा रामाने वध केला. आपल्या ज्ञातीचा नाश झाल्याचे वृत्त ऐकून रावणाला क्रोध आला. त्याने मारीच नको नको म्हणत असता त्याच्या मदतीने रामलक्ष्मणांस दूर नेववून असहाय्य झालेल्या सीतेला उचलून नेले. जटायू नामक गृध्राचा वध केला. सीतेविषयी विलाप करीत फिरत असता कबंधास रामाने मारून जाळले. त्याने धर्माने वागणाऱ्या आणि

अनुक्रमणिका

धर्मज्ञ अशा शबरी नामक तापसीला भेट असे सांगितले. तिच्यापासून सत्कार घेतल्यावर हनुमान वानराची भेट पंपा सरोवरावर झाली. हनुमानाच्या मार्फत सुग्रीवाची भेट घेऊन त्याला आपले दुःख निवेदिले. सुग्रीवाने अग्निसाक्षिक सख्य रामाबरोबर जोडले. सुग्रीवाने रामास आपले दुःख सांगितले, रामाने वालीवधाची प्रतिज्ञा केली. सुग्रीवाने वालीस आव्हान दिले. सुग्रीवाचे व वालीचे युद्ध चालू असता रामाने वालीचा बाणाने वध केला व सुग्रीवास राज्यावर बसविले. सुग्रीवाने दशदिशांस वानर पाठवून सीतेचा शोध केला. संपातीच्या सांगण्यावरून शतयोजन विस्तीण अशा समुद्रावरून हनुमान उडी मारून गेला. सीतेचा शोध काढून, लंका जाळून रामाला बातमी सांगण्यास हनुमान परत आला. समुद्राच्या सांगण्यावरून रामाने नलाकडून सेतू बांधिला आणि त्या सेतूने लंकानगरीला जाऊन व त्या ठिकाणी युद्धामध्ये रावणाचा वध करून रामाने सीता प्राप्त करून घेतली. अग्निदिव्य केल्यावर निष्कलंक अशा सीतेचा रामाने स्वीकार केला. बिभीषणाला लंकाराज्यावर अभिषेक करून पुष्पक विमानात बसून राम अयोध्येस निघाला. हनुमानास पुढे पाठवून राम नंदिग्रामास जाऊन भरतास भेटला. रामाचा राज्यावर अभिषेक झाला. पुढे रामराज्याचे वर्णन करून रामायणाची फलश्रुतीही सांगून नारदाने आपले भाषण संपविले. या कथेत सीतेला पुन्हा वनवासास पाठविलेल्याचा उल्लेख नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे.

अयोध्येचे वर्णन

नारदाने सांगितलेल्या संक्षिप्त रामायणात व्यक्तींची व स्थळांची बरीच नावे आली आहेत. दशरथ, कैकेयी, भरत, गुह, भरद्वाज, वसिष्ठ, विराध, शरभंग, सुतीक्ष्ण, अगस्त्य व त्याचा बंधू, शूर्पणखा, खर, त्रिशिरा, दूषण, रावण, मारिच, जटायू, कबंध, शबरी, हनुमान, सुग्रीव, वाली, संपाती, नल, बिभीषण इत्यादी नावे व्यक्तींची आहेत. तशीच अयोध्या, शृंगवेरपुर, चित्रकूट, नंदिग्राम, दंडका, जनस्थान, पंपा, किष्किंधा, लंका वगैरे स्थलांचीही नावे आली आहेत. रामायणात दिलेले **अयोध्येचेच** वर्णन पाहू. रामायण, बालकांड सर्ग ५.

कोशलो नाम मुदितः स्फीतो जनपदो महान् ।
निविष्टः सरयूतीरें प्रभूतधनधान्यवान् ॥ ५ ॥
अयोध्या नाम नगरी तत्रासील्लोकविश्रुता ॥
मनुना मानवेंद्रेण या पुरी निर्मिता स्वयम् ॥ ६ ॥
आयता दशच द्वेच योजनानि महापुरी ।
श्रीमती त्रीणि विस्तीर्णा सुविभक्तमहापथा ॥ ७ ॥

सरयू नदीचे तीरी कोशल म्हणून एक मोठा देश आहे. त्यात धनधान्याची समृद्धी आहे; त्यातील लोक आनंदित आहेत व उत्तरोत्तर त्या देशाची अभिवृद्धी होत आहे. त्या देशामध्ये मानवाधिपती मनूने स्वतः निर्माण केलेली अशी एक अयोध्या नावाची जगद्विख्यात नगरी आहे. त्या मोठ्या नगरीची लांबी अठ्ठेचाळीस कोस असून रुंदी बारा कोस आहे आणि ती नगरी वैभवसंपन्न असून स्पष्ट अशा बाह्य मार्गांनी युक्त आहे. पुढे आणखी सोळा श्लोकांनी अयोध्येचे वर्णन केलेले आहे. ही सर्व नगरी घरांनी खच्चून भरली होती व हिच्याभोवती कोट व खंदक वगैरे होते. (लेलेशास्त्रीकृत भाषांतर)

अनुक्रमणिका

ही अशी ४८ कोस लांब व बारा कोस रुंद अशी नगरी होती, यात लोकसंख्या किती होती याचा अंदाज दिलेला नाही. तिचा आकार अष्टपैलू होता. तिच्यामध्ये घरांची अगदी खेचाखेच झाली असून मोकळी जागा कोठेही राहिलेली नाही असे १६ । १७ व्या श्लोकात सांगितले आहे. यावरून या अयोध्येची वस्ती मुंबईच्या वस्तीच्या बरीचपट असली पाहिजे असे अनुमान होते.

आजची अयोध्या गोग्रा नदीच्या काठी दाखविली जाते; पण तेथे किंवा आसपास इतकी मोठी राजधानी पूर्वी होती अशा खाणाखुणा काहीच मिळत नाहीत. जुन्या मोठ्या शहरांचे अवशेष जमिनीत दडपून गेलेले बहुतेक ठिकाणी सापडत असतात व त्या त्या सापडलेल्या पदार्थांवरून पूर्वीचा इतिहास कळत असतो व त्याविषयी खात्री पटते.

उंटांची व गाढवांची गर्दी

पण या अयोध्येच्या अस्तित्वाची खूण आजमितीस मुळीच सापडत नाही. रामायणात तिचे वर्णन आहे व त्या आधारे एक गाव रामाची अयोध्या या नावाने आजही ओळखले जाते. यापेक्षा अयोध्येविषयी काही पुरावा मिळत नाही; ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. रामायणात सरयू नदीवर अयोध्या होती असे सांगितले आहे. आजचे नदीचे नाव गोग्रा आहे. नावात असा बदल का व कसा झाला हे कळत नाही.

अयोध्या ही मोठी नगरी अशी वर्णिली आहे. तिच्या किल्ल्यांचे, रस्त्यांचे, बाजारांचे, परदेशी व्यापारांचे, मोठमोठ्या वाड्यांचे, नायकिर्णींचे वगैरे वर्णन इतर शहरांप्रमाणेच आहे. पण अयोध्येचा काही विशेषही सांगितला आहे व तो विचार करण्यासारखा आहे.

तेराव्या श्लोकाचा उत्तरार्ध

वाजिवारणसंपूर्णा गोभिरुष्ट्रैः खरे स्तथा ॥

असा आहे. (अश्व व गज, बैल, उंट व गर्दभ यांनी ती भरलेली असून) प्रत्येक राजधानीत हत्ती व घोडे यांची गर्दी असावयाचीच, बैल हेही असतातच; पण उंट व विशेषतः गाढवे यांनी अयोध्या भरलेली होती असे वाचले म्हणजे विचार करणे भाग पडते उंटांचा उपयोग वालुकामय प्रदेशातच होतो व तेथे ते पुष्कळ असतात. आज रजपुतान्यातीत सर्व संस्थानांत त्यांचा मोठा भरणा आहे; पण ह्या वालुकामय प्रदेशात लोकसंख्याही कमी असते. अयोध्या माणसांनी गजबंजली होती. गंगा, यमुना नद्यांच्या काठावरील प्रदेश सुपीक, तेथे उंटांचा उपयोग नाही. पण अयोध्येत तर त्यांची गर्दी. तशीच गर्दभांची. हा प्राणी आर्यांच्या मताने अशुभ. त्यावर बसल्यास द्विजांचे उपनयन पुन्हा केले पाहिजे अशी शास्त्राज्ञा. अशा प्राण्यांची अयोध्येत गर्दी होती हे सांगणे म्हणते अयोध्या ही नगरी आर्यावर्ताच्या बाहेर असावी असे सांगण्यासारखेच आहे!

श्रृंगवेरपुराविषयी पंचाईत

आता श्रृंगवेरपुराविषयी विचार करू. राम वनवासाला निघाला तो रथातून निघाला. त्या वेळी त्याला निघण्यास बराच उशीर झाला असला पाहिजे; म्हणजे सूर्यास्तास तास दोन तास फार तर असतील. पहिला मुक्काम तमसेवर पडला. मोठ्या पहाटेस राम तमसा उतरून पलीकडे गेला. बराच रस्ता

अनुक्रमणिका

काटल्यावर सूर्य उगवला. प्रातःसंध्या करून राम आपला देश ओलांडून पलीकडे गेला. (**विषयानत्यगाहत** रा. अ. कां. स. ४९, श्लोक २) यावरून अयोध्येच्या पूर्वेस सुमारे ५० । ६० मैलांपेक्षा दशरथाच्या राज्याची सीमा जास्त नसावी. इतकीच किंवा फार तर दुप्पट चारी बाजूंना सीमा असेल. इतक्याशा प्रदेशाची राजधानी ४८ कोस लांब य १२ कोस रुंद असणे असंभवनीय आहे. वाल्मीकीने या बाबतीत अतिशयोक्ती केली हे स्पष्ट आहे कोसल देशाचा विस्तार मोठा नव्हता म्हणून दशरथाला सम्राट किंवा सार्वभौम ही लावलेली पदवी औपचारिकच समजावी लागेल. अयोध्या नगरीच्या आग्नेयेस गंगा व सरयू – आजची गोग्रा – यांच्या संगमाखाली श्रृंगवेरपूर हे नगर लागले. अयोध्येहून निघाल्यानंतर रामलक्ष्मणांनी तमसेवर पहिली रात्र घालविली. दुसरी रात्र गंगेवर श्रृंगवेरपुरी घालविली. एका दिवसात, रथ ओढणारे घोडे ४० । ५० मैलांपेक्षा जास्त मजल करू शकणार नाहीत. फार फार तर ६० । ७० मैल. अयोध्येहून बरोबर थेट दक्षिणेस राम गेलेला नाही, तर पूर्वदक्षिणेस गेलेला आहे. श्रृंगवेरपूर हे गंगेच्या उत्तर तीरावर मिर्झापूरजवळ होते. गंगा नदीच्या पलीकडच्या तीरावर वत्स देश होता असे सांगितले आहे, पण हा देश प्रयागच्या पश्चिमेस आहे असे इतरत्र सांगितले आहे. म्हणजे रामायणाप्रमाणे राम अयोध्येहून सरयूच्या काठाने पूर्वेस गेला. श्रृंगवेरपुराजवळ त्याने नावेने गंगा नदी ओलांडली, तेव्हा तो वत्स देशास पोहोचला होता. तेथून तो पश्चिमेस गेला असला पाहिजे. कारण तो मग गंगा–यमुनांच्या संगमास जाण्यास निघाला असे (अयोध्याकांड सर्ग ५४ श्लोक यात) सांगितले आहे.

यत्र भागीरथीं गंगा यमुनाभिप्रवर्तते ।
जग्मुस्तं देशमुद्दिश्य विगाह्य सुमहद्वनम् ॥ २ ॥

'आणि फार मोठे वन ओलांडून गेल्यावर जेथे यमुनेचा भागीरथीशी संगम होत आहे त्या (प्रयाग) देशाला जाण्याकरिता निघाले.' पुढे पाचव्या श्लोकात, प्रयाग पहा, असे राम सांगत आहे. तेथे तो भरद्वाजाच्या आश्रमास पोहोचला. तेथून दहा कोसांवर असलेल्या चित्रकूटावर राहा असे भरद्वाजाने रामास सांगितले. आज चित्रकूट म्हणून दाखविलेली जागा प्रयागच्या पश्चिमेस आहे.

भरत रामास भेटण्यास आला तोही श्रृंगवेरपुराजवळ गुहाच्या सहाय्याने नदी उतरून आलेला आहे. आजची अयोध्या, गोग्रा नदीचा भागीरथीशी संगम व गंगा–यमुना संगमाचे प्रयाग, हे तीन बिंदू समभुजत्रिकोण साधतात. म्हणजे अयोध्येपासून श्रृंगवेरपुराचे जितके अंतर तितकेच अयोध्येचे प्रयागपासून अंतर व तितकेच प्रयाग व श्रृंगवेरपुराचे मधील अंतर. म्हणजे राम व भरत हे सरळ मार्गाने प्रयागास न जाता दुप्पट अंतर चालून प्रयागास गेले आहेत, हे फार चमत्कारिक आहे.

कवीचे अगाध ज्ञान

रामायणांत पुढे घुसडाघुसड पुष्कळच झाल्याने वाल्मीकीच्या काव्याला फार कमीपणा आलेला आहे. वाल्मीकीसारख्या जुन्या कवीला भरताची सेना गंगा नदी कशी तरून गेली याचे विस्तृत वर्णन देण्याची जरुरी वाटणार नाही. हे वर्णन कोणीतरी शहरातच जन्म घालविलेल्या व सेना न पाहिलेल्या कविबुवाने घुसडून दिलेले दिसते. उदाहरणार्थ– अयोध्याकांड सर्ग ८९, श्लोक १७ व १९.

नारीणामभिपूर्णास्तु काश्चिकाश्चित्तु वाजिनाम् ।
काश्चित्तत्र वहंति स्म यानयुग्यं महाधनम् ॥ १७ ॥

अनुक्रमणिका

या श्लोकात, 'काही नावा घोड्यांनी खचलेल्या होत्या व काही बहुमूल्यवान गाड्या ओढणारें बैल वगैरे वाहून नेत होत्या.' असे सांगितले आहे. सैन्यातील घोडे व बैल नदी उतरताना स्वतः पोहून जातात. त्यांस नावेत घालावे लागत नाही याची जाणीव या कवड्यास नव्हती.

पुढील १९ वा श्लोकच पहा :

सवैजयन्तास्तु गजा गजारोहः प्रचोदिताः ।
तरन्तःस्म प्रकाशन्ते सपक्ष इव पर्वताः ॥

'माहुतांनी प्रेरणा केलेले ध्वजांसहवर्तमान गज नावांतून तरून जाऊ लागले असता पक्षयुक्त पर्वताप्रमाणे दिसू लागले.' हत्ती हा जबर पोहणारा आहे. पाठीवर बसणारासुद्धा तो कसल्याही पुरातून तरून जातो हे प्रसिद्ध आहे; पण या बनावट वाल्मीकीला मात्र ही गोष्ट माहीत नव्हती असे दिसते!

आता श्रृंगवेरपुराविषयी सध्या काय मत आहे ते पाहू. गंगेच्या उत्तर तीरावर अलाहाबादच्या वायव्येस अठ्ठावीस मैलांवर श्रृंगरौर या नावाचे गाव आहे, तेच पूर्वीचे श्रृंगवेरपूर असे दाखविण्यात येते. तेथे श्रृंगी ऋषीचा आश्रम असल्याने ते नाव पडले असे म्हणतात. हे गाव पूर्वीचे रामकालचे श्रृंगवेरपूर असल्यास राम जवळच्या रस्त्याने सरळ तेथे आला असे होईल. पण मग चित्रकूटास जाताना त्याला प्रयाग लागणार नाही. प्रयाग लागले हा उल्लेख रामायणात स्पष्ट आहे.

या भौगोलिक स्थितीवरून एक तर आज दाखविण्यात येत असलेले श्रृंगरौर हे गाव पूर्वीचे श्रृंगवेरपूर नसावे किंवा रामायणात दिलेले प्रवासाचे वर्णन तरी काल्पनिक असावे. कारण तो रामाचा प्रवास खरा धरल्यास रामाने पूर्वेस पुष्कळ दूर जाऊन पुन्हा गंगेच्या काठाने सुमारे दोनशे मैल पायी पायी पश्चिमेकडे जाण्यास काही योग्य कारण दिसत नाही; तसेच भरतानेही जवळच्या रस्त्याने चित्रकूटास रामाकडे न जाता रामाने जसा वळसा घातला त्याच दूरच्या रस्त्याने इतक्या मोठ्या अगडबंब फौजेसुद्धा जाण्याचे श्रम घ्यावे ही गोष्ट विचारबुद्धीस पटणे कठीण.

सर्वज्ञ संस्कृत टीकाकार

आता श्रृंगवेरपूर या शब्दाचा थोडा विचार करू. श्रृंगी ऋषीचा आश्रम सिंगरौर येथे दाखविला जातो. त्या ऋषीच्या नावावरून त्या गावास सिंगरौर हे नाव पडले असेल. पण रामायणातील गुहाच्या राजधानीचे नाव श्रृंगिबेरपूर असे आहे. त्यातील बेर शब्दाची उपपत्ती लावण्याचा प्रसंग टीकाकारांवर आला तेव्हा त्यांनी, श्रृंगि म्हणजे हरणातील नर, बेर, वेर म्हणजे देह व पुर म्हणजे शहर असा या समासांतील तीन पदांचा अर्थ घेतला व ज्या गावात हरणाची शरीरे (अर्थात् पेंढा भरलेली कातडी) घरोघर आहेत ते गाव असा केला. त्या नगरात राहणारे लोक निषाद म्हणजे शिकार करणारे होते. म्हणून हरणे भुलून गावात यावी या हेतूने असे कृत्रिम हरीण उभे करीत. अशी कल्पना टीकाकाराने लढविली. हरणाच्या शिकारीची यत्किंचित तरी माहिती ज्याला आहे, त्याला टीकाकाराच्या या विचित्र कल्पनेचे हसू आल्याशिवाय राहणार नाही. आमच्या पुराणग्रंथांवरील टीकाकार मोठे सर्वज्ञ असत. वाटेल त्या अपरिचित किंवा परकी भाषेतील शब्दाचा संस्कृत अर्थ आपल्या कल्पनेच्या जोरावर त्यांनी ठासून दिला नाही असे उदाहरण मिळणे कठीण. बेर हे पद कुबेर या देवांच्या धनाध्यक्षाचे नाव आहे त्यात आढळते. आमच्या टीकाकारांनी या शब्दावर

आपल्या कुशाग्र बुद्धीचा प्रयोग करून कु (कुत्सितं) बेरं (शरीरं) यस्य स कुबेरः असा विग्रह केला व तो देव किंवा यक्षराज अगदी कुरूप आहे असे ठरविले. त्याला तीन पाय, एक डोळा व आठ दात आहेत, असे सांगण्यात येते. एकंदरीत श्रृंगिबेरपुर कोठे होते याचा पत्ता लागत नाही व हे नावही हिंदी असण्याचा संभव नाही.

चित्रकूटाचे विचित्र कोडे

आता चित्रकूटाविषयी विचार करू (अयोध्याकांड सर्ग ५४, श्लोक २८)

दशक्रोश इतस्तात गिरिर्यस्मिन्निवत्स्यसि ।
महर्षिसेवितः पुण्यः पर्वतः शुभदर्शनः ॥

अर्थ : बा रामा, येथून (प्रयागापासून) दहा कोसांवर एक पर्वत आहे. त्या ठिकाणी तू वास्तव्य कर. त्या पुण्य पर्वताचा महर्षींनी आश्रय केलेला आहे व त्याचे दर्शनही शुभकारक आहे.

गोलांगूलानुचरितो वानरर्क्षनिषेवितः ।
चित्रकूट इतिख्यातो गंधमादनसन्निभः ॥ २९ ॥

गोलांगूलसंज्ञक वानर तेथे संचार करीत असतात व इतर वानर व अस्वले तेथे वास्तव्य करीत असतात. गंधमादन पर्वताप्रमाणे असलेला पर्वत चित्रकूट म्हणून प्रसिद्ध आहे.

ओकांच्या कोषात गंधमादन पर्वताविषयी थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे– गंधमादन : १. हिमालयाच्या उत्तरेकडील एक पर्वत भद्राक्ष वर्षाजवळ. याच्यावर सुगंधवृक्षयुक्त वने आहेत. २. हिमालयाचे एक शिखर. कोणताही अर्थ घेतला तरी गंधमादन हा एक उंच व विस्तृत पर्वत आहे व चित्रकूट त्यासारखाच असल्याने तोही उंच व विस्तृत असावा, अशी कल्पना होते. तिसाव्या श्लोकात चित्रकूट पर्वताच्या शिखरांच्या दर्शनाचे महत्त्व सांगितले आहे. तेथे 'श्रृंगाणि' असा बहुवचनी प्रयोग केला आहे. बहुत शिखरे असलेला पर्वत मोठा असणारच.

पण वस्तुस्थिती काय आहे? अलाहाबाद व प्रयाग यांच्या आसपास शंभर कोसांतही उंच अशी टेकडीदेखील नाही, मग बहुत शिखरे असलेला पर्वत कोठून मिळणार? गंगा, यमुना या नद्या पूर्वीसारख्याच राहून हा चित्रकूट पर्वत मात्र नाहीसा झाला असे म्हणणेही विश्वसनीय नाही.

एकंदरीत रामायणात दिलेले अयोध्येचे वर्णन पाहता व श्रृंगबेरपुर हे नाव व रामाच्या प्रवासाचा दिलेला मार्ग लक्षात घेता, आज दाखविण्यात येणारी अयोध्यानगरी, श्रृंगबेरपुर व चित्रकूट ही स्थळे रामायणकालीन नव्हेत असे स्पष्ट होते. हे सर्व वर्णन काल्पनिकच आहे. यात विश्वसनीय भाग फार थोडा आहे असे कबूल करावे लागते.

मल्लादि वेंकटरत्नम् यांच्या मते ही तीनही ठिकाणे मिसर म्हणजे आजचा इजिप्त या देशातील आहेत असे आहे.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

७ रामायणाची ऐतिहासिक योग्यता

आता **नंदिग्राम** याचा विचार करू.

'रामाकडे चित्रकूट पर्वतावर भरत आला. रामाने आपल्या पादुका देऊन त्याला परत पाठविले.

स (भरतः) काममनवांप्यैव रामपादावुपास्पृशन् ।
नन्दिग्रामे करोद्राज्यं रामागमनकांक्षया ॥

(बालकांड सर्ग १, श्लो ३८,३९)

आपले मनोरथ पूर्ण न होताच तो भरत रामचरणी प्रणाम करून परत फिरला आणि रामाच्या आगमनाची वाट पाहत त्याने नंदिग्रामामध्ये राहून राज्य केले. हे नंदिग्राम कोठे होते याचा तपास करिता अयोध्यांकाड सर्ग ११३, श्लोक २४ यात थोडा उल्लेख आहे. पहा :

'चतुर्दशहि वर्षाणि जटाचीरधयो ह्यहं ॥
फलमूलाशनो वीर भवेयं रघुनंदन ।
तवागमनमाकांक्षन् वसन्वै नगराद् बहिः' ॥ २४ ॥

'हे वीर रघुनंदना, जटावल्कले धारण करून आणि फलमूलें भक्षण करून तुझ्या आगमनाची वाट पाहत मी नगराच्या बाहेर चौदा वर्षेपर्यंत राहीन.' यावरून अयोध्यानगरीच्या बाहेरच नंदिग्राम होते असे दिसते. सर्ग ११५ मध्ये भरत अयोध्येस परत आल्यावर नंदिग्रामास गेल्याचा उल्लेख आहे. (पहा, श्लो. २ **नंदिग्रामं गमिष्यामि;** श्लोक १२ **नंदिग्रामं ययौ तूर्णम्**) हे गाव अयोध्येपासून एक कोसाच्या अंतरावर होते असे दिसते. (युद्धकांड सर्ग १२५, श्लोक २९ **क्रोशमात्रे न्वयोध्यायाः**) राम भरतभेटीस आला तेव्हा त्याच्या स्वागताची मोठी तयारी झाली. त्या वेळी '**कृत्स्नं तु नगरं तत्तु नंदिग्राममुपागमत्**' म्हणजे 'ते सर्वही नगर (अयोध्या) नंदिग्रामाकडे लोटले!' यावरून नंदिग्राम अयोध्येच्या जवळच असले पाहिजे.

आज रोजी अयोध्या शहराजवळ या नंदिग्रामाचा पत्ता लागत नाही. या नावाची किंवा असल्याच नावाची गावे दक्षिण हिंदुस्थानात आहेत. नंदी हे दैवत ज्या गावात प्रमुख तो गाव नंदिग्राम होय. या अर्थाने नंदीची मूर्ती असलेली गावे पुष्कळच आहेत. शिवभक्ती जोरात आल्यावर नंदीला श्रेष्ठ मानणारा एक पंथ निघाला. त्याच्या मते नंदीची प्रतिमा मुख्य असली पाहिजे. पण असे नंदीचे देऊळ अयोध्येजवळ असल्याचा किंवा शंकराच्या भक्तीचा उल्लेख रामायणात आलेला नाही. याचे कारण कट्टर वैष्णव कवीने किंवा कवींनी यातील मूळ कथेचा वाल्मीकीच्या नावाखाली विस्तार केलेला दिसत आहे. पण खऱ्या अयोध्येजवळ नंदीचे देऊळ होते ही गोष्ट लक्षात ठेवण्याजोगी आहे.

भरत परत गल्यावर

'रामस्तु पुनरालक्ष्य नागरस्य जनस्य च ।
तत्रागमनमेकाग्रो दण्डकान्प्रविवेश ह ॥'

अनुक्रमणिका

'नगरवासी जनांचे आगमन पुनरपी होण्याचा संभव आहे असे समजून राम दंडकारण्यात मोठ्या सावधपणाने शिरला.' (बालकांड सर्ग १, श्लोक ४०)

यमुनेपासून. गोदावरीपर्यंतच्या मुलखाला दंडकारण्य म्हणत असे सांगितले आहे. कोठे कोठे नर्मदा व गोदावरी यांच्यामधील प्रदेशासच दंडकारण्य म्हटलेले आढळते. पुढे पंपा सरोवरापर्यंतच्या मुलखाचा समावेश या अरण्यात केलेला आढळतो.

पण इतक्या विस्तृत प्रदेशास दंडकारण्य हे नाव संभवत नाही. पुराणात या अरण्याची उत्पत्ती पुढीलप्रमाणे दिली आहे. दंडक हा इक्ष्वाकुपुत्र लहानपणापासून उन्मत्त व मूढ होता. हा विंध्याद्री व शैवल (विंध्याद्रीच्या दक्षिणेस त्याच्या लगत असलेला पर्वत. आजचा सातपुडा?) या पर्वतांमधील प्रदेशाचा राजा. याने एकदा भृगुकुलोत्पन्न गुरुकन्येवर बलात्कार केल्यामुळे गुरूच्या शापाने याचा नाश झाला व तो देश अरण्यप्राय झाला, कारण त्यावर सात दिवस चिखलाचा पाऊस पडला. म्हणून त्यास दंडकारण्य हे नाव मिळाले. (ओकांचा कोष).

याप्रमाणे दंडकारण्याविषयी निश्चितपणा नाही. राम दंडकारण्यात गेला इतकी कथा. दक्षिणेत राम आला हे सिद्ध करण्यासाठी कोणीही दंडकारण्याची हद्द वाटेल तितकी ताणावी. राक्षसांचे ठाणे दंडकारण्यात होते व त्यांचा उपद्रव थोडाबहुत चित्रकूटापर्यंत पोहोचत असे. म्हणून यमुनेच्या तीरापर्यंत दंडकारण्य होते असे रामायणावरून कळते.

रामाच्या वनवासाची दहा वर्षे घालविण्याकरिता हा रामाचा दंडकारण्यातील प्रवास दिसतो. या दहा वर्षांत विराधाला रामलक्ष्मणांनी मारले. याशिवाय दुसऱ्या कोणाचा वध केल्याची हकीगत दिलेली नाही. पुढील दोन वर्षांत मात्र कथानक फार जोरात आले आहे त्यात हाणामार खेचून भरली आहे. दहा वर्षे लोटल्यावर राम अगस्त्याश्रमास गेले असे सांगितले आहे. याचा अर्थ विंध्य पर्वताच्या दक्षिणेस गेले असा आहे. अगस्तीचा आश्रम पंचवटीपासून दोन योजनांवर होता. (पहा, अरण्यकांड सर्ग १३, श्लोक १३).

दंडकारण्याचा उल्लेख रामायणात येतो; पण तो देश केवढा होता याविषयी एकमत नाही. निरनिराळ्या हद्दी दिल्या जातात; हे आश्चर्यकारक आहे. दंडकाची राजधानी मधुमंत नगर. यावर चिखलाचा वर्षाव सात दिवस झाला व शंभर मैल लांब–रुंद इतका प्रदेश चिखलमय झाला असे दिसते. म्हणजे दंडकारण्य हे नाव दलदलीच्या प्रदेशाचे असावे. तसा प्रदेश आर्यावर्तात आढळत नाही.

जनस्थान : शूर्पणखा जनस्थानात राहणारी होती असे नारदाने सांगितलेल्या रामायणात आहे. पुढे वाल्मीकीच्या रामायणात (अरण्यकांड सर्ग १८, श्लोक २५ त) खर जनस्थानात राहत होता, असा उल्लेख आहे. ओकांच्या कोषात 'जनस्थान – नाशिकजवळचा भाग. येथे शूर्पणखा व खर राक्षस राहत होते. वनवासात रामाचे येथे काही दिवस वास्तव्य होते,' असा खुलासा आहे. जनस्थान म्हणजे जन राहण्याची जागा. कोणत्याही शहरास किंवा गावास हा शब्द लावता येईल. यावरून हे गाव कोठे होते, केवढे होते, वगैरेंचा पत्ता नाही. सर्वच बाब मोघम. जनस्थानापासून तीनच कोसांवर रामलक्ष्मणांना कौंचारण्यनामक वन लागले आहे यावरून जनस्थान फारसे मोठे नसावे असा तर्क होतो.

अनुक्रमणिका

पंचवटीहून सीतेला रावणाने जबरीने नेली. वाटेत जटायूने त्याला विरोध केला. जटायूकडून हकीगत समजल्यावर राम प्रथम पश्चिमेकडे व नंतर दक्षिणेकडे असे शोध करीत चालले.

पंचवटी : जनस्थानाजवळ पाच वडांचे ठिकाण, गोदावरीच्या उत्तर किनाऱ्यावर. गोदावरीच्या उगमापासून समुद्राला मिळेपर्यंतच्या प्रदेशात हे स्थळ असू शकेल नाशिकजवळ पंचवटी ही रामाची जागा असे सांगण्यात येते. तसेच राजमहेंद्रीजवळ पर्णशाला नावाचे गाव आहे. तेथे पंचवटी असून रामाची पर्णशाला होती असेही सांगून जागा दाखविण्यात येते.

सीतेचा शोध करण्यास निघाले, तेव्हा रामलक्ष्मण पश्चिमेस गेले व पुढे दक्षिणेस चालले. पश्चिमेस गेले असे सांगितल्यावरून तिकडे बरेच अंतर चालले पाहिजे; म्हणून रामाची राहण्याची जागा नाशिक पंचवटी नसावी असे वाटते. कारंण ती असती तर लक्ष्मणास सह्याद्रीचे घाट लगेच लागते व पुढे समुद्र लागता. राजमहेंद्रीजवळील पर्णकुटी म्हणावी, तर तिच्या पश्चिमेस बऱ्याच अंतरावर पंपा आहे. पण मग दक्षिणेकडे जावे लागत नाही. याप्रमाणे रामाची खरी पंचवटी ठरविण्यांस अडचण येत आहे. इतर स्थळांप्रमाणेच पंचवटी ही घोटाळ्याची आहे.

पंपा : नामक सरोवर किंवा पुष्करिणी, ऋष्यमूकपर्वताजवळची. दंडकारण्यातील एका नदीलाही पंपा असे नाव आहे. अरण्यकांडाच्या ७५ व्या सर्गात, १४ व्या श्लोकात पंपा नदी आहे, असेही सांगितले आहे.

स तामासाद्य वै रामो दूरात्पानीयवाहिनीम्
मतंगसरसं नाम ऱ्हदं समवगाहत ॥ १४ ॥

समीपच वाहात असलेल्या त्या पंपा नामक नदीला गेल्यावर त्या मतंगसरस नामक सरोवरामध्ये त्याने स्नान केले. (ऱ्हद म्हणजे डोह असे पाहिजे.) होसपेटजवळ हे स्थळ दाखवितात. यावरून पंपाही अनिश्चितच.

किष्किंधा : ही वालीची राजधानी येथून जवळच दाखविली जाते. तुंगभद्रेच्या काठी हंपीजवळ किष्किंधा या नावाचे खेडे दाखवितात. रामायणातील स्थलाविषयी किंवा त्या त्या स्थलास जाण्याच्या मार्गाविषयी वाल्मीकी काहीच माहिती देत नाही. वाटेल त्या जागी जाऊन येथे अमुक झाले म्हणून खुशाल दाखवावे. रामायणात केलेले किष्किंधेचे वर्णनही मामुलीच आहे

आजची पंपा व किष्किंधा दक्षिणेत बल्लारी जिल्ह्यात दाखविली जातात. पण मूळची विंध्य पर्वताच्या उत्तरेस असावी व लंका विंध्याच्या दक्षिणेस असावी. कारण किष्किंधाकांडाच्या ४१ व्या सर्गात अंगदाच्या प्रमुखत्वाखाली हनुमान वगैरे वानर सीतेचा शोध करण्यास पाठविले आहेत; त्यांना सीतेचा शोध कोठे कोठे करावा ते सुग्रीवाने सांगितले आहे (सर्ग ४१, श्लोक ६).

तेषां अग्रेसरं चैव बृहद्बलमथांगदम् ।
विधाय हरिवीराणां आदिशद्दक्षिणां दिशम् ॥ ६ ॥
येकेचन समुद्धेशाः तस्यांदिशि सुदुर्गमाः ॥
कपीशः कपिमुख्यानां स तेषां समुदाहरत् ॥ ७ ॥

अनुक्रमणिका

सहस्रशिरसं विंध्यं नानाद्रुमलतायुतम् ।
नर्मदां च नदीं रम्यां महोरगनिषेविताम् ॥ ८ ॥
ततो गोदावरी रम्यां कृष्णवेणी महानदीम् ॥
मेखलानुत्कलांश्चैव दशार्णनगराण्यपि ॥
आब्रवन्तीमवन्तीच सर्वमेवानुपश्यत ॥ ९ ॥

महाबलाढ्य अंगदाला त्या वानरवीरांचा अग्रणी करून त्यांना दक्षिण दिशेस जाण्यास सांगितले. (६) आणि त्या दिशेला जे काही अत्यंत दुर्गम प्रदेश आहेत, ते सर्व त्या वानराधिपतीने त्या वानरश्रेष्ठांना सांगून दिले. (७) (तो म्हणाला) 'हजारो शिखरांनी आणि नानाप्रकारच्या वृक्षांनी व लतांनी युक्त असलेला विंध्याद्री, महोरगांनी आश्रय केलेली नर्मदा नदी, रम्य गोदावरी महानदी, कृष्णवेणी, मेखल व उत्कल देश, दशार्ण देशातील शहरे आब्रवंती आणि अवंती ही सर्व तुम्ही पहा.'

पुढेही पुष्कळ स्थळे सांगितली आहेत, पण विस्तारभयास्तव त्यांना तूर्त बाजूला ठेवू या त्याप्रमाणे विंध्य पर्वत सर्व हुडकल्याचे ४८ वे सर्गात सांगितले आहे. यावरून किष्किंधा, तसेच पंपा, अगस्त्याश्रम, पंचवटी, जनस्थान, दंडकारण्य वगैरे स्थळे विंध्य पर्वताच्या उत्तरेसच होती असे म्हणावे लागते. तसे असल्यास पंचवटी ही ज्या नदीच्या तीरावर होती तिचे नाव गोदावरी असल्यास ती उत्तरेची नदी असावी असे अनुमान काढावे लागेल. रामायणात किती आणि कोणी कोणी घुसवाघुसव केली आहे याचे अनुमान थोडा विचार करणाऱ्यास सहज होईल.

आता नारदीय रामायणात उल्लेखिलेल्या लंकानगरीचा विचार करू.

अंगद-हनुमानादी वानरांना संपाती विंध्यावर भेटला व कलिंग देशातल्या महेंद्र पर्वतावरून त्याने लंकेत उडी घेतली. (किं. सर्ग ६०, श्लो. ४०).

महेंद्र पर्वत हा कलिंग देशात आहे. कलिंग म्हणजे जनन्नाथ ते कृष्णेपर्यंतचा पूर्वेकडचा प्रदेश हा विंध्याच्या पूर्वेस आहे. (पहा, ओकांचा कोष).

महेंद्र पर्वतापासून १०० योजनांच्या अंतरावर असलेल्या त्रिकूटाचलाच्या लंबसंज्ञक शिखरावर हनुमान उतरला. (सुंदरकांड सर्ग १, श्लो. २०२). तेथून पर्वतशिखरावर असलेली लंका पाहिली. (सर्ग २, श्लो. ८) ती लका अनेक प्रकारच्या कमलांनी भरलेल्या खंदकांनी भूषित झालेली होती. (श्लो. १४). ती लंका उडतच आहे की काय असे त्या हनुमान वानराने अवलोकन केले. (श्लोक २०)

हनुमान परत येऊन सीतेची बातमी रामाला देता झाला. सर्व वानर सैन्य घेऊन राम दक्षिण दिशेस निघाला मोठ्या बंदोबस्ताने तो चालला. (पहा, युद्धकांड सर्ग ४, श्लोक ४३).

जगाम रामो धर्मात्मा ससैन्यो दक्षिणां दिशम् ॥

अखेर राम महेंद्र पर्वतावर गेला.

अनुक्रमणिका

महेंद्रमथ संप्राप्य रामो राजीवलोचनः ।
आरुरोह महाबाहुः शिखरं द्रुमभूषितम् ॥

(यु. कां. स. ४, श्लो. ९४).

वाल्मीकीला हिंदुस्थानच्या भूगोलाची माहिती बेतापुरतीच. पर्वत, नद्या वगैरेंची महशूर असलेली नावे कोठेही दडपून देण्याची त्याला सवय आहे. विंध्य पर्वताच्या उत्तरेस किष्किंधा असली पाहिजे. तेथून विंध्य पर्वतावरून महेंद्र पर्वतावर जावयाचे. रस्ता पूर्व बाजूस लाब नाही असा. परंतु याच सर्गाच्या ७३ व्या श्लोकात

काननानि विचित्राणि नदी प्रस्त्रवणानिच ।
पश्यन्नपि ययौ रामः सह्यस्य मलयस्य च ॥

'रामही सह्याद्रीवरील व मलय पर्वतावरील विचित्र वने आणि नदीप्रवाह अवलोकन करीत चालला' असे दडपून दिले आहे. किष्किंधा, हंपी होसपेटजवळ होती व रामेश्वराजवळ राम गेला असे वादाकरिता मानले तरी सह्य व मलय पर्वतावर रामाने जाणे शक्य नाही. ९६ वे श्लोकात असलेच कथन पुन्हा केले आहे.

ते सह्यं समतिक्रम्य मलयं व महागिरिम् ।
आसेदुरानुपूर्व्येण समुद्रं भीमनिस्वनम् ॥ ९६ ॥

ते वानर सह्य पर्वत आणि मलयसंज्ञक महापर्वत उल्लंघून गेल्यानंतर भयंकर गर्जना करीत असलेल्या समुद्रासमीप सैन्याच्या पद्धतीने बसले.

असल्या भलत्याच चुका दिसल्या म्हणजे सर्वच गोष्ट कल्पित आहे काय असा संशय येतो. महेंद्र पर्वताजवळील समुद्रात शंभर योजनांवर लंका होती. म्हणून आजचे सिंहलद्वीप ही रावणाची लंकाच नसली पाहिजे असेही दिसते.

सिलोन हीच रावणाची लंका हे सिद्ध करण्याकरिता तिनेवेल्ली जिल्ह्यातील एका साधारणशा डोंगराला महेंद्र पर्वत असे नाव दिले आहे. ती जागा रामेश्वर म्हणून आता प्रसिद्ध आहे. पण पुराणप्रसिद्ध महेंद्र पर्वत हा कृष्णा व महानदी यांचेमध्ये आहे.

नारदाने रामचरित्र वाल्मीकीस थोडक्यात सांगितले व वाल्मीकीने त्याचा आपल्या कल्पनेने विस्तार केला. नारदाच्या रामायणात स्थलांची जी जी नावे आली ती ती आर्यावर्तात कोठे दाखविली जातात हे स्थलवार वर दाखविले आहे. राम त्या त्या स्थलास गेल्याची जी हकीगत रामायणात दिली आहे त्यावरून ही स्थले हिंदुस्थानातील असावीत असे मुळीच दिसत नाही. अयोध्येहून निघून श्रंगबेरपुरास राम रथाने गेला व तेथून चित्रकूटास प्रयागावरून पायाने गेला त्याला परत आणण्याच्या उद्देशाने भरतही त्याच मार्गाने गेला. पण तो हत्ती, रथ वाहनाने गेला. अयोध्येहून चित्रकूट फार दूर नसता लांबच्या वाटेने राम जातो व भरतही त्याच दूरच्या वाटेने येताना येतो व जाताना जातो हे आश्चर्य आहे. आजच्या स्थितीला रामायणात वर्णिलेल्या चित्रकूटाचा मुळीच पत्ता नाही. गंगायमुनांचे खोरे शेकडो मैलपर्यंत अगदी सपाट आहे.

अनुक्रमणिका

जनस्थान, पंचवटी, पंपा, किष्किंधा, लंका वगैरे स्थलांसंबंधी तीच स्थिती. या जागा हिंदुस्थानातील होत्या असे म्हणणे बिलकूल पटत नाही.

विंध्य पर्वताच्या उत्तरेस किष्किंधा होती. मारुती वगैरे वानर दक्षिण दिशेस सीतेचा शोध करताना प्रथम विंध्यावर आले व तेथून महेंद्रावर जाऊन हनुमान लंकेत उडी मारून गेला. या हकिगतीवरून पूर्वीचे रामायण केवळ आर्यावर्तापुरतेच होते. म्हणजे त्यात घडलेली हकीगत हिमालय व विंध्याद्री या पर्वतांमधील प्रदेशातच घडली, असा पहिला समज होता. पुढे राम हा दक्षिण हिंदुस्थानाचाही वीर आहे असे दाखविण्याची जरूरी वाटली. त्यावेळी काही सर्ग नवे बनवून किष्किंधा, महेंद्र वगैरे स्थळे दक्षिणेतील, असा भास उत्पन्न केला.

यासंबंधाने आणखी एक महत्त्वाची उणीव भासत आहे. कोणत्याही गोष्टीच्या महत्त्वाच्या खुणा मिळत असतात. कोणाची लेणी असतात. त्या लेण्यात त्यांचे पुतळे असतात. दगडावर कोरलेले लेख असतात. कोणाच्या नावची नाणी मिळतात. कोणाचे विजयस्तंभ असतात. अशोकासारखे राजे आपली शासने कोरून ठेवतात. पण रामासंबंधाने मात्र दुसरा पुरावा मिळत नाही. विष्णुच्या दहा अवतारापैकी राम हा सातवा अवतार मानला जातो. पण अवतारांची यादी प्राचीन नाही; अलीकडील आहे. विष्णुसहस्रनाम या नावाचे विष्णूचे स्त्रोत्र आहे. ते महाभारतात समाविष्ट केलेले आहे. ते केव्हा तयार झाले हे कळणे कठीण आहे. पण या स्तोत्रांत कृष्णावतारासंबंधाने कमीत कमी दहा उल्लेख आहेत. देवकीनंदन असे स्पष्ट नाव आहे. पण दाशरथी रामालाच लागेल असे एकही नाव नाही. यावरून रामाची अवतारांत गणना विष्णुसहस्रनामानंतरची आहे हे निर्विवाद आहे.

रामायणासंबंधाने दुसरी एक महत्त्वाची गोष्ट आहे. 'शंकराची भक्ती फार पुरातन आहे. काशी हे शैवांचे क्षेत्र प्राचीन कालापासून प्रसिद्ध आहे. परंतु सबंध रामायणात शिवालयाचा उल्लेख नाही. राम कोठे चुकूनही शिवाच्या देवळात किंवा शिवालयाच्या गावी जात नाही. ज्या वाल्मीकीने हे रामायण वाढविले तो कट्टर वैष्णव असावा. त्याने शैवासंबंधी उल्लेख मुद्दाम गाळले असले पाहिजेत.

वाल्मीकीचा प्रश्न व त्याच्या उत्तराच्या निमित्ताने रामाचे वर्णन नारदाने करणे हा प्रकार लक्षात घेतला असता राम हा परदेशचा पराक्रमी राजा असावा अशी कल्पना होते. रामायणात रामाच्या प्रवासातील सांगितलेली स्थळे आर्यावर्तातीलच असे ठाम ठरविण्यास पुरावा नाही. आजचा उपलब्ध पुरावा घोटाळ्याचा व अनिश्चित; व म्हणूनच तो अविश्वसनीय आहे. मल्लादि वेंकटरत्नम् यांच्यां मते राम हा इजिप्तचा पराक्रमी राजा दुसरा रामेसिस हा होय. याच्या दोन लढायांची हकीगत नारदाने वाल्मीकीस सांगितली व त्याने हे काव्य लिहिले असावे. यासंबंधाच्या पुराव्याची छाननी करणे जरुर आहे.

रामाची राजधानी अयोध्या ही होती.

इजिप्तच्या रामेसिसची राजधानी मेंफिस शहर होते. मेंफिस हे मिसरी नाव. याचा अर्थ लक्षात घेऊन ग्रीक भाषेंत अजादो (Agadon) या नावाने मेंफिस ओळखण्यात आले. आजच्या कैरो शहराच्या दक्षिणेस १० मैलांवर नील नदीच्या पश्चिम काठावर ते बसले होते. डिओडोरस लिहितो, की त्या शहरची लांबी उत्तर–दक्षिण १५० स्टाडिया होती (१ स्टाडिया = २०२, यार्ड) यावरून ती लांबी १७ मैल आजच्या मापाने होते. रामायणातील अयोध्येची लांबी फार, अतिशयोक्तीची आहे. तेथे ती ९६ मैल दिली आहे!

अनुक्रमणिका

मेंफिस या शब्दाला मूळचा शब्द मिन्—नोफिस असा होता. याचा अर्थ चांगला आसरा असा असावा..अयोध्या या नावाचाही जवळ जवळ तोच अर्थ होता. ग्रीक अजादो व अयोध्या ही नावे अगदी नजीकची आहेत.

मेंफिसचे वर्णन यवन इतिहासकार हिरोडोरस व स्टाबो यांनी केलेले आहे. अबद्—एल—लतीफ या अरबी बखरकारानेही तेरावे शतकाच्या प्रारंभी याचे वर्णन दिले आहे. या शहराच्या पूर्व बाजूस नील नदी असून बाकीच्या बाजूने एक तलाव मेना याने खोदलेला होता. अयोध्या ही मनूने बांधली असे रामायण म्हणते. अयोध्या ही उंटानी व गाढवांनी भरली होती. हे वर्णन आर्यावर्तातील शहराचे बाबतीत कसेसेच वाटते. पण मेंफिसमध्ये उंट, गाढवे यांचा सुकाळ होता यात आश्चर्य नाही.

मुलूख वाळूचा असल्याने उंटाचा उपयोग सर्व कामास फार होतो. म्हणून त्यांनी शहर भरलेले असणेच योग्य. तीच गोष्ट गाढवांची. इजिप्त, अरेबिया, पालेस्टाईन, वगैरे देशांत थोरामोठ्यांची स्वारी गाढवावरूनच होते. अरेबियन नाइट्स् मधल्या गोष्टींत बहुधा गाढव वाहनाचा उल्लेख आढळतो. येशू ख्रिस्तही यरुशलेम शहरात समारंभाने जाताना गाढवावरच बसला होता हे प्रसिद्ध आहे. अशा प्रतिष्ठित वाहनांचा म्हणजे गर्दभांचा भरणा इजिप्तच्या अयोध्येत मोठा होता हे सांगणे हे तेथील संपत्तीचे वर्णन आहे. पण तीच अयोध्या आर्यावर्तातील घोगरा नदीवरील मानली म्हणजे उंट आणि गाढव यांचा उल्लेख शोभत नाही.

अयोध्येचे केलेले वर्णन मेंफिसला जुळते आर्यावर्तातील शहराला जुळत नाही. यावरून अयोध्या मिसर देशातील असावी असे वाटू लागते.

महाराष्ट्र—शारदा : ऑक्टोबर, १९३५

अनुक्रमणिका

८ ब्रह्मचारी हनुमान

चुकीच्या समजुती

आमच्या हिंदूच्या समजुतीप्रमाणे, राम हा विष्णूचा सातवा अवतार ठरून त्याच्या मूर्तीची स्थापना देवळात झाली, तेव्हा राम–लक्ष्मण–सीता यांच्याबरोबर त्यांच्यासमोर हनुमानही हात जोडून उभा केला गेला. लांबच लांब शेपटी व सर्वांगाला शेंदूर फासलेली मूर्ती पाहून साधारण लोकांच्या मनात तो माकड आहे ही कल्पना येते. रामाचा एकनिष्ठ सेवक, स्त्रीजातीशी संबंध न ठेवणारा व अति बलवान् अशी त्याच्याविषयी सामान्यपणे समजूत आहे. मारुती असे त्याचे आणखी नाव आहे. मारुती म्हणजे हनुमान याची स्वतंत्र देवळेही आहेत. दक्षिणेत ती बहुतेक सर्वत्र आहेत. उत्तरेत क्वचित आहेत. रामदास स्वामींशी या देवळाचा लावलेला संबंध काल्पनिक आहे. त्यात सत्य दिसत नाही.

हनुमान हा दक्षिणेकडील देव. रामाचा सेवक तो होता अशी एक समजूत पसरून दिल्यास रामाची योग्यता फारच वाढेल अशा बुद्धीने रामायणात या हनुमानाचा उपयोग करून घेताना त्याच्या अफाट शक्तीच्या अनेक गोष्टी वर्णिल्या आहेत.

हनुमानाविषयी बहुजनसमाजाच्या समजुती मुख्यत्वे चार आहेत :

१. हनुमान हा रामाचा एकनिष्ठ सेवक झाला.
२. तो माकड असल्याने त्याला फारशी अक्कल नव्हती, म्हणजे इतर माकडांसारखा तो निर्बुद्ध होता.
३. तो चिरंजीव आहे.
४. तो ब्रह्मचारी होता, म्हणजे कट्टा स्त्रीपराङ्मुख होता. श्रवण, कीर्तन, केली वगैरे अष्टमैथुन त्याने टाकले होते, व म्हणूनच तो फार बलवान होता.

वाल्मीकी रामायणात दिलेल्या हकीगतीवरून या समजुतीत सत्यपणा किती आहे हे पाहणे जरूर आहे.

रामायणे बरीच आहेत. पण त्यात वाल्मीकी रामायण जास्त प्रमाण मानले जाते. बाकीच्या रामायणांत अतिशयोक्ती फार आहे. वाल्मीकी रामायणाही अतिशयोक्तीपासून मुक्त नाही. पण या अतिशयोक्ती मागाहून घुसडल्या असाव्यात.

हनुमान हा रामाचा एकनिष्ठ सेवक झाला अशी समजूत सार्वत्रिक आहे व याचा पुरावा रामाच्या देवळात हनुमानाची लहानमोठी मूर्ती असावयाचीच हा देण्यात येतो.

अनुक्रमणिका

अवताराची अश्लील कल्पना

राम हा विष्णूचा सातवा अवतार ठरल्यावर या अवतारकल्पनेला जोर येण्यासाठी रामास मदत करणाऱ्या सर्व वानरसेनेची उत्पत्ती देवता वगैरेपासून झाली असे बालकांडाच्या १७ व्या सर्गात सांगितले आहे :

पुत्रत्वं तु गते विष्णौ राज्ञस्तस्य महात्मनः ।
उवाच देवताः सर्वाः स्वयंमूर्भगवानिदम् ॥ १ ॥
सत्यसंधस्य वीरस्य सर्वेषां नो हितैषिणः ।
विष्णोः सहायान् बलिनः सृजध्वं कामरूपिणः ॥ २ ॥
अप्सरःसु च मुख्यासु गन्धर्वीणां तनूषु च ।
यक्षपन्नगकन्यास्तु ऋक्षिविद्याधरीषु च ॥
किन्नरीणां व गात्रेषु वानरीणा तनूषु च ।
सृजध्वं हरिरूपेण पुत्रांस्तुल्यपराक्रमान् ॥

याप्रमाणे विष्णूनी त्या महात्म्या दशरथाचे पुत्रत्व स्वीकारिले असता भगवान् ब्रह्मदेव सर्व देवतांना असे म्हणाले (१) 'सत्यप्रतिज्ञ आणि वीर असा जो आपणा सर्वांचे हित इच्छिणारा विष्णु त्याला यथेष्टरूप धारण करणारे व बलाढ्य असे साहाय्यकर्ते तुम्ही उत्पन्न करा.' (२) त्याप्रमाणे त्यांनी 'मुख्य अप्सरा, गंधर्वपत्न्या, यक्ष व नाग यांच्या कन्या, ऋक्ष आणि विद्याधर यांच्या स्त्रिया, किन्नरांच्या स्त्रिया आणि वानरस्त्रिया यांचे ठिकाणी हरिरूपाने तुम्ही एकसारखे पराक्रमी पुत्र उत्पन्न करा,' (६)

ब्रह्मदेवाची अशी आज्ञा झाल्यावर

ते तथोक्ता भगवता तत्प्रतिश्रुत्यशासनम् ।
जनयामासुरेवं ते पुत्रान्वानररूपिणाः ॥ ८ ॥
ऋषयश्च महात्मानः सिद्धविद्याधरोरगाः ।
चारणाश्च सुतान्वीरान् ससृजुर्वनचारिणः ॥ ९ ॥

अर्थ : याप्रमाणे भगवान् ब्रह्मदेवानी सांगितल्यावर त्या देवांनी त्यांची आज्ञा पाळण्याविषयी वचन दिले आणि त्याप्रमाणे त्यांनी वानररूपी पुत्र उत्पन्न केले. (८). महात्मे, ऋषि, सिद्ध, विद्याधर, उरग आणि चारण यांनी वनामध्ये संचार करणारे असे वीर (वानर) पुत्र उत्पन्न केले.

पुराणातील पावित्र्यविडंबन

या सर्गातील हकीगत खरी मानावयाची असेल तर देवांच्या नीतिमत्तेच्या अभावाची जाणीव होते. या देवांनी वानरपुत्र उत्पन्न करण्याचा हुकूम ब्रह्मदेव देतात. पुत्र उत्पन्न करण्यास स्त्रीजात पाहिजे. तिचीही तरतूद ब्रह्मदेवांनी केली आहे. वरच्या ५ व्या व ६ व्या श्लोकात त्या सांगितल्या आहेत. त्यांतील अप्सरा या वेश्याच आहेत तेव्हा त्यांच्या ठायी पुत्रोत्पत्ती करण्याने विवाहाच्या पावित्र्याची हानी नाही. परंतु गंधर्वपत्न्या यांनी देवापासून वानर उत्पन्न करावे असा हुकूम देऊन ब्रह्मदेवाने त्यांच्या गंधर्वपतीस या कामी नालायक

अनुक्रमणिका

ठरविले. तसेच यक्ष व नाग यांच्या कन्या, ऋक्ष व विद्याधर यांच्या स्त्रिया, किन्नरांच्या स्त्रिया, वानर स्त्रिया या सर्व वानरोत्पत्तीच्या कामासाठी देवांच्या हवाली करून ब्रह्मदेवाने दांपत्यनीतीचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले आहे. विषयी देवांची विषयसुखसेवनाची भरपूर सोय केलेली पाहून त्यांचा कित्ता महात्मे, कृषि, सिद्ध, विद्याधर, उरग व चारण यांनी गिरवून वानरप्रजावृद्धीच्या कामी फार मोठे काम केले आहे. दिसण्यात इंद्रासारखा आणि वानरांचा अधिपती असा वाली नावाचा पुत्र इंद्राने उत्पन्न केला आणि तेजस्व्यांमध्ये श्रेष्ठ असलेल्या सूर्याने सुग्रीव नामक पुत्र उत्पन्न केला (श्लो. १०) याप्रमाणे बृहस्पतीपासून तार, कुबेरापासून गंधमादन, विश्वकर्म्यापासून नल, अग्नीपासून नील, अश्विनीकुमारापासून मंद व द्विविद, वरुणापासून सुषेण, पर्जन्यापासून शरभ असे जन्मास आले. याप्रमाणे ही सर्व लहानथोर वानरसेना त्यांच्या त्यांच्या आईच्या नवऱ्याच्या बीजाची नव्हती, तर त्यांचे जनकत्व निरनिराळ्या देवांकडे होते. हनुमानही अशाच उच्च बीजाचा होता.

मारुतस्यौरसः श्रीमान् हनुमान्नाम वानरः ।
वज्रसंहननोपेतो वैनतेयसमो जवे ॥ १६ ॥
सर्व वानर मुख्येषु बुद्धिमान् बलवानपि ॥ १७ ॥

सर्व मुख्य मुख्य वानरांमध्ये बुद्धिमान आणि बलाढ्य, वेगामध्ये गरुडाची बरोबरी करणारा, कांतिमान आणि वज्रदेही असा हनुमान म्हणून प्रसिद्ध असलेला वानर वायूचा पुत्र होय. (१६ । १७).

या सर्वांविषयी २० वे श्लोकात सांगितले आहे.

यस्य देवस्य यद्रूपं वेषो यश्च पराक्रमः ।
अजायत समं तेन तस्य तस्य पृथक् पृथक् ॥

अर्थ : ज्या देवाचे जे रूप, जो वेष व जो पराक्रम त्यासहवर्तमान त्या त्या देवापासून पृथक् पृथक् पुत्र उत्पन्न झाला. (२०) हे पुत्र उत्पन्न करण्यासाठी या देवांना वानरांचे रूप घ्यावे लागले, का त्यानी आपल्या दैवी रूपातच वानरीशी संग केला हे सांगितले नाही. एकंदरीत रामाचे हे सर्व साह्यकते व मित्र आपापल्या आईच्या नवऱ्याच्या पोटचे नव्हते, व ते कोणाच्या बीजाचे हे त्यावेळी उघड व प्रसिद्ध होते. कौसल्या, कैकयी व सुमित्रा यांच्याशी कोणी देवाने अत्याचार केल्याचे सांगितले नाही हे त्यांचे सुदैव!

ही अवतार—कल्पना बोकाळली म्हणजे विचारशक्ती नाहीशी होते याचे हा सर्ग हे चांगले उदाहरण आहे.

वाली, सुग्रीव, हनुमान यांच्या उत्पत्तीची कथा उत्तरकांडांत ३५ । ३६ सर्गात आहे. तेथे त्यांच्या आयांची व त्यांच्या विवाहित पतींची नावे दिली आहेत :

सूर्यदत्तवरः स्वर्णः सुमेरुर्नाम पर्वतः ।
यत्र राज्यं प्रशास्त्यस्य केसरी नाम वै पिता ॥ १९॥
तस्य भार्या बभूवेष्टा ह्यंजनेति परिश्रुता ।
जनयामास तस्यां वै वायुरात्मजमुत्तमम ॥ २० ॥

अनुक्रमणिका

कल्पनेचे घोटाळे

तात्पर्य : सुमेरू पर्वतावर केसरी नावाचा वानर राज्य करीत होता. अंजना त्याची राणी. तिच्या पोटी वायूपासून पुत्र हनुमान जन्मास आला. पुढील सर्गाच्या ३६। ३७। ३८ या श्लोकांत वाली व सुग्रीव यांच्या बापाचे नाव ऋक्षरजस हे दिले आहे. तो सर्व वानरांचा राजा होता. तो मरण पावल्यावर त्याचे राज्य वालीस मिळाले, असे सांगितले आहे. रामायणकथेतील वाली, सुग्रीव, हनुमान यांचा जन्म राजकुलात झाला असून ते मोठे पराक्रमी होते. त्यांचे बाप त्यांच्याच जातीचे होते. पण रामाला अवतारात घेतले तेव्हा त्याच्या या मित्रासही अवतारी बनवावे लागले. हे करण्यास त्यांचे जनकत्व त्याच्या मातेच्या विवाहित पतीकडून काढून निरनिराळ्या देवांकडे देणे जरूर दिसले. ही अवतारकल्पना घोटाळ्याची, अनैसर्गिक व अविश्वास्य आहे तिच्या भ्रमाचा भोपळा फोडणारावर 'पावित्र्यविडंबना' चा दोष लादण्यात येईल, हे निश्चित आहे. पण आपण ज्यांना अवतारी पुरुष म्हणतो त्यांची उत्पत्ती त्यांच्या आईच्या लग्नाच्या नवऱ्यापासून झालेली नसून परपुरुषांपासून झाली आहे, असे प्रतिपादिताना आपणही 'पावित्र्यविडंबन' करितो याचे भान त्यांस रहात नाही.

हनुमानाच्या आईचे नाव अंजना व तिच्या पतीचे नाव केसरी होते व तो मेरुपर्वतावर राज्य करीत होता. हे राज्य सोडून सुग्रीवाचा अमात्य होण्यास व त्याच्याबरोबर वालीच्या भीतीने भटकण्यास हनुमान केव्हा व काय कारणाने आला हे दिल्याचे आढळत नाही. ऋक्षरजसाच्या ताब्यातील लहानशा प्रदेशाचा संस्थानिक केसरी असावा व त्याचा मुलगा हा वाली, सुग्रीव या राजपुत्रांबरोबर शिक्षणासाठी म्हणून आलेला सुग्रीवाचा मित्र व विश्वासू सेवक असावा असे अनुमान होते.

अशक्य गोष्टींचे भारूड

हनुमान हा वायूचा पुत्र असे सांगितल्यावर या कल्पनेच्या पुराव्यासाठी बऱ्याचशा अद्‌भुत गोष्टी बनवाव्या लागल्या. त्यांतील पहिली म्हणजे सूर्यबिंब धरण्यास जाण्याची. उत्तरकांड सर्ग ३५ श्लोक २१ ते सर्ग ३६ श्लोक २५ पर्यंत ही अद्‌भुत कथा आहे. तिचा सारांश देणे बरे. अंजनेने याला जन्म दिला. फळे आणण्याच्या हेतूने ती अरण्यात गेली (श्लोक. २१). मातेच्या वियोगाने व भुकेने पिडल्यामुळे हे बाळ रडू लागले. यावेळी सूर्योदय होत होता. त्याचे तांबुस रंगाचे बिंब पाहून ते एक फळ आहे, म्हणून तो त्याच्या लोभाने वर उडाला. (श्लो. २२ । २३।).

फललोभाने सूर्यबिंबावर झडप घालण्याचे कृत्य हनुमान जन्मास आल्यावर झाले, का पुढे काही दिवसांनी झाले हे येथे सांगितलेले नाही. उपजल्याबरोबर असे कृत्य घडणे अशक्य असे कै. भाऊशास्त्री लेले या कट्टर सनातनीसही पटले व त्यांनी २१ व्या श्लोकाच्या भाषांतरात 'एके प्रसंगी,' असे शब्द "ही श्रेष्ठ अंजना फळे आणण्याकरिता वनामध्ये गेली होती" याच्यापूर्वी, मुळात तदा हा शब्द आहे त्याचे जागी घातले. पण सर्वसाधारण भाविकांचा समज उपजल्याबरोबरच तो सूर्याबिंबावर धावला असा आहे. चैत्र शुद्ध पौर्णिमेस सूर्योदयापूर्वीच हरदास कीर्तनास उभा राहतो व भाविक स्त्री-पुरुष आपल्या मुलांसह त्यावेळी श्रवणास हजर असतात. सूर्याचे बिंब दिसण्याच्या वेळी मोठया रसाळवाणीने ही कथा सांगण्यात येते, व जन्मल्याबरोबर मारुती उडाला असेच प्रतिपादिले जाते. तेव्हा मारुतीच्या दैवी अचाट सामर्थ्याची बालमनाला ओळख पटून त्यांस फार गंमत वाटते. पण या मुलांच्या करमणुकीच्या गोष्टीचा परिणाण त्यांच्या आईबापांवर भलताच होतो. त्याची विचारशक्ती कुंठित होते. रामायणातारख्या ग्रंथात सांगितलेल्या

अनुक्रमणिका

कथेवर अविश्वास दाखविणे पाप आहे, असे मारुतीजन्माच्या व असल्याच दुसऱ्या प्रसंगाने आमच्या लोकांच्या मनावर ठसविले जात असल्याने आमच्यातील चिकित्सक बुद्धी दडपून गेली आहे. कोणी कसलीही थाप मारावी, आमचे भोळे लोक 'ईश्वरी लीला अगाध आहे,' असे म्हणून विश्वास ठेवण्यास तयारच! आमच्या देशात बोकाळलेल्या बुवाजींचे मूळ या भोळेपणातच आहे. हे मूळ उपटून काढल्याशिवाय आमच्यावर झालेले खुळे संस्कार जाणार नाहीत.

विचारांवर भलते दडपण

केसरी हा लहानसा का होईना राजा होता. त्याचे घरी थोडे तरी दासदासी असणारच. या स्थितीत तान्ह्या मुलास टाकून फळे आणण्यासाठी वनात जाण्याची पाळी अंजनेवर यावी हेच अविश्वसनीय. प्रसूत झाल्याबरोबर ती गेली असे म्हणावे तर या प्रसंगी या राणीच्या सेवेसही कोणीच नव्हते यावर तरी विश्वास कोण विचारी ठेवील? मूल उपजल्यावर एक दिवसपर्यंत त्याला दुधाचीही जरुर नसते. भूक कोठून लागणार? पण हा विचार आमचे हरदास करीत नाहीत व त्यांच्या प्रतिपादनाने श्रोत्यांची विचारशक्ती दडपून टाकली जाते.

वारा वाहण्याचा जास्तीत जास्त वेग तासास १००। १२५ मैल यापेक्षा जास्त नाही. बालकांड सर्ग १७, श्लोक २० मध्ये सांगितल्याप्रमाणे बापाच्या पराक्रमाप्रमाणे पुत्राचा पराक्रम असे. म्हणून या वेगापेक्षा जास्त वेगाने मारुती उडणे शक्य नाही. पृथ्वीपासून सूर्याचे अंतर नऊ कोटी मैलांपेक्षा जास्त आहे. तेथे पोचण्यास मारुतीस किती वर्षे लागतील याचा अंदाज कोणीही करील. त्यातून मारुती बाळ क्षुधेने अतिशय पीडीत झालेले, म्हणून एकसारख्या वेगाने खाण्यापिण्याशिवाय आकाशात उडणे अशक्य.

पृथ्वीपासून वर जसजसे जावे तसतशी उष्णता कमी होऊन थंडी वाढते असा अनुभव आहे. पण आमच्या रामायणाचे कथन याचें उलट! बरे, विसंगती इतक्यानेच पुरी होत नाही.

यमेव दिवसं ह्येष ग्रहीतुं भास्करं प्लुतः ।
तमेव दिवसं राहुर्जिघृक्षति दिवाकरम् ॥

(उ. कां. ३५।३१)

ज्या दिवशी सूर्याला धरण्याकरिता याने उड्डाण केले त्याच दिवशी राहूनेही सूर्याला ग्रस्त करण्याचे मनामध्ये आणिले होते. पुढल्याच श्लोकात राहूला चंदार्कमर्दन असे म्हटले आहे. यावरून चंद्र, सूर्य या दोघांसही एकटा राहूच ग्रासतो असे या वाल्मीकीचे मत दिसते. त्याच्या हिशेबी राहू व केतू एकच. हनुमानजन्म पौर्णिमेला झाला व त्या दिवशी सूर्यग्रहण असे हरिदास सांगतात हेही आमच्या भोळ्या श्रोत्यांस पटते. रामायणातील हा घोटाळा आमच्या भाविकांस पटतो. पटला नाही तरी त्याविरुद्ध ब्र काढण्याची छाती त्यांना होत नाही.

ग्रहणांचा घोटाळा

हनुमान सूर्याचा ग्रास करण्यास गेला तेव्हा सूर्यतापापासून वायु (त्याचा खरा बाप) याने तुषारांच्या समुदायाने शीतल होऊन त्याचे रक्षण केले. हनुमान सूर्याच्या रथासमीप गेला तेथे सूर्याला गिळण्याला राहू

अनुक्रमणिका

आला होता. त्याला मारुतीचा धक्का लागून तो कोलमडून पलीकडे सरला. नंतर इंद्रलोकी जाऊन देवगणासहवर्तमान बसलेल्या देवराज इंद्राला तो क्रोधयुक्त राहू भिवया चढवून म्हणाला, (उ. कां. ३५। ३३) 'हे बलवृत्रघातका इंद्रा, सूर्यचंद्र हे क्षुधा दूर करण्याचे साधन तू मला दिले असून तेच तू दुसऱ्याला दिलेस काय? (तेच ३४) मी आज अमावास्येचे दिवशी सूर्याला ग्रस्त करण्याच्या उद्देशाने आलो असता दुसराच राहू येऊन त्याने सूर्याला ग्रस्त केले.' (तेच ३५) (येथे पर्व शब्द आहे, त्याचा अर्थ अमावास्या असा लेले शास्त्र्यानी केला आहे. पण अष्टमी, चतुर्दशी. पूर्णिमा व अमावास्या यांतील कोणत्याही दिवसास पर्व म्हणतात) इंद्राला राग येऊन तो उत्तम हत्तीवर बसून सूर्याकडे निघाला. राहू त्याच्यापुढें धावला. हेही एक फळ आहे असे समजून मारुती राहूवर धावला. तेव्हा राहू घाबरून आश्रयासाठी इंद्राकडे पळाला इंद्राचा ऐरावत हाही एक फळ आहे असे समजून त्याच्याकडे मारुती धावला, आणि इंद्राने त्याच्यावर वज्र फेकले. इंद्राच्या वज्राने ताडित झालेला हा मारुती पर्वतावर पडला व पडता पडता त्याची डावी हनु मोडली. वायु इंद्रावर क्रुद्ध झाला व त्याने सत्याग्रह करून सर्व भूतांचा श्वासोच्छ्वास बंद केला. पुढे देव, गंधर्व, भुजंग व गुह्यक ह्या प्रजासहवर्तमान (या सर्वांचा श्वासोच्छ्वास बंद झाला असताही) ब्रह्मदेव आपला पुत्र घेऊन वायु बसला होता तेथे गेला (श्लो. ६५). ब्रह्मदेवाने मारुतीला उठविले व वायूने आपला सत्याग्रह सोडला.

ही सर्वच कथा अशक्य कोटीतील, न घडण्यासारखी असल्याने इचे खंडन करण्याचीही जरूर नाही. पण ही कथा हनुमज्जयंतीला दरसाल सांगण्यात येते व आमच्या भोळ्या लोकांचा भोळेपणा दरसाल ताजा केला जातो. या कथांचा खोटेपणा उघड उघड सांगणारे उपदेशक आम्हास पाहिजेत.

टाकाऊ कल्प—कथा

हनुमानाच्या उत्पत्तीच्या व त्याच्या बालपणच्या पराक्रमाच्या कथा सर्वस्वी टाकाऊ आहेत. तो फार वेगवान, चपळ, वाऱ्यासारसा धावणारा म्हणून त्यास मारुती असे कोणी म्हणणे स्वाभाविक आहे. तेवढ्यावरून मरुताने अंजनीच्या पोटी गर्भ ठेविला असे म्हणणे म्हणजे तिचा गौरव होत नाही व हनुमानाचाही होत नाही; ही गोष्ट हा अवतारसर्ग घुसडणाऱ्याच्या लक्षात आली नाही. सुग्रीव एक देवाच्या बीजाचा असो, पण त्याचा शत्रू त्याचा भाऊ वाली असाच इंद्रापासून उत्पन्न झालेला व म्हणून बलवान दाखविण्यातील औचित्य समजणे कठीण आहे, अद्‌भुत जन्मासंबंधी चर्चा इतकी पुरे.

हनुमान, वाली, सुग्रीव, नल, नील वगैरे वानर होते असे कितीही अट्टाहासाने रामायणात सांगितले असले तरी ते सर्व मनुष्ययोनीतील होते यात काही संशय नाही. कथेला अद्‌भुतता आणण्यासाठीं या सर्वांस शेपट्या लाविल्या आहेत बालकांड अध्याय (१७) श्लोक १६ । १७ यात हनुमानासंबंधी महत्त्वाचा उल्लेख आहे. तो सर्व मुख्य मुख्य वानरांमध्ये बुद्धिवान आणि बलवान होता, वेगामध्ये गरुडाची बरोबरी करणारा, कांतिमान आणि वज्रदेही होता. सर्व वानरांत मारुती बुद्धिमान होता असे सांगण्याने बृहस्पतीपासून जन्मलेल्या तारापेक्षाही तो बुद्धिमान होता हे स्पष्टच आहे. बृहस्पतीपेक्षा वायु हा कमी बुद्धिचा यात संशय नाही. यावरून देवांपासून यांची सांगितलेली उत्पत्ती केवळ काल्पनिक होय. ती खरीच असती तर प्रत्येकाच्या ठायी बापाचे गुण आले असल्याने बृहस्पतीची बुद्धिमत्ता ताराला आली असती व तो वायुसुतापेक्षा जास्त बुद्धिमान असावयास पाहिजे होता. तसे नसल्याने अवतारकल्पना खोटी आहे असे सिद्ध होते.

अनुक्रमणिका

हनुमानाचे गुण

त्यापुढे किष्किंधा कांडाच्या दुसऱ्या सर्गात हनुमानाची गाठ पडते. सुग्रीवाला हुडकीत राम–लक्ष्मण पंपा सरोवरावर आले. आपणास मारण्यासाठी वालीने यांना पाठविले अशी भीती त्यांना पाहून सुग्रीवास पडली. त्यावेळी भयभीत

उवाच हनुमान्वाक्यं सुग्रीवं वाक्यकोविदः ॥ १३ ॥

झालेल्या सुग्रीवाला संभाषाज्ञ हनुमान म्हणाला. कोणत्या वेळी काय बोलावे व कसे बोलावे हे त्यास बरोबर कळत असे. सुग्रीवाची भीती अस्थानी आहे असे त्याने थोडक्यात पटवून दिले. राम–लक्ष्मणांची चौकशी करण्यास व त्यांचा येण्याचा उद्देश समजून घेण्यास सुग्रीवाने त्यालाच पाठविले.

(किष्किंधा कांड सर्ग २, श्लो. २४ । २९)

राम लक्ष्मणाकडे येऊन गोड भाषण करून आपण कोण, कोणाकडून आलो, हे त्याने कळविले. लक्ष्मणाने रामाची सर्व हकीगत हनुमानास सांगितली व लक्ष्मण म्हणाला,

अहं चैवच रामश्च सुग्रीवं शरणं गतौ । कि. कां. ४ । १७

मी व राम सुग्रीवाला शरण आलो आहोत. नंतर त्याने त्या उभयतांना सुग्रीवाकडे नेऊन त्यांचे काम सुनाविले. हनुमानाने राम हा तुला शरण आला आहे असे स्पष्टच त्या दोघांसमक्ष सांगितले. पुढे उभयतांचे सख्य झाले व मारुतीने अग्नी पेटवून ते अग्निसाक्षिक केले.

हनुमान हा सुग्रीवाचा मुख्य मंती होता व तो सुग्रीवाच्या हितास जपत होता. त्याच्या सल्ल्याप्रमाणे वागून सुग्रीवाने रामाच्या हातून आपला भाऊ वाली याचा वध करविला व रामाने त्यास राज्यावर बसविले व वालीपुत्र अंगदास युवराजपद दिले. नंतर रामाने त्या नगरीबाहेरच्या गुहेत पावसाळा काढला. सुग्रीव ऐषआरामात मग्न झाला असता त्यास हनुमान जागा करीत असे. तरी तो रामकार्याची हेळसांड करू लागल्याने लक्ष्मणाने त्याचे राजवाड्यात जाऊन त्याला चांगली तंबी दिली. तेव्हा सुग्रीवानेच सर्व दिशांस वानर पाठवून सीतेचा शोध करविला. अंगदाच्या पुढारीपणाखाली हनुमानास दक्षिण दिशेस पाठविले. हनुमानाने लंकेस जाऊन सीतेला भेटून अशोक वनाचा उच्छे करून रावणाची भेट घेतली. तेव्हा रावणाच्या आज्ञेने प्रहस्ताने मारुतीस तू कोठला, कोण व रावणाच्या निवासस्थानामध्ये तुझा प्रवेश होण्याचे कारण काय, असे विचारले. (सुंदरकांड ५१ । १२) त्याने आपल्या उत्तरात–

केनचिद्राजकार्येण आगतोऽस्मि तवान्तिकम् ॥ १८ ॥
दूतोऽहमिति विज्ञेयो राघवस्वामितौजसः ।
श्रूयतां चापि वचनं मम पथ्यमिदं प्रभो ॥ १९ ॥

मी रामकार्याकरिता आलो आहे. रामाचा दूत वगैरेवरून हनुमान रामाचा सेवक झाला असे म्हणता येत नाही. कारण हे श्लोक ५० वे सर्गात शेवटचे आहेत व पुढल्या सर्गात तेच भाषण पुढे चालविले आहे; त्यांत पहिलेच वाक्य

अनुक्रमणिका

अहं सुग्रीवसंदेशादिह प्राप्तस्तवांतिके ॥ २ ॥

हे आहे. सुग्रीवाच्या आज्ञेने मी तुझ्याकडे आलो आहे असे तो स्पष्ट सांगतो. नंतर लंका जाळून तो सुग्रीव व राम यांचेकडे परत गेला. येथपर्यंत तरी तो सुग्रीवाचाच नोकर होता व त्याच्या आज्ञेने रामाचे कार्य करीत होता हे स्पष्ट आहे.

मारुती रामसेवक नव्हे

हनुमान हा सुग्रीवाचा नोकर, आपला नव्हे असे युद्धकाण्डाच्या पहिल्या सर्गात रामानेच कबूल केले आहे. सीताशुद्धीचे महाकठीण काम करून परत आल्यावर राम त्याची स्तुती करितो. तीत तो म्हणतो,

भृत्यकार्यं हनुमता सुग्रीवस्य कृतं महत्, ।
एवें विधाय स्वबलं सदृशं विक्रतस्य च ॥

हनुमानाने आपल्या पराक्रमाला अनुरूप असे मोठ्या शक्तीचे, भृत्य या नात्यानें कर्तव्य असलेले, सुग्रीवाचे मोठे कार्य केलेले आहे.

तन्नियोगे नियुक्तेन कृतकृत्यं हनूमता ।
न चात्मा लघुतां नीतः सुग्रीवश्चापि तोषितः ॥ ११ ॥

कार्य सांगितलेल्या हनुमानाने ते कार्य पार पाडले, स्वतःला हलकेपणा आणू दिला नाही आणि सुग्रीवालाही संतुष्ट केले. (११)

वालीवधाच्या पूर्वी केलेल्या कराराप्रमाणे सीतेला परत मिळविण्याच्या कामी सुग्रीवाने रामास सैन्यासह साह्य करावयाचे होते. त्याप्रमाणे सुग्रीव ससैन्य रामाबरोबर गेला. त्याने नलाकडून दहा योजने रुंद व शंभर योजने लांब असा सेतू बांधविला. मोठ्या वानरसेनेसह राम लंकेस पोचला. रावणाच्या सैन्याबरोबर मोठे युद्ध झाले. हनुमानाने फार पराक्रम केला.

रामासाठी त्याची मेहनत

रावणवधानंतर सीतेला आणण्यास रामाने हनुमानालाच पाठविले. कारण तो तिला पूर्वी भेटलेला होता व त्यावर तिचा विश्वास होता. ते काम त्याने केले. पुढे पुष्पक विमानात बसून राम, लक्ष्मण, सीता हे सर्व सेनेसह किष्किंधेस आले. तेथे सुग्रीवाच्या राण्या व मुख्य मुख्य वानर सरदारांच्या बायका विमानात घेऊन राम अयोध्येस निघाला. हनुमान हा सुग्रीवाचा आपत्कालचा अमात्य, युद्धात फार पराक्रम केलेला, म्हणून त्यास बरोबर घेणे योग्यच होते. भारद्वाजाश्रमास रामाचा मुक्काम पडल्यावर पुढे भरताकडे बातमी पाठविण्यास हनुमानाची योजना रामाने केली हेही साहजिक होते.

अनुक्रमणिका

रामाला अभिषेक झाल्यावर रावणाबरोबरच्या युद्धात कार्यकर्त्या पराक्रमी वीरांस बक्षिसे वाटण्यात आली. त्यात हनुमानाची कामगिरी विशेष महत्त्वाची असल्याने रामाने महीषी सीतेकडून त्याचा सत्कार करविला. इतर सर्वांना योग्यतेप्रमाणे बक्षिसे दिली.

येथपर्यंत तरी हनुमान हा सुग्रीवाचा सेवक होता. सुग्रीवाची नोकरी सोडून रामाची सेवा करण्यास तो राहिला असता तर तसा स्पष्ट उल्लेख पाहिजे. तसा तर नाहीच, पण त्याचे उलट हनुमान परत गेल्याचा स्पष्ट पुरावा आहे.

बिभीषणोऽथ सुग्रीवो हनुमाञ्जांबवांस्तथा ।
सर्वे वानरमुख्याश्च रामेणाक्लिष्ट कर्मणा ॥ ८५ ॥
यथार्हं पूजिताः सर्वे कामै रत्नैश्च पुष्कलैः ।
प्रह्रष्टमनसः सर्वे जग्मुरेव यथागतम् ॥

बक्षिसांची वाटणी

बिभीषण, सुग्रीव, हनुमान, जांबवान व इतरही सर्व वानरश्रेष्ठ या सर्वांचे उदार पराक्रम करणाऱ्या रामाने असंख्य रत्ने व इष्ट वस्तू देऊन योग्यतेनुरूप पूजन केले व नंतर ते सर्वही मनामध्ये संतुष्ट होऊन आल्या मार्गाने परत गेले. (युद्धकांड २८।८५,८६). युद्धकांडाचा व रामायणाचा हा शेवटचाच सर्ग. उत्तरकाण्ड प्रक्षिप्त आहे. पण त्यातही तोच सूर निघतो. (पहा सर्ग ३९, श्लोक १६ । १७ । १८। १९)

हनूमन्तं च नृपतिरिक्ष्वाकूणां महारथः ।
अंगदंच महाबाहूमङकमारोप्य वीर्यवान् ॥ १६ ॥
रामः कमलपत्राक्षः सुग्रीवमिदमब्रवीत्
“अंगदस्ते सुपुत्रोऽयं मंत्री चाप्यनिलात्मजः ॥ १७ ॥
सुग्रीवमंत्रितं युक्तौ ममापि न हिते रतौ
अर्हतो विविधां पूजां त्वत्कृते वै हरीश्वर” ॥ १८ ॥

अंगद व हनुमान यांना रागाने आपल्या मांडीवर बसविले व म्हटले, ‘हें सुग्रीवा, अंगद हा तुझा सत्पुत्र असून वायुपुत्र तुझा मंत्री आहे. हे मसलतीमध्ये निपुण असून माझ्या हिताविषयी तत्पर आहेत. तुझ्याकरिता मी यांची नानाप्रकारांनी पूजा करण्यास योग्य आहे.’ (१६। १७। १८) असे म्हणून आपल्या अंगावरील दागिने काढून ते त्यांच्या अंगावर बांधले. वानरराक्षसांनी चैनीत दोन महिने काढले. पुढे–

राघवस्तु महातेजाः सुग्रीवमिदमब्रवीत् ॥ १ ॥
“गम्यतां सौम्य किष्किधां दुराधर्षा सुरासुरैः ।
पालयस्व सहाप्रात्यो राज्यं निहतकटकम् ॥ २ ॥
अंगद च महाबाहो प्रीत्या परमया युतः ।
पश्य त्वं हनुमंतं च नलं च सुमहाबलम्” ॥ ३ ॥

अनुक्रमणिका

राम सुग्रीवाला म्हणाला, "हे विनयसंपन्न, देव आणि दैत्य यांना अजिंक्य असलेल्या किष्किंधा नगरीला जा आणि अमात्यासहवर्तमान तू निष्कंटक झालेल्या राज्यांचे परिपालन कर. (२) हे महापराक्रमी सुग्रीवा, मोठ्या आनंदाने तू अंगद, हनुमान आणि अत्यंत महाबलाढ्य नल यांना अवलोकन कर.

रामाने हनुमानाला सुग्रीवाबरोबर परत पाठवून त्यावर कृपादृष्टी ठेवण्यास त्याच्या धन्यास म्हणजे सुग्रीवास बजाविले आहे.

यावरून हनुमान हा सुग्रीवाचा सेवक होता. तो सेवा सोडून रामाचा सेवक कधीही झाला नाही. तो सुग्रीवाबरोबर परत गेला. पुन्हा येऊन रामाची सेवा केल्याचा दाखला वाल्मीकी रामायणात नाही. पण राम स्वर्गास जाण्याच्या वेळी इतरांबरोबर तो भेटण्यास आला होता. पण तो रामाबरोबर देहपात न करिता परत गेला आहे. हनुमान हा रामाचा सेवक व भक्त ही कल्पना पुढे कोणीतरी पसरविली आहे. तिला सत्याचा आधार दिसत नाही.

तो वानर असल्याने तो हुमदांडगा, फारशी अक्कल नसलेला, सांगकाम्या होता असा त्याचेविषयी तिसरा समज आहे.

तो वानर म्हणजे पशू नव्हता; मनुष्यच होता. कविकल्पनेने लावलेली शेपटी आता कापूनच टाकली पाहिजे.

रामाला साह्य करणाऱ्या वानरांची उत्पत्ती बालकांडाच्या १७ व्या सर्गात दिली आहे. तेथे हनुमानाविषयी '**सर्व वानरमुख्येषु बुद्धिमान्बलवानपि**' (श्लोक १७) असे म्हटले आहे. सर्व वानरात तो बुद्धिमान होता. यानंतर हनुमानाची गाठ किष्किंधा कांडात पडते. रामलक्ष्मण ऋष्यमूक पर्वतावर सुग्रीव–सख्य जोडण्यास गेले असता. तो त्यास भेटतो. त्याप्रसंगी त्याचे स्वगत विचार व त्याने केलेली प्रकट भाषणे पाहिली असता त्याच्या चातुर्याची ओळख पटते. त्या कांडाच्या दुसऱ्या सर्गात रामलक्ष्मणाला पाहून सुग्रीव घाबरला होता, तेव्हा त्याच्या मंत्र्यांपैकी एक हनुमान त्याचेकडे गेला व त्यास त्याने शांत केले. हा प्रसंग १४ ते १८ श्लोकात वर्णिला आहे.

या प्रसंगी वाल्मीकीने हनुमानास **वाक्यकोविदः** (संभाषणज्ञ) असे विशेषण लाविले आहे. घाबरलेल्या माणसास भरंवसा देताना प्रथम भयाचे कारण नाही असे सांगावे लागते; नंतर त्याला थोडे दटावावेही लागते. हे दोन्ही प्रकार हनुमानाने योजिले आहेत सुग्रीवाने त्याला रामलक्ष्मणाकडे पाठविले.

राम–लक्ष्मणांशी त्याची भेट तिसरे सर्गात वर्णिली आहे. त्याने आपले रूप सोडून शठबुद्धीने तापसाचे रूप घेतले. 'आणि नम्रपणे राघवाजवळ जाऊन व त्यांना प्रणिपात करून, मधुर व मनोहर शब्दांनी त्या वीरांशी भाषण करून त्यांची त्याने यथायोग्य रीतीने प्रशंसाही केली.' नंतर मृदु शब्दांनी विचारू लागला. हे चतुर भाषण श्लोक ४ ते २४ पर्यंत आहे. त्यानंतर त्याने आपल्या धन्याची हकीगत थोडक्यात देऊन आपण त्याचा सचिव आहे असे सांगितले. रामाने स्वतः उत्तर दिले नाही. सुग्रीवाबरोबर सख्य करण्यास तो आला होता. पण सुग्रीवाच्या सचिवाबरोबर आपल्या सचिवाने बोलणे बरे असे जाणून रामाने लक्ष्मणास त्याच्याशी बोलण्यास सुचविले.

अनुक्रमणिका

रामाच्या मनावर हनुमानाच्या भाषणाची किती छाप पडली हे पाहिल्यास त्याची योग्यता कळून येते राम म्हणतो,

तमभ्यभाष सौमित्रे सुग्रीवसचिवं कपिम् ।
वाक्यज्ञं मधुरैर्वाक्यैः स्नेहयुक्तमरिंदम ॥ २७ ॥
नानृग्वेदविनीतस्य नायजुर्वेदधारिणः ।
नासामवेदविदुषः शक्यमेवं विभाषितुम् ॥ २८ ॥
नूनं व्याकरण कृत्स्नं अनेन बहुधा श्रुतम् ।
बहुव्याहरतानेन न किंचिदपभाषितुम् ॥ २९ ॥
न मुखे नेत्रयोश्चापि ललाटे च भ्रुवोस्तथा ।
अन्येष्वपि च सर्वेषु दोषः संविदितः क्वचित् ॥ ३० ॥
अविस्तरमसन्दिग्धमविलंबितमव्ययय् ।
उरस्थं कंठगं वाक्यं वर्तते मध्यमस्वरम् ॥ ३१ ॥
संस्कारक्रमसंपन्नामद्रुतामविलंबिताम् ।
उच्चारयति कल्याणीं वाचं हृदयहर्षिणीम् ॥ ३२ ॥
अनया चित्रया वाचा त्रिस्थानव्यंजनस्थया ।
कस्य नाराध्यते चित्तमुद्यतासेररेरपि ॥ ३३ ॥
एवंविधो यस्य दूतो न भवेत्पार्थिवस्य तु ।
सिध्यंति हि कथ तस्य कार्याणां गतयोऽनघ ॥ ३४ ॥
एवं गुणगणैर्युक्ता यस्य स्युः कार्यसाधकाः ।
तस्य सिध्यंति सर्वार्था दूतवाक्यप्रचोदिताः ॥ ३५ ॥

हनुमानाची तारीफ

अर्थ : हे लक्ष्मणा, प्रेमयुक्त, शत्रूंचे दमन करणारा आणि संभाषणज्ञ अशा त्या सुग्रीवमंत्री वानराशी मधुर शब्दांनी तू काही तरी बोल. (२७) ज्याने ऋग्वेदाचा अभ्यास केलेला नाही, ज्याने यजुर्वेद धारण केलेला नाही आणि जो सामवेद जाणत नाहीच नाही, त्याला असे भाषण करता येणे शक्य नाही. (२८) खरोखर संपूर्ण व्याकरण याने अनेक वेळा ऐकलेले आहे. कारण, जरी हा पुष्कळ बोलत होता तरी काहीही अशुद्ध याच्या तोंडातून निघालेले नाही. (२९) मुख, नेत्र, ललाट, भुवया आणि इतरही सर्व अवयव यापैकी कोठेही याचे ठिकाणी दोष दृष्टोत्पत्तीस आला नाही. (३०) याच्या भाषणात उगीच, पाल्हाळ नाही; ते संदिग्ध नाही, अस्खलित आहे, ऐकणाऱ्याला कंटाळा आणण्यासारखे नाही. आणि मनामध्ये उत्कृष्ट रीतीने घेऊन विवरापासून ते श्रोत्याच्या कानावर पडत असल्यामुळे त्याचा उच्चार मध्यम स्वराने होत आहे. (३१) त्या त्या वर्णाचे संस्कार क्रमाने अंतःकरणावर ठसविण्यास समर्थ, त्वरारहित, विलंबशून्य आणि म्हणूनच हृदयाला आनंद देणारी अशी शुभवाणी हा उच्चारीत आहे. (३२) ऊर, कंठ, आणि शिर या तिन्ही ठिकाणी अभिव्यक्त होणाऱ्या याच्या या अद्‌भुत वाणीने खड्‌ग उपसून तयार असलेला शत्रू जरी झाला तरी कोणाचे बरे चित्त अनुकूल होणार नाही? (३३) हे निष्पापा, या प्रकारचा दूत ज्या राज्यापाशी नसेल त्याची कृत्ये सिद्धीस कशी जाणार? (३४) या प्रकारच्या गुणसमुदायांनी युक्त असलेले कार्यसाधक ज्याच्यापाशी असतील त्याचे दूताच्या भाषणाने बोधित केलेले सर्वही मनोरथ सिद्धीस जातील.

अनुक्रमणिका

स्वाभिमानी मारुती

रामाने सुचविल्याप्रमाणे लक्ष्मण हनुमानाशी बोलू लागला. तो म्हणाला, 'सुग्रीवाचे गुण आम्हास माहीत आहेत व आम्ही त्यालाच शोधीत आहोत.' इतक्यावरूनच सुग्रीवाशी याचे काही काम आहे हे जाणून त्याने धूर्तपणे 'सुग्रीवाचा मनोरथ आता परिपूर्ण होईल' असा तर्क बांधून तो आनंदित झाला. (सर्ग ४।१). तो मनामध्ये म्हणाला, 'त्या महात्म्या सुग्रीवाला राज्यप्राप्ती अवश्य होणार, कारण हा महापुरुष काही कार्याच्या उद्देशाने येथे आला आहे.' रामलक्ष्मणामध्ये राम श्रेष्ठ आहे हे त्याने तर्काने जाणले होते व दुय्यमाशी वाटाघाट करण्यापेक्षा मुख्याशीच बोलणे महत्त्वाचे हा पोच ठेवून त्याच्याशी लक्ष्मण बोलला होता, तरी तो रामाकडे वळून त्याच्याशीच बोलू लागला. यात मारुतीचा स्वाभिमान दिसून येतो. याही प्रसंगी रामाच्या आज्ञेने लक्ष्मणाने सर्व हकीगत सांगून सीताशोधासाठी सुग्रीवाच्या साह्याची कशी जरूर आहे व राम या कामाकरिता सुग्रीवास शरण आला आहे असे डोळ्यात अश्रू आणून दीनवाणीने सांगितले. हनुमानास यामुळे जास्तच स्फुरण आले व तो आपल्या मालकाचा मोठेपणा व्यक्त करीत, परंतु रामालाही चढविण्यासाठी त्याची स्तुती करीत म्हणाला, 'अशा प्रकारचे बुद्धिमान, जितेंद्रिय, क्रोध जिंकलेले आणि वानरराजाने भेट घेण्यास योग्य अशांचे दर्शन झाले ही सुदैवाचीच गोष्ट आहे.' (सर्ग ४।२६) नंतर त्याने मोठ्या खुबीने सुग्रीवाला वालीने कसे हाकून दिले हे थोडक्यात सांगून तो म्हणाला, 'तस्मात् तो सूर्यपूत्र सुग्रीव सीतेच्या शोधासंबंधाने आम्हासहवर्तमान तुमचे साह्य करील' (४।२८)

चातुर्याचे उदाहरण

या ठिकाणी हनुमानाचे चातुर्य फार वरच्या दर्जाचे दाखविले आहे. वालीच्या वैरामुळे सुग्रीवाचा वनवास व साह्य देण्याचे वचन याच्यामधला दुवा म्हणजे वालीचा वध हा त्याने मोठ्या खुबीने सुचविला आहे. मोरकऱ्यासारखे हलक्या दर्जाचे काम सुचविताना स्पष्ट शब्दात बोलण्याची सुरवात केली जात नाही, व्यंजनेने ते सुचवावे लागते. हनुमानानेही धूर्तपणाने तेच केले. लक्ष्मण त्याचा हेतू समजला व तसे तो रामाजवळ बोलला. नंतर त्या दोघांस घेऊन हनुमान सुग्रीवाकडे गेला. पण त्याने त्यांना एकदम सुग्रीवाकडे नेले नाही. तसे करण्याने सुग्रीवाचे महत्त्व कमी झाले असते. म्हणून त्याने रामलक्ष्मणाला, ऋष्यमूक पर्वतावर ठेवून आपण एकटाच मलय पर्वतावर सुग्रीवाकडे गेला. याप्रसंगी त्याने रामाचे महत्त्व वर्णून तो आपल्यासारख्याचे सख्य जोडण्यास योग्य आहे असे सांगितले व त्याने रामाचीं व सुग्रीवाची गाठ घालून देऊन त्यांचे सख्य अग्निसाक्षिक करून दिले. अशा रीताने राम–सुग्रीव परस्पर मित्र झाले.

सुग्रीवाची कानउघाडणी

वालीचा वध झाल्यावर त्याची पत्नी तारा फार शोक करू लागली. त्या वेळी वानर सेनापती हनुमान याने तिचे सांत्वन करण्यासाठी भाषण केले. त्यावरूनही त्याचा शहाणपणा व वक्तृत्व ही दिसून येतात (पहा सर्ग २१, श्लोक १ ते १०). त्याचप्रमाणे २६ वे सर्गात सुग्रीवाला राज्याभिषेक करण्याची परवानगी हनुमानानेच मिळवली आहे. अभिषेकानंतर पावसाळ्यात सुग्रीव, रुमा व तारा या दोघींबरोबर आणि इतर तरुण स्त्रियांबरोबर विलास करीत चैनीने राहिला. त्याला रामाच्या कामाची आठवण राहिली नाही. पण जबाबदार प्रधानमंत्री म्हणून हनुमान जागरूक होता. त्याने सुग्रीवास केलेला सुबोध सर्ग २९, श्लोक १० ते २८ पर्यंत आहे. त्यात मित्रकार्य करण्याविषयी परोपरीने सांगितले आहे. या भाषणाला

अनुक्रमणिका

'कालाला उचित' असे पुढील श्लोकात म्हटले आहे. कालाला उचित भाषण शहाण्या व धोरणी माणसालाच करता येईल. ते ऐकून सुग्रीवाने सर्व वानर जमविण्यास हुकूम सोडले.

हितोपदेशी मंत्री

इकडे पावसाळ्याचे दिवस संपले तरी सीताशोधाचे (शुद्धीचे) काम हाती घेण्याचा उद्योग न दिसल्यामुळे रामास संशय व क्रोध येऊन त्याने सुग्रीवाची कानउघाडणी करण्यास लक्ष्मणास पाठविले. लक्ष्मण रागानेच आला व त्याने अंगदाला सुग्रीवाकडे पाठविले. अंगदाने सुग्रीवाकडे जाऊन लक्ष्मण क्रोधाविष्ट झाल्याचे कळविले. लक्ष्मणाच्या कोपाचे कारण काय हे सुग्रीवाच्या ध्यानी येईना. तो म्हणाला, 'मित्र विनाकारण क्रुद्ध झाला आहे. यामुळे मात्र मला भीती उत्पन्न झाली आहे. यासाठी लक्ष्मणाच्या कोपाचे कारण काय हे विचारपूर्वक ठरविण्यास त्याने आपल्या मंत्र्यांस सांगितले. हनुमान हा मुख्य मंत्री होता. स्वतःच्या तर्काने जाणून त्याने केलेले भाषण सर्ग ३२ श्लोक १० ते २२ पर्यंत दिले आहे. त्याने रामाच्या कोपाची योग्य मीमांसा केली असून सुग्रीवाकडून झालेली चूक निर्भीडपणे स्पष्ट केली आहे हा क्रोध घालविण्याचा उपाय 'हात जोडून लक्ष्मणाची कृपा संपादन करणे' हा त्याने ठासून सांगितला आहे व खऱ्या सेवकाचे कर्तव्यही स्पष्टपणें मांडले आहे 'हितोपदेशाविषयी नेमलेल्या मंत्र्यांनी जे काही हित असेल ते राजाला अवश्य सांगितले पाहिजे आणि म्हणूनच मी भय न बाळगिता निश्चित भाषण करीत आहे' असे बजाविले. यावरूनही हनुमानाच्या योग्यतेची अटकळ करिता येते.

बुद्धिमत्तेची खूण

सीताशोधाकरिता सुग्रीवाने वानरांच्या टोळ्या पूर्व, दक्षिण, पश्चिम व उत्तर या दिशांस पाठविल्या. हनुमान दक्षिण दिशेस पाठविलेल्या टोळीत होता व तिचे प्रमुखत्व अंगदाकडे होते. सर्व विंध्य पर्वत हुडकूनही सीतेचा शोध न लागण्याने निराश होऊन शोधासाठी म्हणून ते स्वयंप्रभेच्या विवरात शिरले. तेथे तिच्याशी बोलण्याचे काम हनुमानालाच करावे लागले. (सर्ग ५२) तिच्या कृपेने ते त्या विवराबाहेर आल्यावर मुदतीचा महिंना टळून गेला असे पाहून अंगद निराश झाला व परत गेलो असता सुग्रीव आपणास जीवे मारल्याशिवाय राहणार नाही म्हणून येथेच समुद्रकिनारी प्रायोपवेशन करू या असे तो म्हणाला. त्याला बऱ्याच वानरांनी अनुमोदन दिले. यावर ताराने उपसूचना आणली, की मरण्यापेक्षा स्वयंप्रभेच्या विवरात जाऊन राहावे. ती जागा सुरक्षित आहे. आपल्याविरुद्ध सुग्रीवाचे काही चालणार नाही व तेथे पुष्पे, उदक, भोज्य व पेय पदार्थ यांची चंगळ आहे. सर्वाना हा विचार पसंत पडला. (सर्ग ५३) हनुमानाला हे पसंत पडले नाही. तो स्वामिनिष्ठ होता व अंगदाने येथे स्वतंत्र राज्य करावे हे त्याला इष्ट नव्हते. म्हणून त्या अंगदाला हनुमानाने ताराप्रभृतींपासून वेगळा काढण्याचा उपक्रम केला. (सर्ग ५४, श्लो. ५) प्रथमतः चार उपायांपैकी भेदाची प्रशंसा करण्याकरिता आपल्या भाषणाच्या जोरावर त्या सर्व वानरांना विचारदृष्ट्या अंगदापासून फोडले. (श्लोक. ६) आणि याप्रमाणे त्या सर्वांचे मत अंगदाहून भिन्न केल्यावर चौथा उपाय जो दंड त्याने युक्त अशा नाना प्रकारच्या भीतीजनक वाक्यांनी अंगदाला तो भय उत्पन्न करू लागला. (७) हे भाषण ८ ते २२ श्लोकापर्यंत फार उत्तम आहे व यावरून हनुमानाची बुद्धिमत्ता. सुग्रीवाविषयीची निष्ठा सर्व बाजू लक्षात घेऊन विचार करण्याची पात्रता दिसून येते.

अनुक्रमणिका

समयज्ञता व चातुर्य

संपातीने दिलेल्या माहितीप्रमाणे १०० योजन समुद्र उडून गेल्यावर लंका बेट लागते. हे अंतर तोडून परत येण्याचे सामर्थ्य हनुमानाचे अंगी आहे असे पाहून त्यालाच पाठविण्यात आले; हे लक्षात घेतल्यास शक्तीच्या बाबतीत त्याचा श्रेष्ठपणा सिद्ध होतो. लंकेत गेल्यावर त्याने केलेला शोध व त्याची आत्मगत भाषणे त्याच्या निरीक्षण शक्तीचा पुरावा देतात. सीता प्रथम दृष्टीस पडल्यावर 'विशाल नेत्रांनी युक्त असलेल्या या सीतेकरताच महाबलाढ्य वालीचा व वीर्यामध्ये रावणाची बरोबरी करणाऱ्या कबंधाचा वध झाला (सुं. १६।७) आणि जगद्विख्यात सुग्रीवाला हिच्यामुळेच वालीने रक्षिलेले वानरांचे दुर्लभ ऐश्वर्य प्राप्त झाले.' (११) इत्यादी त्याचे विचार त्याच्या धोरणी स्वभावाची जाणीव करून देतात. सीतेचा शोध लावल्यावर तिला आश्वासन दिल्याशिवाय परत गेल्यास ती कदाचित् प्राणत्याग करील यासाठी तिची भेट कशी घ्यावी या विचारात त्याने उलट सुलट केलेल्या कल्पना पाहता त्याची बुद्धी कुशाग्र होती असे दिसते. संस्कृत वाणीने बोलल्यास मी रावण आहे असे तिला भासेल. पण आपण रामगुणकीर्तन केल्यास सीता लक्ष देऊन एकेल व मग आपली भेट सीता घेईल वगैरे योजना करून त्याने सीतेची भेट घेतली आहे. ही भेट त्याच्या अपेक्षेप्रमाणे सुफल आली. या प्रसंगी हनुमानाची भाषणे कालाला व प्रसंगाला अनुरूप व शहाणपण दाखवणारी आहेत.

सीतेचा निरोप घेऊन हनुमान निघाला, तेव्हा त्याचे आत्मगत विचार त्याची योग्यता दाखवतात :

कार्ये कर्मणि निर्वृत्ते यो बहून्यपि साधयेत् ।
पूर्वकार्याविरोधेन स कार्य कर्तुमहति ॥ सर्ग ४१-५ ॥
नह्येकः साधको हेतुः स्वल्पस्यापीह कर्मणः ।
यो ह्यर्थ बहुधा वेद स समर्थोऽर्थसाधने ॥ ६ ॥

सांगकाम्या नव्हे

'मुख्य कार्य पार पडल्यानंतर पहिल्या कार्याशी विरोध न येता जो अनेक कार्ये पार पाडतो तोच हाती घेतलेले काम शेवटास नेण्यास समर्थ होतो (५). अल्पस्वल्प जरी काम असले तरी एकाच उपायाने पार पडेलच असे नाही; यास्तव अनेक प्रकारांनी उपाय योजण्याचे ज्याला माहीत असते तोच कार्य शेवटास नेण्यास समर्थ होतो. (६). तस्मात् सीतेचा शोध लावणे येवढेच जरी कार्य करण्याचा माझा प्रथम निश्चय होता, तरी शत्रूचा व आपला युद्धप्रसंग प्राप्त झाला असता आपणामध्ये आणि शत्रूमध्ये. विशेष काय आहे हे खरे खरे समजून आल्यानंतर जर मी वानराधिपती सुग्रीवाकडे गेलो तर यजमानाच्या आज्ञेप्रमाणे खरे खरे काम मी केल्याप्रमाणे होईल.' हनुमान हा केवळ सांगकाम्या नव्हता. मालकाने सांगितलेले काम तर करावयाचेच, परंतु मुख्य हेतूला पोषक अशी दुसरी कृत्ये आपल्या जबाबदारीवर पुरी पाडावयाची अशा हिंमतीचा व आत्मविश्वासवान असा तो होता. या कामी चांगलीच बुद्धिमता लागते व ती हनुमानाचे ठिकाणी भरपूर होती.

अनुक्रमणिका

रामाचा दूत

बागेचा विध्वंस केल्याने राक्षसांबरोबर युद्धाचा प्रसंग घडवून आणला. अखेर इंद्रजिताने त्याला पकडून नेऊन रावणापुढे उभे केले. तू कोण असा प्रश्न झाल्यावर त्याने 'वानरराज सुग्रीवाचा मी दूत आहे व तेथूनच मी येथे आलो आहे,' असे उत्तर दिले (सुं. ४८।६२) वनाच्या विध्वंसाचे कारण विचारले असता साधारणपणे पटेल असे उत्तर त्याने मोठ्या चातुर्याने दिले आहे तो म्हणाला, मी वानरच, येथे राक्षस राजाच्या दर्शनाकरिता आलो आहे. ते हे दर्शन मला दुर्लभ आहे असे समजूत दर्शनाकरिता मी राक्षस राजाच्या वनाचा विध्वंस केला. काही रामकार्याकरिता मी तुझ्या समीप आलो आहे. यास्तव अतुल सामर्थ्यवान रामाचा मी दूत आहे असे समजून, हे प्रभो, माझे हे हितकारक भाषण तू श्रवण कर.' (सुं ५१, श्लो. १४ ते १९). पुढील सर्गातील सुग्रीवाचा वकील म्हणून केलेले भाषण मोठ्या मुत्सद्द्यास शोभण्यासारखे आहे. राजे लोक परस्परांस बंधू म्हणून अनादिकालापासून म्हणत आले आहेत. या ठिकाणीही भ्राता सुग्रीव असे हनुमान म्हणत आहे व त्याचा निरोप तुझ्या हिताचा असणार असे तो सुचवित आहे. ५१ व्या सर्गाच्या ४६ व्या श्लोकान या भाषणास वाल्मीकी

स सौष्ठवोपेतमदीनवादिनः कपेर्निशम्याप्रतिमो ऽ प्रियं वचः ॥

'दीनवाणीचे अवलंबन न करिता भाषण करणाऱ्या त्या वानराचे ते सयुक्तिक परंतु अप्रिय भाषण' असे वर्णितो. हनुमान हा श्रेष्ठ दर्जाचा वक्ता होता असे सिद्ध होत आहे. हनुमानाने लंकेत काय काय केले याचा सारांश सर्ग ५६ श्लोक २३।२४ यात दिला आहे.

'राक्षणान्प्रवरान्हत्वा नामविश्राव्य चालनः ॥
समाश्वास्य च वैदेहीं दर्शयित्वा परं बलम् ॥ २३ ॥
नागरीमाकुलां कृत्वा वंचायित्वा व रावणम् ॥
दर्शयित्वा बलं घोरं वैदेहीमभिमाद्यच" ॥ २४ ॥

रामाला सल्ला दिला

'श्रेष्ठ श्रेष्ठ राक्षसांचा वध करून, आपले नाव गाजवून, सीतेला आश्वासन देऊन, अपरिमित सामर्थ्य प्रकट करून, लंकानगरीमध्ये दाणादाण उडवून देवून, रावणाला फसवून, भयकर बल प्रकट करून आणि सीतेला अभिवंदन करून, (२३।२४) तो आत आला.

अंगद प्रमुख वानराकडे परत गेल्यावर 'दृष्टा देवी' इतकेच संक्षेपाने सांगून हनुमानाने आपला विनय दाखविला आहे. पुढे वर्णन केले ते तिच्या दुःखी स्थितीचे ! आत्मश्लाघा बिलकुल केली नाही हे ध्यानात घेण्यासारखे आहे. तोच प्रकार रामाची प्रथम भेट झाली व रामाने सीता देवी कोठे आहे व माझ्याविषयी तिचे आचरण कसे आहे' असे विचारले तेव्हा दिलेल्या उत्तरात आहे (सर्ग ६५) शंभर योजने समुद्र उल्लंघून लंकेस गेलो व तेथे सीता पाहिली, इतकेच त्याने प्रथम सांगून पुढील सर्व भाषण सीतेच्या स्तुतिपर केले आहे वीर, वक्ता, मुत्सद्दी इत्यादी गुण हनुमानाचे ठायी असून विनयसंपन्नतेमुळे त्याच्या या अनेक गुणांस शोभा आली होती. वानरसेनेचा तळ समुद्रांवर पडल्यावर रावणाबरोबर कुरापत काढून भांडण करून बिभीषण रामाकडे आला. आकाशातच उभा राहून आपण आल्याची वर्दी द्या असे तो ओरडला. सुग्रीवाने

अनुक्रमणिका

लक्ष्मणासमक्ष रामाला ते वर्तमान कळविले. सुग्रीवाचे मते बिभीषण आपल्याकडे शत्रुभावाने आला आहे, त्याच्यावर तुटून पडून त्याचा नाश करावा. त्याचे बोलणे ऐकून राम हनुमानादिक इतर वानरांस म्हणाला, 'तुमचा सल्ला या कामी काय आहे?' अंगद, शरभ, जांबवान मैन्द यानी आपले अभिप्राय दिले; पण ते सर्वच संदिग्ध होते. अमुक स्थिती आहे अमुकच करावे असे कोणी सांगत नाही. तदनंतर शास्त्र—ज्ञानाचा ज्याला संस्कार झालेला आहे असा मंत्रिश्रेष्ठ हनुमान अर्थाने परिपूर्ण, मधुर, मित व स्पष्ट असे भाषण करू लागला.' (यु. १७।५०) ५१ व ५२ श्लोकांत त्याने आपला विनय व्यक्त केला आहे. पण इतरांनी दिलेल्या अभिप्रायावर त्याला टीका करावी लागली. तो म्हणाला, गुणदोषविवेचनासंबंधाने जे सचिवांनी आपणाला सांगितले त्यात मला दोष दिसत आहे. कारण अमुक एक गोष्ट करावी असा त्यांच्या सांगण्यापासून काही एक निश्चय ठरविता येत नाही. (श्लो. ५३) भलत्याच ठिकाणी हा बिभीषण प्राप्त झाला आहे असे जांबवाने म्हटले आहे. (५६) त्यावर हनुमान म्हणतो, की ज्याप्रमाणे आपण येथे योग्य ठिकाणी व योग्य समयी प्राप्त झाला आहे त्याप्रमाणे तो योग्य ठिकाणी व योग्य समयीच प्राप्त झाला आहे. रावणापेक्षा आपण उत्तम आहात असा निश्चय करून आणि उभयतांचे ठिकाणी असलेले गुणदोष पाहून हा आला आहे (५७). रावणाचे ठिकाणी दुष्टपणा आणि आपले ठिकाणी असणारा पराक्रम दृष्टीस पडल्यानंतर त्याजे जे येथे आगमन झाले आहे ते त्याच्या बुद्धीला अनुरूपच आहे. (५८) अखेर तो आपला अभिप्राय स्पष्टपणे देतो. 'आपला उद्योग पाहून, रावण दुर्वृत्त आहे असे अवलोकन करून आणि आपल्या हातून वालीचा वध होऊन सुग्रीवाला अभिषेक झाल्याचे श्रवण करून (६६) राज्याच्या हेतूने हा समजून उमजून येथे आलेला आहे; आणि असे आहे म्हणूनच त्याचा संग्रह करणे मला उचित दिसत आहे (६७) हनुमानाचे अनुमान बिनचूक असल्याने रामास व इतरांस ते पसंत पडले.

चांगला बातमीदार

रावणवध झाल्याचे वर्तमान सीतादेवीस कळविण्याचे काम रामाने हनुमानाला सांगितले ते त्याने किती उत्तम रीतीने केले हे युद्धकांडाच्या ११३ व्या सर्गात आहे. भरद्वाज आश्रमी राम पोचल्यावर व तेथे त्याचा मुक्काम झाल्यावर राम आल्याचे आनंदाचे वर्तमान भरतास कळविण्याची कामगिरी हनुमानावर पडली व ती त्याने उत्तम रीतीने पार पाडली.

येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून 'माकडे' असल्याने त्याला फारशी अक्कल नव्हती म्हणजे इतर माकडांप्रमाणे तो निर्बुद्ध होता असा जो लोकांचा समज आहे तोही वाल्मीकी रामायणात वर्णिल्याप्रमाणे चुकीचा आहे. हनुमान हा सुशिक्षित, विद्वान व चतुर मुत्सद्दी होता.

चिरंजीवित्वाचे निराकरण

हनुमान चिरंजीव आहे असा एक समज आहे. चिरंजीव म्हणजे दीर्घकाळ वाचणारा. मुळीच मरण नाही असा मात्र नव्हे. याला आधार उत्तराकाडांत सर्ग ४० व सर्ग ९९ यांत दिला आहे.

रामाला राज्याभिषेक झाल्यावर त्याने दोन महिने सुग्रीवादीस ठेवून घेतले व नंतर त्यांची पाठवणी केली. त्यावेळी हनुमान नम्र होऊन रामाला म्हणाला : (उत्तरकांड सर्ग ४०, श्लोक १६— १९)

अनुक्रमणिका

'स्नेहो मे परमो राजंस्त्वयि तिष्ठतु नित्यदा ।
भक्तिश्च नियता वीर भावो नान्यत्र गच्छतु ॥ १६ ॥
यावद्रामथा वीर चरिष्यति महीतले ।
तावच्छरीरे वत्स्यंति प्राणा मम न संशयः ॥ १७ ॥
यद्यैतच्चरितं दिव्यं कथां ते रघुनंदन ।
तन्ममाप्यमरसो नाम श्रावयेयुर्नरर्षभ ॥ १८ ॥
तच्छ्रुत्वांह ततौ वीर तवचर्यामृतं प्रभो ।
उत्कंठा ता हरिष्यामि मेघलेखामिवानिलः" ॥ १९ ॥

अर्थ : 'हे राजा, तुझे ठिकाणी सर्वदा माझे पराकष्ठेचे प्रेम असो; भक्ती अचल राहो आणि माझ्या मनाचा कल तुझ्याशिवाय दुसरीकडे न जावो. (१६) हे वीरा जोपर्यंत भूतलावर रामकथा सुरू राहील तोपर्यंत माझ्या शरीरामध्ये प्राण राहतील; या विषयी संशय नसावा. (१७) हे रघुनंदना, पुरुषश्रेष्ठा, हे तुझे कथारूप दिव्य चरित्र मला अप्सरा कथन करोत (१८) म्हणजे हे वीर प्रभो, वायु ज्याप्रमाणे मेघपंक्ती हरण करून नेतो त्याप्रमाणे मी तुझे चरितामृत श्रवण करून तुझ्या दर्शनासंबंधाची आपली इच्छा पूर्ण करून घेईन.'

राम सिंहासनावरून उठला आणि त्याला प्रेमाने भेटून म्हणाला,

'एवमेवत्कपिश्रेष्ठ भविता नात्र संशयः ।
चरिष्यति कथा यावदेषा लोके च मामिका ॥ २१ ॥
तावत्तै भविता कीर्तिः शरीरेप्यसवस्तथा।
लोकाहि यांवत्स्थास्यन्ति तावत्स्थास्यति मे कथा' ॥ २२ ॥

अर्थ :— 'हे वानरश्रेष्ठ, या तुझ्या म्हणण्याप्रमाणे होईल यात संशय नाही. ही माझी कथा जोपर्यंत जगतामध्ये राहील, (२१) तोपर्यंत कीतिसहवर्तमान तुझ्या शरीराचे ठिकाणी प्राण राहतील, आणि जोपर्यंत त्रैलोक्य राहील तोपर्यंत माझ्या कथा राहतील.' (२२) यानंतर रामाने त्याचे आभार मानिले व आपल्या गळ्यातील हार काढून तो त्याच्या गळ्यात घातला. ते सर्वही आपल्या घरी निघून गेले; असे ३० श्लोकात आहे यावरून हनुमानही गेला हे उघड आहे.

बिभीषणाला आशीर्वाद

रामाच्या निर्याणसमयी त्याने सर्वांस बोलाविले. त्यात सुग्रीव, बिभीषणही आले. सुग्रीवाला रामाने बरोबर घेतले. त्यावेळी बिभीषणाला राम म्हणाला,

'यावत्प्रजा धरिष्यन्ति तावत्वं वै बिभीषण ॥
राक्षसेंद्र महावीर्य लंकास्थः स्वं धरिष्यसि ॥ २५ ॥
यावच्चंद्रश्वसूर्यश्च यावत्तिष्ठति मेदिनी ॥
यावच्च मत्कथा लोके तावद्राज्यं तवास्त्विह ॥ २६ ॥
शासितस्त्वं सखित्वेन कार्य ते मम शासनम् ॥

अनुक्रमणिका

प्रजाः संरक्ष्य धर्मेण नोत्तरं वक्तुमर्हसि' ॥ २७ ॥

अर्थ : 'हे बिभीषणा, हे महावीर्यवान् राक्षसाधिपते, जोपर्यंत भूतलावर प्रजा आहे तोपर्यंत लंकेमध्ये राहून तू आपला देह धारण कर. (२५) सूर्य, चंद्र, व पृथ्वी ही जोपर्यंत आहेत तोपर्यंत येथे तुझे राज्य असो. (२६) मित्रत्वाने मी तुला आज्ञा केली आहे. व तू माझ्या आज्ञेप्रमाणे वागणे आवश्यक आहे. तू धर्माने प्रजेचे रक्षण कर. यावर काही एक उत्तर करू नकोस.'

तमेवमुक्त्वा काकुत्स्थो हनूमंतं तथा ब्रवीत् ।
'जीविते कृतबुद्विस्त्वं मा प्रतिज्ञां विलोपय ॥
मत्कथाः प्रचरिष्यति यावस्लोके हरीश्वरा ।
तावद्रमस्व सुप्रोतो मद्वाक्यमनुपालयन् '॥ ३१ ॥

अर्थ : याप्रमाणे बिभीषणाला सांगितल्यानंतर राम हनुमानाला म्हणाला 'जिवंत रहाण्याविषयी तू निश्चय केला आहेस. यास्तव तू आपली प्रतिज्ञा निष्फळ करू नकोस. (३०) जोपर्यंत जगतामध्ये माझ्या कथा प्रचलित राहातील, तोपर्यंत माझ्या आज्ञेचे परिपालन करून तू सुप्रसन्नमनाने भूतलावर स्वस्थ रहा.' (३१) या प्रमाणे महात्मा रामाने हनुमानाला सांगितले असता त्याला मोठा हर्ष झाला आणि तो म्हणाला (३२) जोपर्यंत जगतामध्यें तुझी कथा प्रचलित राहील तोपर्यंत तुझ्या आज्ञेचे परिपालन करून मी भूतलावर राहीन, (३३). नंतर

जांबवन्तं तथोक्ता तु वृद्धमब्रह्मसुतं ।
तथा मैन्दं च द्विविदं चैव पंच जांबवतासह ॥ ३७ ॥
यावत्कलिश्च सप्राप्तस्तावज्जीत सर्वदा ॥ ३५ ॥

हा शाप की वर?

अर्थ : नंतर वृद्धब्रह्मपुत्र जांबवान, मैंद व द्विविद यांनाही रामाने तसेच सांगितले आणि जांबवान, हनुमान, बिभीषण, द्विविद व मैंद या पाचांना तो म्हणाला, 'जोपर्यंत कलियुग आहे तोपर्यंत तुम्ही जिवंत रहा. (३५) 'यावत्कलिश्चसंप्रातः' याचे भाषांतर शास्त्रीबुवांनी 'जोपर्यंत कलियुग आहे, तोपर्यंत' असे केले आहे ते बरोबर दिसत नाही. कलियुग लागेपर्यंत असे पाहिजे. तसे म्हटल्यास या पाचही चिरंजीवांची आयुमर्यादा द्वापारयुगाचे अंती खलास झाली व ते आता हयात नाहीत असे होते. फार तर कलियुगाचा आरंभ झाल्यावर तरी त्यांनी देह सोडला असला पाहिजे. बिभीषण व हनुमान चिरंजीव आहेत असा समज आहे. पण जांबवान, द्विविद, मैंद यांच्या चिरंजीवित्वाची जाणीव कितीकांना आहे? चिरंजीवपणाच्या या निव्वळ गप्पा आहेत. त्यांच्यावर विश्वास ठेवण्याचे काम भोळ्याभाबड्यांनी करावे. अशाप्रकारचे चिरंजीवित्व हा एक शाप होय दीर्घायु असावे, पण मर्यादेबाहेरचे आयुष्य म्हणजे दुःखपरंपराच. बिभीषण हा भ्रातृद्रोही व नीच मनोवृत्तीचा म्हणून त्याची दुष्कीर्ती कायम रहावी या हेतूने त्याला रामाने चिरंजीवित्व दिले, म्हणजे त्याच्या दुष्कृत्याची कायमची जाहिरात केली असे वाटू लागते.

मारुतीचा पराक्रम, बुद्धिमत्ता ही विशेष सरस असल्याने रामकथा लोकांत आहे तोपर्यंत मारुतीचे कीर्तीशरीरही कायमच रहाणार, या हेतूने 'चिरंजीव हो' असे सांगणे विचाराला पटेल. मर्त्य देहाने जगणे

अनुक्रमणिका

शक्य नाही व ते इष्टही नाही. तसा कोणी जगल्यास तो आपण दुःखी राहून इतरांसही दुःखीच करेल. सनातन्यांच्या मताप्रमाणे आमच्या धर्माचे न बदलणारे म्हणून चिरंजीव स्वरूप आज सर्व हिंदूंच्या अवनतास व दुखाःस कारण झाले आहे. देशकालवर्तमानाप्रमाणे त्यात सुधारणा होईल तरच आम्ही हिंदू सुखी होऊ व प्रगतीस जाऊ.

ब्रह्मचर्याचे थोतांड

हनुमान हा ब्रह्मचारी होता म्हणजे तो स्त्रीसुखपराङमुख होता असा एक समज आहे.

संन्यासी आणि ब्रह्मचारी । तरी उभयता नैष्ठिक ब्रह्मचारी ।
अष्टमैथुनांची परी । वर्जंनी ब्रह्मचर्याचारी असावें ॥
—(**रंगनाथ योगवासिष्ठ,** मनोलय प्रकरण, ओवी ४७३.)
संदर्शनं स्पर्शनं केलिः कीर्तनं गुह्यभाषणम् ।
संकल्पोध्यवसायश्च क्रियानि वृत्तिरेव च ॥
एतन्मैथुनमष्टांगं प्रवदन्ति मनीषिणः ।
विपरीतं ब्रह्मचर्य एतद्देवाष्टलक्षमणम् ॥

असा हा ब्रह्मचारी शब्दाचा रूढ अर्थ आहे. पण या शब्दाचा यौगिक अर्थही चांगला आहे; व तो शब्द चार आश्रमाच्या यादीत येतो. अमरकोशाचा टीकाकार या शब्दाचा विग्रह असा देत आहे.

ब्रह्म वेदः । तदध्यनार्थं
व्रतमपि ब्रह्म । तच्चरतीति णींतिः ।

ब्रह्म म्हणजे वैद. त्याच्या अध्ययनाचे व्रत हाही ब्रह्मशब्दाला अर्थ आला ते व्रत आचरतो म्हणून इन् प्रत्यय लागून ब्रह्मचारिन् हे पद सिद्ध होते. त्याचे प्रथमेचे एकवचन ब्रह्मचारी या शब्दाचा हा मुख्य अर्थ आहे. विद्या शिकणाराने आपले सर्व लक्ष्य ती संपादन करण्याकडे लाविले पाहिजे स्त्रीसमागमाकडे त्याचे चित्त जाऊ नये म्हणून ब्रह्मचारी आश्रमात स्त्री त्याग हे महत्वाचे अंग ठरले; यासाठी

कर्मणा मनसा वाचा सर्वावस्थासु सर्वदा ।
सर्वत्र मैथुनत्यागो ब्रह्मचर्य तदुच्यते ॥

असा ब्रह्मचारी शब्दाचा रूढ अर्थ झाला. आज रोजी विद्यासंपादन करणारा असो नसो, तो विवाहित नसेल तर त्याला ब्रह्मचारी म्हटले जाते. विद्या शिकणाराला ब्रह्मचारी म्हणत नाहीत. आर्यसमाजी मात्र विद्यार्थ्यास ब्रह्मचारी म्हणतात.

हनुमान मारुती हा ब्रह्मचारी होता हे खरे; पण तो ज्ञानसंपादन करणारा विद्यार्थी या अर्थाने ब्रह्मचारी होता स्त्रीविषयपराङमुख या अर्थाने नव्हता असे रामायणावरून दिसते. रामाची व त्याची प्रथम भेट झाली त्यावेळी त्याच्याशी झालेल्या संभाषणावरून तीन वेद व व्याकरण यांचे अध्ययन याने केले असले पाहिजे असे राम म्हणतो. त्याचप्रमाणे त्याची विद्वत्ता पुष्कळच ठिकाणी दिसून येत आहे. त्याचे बोलणे

अनुक्रमणिका

तर्कशुद्ध व भाषा प्रौढ असते. चांगल्या विद्वानाशिवाय इतरांना हे शक्य नाही. वानरांमध्ये याच्या तोडीचा ज्ञानी कोणी नसल्याने ज्ञानसंपादन करणारा या अर्थी ब्रह्मचारी हे विशेषण त्यांच्या लोकांत प्रसिद्ध असावे. मारुतीच्या विद्वत्तेवरून हा तर्क करण्यात आलेला आहे. मारुतीच्या घरी स्त्रिया होत्या त्यावरून तो स्त्रीपराङ्मुख नव्हता हेही दिसून येते पहा, किष्किंधा कांड सर्ग ३३. लक्ष्मणाला किष्किंधेत राजमार्गाने नेले तेथे कोणकोणाची घरे होती ते श्लोक ९– १०—११ यात दिले आहे. अंगद, मैंद, द्विविथ, गवय, गवाक्ष, गज, शरभ, विद्युन्माली, संपाती, सूर्याक्ष, हनुमान, वीरबाहु, सुबाहु, नल, कुमुद, सुषेण, तार, जांबवान, दधिवक्त्र, नील, सुपाटल, सुनेत्र, 'याही महात्म्या वानरश्रेष्ठांची मोठी मजबूत व उत्कृष्ट घरे राजमार्गामध्ये लक्ष्मणाने अवलोकन केली.' (१२)

या घरांचे वर्णन पुढीलप्रमाणे आहेः

पांडुराभ्र प्रकाशानि गंध माल्ययुतानि च ।
प्रभूत धनधान्यानि स्त्रीरत्नेः शोभितानि च ॥ १३ ॥

ही गृहे श्वेतवर्ण अभ्राप्रमाणे प्रकाशणारी असून सुगंधी द्रव्यांनी व पुष्पांनी भरलेली होती आणि त्याचप्रमाणे विपुल धनधान्यांनी ती संपन्न असून सर्वोत्कृष्ट झालेली होती. इतरांबरोबर हनुमानाचाही वाडा त्या राजरस्त्यावर होता व त्यातही सर्व चैनीच्या व सुखभोगाच्या वस्तू होत्या. सुगंधी द्रव्य व पुष्पें, धनधान्य ही सर्व ऐषआराम भोगण्याची साधने आहेत व यांचा कळस सुंदर स्त्रिया होत. त्याही प्रत्येक घरात बहुत होत्या, तशा मारुतीच्याही घरी असल्या पाहिजेत; तशा नव्हत्या व मारुती हा स्त्रीसंग वर्ज्य करणारा होता असे सांगण्याचा वाल्मीकीचा उद्देश असता तर त्याने वरील यादीत हनुमानाने नाव गाळले असते किंवा तो एकच या सर्वांना अपवाद होता असे स्पष्टपणे सांगितले असते. बरे, हनुमान हा सुग्रीवाचा अमात्य होता. ज्याला बायका व मुले नाहीत असा सुखपराङ्मुख सडा फर्टिग सुग्रीवाची सेवा करीत राहणेही संभवनीय नाही. वगैरे वरून पाहता मारुती इतरांसारखाच आपल्या बायका घेऊन मोठ्या इतमामाने राहाणारा असा दरबारी माणूस असला पाहिजे असे दिसते. सीताशुद्धीसाठी हनुमान लंकेत गेला व सीतेला शोधण्यासाठी त्या रात्रीच सर्व घरे धुंडावी लागली तेव्हा,

स्त्रीणां मदनविद्धानां दिविचाप्सरसामिव ।
शुश्राव कांचीनिनदं नूपुराणांच निस्वनम्

(सुंदरकांड स. ४, श्लोक ११)

अर्थ : स्वर्गातील अप्सराच की काय, अशा दिसत असलेल्या व मदनाने व्याकूळ झालेल्या. स्त्रियांच्या तोरड्यांचा व कमरपट्यांचा शब्द त्याच्या कानांवर येऊ लागला. (११). हे सर्व विलासाचे प्रकार मारुतीला समजले असे दिसते. तो खरोखरच स्त्रीविषयपराङ्मुख असता तर ते त्यास समजणे शक्य नव्हते. रावणाच्या अंतःपुरात गेल्यावर रावण, 'मद्यपान करून व सुरतक्रिडा करून पडला होता, अशाप्रकारे महाकपि हनुमानाने त्याला अवलोकन केले.' (सुं. १०। ११) सुरतक्रीडेचा अनुभव असणारालाच ही स्थिती ओळखता येईल. (सर्ग ११. श्लो. ७।८) त्यात झोपेमध्ये एकमेकींच्या सौंदर्यासंबंधाने बोलत असून योग्य रीतीने गायनाचा अर्थ बोलून दाखविणाऱ्या, स्थल व काल यांना अनुरूप असे योग्य भाषण करणाऱ्या,उत्कृष्ट रीतीने सुरतक्रीडा करणाऱ्या, आणि अलंकारांनी भूषित झालेल्या हजार स्त्रिया त्या पानभूमीवर असल्याचे त्या वानरसेनाधिपती हनुमानाने अवलोकन केले. निजलेल्या स्त्रियांत उत्कृष्ट रीतीने

सुरतक्रीडा करणाऱ्या निवडून काढण्याचे काम नैष्ठिक ब्रह्मचाऱ्याला कसे होणार? त्यासाठी अनुभविकच इसम पाहिजे. त्या बाबतीत जास्त विस्तार करण्याची जरूर नाही युद्धकांडातील एकच प्रसंग देऊन हा मुद्दा संपवितो.

युद्धकांड (सर्ग १२८) यात भरद्वाजाश्रमात रामाने मुक्काम केल्यावर त्याच्या आगमनाची वार्ता सांगण्यास हनुमानाला भरताकडे पाठविले. तेथे जाऊन त्याने ती शुभवार्ता भरतास सांगितली. थोडा वेळ त्यास काही सुचेनासे झाले, त्याने मारुतीला आलिंगन दिले व तो म्हणाला,

प्रियाख्यानस्य ते सौम्य ददामि ब्रुवतः प्रियम् ॥ ४४ ॥
गवां शतसहस्रंच ग्रामाणां च शतं परम्
सुकुंडला : शुभाचारा भार्या : कन्यास्तु षोडश ॥ ४५ ॥
हेमवर्णा : सुनासोरु : शशिसौम्याननाः स्त्रियः
सर्वाभरणसंपन्नाः संपन्नाः कुलजातिभिः ॥ ४६ ॥

अर्थ : हे सौम्य प्रियवृत्तांत कथन करणाऱ्या तुला मी काय बरे प्रिय वस्तू अर्पण करू? (४४) एक लक्ष गाई, शंभर उत्कृष्ट गावे आणि कुंडले व सर्व भूषणे यांनी युक्त असलेल्या, कुलीन जातिवंत व शुभ आचरण, उत्कृष्ट नासिका व माड्या, चंद्राप्रमाणे सौम्य मुख व सुवर्णतुल्य कंठ यांनी संपन्न असलेल्या सोळा कन्या भार्या म्हणून मी तुला अर्पण करतो. (४५।४६) ही देणगी नाकारली नसल्याने ती स्वीकारली असलींच पाहिजे. याप्रमाणे मारुतीच्या जनानखान्यात एकदम सोळा भार्यांची भर पडली हनुमान बलवान होता व मोठा वीर होता, पण स्त्रीविषयपराङ्मुखता त्याचे ठिकाणी नव्हती व त्याचे बल विषयपराङ्मुखतेवर अवलंबून नव्हते. ब्रह्मचर्याच्या पालनाने अचाट सामर्थ्य येते या समजुतीस आधार नाही.

आज हनुमानाविषयी भाविक लोकांचे समज काय आहेत व ते कसे खोटे आहेत हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. तो रामाचा एकनिष्ठ सेवक होता ही समजूत अगदी खोटी आहे. तो अव्वलपासून अखेरपर्यंत सुग्रीवाचा नोकर. सुग्रीवाने सांगितल्यावरून तो रामाचे कामगिरीवर गेला व ती त्याने उत्तम प्रकारे पार पाडली.

तो शेपटीवाला माकड अशी दुसरी समजूत आहे व त्यामुळे तो निर्बुद्धे असावा असेही समजले जाते. हे दोन्हीही समज चुकीचे आहेत. तो मनुष्यच होता व तो विद्वान बहुश्रुत आणि चाणाक्ष होता. तो चिरंजीव आहे. म्हणजे आजही हयात आहे अशी समजूत आहे तीही विचारास न पटणारी आहे. ही कथा उत्तरकांडातील आहे व उत्तरकांड प्रक्षिप्त आहे. तसे न मानले तरी माणसांचे आयुष्य मर्यादित आहे.

तो ब्रह्मचारी म्हणजे स्त्रीविषयपराङ्मुख होता हा समजही रामायणात जे थोडे उल्लेख सापडले त्यावरून खोटा ठरतो. त्याला पूर्वीच बायका होत्या व भरताने त्यात सोळांची भर घातली.

हनुमान ही रामायणातील एक श्रेष्ठ दर्जाची विभूती आहे. सुग्रीवाची सेवा पत्करल्यावर त्याच्या पडत्या काळीही बायकांची आशा सोडून तो सुग्रीवाबरोबर अरण्यात गेला व त्याने मालकाबरोबर कष्ट सोसले. मोठ्या धूर्तपणाने राम व सुग्रीव यांचा स्नेह जुळवून आणून वालीचा घात रामाकडून करविला व सुग्रीवास राज्यप्राप्ती करून दिली. सुग्रीवाबरोबर लंकेवर हल्ला चढवून मोठा पराक्रम केला युद्धात त्याचा

अनुक्रमणिका

पहिला नंबर असे तसा मसलतीच्या कामीही त्याचा मुत्सद्दीपणा अव्वल दर्जाचा असे. याप्रमाणे वाल्मीकी रामायणाप्रमाणे हनुमान हा एक श्रेष्ठ पुरुष आहे. पण त्याच्यावर देवत्वाचा आरोप करून त्यावर तेलशेंदराचे चोपडण घातल्यामुळे त्याच्या थोर गुणांची आम्हास विस्मृती झाली आहे.

महाराष्ट्र शारदा डिसेंबर – जानेवरी १९३५–३६

अनुक्रमणिका

९ रामायणातील आणखी काही स्थळे

शृंगबेरपूर : ही गुह नामक निषादाधिपतीची राजधानी. अयोध्येहून राम दुपारी निघाला असे धरले तर तो संध्याकाळी तमसेवर पोचला व दुसरे दिवशी शृंगबेरपुरास गेला असे लिहिले आहे आजच्या अयोध्येहून अंतर फार तर ६० मैल होईल. मग शरयू हीच गोग्रा मानावी लागते. तिचा गंगेशी झालेला संगम पाटणा शहरापासून फारसा दूर नाही. म्हणजे आज जी अयोध्या दाखविली जाते तेथून शृंगबेरपुराचे अंतर जास्त पडते. याबद्दलचे विचार पूर्वीच दिले आहेत. त्यावरून अयोध्येप्रमाणेच शृंगिबेरपूर हेही गाव आर्यावर्तातील नसावे असे वाटू लागते. संस्कृत भाषेच्या साहाय्याने नावाचा अर्थ केल्यास कसा अनर्थ होतो हे दाखविले आहे. कुबेर शब्दाचाही संस्कृताभिमान्यांनीं ओढूनताणून भलताच अर्थ केला आहे. हा कुबेर यक्षांचा राजा असून शंकराचा मित्र आहे व हा फार कुरूप आहे. याला तीन पाय, एक डोळा, आठ हात आहेत असे पुराणात वर्णन आहे. कुरूप देवांची आम्हाला मोठी हौस!

इजिप्त, पालेस्ताईन, अरबस्तान, वगैरेकडील भाषांना सेमिटिक भाषा म्हणतात. आर्य भाषा याहून अगदी भिन्न आहेत. म्हणजे भाषांची दोन मोठी कुले आहेत. एक आर्य व दुसरें सेमिटिक. ग्रीक, लाटिन, संस्कृत, फारशी, झेंद वगैरे आर्यकुली भाषा. अरबी, यहुदी, पुराण ईजिप्तची या सेमिटिक कुलातील. या सेमिटिक भाषांत कबीर या शब्दाचा अर्थ थोर असा आहे. पुराण मिसरात कबीरी नावाचे देव होते व त्यांचा दर्जा इतर देवांपेक्षा कधी कधी खालचा समजत. पता, सेकरी, ओसिरी असे तीन कबीरी मानीत किंवा तीन नावे एकाचीच मानीत. फिनिशियन लोक कबीरी आठ आहेत असे मानीत

आमचा कुबेर हा यक्षांचा राजा. यक्ष हे देवयोनीचे पण जरा कमी दर्जाचे. यावरून कुबेर हा इजिप्तच्या कबीरीचे हिंदी रूप दिसत आहे.

श्रृंगिबेर हे संस्कृतरूप आहे. इजिप्तचे रूप सेरेन + कबीर असे होते. या कबीराचे देऊळ मेफिस म्हणजे अजादोमध्ये होते. जवळच तेल्—एल्—कबीर या नावाचा पर्वतही आहे.

पालेस्ताईन देशाच्या दक्षिणेस कबीरी या नावाचे लोक राहात. ते लुटारू, दरवडेखोर समजले जात. रामायणातही श्रृंगबेरपुरचा राजा निषादांचा अधिपती आहे. निषाद ही एक गुन्हेगार, दरवडे घालणारी जात समजली जाई. याप्रमाणे विचार करिता निषाद व त्यांचे हशर श्रृंगबेरपूर ही दोन्ही इजिप्त देशातील. लुटारी कबीरींचा उल्लेख संस्कृत भाषेत निषाद या शब्दाने केला आहे असे दिसत आहे. याप्रमाणे अयोध्या व श्रृंगबेरपूर दोनही ठिकाणे आर्यावर्तांतील नाहीत. वाल्मीकी रामायणात दिलेल्या वर्णनावरून ती परदेशीच असावीत. इंजिप्तच्या पुराण इतिहासावरून ती दोन्ही इजिप्तातली असावी असे अनुमान होते.

चित्रकूट : आज प्रयागपासून ७५ मैलांवर एक साधारणशी टेकडी दाखवतात व हा रामाचा चित्रकूट म्हणतात. रामायणात हे अंतर २०।२५ मैलच आहे असे सांगितले आहे.

चित्रकूट यात दोन पदे आहेत चित्र व कूट. चित्र याचा अर्थ १. चकचकीत २. चित्रविचित्र रंगाचा कूट म्हणजे ढीग किंवा शिखर. पर्वतासंबंधी बोलावयाचे असल्यास चित्रं कूटं यस्य सः, ज्याचे शिखर चित्रविचित्र किंवा चकचकीत आहे तो साधारणसा डोंगर असल्यास ज्याचा ढीग चकचकीत आहे तो. असा पर्वत किंवा डोंगर प्रयागाजवळ नाही. पण मिसरातील मेंफिस म्हणजे अजादोंजवळ नदीच्या पलीकडील

अनुक्रमणिका

तीरावर पांढऱ्या संगमर्मरच्या खाणी आहेत व त्या सूर्याच्या उन्हात फार चकचकीत दिसतात. याला तुरा पर्वत म्हणतात याला समांतर असा उत्तरेच्या अंगास दो शिरी म्हणजे रक्तपर्वत आहे यालाही चित्रकूट म्हणता येईल. असे चित्रकूट या प्रांतात आणखीही आहेत. एकूण, चित्रकूट इकडचा नसून इजिप्तचा असावा.

नंदिग्राम : हिंदुस्थानातील अयोध्येजवळ नंदीचे देऊळे असल्याचा दाखला मिळत नाही. दक्षिण हिंदुस्थानात अशी नंदीची देवळे आहेत. पण ती अयोध्येपासून फार दूर. मिसरचा जुना इतिहास या बाबीत चांगला प्रकाश पाडतो. तेथे ऑसिरिस या नावाचा देव होता. आमचा शिव किंवा शंकर व ऑसिरिस एकच या देवाला सोडलेले बैल असत. त्यांस ऑसिरिसचे अवतार समजत ते त्यांच्याकरिता मुद्दाम बांधलेल्या देवळात राहात. ते मेल्यावर त्यांच्या प्रेतात मसाला भरून त्यांची ममी करून त्या ममी एका भुयारात ठेवल्या जात. स्त्राबो नावाच्या ग्रीक इतिहासकाराने या देवळाचे वर्णन प्राचीन काली केले आहे त्याप्रमाणे शोध करिता सन १८५० साली मारिएट याला हे एपिसचे देऊळ व नंदींची ममी ठेवण्याची जागा ही दोन्ही सापडली. ही ममी ठेवण्याची जागा मेंफिसजवळच्या सक्कारा या गावी होती. तेथे जमिनीखाली खडकात लेणी कोरून त्यात या बैलांच्या ममी ठेवीत. रामायणातील नंदिग्राम हे सक्कारा गाव असावे. एपिस ब बसव हे शब्द एकच आहेत. बसव हा शब्द द्रविड भाषेत नंदीचा वाचक आहे. चित्रकूट, नंदिग्राम ही दोन्हीही आर्यावर्तीय नव्हत. ती इजिप्शिन असावी असा पुरावा मिळतो.

दंडका—दंडकारण्य

दंडक : एक इक्ष्वाकुपुत्र हा लहानपणापासून मूढ व उन्मत्त असे. हा विंध्याद्री व शैवल या पर्वतांमधील प्रदेशाचा राजा. याने एकदा आपल्या भृगुकुलोत्पन्न गुरुकन्येवर बलात्कार केल्यामुळे गुरूच्या शापाने याचा नाश झाला व तो देश अरण्यप्राय झाला म्हणून त्यास दण्डकारण्य असे नाव पडले. दंडकाला शिक्षा करण्यासाठी म्हणून या प्रदेशावर चिखलाचा पाऊस पडला व त्याखाली सर्व दडपून गेले. याचा अर्थ हा चिखलाचा प्रदेश असावा. गंगेच्या मुखाजवळ असा प्रदेश आहे. पण रामायणात सांगितलेली दण्डका तेथे नव्हती. ती चित्रकूट पर्वताजवळ होती. चित्रकूट पर्वत तर प्रयागजवळ नाही. तो इजिप्तमधील तुरा किंवा दोशिरीपर्वत धरल्यास तेथे चिखलाचे प्रदेश नाईल नदीच्या मुखाजवळचे आहेत व त्याला हे दंडकेचे वर्णन पूर्णपणे लागू पडते. या प्रदेशाला देन्देरा म्हणजे दहातायरा असे म्हणत. याजवळच झोआनतानिस गाव होते. जनस्थान हे त्याचे संस्कृतीकरण आहे. येथे खर व त्याची फौज असे. रामाने तिचा नाश केला.

पंपा व किष्किंधा यांचा विचार वाली कोण होता याचा तपास करताना करणे बरे. पंपा एक सरोवर होते व एकदा ती नदी होती असेही आढळते व किष्किंधा ही नगरी होती ती अमुकच असे सांगणे कठीण आहे.

लंका : रामाचा मुख्य शत्रू रावण व त्याची राजधानी लंका. हे बेट आजचे सिलोन नव्हे. कारण रामायणात दिलेले लंकेचे वर्णन सिंहलद्वीपाशी मुळीच जुळत नाही. रामेश्वरापासून ते शंभर योजन नाही. ते मोठ्या उंच डोंगरावर वसलेले नाही. आर्य लोकाना माहीत असलेल्या या लंका बेटाचा उल्लेख ज्योतिषशास्त्रात येतो. हे शहर विषुववृत्तावर अवंतीच्या थेट दक्षिणेस होते. पहिला मेरिडियन (अक्षांश) या दोन स्थळांतून जात असे. सिलोन बेट विषुववृत्तावर नाही व अवंतीच्या थेट दक्षिणेसही नाही. यामुळे त्या

अनुक्रमणिका

वेटास लंका हे नावच योग्य नाही. वास्वविक पहाता अशोकाचा पुत्र सिलोनला जाण्यापूर्वी आर्यांना सिलोनची विशेषशी माहिती नव्हती. लंका याचा अर्थ कोणतेही बेट असा घ्यावा लागेल.

रामाची लंकेवरची स्वारी फार थोड्या मुदतीची आहे व म्हणून ती फार दूरची असणे शक्य नाही या मुद्याचा जरा बारकाईने विचार करू.

वालिवध श्रावणात झांला.

पूर्वोऽयं वार्षिको मास. श्रावणः सलिलागमः ।
प्रवृत्ता सौम्यभ्य चत्वारी मासा वार्षिकसंज्ञिताः ॥

(कि. कां. सर्ग २६ श्लोक १४)

कार्तिके समनुप्राप्ते त्वं रावणवधे यतः ॥

(कि. कां. स. २६। १७)

वर्षाः समयकालं तु प्रतिज्ञाय हरीश्वरः ।
व्यतीतांश्चतुरो मासान्विहरन्नावबुध्यते ॥

(कि. कां. ३०॥७८)

मार्गशीर्षात सीतेचा शोध करण्यासाठी हनुमानादी वानरांस पाठविले व त्यांस एक महिन्याची मुदत दिली होती व ती मुदत पुरी होत आली म्हणून वानर प्रायोपवेशनास बसले होते. त्या सुमारास हनुमान लंकेत गेला तेव्हा सीताहरणास दहा महिने झाले होते. म्हणजे माघअखेरीस किंवा फाल्गुनच्या सुरवातीस सीतेला रावणाने नेले होतें. यापुढील दोनच महिन्यांत राम किष्किंधेहून निघाला व समुद्रावर जाऊन तेथे शतयोजन सेतू त्याने बांधला व लंकेस जाऊन रावणाबरोबर युद्ध करून त्याने रावणवध केला, अशी रामायणकथा आहे. आज दाखवित असलेली किष्किंधा जर खरी असेल आणि सिलोन बेट हीच जर लंका असेल तर किष्किंधेहून समुद्रापर्यंत जाण्यास व पूल बांधण्यास दोन महिने आजच्या कालीही पुरावयाचे नाहीत. मग तेव्हा प्रवाससाधने अनुकूल नसता ही हकीगत घडली हे विश्वास ठेवण्यासारखे बिलकूल नाही.

याप्रमाणे विचार करता नारदाने सांगितलेल्या छोट्या रामायणात दिलेली गावांची नावे व त्यांची वर्णने हिंदुस्थानातील नव्हेत असेच निःसंशय दिसून येत आहे. रामायणात स्थळांसंबंधाने वर्णन अगदीच त्रोटक व जी दिलेली आहेत तसली स्थिती आर्यावर्तात कोठेही सापडणे कठिण.

किष्किंधेपासून लंकेपर्यत वाटेत शहरे, नद्या, पर्वत वगैरे काही लागलीच नाहीत काय? कारण कोणाचेही नाव दिलेले नाही ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. यावरून हे रामाचे हिंदी आक्रमण निव्वळ काल्पनिक दिसत आहे.

स्थळावरून विचार करीत असता नारदीय रामायणात उल्लेख नसलेल्या एका स्थळाचा निर्देश करणे अयोग्य होणार नाही. राम वगैरे विवाह करून मिथिलेहून परत आल्यावर भरत आपल्या मामाबरोबर आजोळी गेला. तो तिकडे बारा वर्षे राहिला. आईबापांची त्यास आठवण होई व इकडे आईबापांसही त्याची आठवण होई, पण त्यास या दीर्घ कालात आणण्याची तजवीज झाली नाही हे आश्वर्य आहे. दशरथ मरण

अनुक्रमणिका

पावल्यावर त्यास स्वार पाठवून आणविले आहे. त्याच्या प्रवासाचा विचार करताना केकयांचे गिरिव्रज व अयोध्या यामधील प्रदेशांची तपासणी करिता येईल अयोध्या कांडाच्या ६८ वे सर्गात दूत अयोध्येहून केकयाला जाण्याची कथा आहे.

दत्तपथ्यशना दूता जग्मुः स्वं स्वं निवेशनम्।
केकयांस्ते गमिष्यन्तो हयानारुह्य संमतान् ॥ १० ॥

अर्थ : मार्गात पडणाऱ्या भोजनाकरिता ज्यांच्यापाशी द्रव्य दिले आहे असे ते दूत आपणाला पसंत अशा अश्वांवर आरूढ होऊन केकय देशाला जाण्याकरिता आपआपल्या घरी गेले. (१०)

ततः प्रास्थानिकं कृत्वा कार्यशेषमनन्तरम्।
वसिष्ठेनाभ्यनुज्ञाता दूताः संत्वरितं ययुः ॥ ११ ॥

तदनंतर जाण्याकरिता उरलेसुरलेली तयारी करून वसिष्ठ मुनींनी अनुज्ञा दिलेले ते दूत सत्वर चालते झाले. ॥ ११ ॥

न्यन्तेनापरतालस्य प्रलंबस्योत्तरं प्रति ।
निषेवमाणास्ते जग्मुः नदीं मध्येन मालिनीं ॥ १२ ॥
ते हास्तिनपुरे गंगां तीर्त्वा प्रत्यङ्मुखं ययुः ।
पंचालदेशमासाद्य मध्येन कुरुजांगलम् ॥ १३ ॥
सरांसि च सुफुल्लानि नदीश्च विमलोदकाः ।
निरीक्षमाणाजन्मुस्ते दूताः कार्यवशाद् द्रुतम् ॥ १४ ॥
ते प्रसन्नोदकां दिव्या नानाविहगसेवितां ।
उपातिजग्मुर्वेगेन शरदण्डां जलाकुलाम् ॥ १५ ॥
निकूलवृक्षमासाद्य दिव्यं सत्योपयाचनम् ।
अभिगम्याभिवाद्य तं कुलिंगां प्राविशन्पुरीम् ॥ १६ ॥
अभिकालं ततः प्राप्य तेजोभिभवनाच्च्युताः ।
पितृपैतामहीं पुण्यां तेरुरिक्षुमतीं नदीम् ॥ १७ ॥
अवेक्ष्यांजलिपानांश्च ब्राह्मणान्वेदपारगान् ।
ययुमंध्येन बाल्हीकान् सुदामानं च पर्वतम् ॥ १८ ॥
विष्णोः पद प्रेक्षमाणाः विपाशां चापि शाल्मलीम् ।
नदीर्वापितटाकानि पल्वलानि सारांसि च ॥ १९ ॥
पश्यन्तो विविधांश्चापि सिहान्व्याघ्रान्मृगान्द्विपान् ।
ययु : पथातिमहता शासनं भर्तुरीप्सवः ॥ २० ॥
ते श्रांतवाहना दूताः विकृष्टेन सता पथा ।
गिरिव्रजं पुरवरं शीघ्रमासेदुरंजसा ॥ २१ ॥
भुर्तः प्रियार्थ कुलरक्षणार्थ भर्तुश्च वंशस्य परिग्रहार्थम् ।
अहेडमानास्त्वरया स्म दूता रात्र्यां तु ते तत्पुरमेव याताः ॥ २२ ॥

अनुक्रमणिका

अर्थ : अपरताल देशाच्या पश्चिम बाजूला आणि प्रलंब देशाच्या उत्तर बाजूला असलेल्या मालती नदीवर उतरून ते त्या नदीतून पलीकडे गेले (१२). (ईशान्य दिशेस जाण्याकरिता निघालेले) ते दूत पंचाल देशाला येऊन हस्तिनापुरासमीप गंगा उतरल्यावर पश्चिमेकडे वळून कुरजांगल देशाला जाणाऱ्या मधल्या रस्त्याने चालले. (१३) पुष्पांनी फुललेली सरोवरे आणि निर्मळ उदकाने युक्त असलेल्या नद्या मार्गांमध्ये दृष्टी पडत असतानाही ते दूत (मध्ये न थांबता) जरुरीच्या कामामुळे सत्वर पुढे चालते झाले (१४). निर्मल उदक, नाना प्रकारचे पक्षी यांनी सेवित आणि उदकाने क्षुब्ध अशा शरदंडा नामक दिव्य नदीसमीप जाऊन ते ती नदी ओलांडून पुढे गेले (१५). शरदंण्डा नदीच्या पश्चिम तीरावर अभिवंदन करण्यास योग्य असलेल्या सत्योपयाचन नामक दिव्य वृक्षांशी गेल्यावर दूतांनी त्याला प्रदक्षिणा केली आणि नंतर ते कुलिंगा नामक राजधानीमध्ये प्रविष्ट झाले (१६). तदनंतर तेजोभिभवन गावातून निघून अभिकाल नामक गावाला आल्यावर इक्ष्वाकूंचा पिता व पितामह यांचा जिच्याशी संबंध आहे अशी पुण्य इक्षुमती नदी ते उतरून गेले. (१७) बाल्हीक देशात राहणाऱ्या वेदपारंगत ब्राह्मणांना ओंजळींनी पाणी पिताना पाहून ते दूत बाल्हीक देशातून सुदाम पर्वताला चालते झाले. (१८) तदनंतर सुदाम पर्वतावर असलेले विष्णूचे स्थान पहाण्याचा उद्देश मनात धरून आणि विपाशा व शाल्मली या नद्या अवलोकन करून नद्या, वापी, तडाग, तळी, सरोवरे, नाना प्रकारचे सिंह, व्याघ्र, मृग आणि गज अवलोकन करीत त्यांना पाठविणाऱ्या प्रभु वसिष्ठाची आज्ञा सिद्धीस नेण्याची इच्छा धरणारे ते दूत मोठ्या मार्गाने चालते झाले. (२०) नंतर उपद्रवरहित असा बराच लांब मार्ग चालून आल्यामुळे वाहने श्रांत होऊन गेलेले ते दूत गिरिव्रज नामक श्रेष्ठ नगराला अनायासे सत्वर गेले. (२१) प्रभु वसिष्ठाची मर्जी संपादन करण्याकरिता, प्रजाकुल रक्षण करण्याकरिता आणि दशरथ राजाच्या वंशजांचे जे वंशपरंपरागत राज्य त्याचा भरताकडून स्वीकार होण्याकरिता उपेक्षा न करणारे ते दूत रात्रीच्या रात्रीच त्वरेने त्या नगराला चालते झाले (२२).

या दूतांना प्रवास करण्यास किती दिवस लागले हे सांगितलेले नाही. परंतु भरत आपल्या आजोळाहून निघाल्यापासून अयोध्येस पोचला तोपर्यंत सात रात्री गेल्या होत्या असे सांगितले आहे. म्हणजे सात दिवस व सात रात्रींचा त्याचा प्रवास होती. यांतील सहा दिवस त्याचे सैन्याबरोबरच गेले व त्या सैन्यात हत्ती घोडे, उंट असून गाढवे व बैल ही जनावरे व पायांनी चालणारे शिपाईही होते म्हणजे हा प्रवास दर दिवसाला २५–३० मैलांपेक्षा जास्त होणे शक्य नाही. शेवटी भरताने घोड्यावरून दौड केली तीही ४०–५० मैलांपेक्षा जास्त असणे शक्य नाही. एकंदरींत सात दिवसांचा प्रवास २०० मैलांपेक्षा जास्त होणे संभवनीय नाही.

आजच्या अयोध्येपासून सिंधु नदीपर्यंतचे अंतर यापेक्षा पुष्कळच जास्त आहे. म्हणून केकय हा देश आर्यावर्तातच होता असे म्हणावे लागेल. पण आजचे बाल्ख शहर हे प्राचीन बाल्हीक म्हणतात.

भरत आजोळी १२ वर्षे राहिला. त्यास दशरथाने त्या मुदतीत बोलविले नाही. केकय देश ७ दिवसांत पोचण्याइतका जवळ असता तर आईच्या भेटीसाठी तरी त्याच्या कैक फेऱ्या झाल्या असत्या तशा त्या झालेल्या नसल्याने केकय देश पुष्कळच दूर असला पाहिजे असे अनुमान होते.

केकय देशाचा राजा भरताचा आजा याचे नाव अश्वपती आहे. यात काही तरी अर्थ भरलेला आहे. त्याच्या सैन्यात व देशात घोड्यांचा मोठा भरणा असून आजूबाजूच्या देशात त्यांचा तोटा असावा. अश्वपतीने भरताला देणगी दिली आहे तिचा विचार करणे योग्य होईल.

अनुक्रमणिका

“तस्मै हस्त्युत्तमांश्चित्रान्कंबलानजिनानि च ।
सत्कृत्य केकयो राजा भरताय ददौ धनम्’ ॥

(अयोध्या काण्ड सर्ग ७०, श्लोक १९).

अंतःपुरेतिसवृद्धान् व्याघ्रवीर्यवलोपमान् ।
दंष्ट्रायुक्तान्महाकायान् शुनश्चोपायनं ददौ ॥ २० ॥
रुक्मनिष्कसहस्रे द्वे षोडशाश्वशतानि च ।
सत्कृत्य केकयीपुत्रं केकयो धनमाविशत् ॥ २१ ॥

यातील उत्तम चित्रविचित्र कंबले, वाघाच्या बलाचे कुत्रे आणि सोळाशे घोडे या बाबी लक्षात घेण्यासारख्या आहेत. कंबल म्हणजे लोकरीचे वस्त्र. पण या ठिकाणी ते उत्तम शालीसारखे चित्रविचित्र मौल्यवानच घेतले पाहिजे. शिकारी कुत्रे घरी वाढविलेले दिले आहेत. ते शिकारी मोठे कुत्रे होते. यावरून सदरचा मुलूख डोंगराळ असावा व थंड हवेचा असावा. त्याशिवाय अत्यंत बारीक व मृदु अशी लोकर मिळणे कठीण व कुत्रीही मोठी असणे कठीण. म्हणजे हा मुल्लुख आजच्या आर्यावर्तातील होता असे म्हणता येत नाही.

ऐरावतानैन्द्रशिरान्नागान्वै प्रिशदर्शनान् ।
खरान् शीघ्रान्सुसंयुक्तान्मातुलोऽस्मै धनं ददौ ॥ २३ ॥

ऐरावत कुळातील आणि इंद्रशिरनामक देशातील दिसण्यातही मनोहर असलेले गज आणि उत्कृष्ट रीतीचे सामानसुमान घातलेले शीघ्रगामी खर असे धनही मातुलाने त्याला दिले. (२३) हत्ती देणे हे योग्यच पण शीघ्रगामी खर यांना येथे धन म्हटले आहे व ते खर स्वारीचे आहेत; ही गोष्ट लक्षात घेतली असता खर म्हणजे गाढव हे मोठे प्रतिष्ठेचे वाहन केकय देशात होते हे स्पष्ट होते. म्हणजे हा देश हिंदुकुश पर्वताच्या पलीकडे कोठेतरी असला पाहिजे. इतकेच नव्हे तर आजचे अफगाणिस्तान व इराण हा देश मूळचा आर्याचाच असल्याने त्याच्याही पलीकडचा हा देश असला पाहिजे.

सात दिवसात भरत अयोध्येस पोचला ही गोष्ट संभवनीय मानावयाची असल्यास अयोध्या आज दाखवितात ती नसून तिकडेच कोठे तरी असली पाहिजे. मेंफिस म्हणजे ग्रीकांची (यवनाची) अजादो ही अयोध्या असावी असे वर दाखविलेच आहे. तसे असल्यास केकय देश असूरियात असावा.

रामायणात वर्णिलेला दूतांचा केकय देशाला जाता वेळचा मार्ग आणि केकय देशाहून येण्याचा भरताचा मार्ग हे दोन्ही आजच्या अयोध्येस रामाचे राज्य होते असे मानल्यास निव्वळ काल्पनिक दिसतात. दूत जाताना त्यास प्रथमतः मालती नदी लागली. भरत दुसऱ्या बाटेने आला असला तरी त्याला ही नदी लागावयास पाहिजे होती. दूत हस्तिनापुराजवळ गंगा उतरून गेले. पण हस्तिनापुराजवळ गंगा नदी नाही, यमुना आहे. गंगा हा शब्द सामान्य नदीचा वाचक म्हणून प्रयोजिला आहे असे म्हटले तरच वाल्मीकीची अब्रू राहील. रामायणावरील टीकाकार हीच अडचण आल्यामुळे गंगा म्हणजे कोणतीही नदी असा अर्थ त्यास करावा लागला. दूतांना गिरिव्रजाजवळ सुदाम पर्वत लागला तर भरताला सुदामा नदी लागली. पंपा पुष्किरिणीच्या संबंधातही पंपा नावाची नदी दिली आहे. कवीच्या इच्छेस येईल त्याप्रमाणे नदी, पर्वत वगैरेस नावे देण्यात येत असे दिसते.

अनुक्रमणिका

रामायणास इतिहास म्हणतात व त्यात दिलेली सर्व हकीगत या आर्यावर्तात व दक्षिणेत मिळून घडली असा समज आहे. पण रामायणात दिलेली हकीगत या कामी अगदी कुचकामी आहे. रामायणात सांगितले याशिवाय या संबंधाचा अन्य पुरावा बिलकूल नाही. यासंबंधाने कोठेही कोरीव लेख नाही, चित्रे खोदलेली नाहीत किंवा दुसरा कसलाही पुरावा नाही. यामुळे किष्किंधा, पंपा, पंचवटी, जनस्थान वगैरे स्थळे अनेक ठिकाणी दाखविण्यात येतात. ही गोष्ट विचारात घेतल्यास रामायणकथेचे क्षेत्र हिंदुस्थान नसून दुसरेच असले पाहिजे असे वाटते.

नारदीय रामायणात पुरुष–स्त्रियांची अनेक नावे आली आहेत. त्यांचा विचार करून या शंकेवर विशेषसा प्रकाश पडणारा नाही. यासाठी तो प्रयत्न करण्याचे कारण नाही.

–महाराष्ट्र–शारदा, फेब्रुवारी, १९३६

अनुक्रमणिका

१० रामायणाचे मूळ

आंध्र प्रांतातील मल्लादि वेंकटरत्नम् यांनी प्रथमतः या विषयावर ग्रंथ लिहून रामायणाच्या इतिहासाचे मूळ इजिप्तात आहे असे प्रतिपादिले. त्यावरून रामायणाचा अभ्यास या नव्या दृष्टीने करू लागल्यावर काय काय नजरेस आले हे मागील तीन लेखात दिलेले आहे. रामायणकथा परदेशी आहे. तिची माहिती वाल्मीकीस मुळीच नव्हती नारदासारख्या प्रवाशाकडून ती वाल्मीकीस मिळाली असे रामायणाच्या पहिल्याच श्लोकावरून अनुमान होते. पहिल्याच सर्गात नारदाने वर्णिलेले रामाचे चरित्र आहे व त्याचाच विस्तार पुढील रामायणात केलेला आहे. या नारदीय रामायणात स्त्री–पुरुषाची अनेक नावे आली असून स्थलांची काही नावे नमूद केली आहेत.

रामकथा इजिप्तमधली ?

राम हा आर्यावर्तातील सूर्यवंशी राजा व त्याचा यथातथ्य इतिहास वाल्मीकीने लिहिला अशी सार्वत्रिक समजूत असल्याने महाभारत, भागवत वगैरे ग्रंथांत कोणत्या तरी निमित्ताने रामकथा घुसडून दिलेली आढळते. इतर कवींनीही आपल्या कवित्वाच्या जोरावर वाल्मीकीच्या काव्याच्या आधाराने रामायणे रचिली आहेत. प्राकृत कवींनीही तेच काम केले. अशा रीतीने रामचरित्र सर्वांच्या परिचयाचे झाले आहे. त्यावर नाटके लिहिली गेली. बायकांची गाणी झाली. एकंदरीत, रामकथा सर्व हिंदूंस अवगत आहे व राम एतद्देशीय अशीच सर्वांची समजूत आहे. या समजुतीस जबर धक्का देण्याचे काम वेंकटरत्नम् यांनी मोठ्या धैर्याने व पदरास खार लावून केले याबद्दल त्यांस धन्यवाद देणे जरूर आहे.

रामायणात जी व्यक्तींची नावे आहेत त्यावरून विचार करण्यास फारसा वाव नाही. संस्कृत भाषेतील धातू व एकाक्षरी कोष यांच्या मदतीने वाटेल त्या भाषेतील वाटेल त्या शब्दाला थोडी विकृती करून संस्कृत रूप देता येते व त्याचा अर्थ लावता येतो. यासाठी व्यक्तींच्या नावावरून विचार करण्यास फारशी सवड मिळत नाही. पण स्थळांच्या नावावरून विचार करण्यास जागा आहे बहुतेक सर्व स्थलांची नावे सार्थ आहेत. उदाहरणार्थ अयोध्या, श्रृंगबेरपूर, चित्रकूट, जनस्थान वगैरे. स्थलांच्या संबंधाने चौकशी करण्यात आणखी एक दिशा मिळते. ती आजची त्यांची स्थिती होय ही स्थले आर्यावर्तातील असल्यास ती कोठेकोठे होती हे आज दाखविता आहे पाहिजे. आज बरीच स्थळे दाखविण्यात येतात. काही काही वेळ तरी एकच स्थळ अनेक ठिकाणी दाखविण्यात येते. या प्रसंगी तेथील लोकात अभिनिवेश उत्पन्न होऊन प्रत्येक जण आपल्याजवळच्या स्थळी राम होता असे अट्टाहासाने प्रतिपादन करितो.

सरयूचा घोटाळा

पहिल्या लेखात प्रथम अयोध्या शहरासंबंधाने रामायणातील वर्णन देऊन ते वर्णन हिंदुस्थानातील अयोध्येस कस लागू पडत नाही हे दाखविले आहे. श्रृंगबेरपुराविषयी आलेली अडचण निराळ्या तऱ्हेची आहे. ही निषादपती गुह याची राजधानी गंगा व सरयू यांच्या संगमावर असलेली. सरयू ही मानस सरोवरात उगम पावलेली म्हणून तिला सरयू असे नाव मिळाले असे रामायण म्हणते मानस सरोवरातून तीन नद्या उगमे पावतात; सिंधू ही पश्चिमेकडे वहात जाऊन पुढे दक्षिणगामिनी होते. दुसरी ब्रह्मपुत्रा ही पूर्वेकडे वहात जाऊन पुढे दक्षिण दिशेने वाहून समुद्रास मिळते. तिसरी सतलज ही दक्षिणेकडे वहात जाऊन पूर्वी

अनुक्रमणिका

स्वतंत्रपणे समुद्रास मिळे. आता ती सिंधूस मिळते. अयोध्या या तिन्हीपैकी कोणत्याही नदीवर नाही. आजची अयोध्या गोग्रा नदीवर दाखविली जाते. गोग्रा हीच पूर्वीची सरयू म्हणावी तर गोग्रा हिचा उगम मानस सरोवरातून नाही. राम वनवासाला निघाल्यावर तो प्रथम लमस्त नदीवर पोचला व तेथे त्यांनी रात्र घालविली ही नदी अयोध्येपासून जवळच अगदी उथळ असावी. कारण, रामाचा रथ नावेच्या साधनाशिवाय पलीकडे गेलेला आहे. दुसरे दिवशी संध्याकाळी सीता, राम, लक्ष्मण श्रृंगबेरपुरास पोचले तेथे नावेने गंगाभागीरथी उतरून ते पायी प्रयागास गेले गोग्रा हीच सरयू असल्यास या प्रवासात मोठा हेलपाटा आहे. आज अयोध्येपासून प्रयागचे जे अंतर आहे त्याच्या निदान दुप्पट तरी अयोध्या ते गोग्रा, गंगासंगम व तेथून प्रयाग हे अंतर आहे. प्रयागहून ते चित्रकूटावर जाऊन राहिले. तेथे राहिल्याची वर्दी काढून भरत रामाच्या भेटीस आला आहे तोही श्रृंगबेरपुराहूनच आला. या वरून मूळ कथेत अयोध्या, श्रृंगबेरपूर, प्रयाग ही ठिकाणे एका सरळ रेषेत किंवा एका रस्त्यावर असावीत असे अनुमान होते. राम लंकेहून परत पुष्पक विमानाने आला व भरद्वाजाश्रमात त्याचा तक रात्र मुक्काम पडला, तेव्हा त्याने भरतास आपल्या आगमनाची खबर देण्यास हनुमानास पाठविले. त्यालाही श्रृंगबेरपुराहूनच रस्ता सांगितला आहे. यावरून तो हमेशचा रस्ता, असला पाहिजे. म्हणजे आज जी स्थाने अयोध्या, श्रृंगबेरपूर, चित्रकूट म्हणून दाखविली जातात, ती रामायणात सांगितलेली नसून रामायण कथा दुसऱ्याच प्रदेशात घडली असावी.

दण्डकारण्याचे मूळ

रामायणात सांगितलेली दुसरी ठिकाणे दण्डका, जनस्था, पंपा वगैरेविषयीही तेच अनुमान निघते. किष्किंधाही याच वर्गातील. ही ठिकाणे विंध्याच्या दक्षिणेत का उत्तरेस असा प्रश्न उद्‌भवतो. आज ही सर्व स्थाने विंध्याच्या दक्षिणेस दाखविली जातात. पण सीतेचा शोध करण्यास सुग्रीवाने वानर पाठविले त्यांतील दक्षिण दिशेस पाठविलेल्या टोळीस विंध्य पर्वत सर्व शोधण्यास सांगितले व त्याप्रमाणे त्यांनी केल्याचे वर्णन आहे यावरून सुग्रीवाची किष्किंधा विंध्याच्या उत्तरेस असली पाहिजे. हिंदुस्थानातील दाखविण्यात येणाऱ्या स्थळांशी रामायणकथा अगदीच विसंगत आहे. दक्षिण दिशेकडे पाठविलेल्या टोळीला काय काय लागेल याची यादी सुग्रीवाने दिली तीत प्रथम एक हजार शिखरांचा विंध्य शोधण्यास सांगितले. त्यानंतर नर्मदा नदी लागते. पुढे गोदावरी, कृष्णावेणी व महानदी या लागतील असे सांगितले. सातपुडा व तापी याचा विसर पडला कीं काय? का हा पर्वत व ही तापी नदीच त्या काळी नव्हती, अशा शंका येतात. मेखल व उत्कल हे प्रांत लागतील असे सागितले. हे आज ओरिसात आहेत. मेखल प्रांताची राजधानी माहिष्मती नगर नर्मदा तीरावर होते. दशार्णातील शोधण्यास सांगितले आहे. हा दशार्ण देश माळव्याच्या उत्तेस होता. यावरून किष्किंधा याच्याही उत्तरेस असली पाहिजे. यानंतर अवन्ती व आब्रुवन्ती ही नगरे पाहाण्यास सांगितले. अवन्ती ही प्रसिद्ध उज्जयनी. पुढे अनेक देश सांगितले आहेत. त्यांचा विचार करण्याची जरूर नाही. तथापि सुग्रीवाची किष्किंधा आर्यावर्तातील म्हणावयाची असल्यास ती विंध्य पर्वताच्या उत्तरेस व माळव्याच्याही उत्तरेस असली पाहिजे. पंपा तेथेच असणार जनस्थान, पंचवटी वगैरे त्याच्याही उत्तरेस पाहिजेत. यावरून आज जी या नावाची स्थाने दाखविली जातात ती खरी नाहीत. सर्व घोटाळा आहे. नद्यांची व शहरांची आणि देशांची दिलेली नावे कोणीही, कोठेही घुसडावीत असा प्रकार दिसत आहे. गोदावरीचे नाव दोन वेळ आले आहे, त्यावरून तरी पंचवटी व अनस्थान गोदेवर नव्हते असे ठरते. या एकंदर घोटाळ्यावरून रामाचे हे परिभूषण आर्यावर्तातील नसून रामकथेचे रूपांतर करणाऱ्याने परदेशी नावांना संस्कृत रूप दिले होते. राम हा अवतार ठरविला गेला व तो आर्य राजा होता हा भ्रम दृढ झाल्यावर आर्यावर्तातील नद्या, पर्वत, शहरे, देश वगैरेंची नावे पुढे अनेकांनी आत घुसडली असावीत व मूळ

अनुक्रमणिका

रामायणातील नावे गावास वगैरे ठेवली असावीत व या रीतीने राम हा या देशचा असा पुरावा केला असे अनुमान होते. असे प्रकार रामायणात आणखी बऱ्याच ठिकाणी आहेत.

अगस्ती आश्रमाची आठवण

निरनिराळ्या ऋषींच्या आश्रमात कोठे चार महिने, कोठे आठ महिने, कोठे वर्ष, कोठे दीड वर्ष असे काढून वनवासाची दहा वर्षे संपल्यावर राम पुन्हा सुतीक्ष्ण मुनीच्या आश्रमास गेला. तेथे रामाला अगस्त्य मुनीचे दर्शन घ्यावे अशी इच्छा झाली व त्याला सुतीक्ष्णाने अगस्त्याश्रमाचा मार्ग सांगितला. सुतीक्ष्ण म्हणतो,

'अयमाख्यामि ते राम यत्रागस्त्यो महामुनिः ॥ ३७ ॥
योजनान्याश्रमात्तात याहि चत्वारि वै ततः ।
दक्षिणेन महाञ्छ्रीमानगस्त्यभ्रातुराश्रमः ॥ ३८ ॥
तत्रैकां रजनीं व्युष्य प्रभाते राम गम्यताम् ।
दक्षिणां दिशमास्थाय वनखंडस्य पार्श्वतः ॥ ४१ ॥
तत्रागस्त्याश्रमपदं गत्वा योजनमंतरम् ।
रमणीये वनोद्देशे बहुपादपशोभिते" ॥ ४२ ॥

(अरण्यकाण्ड सर्ग ११)

अर्थ : 'हा मी तुला अगस्ती कोठे राहातात ते सांगतो. (३७) बा रामा, या आश्रमांतून चार योजनेपर्यंत तू दक्षिणेस जा म्हणजे अगस्ती मुनींच्या भ्रात्याचा एक मोठा भव्य आश्रम तेथे आहे. (३८) हे रामा, त्या ठिकाणी एक रात्र वास्तव्य कर आणि प्रभातकाली वनप्रदेशाच्या बाजूने दक्षिण दिशेचे अवलंबन करून जा (४१). दक्षिण दिशेस एक योजनपर्यंत प्रदेश तू चालून गेलास म्हणजे विपुल वृक्षांनी सुशोभित अशा रम्य वनप्रदेशामध्ये अगस्ती मुनींचा आश्रम तू अवलोकन करशील.' (४२) सुतीक्ष्णाने त्यांना सांगितले,

अद्यैव गमने बुद्धिं रोचयस्व महामते ॥ ४४ ॥

तू आजच जाण्याचा बेत कर. याप्रमाणे सुतीक्ष्ण मुनींचे भाषण श्रवण करून भ्रात्या लक्ष्मणासह रामाने त्याला अभिवंदन केले आणि अगस्ती मुनींकडे जाण्याचा उद्देश मनात धरून सीता व लक्ष्मण यांसह तो राम तेथून निघाला (४५)

हे बोलणे सकाळचे स्नानसंध्याधिक आन्हिक कर्म आटोपल्यावर झाले असले पाहिजे. म्हणजे आजच्या भाषेत सकाळचे आठ तरी वाजले असतील. त्याच वेळी सुतीक्ष्ण त्यांस अगस्तीकडे जाण्यास सांगतो व ते तिघे निघतात. अगस्ती भ्रात्याचा आश्रम चार योजने म्हणजे सोळा कोस दूर होता. हे अंतर त्यांना सूर्यास्तापूर्वी चालून जाणे भाग होते. कारण, रानांतून न पाहिलेल्या मार्गाने जावयाचे होते. बरे, रस्ता तरी सपाटीचा म्हणावा तर तसेही नाही.

पश्यन्वनानि चित्राणि पर्वतांश्चाभ्रसन्निभान् ।
सरांसि सारितश्चैव पथि मार्गवशानुगाम् ॥ ४६ ॥

अनुक्रमणिका

व जाता जाता मार्गामध्ये प्राप्त झालेली अद्‌भुत वने, मेघांसारखे पर्वत सरोवरे आणि नद्या पहात पहात तो मार्गाने चालला. ते अगस्तीच्या भावाच्या आश्रयास पोचले. नंतर सूर्य अस्तास गेला (श्लोक ६९). सोळा कोस अंतर इतक्या थोड्या वेळात काटणे सीतेसारख्या सुकुमार स्त्रीला कठीणच. पुढे दुसरे दिवशी राम अगस्त्याश्रमास पोचले.

येथे शंका अशी येते, की राम हा दहा वर्षेपर्यंत निरनिराळ्या ऋषींची दर्शने घेत व काही महिने प्रत्येक ठिकाणी राहात होता. सुतीक्ष्णाच्या आश्रमात तो निदान दोन वेळ आला व सुतीक्ष्णाच्या आश्रमापासून अगस्ताश्रम केवळ ५ योजने अंतरावर असता राम यापूर्वीच त्याच्या दर्शनास कसा गेला नाही?

ऋषींची नावे जी वर आली आहेत त्यापेक्षा अगस्तीची योग्यता फार मोठी होती. या अगस्त्यानें वातापि राक्षसास पोटात जिरवून टाकले होते. त्याने समुद्रात राहणाऱ्या कालकेय असुराचा नाश समुद्र पिऊन केला. नहुष राजाला 'सर्प हो' असा शाप यानेच दिला. विंध्याद्रीला पालथा घालून त्याचा उंच वाढण्याचा गर्व यानेच हरण केला. म्हणून अगस्तीचा आश्रम विंध्याच्या दक्षिणेस असला पाहिजे असे होते.

विंध्य–गर्व–परिहार

येथें कोणी शंका घेईल की, राम अवतारी अगस्ती विन्ध्याच्या उत्तरेस आश्रय करून होता व विन्ध्य वाढू लागल्याने त्यास मी परत येईपर्यंत पडून रहा असे सांगून दक्षिणेत जाऊन तिकडे आश्रम केला असावा. या शंकेस जागा नाही. रामाच्या पूर्वीच विंध्यपर्वताला अगस्तीने पालथा घातल्याची गोष्ट झाली होती. याच सर्गात अगस्तीचे वर्णन करताना राम लक्ष्मणास सांगतो,

मार्ग निरोध्दुं सततं भास्करस्याचलीत्तमः
संदेश पालयस्तस्य विन्ध्ययशैलो न वर्धते ॥ ८६ ॥

'मेरुपर्वताशी स्पर्धा करून सूर्याचा मार्ग नेहमी अडवू पाहाणारा श्रेष्ठ पर्वत विंध्याद्री त्या अगस्तिमुनीची आज्ञा परिपालन करून राहिला असल्यामुळे अद्यापि वृद्धिंगत होत नाही'

यावरून हा आश्रम रामाच्या वेळीही दक्षिणेसच असला पाहिजे. म्हणजे रामाने विंध्य पर्वत ओलांडला पाहिजे. पण तसा उल्लेख कोठेही नाही, इतकेच नव्हे तर पंचवटी, जनस्थान, किष्किंधा वगैरे सर्व जागा विन्ध्याच्या उत्तरेस होत्या. पण पंचवटी तर अगस्त्याश्रमाजवळ होती. मग अगस्त्याश्रम विंध्याच्या उत्तरेस, का दक्षिणेस ही शंका कायमच राहाते.

राम चित्रकूटावर असता तपस्वी भयभीत होऊन दुसरीकडे जाण्याकरिता उत्सुक झाले आहेत असे त्याला दिसले. (अयोध्याकांड सर्ग ११६, श्लो. १) त्याने तपास केला तेव्हा

"त्वन्निमित्तमिदं तावत्तापसान्प्रतिवर्तते ।
रक्षोभ्यः तेन संविग्ना कथयन्ति मिथः कथाः ॥ १० ॥
रावणावरजः कश्चित्खरो नामेह राक्षसः ।

अनुक्रमणिका

उत्पाट्य तापसान्सर्वाञ्जनस्थाननिवासिनः ” ॥ ११ ॥

अर्थ : ‘तुझ्यामुळे राक्षसापासून हे भय तपस्वी लोकांना प्राप्त झालेले आहे आणि त्यामुळे हे तपस्वी उद्विग्न होऊन आपआपसात बोलत आहेत. (१०) रावणाचा कोणी कनिष्ठ भ्राता खर नामक राक्षस येथे आहे. त्याने जनस्थानामध्ये राहणारे सर्व तपस्वी उध्वस्त केले. (११) त्या भीतीने आम्ही हे अरण्य सोडून जातो,’ असे ऋषी म्हणाले.

यावरून खर राक्षसाचे स्थान व जन्मस्थान ही चित्रकूटाजवळच होती असे दिसते. यावरून अगस्त्याचा आश्रमही त्याचेबरोबर विन्ध्याच्या उत्तरेस असला पाहिजे असे होते. सर्वच घोटाळा दिसून येतो.

राम दक्षिणेत आला होता असे दाखविण्याची जरूरी भासली, तेव्हा राम आल्याच्या पुराव्यादाखल ही अगस्त्याच्या भेटीची कथा घुसडून दिलेली आहे, असे म्हणणे भाग आहे सुतीक्ष्णापासून केवळ दीड दिवसाच्या वाटेवर व त्याचे अरण्यात (श्लोक ३१) अगस्त्याश्रम असता, तर राम दहा वर्षात त्याच्या दर्शनास बरेच वेळा गेला असता. पण दहा वर्षात त्यास अगस्त्याची दाद लागली नाही, हे आश्चर्य आहे. अगस्त्यदर्शनाची कथा क्षेपक आहे हे थोडासा विचार करणारास दिसून येईल. महाभारतात अगस्ती ऋषीचे अचाट सामर्थ्य वर्णिले आहे. थोर ऋषीचा आशीर्वाद रामास मिळाला पाहिजे म्हणून त्यास, त्याची पत्नी लोपामुद्रा ईस व अगस्तीच्या भावास या ठिकाणी खेचून आणले आहे व त्याच्याकडून धनु, ब्रह्मदत्त बाण व अक्षय्य भाते आणि इंद्रहत्त खड्ग यांस देवविले. येथे अगस्तीच्या पत्नीची राम-लक्ष्मण-सीता यांना भेट झाल्याचा उल्लेख नाही हे आश्चर्य आहे. अगस्तीच्या भावाचे नावही देण्याची जरूरी वाल्मीकीस किंवा ही कथा घुसडून देणारास वाटली नाही हेही दुसरे आश्चर्य आहे.

रामेसूचा इतिहास

रामायणकथा वाल्मीकीने दिव्यदृष्टीने पाहिली व नंतर लिहिली ही खुळी समजूत आमच्या भोळसट हिंदूनी उराशी बाळगल्यामुळे रामायणातील सारे घोटाळे व गैर मेळ आमच्या लोकांस सुसंबद्ध वाटत आले आहेत. विचारशक्तीला सोडल्यावर असाच प्रकार व्हावयाचा!

रामायणात सांगितलेली अयोध्या, शृंगबेरपूर, चित्रकूट, दंडका, जनस्थान वगैरे स्थळे आर्यावर्तातील नव्हेत व रामाचा इतिहासही इकडचा नव्हे असे व्यतिरेकाने, पूर्वीच्या तीन लेखांत व चालू लेखात अगस्त्याची कथा बनावट असे प्रतिपादिले आहे. मल्लादि व्यंकटरत्नम् यांच्या मताने इजिप्तचा पराक्रमी राजा रामेसू याची कथा रामायण कथेचे मूळ आहे. सदरची कथा भाषांतरित न करिता रूपांतरित झाल्याने व त्यामुळे त्या कथेला आर्यावर्ती रूप देण्याचा प्रयत्न केल्याने आमचे भावडे लोक फसले रामाला अवतार बनविल्यावर आमच्या भोळेपणाची सीमा झाली व आमचे लोक रामायणातील प्रत्येक गोष्ट खरी धरून चालू लागले.

इजिप्त हा पुराण देश आहे. तेथील सुधारणा फार प्राचीन आहे. ख्रिस्तपूर्व तेरावे शतकात रामेसू हा इजिप्तचा राजा १२९२ ते १३२५ पर्यंत होता. हा एकोणिसाव्या वंशाचा. याचे पूर्वी अठरा वंशांचे राजे होऊन गेले यांचे ६०–६२ तरी राजे झाले होते. पहिल्या वंशाचा राजा मेना ख्रि. पू. ५५०० वर्षांपूर्वी झाला. म्हणजे ही संस्कृती किती प्राचीन आहे हे दिसून येते. यांचा इतिहास बराचसा उपलब्ध आहे. मेना हा राजा फार

अनुक्रमणिका

प्राचीन काळी होऊन गेला. त्याने नाईल नदीला जोडणारे एक मोठे सरोवर खोदले हे सरोवर व नाईल नदी आणि पलीकडचा भाग यांत मेंफिस शहर होते. याचे ग्रीक भाषांतर अजादो–अजोध्या–अयोध्या. रामायणात हे शहर मनूने निर्माण केले आहे.

(पहा, रामायण बालकांड स. ५, श्लो. ६)

अयोध्या नाम नगरी तत्रासील्लोकविश्रुता
मनुना मानवेंद्रेण या पुरी निर्मिता स्वयम् ॥

मेंफिस मेनाने वसविले. मेना याचे रूपांतर मनु करणे साहजिक आहे. अयोध्येचे वर्णन रामायणातले फार अतिशयोक्तीचे आहे. तसले मोठे शहर दशरथाच्या राज्यासारख्या लहान राज्याची राजधानी असणे शक्य नाही. याउलट मेंफिस हे मोठे शहर होते असे ग्रीक व अरब इतिहासकारांनी लिहिले आहे. अयोध्येत उंटांची व गाढवांची गर्दी होती हे वर्णन हिंदुस्थानातील शहरास लागू पडत नाही. पण इजिप्तच्या अजादोंला ते बरोबर लागू पडते.

मनू व मानस सरोवर

एकोणिसाव्या वंशाचा रामेसिस हा प्रख्यात राजा होता. त्या वेळच्या चित्रलिपीत 'राम उसर' किंवा 'रामेसू' असे नाव लिहिलेले आढळते. त्याचे रूपांतर संस्कृत भाषेत राम करणे साहजिक आहे. शिवाय रम् धातूपासून राम शब्द सिद्ध करता येऊन रमविणारा, आनंद देणारा असा चांगला अर्थही निघतो.

रमन्ते योगिनोऽनन्ते सत्यानन्दे चिदात्मनि।
इति रामपदेनासौ पर आत्मभिधीयते ॥

असे वेदांती म्हणतातच.

इजिप्त हा नदीमातृक देश. मोठी नदी काय ती नाईल अथवा नील. बाकीचा देश बहुतेक वालुकामय सपाट. मधेमधे थोडे डोंगर असा हा सपाटीचा मुलूख आहे. रामायणातील वर्णनही त्याच प्रकारचे आहे. रामाला मोठे डोंगर कोठे चढावे उतरावे लागले नाहीत.

अयोध्या ही सरयू नदीवर वसली होती व सरयू मानस सरोवरात उगम पावल्याने तिला ते नाव मिळाले असे रामायण सांगते. हे वर्णन आजच्या हिंदी अयोध्येस लागू नाही असे वर दाखविलेच आहे. पण ते इजिप्तच्या अजादोंस चांगले लागते. नाईल नदीला जोडणारे असे मोठे सरोवर मेनाने खणल्याचा उल्लेख आहे. या सरोवरात नाईल नदीच्या वरच्या भागातूनच पाणी घेतले होते. यावर अजादो वसले असल्याने मानस सरोवरातून उगम पावलेली नदी असे वर्णन करता आले.

सुमंत हा दशरथाचा मंत्री होता व रथ हाकणारा तोच होता. रामायणात रथाचा उल्लेख आला की तेथे सारथी सुमंत असावयाचाच असा नियम ठरला आहे. दशरथाच्या दरबारात सारथ्यांचा इतका तुटवडा होता काय, अशी शंका येते. या दरबाराशिवाय अन्यत्र असा तुटवडा नाही. प्रत्येक क्षत्रिय वीर रथी; प्रसंगी सारथ्याचे काम करण्यास लायक असे व कृष्ण व शल्य हे अर्जुन व कर्ण यांचे सारखी झाले. इजिप्तमध्ये

अनुक्रमणिका

ता–उर्–त या नावाची देवी होती. तिच्या मूर्ती आयोध्याल्या आहेत, यावरून मंत्री व सारथी अशी दोन कामे करण्याचा भास होतो.

श्रृंगबेपूर : टीकाकारांनी या नावाचा लावलेला अर्थ कसा कुचकामी आहे हे पूर्वीच्या लेखांत दाखविण्यात आलेच आहे. तेथील राजा गृह. हा निषादांचा अधिपती होता. निषाद ही चोऱ्या, लुटालूट करणारी जात होती.

रामायणात 'श्रृंगि–बेर–पुर' असे नाव दिले आहे व टीकाकार याप्रमाणे पदे पाडतात. पण इजिप्तमध्ये सेरेन–कबीर असे नाव होते. तेथे तेल–एल–कबीर या नावाचा एक डोंगर आहेच. कबीरी लोकही लुटालूट करणारेच होते.

चित्रकूटासंबंधाने टीका पूर्वीच केलेली आहे. रामायणातील वर्णन आजच्या चित्रकूटास मुळीच लागू पडत नाही. पण इजिप्तमध्ये मात्र मेंफिसच्या जवळच जे डोंगर आहेत, त्यास चित्रकूट असे म्हणणें योग्य आहे. या डोंगरास तुराचा डोंगर म्हणतात. या डोंगरात अगदी शुभ्र दगड निघतो व त्यावर सूर्यकिरण पडल्यावर त्याचे तेज फार पडते. या डोंगरास चित्रकूट हे नाव शोभेल. तेथून जवळच दोशिरी नावाचा डोंगर आहे. तो तांबड्या दगडाचा आहे. त्यासही चित्रकूट हे नाव शोभेल पण प्रयागजवळ डोंगरच नाही व ज्याला चित्रकूट म्हणतात त्याला ते नाव मुळीच शोभत नाही.

इजिप्तचे नंदिग्रामाशी साम्य

नंदिग्रामाचीही तीच अवस्था. नंदिग्राम म्हणजे नंदीची पूजा ज्या गावी चालते ते गाव. नंदी हा शिवाचे वाहन म्हणून नंदिग्रामातील लोक शिवाचे भक्त. असे स्थान रामायणात कोठेही वर्णिलेले नाही. अयोध्येजवळ तसे स्थान असल्याचा उल्लेखही नाही, पण भरत हा नंदिग्रामात राहू लागला व ते स्थान अयोध्येजवळच होते, तेथून रामाची स्वारी मोठ्या लवाजम्याने व समारंभाने अयोध्येस गेल्याचे वर्णन आहे. हे नाव रामायण-कथेत येण्याचे कारण अयोध्या हीच इजिप्तची मेंफिस–अजादो होती व तिच्याजवळच नंदिग्राम होते, हे आहे मेंफिसला लागूनच सक्कारा म्हणून गाव होते. तेथे पवित्र नंदी ठेवीत असत व मेल्यावर त्याची ममी करून ती पुरीत.

इजिप्तचा पुराण धर्म

या नंदीचे वर्णन दिल्यास इजिप्तच्या पुराण धर्मावर थोडाबहुत प्रकाश पडेल. प्राचीन इजिप्तला त्या काळाच्या भाषेत 'की मी' म्हणत. याचा अर्थ काळी जमीन असा होता. तो देश मूळापासूनच शेतकीप्रधान असल्याने काळीचे महत्त्व तेथे मोठे असणे साहजिकच आहे. ग्रीकांनी त्याला इजिप्त हे नाव दिले. त्या देशात ठिकठिकाणी तेथील देवांची (ग्रामदेवतांची) मोठी मंदिरे असत प्रत्येक मोठ्या शहराचा रक्षणकर्ता, एकेक स्वतंत्र देव असे. काही चतुष्पाद पशू व पक्षीही पवित्र मानले जात व त्यांच्याकरिता स्वतंत्र झोपडे, घर किंवा मंदिर असे. त्यांची निगा ठेवण्यासाठी, वेळच्यावेळी अन्नपाणी देण्यासाठी, स्वतंत्र माणसे असत; धार्मिक विधी करण्यास पुजारी असत. या पवित्र पशुपक्ष्यांची सबंध जातच पवित्र मानली जात होती. त्यांतल्या एखाद्या प्राण्यास जाणून बुजून मारणारास देहांत शासन होई. बहिरी ससाणा किंवा गरुड, इबेक्स (बकरा) किंवा मांजर कोणाच्या हातून मेल्यास तो मनुष्यवधासारखा मोठा गुन्हा मानला जाई. नंदी म्हणजे

अनुक्रमणिका

बैल. हाही एक पवित्र प्राणी मानला होता व त्याची स्वतंत्र देवळे असत. यात ठेवण्यासाठी निवड मोठ्या कसोशीने होई. चंद्राच्या कोरीच्या आकाराचे चिन्ह एका कुशीस असावे लागे किंवा पांढरा त्रिकोण कपाळावर असावा; पंख पसरलेल्या उडत्या गिधाडाचे चिन्ह पाठीवर असले पाहिजे व जिभेखाली काळ्या रंगाची गाठही पाहिजे. ही सगळी चिन्हे एकाच बैलाच्या ठिकाणी मिळणे अशक्यच. यासाठी जास्तीत जास्त व जवळ जवळ पाहिजे तशी लक्षणे मिळाली म्हणजे त्यास पसंत करीत. मृत नंदीच्या शोकप्रदर्शनार्थ करण्यात येणारी कर्मे व मुंडण नवीन नंदी मिळेपर्यंत चालू राही. मिळाल्यावर त्याला निलोपोलिस येथे ४० दिवस चांगला भरपुर चारा देऊन ठेवीत. नंतर त्याला एका नाथेने सोन्याच्या मखरातून मेंफिस येथे आणीत व तेथे त्याला स्वतंत्र देवळात ठेवीत. पण मोठ्या मिरवणुकीत त्याला बाहेर काढीत, तेव्हा त्याचेबरोबर गाणाऱ्या मुलांचा घोळका असे. देवळात दोन दालने समोरच असत. कोणास शकुन पाहावयाचा असल्यास नंदी उजव्या दालनात जातो का डाव्यात जातो यावरून अनुकूल-प्रतिकूल उत्तर सांगण्यात येई. देवळाच्या मधल्या चौकात आणल्यावर त्याचे दर्शन लोकांस मिळे. नंदिच्या आईचेही यालगत दुसरे देऊळ असे.

जनस्थानाचे खरे नाव

या नंदीला धूपदीप दाखवीत, उत्तम दारूही नैवेद्यासाठी असे. बैल बळीही दिले जात. या नंदीला पंचवीस वर्षांपेक्षा जास्त ठेवीत नसत असे प्लूटार्क म्हणतो. तेवढे वय झाले, की त्याचे पुजारी त्याला एका तळ्यात बुडवीत. त्यानंतर त्याच्या डोक्यात व पायात मसाला भरून ममी करीत व नंतर सेरापियम जागी दफन करण्याचा मोठा समारंभ होई. त्या कामी मोठा खर्च करावा लागे. ही जागा सक्कारा ह्या गावी होती. ते खरे नंदिग्राम. हे मेंफिसला लागूनच होते. सन १८५० साली मारियेट याला तपास करताना नंदीचे देऊळ व त्याच्या दफनाचे सेरापियन सापडले. त्यात पुष्कळच नंदीच्या ममी मिळाल्या. अयोध्येजवळच नंदिग्राम होते असे रामायण म्हणते. हिंदी अयोध्येजवळ त्याचा थांगपत्ता नाही. इजिप्शन अजादोजवळ मात्र नंदिग्रामाचा चांगलाच पत्ता लागतो.

दंडका : या अरण्यात राम जाऊन राहिला असे रामायण म्हणते. पण दंडका कोठे होती यासंबंधाने किती घोटाळा आहे हे वर दाखविलेच आहे. चित्रकूटर्यंत दंडका होती असे एका ठिकाणी आहे. पण आजचा समज दंडका गोदावरी व कृष्णा नदीपर्यंत खाली होती. इतकेच नव्हे तर हंपीपर्यंतही होती. पुराणातील विंध्य व सातपुडा यांचे मध्ये होती, असे आहे. सात दिवस चिखलाचा पाऊस पडल्याने ती सर्व चिखलमय होती असे सांगितले आहे. मोठ्या नदीच्या मुखाजवळ असा दलदलीचा प्रदेश असतो. भागीरथीच्या मुखाजवळचे सुंदरबन प्रसिद्ध आहे. सिंधूच्या मुखाजवळही तशीच दलदल आहे. इजिप्तच्या नाईल नदीच्या मुखाजवळ अनेक फाटे होऊन तो प्रदेश कर्दममय आहे व तेथे दक्षिणेच्या अंगास वसलेल्या गावास देदेहा असे नाव होते. त्याचे संस्कृतीकरण दंडका झाले असावे असे दिसते.

हीच गोष्ट जनस्थानची. येथे खर रहात होता व त्याचे लोक ऋषीस त्रास देत हे जनस्थान दंडकारण्यात म्हणजे दलदलीच्या मुलुखात होते. रामेसीसच्या वेळी नील नदीच्या एका मुखाजवळ झोनतानित नावाचे शहर होते. त्या नावाचे संस्कृतीकरण जनस्थान असे झाले असावे. एकंदरीत, रामायणात जी गावे हिंदुस्थानात अमुक ठिकाणी होती असे ठाम सांगता येत नाही, त्याच गावचा पत्ता इजिप्तच्या भूमीत बरोबर लागतो. यावरून रामायणकथा आर्यावर्तात मुळीच घडली नसून ती इजिप्तात घडली असे मल्लादी व्यंकटरत्नम् म्हणतात हेच खरें दिसते.

महाराष्ट्र—शारदा, एप्रिल, १९३६

अनुक्रमणिका

११ रामराज्यातील प्रजानन

रामराज्यातील प्रजेसंबंधाने विशेषशी माहिती रामायणात नाही. ती मोठ्या सुखात व संतुष्ट होती एवढेच वर्णन आहे. रामाने सीतेचा त्याग केला याला कारण प्रजेचे सीतेविषयी विरुद्ध मत असे सांगितले आहे. या कामी प्रजेचे मत स्पष्ट झाले आहे. रावणाच्या घरी सीता दूषित झाली, तिची अग्निशुद्धी म्हणजे निव्वळ थोतांड, थाप अशीच त्यांची समजूत होती.

आज आमच्या सनातनी हिंदूंची समजूत त्याच्या अगदी उलट आहे. सीतादेवी ही महासाध्वी असून रावणाच्या बंदीत तिने हालात दिवस काढले व आपले पावित्र्य संभाळले. तथापि रामाची किंवा इतरांची शंका घालवण्यासाठी तिने अग्नीत प्रवेश केला; त्यातून ती जिवंत निघाली व तिच्या पवित्रपणाविषयी सर्वांची खात्री झाली वगैरे वगैरे.

या मुद्याचा वाल्मीकी रामायणाच्या आधारे जरा विस्ताराने विचार करणे बरे. रावणाचा वध झाला आणि बिभीषणाला रामाच्या आज्ञेने लंकेच्या राज्याचा अभिषेक केला गेला, त्यानंतर रामाने हनुमानाला सीतेकडे पाठविले. राम म्हणाला, 'हे सौम्या, महाराज बिभीषणाची आज्ञा घेऊन तू लंका नगरीमध्ये जा आणि सीतेला कुशल वर्तमान कळीव. हे वक्त्यांमध्ये श्रेष्ठ हनुमाना. मी व सुग्रीवासह लक्ष्मण कुशल असून रणामध्ये रावणाचा वध झाल्याचे तू सीतेला कळीव ... आणि तिचा निरोप घेऊन परत ये.' (युद्धकांड सर्ग ११२ श्लो. २४ २५, २६).

हनुमान सीतेकडे गेला. तो केवळ सांगकाम्या नव्हता. तो नावाजलेला वक्ता होता. त्याचे भाषण यु. कां. सर्ग ११३ यात श्लोक ७–१३ पर्यंत आहे. शेवटचे दोन श्लोक विशेष ध्यानात ठेवण्यासारखे आहेत. तो म्हणतो, 'रावणाच्या घरी असलेल्या तुला आता भय बाळगण्याचे कारण नाही. कारण हे लंकेचे ऐश्वर्य बिभीषणाच्या स्वाधीन केलेले आहे. तू आता विश्वासाने स्वस्थ हो; तू आता स्वतःच्या घरीच आहेस आणि तुझ्या दर्शनास उत्सुक झालेला हा आनंदित बिभीषण इकडेच येत आहे.' (१३). हर्षातिशयाने सीतेला काही बोलवेना. पण त्याने पुन्हा प्रश्न केल्यामुळे तिला आपले मौन सोडावे लागले. त्यांचे काही वेळ संभाषण झाल्यावर 'रामाकडे मी जात आहे. त्याला काही निरोप सांगावयाचा असल्यास सांग,' असे तो म्हणाला. ती म्हणाली, 'भक्तवत्सल भर्त्याच्या दर्शनाची मला इच्छा आहे.' हनुमान रामाकडे येऊन त्याने सीतेचा निरोप कळविला. तेव्हा रामाचे मुख काहीसे अश्रूंनी भरून गेले, काही वेळ त्याने विचार केला व खाली मान घालून दीर्घ सुस्कारा सोडून जवळ बसलेल्या बिभीषणाला तो म्हणाला, 'दिव्य उटी लावून व दिव्य अलंकारांनी भूषित होऊन शिरःस्नात झालेल्या सीतेला येथे घेऊन ये. विलंब लावू नको.'

त्याप्रमाणे सीतेला थोड्याच वेळात बिभीषणाने रामाकडे आणले. 'सीता आल्याचे श्रवण करताक्षणीच रामाला रोष, हर्ष व दैन्य ही सर्वच प्राप्त झाली...' 'हर्षरहित झालेल्या त्या रामाने 'सीतेला सत्वर माझ्यासमीप येऊ दे' असे बिभीषणाला सांगितले. त्याप्रमाणे सीता जवळ आली व तिने विस्मयाने, आनंदाने व प्रेमाने आपल्या पतीच्या मुखाकडे पाहिले. बाजूला नम्रपणे उभी असलेली सीता पाहून राम आपले हृद्गत बोलून दाखवू लागला. आपल्या, सुग्रीवाच्या व हनुमानाच्या पराक्रमाचे वर्णन करून आपल्या अपमानाचा आपण कसा सूड घेतला हे त्याने सांगितले. 'सीतेकडे पहात असलेल्या रामाचे हृदय लोकापवादाच्या भीतीने द्विधा झाले.' तो म्हणाला, 'रावणाचा वध करून मी माझ्या अपमानाचे परिमार्जन केले आहे व तुला परत मिळविली आहे. तुझे कल्याण असो. माझ्या मित्राच्या साह्याने जो या मोठ्या

अनुक्रमणिका

संग्रमाचा मी खटाटोप केला, तो तुझ्याकरिता केलेला नाही. अपवाद टाळून आपली कीर्ती राखावी, याकरिता व आपल्या प्रख्यात वंशाला आलेला कमीपणा नाहीसा करण्यासाठी मी हे केले. तुझ्या वर्तनासंबंधी संदेह उत्पन्न झाल्यामुळे तू माझ्या दृष्टीला अतिशय प्रतिकूल झाली आहेस. म्हणून हे जानकी, मी तुला अनुज्ञा देतो, तू आज वाटेल तिकडे चालती हो; तुला दहा दिशा मोकळ्या आहेत. तुझ्याशी मला काही कर्तव्य नाही. पुष्कळ दिवसांपासून ही आपणावर प्रेम करणारी आहे, असा लोभ मनामध्ये करून कोण बरे कुलीन व तेजस्वी पुरुष परगृही राहिलेल्या स्त्रीचा स्वीकार करणार आहे? रावणाच्या अंकाचा स्पर्श झालेल्या आणि त्याने दुष्ट नजर ठेवलेल्या तुझा, कुलीन म्हणवणारा मी कसा बरे स्वीकार करू? ज्या हेतूने मी तुला जिंकले तो माझा हेतू सिद्ध झाला. तुझ्या ठायी माझ्या मनाची आसक्ती नाही. तू वाटेल तिकडे चालती हो. हे भद्रे, मनाचा निश्चय करून ही गोष्ट मी तुला सांगितली आहे. आता तुझी इच्छा असल्यास लक्ष्मणापाशी अथवा भरतापाशी तू खुशाल रहा सीते, शत्रुघ्नावर अथवा सुग्रीवावर, बिभीषण राक्षसावर किंवा तुला सुख लागेल तेथे आपले चित्त ठेव. आपल्या घरी राहिलेल्या दिव्य कांतियुक्त व मनोहर अशा तुला पाहून रावणाने एक क्षणही तुझी उपेक्षा केली नसावी.' (युद्धकांड सर्ग ११५, श्लोक १३ ते २४).

हे ऐकून सीता मोठ्याने रडू लागली, तिला मोठी लाज वाटली. पण आपली आसवे पुसून ती तेंजस्वी सीता रामाला म्हणाली, 'यःकश्चित् पुरुष एखाद्या स्त्रीला अनुलक्षून भाषण करतो त्याप्रमाणे अशाप्रकारचे हे कर्णकटु व अयोग्य भाषण मला अनुलक्षून आपण करता? आपणाला जशी मी वाटते तशी मी नाही याचा प्रत्यय आपणास येईल हे मी आपणास आपल्या पातिव्रत्यरूप सदाचरणाच्या शपथेवर सांगत आहे. सामान्य स्त्रीचे आचरण पाहून संपूर्ण स्त्रीजातीविषयी आपण शंका घेत आहात. पराधीन झाल्यामुळे मला परपुरुषाचा जो स्पर्श झाला, तो माझ्या इच्छेविरुद्ध होता. दुर्दैवामुळे ती गोष्ट घडून आली. माझ्या आधीन असलेले माझे हृदय ते तर आपल्या ठिकाणीच रत आहे; परंतु शरीर माझ्या स्वाधीन नसल्याने मी पराधीन स्त्री काय करणार बरे? परस्परांवर प्रेम वृद्धिंगत झाले असून आणि पुष्कळ दिवसपर्यंत दोघे एकत्र राहिलो असूनही माझी परीक्षा आपणास झाली नसेल तर मात्र मी कायमचीच बुडाले; 'मी तुझा त्याग केला आहे' असा निरोप तुम्ही हनुमानाबरोबर पाठवला असता तर मी प्राणत्याग केला असता व आपणास जीव धोक्यात घालून युद्ध करण्याचे श्रम पडले नसते; व आपल्या मित्रांसही क्लेश झाले नसते. बाल्यावस्थेमध्ये ज्या उद्देशाने माझे पाणिग्रहण केले त्याचीही आपण पर्वा केली नाही त्याचप्रमाणे माझी भक्ती व शील या सर्वाकडेच आपण पाठ केली आहे.' (यु. कां. सर्ग ११६, श्लो. १ ते १५)

अश्रूंनी कंठ दाटून आल्यामुळे अशा रीतीने रडत रडत भाषण करणारी सीता चिंताक्रांत झालेल्या दीन लक्ष्मणाला म्हणाली, 'हे लक्ष्मणा, माझ्यासाठी चिता तयार कर. चिता हे या संकटाचे औषध आहे मिथ्यापवादाने ग्रस्त झालेल्या मला जिवंत राहण्याची इच्छा नाही. गुणांनी संतुष्ट न झालेल्या भर्त्याने लोकसमाजामध्ये त्याग केलेल्या मला आता मरणाचेच अवलंबन करणे योग्य असल्यामुळे मी अग्नीमध्ये प्रवेश करते. (यु. कां. सर्ग ११६, श्लो. १७ ते १९)

तिचा जीव देण्याचा निश्चय झाला होता. अग्नीतून जिवंत बाहेर येणे तिला शक्य नव्हते असे या उद्‌गारांवरून दिसते.

लक्ष्मणाला राग येऊन त्याने रामाकडे पाहिले. पण रामाचे मन जाणून त्याने मुकाट्याने चिता रचली. सीतेने रामाला प्रदक्षिणा घालून दैवतांना व ब्राह्मणांना (हे राक्षसांतील असले पाहिजेत) नमन केले व अग्नीजवळ जाऊन म्हणाली,

अनुक्रमणिका

'माझे चित्त जर रामापासून केव्हाही दूर जाणारे नसेल तर जगत्साक्षी अग्नी माझे सर्व प्रकारे रक्षण करील. (२५) माझे वर्तन शुद्ध असून राम मला दूषित समजत आहे हे खरे असेल तर लोकसाक्षी अग्नी माझे सर्व प्रकारे रक्षण करील' (२६) असे म्हणून निर्भय होऊन तिने अग्निप्रवेश केला. बाल व वृद्ध यांनी गजबजलेला मोठा समाज, सर्व प्राणी, ऋषी, देव आणि गंधर्व, दानव, त्रैलोक्य यांनी तिला अग्निप्रवेश करताना पाहिले असे वर्णन केले आहे. स्त्रिया आक्रोश करू लागल्या व हायहाय असा फारच मोठा ध्वनी राक्षस व वानर यांच्यामध्ये उसळला (३४).

पुढील ११७ सर्ग रामाकडे देव येऊन स्तुती करतात अशा विषयाचा अवतार—कल्पनेने भरलेला प्रक्षिप्त असला पाहिजे. त्याचा विचार करण्याची जरूर नाही. ११८ वा सर्ग तसाच आहे. त्यात 'अग्नी सीतेला मांडीवर घेऊन पडला.' (श्लो, १.) ती चिता उडवून देऊन जनककन्या सीतेला घेऊन मूर्तिमान अग्नी तेथून सत्वर बाहेर निघाला. (२) पुन्हा चौथ्या श्लोकात, त्या सीतेला मांडीवर घेऊन अग्नीने रामाला सीता शुद्ध असल्याविषयी निर्वाळा दिला व 'शुद्ध अंतःकरणाने युक्त असलेल्या या निष्पाप सीतेचा तू स्वीकार कर. हिला उद्देशून तू काही एक भाषण करू नको अशी माझी तुला आज्ञा आहे' असेही बजावले. '(श्लो.५—१०) नंतर राम त्या अग्नीला म्हणाला, 'सर्व लोकांसमक्ष सीतेची शुद्धी होणे अवश्य होते. कारण ही शुभ सीता रावणाच्या अंतःपुरात पुष्कळ दिवस राहिलेली आहे. (१३) तस्मात् हिची शुद्धी न करिता जर मी हिचा स्वीकार केला असता तर दशरथपुत्र राम विषयलंपट व बालिश आहे असे मला लोक म्हणाले असते.' (१४) सीता शुद्ध आहे व रावणाच्या हातून ती दूषित होणे अशक्य होते असे प्रतिपादून राम म्हणतो, 'विचारी पुरुषाच्या हातून ज्याप्रमाणे कीर्तीचा त्याग होणे शक्य नाही, त्याप्रमाणे त्रैलोक्यामध्ये शुद्ध ठरलेल्या मिथिलेच्या राजकन्या जानकीचा त्याग माझ्या हातून होणे शक्य नाही. (१९) तुम्हा सर्वांच्या हितकारक उपदेशाप्रमाणे मला अवश्य वागले पाहिजे. तुम्ही जगताचे अधिपती असून माझ्यावर प्रेम करणारे आहात आणि हिताची गोष्ट मला सांगत आहात.' (२०) पुढील ११९ व्या सर्गात स्वर्गस्थ पित्याची म्हणजे दशरथाची भेट झाली व त्याने रामलक्ष्मणास मांडीवर घेऊन आलिंगन दिले; ही कथा कितपत विश्वसनीय आहे याचा विचार वाचकांनी करावा.

सीता अग्नीतून जिवंत बाहेर आली व निष्पाप आहे असे अग्नीने व इतर देवांनी रामाला सांगितले; ही गोष्ट बिभीषणादी सर्व राक्षस, सुग्रीवादी सर्व वानर, राम आणि लक्ष्मण यांच्यासमक्ष घडली व या सर्वांस रामाने आपल्या राज्याभिषेकाकरिता पुष्पक विमानातून अयोध्येस आणले.

ही सर्व मंडळी रामाचा पाहुणचार खात अयोध्येत दोन महिने राहिली होती. रावणाबरोबरचे युद्ध व रामलक्ष्मणादी वीरांचे पराक्रम हा लोकात चालू विषय होता. वानर, राक्षस वगैरे प्रत्यक्ष पहाणाऱ्याच्या तोंडून युद्ध व सीतेचे अग्निदिव्य या गोष्टी सर्व अयोध्यावासी जनांनी पुनःन्हा ऐकल्या असल्या पाहिजेत. भाटांनी त्यावर कवने रचून ती दरबारात व इतरत्र गायिली असावीत आजच्या भाषेत बोलावयाचे झाल्यास ठिकठिकाणी मोठमोठ्या सभा भरवून त्यात ही युद्धकथा सीताशुद्धी अनेक वानर व राक्षस वक्त्यांनी जीव तोडून सांगितली असेल, (त्या काळी वर्तमानपत्रे असल्यास) अनेक संपादकांनी व बातमीदारांनी त्यांच्या भेटी घेऊन त्यांच्या मुलाखती भपकेदार वर्णनासह देऊन आपल्या पत्राचे अनेक रकाने भरून काढून, रामाच्या सर्व प्रजेला या बाबतीत सुशिक्षित केले असेल.

पण हे सर्व प्रयत्न पालथ्या घागरीवर पाणी ओतल्यासारखे निष्फळ झाले असे म्हणावे लागते. पालथ्या घागरीत पाण्याचा थेंबही शिरत नाही त्याप्रमाणे अयोध्यावासी जनांच्या हृदयात निदान सीतेच्या

अनुक्रमणिका

पवित्रपंणाविषयीची खात्री शिरली नाही, म्हणजे त्यांना ती विश्वसनीय मुळीच वाटली नाही. सीता ही दूषित झाली आहे अशीच त्यांची समजूत झाली असल्याने वानर, राक्षस आणि खुद्द रामलक्ष्मण हे आम्हास बनवू पहात आहेत. यांच्या सांगण्यावर विश्वास ठेवणे म्हणजे आम्हास काही अक्कल नाही, शक्य अशक्य जाणण्याची पात्रता नाही असे जाहीर करण्यासारखेच आहे असे ते परस्परांशी बोलत असावेत. चिता रचून पेटवलेल्या अग्नीत पुरुष किंवा स्त्री शिरल्यास ती सहीसलामत बाहेर येणे, अग्निदेव प्रकट होऊन त्याने सीतेला रामाच्या हवाली करणे, महादेव, इंद्र, ब्रह्मदेव वगैरे देव येऊन त्यांनी सीता शुद्ध असल्याची खात्री करणे व शेवटी १४ वर्षांपूर्वी मयत झालेला दशरथ पार्थिव देहाने येऊन रामलक्ष्मणास मांडीवर घेऊन सीतेविषयी त्यांनी संशय घेऊ नये असे बजावणे या गोष्टी अशक्य कोटीतील आहेत, यावर विश्वास ठेवणाऱ्याच्या ठिकाणी सद्सद्विवेकबुद्धी नाही असे म्हणणे भाग आहे अशी रामाच्या प्रजेची खात्री झाली होती असे पुढील हकीगतीवरून दिसते.

रामराज्य फार उत्तम. त्याची प्रजा धर्मनिष्ठ व राजावर संतुष्ट अशी होती अशी वार्ता भरतानेच रामास सांगितल्याची कथा उत्तरकांड सर्ग ४१ याच्यात आहे. पुढील श्लोक पहा. भरत म्हणतो, 'हे वीरा, तू राज्य करू लागल्यापासून अमानुष प्राणीही वारंवार वाचायुक्त असल्याचे दृष्टोत्पत्तीस येते (१८) हा पूर्ण महिना लोटून गेला तरी मर्त्य जनांना आरोग्य असून, हे राघवा, जीर्ण झालेल्या प्राण्यांनाही मृत्यू येत नाही (१९) हे राजा, स्त्रियांना निरोगी मुले होत आहेत, मानव दृष्ट व पुष्ट शरीराने युक्त आहेत आणि नगरवासी जनांना अधिकच हर्ष झाला आहे (२०). अमृततुल्य उदक पाडणारा पर्जन्य वेळेवर दृष्टी करीत आहे; हे वायूही सुखस्पर्शाने युक्त व कल्याणकारक वहात आहेत (२१). त्याचप्रमाणे हे राजा, नगरांतील व देशांतील लोक 'अशा प्रकारचा राजा आम्हाला नेहमी असो' असे नगरामध्ये बोलत आहेत' (२२).

त्याच दिवशी अंतःपुरात जाऊन सोतेचे डोहाळे पुरविण्यासाठी 'उद्या तुला वनात पाठवतो' असे आश्वासन देऊन राम आपल्या सुहृदांसह मधल्या चौकात गेला. तेथे बसला असता ते खुषमस्करे त्यास नानाप्रकारच्या गोष्टी व बातम्या सांगत असत. एकंदरीत दहा खुषमस्कऱ्यांची नावे दिली आहेत. त्यांतील भद्राला रामाने विचारले. 'हे भद्रा, नगरामध्ये व देशामध्ये काय चालले आहे? नगरातील व देशातील लोक माझ्यासंबधी काय काय बोलत आहेत? आणि त्याचप्रमाणे सीता, भरत, लक्ष्मण, शत्रुघ्न व माता कैकेयी यांच्यासंबंधानेही लोक काय बोलत असतात? कारण राजे वनांमध्ये असोत अथवा राज्यावर असोत; लोक त्यांना काही ना काही नावे ठेवीत असतातच.' (उत्तरकांड सर्ग ४३, श्लो. ४–५).

यावर भद्र हात जोडून म्हणाला, 'हे राजा, नगरवासी जनांच्या गोष्टी चांगल्या चाललेल्या असतात. रावणाच्या वधामुळे प्राप्त झालेला विजय तर नगरातील लोक फारच वाखाणीत आहेत.' यावर जास्त आग्रह करून राम म्हणाला, 'तर मग जे काही असेल ते सर्व तू काही एक शिल्लक न ठेवता मला इत्थंभूत कथन कर (९). बरीवाईट भाषणे माझ्यासंबंधाने नगरवासी लोक काय काय करीत असतात? तू काही एक भीती मनामध्ये न बाळगता कुटाळ लोक देशामध्ये माझ्याबद्दल काय बोलत असतात ते निर्भयपणे व निःशंकपणे कथन कर.' (११). भद्र हात जोडून म्हणाला, 'हे राजा, चवाठे, बाजार, रस्ते, वने आणि उपवने यांमध्ये लोक तुझ्यासंबंधाने जे काही बरेवाईट बोलत असतात ते ऐक (१३). 'समुद्रावर सेतुबंधन हे दुष्कर कृत्य रामाने केले. हे कृत्य देवदानवांच्या हातूनही घडल्याचे कोणत्याही वृद्ध लोकांच्यासुद्धा ऐकण्यात नाही (१४) अजिंक्य रावणाचा, सैन्य व वाहने यांसह वध करून राक्षसांसहवर्तमान ऋक्ष व वानर रामाने स्वाधीन करून घेतले (१५). संग्रामामध्ये रावणाचा वध करून सीता घेतल्यानंतर क्रोध मागे सारून त्याने तिला पुनरपि घरी आणिले (१६).

अनुक्रमणिका

परंतु सीतेच्या समागमापासून त्या रामाच्या मनाला काय बरे सुख वाटत असेल? जिला पूर्वी रावणाने बलात्काराने अंकावर घेऊन हरण करून नेले (१७), पूर्वी लंकेत नेल्यानंतर अशोक वनामध्ये नेऊन ठेविले असता जी राक्षसांच्या आधीन होती, तिला राम कसे दूषण देत नाही? (१८) आता स्त्रियांसंबंधाने असला प्रकार आम्हालाही सहन होऊ लागेल. कारण, जसे राजा करू लागतो तसे लोकही त्याला अनुसरून वागू लागतात. (१९) अशी नानाप्रकारची भाषणे, हे राजा, नागरिक जन सर्व नगरामध्ये, व देशामध्ये तुझ्यासंबंधाने करीत असतात.' (२०) हे ऐकून राम अतिशय कष्टी झाला त त्याने बाकीच्या मित्रांस विचारले त्या सर्वांनींच भद्र सांगत आहे याप्रमाणे हे निःसंशय खरे आहे असे सांगितले.

पुढे रामाने सीतेचा त्याग केला.

रावणाच्या घरी सीता राहिल्याने ती दूषित झाली. तिला व्यभिचार घडला अशीच समजूत अयोध्यावासी नागरिकांची व राज्यातील रयतेची झाली हाती. सीतेने अग्नीत शिरून दिव्य केले. साक्षात अग्नीने ती पवित्र आहे अशी सर्वांसमक्ष रामाची खात्री केली, वगैरे कथांवर त्यांच्यापैकी कोणीही भरंवसा ठेवला नाही. अग्नीत शिरलेले माणूस पवित्र असो किंवा अपवित्र असो, ते जिवंतपणी बाहेर येणे संभवनीय नाही. यासाठी सीता तशी सुरक्षित अग्नीतून निघाली ही कथा केवळ थोतांड आहे, असे त्या लोकांनी ठरविले. यावरून रामाची प्रजा ही विचार करणारी होती आजच्या आमच्या लोकासारखी बनावट भाकडकथांवर डोळे झांकून विश्वास ठेवणारी नव्हती असे म्हणणे भाग आहे.

सीतेने अग्निदिव्य केले ते आम्ही पाहिले असे सांगणारे साक्षीदार पुष्कळ होते व त्यांनी जीव तोडून कितीही सांगितले, तरी त्यांच्यावर विश्वास त्या काळच्या लोकांनी ठेवलेला नाही. आजचे आम्ही हिंदू या अद्‌भुत कथेवर विचारशक्तीला रजा देऊन विश्वास ठेवीत आहोत.

आजच्या आम्हा आर्यांची विचारशक्ती नाहीशी होण्याचे कारण काय याचा विचार जरूर झाला पाहिजे जी गोष्ट रामाच्या वेळी खोटी ठरली; ती रामायणात लिहिली म्हणूनच खरी असली पाहिजे असे आजचे हिंदू मानीत आहेत, हा मोठा चमत्कार आहे. या स्थितीला उन्नती म्हणावी की अवनती म्हणावी हे विचार करणारांस सहज समजेल. आमच्यात अंधश्रद्धेचे पीक म्हणा किंवा खूळ म्हणा फार माजले आहे. भरताने रामराज्याचा वर्णन केलेला उतारा एक्केचाळीसाव्या सर्गातील दिला आहे. त्यात १८ व्या श्लोकात 'तू राज्य करू लागल्यापासून अमानुष प्राणीही वारंवार वाचायुक्त असल्याचे दृष्टोत्पत्तीस येते,' असे एक वाक्य आहे. पोपटासारखे पक्षी वाचायुक्त आजही आहेत. पण इतरांना मानवी वाचा फुटली असे सांगणारा सांगो, पण ऐकणाऱ्यावर विचार करण्याची जबाबदारी आहे. परंतु रामायणाचे भाषांतरकार लेलेशास्त्री हे या श्लोकावर पुढील टीप देतात. 'एकाद्या विशिष्ट राजाच्या पुण्यप्रभावामुळे अमानुष प्राण्यांना मनुष्य वाचा पुरातनकालीही प्राप्त होती असे यावरून दिसते.' भोळा बिचारा लेलेशास्त्री! रामायणात लिहिलेले खोटे कसे असेल? ते खरे असलेच पाहिजे, अशी भावडी समजूत करून घेऊन बसलेला! आज शेकडो वर्षे अशीच समजूत आम्हा हिंदूंची होऊन बसली आहे व त्यामुळे आम्ही आमची विचारशक्ती गमावून बसलो आहोत. अमानुष प्राणी रामाच्या वेळी बोलत होते त्यावर ज्यांचा विश्वास बसतो त्यांना साधुसंतांच्या नावावर दडपून दिलेले चमत्कार खरेच वाटतात. ज्ञानोबाने रेड्याच्या तोंडून वेद बोलवले, ही गोष्ट खोटी म्हणण्याची हिंमत त्यांच्या अंगी नसते. कोणत्याही विद्यमान किंवा मृत साधूच्या साधक चेल्यांनी सांगितलेले बनावट चमत्कार त्यांना खरे वाटतात व ते साधूंच्या भजनी लागतात. बुवाबाजीचे मूळ या आजच्या हिंदू लोकांच्या विचारशक्तीच्या ऱ्हासात आहे. आमचे हरिदास व पुराणिक धार्मिक भोळेपणा वाढवण्याचे काम

अनुक्रमणिका

सतत करीत असतात व आम्ही त्यांना उत्तेजन देत आहोत. असा भोळेपणा वाढत राहील तोपर्यंत बुवाबाजी कायम रहाणारच. एकाद्यादुसऱ्या साधुची बरीवाईट कृत्ये प्रसिद्ध केल्याने कदाचित् त्या व्यक्तीचे महत्त्व कमी होईल, पण आमचा भोळेपणा कायम आहे व तो वाढवण्याचे पद्धतशीर प्रयत्न हरिदास व पुराणिक यांच्या हातून कळत वा न कळत होत आहेत, तोपर्यंत बुवाबाजीला आळा पडणे अशक्य आहे.

अरबी भाषेतील सुरस गोष्टी व रामायणातील गोष्टी या अद्‌भुततेत सारख्या आहेत पण पहिल्या काल्पनिक आहेत हे सर्वांस माहीत असते. म्हणून त्यांच्या वाचनाने कल्पनाशक्ती वाढते हा फायदाच आहे. विशेषेकरून लहान वयाच्या मुलांस या गोष्टी सांगणे चांगले. पण रामायणातील कथा अज्ञानवर्धक आहेत. त्यांच्या पठणाने बालांची, तरुणांची आणि वृद्धांची विचारशक्ती कुंठित होते. हा विचारशक्तीचा ऱ्हास केवळ धार्मिक विषयापुरता मर्यादित रहात नाही इतर व्यावहारिक विषयांतही आमचा समाज मागे पडला आहे. यासाठी विचार शक्तीला आवळून टाकणाऱ्या बेड्या तोडून टाकण्याचे काम आमच्या विद्वानांनी हाती घ्यावे. हे देशसेवेचे मोठेच काम आहे. किर्लोस्कर, एप्रिल, १९३६

अनुक्रमणिका

१२ दाशरथी राम अनार्य होता?

रामायणकथा आर्यावर्तात मुळीच घडली नाही आणि दक्षिण हिंदुस्थानात तर नाहीच नाही, असे रामायणकथेत आलेल्या स्थळांचा विचार करून मागील काही लेखांत दाखविले. त्यांत आलेल्या व्यक्तींच्या नावावरूनही विचार करता येईल. पण त्यावरून निःसंशय अनुमान काढणे कठीण. तीच तीच नावे थोड्याशा फरकाने निरनिराळ्या देशात सापडणे साहजिक आहे. तेव्हा तो प्रयत्न सोडून देऊ

परंतु संस्कृती, विचार, चालीरीती, कायदे यांची गोष्ट निराळी आहे. ज्याची त्याची संस्कृती, आचारविचार, कायदे म्हणजे स्मृतीत दिलेले नियम हे ठराविक असतात. आमच्या आर्य संस्कृतीहून पाश्चात्य संस्कृती भिन्न आहे त्यामुळे आमच्या व त्यांच्या आचारविचारांतही भिन्नपणा असतो.

दोन ठिकाणच्या आचारांत व विचारांत सर्व बाबतीत फरक असतोच असे नाही. काही थोड्या ठळक बाबतीतच असतो. या फरकावरून दोन देशांचा भिन्नपणा ओळखावयाचा आहे.

पहिले उदाहरण वालीवधाचे आहे. वाली व राम यांचे वैर नसता, वालीने रामाचा कसलाही अपराध केला नसता व वाली सुग्रीवाशी द्वंद्वयुद्ध करीत असता रामाने वालीला बाणाने मारावे हे कृत्य अगदी अधर्म्य आहे. मन्वादि स्मृतिकारानी अशा युद्धाचा निषेधच केला आहे.

(मनु—अध्याय ७, श्लोक ९२)

न सुप्तं न विसन्नाहं न नग्नं न निरायुधम्
नायुध्यमानं पश्यन्त न परेण समायतम् ॥

अर्थ : निजलेल्याला, कवच काढलेल्याला, नग्नाला, शस्त्रहीनाला, न लढणाऱ्याला व दुसऱ्याशी युद्ध करणाऱ्याला मारू नये. अशा काही गोष्टी न करण्याच्या सांगितल्यावर मनु म्हणतो,

एषो ऽ नुपस्कृतः प्रोक्तो योधधर्मः सनातनः ।
अस्माद्धर्मान्न च्यवेत क्षत्रियो घ्नन् रणे रिपून् ॥ ९८ ॥

वाली सुग्रीवाबरोबर लढत असता रामाने ही मनूची आज्ञा मोडली. राम आर्यक्षत्रिय असता तर स्मृतीप्रमाणे युद्धधर्म बरोबर पाळता. कारण मनूने सांगितल्याप्रमाणेच इतर स्मृतींचा अभिप्राय आहे. (पहा याज्ञवल्क्य स्मृति अ. १ श्लो ३२६). पण या स्मृतिवचनांचा अनादर रामासारख्याने केला. त्याचे कारण तो आर्यसंस्कृतीचा नसल्याने त्याला हा क्षात्रधर्मच मान्य नव्हता हे आहे. कोणीकडून तरी आपला कावा साधावयाचा! Everything is fair in love and war अशी प्राश्चात्यांची नीती आहे. तिला अनुसरणारा राम अनार्यच असला पाहिजे या असे कृतीवरून दिसते.

या कृत्याबद्दल वालीने त्यास दोष दिलाच. तो म्हणाला :

सतां वेषधरं पापं प्रच्छन्नमिव पावकम् ।
नाहं त्वामाभिजानामि धर्मच्छद्माभिसंवृतम् ॥

अनुक्रमणिका

विषये या पुरे वा ते यदा पापं करोम्यहम् ।
न च त्वामयजाने ऽ हं केस्मात्त्वं हंस्यकिल्विषम् ॥
मामिहा प्रतियुध्यन्तमन्येन च समागतम् ॥

(कि. १७ श्लो. २३–२५).

सीतेला दुसरीकडे जाण्याचा उपदेश

अर्थ : सज्जनांचा वेष धरणारा तू वस्तुतः पापी असून झाकलेल्या अग्नीसारखा धर्माचे सोंग घेतले आहेस. तुझ्या देशात किंवा नगरात मी जर काही पाप केले नाही; आणि तुझी अवज्ञा केली नाही तर तू मजसारख्या निरपराध्याचा का वध केलास? तुझ्याशी युद्ध न करिता दुसऱ्यांशी भिडलो असता माझा वध का केलास? इत्यादी.

या भाषणाला १८ व्या सर्गाच्या पहिल्या श्लोकात वाल्मीकीने 'दिसण्यात कठोर परंतु हितावह, विनययुक्त आणि धर्म व अर्थ यांना धरून असणारे' असे म्हटले आहे. याला रामाने दिलेले उत्तर त्याला न शोभण्यासारखे आहे. त्यात असत्य भरपूर आहे. पहा, राम म्हणतो, (सर्ग १८) 'पर्वत, वने व अरण्य यासह इक्ष्वाकु वंशजनांना ही भूमि दिलेली आहे व म्हणून पशू, पक्षी व मनुष्ये यांच्यावर अनुग्रह आणि त्यांचा निग्रह करण्याचा अधिकारही त्याने दिलेला आहे. या पृथ्वीचे पालन भरत करीत आहे व त्याने धर्मरक्षणार्थ आमची व इतर राजांची योजना केलेली आहे. मग रामाच्या पादुका नेऊन सिंहासनावर स्थापून राम प्रतिनिधी म्हणून भरत राज्य करीत होता हे कथन खोटे असले पाहिजे. इतर राजे जसे जनक, केकयाचा अश्वपती व लंकेचा रावण हेही भरतांच्या व त्याच्या पालन भरत करीत आहे व त्याने धर्मरक्षणार्थ आमची व इतर राजांची योजना केलेली आहे. 'मग रामाच्या पादुका नेऊन त्या सिंहासनावर स्थापून रामप्रतिनिधी म्हणून भरत राज्य करीत होता हे कथन खोटे असले पाहिजे. इतर राजे जनक, केकयाचा अश्वपती व लंकेचा रावण हेही भरताच्या व त्याच्यापूर्वी दशरथाच्या आज्ञेत होते असे म्हणावयाचे काय? पुढील नववे व दहावे श्लोकांत सर्व पृथ्वीचा राजा भरत आहे असे खोटेच सांगितले आहे. आम्हीही धर्मवृद्धीची इच्छा धरून संपूर्ण पृथ्वीवर संचार करीत आहो, हे विधान धादांत खोटे आहे. वालीचे मोठे पाप म्हणजे त्याने धाकट्या भावाची बायको बळकावली हे. भावाच्या बायकोवर त्या वेळी हक्कच होता. ते कृत्य अधर्म्य नव्हते, हे खुद्द देवगुरू ब्रम्हस्पतीच्या ममतेशी झालेल्या संगावरून सिद्ध आहे. इतकेच नव्हे तर ही गोष्ट खुद्द रामालाही मान्य होती. वनवासाला जाण्यापूर्वी सीतेचे सांत्वन करताना, 'भरताच्या मर्जीप्रमाणे वागून त्याच्याजवळ राहणे तुला शक्य आहे.' (अयोध्याकांड, सर्ग २६ श्लो. २६) असे त्याने म्हटले. यात स्पष्टता नाही, पण कसे वागावे हे ध्वनित केले आहे. युद्धकांडात ११५ वे सर्गांत रामाने सीतेला स्पष्ट सांगितले आहे. रावणाकडे राहिल्याने ती दूषित झाली म्हणून राम म्हणतो –

'यदर्थं निर्जिता मे त्वं सोयमासादितो मया ।
नास्ति मे त्वय्यभिष्व गो यथेष्टं गम्यतामिति ॥ २१ ॥
तदद्य व्याहृतं भद्रे मयैतत्कृतबुद्धिना ।
लक्ष्मणे वाथ भरते कुरु बुद्धिं यथासुखम् ॥ २२ ॥
शत्रुघ्ने वाथ सुग्रीवे राक्षसे वा बिभीषणे ।
निवेशय मनः सीते यथा वा सुखमात्मनः ॥ २३ ॥

अनुक्रमणिका

अर्थ : 'ज्याच्याकरिता मी तुला जिंकिले तो हा माझा उद्देश सिद्धीस गेला आहे. आता तुझ्या मनाची आसक्ती नाही; तू वाटेल तिकडे चालती हो. (२१) भद्रे, मनाचा निश्चय करून ही गोष्ट मी तुला सांगितली आहे. आता तुझी इच्छा असल्यास लक्ष्मणापाशी किंवा भरतापाशी तू खुशाल रहा. (२२) हे सीते, शत्रुघ्नाजवळ, सुग्रीवाजवळ, बिभीषण राक्षसाजवळ किंवा तुला नीट वाटेल तेथे राहण्याचे तू मनामध्ये आण.' (२३)

रामाच्या बोलण्याचा आशय स्पष्ट आहे. लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न हे रामाचे भाऊच, तेव्हा त्यांची नावे प्रथम घेतली. सुग्रीवाबरोबर अग्निसाक्षिक सख्य केल्याने तो भाऊ झाला व अशा पद्धतीने झालेल्या भावांत एकमेकांची बायको उपभोगण्याचा हक्क येत असे. (पहा, उत्तरकांड सर्ग ३४, श्लो. ४० । ४१ । ४२).

जुन्या काळची जुनी रीत

'सोऽहं दृष्टबलस्तुभ्यं इच्छामि हरिपुंगव ।
त्वयासह चिर सख्यं सुस्निग्धं पावकाग्रतः ॥ ४० ॥
दाराः पुत्राः पुर राष्ट्रं भोगाच्छादनभोजनन् ।
सर्वमेवाविभक्तं नौ भविष्यति हरीश्वर' ॥ ४१ ॥
ततः प्रज्ज्वालयित्वाग्निं तावुभौ हरिराक्षसौ ।
भ्रातृत्वमुपसंपन्नौ परिष्वज्य परस्परम् ॥ ४२ ॥

अर्थ : 'हे वानरश्रेष्ठ, प्रसिद्ध सामर्थ्य ज्याचे आहे असा मी अग्नीसमक्ष तुझ्याशी अत्यंत प्रेमयुक्त असे चिरकाल सख्य करण्याची इच्छा करीत आहे. (४०) हे वानराधिपते, धर्मपत्न्या, पुत्र, नगर, राष्ट्र, भोग्य वस्तू, आच्छादन, भोजन, हे आपले समाईक असो. (४१) नंतर ते उभयता वानरराक्षस अग्नी पेटवून परस्पराला आलिंगून भ्राते बनले. (४२) नंतर रावणाने एक महिना वालीचा पाहुणचार सुग्रीवाप्रमाणे राहून घेतला असे ४४ वे श्लोकात सांगितले आहे. रामाने सुग्रीवापाशी अग्नी पेटवून सख्य केले आहे. त्यालाही हा विधी व याच्या अंतर्गत कल्पना माहीत होत्या. यावरून मानीव, कृत्रिम भावांमध्ये धर्मपत्न्यांचा उपभोग मान्य होता, तर सख्ख्या भावामध्ये तो मान्य असलाच पाहिजे हे उघड आहे. त्यामुळे वालीने रुमेचा उपभोग घेतला म्हणून तो देहान्तशासनास पात्र झाला हे रामाचे म्हणणे अगदी असत्य, भ्रामक, काही तरी नसता दोष वालीचे अंगी चिकटवून आपण केले ते योग्य असा कांगावा करण्यासारखे आहे. या एकंदर प्रकारावरून वालीवधाचे कृत्य आर्यावर्तात चालू असलेल्या धर्मशास्त्राला प्रतिकूल आहे. असे कृत्य करणारा विख्यात राजा दुसऱ्या धर्मशास्त्राला मानणारा परकीय असला पाहिजे असे अनुमान होते.

राजाचे त्या वेळचे आचार

आणखी विचार येतो तो. अग्निसाक्षिक सख्य व त्याच्या अंगभूत भाऊ होऊन जनानखान्यापर्यंतचा उपभोग ही चाल आर्यांत होती काय? रामायणात अशा सख्याचे दोन दाखले आहेत. इतर कोणत्या ग्रंथात असल्याचे आमच्या ऐकिवात नाही. ही चाल अनार्य असल्यास रामायणकथा परदेशची व रामही परदेशी हे कबूल करावे लागेल.

अनुक्रमणिका

राम हा मन्वादि आर्यस्मृती पाळणारा नव्हता असे दुसऱ्या एका वर्तनावरून दिसते. राजाचा आचार कसा असावा याविषयी आमच्या स्मृतिकारांचा मोठा कटाक्ष आहे. राजाचे मुख्य कर्तव्य प्रजापालन. बाकी धार्मिक व कार्मिक कार्यांकडे थोडा वेळ देणे योग्य. यावर मनुस्मृतीतील दोन श्लोक पुरे आहेत :

उत्याय पश्चिमे यामे कृतशौचः समाहितः ।
हुताग्निर्ब्राह्मणांश्चार्च्य प्रविशेत्स शुभां सभां ॥ १४५ ॥
तत्र स्थितः प्रजाः सर्वाः प्रतिवंद्य विसर्जयेत् ।
विसृज्य च प्रजाः सर्वाः मंत्रयेत्सह मंत्रिभिः ॥ १४६ ॥

(अ. ७)

अर्थ : भल्या पहाटेस उठून शौचादि आटपून अग्नीत आहुती देऊन व ब्राह्मणांचा सत्कार करून शुभसभागृहात जावे. तेथे सर्व प्रजेला आनंद देऊन (म्हणजे त्यांच्या तक्रारी ऐकून त्या दूर करणे, न्याय देणे) रजा द्यावी व नंतर मंत्र्यांबरोबर मसलती कराव्या, इत्यादी. आपली धर्मकृत्ये करण्यात राजाने विद्वान पुरोहित नेमावा असे इतर स्मृतीतही आहे, याचा उद्देश स्पष्ट आहे. प्रजारक्षणाकडे राजाला भरपूर वेळ मिळाला पाहिजे. रामायणात रामाची दिनचर्या कशी सांगितली आहे पाहू. (उ. का. सर्ग ४२)

प्राप्तयोर्विविधान्भोगान् अतीतः शिशिरागमः॥ २६ ॥

ते उभयता (सीता, राम) नाना प्रकारचे भोग भोगीत असताना हिवाळा निघून गेला. (२६)

पूर्वाण्हे धर्मकार्याणि कृत्वा धर्मेण धर्मवित् ।
शेषं दिवसभागार्ध अंतःपुरगतोऽभवत् ॥ २७ ॥
सीतापि देवकार्याणि कृत्वा पौर्वाण्हिकानि वै ।
श्वूश्रणामकरोत्पूजां सर्वासामविशेषतः ॥ २८ ॥
अभ्यगच्छत्ततो रामं विचित्रा भरणांबरां ।
त्रिविष्टपे सहस्राक्षं उपविष्टं यथा शची ॥ २९ ॥

अर्थः धर्मवेत्ता राम पूर्वाण्हसमयी धर्मकार्ये यथाविधी उरकल्यानंतर दिवसाच्या अवशिष्ट राहिलेल्या अर्ध्या भागामध्ये अंतःपुरात आत असे. (२७) आणि सीताही सकाळची देवकार्ये आटोपून सर्व सासवांची एकसारखी पूजा केल्यानंतर (२८) स्वर्गामध्ये असलेल्या इंद्राकडे जाणाऱ्या शचीप्रमाणे विचित्र भूषणे व रत्ने धारण करून रामाकडे जात असे. (२९) यावरून धर्मकृत्याकडे अर्धा दिवस व अंतःपुरात बाकीचा वेळ अशी रामाची दिनचर्या असावी. त्यातून उपभोगाचा कंटाळा आल्यास मधल्या चौकात जाऊन खुषमस्कऱ्यांबरोबर मजेत काळ घालवावा, असे पुढील सर्गाच्या पहिल्याच श्लोकात सांगितले आहे :

तत्रोपयिष्टं राजानं उपासन्ते विचक्षणाः
कथानां बहुरूपानां हास्यकाराः समन्ततः ॥

(सर्ग ४३, श्लो. १)

अनुक्रमणिका

रामराज्याची वास्तविक कल्पना

अर्थ : समयसूक असे खुषमस्करे लोक नाना प्रकारच्या गोष्टी राजा बसला असताना सांगून त्याची सर्व प्रकारे सेवा करीत असत. हे खुषमस्करे होते. राज्यातील बरीवाईट बातमी आणणारे हेर नव्हते हे लक्षात ठेवणे जरूर आहे. एकंदरीत रामाचा वेळ धर्म व काम यांच्या सेवनात जात होता. राज्यकारभाराची काळजी त्याला बिलकूल नव्हती. कारण ते काम पूर्वीप्रमाणेच भरताकडे सोपविलेले होते. रामायणात सांगितल्याप्रमाणे रामराज्याची कल्पना असेल तर तसले रामराज्य आम्हास नको. मनुस्मृतीत सांगितल्याप्रमाणे प्रजेची गाऱ्हाणी स्वतः ऐकणारा राजा आम्हास पाहिजे. रामाच्या राज्यात राम हा धमकृत्ये व विलास यात वेळ घालवी. प्रजेकडे पाहण्याचे काम भरताकडे व इतर अधिकारी वर्गाकडे. स्मृतीची योजना राजाने स्वतः कारभार पाहण्याची. रामायणी राज्यकारभार अधिकारी वर्गाच्या हाती. राजा केवळ तटस्थ. अशी स्थिती पुराण इजिप्तात होती असा दाखला मिळतो.

From 'Social Life in Ancient Egypt' by W. M. Flinders Petrie.

P.31. 'The King was held in by part of a highly organised official machinery, in which every one knew their own business, and his official acts were part of that machinery.

P.9. 'The religious functions of the Egyptian Kings are not sufficiently recorded to show their origins. He certainly performed the daily sacrifice, acting as supreme priest for the country, and every funeral offering was nominally made in his name. He seems to have had the position, well known in many other countries, that the welfare of the land depended upon his vitality and action; Another matter, which surprised the Greeks was his entire subservience to the laws not only Government but in private life.'

P.37 (After rising), 'Then came the ceremonial purification, the assumption of the robes and insignia, and proceeding to the sacrifice. Before that act the high priest, with king and people standing around him, prayed for the health and prosperity of the king, recited the praises of the king and then a curse on all offences that had been ignorantly committed, laying the blame on the ministers. This must have been a considerable criticism of affairs, which owing to the great power of the priesthood would be hard to control officially; it is said that this was to guide and check the royal conduct. It is not stated whether the manual act of sacrifice was by the king or the high priest, but it was ceremony, and he inspected the entrails. Then followed the sermon, when the priests read edicts, laws and historical passages fitting for the time.

'The powers of the king were strictly limited. 'He could not do any public business; condemn or punish any man to gratify his own humour or revenge, or for any unjust cause; but was bound to do according as the laws had ordered in every particular case… … The kings, therefore, carrying this even hand towards all their subjects, were more beloved by

अनुक्रमणिका

them than by their kindred.' Though this is a later statement, it is to be accepted for the early times, as in the VIth dynasty a queen was tried by a judge, who wrote the report with another judge, the king taking no part, and not appearing to act in the case. He may probably have given judgment finally, in this case as in other serious cases but the examination and condemnation of criminals was entirely a matter of legal procedure.

सारांश : (३१) पुराण इजिप्तच्या राज्ययंत्राचे राजा हे एक चक्र होते व इतर कामगार हेही त्या यंत्राचे लहानमोठे भाग होते. आपआपले काम कसे करावे याची माहिती प्रत्येकास असावी लागे. राजाच्या नावाने सुटणारे हुकूम या राजयंत्रातूनच निघत असत.

(९) इजिप्तच्या राजास नित्य करावी लागणारी धार्मिक कर्मे मुळात कशी सुरु झाली हे समजण्यास भरपूर साधन नाही. त्याला रोज अग्नीत आहुती द्याव्या लागत व त्या सर्व राष्ट्राचा तो श्रेष्ठ याजक असे. मृतासाठी दिलेली दाने त्याच्याच नावाने होत. राजाचे ओज व त्याची धर्मकर्मे यावर राज्याचे कल्याण अकल्याण अवलंबून असते अशी इतर बऱ्याच देशांप्रमाणे इजिप्तचीही समज होती. तेथील राजाला राज्यकारभारात व खाजगी जीवनात कायद्याच्या जोखडाखाली मान द्यावी लागे; याचे ग्रीक लोकांना फार आश्चर्य वाटे.

इजिप्शियन राजाची दिनचर्या

(३७) शयनातून उठल्यावर राजाला धर्मशास्त्रात सांगितलेल्या नियमाप्रमाणे शौचमुखमार्जन, स्नान वगैरे करावे लागे. नंतर राजचिन्हे, झगा वगैरे घालून राजा यज्ञमंडपात जाई. मुख्य याजकाजवळ राजा व इतर उभे राहात माणि राजाला आरोग्य असावे व त्याचा उत्कर्ष व्हावा असे तो देवाजवळ मागणे करी. नंतर राजाचे गुणवर्णन करून त्याच्या हातून न कळत घडलेल्या चुकांची जबाबदारी त्याच्या मंत्र्यांवर टाकून त्यांचा निषेध करी. या प्रसंगी राज्यकारभारात घडलेल्या बऱ्याच भल्याबुऱ्या बाबींची छाननी होत असे. उपाध्याय वर्गाचे प्रस्थ फारच वाढल्यामुळे त्यांना गप्प करणे कठीण होते. राजाने आपल्या धर्मापासून किंचितही ढळू नये अशी दक्षता त्याने घ्यावी म्हणून ही योजना होती. आहुती देण्याची क्रिया स्वतः करी, का मुख्य याजकाकडून करवी हे नमूद नाही. पण हा नित्याचा यज्ञ राजाचा म्हणून होता व बली दिलेल्या पशूंची आतडी त्यात स्वतः तपासावी लागत असत. हे झाल्यावर मुख्य याजक प्रवचन करी; त्यांत त्या कालाला व प्रसंगाला अनुसरून बसलेल्या धर्मशास्त्रातील नियम आणि पूर्वीच्या इतिहासातील घडलेल्या गोष्टी यांची चर्चा असे.

राजाचे अधिकार नियमाने बांधलेले होते. आपली लहर लागेल त्याप्रमाणे निग्रह किंवा अनुग्रह करणारे हुकूम त्याला देता येत नसत. कोणावर दात ठेवून त्याला दोषी ठरविता येत नसे. प्रत्येक बाबीत धर्मशास्त्रांतील ठरीव नियमाला अनुसरूनच त्याला वागावे लागे. याप्रमाणे सर्व प्रजेशी निष्पक्षपातीपणाने वागणे राजाला भाग असल्याने त्याचेवर प्रजेची मोठी भक्ती असे. तशी राजघराण्यातील माणसांची किंवा दरबारातील सेवकांची असणे शक्य नव्हते. सहाव्या वंशाचे राज्य असता प्रत्यक्ष राणीची चौकशी एका न्यायाधीशाने केली व दुसऱ्या जज्ञाच्या मदतीने त्याने आपला निर्णय लिहिला असे नमूद आहे. या चौकशीच्या कामी अखेरचे हुकूम राजाचे नावाने निघत. याप्रमाणे या राणीच्या खटल्यातही निघाला असेल. परंतु कोणाचीही चौकशी होऊन अपराधी शाबीद होण्याचे काम पूर्णपणे नियमास अनुसरूनच चाले.

अनुक्रमणिका

यावरून राम हा आर्यावर्तातील स्मृती मानणारा राजा नसून पुरावा मिसरच्या कायद्याने जखडलेला राजा असावा असे दिसते. तेथे राजाचा पुष्कळच वेळ धर्मकर्मात जाई. रामाची दिनचर्याही उत्तरकांड सर्ग ४२, श्लोक २७ यात थोडक्यात दिली आहे.

पूर्वाण्हे धर्मकार्याणि कृत्वा धर्मेण धर्मवित्
शेषं दिवसभागार्ध अंतःपुरगतोऽभवत् ॥

धर्मवेत्ता राम पूर्वाण्ह समयी धर्मकार्ये यथाविधी उरकून दिवसाच्या अवशिष्ट राहिलेल्या अर्ध्या भागामध्ये अंतःपुरात जात असे. राज्यकारभाराचे काम रामाने भरताच्या अंगावर टाकले होते. पुराण इजिप्तात ते काम अधिकारी वर्ग पूर्वीपासून बांधून दिलेल्या नियमाप्रमाणे करी. मिळून हिशेब एकच. धर्मकर्मात रामाचा वेळ फार जात असे याचा पुरावा युद्धकांड सर्ग १२८ यातही मिळतो.

पौंडरीकाश्वमेधायां वार्जिमेधेन चासकृत् ।
अन्यैश्च विविधैर्यज्ञरयजत्पार्थिवात्मज ॥ ९४ ॥
दशाश्वमेधानाजन्हे सदश्वान्भूरिदक्षिणान् ॥ ९५ ॥
राधवश्चापि धर्मात्मा प्राप्य राज्यमनुत्तमम् ॥ ९६ ॥
ईजे बहुविधैर्यज्ञैः ससूनुभ्रातृबांधवः ॥ ९७ ॥

अर्थ : राजकुमार रामाने पौंडरीक, अश्वमेध आणि विशेषतः वाजिमेध वारंवार करून इतरही नाना प्रकारचे यज्ञ केले. (९४) उत्कृष्ट अश्व आणि विपुल दक्षिणा यांनी युक्त असे दहा अश्वमेध त्याने केले (९५). धर्मात्म्या रामाला अनुपम राज्य प्राप्त झाल्यानंतर पुत्र, भ्राते व बांधव यांसह त्याने नाना प्रकारचे यज्ञ केले (९७), इत्यादी उल्लेखांवरून रामाचा बहुतेक काळ धर्मकृत्यांत जात असून राज्यकारभाराची दगदग त्यास नव्हती असे दिसते. यावरून तो आर्यावर्तातील राजा नसून इजिप्तचा राजा असावा असे वाटू लागते. इजिप्तच्या राजाचा वेळ धर्मकृत्यांत जास्त जाई व न्याय वगैरे देण्याचे काम इतर अधिकारी करीत.

राम हा आर्य नव्हे!

इजिप्तमध्यें पुरोहित किंवा याजक वर्गाचे मोठे महत्त्व असे. दररोज हवनाच्या वेळी राजाला ईशप्रार्थना ऐकविली जाई. तीत त्याच्या राज्यव्यवस्थेतील चुकांबद्दल क्षमा भाकण्यात येई. पुढे एक प्रवचन होई. त्यात मागील राजांचे दाखले देऊन राजाने कसे वागले पाहिजे हे त्याच्या मनावर ठसविण्यात येई. …

भिन्नभिन्न शहरांच्या देवळांची उत्पन्ने वाढली व त्यामुळे सुंदर मंदिरे बांधता आली व याजकाची संपत्तीही फार वाढली.

रामायणात देवस्थानांचे वर्णन नाही. काशी येथील विश्वनाथ हे प्रसिद्ध पुरातन देवस्थान आहे; पण त्याचाही उल्लेख कोठेच मिळत नाही. रामकाली मूर्तिपूजाच नव्हती असे म्हणावयाचे की काय? इतिहासात इजिप्तच्या व तेथील प्राचीन धर्मात प्रत्येक शहरचा एकेक प्रसिद्ध देव असे व राजा या प्रत्येक देवस्थानचे दर्शन घेऊन तेथे हवन करीत असे. रामायणात ही देवस्थाने मुळीच नमूद नाहीत. त्यांची जागा ऋषींच्या

अनुक्रमणिका

आश्रमांनी पटकाविली आहे. या आश्रमात कोठेही देवांच्या मूर्ती नाहीत.

प्राचीन इजिप्तच्या राज्यात राजाकडे मुख्य काम राष्ट्राच्या भरभराटीकरिता नित्य व नैमित्तिक हवन, यज्ञ वगैरे करणे हे असे. आर्यांच्या स्मृतींप्रमाणे मुख्य काम दंड म्हणजे न्याय देणे हे असे. प्राचीन इजिप्तात न्याय देण्याचे काम स्वतंत्र असलेले न्यायाधीश करीत. राजाची लहर वगरे त्यात चालत नसे. म्हणून तेथे राजा हा फार लोकप्रिय असे. ज्या ठिकाणी राज्यघटनेप्रमाणे राज्यकारभार चालतो व राजा केवळ त्या घटनायंत्राचे एक चक्र होऊन राहतो, तेथे राजा हा प्रजेला फार प्रिय असतो हा अनुभवच आहे. इंग्लंडच्या राजाचे महत्त्व व लोकप्रियतेचे मूळ यातच आहे. याच कारणाने प्राचीन इजिप्तात राजा लोकप्रिय असे व म्हणूनच रामराज्याची कीर्ती तिकडे दुमदुमत होती. रामायणकारांनी तिकडील काव्याचे रूपांतर करून ही कथा आर्यावर्तातील असा भास उत्पन्न केला; तेव्हा रामराज्याची कल्पना येथेही पसरली व आज प्रजेला सुख देणाऱ्या राजाला रामाची व त्या राज्यकारभाराला रामराज्याची उपमा देण्यात येत असते. पण ही कल्पना अगदीच परदेशी आहे.

—महाराष्ट्र शारदा, मे १९३६

अनुक्रमणिका

१३ राम अनार्य होता!

मागील लेखात रामचरित्रातील दोन प्रसंग घेऊन त्या त्या प्रसंगी रामाने केलेले वर्तन आर्यांच्या स्मृतिवचनांस विरुद्ध कसे होते हे दाखविले. पहिले उदाहरण वालीयुद्धाचे. वाली हा सुग्रीव नावाच्या आपल्या भावाबरोबर द्वंद्वयुद्ध करण्यात गुंतला असता त्यावर रामाने बाण सोडून त्याचा वध केला. हे कृत्य मन्वादि सर्व स्मृतिकारांच्या मताने क्षत्रियास न शोभण्यासारखे अधर्म्य आहे. ते रामाने केले व त्या कामाची त्याला शरमही वाटली नाही. यावरून राम हा भिन्न संस्कृतीचा असावा व त्या संस्कृतीप्रमाणे असे कृत्य निंद्य नसावे म्हणूनच त्याच्यासारख्या वीराने ते बिनदिक्कत आचरणात आणले असे अनुमान निघते.

दुसरे उदाहरण रामाच्या दिनचर्येचे होते. राम हा दिवसाचा अर्धा भाग यज्ञ, आहुती वगैरे धर्मकृत्यांत घालवी व पुढला अर्धा भाग आणि रात्र जनानखान्यात ऐषआरामात घालवी. प्रत्यक्ष राज्याचा कारभार भरताकडे सोपविला होता. आमच्या आर्यस्मृतिकारांच्या मताप्रमाणे राजाचे पहिले व मुख्य काम प्रजेची गाऱ्हाणी ऐकून ती दूर करणे व नंतर इतर गोष्टी. धर्मकर्मे करण्यास जरूर तर पुरोहिताची नेमणूक करावी अशी सवलत दिलेली आहे. याप्रमाणे राजाचे कर्तव्य राज्यकारभारावर स्वतः नजर ठेवणे हे आहे. रामाचे वर्तन या आर्यपद्धतीस सुटून झालेले आहे. रामाचा सर्व काळ धर्मकृत्यांत किंवा सुखोपभोगांत जाई व प्रजारक्षणासाठी भरताची योजना होती. हा आचार प्राचीन इजिप्त देशात होता असे सर फ्लिंडर्स पेट्री यांच्या ग्रंथातील उताऱ्यावरून दाखविले आहे. तसा प्रकारचा आचार रामाकडून घडला असल्याने राम हा पुराण इजिप्तचा राजा असावा अशा अनुमानास बळकटी येते.

तिसरे उदाहरण सीता–त्यागाचे आहे. रावणाने सीतेला जबरदस्तीने उचलून नेली व ती त्याच्या अशोक वनात एक वर्ष होती. अशोक वन हे नावाप्रमाणे अरण्य नव्हते, तर तो विलास भोगण्याचा एक उत्कृष्ट बाग होता. हनुमान सीताशोधासाठी लंकेस गेला, तेव्हा त्याने या अशोकवनाचे वर्णन केले आहे. त्यात एक रम्य नदी असून 'नानाप्रकारच्या पक्षिगणांनी युक्त असलेली सरोवरे त्या कपिश्रेष्ठ वायुपुत्र हनुमानाने अवलोकन केली.' (सुंदरकांड १४।३२)

कृत्रिमां दीर्घिकां चापि पूर्णां शीतेन वारिणा ॥
मणिप्रवरसोपानां मुक्तासिकत शोभिताम् ॥ ३३ ॥
विविधैर्मृगसघैश्च विचित्रां चित्रकाननाम् ॥
प्रासादैः सुमहभ्दिश्च निर्मितैर्विश्वकर्मणा ॥ ३४ ॥
कानैनः कृत्रिमैश्चापि सर्वतः समलंकृताम् ।

शीत जलाने परिपूर्ण अशी एक तयार केलेली वापीही तेथे त्यानें अवलोकन केली. त्या वापीला उत्कृष्ट रत्नाच्या पायऱ्या केलेल्या होत्या; मोत्याच्या वाळूने ती सुशोभित झालेली होती. (३३) नानाप्रकारच्या पशुसमुदायांनी ती मनोहर दिसत होती; सभोवती असलेल्या चित्रविचित्र वनांनी ती युक्त होती आणि विश्वकर्माने निर्माण केलेल्या प्रचंड राजवाड्यांनी (३४) व कृत्रिम वनांनीही ती सर्व बाजूनी भूषित झालेली होती.

एकंदरीत अशोक वन हा चैनीने विलास करण्यासाठी उत्तम प्रासाद असलेला मोठा, सुंदर, मनोहर बाग होता व त्यात रावणाने सीतेला ठेविले होते.

अनुक्रमणिका

अशोक वन हे विशेष नाम नसून अशा प्रकारच्या विलासोपभोग करण्याच्या स्थानाला ते सामान्य नाम असावे. उत्तरकांडाच्या ४२ व्या अध्यायात पहिल्याच श्लोकात अयोध्येतील अशोक वनात राम सीतेसह क्रीडण्यास गेल्याचा उल्लेख आहे.

स विसृज्य ततो रामः पुष्पक्रं हेमभूषितम् ।
प्रविवेश महाबाहुः अशोकवनिकां तदा ॥ १ ॥

या वनातही लंकेप्रमाणेच अनेक वृक्ष व सुंदर पक्षी होते. वापीही होत्या, त्यात माणकाच्या पायऱ्या केल्या होत्या, त्यांच्या आतील फरशी स्फटिकांची केलेली होती.

नंदनं हि यथेंद्रस्य ब्रह्मं चैत्ररथं यथा ।
तथाभूत हि रामस्य काननं संनिवेंशनम् ॥ १५ ॥
बव्हासनगृहोपेता लतासनस्तमावृताम् ।
अशोकवनिकां स्फीतां प्रविश्य रघुनंदनः ॥ १६ ॥

इंद्राच्या नंदनवनाप्रमाणे अथवा ब्रह्मदेवाने निर्माण केलेल्या चित्ररथाच्या वनाप्रमाणे त्या रामाच्या वनाचा आकार होता. (१५) विपुल आसने व गृहे यांनी युक्त असून लतासनांनी व्याप्त झालेंल्या त्या भव्य अशोक वनामध्ये रघुनंदन रामाने प्रवेश केला. (१६).

एकंदरीत सीतेला लंकेतील अशोक वनात ठेविले होते, ते वन अयोध्येतील विलास वनाप्रमाणेच होते. लंकेत व अयोध्येत सीता ही अशोक वनात होती.

रामापासून वियोग झाल्यामुळे सीता फार कष्टी असे. तिच्या विरहावस्थेचे वर्णन हनुमानाने केलेले आहे. रामाने रावणाचा वध केल्यावर पहिले काम बिभीषणाकडून रावणाच्या शवाची व्यवस्था लावण्याचे केले व दुसरे काम त्याला लंकेचा राजा म्हणून अभिषेक करविला हे होते.

लंकापुरवासी प्रजेने बिभिषणाकडे मंगल नजराणा आणला तो त्याने तसाच रामाला अर्पण केला.

यानंतर रावणवधाची वार्ता कळविण्यास सीतेकडे हनुमानास पाठविले ।

‘अनुज्ञाप्य महाराजं इमं सौम्य बिभीषणम् ।
प्रविश्य नगरी लंकां कौशलं ब्रूहि मैथिलीम् ॥ २४ ॥
वैदेह्या मां च कुशलं सुग्रीवं च सलक्ष्मणम् ।
आचक्ष्व वदतां श्रेष्ठ रावणं च हतं रणे ॥ २५ ॥
प्रियमेतदिहाख्याहि वैदेह्यास्त्वं हरीश्वर ।
प्रतिगुह्य तु संदेशं उपावर्तितुमर्हसि’ ॥ २६ ॥

(यु. का. सर्ग ११२.)

अनुक्रमणिका

अर्थ : हे सौम्य, बिभीषणाची आज्ञा घेऊन तू लंकानगरीमध्ये जा आणि सीतेला कुशल वर्तमान कळीव (२४). हे वक्त्यांमध्ये श्रेष्ठ हनुमाना, मी व सुग्रीवासहवर्तमान लक्ष्मण कुशल असून रणामध्ये रावणाचा वध झाल्याचे तू सीतेला कळव (२५). हे वानराधिपते, हे प्रियवृत्त सीतेला कळीव व तिचा निरोप घेऊन इकडे परत ये' (२६).

त्याप्रमाणे हनुमान अशोक वनात गेला. त्याने संस्कारसहित सीता अवलोकन केली. सीतेला त्याने रामाचा निरोप जरा विस्तारपूर्वक खुलवून सांगितला. सीता हर्षोत्मादाने बोलण्यास असमर्थ झाली. हनुमानाने पुन्हा प्रश्न केल्यावर, ती बोलू लागली. पुढे परत जाताना हनुमान म्हणाला, 'रामाची तू गुणसंपन्न धर्मपत्नी योग्य आहेस. हे देवी, आता रामाला काही निरोप सांगावयाचा असल्यास तू माझ्यापाशी सांग. म्हणजे मी जिकडे राम आहे तिकडे जातो.' सीतेने सांगितले, 'भक्तवत्सल भर्त्याच्या दर्शनाची मला इच्छा आहे.' हनुमानाने हा निरोप रामास कळविला. (सर्ग ११३)

हा निरोप ऐकून रामाला अश्रू आले व दीर्घ सुस्कारा टाकून पृथ्वीकडे पाहात तो बिभीषणाला म्हणाला, 'दिव्य उटी लावून व दिव्य अलंकारांनी भूषित होऊन शिरःस्नात झालेल्या सीतेला तू येथे घेऊन हे. विलंब लावू नकोस." त्याप्रमाणे अलंकार लेववून सीतेला रामाकडे आणले.

राम आपलें हद्‌गत तोंडाने बोलून दाखवू लागला. (सर्ग ११५, श्लोक १)

"एषासि निर्जिता भद्रे शत्रूं जित्वा रणाजिरे ।
पौरुषाद्यदनुष्ठेयं मयैतदुपपादितम् ॥ २ ॥
गतोऽस्म्यंतममर्षस्य घर्षणा संप्रमार्जिता ।
अवमानश्च शत्रुश्च युगपन्निहतो मया ॥ ३ ॥
अद्य मे पौरुषं दृष्टं अद्य मे सफलः श्रमः ।
अद्य तीर्णप्रतिज्ञोऽ हं प्रभवाम्यद्य चात्मनः ॥ ४ ॥
या त्वं विरहिता नीता चलचित्तणे रक्षसा ।
दैवसंपादितो दोषो मानुषेण भया जितः ॥ ५ ॥
संप्राप्तमवमानं यस्तेजसा न प्रर्मार्जति
कस्तस्य पौरुषेणार्थो महताप्यल्पचेतसा" ॥ ६ ॥

'हे कल्याणी, संग्रामामध्ये शत्रूचा पराजय करून तुला मी जिंकून आणले आहे. पुरुष–प्रयत्नाने जे काही करता येण्यासारखे आहे ते हे मी केले आहे. (२) आज क्रोधाची समाप्ती झाली असून शत्रूने केलेल्या स्त्रीहरणरूप अपमानाचीही मी फेड केली आहे. आणि अपमान व शत्रू या दोहोंचेही पारिपत्य मी एकदमच केले आहे. (३) आज माझा पराक्रम लोकांच्या दृष्टी पडला; आज माझ्या श्रमाचे सार्थक झाले. आज मी आपली प्रतिज्ञा शेवटास नेली आणि आज मी स्वतंत्र झालो. (४) चंचल चित्ताने युक्त झालेल्या राक्षसाने तुला एकटी असता नेले हा अनर्थ दैवामुळे घडला व तो मी मनुष्याने साध्या पराक्रमाने नाहीसा केला. (५) अपमान झाला असता जो तेजाच्या योगाने त्याचे परिमार्जन करीत नाही त्या मंदमती पुरुषाचा पराक्रम मोठा जरी असला तरी त्याचा उपयोग काय?' (६) याप्रमाणे बोलत असलेल्या रामाचे भाषण ऐकून सीता अश्रूंनी भरून गेली आणि मनाला प्रिय असलेल्या सीतेकडे पाहाणाऱ्या रामाचे हृदय लोकापवादाच्या भीतीनें द्विधा

अनुक्रमणिका

झाले. (सर्ग ११५, श्लो. १०।११.) पुढे राम तिला म्हणाला, 'रावणाचा वध अपमान परिमार्जनाकरिता मी केला व तुला परत मिळविली. पण हा सारा खटाटोप मी तुझ्या प्राप्तीसाठी केलेला नव्हता.' (१३।१४).

रक्षता तु मया वृत्तं अपवादं च सर्वतः ॥
प्रख्यातस्वात्मवंशस्य व्यंगं च परिमार्जता ॥ १६ ॥
प्राप्तचारित्र्यसंदेहा मम प्रति मुखे स्थिता ॥
तद्वच्छत्वानुजानेद्य यथेष्टं जनकात्मंजे ॥
एताद्दशदिशो भद्रे कार्यमस्ति न मे त्वया ॥ १८ ॥
कः पुमांस्तु कुले जातः स्त्रियं परगृहोषिताम् ॥
तेजस्वी पुनरादद्यात्सुहृल्लोमेन चेतसा ॥ १९ ॥
रावणांकपरिक्लिष्टां दृष्टां दुष्टेन चक्षुषा ॥
कथं त्वा पुनरादद्यां कुलं व्यपदिशन्महत् ॥ २० ॥
यदर्थं निर्जिता मे त्वं सोऽयमासादितो मया ॥
नास्ति मे त्वय्यभिष्यंगो यथेष्टं गम्यतामिति ॥ २१ ॥
तद्व्यव्याहृतं भद्रे भयैतत्कृत बुद्धिना ॥
लक्ष्मणे वाथ भरते कुरु बुद्धि यथा सुखम् ॥ २२ ॥
शत्रुघ्ने वाथ सुग्रीवे राक्षसे वा बिभीषणे ॥
निवेशय मनः सीते यथा वा सुखमात्मनः " ॥ २३ ॥

अर्थ : "आपले वर्तन कायम राखण्याकरिता, अपवाद सर्वस्वी टाळण्याकरिता आणि आपल्या प्रख्यात वंशाला आलेला कमीपणा नाहीसा करण्याकरिता मी हे केले. (१६) तुझ्या वर्तनासंबंधाने संदेह आल्यामुळे माझ्या संमुख उभी असलेली तू माझ्या दृष्टीला अतिशय प्रतिकूल झाली आहेस. (१७) हे जनककन्ये, मी तुला अनुज्ञा देतो. तू आज वाटेल तिकडे चालती हो. हे भद्रे, या दशदिशा तुला मोकळ्या आहेत; तुझ्याशी मला आता काही एक कर्तव्य नाही; (१८). पुष्कळ दिवसांपासून ही आपणावर प्रेम करणारी आहे असा लोभ मनामध्ये धरून, कोण बरे कुलीन व तेजस्वी पुरुष परगृही राहिलेल्या स्त्रीचा पुनरपि स्वीकार करणार आहे? (१९). रावणाच्या अंकाचा स्पर्श झालेल्या आणि त्याने दोषदृष्टीने अवलोकन केलेल्या तुझा स्वीकार कुलीन म्हणविणारा मी कसा बरे करू? (२०). ज्याच्याकरिता मी तुला जिंकले तो हा माझा उद्देश सिद्धीस गेला आहे. आता तुझ्या ठिकाणी माझ्या मनाची आसक्ती नाही; तू वाटेल तिकडे चालती हो (२१). हे भद्रे, मनाचा निश्चय करून ही गोष्ट मी तुला सांगितली आहे. आता तुझी इच्छा असल्यास लक्ष्मणापाशी अथवा भरतापाशी तू खुशाल रहा. (२२). अथवा हे सीते, शत्रुघ्नाजवळ, सुग्रीवाजवळ, बिभीषण राक्षसाजवळ किंवा तुला सुख मिळेल तेथे राहण्याचे तू मनामध्ये आण" (२३). अखेर तो आणखी म्हणाला, 'तुझ्यासारख्या सुंदर स्त्रीला आपल्या घरी ठेवून रावण तुझी उपेक्षा करील असे संभवत नाही.'

या रामाच्या भाषणावरून त्या काळच्या कुलीन म्हणविणाऱ्या पुरुषाचे विचार कळून येतात.

१. रावणवध करून सीतेला जिंकून आणले. सर्ग ११५।२.
२. शत्रूने स्त्री हरण केली हा अपमान पुसून न काढणाऱ्याच्या पराक्रमाचा काय उपयोग?

अनुक्रमणिका

३. रावणाचा वध अपमानमार्जनाकरिता केला; सीतेच्या प्राप्तीच्या लोभाने केला नाही. श्लो. १३ । १४.

४. सीता हरण करून नेली हा वंशाला कमीपणा आला होता तोही शत्रुवधाने धुऊन काढला.

५. सीतेच्या वर्तनासंबंधाने संदेह आल्यामुळे तिने पाहिजे तिकडे जावे. अर्थात तिचा त्याग केला.

६. परक्याच्या घरी राहिलेल्या स्त्रीला कुलीन पुरुष स्त्री करणार नाही.

७. म्हणून परपुरुषाच्या अंकाचा स्पर्श झालेल्या व त्याची पाप दृष्टी पडलेल्या सीतेचा स्वीकार कुलीन म्हणविणारा राम करणार नाही.

८. सीतेसारखी सुंदर स्त्री रावणाच्या घरी शुद्ध राहणे संभवनीय नाही. यातील पहिल्या मुद्यावरून रामाला आर्यांची विवाहसंस्था मान्य नव्हती असे दिसते. सीतेला जिंकून आणल्याकारणाने तिची वाटेल तशी व्यवस्था लावण्यास राम मुखत्यार होता. म्हणून त्याने तू वाटेल तिकडे जा असे तिला सांगितले. लग्नबंधन तुटले अशीच त्याची समजूत. दुसरा, तिसरा व चौथा हे मुद्दे वस्तुतः एकच आहेत. सीतेची पुनः प्राप्ती हा युद्धाचा हेतूच नाही. वंशाच्या इभ्रतीचा बचाव करण्यासाठी युद्ध केले.

पाचवा व सहावा या मुद्यांचा विचार एकत्र करणे बरे. परक्याच्या घरी राहिलेल्या स्त्रीचा स्वीकार कुलीनाने करता नये. म्हणून सीतेच्या शुद्ध वर्तनासंबंधाने शंका आल्यानें तिला हाकून देणेच योग्य; यावरून स्त्रीच्या इच्छेविरुद्ध कोणी तिचा उपयोग घेतल्यास ती स्त्री टाकून देण्यास पात्र होते व तिच्याशी झालेला विवाहसंबंध तुटतो असा रामाच्या भाषणाचा आशय आहे. इतकेच नव्हे, तर रावणाच्या अंकाचा स्पर्श झालेल्या व जिच्यावर रावणाची पापदृष्टी पडली त्या सीतेचा स्वीकार रामासारख्या कुलीन राजाने करणे योग्य नाही असे राम मोठ्या आढ्यतेने सांगत आहे.

स्त्रियांच्यासंबंधाची ही हलकी कल्पना व व्यभिचारदोषास्तव स्त्रीचा त्याग या गोष्टी रामाला कितीही पसंत असल्या तरी त्या आर्यांच्या सर्व स्मृतिकारांच्या मताविरुद्ध आहेत. रामाच्या भाषणात काय मुद्दे आहेत ते येथे स्पष्टपणे मांडले आहेत. स्त्रीला तिच्या इच्छेविरुद्ध जबरीने कोणी स्पर्श केल्यास किंवा तिच्यावर पापी नजर टाकल्यास ती त्याग करण्याच्या लायकीची होते, तिचा स्वीकार करण्याने उच्च कुलीनाच्या कुलास कलंक लागतो, असा रामाचा अभिप्राय आहे. आमचे पूर्वीचे सर्व स्मृतिकार या मताच्या विरुद्ध आहेत व व्यभिचार हे पातक गणून त्यांनी स्त्री व पुरुष या उभयतांसही प्रायश्चित्त सांगितले आहे. यावरून राम आमच्या हिंदी संस्कृतीत वाढलेला नसून परक्या संस्कृतीचा अभिमानी आहे असे दिसून येते.

वर उतारा दिल्याप्रमाणे झालेले रामाचे भाषण ऐकून सीता प्रथमतः अतिशय घाबरून गेली. (सर्ग ११६, श्लोक १) तिने लज्जेने मान खाली घातली. (श्लो. २) नंतर अश्रूंनी भरलेले आपले मुख पुशीत पुशीत गग्द्द वाणीने हळूहळू आपल्या भर्त्याला ती म्हणाली (श्लो. ४) : 'हे वीर, एखादा यःकश्चित पुरुष एखाद्या क्षुद्र स्त्रीला अनुलक्षून भाषण करितो त्याप्रमाणे असले हे कर्णकटू व अयोग्य भाषण मला अनुलक्षून आपण का बरे करीत आहा (श्लो. ५) आपण जशी मला समजत आहा तशी मी नाही याचा आपणाला प्रत्यय येईल, हे मी आपल्या सदाचरणाच्या शपथेवर आपणाला सांगत आहे. (६) हे प्रभो, पराधीन झाल्यामुळे जो मला पर पुरुषाचा स्पर्श झाला तो माझ्या इच्छेने झाला नाही. दुर्दैवामुळे ती गोष्ट घडून आली (८). माझ्या आधीन असलेले माझे हृदय ते तर माझे आपल्यापाशीच आहे, परंतु शरीर मात्र माझ्या स्वाधीन नसताना मी पराधीन स्त्री काय बरे करणार? (९) हे मान्य रामा, परस्परांचे प्रेम वृद्धिंगत झाले असून आणि पुष्कळ दिवसपर्यंत उभयतांचे एकत्र वास्तव्य झाले असूनही जर माझी परीक्षा आपणाला झाली नसेल तर मात्र मी कायमचीच

अनुक्रमणिका

बुडाले. (१०). मी लंकेत असता वीर हनुमान माझ्या शोधासाठी आला, तेव्हाच 'तुझा मी त्याग केला आहे' असे मला का कळविले नाही? (११). तसा आपला निरोप कळताच मी जीविताचा त्याग केला असता. (१२). तसे झाले असते तर जीव धोक्यात घालून युद्ध करण्याचे श्रम आपणाला करावे लागले नसते व आपल्या मित्रमंडळींसही विनाकारण क्लेश पडले नसते.' (१३)

"त्वया तु नृपशार्दूल रोषमेवानुवर्तता ॥
लघुनेव मनुष्येण स्त्रीत्वमेव पुरस्कृतम्" ॥ १४ ॥

'क्रोधाने आधीन होऊन आपण एखाद्या क्षुद्र मनुष्याप्रमाणे सामान्य स्त्री जातीला अनुसरूनच माझ्यासंबंधाने विचार केला आहे.' (१४).

या भाषणावरून व्यभिचारी स्त्रीचा त्याग करणे हे सीतेला गैर दिसत नाही; कारण तीही रामाच्याच संस्कृतीची होती. आर्य संस्कृतीप्रमाणे स्मृतींनी प्रायश्चित सांगितले आहे ही गोष्ट तिच्या माहितीतही नाही. तिचे म्हणणे आपण शुद्ध आहो; सामान्य स्त्रीच्या हातून जसे वर्तन घडावे असे आपणास वाटते तसे माझ्याकडून झालेले नाही, असे आहे. नंतर तिने लक्ष्मणास सांगितले, 'लक्ष्मणा, माझ्याकरिता चिता तयार कर. चिता हे या संकटाचे औषध आहे. कारण मिथ्या प्रवादाने ग्रस्त झालेल्या मला जिवंत राहण्याची इच्छा नाही. (१८). गुणांनी संतुष्ट न झालेल्या भर्त्याने लोकसमाजामध्ये त्याग केलेल्या मला मरणाचाच अवलंबन करणे योग्य असल्यामुळे मी अग्नीमध्ये प्रवेश करिते' (१०). रामाची याला संमती आहे असे मुद्रेवरून ओळखून लक्ष्मणाने चिता तयार केली. हा वेळपर्यंत अग्निदिव्याची कल्पना कोणासच नव्हती. दुसरे कोणीही सुचवीत नाही. सीता चिता रचण्यास सांगते व तीही आपला उद्देश स्पष्ट करिते. 'मिथ्या प्रवादाने ग्रस्त झालेल्या मला जिवंत राहण्याची इच्छा नाही.'

चिता पेटविल्यावर अधोमुख बसलेल्या रामाला प्रदक्षिणा करून सीता प्रदीप्त होत असलेल्या अग्नीकडे वळली (२३). देव–ब्राह्मणाला नमन करून हात जोडून अग्नीला बोलली,

'यथा मे हृदयं नित्यं नापसर्पति राघवात् ।
तथा लोकस्य साक्षी मां सर्वतः पातु पावकः ॥ २५ ॥
यथा मां शुद्धचारित्रां दुष्टां जानाति राघवः ।
तथा लोकस्य साक्षी मां सर्वतः पातु पावकः' ॥ २६ ॥
एवमुक्त्वा तु वैदेही परिक्रम्य हुताशनम् ।
विवेश ज्वलनं दीप्तं निःशंकेनांतरात्मना ॥ २७ ॥

अर्थ : 'माझे चित्त जर रामापासून नित्य दूर जात नसेल तर जगत्साक्षी अग्नी माझे सर्व प्रकारे रक्षण करील (२५). माझे वर्तन शुद्ध असून राम मला दुष्ट समजत आहे हे जर खरे असेल तर लोकसाक्षी अग्नी माझे सर्व प्रकारे रक्षण करील' (२६). याप्रमाणे भाषण करून व अग्नीला प्रदक्षिणा करून मनात काही एक भीती न आणता सीतेने प्रदीप्त अग्नीमध्ये प्रवेश केला (२०). हे सर्वांनी पाहिले; बाल व स्त्रिया यांनी हाहाकार केला, ऋषी, देव व गंधर्व यांनी सीतेला अग्निप्रवेश करताना पाहिले.

अनुक्रमणिका

तदनंतर याप्रमाणे हाय हाय करीत असलेल्या लोकांची भाषणे ऐकून मनामध्ये खिन्न झालेल्या धर्मात्मा रामाचे नेत्र अश्रूंनी व्याकुळ झाले आणि तो एक मुहूर्तभर विचार करू लागला. (यु. कां ११७) संस्कृत भाषेत मुहूर्त (घटका = ४८ मिनिटे). परंतु मुहूर्त याचा अर्थ क्षण असाही आहे. क्षण म्हणजे सहा मिनिटे असाही काल दिला आहे. एकंदरीत मुहूर्त शब्दाने निश्चित कालाचा बोध होत नाही. नंतर राजा कुबेर, पितरांसहवर्तमान मन, देवराज सहस्त्रनयन इंद्र, जलाधिपती वरुण, तीन नेत्रांनी युक्त असलेला वृषभध्वज महादेव आणि सर्व जगताचा उत्पादक व त्यामध्ये श्रेष्ठ ब्रह्मदेव हे सर्वही सूर्यतुल्य तेजस्वी विमानामध्ये आरूढ होऊन व एकत्र जुळून लंकेमध्ये आल्यानंतर रामाजवळ आले. (२, ३, ४) 'तू स्वतः देवगणामध्ये श्रेष्ठ असल्याचे कसे जाणत नाहीस?' असे सर्व श्रेष्ठ देवांनी रामाला विचारले. (७)

राम म्हणतो– 'मी स्वतः दशरथपुत्र मनुष्य असल्याचे समजत आहे. तथापि मी वस्तुतः कोण आहे आणि माझी प्रकृती कोणती आहे हे आपण मला कथन करावे.' (१२) तेव्हा ब्रह्मदेव म्हणाला, 'चक्रायुध धारण करणारा असा जो प्रभु नारायणदेव तो तू आहेस.' (१४) इत्यादी रामाची स्तुती हे एक स्तोत्रच झालेले आहे, ते १४–३३ श्लोकापर्यंत आहे. येथे ११७ सर्ग समाप्त होतो. संबंध सर्ग क्षेपक असला पाहिजे. यामध्ये आलेली देवांची नावे रामायणात यापूर्वी कोठेही आढळत नाहीत. इतक्या देवांनी येऊन गर्दी करण्याचे कारणही दिसत नाही. कोणी रामभक्ताने हे स्तोत्र वा हा सर्ग घुसडून दिला आहे.

ब्रह्मदेवाने केलेले हे शुभभाषण ऐकल्यावर अग्नी सीतेला मांडीवर घेऊन बाहेर पडला (सर्ग ११८ श्लोक) आणि टवटवीत पुष्पांची भूषणे जिने धारण केली आहेत आणि जी निर्दोष आहे अशा सीतेला मांडीवर घेऊन अग्नीने रामाला अर्पण केले. (४). लोकांसमक्ष अग्नी त्या वेळी म्हणाला, 'हे रामा, ही सीता, हिचे ठिकाणी दोषाचा संपर्क नाही. (५). वाणीने, मनाने, बुद्धीने व दृष्टीने हिने तुजविषयी सद्वृत्ताचे उल्लंघन केले नसून हिचे वर्तन उत्कृष्ट आहे. (६). शुद्ध अंतःकरणाने मुक्त असलेल्या या निष्पाप सीतेला तू स्वीकार. हिला उद्देशून तू काहीएक भाषण करू नकोस अशी माझी तुला आज्ञा आहे. (१०) राम अग्नीला म्हणाला– 'लोकांसमक्ष सीतेची शुद्धी होणे अवश्य होते कारण ही शुभ सीता रावणाच्या अंतःपुरामध्ये पुष्कळ दिवसपर्यंत राहिलेली आहे (१३) तस्मात् हिची शुद्धी न करता हिचा स्वीकार केला असता तर दशरथपुत्र राम विषयलंपट व बालिश आहे असे लोक मला म्हणाले असते. (१४). सीता शुद्ध आहे. सीतेला भ्रष्ट करण्याचे सामर्थ्य रावणाला नव्हते. (१६ । १७). विचारी पुरुषाच्या हातून ज्याप्रमाणे कीर्तीचा त्याग होणे शक्य नाही त्याप्रमाणे त्रैलोक्यात शुद्ध अशा मिथिल राजकन्या जानकीचा माझ्या हातून त्याग होणे शक्य नाही. (१९). तुम्हा सर्वांच्या हितकारक उपदेशाप्रमाणे अवश्य वागले पाहिजे.' (२०). याप्रमाणे देवांना सांगून रामाने प्रिय सीतेचा स्वीकार केला आणि सुखाचा उपभोग घेतला.

नंतर महादेव पुढे सरसावले. सर्वांना आनंद देऊन शेवटी स्वर्गास ये व विमानात राजा दशरथ आला आहे त्याला तू व लक्ष्मण हे दोघेही वंदन करा असे यांनी सांगितले. (८) विमानारूढ पित्याला उभयतांनी वंदन केले (९). दर्शन घेतले. (१०) दशरथाला अतिशय आनंद झाला. (११). आणि त्याला अंकावर घेऊन व बाहूंनी आलिंगन देऊन विमानारूढ असलेल्या त्या महापराक्रमी प्रभु दशरथाने रामाशी संभाषण केले व सुनेला मुली अशी हाक मारून तो म्हणाला, 'हे वैदेही, रामाने जो हा पूर्वी तुझा त्याग केला होता त्यासंबंधाने तू त्याच्यावर क्रोध करू नको. तुझे हित इच्छिणाऱ्या रामाने तुझ्या शुद्धीकरिता हे केले आहे.' (३३). पुढे दशरथ इंद्रलोकास गेला.

अनुक्रमणिका

या अग्निशुद्धीच्या कामी सीतेला अग्नीने मांडीवर घेणे, दशरथाने रामाला मांडीवर घेणे, या चालीविषयी दोन शब्द सांगणे जरूर आहे. रामाने लक्ष्मणाला व भरताला मांडीवर घेतल्याविषयी उल्लेख आहे व हे दोघे रामापेक्षा फार तर एक दोन दिवसांनीच लहान असतील. रामाने अगडबंब मारुतीला व अंगदालाही मांडीवर घेतल्याचा उल्लेख उत्तरकांडात आहे. कोणाचाही सत्कार करताना त्याला मांडीवर घेण्याची चाल रामाच्या देशात असावी. ही हिंदी आर्यांची चाल होती असे दिसत नाही.

सर्व वानर व ऋक्ष यांस जिवंत करून त्यांसह बिभीषणाचे थोडे राक्षस घेऊन राम अयोध्येस पोचला व त्यास राज्याभिषेक सीतेसह झाला. पाहुणे मंडळी दोन महिने राहिली. सर्वांची रामाने थाटाने पाठवणी केली.

महाराष्ट्र—शारदा : जून, १९३६

अनुक्रमणिका

१४ रामाचे अनार्य वर्तन!

रामाने आपल्या अभिषेकसमारंभासाठी बिभीषण व त्याचे मंत्री, सुग्रीव व त्याचे मुख्य मुख्य वानर अयोध्येस आणले होते. सीतेचे अग्निदिव्य, अग्निदेवाने मांडीवर घेऊन तिला रामाचे स्वाधीन करणे व ती शुद्ध आहे असे बजावणे. महादेव, ब्रह्मदेव वगैरे देवांनी तसेच सांगणे, राजा दशरथ विमानातून येऊन त्याने रामास आलिंगन देऊन सीतेच्या पावित्र्याची खात्री देणे, वगैरे गोष्टी खरोखर घडल्या असल्यास त्या या सर्वांनी पाहिल्या असल्या पाहिजेत व या अद्‌भुत गोष्टींची चर्चा त्यांनी अयोध्येत पुष्कळांबरोबर करणे साहजिक आहे.

पण रामराज्यातील प्रजाजनांस सीतेचा पवित्रपणा मुळीच पटला नाही. त्यांच्या मते मरण पावलेला दशरथ आलिंगन देण्यासारख्या जड देहाने विमानातून आला व त्याने सीतेला दोन शब्द सांगितले ही गोष्ट निव्वळ थाप होती. तीवर त्यांनी बिलकूल विश्वास ठेवला नाही. पेटविलेल्या चितेत एक मुहूर्तभर राहिल्यावर सीतेला काही इजा झाली नाही व अग्निदेवाने खुद्द देह धारण करून तिच्या पावित्र्याबद्दल खात्री दिली ही गोष्टही त्यांना विश्वास ठेवण्यास योग्य नाही असेच वाटले. महादेव, ब्रह्मदेव वगैरे प्रकट होणे ही गोष्टही बनावट अशीच त्यांची समजूत झाली होती यावरून रामराज्यातले प्रजाजन चिकित्सक बुद्धीचे तरी असावेत किंवा सीताशुद्धीची कथा मागाहून कोणी तरी रचून रामायणात घुसडून दिली असावी, असे अनुमान निघते. आजच्या रामायणात सीताशुद्धी संबंधाची जी सविस्तर हकीगत आली आहे तीत राम, सीता वगैरे नावे बदलून दुसरी नावे घालून गोष्ट तयार करून कोणास सांगितल्यास ती खरी आहे, तसे घडले असेल असे मानणारा कोणीही भेटणार नाही. राम व सीता हे विष्णू व लक्ष्मी यांचे अवतार मानले गेल्याने त्यांच्या बाबतीत अद्‌भुत गोष्टी घडून येणे संभवनीय आहे असे भोळसर भक्तिवानांस आज वाटते. याप्रमाणे धर्मभोळेपणाने आमची विचारशक्ती व चिकित्सक बुद्धी लयास नेली आहे. याचे वाईट परिणाम आमच्या लोकांस निरनिराळ्या प्रकाराने भोगावे लागत आहेत.

लोकापवादाची अवास्तव भीती

ही सीतेची अग्निशुद्धी, अग्नीने सीतेला दिलेले सर्टिफिकेट, महेश्वरादी देवतांचा निर्बाळा व खुद्द दशरथाची भलावण या साऱ्या गोष्टी प्रजाजनांच्या चिकित्सक बुद्धीस मुळीच पटल्या नाहीत. या सर्व गोष्टी बनावट व अविश्वसनीय अशीच त्याची खात्री असली पाहिजे. त्या काळी नागरिकांना काय वाटले व ते आपआपसांत काय बोलत होते, याविषयी रामाचा मित्र व खुषमस्कऱ्या भद्रच सांगत आहे. (उ. का. स. ४३.) .

"श्रृणु राजन्यथा पौराः कथयंति शुभाशुभम् ।
चत्वरापणरथ्यासु वनेषूपवनेषु च ॥
दुष्करं कृतवान्रामः समुद्रे सेतुबंधनम् ।
अश्रुतं पूर्वकैः कैश्चिद्देवैरपि स दानवैः ॥
रावणश्च दुराधर्षो हतः सबलवाहनः ।
वानराश्च वशं नीता ऋक्षाश्च सह राक्षसैः॥
हत्वा च रावणं संख्ये सीतामाहृत्य राघवः ।
अमर्ष पृष्ठतः कृत्वा स्वदेश्म पुनरानयत् ॥

अनुक्रमणिका

कीदृशं हृदये तस्य सीतासंभोगजं सुखम् ।
अंकमारोप्य तु पुरा रावणे न बलाद्हृताम् ॥
लंकामपि पुरा नीतामशोकवनिकां गताम् ।
रक्षसां वशमापन्नां कर्थ रामो न कुत्स्यति ॥
अस्माकमपि दारेषु सहनीयं भविष्यति ।
यथा हि कुरुते राजा प्रजास्तमनुवर्तते ॥
एवं बहुविधा वाचो वदन्ति पुरवासिनः ।
नगरेषु च सर्वेषु राजञ्जनपदेषु च"॥ श्लो. १३ –२०.

अर्थ : 'हे राजा, चवाठे, बाजार, रस्ते, वने आणि उपवने यांमध्ये लोक तुझ्यासंबंधाने जे काय बरेवाईट बोलत असतात ते ऐक. (१३). समुद्रामध्ये सेतुबंधन हे दुष्कर कृत्य रामाने केले. हे कृत्य देवदानवांच्या हातूनही घडल्याचे कोणत्याही वृद्ध लोकांच्यासुद्धा ऐकण्यात नाही. (१४). अजिंक्य रावणाचा, सैन्य व वाहने यांसह, वध करून राक्षसांसह ऋक्ष व वानर रामाने स्वाधीन करून घेतले. (१५) संग्रामामध्ये रावणाचा वध करून सीता घेतल्यानंतर क्रोध मागे सारून त्याने तिला पुनरपि घरी आणिले. (१६). सीतेच्या संभोगापासून त्या रामाच्या मनाला काय बरे सुख वाटत असेल? जिला पूर्वी रावणाने बलात्काराने अंकावर घेऊन हरण करून नेले, (१७) इतकेच नव्हे, परंतु पूर्वी लंकेत नेल्यानंतर अशोक वनामध्ये नेऊन ठेविले असता जी राक्षसांच्या आधीन झाली होती, तिला राम दूषण कसे देत नाही? (१८). आता स्त्रियांसंबंधाने असला प्रकार आम्हालाही सहन होऊ लागेल. कारण जसे राजा करू लागतो तसे लोकही त्याला अनुसरून वागू लागतात. (१९). अशी नाना प्रकारची भाषणे, हे राजा, नागरिकजन सर्व नगरामध्ये व देशामध्ये तुझ्यासंबंधाने करीत असतात.' (२०)

बाकीच्या मित्रांनीही भद्र सांगतो ते खरे आहे असे त्याच्या प्रश्नाला उत्तर दिले. भद्राच्या व इतर मित्रांच्या सांगण्यावरून त्या काळच्या लोकांची स्त्रियांच्या पातिव्रत्याविषयी काय समजूत होती हे उघड होते. सीतेला रावणाने जबरदस्तीने नेले ही गोष्ट सर्वांस माहीत होती. अशोक वनासारख्या विलासी ठिकाणी राक्षसांच्या आधीन असल्याने ती देहाने अशुद्ध झाली असली पाहिजे ही त्यांची कल्पना होती. याच वेळी सीता गरोदर आहे असे सर्वास जाहीर झाल्यामुळे तर त्यांच्या सीतेच्या चारित्र्याविषयीच्या शंकेस जोरच आला असावा. स्त्री एकदा भ्रष्ट झाली की ती कायमचीच भ्रष्ट होते, तिला घरात घेणे योग्य नाही, ती नीती नाही असेच त्यांचे मत असावे. अशा स्त्रीला रामाने घरात घेतल्यामुळे, त्याने सार्वजनिक नीतीला मोठा धक्का दिला व वाईट उदाहरण घालून दिले, अशी त्यांना भीती वाटली. रामाचे उदाहरण पाहून नागरिकांमध्येही व्यभिचार खपू लागले व नीतिबंधने शिथिल होतील असे त्यास वाटल्यामुळेच सर्व अयोध्यानगरभर व राज्यभर हीच चर्चा चालली होती. यावरून व्यभिचारी स्त्रीचा अंगीकार त्या काळच्या व त्या देशच्या प्रचलित नीतीस मान्य नसल्यामुळे फार मोठी खळबळ उडाली होती असे दिसते.

सीतेला घेऊन राम परत आल्यावर राज्याभिषेकाचा मोठा समारंभ झाला. त्यावेळी सीतेच्या पातिव्रत्याविषयी शंका घेण्याची हिंमत कोणासच झाली नाही. पण ती गर्भार आहे असे कळल्यावरच या लोकापवादास जोर आला. यावरून सीतेचा गर्भ रामापासून नाही, इतरांचा आहे अशी त्यांची खात्री झाल्यावरच रामाच्या वर्तनाबद्दल प्रजेत तीव्र असंतोष पसरला असे दिसते. असल्या विचारसरणीवर 'सीता लंकेहून आली तेव्हा दोन महिन्याची गर्भार होती' हे वरेरकरमामांचे विधान आधारलेले असावे. व्यभिचारी

अनुक्रमणिका

स्त्रीचा त्यागच करणे योग्य, प्रायश्चित्ताने शुद्ध करून घेता येत नाही असाच रामाचे प्रजानन व राम यांचा कायदा असावा.

नंतर रामाने आपल्या तिघा भावांस बोलावून आणले. (उ. कांड सर्ग ४५) तो त्यांना म्हणाला –

"सर्वे श्रुणुत भद्रं वो मा कुरुध्वं मनो ऽ न्यथा ।
पौराणां मम सीतायां यादृशी वर्तते कथा ॥ २ ॥
पौरापवादः सुमहांस्तथा जनपदस्य च ।
वर्तते मयि बीभत्सा सा मे मर्माणि कृंतति ॥ ३ ॥
जानासि त्वं यथा सौम्य दंडके विजने वने ।
रावणेन हृता सीता स च विध्वंसितो मया ॥ ५ ॥
तत्र मे बुद्धिरुत्पन्ना जनकस्य सुतां प्रति ।
अत्रोषितामिमां सीतां आनयेयं कथं पुरीम् ।
प्रत्ययार्थ ततः सीता विवेश ज्वलन तदा ॥ ६ ॥
प्रत्यक्ष तव सौमित्रे देवानां हव्यवाहनः ।
अपापा मैथिलीमाह वायुश्चाकाशगोचरः ॥ ७ ॥
चंद्रादित्यौ च शंसेते सुराणां संनिधौ पुरा ।
ऋषीणां चैव सर्वेषां अपापां जनकात्मजाम् ॥ ८ ॥
एवं शुद्धसमाचारा देवगंधर्वसंनिधौ ।
लंकाद्वीपे महेन्द्रेण मम हस्ते निवेदिता ॥ ९ ॥
अंतरात्मा च मे वेत्ति सीतां शुद्धां यशस्विनीम् ।
ततो गृहीत्वा वैदेहीमयोध्यामहमागतः ॥ १० ॥
अयं तु मे महान्वादः शोकश्च हृदि वर्तते ।
पौरापवादः सुमहांस्तथा जनपदस्य च ॥ ११ ॥
अकीर्तिर्यस्य गीयेत लोके भूतस्य कस्यचित् ।
पतत्येवाधमान् लोकान्यावच्छब्दः प्रकीर्त्यते ॥ १२ ॥
अकीर्तिर्निंद्यते देवैः कीर्तिर्लोकेषु पूज्यते ।
कीर्त्यर्थं तु समारंभः सर्वेषां सुमहात्मनाम् ॥ १३ ॥
अप्यहं जीवितं जह्यां युष्मान्वा पुरुषर्षभाः ।
अपवादभयाद्भीतः किं पुनर्जनकात्मजाम्"॥ १४ ॥

अर्थ : 'तुमचे कल्याण असो; दुसरीकडे लक्ष न देता तुम्ही सर्व श्रवण करा. सीतेविषयी माझ्या संबधाने लोक काय बोलत आहेत ते तुम्ही ऐका. (२) नगरातील व देशातीले लोकांचा फारच मोठा अपवाद आहे. ते माझी निंदा करीत आहेत व ती निंदा माझ्या मर्माचा भेद करीत आहे. (३). हे विनयसंपन्न, निर्जन दंडकारण्यामध्ये रावणाने सीता कणी हरण करून नेली व त्याचा वध मी कसा केला हे तू जाणतच आहेस (५) या ठिकाणी राहिलेली सीता अयोध्यानगरीप्रत मला कशी नेता येईल, ही शंका त्या जनककन्येसंबंधाने मला तेथेच आली होती. तेव्हा खात्रीकरिता सीता अग्नीमध्ये प्रविष्ट झाली. (६). हे लक्ष्मणा, देवांचे संनिध हव्य नेणाऱ्या अग्नीने व आकाशामध्ये संचार करणाऱ्या वायूने मैथिली निष्पाप असल्याचे तुझ्या समक्षच सांगितले आहे (७). आणि सर्व ऋषी व देव याचे संनिध सूर्य-चद्रांनीही पूर्वी जनककन्या निष्पाप असल्याचे

कथन केले आहे. (८). याप्रमाणे देव आणि गंधर्व यांचे संनिध आचरणाने शुद्ध झालेली सीता लंकाद्वीपामध्ये महेंद्राने माझ्या हाती दिली. (९). आणि यशस्विनी सीता शुद्ध असल्याची माझ्या मनामध्ये खात्री आहे. तेव्हा सीतेला घेऊन मी अयोध्येला आलो. (१०) परंतु माझ्यासंबधाने ही मोठीच निंदा सांप्रत सुरू झाल्यामुळे माझ्या मनाला दुःख होत आहे. कारण, नगरातील, देशातील लोकांचा फारच मोठा माझ्यासंबंधाने अपवाद आहे. (११). जगतामध्ये ज्या कोण्या प्राण्याची निंदा होऊ लागते, तो प्राणी ती निंदा कायम असेपर्यंत नरकामध्ये पडून राहतो. (१२). देवही अपकीर्तीची निंदा करीत असतात; कीर्तीची लोकांमध्ये प्रशंसा होत असते आणि सर्वही महात्मे कीर्ती संपादन करण्याकरिताच खटपट करीत असतात. (३). हे पुरुषश्रेष्ठ हो, लोकापवादरूप भयाला भिऊन मी जीविताचा अथवा तुमचाही त्याग करीन; मग जनककन्येची गोष्ट पाहिजे कशाला?' (१४).

भवभूतीनें रामाला सावरले!

या शेवटच्या श्लोकात तर रामाने सीतेची किंमत बरीच कमी केलेली आहे. लोकांच्या अपवादाला तो फार किंमत देत आहे. लोकापवाद टाळण्यासाठी राम स्वतःचा जीव देण्यास तयार आहे, आपल्या भावांचाही त्याग करण्यास तो तयार होईल. मग जनकात्मजेची काय बिशाद? स्त्रीची किंमत रामाच्या दृष्टीने फारच कमी. 'किं पुनर्जनकात्मजाम्' असे तो म्हणतो. माझ्या जिवाची किंमत सर्वांत जास्त, त्याच्याच खालोखाल किंमत भावांची, सीता त्यांच्यापेक्षा कितीतरी हलक्या किंमतीची, असे राम कंठरवाने सांगत आहे. भवभूतीसारख्या महाकवीला ही रामाची उक्ती अस्वाभाविक व रामास कमीपणा आणणारी अशी वाटली. म्हणून त्याने आपल्या उत्तररामचरित नामक नाटकात

"स्नेह दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि ।
आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा" ॥

असा श्लोक रामाच्या तोंडी घातला. प्रजेला खूष करण्याकरिता स्नेह, दया, सौख्य, फार काय जानकी देखील टाकताना मला व्यथा होणार नाही, असे भवभूती रामाकडून वदवितो. यात सीतेची योग्यता स्नेह, दया व सौख्य यापेक्षां मोठी दाखविली आहे. 'किं पुनर्जनकात्मजाम्' व 'यदि वा जानकीमपि' यांतील फरक सहृदय वाचक जाणतीलच.

रामाने नरकवासाचे कारण अपकीर्ती दिलेले आहे. 'जगतामध्ये ज्या कोणा प्राण्याची निंदा होऊ लागते तो प्राणी ती निंदा कायम असेपर्यंत नरकामध्ये पडून राहतो,' हे विधान आमच्या कर्माच्या सिद्धांताला विरुद्ध आहे. मनुष्य हा आपल्या शुभ व अशुभ कर्माप्रमाणे स्वर्गात किंवा नरकात वास करतो. कर्माचा क्षय झाला म्हणजे दुसरा जन्म घेतो. 'क्षीणे पुण्ये मर्त्यलोके विशंति' असेच मत उपनिषदांतहि प्रतिपादिले आहे. (आर्तभाग, याज्ञवल्क्य संवाद बृहदारण्य उपनिषद अ. ३ ब्रा. २ कं. १३.)

'पुण्यो वै पुण्येंन कर्मणा भवती पापा पापेनेति ।'

यावर शांकरभाष्य

तस्मात्पुण्यो वै शास्त्रविहितेन पुण्येन कर्मणा भवति तद्विपरीतेन

अनुक्रमणिका

विपरीतो भवति पापः पापेन इति।

पुढील ब्राह्मणाच्या उपोद्घातात याचा विंचार जरा जास्त विस्ताराने केलेला आहे.

तत्र अपुण्येन स्थावरजंगमेषु स्वभावदुःख बहुलेषु नरकतिर्यक्प्रेतादिषु
च दुःखमनुभवति पुनःपुनर्जामानः म्रियमाणश्च इत्येतत्
राजवर्त्मवत्सर्वलोकप्रसिद्धम् ।
यस्तु शास्त्रीयः पुण्यो वै पुण्येन कर्मणा भवति तत्रैव आदरः क्रियते इह श्रुत्या ।

अर्थ : तेथे पापकर्माने पर्वतवृक्षादी स्थावर, पशुपक्ष्यादी जंगम अशी शरीरे घेऊन किंवा स्वाभाविक दुःखप्रचुर अशा नरक किंवा कीटक किंवा प्रेत अशा शरीरांत राहून वारंवार जन्म घेत व मरण अनुभवीत दुःख भोगतो. हे राजमार्गाप्रमाणे सर्व लोकांत प्रसिद्ध आहे.

ही भीति आर्यांना नसे

आमच्या यमाला धर्म अशी संज्ञा आहे. तो प्रत्येक जीवाच्या पापपुण्याप्रमाणे निवाडा देतो. चित्रगुप्त या पापपुण्याचा हिशेब ठेवतो. अशा प्रकारचा कर्मवाद हे या आर्यभूचे विशेष आहे. रामाची समजूत याचे उलट आहे.

अकीर्तिर्यस्त गीयेत लोके भूतस्य कस्यचित् ।
पतत्येवा धर्मान्लोकान् यावच्छब्दः प्रकीर्त्यते ॥

कोणाची जगात निंदा झाल्यास ती निंदा कायम असेपर्यंत तो नरकात पडून असतो ही रामाची समजूत. ही निंदा सकारण असो निष्कारण असो; नरकवास निश्चित! सीतेचा अंगीकार केला ही गोष्ट रामाच्या दृष्टीने योग्य होती. लोकांच्या दृष्टीने अयोग्य ठरल्यामुळे रामाची निंदा होऊ लागली. ही निष्कारण निंदा कायम राहिली तर आपणास नरकवास येईल ही रामाला भीती पडली व म्हणून त्याने निष्कारण होत असलेली निंदा टाळण्यासाठी निष्पाप अशा सीतेचा त्याग केला. स्वतःच्या कर्माप्रमाणे जीवाला सुखदुःख भोगावे लागते हा आर्यावर्ताचा कर्मवाद. दुसऱ्यांच्या निंदास्तुतीप्रमाणे जीवास नरक किंवा स्वर्गवास घडतो हा रामाच्या देशाचा समज. यावरून रामाचा देश आर्यावर्त नव्हता; अगदी निराळा होता हे स्पष्ट होत आहे; कारण मरणानंतरच्या अवस्थेविषयी त्यांची कल्पना आर्यावर्ताच्या कल्पनेहून अगदी निराळी होती.

इजिप्तचे फारो राजे आपली कीर्ती मागे राहावी म्हणून आपल्या प्रेताकरिता पिरामिडच्या आकाराच्या समाधी बांधीत व आत सर्व सुखसोयी करीत. आपली कीर्ती जोपर्यंत आहे तोपर्यंत आपणास सुख मिळेल ही त्यांची भावना होती. पिरामिड बांधताना हजारो लोकांस कैक वर्षेपर्यंत राबावे लागे व त्या कामी त्यांच्यावर पुष्कळ जुलूम होत असे. या जुलूमाची क्षिती फारोस नसे. कारण लोक ती मोष्ट थोडेच वर्षात विसरून जातील व आपली कीर्ती मागे राहील ही त्यांची खात्री होती. रामाची मनोरचना याच ठशाची आहे हे थोड्या विचारांती दिसून येईल.

अनुक्रमणिका

रामाच्या मते सीता निष्पाप आहे, व तशी खात्री मोठमोठ्या देवांनी, खुद्द अग्नीने व दशरथाने दिलेली होती. असे असताही साध्वी व गर्भवती अशा धर्मपत्नीचा त्याग करण्यास राम तयार होत आहे हे आमच्या आर्यसंस्कृतीच्या विरुद्ध आहे. आमच्या समजुतीप्रमाणे पितरांचे ऋण फेडण्यासाठी पुत्राची जरुरी आहे. आपला गर्भ जिच्या उदरी आहे अशा भार्येचा त्याग आर्य केव्हाही करणार नाही. राम त्याग करीत आहे यावरूनही तो आर्यावर्तातील नव्हे असे म्हणणे भाग येते.

सीता गर्भवती होती. सीतात्यागाचा निश्चय करण्यापूर्वी थोडेच तास रामाने सीतेला विचारल होते.

'किमिच्छसि वरारोहे कामः किं क्रियतां तव'

उ. कां. श्लो. स. ४२ । ३१

'हे सुंदरी, तू काय इच्छितेस? तुझे कोणते डोहाळे पुरवावे?' यावर सीता हास्य करून रामाला म्हणाली –

तपोवनानि पुण्यानि द्रष्टुमिच्छामि राघव ॥
गंगातीरोपविष्टानां ऋषीणामुग्रतेजसाम् ।
फलमूलाशिना देव पादमूलेषु वर्तितुम् ॥ ३३ ॥
एष मे परमः कामी यन्मूलफलभोजिनाम् ।
अप्येक रात्रिं काकुत्स्थ निवसेयं तपोवने.' ॥ ३४ ॥

अर्थ : 'हे राघवा, पवित्र तपोवने अवलोकन करण्याची आणि फळे व मुळे भक्षण करून गंगातीरी वास्तव्य करीत असलेल्या महातेजस्वी ऋषींच्या चरणासमीप राहण्याची मला इच्छा झाली आहे. (३३) हे काकुत्स्था, फळे व मुळे भक्षण करणाऱ्या ऋषींच्या तपोवनामध्ये एक रात्र तरी वास्तव्य करावे ही माझी उत्कट इच्छा आहे. (३८). यावर 'ठीक आहे,' असे आश्वासन देऊन राम म्हणाला.

'विश्रब्धा भव वैदेहि श्लोगमिष्यस्यसंशयम् ।'

'हे वैदेही, स्वस्थ राहा; तू उद्या निःसंशय जाशील.' (३५) यावेळी सीतेला टाकून देण्याचा उद्देश रामाच्या मनात होता असे म्हणण्यास आधार नाही. रामाने प्रामाणिकपणे वचन दिले असे सागण्यांचा वाल्मीकीचा आशय आहे. कारण तो याच श्लोकाच्या पहिल्या अर्ध्यात रामाला अक्लिष्टकर्मा असे विशेषण लावतो : 'तथेति च प्रतिज्ञातं रामेणाक्लिष्टकर्मणा' याचा अर्थ लेलेशास्त्री 'पवित्र कर्म करणाऱ्या रामाने' असा करितात. लोक काय बोलतात हे खुषमस्कऱ्याकडून समजल्यावरच सीतेचा त्याग करण्याचा निश्चय रामाने केलेला आहे. ही गोष्ट सीतेला वचन दिल्यानंतरची आहे. तिघा भावांना बोलावून आणल्या वेळी त्यांना फार मोठेपणा दिला गेला आहे. (पहा, सर्ग ४४.)

तान्परिष्वज्य बाहुभ्यां उत्थाप्यच महाबलः ।
आसनेष्वासतेत्युक्त्वा ततो वाक्यं जगाद ह ॥ १९ ॥

अनुक्रमणिका

अर्थः नंतर त्यांना हातांनी कवटाळून धरून व उठवून आसनावर बसा असे त्यांना सांगून म्हणाला (१९).

यात रामाने फारच साखर पेरली आहे. तो म्हणतो –

भवंतो मम सर्वस्वं भवंता जीवितं मम
भवद्भिश्च कृतं राज्यं पालयामि नरेश्वराः ॥ २० ॥
भवन्तः कृतशास्त्रार्था बुद्धया व परिनिष्ठिताः ।
संभूय च मदर्थोऽयमन्वेष्टव्यो नरेश्वराः ॥ २१ ॥

भावांना दटावणी

'तुम्ही माझें सर्वस्व व माझे जीवित आहा; आणि हे राजपुत्रही, तुम्हीच संपादन केलेले राज्य मी परिपालन करीत आहे (२०). तुमची बुद्धी परिपक्व झाली असून शास्त्रतात्पर्यही तुम्ही जाणले आहे व त्याप्रमाणे तुम्ही वागतही आहा यास्तव हे राजपुत्र हो, तुम्ही सर्व मिळून मी काय म्हणत आहे याचा विचार करा. (२१) यानंतरचे रामाचे भाषण ४५ वे सर्गातील वर दिलेलेच आहे. भावांचा विचार घेण्यासाठी त्यांना बोलावून आणले त्यांची तारीफ केली त्यांना आपले म्हणणे सांगितले. पुढे मी कसे करावे हे तुम्ही मला सांगा, असे पूर्वी म्हटले होते तरी त्यांचे म्हणणे न ऐकता रामाने आपला निकाल दिला. तो बजावण्याची कामगिरी लक्ष्मणावर सोपविली व आपल्या पायांची व जीविताची शपथ घातली.भावाचा सल्ला न घेताच राम लक्ष्मणास म्हणतो –

'श्वस्त्व प्रभाते सौमित्रे सुमन्त्राधिष्ठितं रथं ।
आरुह्य सीतामारोप्य विषंयान्ते सुमुत्सृज॥ १६ ॥
गंगायास्तु परेपारे वाल्मीकेस्तु महात्मनः ।
आश्रमो दिव्य संकाशः तमसातीरमाश्रितः ॥ १७ ॥
तत्रैतां विजने देशे विसृज्य रघुनन्दन ।
शीघ्रमागच्छ सौमित्रे कुरूष्व वचनं मम' ॥ १८ ॥

अर्थ : 'हे लक्ष्मणा, उद्या सकाळी सुमंत्र सारथी ज्याच्यावर आहे अशा रथावर आरूढ होऊन तू सीतेला वर घे आणि या देशाच्या हद्दीपलीकडे सोडून दे. (१६). गंगा ओलांडून गेल्यावर तमसा नदीचे तीरी महात्मा वाल्मीकी मुनींचा दिव्य आश्रम आहे. (१७). तस्मात् हे रघुनंदना लक्ष्मणा, तेथे निर्जन प्रदेशामध्ये हिला सोडून देऊन तू सत्वर परत ये. हे माझे म्हणणे ऐक.' (१०)

यावर तीन भावांपैकी कोणीतरी उलट बोलेल अशी रामाला भीती होती, म्हणून भावांची तोंडे बंद करण्यासाठी राम म्हणतो –

'न चास्मि परिवक्तव्यं सीतां प्रति कथं च न ।
तस्मात्त्वं गच्छ सौमित्रे नात्र कार्या विचारणा ॥ १९ ॥

अनुक्रमणिका

'सीतेसंबंधाने याचे उलट तू मला काही एक सांगू नकोस. तस्मात् हे लक्ष्मणा याविषयी काही एक विचार न करिता तू चालता हो.' (१९). इतक्यानेही कार्य भागेल असे रामास वाटेना म्हणून तो लक्ष्मणास व इतर भावांस शपथ घालीत आहे.

'अप्रीतिहि परा मह्यं त्वयैतत्प्रतिवारिते ।
शापिता हि मया यूयं पादाभ्यां जीवितेन च'॥ २० ॥

'तू याला आड येशील तर मला अतिशय दुःख होईल. यास्तव मी आपल्या पायांची व जीविताची तुम्हाला शपथ घातली आहे.' (२०) पण इतक्यानेच भाऊ गप्प बसतील असे त्यास वाटेना, म्हणून त्यांस तो दरडावण्यासाठी दम भरीत आहे.

'ये मां वाक्यान्तरे ब्रूयुः अनुनेतुं कथं च न ।
अहिता नाम ते नित्यं मदभीष्टविघातनात् ॥ २१ ॥
मानयन्तु भवन्तो मां यदि मच्छासने स्थिताः
इतोऽद्य नीयतां सीता कुरूष्व वचनं मम" ॥ २२ ॥

'माझ्या भाषणाविरुद्ध माझी समजूत करण्याकरिता कसल्याही प्रकारचे भाषण करतील त्यांच्या योगाने मला इष्ट असलेल्या गोष्टींचा विघात होत असल्यामुळे ते माझे सर्वदा शत्रू समजले जातील. (२१). तुम्ही जर माझ्या आज्ञेप्रमाणे वागत असाल तर मला मान द्या. सीतेला येथून घेऊन जा. हे माझे म्हणणे ऐक. (२२)

बंधूंशी अरेरावीची वागणूक

दुसऱ्यांचे म्हणणे ऐकण्याची तयारी नाही असे हे रामाचे अरेरावीचे वर्तन आहे. भावांना सल्ला देण्याकरिता बोलविले. सल्ला द्या असे प्रथम सांगितले आणि आपला निश्चय त्यास सांगून त्याप्रमाणे अंमलबजावणीचा एकदम हुकूम दिला.

बरे, सीतेला तरी तिच्यावर कोणता प्रसंग ओढवणार याची कल्पना देऊन तिच्या मनाची तयारी करावयाची संधी देणे योग्य असता राम तसे काहीच करीत नाही. गरीब बिचारी भाबडी सीता! डोहाळे काय म्हणून रामाने विचारल्यावर ऋषींचे आश्रम पाहण्याची इच्छा आहे असे तिने सांगितले होते. त्याचा फायदा– अगदी अयोग्य फायदा–राम घेत आहे–अगदी विश्वासघात करीत आहे.

'पूर्वमुक्तोऽहमनया गंगातीरेऽहमाश्रमान् ।
पश्येयमिती तस्याश्च कामः संवर्त्यतामयम्" ॥

'गंगातीरी असलेले आश्रम अवलोकन करण्याची माझी इच्छा आहे, असे तिने पूर्वीच मला सांगितले आहे. यास्तव ही तिची इच्छा परिपूर्ण होऊ दे' (२३). लक्ष्मणाला ही गोष्ट मान्य करावी लागली व त्याप्रमाणे दुसरे दिवशी त्याने बतावणीही चांगली केली. दुसरे दिवशी लक्ष्मणाने सुमंत्रास रथ जोडून आणण्यास सांगितले. रामराज्यात सर्व गोष्टींची सुबत्ता असून सारथ्यांचा मात्र तुटवडा होता. केव्हाही काम पडो,

सुमंत्राला आपले मंत्रिपदाचे काम खालच्या अधिकाऱ्याकडे सोपवून घोडे हाकण्यासाठी चाबूक हाती घ्यावा लागत आहे. त्याने त्याप्रमाणे रथ जोडून आणला असे लक्ष्मणाला कळविले नंतर

एवमुक्तः सुमंत्रेण राजवेश्मनि लक्ष्मण ।
प्रविश्य सीतामासाद्य व्याजहार नरर्षभः ॥ सर्ग ४६ श्लो. ६

'त्वया किलैष नृपतिर्वरं वै याचतः प्रभुः ।
नृपेण च प्रतिज्ञातं आज्ञप्तश्चाश्रमं प्रति ॥ ७ ॥
गंबातीरे मया देवि ऋषीणामाश्रमा शुभान् ।
शीघ्रं गत्वा तु वैदेहि शासनात्पर्थिवस्य नः ॥ ८ ॥
अरण्ये मुनिभिर्जुष्ट अवनेया भविष्यसि" ॥

अर्थ : याप्रमाणें सुमंत्राने सांगितले असता लक्ष्मण राजवाड्यामध्ये गेला आणि सीतेसन्निध जाऊन तो पुरुषश्रेष्ठ तिला म्हणाला, (६) 'तू खरोखर या प्रभुराजापाशी आश्रमाला जाण्यासंबंधाने एक वर मागितला होतास आणि त्याने तो देण्याचे कबूल करून मला आज्ञा केली आहे. (७) हे देवी वैदेही, आमच्या राजाच्या आज्ञेने गंगातीरी ऋषीच्या शुभ आश्रमांमध्ये सत्वर जाऊ या. (८) मुनींनी आश्रित अशा अरण्यामध्ये मी तुला पोचविणार आहे.

भाबड्या सीतेला ही गोष्ट खरी वाटली!

एवमुक्ता तु वैदेही लक्ष्मणेन महात्मना ॥ ९ ॥
प्रहर्षमतुलं लेभे गमनं चाप्यरोचयत् ।
वासांसि च महार्हाणि रत्नानि विविधानि च ॥ १० ॥
गृहीत्वा तानि वैदेही गमनायोपचक्रमे ।
इमानि मुनिपत्नीनां दास्याम्याभरणान्यहम् ॥ ११ ॥
वस्त्राणि न महार्हाणि धनानि विविधानि च ।

अर्थ : याप्रमाणे महात्म्या लक्ष्मणाने सीतेला सांगितले असता (९) तिला अनुपम हर्ष झाला आणि जाण्याचेही तिने मनामध्ये आणले. नंतर मोठी मूल्यवान वस्त्रे व नाना प्रकारच्या वस्तूमी ऋषिपत्नांना देईन' असे म्हणून ती जाण्यास निघाली.

भिकार लक्षणे

येथे एक शंका येते. त्या काळचे रथ दोन चाकांचे व दोन घोडे जोडलेले लहानच असत. सीता, लक्ष्मण व सुमंत्र अशी तीन माणसे रथावर बसल्यावर ऋषिपत्न्यांना देण्यासाठी घेतलेली भूषणे, मौल्यवान वस्त्रे व नानाप्रकारच्या वस्तू ठेवण्यास जागा कोठे मिळाली? दुसरा रथ बरोबर नव्हताच. वास्तविक पाहता रामासारख्या श्रीमान सम्राटाची अभिषिक्त राणी डोहाळे पुरविण्यासाठी वनात जाते तिच्याबरोबर एकही दासी नसावी हे चमत्कारिक नव्हे काय? बालकांडाच्या ७४ वे सर्गात जनकाने आपल्या कन्यांस आंदण काय काय दिले याची नोंद श्लोक ३।४।५।६ यांत आहे. त्यांत

अनुक्रमणिका

ददौ कन्याशतं तासा दासीदासमनुत्तमम् ।

त्या चौघींपैकी प्रत्येकीबरोबर, सख्या शंभर शंभर कन्या आणि उत्कृष्ट दास व दासी दिल्या होत्या असा उल्लेख आहे. यावेळी राम केवळ राजपुत्र होता. युवराजही नव्हता. महाराज झाल्यावर महाराज्ञीचा परिवार वाढला पाहिजे. बरे, न वाढता तितकाच राहिला असे मानले तरी या गर्भार स्थितीत सीतेबरोबर एकही दासी जाऊ नये व तिने नेऊ नये हे मोठेच चमत्कारिक दिसते. साधारण श्रीमंताच्या किंवा कमी उत्पन्नाच्या सरदाराच्या बायकोबरोबर एक तरी बाईमाणूस असतेच. पण रामाच्या महाराणीबरोबर एकही दासी नसावी, तिचे सामान–सुमानास आणखी एखादा रथदेखील नसावा हे मोठे चमत्कारिक आहे.

आम्ही लहानपणी एक गोंधळ घातलेला पाहिला आहे. त्यात गोंधळी राजा विक्रमाची कथा सांगत असतात. राजाच्या घरच्या एका मेजवानीचे वर्णन करण्याच्या भरात गोंधळीबुवा आले व 'राजा विक्रमाच्या घरी । गाडग्यागाडग्यांनी खीर वाढी ॥' असे दोनतीनदा म्हणाले. राजाच्या घरातील भांडी निदान चांदीची तरी असतात, याची कल्पना वक्त्यास कोठची? त्याच्या घरात गाडग्याशी कारभार. त्याच भांड्याचे नाव नेहमीच्या सरावाने त्याच्या तोंडी आले. त्या गरीबाला खीर हे मोठे पक्वान्न आणि ती पुष्कळ पोटभर मिळाली म्हणजे तो खूष! यामुळे इतर पक्वान्नांची नावे त्याला घेता आली नाहीत. रामायणाचा हा भाग घुसविणारा वाल्मीकी अशाच कल्पनाशक्तीत किंवा माहितीत दरिद्री असावा. तसा नसता तर त्याने सीतेबरोबर जास्त दासदासी वगैरे लवाजमा दिला असता. याचे उलट अयोध्याकांडाचा वाल्मीकी कल्पनाशक्तीत मातब्बर होता. रामास परत आणण्यास भरत गेला तेव्हा वास्ताविक फार मोठ्या लवाजम्याची जरुरी नव्हती. पण या वाल्मीकीला त्याचे काय? वर्णनात भली थोरली अतिशयोक्ती! त्याने केलेले वर्णन अयोध्याकांड सर्ग ४३ मध्ये आहे. भरताबरोबर ९000 हत्ता, ६00000 रथ, एक लक्ष स्वार होते. याशिवाय प्रजानन, व्यापारी वगैरे निराळेच. रामायणात असे प्रकार अनेक ठिकाणी आढळतील. सीतेला डोहाळे पुरविण्याच्या मिषाने लक्ष्मणाने नेली तेव्हा बरोबर एकही दासी नव्हती व ऋषिपत्न्यांस देण्याकरिता वस्त्रे व अलंकार घेतले होते, त्यापलीकडे सीतेचे काही सामानही नव्हते! अशा रीतीने सीतेस रामाने राज्याबाहेर निष्ठुरपणे हाकून दिले. निघतेवेळी राम तिला भेटला नाही, इतकेच नव्हे तर तिला जीव की प्राण करणाऱ्या अशा तिच्या सासवांपैकी कोणीही लवकर परत ये असे सांगण्यास आली नाही!

सारासार विचार

सीतेसंबंधाने पसरलेल्या लोकापवादाविषयी व त्या लोकापवादामुळे प्रजेला संतुष्ट करण्याच्या हेतूने तिला राज्याबाहेर नेऊन सोडण्याच्या निश्चयाविषयी सीतेला पूर्णपणे अज्ञानात ठेवण्याचे काय कारण होते, याची कल्पना होत नाही. डोहाळे पुरविण्यासाठी तुझ्या इच्छेप्रमाणे राम तुला तपोवनात पाठवीत आहे अशी तिची समजूत लक्ष्मणाने करून दिलेली दिसते.

सीतेला आपल्यावरील लोकापवादाची जाणीव करून दिली असती तर पूर्वी अंकेत अग्निदिव्य करून रामाची खात्री केली तशी अयोध्यावासी जनांची पुन्हा ते किंवा दुसरे दिव्य करून तिने खात्री केली असती. ती निष्पाप आहे अशी रामाची खात्री झाली होती, तर लोकांची खात्री होण्यासाठी पुन्हा दिव्य करविणे कठीण नव्हते. ब्रह्मदेव, महादेव वगैरे सर्व देव सीतेच्या पातिव्रत्याची भलावण करण्यास जसे लंकेत आले तसे ते अयोध्येसही आले असते. राजा दशरथ पूर्वीप्रमाणे येऊन सर्व प्रजाजनांना सीतेच्या

अनुक्रमणिका

पावित्र्याची साक्ष देता तर त्यांचे तोंड मिटले असते. पण याप्रमाणे करण्याची संधी सीतेला मुळीच देण्यात येत नाही. हे मोठे विलक्षण व आश्चर्यकारक दिसत आहे.

बरे, पुन्हा दिव्य करणे व देवांस येण्याचा त्रास देणे योग्य नाही म्हणून रामाने तसे करण्यास सीतेला सांगितले नाही असेही म्हणता येत नाहीं. कारण नैमिषारण्यात त्याने अश्वमेध केल्याची कथा उ. का. सर्ग ९५ यात आहे. तेथें रामाने सीतेला पुन्हा दिव्याची अट घातली आहे मग प्रथमच त्याने का घातली नाही हे कोडे राहतेच. आपल्या यज्ञाकरिता रामाने सर्व ऋषींस बोलावले, परंतु वाल्मीकीस तो अगदी रामराज्याच्या सीमेवर राहात होता तरी बोलाविले नव्हते. तो आपण होऊनच आपल्या दोन शिष्यांस घेऊन आला व त्यांच्याकडून त्याने रामायणाचे दररोज वीस वीस सर्ग पठण करविले. रामाने ते ऐकले. रामायण गाणारे दोघे सीतापुत्र असल्याचे कळल्यावर त्याने दूत बोलावून त्यांना आपला निरोप वाल्मीकी मुनीस कळविण्यास पाठविले. तो निरोप असा आहे :

'यदि शुद्धसमाचारा यदि वा वीतकल्मषा ।
करोत्विहात्मनः शुद्धिं अनुमान्य महानुनिम् ॥ ४ ॥
छदं मुनेश्च विज्ञाय सीतायाश्च मनोगतम् ।
प्रत्ययं दातुकामायाः ततः शंसत मे लघु ॥ ५ ॥
श्वः प्रभाते तु शपथं मैथिली जनकात्मजा ।
करोतु परिषन्मध्ये शोधनार्थ ममैव च' ॥ ६ ॥

अर्थ : 'सीतेचे आचरण जर स्वाभाविकच शुद्ध असेल अथवा (आश्रमात वास्तव्य केल्यामुळे) ती जर शुद्ध झाली असेल तर महर्षीची अनुज्ञा घेऊन तिने आपल्या शुद्धीविषयी येथे शपथ करावी. (४). असा भगवान वाल्मीकी मुनींना निरोप कळवून मुनीचा व सीतेचा अभिप्राय तुम्ही समजून घ्या आणि ती जर आपल्या आचरणाविषयी खात्री करून देण्यास तयार असेल तर तसे मला लवकर येऊन कळवा. (५). उदईक प्रभातकाळी जनककन्या मैथिलीने सभेमध्ये स्वतःवरील व माझ्यावरील अपवाद दूर करण्याकरितां शपथ करावी.' (६) वाल्मीकीने हे कबूल केले व त्याप्रमाणे शपथ झाल्याची हकीगत ९७ वे सर्गात आहे.

शपथेचा हा विधी लोकांची खात्री पटवून त्यांची तोंडें बंद पाहण्यासाठी रामास पूर्वीच करविता आला असता. प्रजाजनांचे म्हणणे सीतेच्या हातून व्यभिचार घडला हे होते. सीतेने अग्निदिव्य केले व ब्रह्मदेवादी देव, अग्नी व दशरथ यांनी खात्री पटविली वगैरे कथा विश्वसनीय आहेत असे त्यास पटेना. त्यांच्या समक्षच तो चमत्कार पुन्हा झाला असता तर त्यांना सीतेचे पावित्र्य पटले असते. पण तसे काही एक न करता व सीतेला पुढल्या संकटाची दखलगिरी न देता डोहाळे पुरविण्याकरिता मी नेत आहे असा लक्ष्मणाकडून विश्वास दाखवून तिला फसविण्याचे कृत्य रामाने करावे हे आश्चर्य आहे. असे कृत्य एखाद्या सामान्य माणसाच्या हातून झाले असते तर त्याच्यावर कडक टीका झाल्याशिवाय राहिली नसती. पण राम हा विष्णूचा अवतार अशी भुरळ लोकांना पडल्यामुळे त्यांची विचारशक्तीच कुंठित झाली व रामांच्या वर्तणुकीच्या बऱ्यावाईटपणाची चिकित्सा करण्याची हिंमत कोणासच होत नाही. सीतेला हद्दपारीची शिक्षा देण्याच्या व ती अंमलात आणण्याच्या कामी वसिष्ठ मुनींचा सल्ला कोणीच घेत नाही, हेही एक आश्चर्यच आहे. का रामाने केलेला प्रकार योग्यच होता असे वसिष्ठांचेही मत होते? रामाचा निषेध त्यांनी केला असा उल्लेखही पुढे कोठे झालेला नाही. त्यांच्या मुग्धतेचा अर्थ त्यांची मान्यता या कामी होती असा करावा काय?

अनुक्रमणिका

१५ रामाचे अनार्यत्व

सीतेला रावणाने पंचवटीहून जबरीने नेले व लंकेतील अशोक नावाच्या विलासवनात एक वर्षभर ठेविले होते. त्यामुळे ती शुद्ध राहिली नसावी अशी रामास व इतरांस शंका आली. ती घालविण्यासाठी सीतेने अग्निदिव्य केले. ब्रह्मदेवादी सर्व देव, अग्नी व दशरथ वगैरेंनी सीतेच्या पावित्र्याची खात्री दिल्यावर रामाने तिचा स्वीकार केला. सर्व अयोध्येस येऊन सीता व राम यांस राज्याभिषेक झाला व ते आनंदाने विलासात काळ घालवू लागले. पण सीतेच्या अग्निशुद्धीची हकीगत सर्व नागरिकांस व प्रजाजनांस खोटी वाटली व व्यभिचारी सीतेचा अंगीकार करणारा असा दोष ते रामास देऊ लागले. त्यावेळी सीता गर्भवती होती. यामुळे तिच्या व्यभिचाराविषयी लोकांमध्ये जास्तच चर्चा झाली. लोकांची क्षुब्ध झालेली मने शांत करण्यास सीतेचा त्याग करणेच योग्य असे रामास वाटून त्याने लक्ष्मणाकडून तिला आपल्या राज्याच्या बाहेर काढून लावले. राज्यामिषिक्त महिषीबरोबर एखादी दासी देखील जाऊ दिली नाही तिचे राज्ञीपद काढून घेण्यात आले, नवऱ्याने टाकलेल्या गरीबाच्या स्त्रीची अवस्था तिला प्राप्त झाली. तिच्या उदरनिर्वाहाची काही सोय केली नाही. तिच्या माहेरीही तिला पोचविली नाही. दयाळू वाल्मिकी ऋषी तिचा प्रतिपाळ करील असा भरवसा मात्र धरला होता.

व्यभिचाराचा आरोप सीतेवर शाबीद मानून ही शिक्षा तिला भोगावयास लाविली, हे रामाचे कृत्य धर्माला सोडून आहे असे भरत, लक्ष्मण, शत्रुघ्न या तिघांपैकी एकालाही म्हणता आले नाही, कौसल्या, कैकेयी व सुमित्रा या राजमातांनीही या कामी रामाचा निषेध केल्याचे दिसत नाही. वसिष्ठादिक गुरूनीही या कामी रामाची कानउघाडणी केली नाही. यावरून त्या काळच्या रामाच्या देशातील धर्मशास्त्राप्रमाणे व्यभिचारी स्त्रीचा त्याग करणे विहित होते व त्याप्रमाणे रामाने योग्य ते धर्माचरण केले. म्हणून रामप्रजेस रामाविषयी अभिमानच वाटला पाहिजे व त्याची जिकडे तिकडे वाहवा झाली असली पाहिजे.

परंतु व्यभिचारी स्त्रीस वागविण्याचे नियम मन्वादी स्मृतीप्रमाणे अगदी निराळे आहेत. (पहा, मनु अध्याय ४१, श्लोक १७७। १७८)

विप्रदुष्टां स्त्रियं भर्ता निरुन्ध्यादेकवेश्मनि ।
यत्पुंसः परदारेषु तद्यैनां चारयेद्व्रतम् ॥
सा चेत्पुनः प्रदुष्येत्तु सदृशेनोपयंत्रिता ।
कृच्छं चांद्रायणं चैव तदस्याः पावनं स्मृतम् ।

अर्थ : व्यभिचारिणी स्त्रीला एका घरात कोंडून ठेवावे व व्यभिचारी पुरुषाला सांगितलेले प्रायश्चित्त तिच्याकडून करवावे. (१७७) समान वर्णाच्या पुरुषाबरोबर ती पुन्हा व्यभिचार करील तर तिला शुद्ध करण्याकरिता चांद्रायण व्रत करावे. (१७८)

याप्रमाणे मनूच्या मताने केलेल्या प्रायश्चित्ताने व्याभिचार घडलेली स्त्री शुद्ध होते. रावणाबरोबर सीतेचा व्यभिचार झाला असे मानले तरी रावण हा जन्माने ब्राह्मणवर्णी व कर्माने मोठा शूर लढवय्या असल्याने क्षत्रियवर्णी होता. या कारणाने फार तर चांद्रायण व्रताने तिची शुध्दी होणे योग्य होते.

अनुक्रमणिका

स्त्रिया या स्वभावतः शुद्ध आहेत. त्यांच्या हातून पाप किंवा व्यभिचार घडल्यास त्या प्रायश्चित्ताने शुद्ध होतात असे याज्ञवल्क्याचेही सांगणे आहे. (पहा, याज्ञवल्क्य स्मृती अध्याय १, श्लोक : ७१)

सोमः शौचं ददौ चासां गंधर्वश्च शुभां गिरम् ।
पावकः सर्वमेध्यत्वं मेध्या वै योषितो ह्यतः ॥

अर्थ : स्त्रियांना चंद्राने शौच, गंधर्वाने मधुरवाणी व अग्नीने सवे प्रकारची पवित्रता दिली असल्याने स्त्रिया या पवित्रच आहेत.

व्यभिचारिणी स्त्रीला कसे वागवावे हे याज्ञवल्क्य त्याच अध्यायाच्या ७० व्या श्लोकात सांगतो–

हृताधिकारां मलिनां पिण्डमात्रोपजीविनीम् ।
परिभूतामधः शय्यां वासयेद्व्यभिचारिणीम् ॥

अर्थ : व्यभिचारिणी स्त्रीचे घरातील सर्व अधिकार काढून घेऊन अल्पमूल्य वस्त्रे वापरण्यास द्यावी. केवळ जिवंत राहण्याइतके अन्न देऊन तिचा अनादर करून भूमीवर शयन करण्यास लावावे.

पण ही शिक्षा कायमची नव्हती. स्त्रिया या स्वभावतः पवित्र असल्याने ७२ व्या श्लोकात शिक्षेचा अवधी सांगितला आहे. व्यभिचारादृतौ

शुद्धिः गर्भे त्यागो विधीयते ॥ ७२ ॥

अर्थ : व्यभिचारिणी स्त्री ऋतुमती झाल्यावर व परपुरुषापासून गर्भ धारण करणारी स्त्री बाळंत झाल्यावर किंवा गर्भपतन पावल्यावर शुद्ध होते.

सीता व्यभिचारिणी झाली व तिला रावणापासून गर्भ राहिला होता असा लोकांचा समज झाला असला तरी त्या प्रसंगी सीतेला फक्त अन्नवस्त्र देऊन, एका लहानशा घरात बंद करून तिला प्रसूतीपर्यंत ठेवणे स्मृतिवचनाप्रमाणे विहित होते. रामाने शिक्षा दिल्याप्रमाणे 'घराबाहेर' हाकून लावणे हे कृत्य मनु व याज्ञवल्क्य यांच्या वचनान्वये अधर्म्यच आहे.

मनु व याज्ञवल्क्य यांशिवाय इतर स्मृतिकारही व्यभिचाराला प्रायश्चित्तार्ह ठरवीत आहेत. अंगिरा स्मृतीत स्त्रियांना पुरुषाच्या निम्मे प्रायश्चित्त सांगितले आहे.

अशीतिर्यस्य वर्षाणि बालो वाप्यूनशोडषः ।
प्रायश्चित्तार्धमर्हन्ति स्त्रियो रौगिण एव च ॥ ३३ ॥

ऐंशी वर्षांचा वृद्ध, सोळा वर्षांखालील बालक, स्त्रिया व रोगी हे अर्धप्रायश्चित्ताला योग्य होत. बृहद्यमस्मृतीच्या ४ थ्या अध्यायात

अनुक्रमणिका

घृतं योन्यां क्षिपेद् घोरं परपुंसगता हि या ॥
हवनं च प्रयत्नेन गायत्र्या चायुतत्रयम् ।
ब्राह्मणान्भोंजयेत्पश्चाच्छतमष्ठोत्तरेण हि ॥ ३७ । ३८ ॥

अर्थ : परपुरुषाशी व्यभिचार करणाऱ्या स्त्रीला तुपाने भरलेल्या भांड्यात बसवावे. बाहेर काढल्यावर गायत्री मंत्राने तीस हजार आहुती देऊन १०८ ब्राह्मणांस भोजन द्यावे, म्हणजे शुद्धी होते असे सांगितले आहे.

पाराशर स्मृतीच्या अध्यायात तर सर्वांत गर्ह्य अशा म्हणजे ब्राह्मणीच्या चांडालाबरोबर झालेल्या व्यभिचारास प्रायश्चित्त सांगितले आहे.

चाण्डालैः सह संपर्कं या नारी कुरुते ततः ॥
विप्रान्दशावरान्कृत्वा स्वयं दोषं प्रकाशयेत् ।
आकंठसमिते कूपे गोमयोदककर्दमे ॥ १९ ॥
तत्र स्थित्वा निराहारा त्वहोरात्रेण निष्क्रमेत् ।
सशिखं वपनं कृत्वा भुंजीयाद्यावकौदनम् ॥ २० ॥
त्रिरात्रमुपवासित्वा त्वेकरात्रं जले वसेत् ।
शंखपुष्पीलतामूलं पत्रं या कुसुमं फलम् ॥ २१ ॥
सुवर्ण पंचगव्यं प क्राथयित्वा पिबेज्जलम् ।
एकमुक्तंचरेत्पश्चाद्यावत्पुष्पवती भवेत् ॥ २२ ॥
व्रतं चरति तद्यावत्तावत्संवसते बहिः ।
प्रायश्चित्ते ततश्चीर्णे कुर्याद् ब्राह्मणभोजनम् ॥ २३ ॥
गोद्वयं दक्षिणा दद्याच्छुद्धिं पाराशरो ब्रवीत् ।
चातुर्वर्णस्य नारीणां कृच्छ्रं चांद्रायणं व्रतम् ॥ २४ ॥

अर्थ :चांडालाबरोबर व्यभिचार करणाऱ्या स्त्रीने कमीत कमी दहा ब्राह्मणांच्या सभेत आपले कर्म कबूल करावे. नंतर शेण कालविलेल्या पाण्याने खड्डयात निराहार एक दिवस रात्र उभे राहावे. नंतर बाहेर येऊन डोक्याचे केस दोन बोटे कातरावे व यवाचा भात खावा. पुन्हा तीन रात्र उपवास करून एक रात्र पाण्यात बसावे. शंखपुष्पी लतेचे मूळ, पान किंवा फूल, सोने व पंचगव्य यांचा काढा करून प्यावा. यानंतर रजोदर्शन होईपर्यंत एक वेळ भोजन करावे. व्रत चालू असेपर्यंत घराबाहेर राहावे. प्रायश्चित्त पुरे झाल्यावर ब्राह्मणांना भोजन, दोन गाई दक्षिणा द्याव्या; अशी शुद्धी महर्षी पाराशरने सांगितली आहे. चारी वर्णांच्या स्त्रियांच्या शुद्धीसाठी कृच्छ व चांद्रायण व्रत आहे.

यथाभूमिस्तथा नारी तस्मात्तां न तु दूषयेंत् ।
बंदिग्राहेण या भुक्ता हत्वा बद्ध्वा बलाद् भयात् ॥

मारून, बद्ध करून, घाबरवून जिचा उपभोग घेतला ती नारी भूमीसारखीच आहे, म्हणून अशा स्त्रीला दोष लावू नये.

अनुक्रमणिका

पराशराच्या मताप्रमाणे सीतेला जबरदस्तीने नेल्यामुळे तिचा उपभोग रावणाने तिला घाबरवून केला असला तरी भूमीप्रमाणेच सीता निर्दोष मानली पाहिजे. रावण हा वर सांगितल्याप्रमाणे ब्राह्मण किंवा क्षत्रियवर्णी होता. त्याच्याशी रत झाल्याने सीता दूषित झाली असे वादाकरिता मानले तरी ती कृच्छ्र व चांद्रायण व्रताने शुद्ध झाली पाहिजे. हे चांद्रायण व्रत व कृच्छ्र आपल्या कुटुंबात राहूनच करावयाचे आहे. नारीला वपन सांगितले असले तरी सर्व डोक्याचे मुंडन न करता दोन बोटे केश कापून ते करावे असे याच स्मृतीच्या ९० व्या अध्यायात ५६-६० श्लोकांत सांगितले आहे. पहा –

सर्वान्केशान्समुद्धृत्य छेंदयेदंगुलिद्वयम् ॥
एवं नारीकुमारीणां शिरशो मुंडनं स्मृतंम् ॥ ५६ ॥

सर्व केश वर उचलून दोन बोटे कातरावे. याला स्त्री व कुमारी—कन्यांचे मुंडन म्हणतात. (५६)

बंधुमध्ये व्रतं तासां कृच्छ्रचांद्रायणादिकम् ॥ ५९ ॥
गृहेषु सततं तिष्ठेच्छुचिर्नियममाचरेत् ॥

अर्थ : बंधुजनांमध्येच राहून त्यांनी कृच्छ्र चांद्रायणादी व्रत आचरावयाचे आहे. नेहमी घरी शुची व नियम पाळून राहावे.

यावरून पाराशर मताप्रमाणेही घरातून हाकून लावण्याची शिक्षा धर्माला सोडून आहे असे स्पष्ट आहे.

कृत्वा सांतपनं कृच्छ्र शुद्धेत्पाराशरो ऽ ब्रवीत।
सकृद्भुक्ता तु या नारी नेच्छन्ती पापकर्मिभिः ॥ २६॥
प्राजापत्येन शुद्ध्येत् ऋतुप्रस्त्रवणेन च ॥ २७ ॥

पंचविसाव्या श्लोकात सांगितल्याप्रमाणे बांधून नेल्यास, मारण्याचे भय दाखवून किंवा बांधून जी अत्याचार करून भोगिली जाते तीच कृच्छ्रसांतपनाने शुद्ध होते. कोणा पाप्याने स्त्रीच्या इच्छेविरुद्ध जबरीने एक वेळ भोग घेतल्यास ती प्राजापत्य व्रत करून रजस्वला झाल्यावर शुद्ध होते.

याप्रमाणे सीतेला शुद्ध करून घेणे आर्यस्मृतींच्या आधारे योग्य होते.

वसिष्ठ स्मृतीचा पुरावा

ज्या वसिष्ठावर रामाच्या गुरुत्वाचा आरोप केला आहे, त्या वसिष्ठाच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या स्मृतीत यासंबंधाने काय सांगितले आहे ते पाहू :

मनसा भर्तुरतिचारे त्रिरात्रि यावकं क्षारौदनं वः भुंजानाऽघःशयीत
ऊर्ध्व त्रिरात्रादप्सु निमग्नायाः सावित्र्यष्टशतेन शिरोभिर्जुहुयात् पूता
भवतीति विज्ञायते ॥ वाक्संबंधे एतदेव मासं चरित्वोर्ध्वमासादप्सु
निमग्नायाः सावित्र्याश्चतुर्भिरष्टशतैः शिरोभिर्जुहुयात्पूता भवतीति

अनुक्रमणिका

विज्ञायते ॥ ८ ॥ व्यवाये तु संवत्सरं घृतपटं धारयेत् ॥ ९ ॥
गोमयर्गेत कुशप्रस्तरे वा शयीतोर्ध्व संवत्सरादप्सु निमग्नायाः सावित्र्याः
त्र्यष्टशतेन शिरोभिर्जुहुयात्पूता भवतीति विज्ञायते ॥ १० ॥

अर्थ : मनाने दुसऱ्या पुरुषाची इच्छा करून पतीचा अनादर करणाऱ्या स्त्रीने तीन रात्र यवाचे पाणी अथवा दूधभात खाऊन राहावे. भूमीवर शयन करावे. तीन रात्री झाल्यावर सावित्रीच्या शिरोमंत्राने तुपाच्या ८०० आहुती नदीच्या पाण्यात द्याव्या. असे करण्याने ती शुद्ध होते. (७). जी स्त्री परपुरुषाला शब्दाने बोलवून पतीचा अनादर करते, तिने वर सांगितलेले नियम एक महिना पाळावे. नंतर नदीच्या पाण्यात सावित्रीच्या शिरोमंत्राने तुपाच्या ३२०० आहुती दिल्यावर ती शुद्ध होते. (८).

परपुरुषाबरोबर संग करणाऱ्या स्त्रीने एक वर्ष तूप लावलेले वस्त्र नेसावे, (९) किंवा शेणाच्या खाईत किंवा गवताच्या ढिगात निजावे. वर्षानंतर नदीच्या पाण्यात तुपाच्या २४०० आहुती द्याव्या म्हणजे ती शुद्ध होते. (१०)

ब्राह्मणक्षत्रियविशां स्त्रियःशूद्रेण संगताः ।
अप्रजाता विशुद्धयंति प्रायश्चित्तेन नेतराः ॥ १४ ॥

अर्थ : शूद्राबरोबर संग करणाऱ्या ब्राह्मणक्षत्रियविशांच्या स्त्रियांना शूद्रापासून मूल झाले नसेल तर त्या शुद्ध होतात. मूल होणाऱ्या शुद्ध होत नाहीत. रावण हा शूद्र नसल्याने, सीता त्याच्यापासून गर्भवती झाली होती, असे बरेरकर मामांच्या मताप्रमाणे खरे असले तरी, वसिष्ठमताप्रमाणे ती प्रायश्चित्ताने शुद्ध होण्यासारखी होती. स्त्रीला हाकून लावणे वसिष्ठास मान्य नाही.

देवल स्मृती ही काय सांगते पहा. या स्मृतीत सांगितल्याप्रमाणे उपाययोजना केल्यास बंगाल, संयुक्त प्रांत, पंजाब, सिंध वगैरे प्रांतांत हल्ली घडणाऱ्या अत्याचारास थोडाबहुत आळा पडेल. निदान इतर धर्मीयांचा फायदा होणार नाही. पहा,

अतःपरं प्रवक्ष्यामि प्रायश्चित्तमिदं शुभम् ।
स्त्रीणां म्लेच्छैश्च नीतानां बलात्संवेशने क्वचित् ॥ ३६ ॥
ब्राह्मणी क्षत्रिया वैश्या शूद्रा नीता यदातन्त्यजैः ।
ब्राह्मण्याः कीदृशं न्यायं प्रायश्चित्तं विधीयते ॥ ३७ ॥
ब्राह्मणी भजते म्लेच्छं अभक्ष्यं भक्षयेद्यदि ।
पराकेण ततः शुद्धि पादेनोत्तरतोत्तरान् ॥ ३८ ॥
न कृतं मैथुनं ताभिः अभक्ष्यं नैव भक्षितम् ।
शुद्धिस्तादा त्रिरात्रेण म्लेच्छान्नेनैव भक्षिते ॥ ३९ ॥

अर्थ : ज्या स्त्रियांना म्लेंच्छ बलात्काराने नेऊन त्यांच्याशी संभोग करतात त्या प्रसंगीचे शुभ प्रायश्चित्त मी सांगतो (३६). जर ब्राह्मणी, क्षत्रिया, वैश्या, शूद्रा यांना अंत्यज बलात्काराने नेईल तर ब्राह्मणीने काय प्रायश्चित्त करावे? (३७). जी ब्राह्मणी म्लेंच्छाला वश होऊन राहते व अभक्ष्यवस्तु (गोमांसादी) खाते ती परत घरी आल्यावर पराक व्रत करण्याने शुद्ध होते. अशा क्षत्रिय स्त्रीला तीन

पाद पराक व्रत करण्याने, वैश्य स्त्रीला पराक व्रत अर्धे करण्याने व शूद्र स्त्रीला चतुर्थांश पराक व्रत करण्याने शुद्धी प्राप्त होते. (३८). जी ब्राह्मणी म्लेंच्छाशी समागम करीत नाही व अभक्ष्यभक्षण करीत नाही, फक्त त्याच्या घरचे अन्न खाऊन राहते ती घरी आल्यावर तीन रात्र पराक व्रत करून शुद्ध होते. (३९)

गृहीता स्त्री बलादेव म्लेच्छैर्गुर्वी कृता यदि ।
गुर्वी न शुद्धिमाप्नोति त्रिरात्रेणेतरा शुचिः ॥ ४७ ॥
येषां गर्भ विधत्ते या म्लेच्छात्कामादकामतः ।
ब्राह्मणी, क्षत्रिया, वैश्या, शूद्रावर्णेतरा च या ॥ ४८ ॥
अभक्ष्यभक्षणं कुर्यात्तस्याः शुद्धिः कथं भवेत् ।
कृच्छ्रं सांतपनं शुद्धिः घृतैः योनेश्च पावनम् ॥ ४९ ॥

अर्थ : ज्या स्त्रियांना म्लेंच्छ बलात्काराने नेतात त्यांना म्लेंच्छांपासून गर्भ राहिला असल्यास प्रसूतीपूर्वी तिला शुद्धी नाही. गर्भार न राहिलेल्या स्त्रिया तीन रात्री निराहार राहण्याने शुद्ध होतात. (४७), जी ब्राह्मणी, क्षत्रिया, वैश्या किंवा वर्णसंकर स्त्री खुशीने अथवा इच्छेविरुद्ध म्लेंच्छापासून गर्भार होते व अभक्ष्यभक्षण करते तिची शुद्धी कशी होते? (४८।४९) ती कृच्छ्र सांतपन व्रत व घृताने योनिसंस्कार केल्याने शुद्ध होते.

असवर्णेन यो गर्भः स्त्रीणां योनौ निषिच्यते ।
अशुद्धा सा भवेन्नारी यावच्छल्यं न मुंचति ॥ ५० ॥
विनिःसृते ततः शल्ये रजसो वापि दर्शने ।
तदासा शुध्यते नारी विमलं कांचनं यथा ॥ ५१ ॥
स गर्भो दीयतेऽन्यस्मै स्वयं ग्राह्यो न कर्हिचित् ।
स्वजातो वर्जयेद्यस्यात् संकरः स्यादतो ऽ न्यथा ॥ ५२ ॥

भिन्नवर्णी पुरुषापासून गंर्भधारणा केलेली स्त्री गर्भप्रसव होईपर्यंत किंवा रजोदर्शन होईपर्यंत अशुद्ध आहे. त्यानंतर ती सोन्याप्रमाणे शुद्धच आहे. अशा गर्भापासून झालेले मूल दुसऱ्या जातीत देऊन टाकावे. त्याचे ग्रहण केल्याने वर्णसंकर होईल. (५१।५२).

अत्रि स्मृतींतही यालाच अनुसरून प्रायश्चित्ताला संमती आहे. पहा,

अशुद्धा सा भवेन्नारी यावद् गर्भ न मुंचति ।
असवर्णात्तु यो गर्भः स्त्रीणां योनौ निशिच्यते ॥ १९१ ॥
विमुक्ते तु ततः शल्ये रजश्चापि प्रदृश्यते ॥ १९२ ॥
तदासा शुध्यते नारी विमलं कांचनं यथा ॥ १९३ ॥

अन्त्यज शब्दाची व्याख्या अत्रिस्मृतीत दिलेली आहे. (श्लोक १९५। १९६).

रजकश्चर्मकारश्च नटो बुरुड एव च ।
कैवर्तमेदभिल्लाश्च सप्तैते अन्त्यजाः स्मृताः ॥

अनुक्रमणिका

एतान् गत्वा स्त्रियो मोहात्भुक्त्वा च प्रतिगृह्य च ॥
कृच्छ्राब्दमाचरेज्ज्ञानादज्ञानादैन्दवद्वयम् ॥
सकृद्भुक्ता तु या नारी म्लेच्छैः सा पापकर्मभिः ॥ १९७ ॥
प्राजापत्येन शुद्ध्येत ऋतुप्रस्त्रवणेन तु ॥
बेलोद्धृता स्वयंवापि परप्रेरितया यदि ॥ १९८ ॥
सकृद्भुक्ता तु या नारी प्राजापत्येन शुद्धति ॥ १९९ ॥

परीट, ढोर, चांभार, नट, बुरूड, कैवर्त, मेद, भिल्ल या सात जातींच्या लोकांना अंत्यज म्हणावे. यांच्याशी मोहाने स्त्रिया जातील माणि त्यांचा भोग घेतला जाईल तर हे कृत्य जाणून झाले असल्यास एक वर्ष व अज्ञानाने झाले असल्यास दोन यास कृच्छ केल्याने शुद्धी होते. पापकर्मी यवनांनी एक वेळ भोगलेली स्त्री प्राजापत्य प्रायश्चित्ताने ऋतुस्नान झाल्यावर शुद्ध होते. तेच प्रायश्चित्त जबरीने ओढून नेल्यावर किंवा स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या प्रेरणेने गेलेल्या एक वेळ भोगलेल्या स्त्रीला आहे.

संवर्त स्मृती

चांडालं पुक्कसं चैव श्वपाकं पतितं तथा ।
एताः श्रेष्ठाः स्त्रियो गत्वा कुर्याच्चांद्रायणव्रतम् ॥ १७३ ॥

याप्रमाणे बहुधा प्रत्येक स्मृतीत व्यभिचारी स्त्रीला प्रायश्चित्ताने शुद्धी होते असे सांगितले आहे. तिचा त्याग करावा असे कोठेही सांगितलेले नाही. रामाने तर सीतेचा त्याग केलेला आहे व तो त्याग विशेष निष्ठुरपणे केलेला आहे. आमचे आर्यस्मृतिकार व्यभिचाराला पातक समजतात व शुद्धीसाठी प्रायश्चित्त सांगतात. सर्व स्मृतींत पुरुषांनाही व्यभिचाराबद्दल प्रायश्चित्त सांगितले आहे व तशाच अपराधाबद्दल स्त्रीला तेच प्रायश्चित्त अर्ध प्रमाणात द्यावे असे काही स्मृतिकार सांगतात. आमचे आर्यस्मृतिकार व्यभिचाराच्या पातकाच्या बाबतीत स्त्रीपेक्षा पुरुषावर जास्त जबाबदारी ठेवीत आहेत. निदान त्यांनी दोघांस समान प्रायश्चित्त सांगितले आहे. पण आजचा आचार व लोकांचा समज पाहिल्यास आमच्या मूळच्या स्मृतींतील सर्व वचने बाजूस टाकून देऊन पुरुषाचा व्यभिचार हे मुळीच पातक नाही, त्याला त्याबद्दल प्रायश्चित्त घेण्याची आवश्यकता नाही; पुरुष हा सोन्याचे भांडे; तो नेहमीच शुद्ध; असा समज नेहमीच्या भाषणात दिसतो व आचारही तसाच. स्त्रिया मात्र मातीच्या भांड्यासारख्या एकदा भ्रष्ट झाल्या की त्यांना शुद्धी नाही. मातीचे भांडे फोडून टाकतात त्याप्रमाणे व्यभिचारी स्त्रियांना टाकून द्यावे असा आजचा समज व आचार आहे. आमचे मूळचे शास्त्र तर याच्या अगदी उलट. स्त्रिया मूळच्याच शुद्ध आहेत असे याज्ञवल्क्य व इतर ऋषी कंठरवाने सांगतात तर त्या मूळच्या अशुद्ध असे समाज मानतो. पुरुष हा व्यभिचाराने पतित होतो असे शास्त्र सांगते. याच्या उलट आजचे ब्राह्मणादी सर्व लोक पुरुष हा शुद्धच आहे असे मानतात. स्त्रियांच्या व्यभिचारदोषाचा परिहार प्रायश्चित्ताने होतो असे शास्त्र कंठरवाने सांगत आहे; तर तिचा त्यागच केला पाहिजे अशी आजची समजूत व आचार. आम्हा आर्यांची स्त्रियांविषयीची मूळची आदरबुद्धी व न्यायबुद्धी जाऊन तिच्या ठिकाणी अनादर व सूड उगविण्याची बुद्धी उत्पन्न झाली आहे असे आज दिसून येत आहे.

शास्त्रकारांच्या वचनास बाजूला टाकून पुरुषांना मात्र वाटेल त्या सवलती व स्त्रियांना मात्र शास्त्राला पसंत नाही असा जाच, अशी आजची स्थिती आहे. पुरुषाने कोणत्याही स्त्रीबरोबर व्यभिचार करावा. त्याला प्रायश्चित्त घेऊन शुद्ध होण्याची जरुरी नाही. तो जन्मतःच शुद्ध समजला जातो. त्याच्याशी व्यभिचार करणारी स्त्री समाजातून पतित होते. तिला प्रायश्चित्ताने शुद्ध करून घेता येते ही गोष्ट बहुतेक विसरून

अनुक्रमणिका

गेलेली आहे. आमच्या समाजाची अशी ही स्थिती होण्याची जबाबदारी बरेच अंशाने रामाच्या वर्तणुकीवर आहे, असे म्हणता येईल.

वसिष्ठ स्मृतीतील वचने वर दिलीच आहेत. व्यभिचाराचा आरोप सीतेवर शाबीत झाला असला तरी त्या पापाची प्रायश्चित्ताने शुद्धी व्हावयास पाहिजे. पण रामाने या वसिष्ठस्मृतीचा अनादरच केला आहे. यावरून स्मृतिकार वसिष्ठ हा रामाचा गुरु किंवा पुरोहित असणे संभवनीय नाही. राम हा आर्यस्मृती न मानणारा परदेशचा राजा असला पाहिजे.

राम हा आर्यावर्तातील अयोध्येचा राजा व तो विष्णूचा अवतार अशी चुकींची समजूत झाल्याने रामाची वागणूक योग्य असलीच पाहिजे असे वाटून सीतेला निर्दयपणे घालवून देण्याचे रामाचे कृत्य योग्य व धर्मशास्त्राला मान्य असेच पुष्कळांस वाटू लागले. धर्मशास्त्राचा अभ्यास मागे पडला होताच. रामायणादी ग्रंथांच्या पारायणाने व हरिदासांनी लावलेली रामचरित्रपर आख्याने ऐकून व्यभिचारी स्त्रीचा त्यागच विहित अशी लोकांची समजूत झाली व याचा परिणाम स्त्रियांस वागविण्याच्या कामी निष्ठुरपणा वाढू लागला आहे. स्त्रिया या याज्ञवल्क्य मताने मूळच्या स्वभावतःच शुद्ध आहेत, ही कल्पना जाऊन स्त्रिया या अशुद्धच आहेत असा समज वाढत चालला. या अनिष्ट प्रकाराची जबाबदारी रामायणाच्या शिकवणीवर पडते.

स्मृतिकारांच्या वचनांचा विचार केल्यास स्त्रियांचा व्यभिचार ही प्रायश्चित्ताने शुद्ध होण्याची बाब होती. पतिव्रताधर्माचे बंड त्या वेळी फार कमी होते. आमचे पूर्वीचे आर्य ऋषिपूर्वज पातिव्रत्यावर फारसा जोर देत नसत. स्त्रीच्या हातून व्यभिचार झाल्यास तो गुन्हा कबूल केल्यास तो दोष कमी होतो अशी समजूत होती.

एका ऋतुयागात (शतपथ ब्राह्मण २—५—२, २०) यजमानपत्नी आणताना प्रतिप्रस्थाता काय करतो याचे वर्णन आहे.

'नंतर प्रतिप्रस्थाता यजमानाची पत्नी बसली असेल त्या जागेकडे जातो आणि तिला आणताना विचारतो की, 'तू कोणाबरोबर व्यभिचार करतेस? कारण एकाशी लग्न लागलेली स्त्री जर दुसऱ्याबरोबर व्यभिचार करील तर ती वरुणाचा मोठा अपराध करील.' असे विचारताना प्रतिप्रस्थात्याचा उद्देश 'मनामध्ये कोणतीही गोष्ट जाचत असता यज्ञ करणे दोषावह आहे' हे तिला समजावे असा आहे. म्हणून तो असा प्रश्न विचारतो. आपले पाप कबूल केले असता कमी होते; कारण मग ते सत्यच होते. याच कारणास्तव तो तिला विचारतो. जे पाप ती कबूल करणार नाही त्याचे परिणाम तिच्या नातेवाईकांस भोगावे लागतील.'

(पहा ज्ञानकोष : विभाग दुसरा, पृष्ठ १५७)

पण रामायणकथा हिंदी आहे व त्यातील धर्माचे तत्त्व या देशात मान्य आहे असा समज वाढत चालला. तेव्हा स्त्रीधर्मात पातिव्रत्यास महत्त्व आले व सीता—सावित्री पतिव्रता होत्या यावर जोर देण्यात येऊ लागला. आजही सीता या पतिव्रतांत अग्रगण्य आहेच. 'पंचकन्या' म्हणून ज्यांना म्हणतात व ज्यांचे स्मरण नित्य करावे व त्यापासून मोठ्या पातकांचा नाश होतो असे सांगितले आहे त्या पंचकडींतील चार रामायणात वर्णिलेल्या स्त्रिया आहेत. हे लक्षात घेणे जरूर आहे. यावरून रामायणाचा पगडा आमच्या लोकांच्या मनावर किती दृढ आहे, हे दिसून येत आहे.

अनुक्रमणिका

रामाने केलेला सीतेचा त्याग आमच्या स्मृतिकारांस मान्य नाही. म्हणजे रामाला आमच्या स्मृती मान्य नव्हत्या. त्याचा गुरुही वसिष्ठ नव्हता. तो असता तर त्याने वसिष्ठ—स्मृतीप्रमाणे आचरण केले असते. यावरून राम हा कोणत्यातरी लांबच्या देशाचा राजा होता. तो देश इजिप्त असावा असे मल्लादी व्यंकटरत्नम् प्रमाणेच आम्हासही वाटते.

सर फ्लिन्डर्स पेट्री यांच्या ग्रंथातील एक अवतरण या ग्रंथातील एका लेखात दिले आहे. त्यातील अखेरच्या भागाचा मराठी आशय या ठिकाणी उतरून घेतो.

सहाव्या वंशाचे राज्य असता प्रत्यक्ष राणीची चौकशी एका न्यायाधिशाने केली व दुसऱ्या न्यायाधिशाच्या मदतीने त्याने आपला निर्णय लिहिला असे नमूद आहे. या चौकशीच्या कामी राजाला काही भाग घेता आला नाही. इतर मोठ्या गुन्ह्यांच्या कामी अखेरचे हुकूम राजाच्या नावाने निघत त्याप्रमाणे या राणीच्या खटल्यातही निघाला असेल. पण कोणाची चौकशी होऊन अपराध शाबीत होण्याचे काम पूर्णपणे न्याय देण्याच्या पद्धतीत सांगितलेल्या नियमांस अनुसरून चाले.'

प्राचीन इजिप्त देशाच्या राज्यपद्धतीस अनुसरून सीतेच्या बाबतीत वर्तन झाले आहे असे थोड्या विचारांती दिसून येते. रामायणकथेत सीतेची चौकशी झाल्याची व न्यायाधिशाने अपराध शाबीत मानल्याची हकीगत दिलेली नाही. तथापि तसा काही तरी प्रकार असावा व त्या ठरावात रामाला किंवा त्याच्या भावांना किंवा कोणाला फेरफार करण्याचा अधिकार नसावा. निमूटपणे तो ठराव अमलात आणणे भाग होते असेच रामाच्या व इतरांच्या वर्तनावरून दिसते. सीतेला नेऊन आपल्या राज्याच्या हद्दीबाहेर सोडण्यास रामाने लक्ष्मणास सांगितले, तेव्हाही 'मला इष्ट असलेल्या गोष्टीचा विधात होत असल्याने मजविरुद्ध बोलणारे शत्रू समजले जातील,' असे राम स्पष्ट सांगत आहे. या ठिकाणी 'अहित' शब्दाचा रूढार्थ शत्रू न घेता हितविघात करणारे असा यौगिक अर्थ घेणे बरे दिसते. राजाने न्याय देण्याच्या कामी आपल्या इच्छेप्रमाणे ढवळाढवळ केल्यास प्रजा नाराज होऊन राजालाच काढून टाकील अशी भीती त्यास असावी. एकंदरीत सीतात्यागाच्या बाबतीत रामाने जे वर्तन केले ते हिंदी आर्यसंस्कृतीच्या अगदी उलट होते. ते पुराण मिसरच्या चालीरीतीस अनुसरून आहे असे दिसते. या अखेरच्या पुराव्याने पूर्वीचेच अनुमान राम हा पुराण इजिप्तचा राजा असावा हे सिद्ध होत आहे.

महाराष्ट्र—शारदा : ऑगस्ट, १९३६

अनुक्रमणिका

१६ रामायणातील काही अनार्य चाली

रामाच्या चरित्रातील वालीवध, रामाची दिनचर्या व व्यभिचारासाठी सीतेचा त्याग, या व यांच्यासंबंधी गोष्टी घेऊन राम हा आर्य संस्कृतीचा नव्हता व तो इजिप्शन संस्कृतीचा होता असे दाखविण्यात आले आहे. या काव्यातील गौण पात्रांचा व गौण गोष्टींचा विचार करून त्यांचे आचारविचार आर्य संस्कृतीस मिळते नाहीत व ते इजिप्तच्या पुराण संस्कृतीस मिळते आहेत, असे आणखी दाखवावयाचे आहे.

प्रथमतः ताटकावधाचा प्रसंग घेऊ. ताटका ही आततायिनी होती म्हणून तिचा वध करणे प्राप्त होते. यात गैर झाले असे म्हणता येत नाही. ती रामावर शिलांचा वर्षाव करीत होती, रामाने बाण मारून तिचे दोन्ही हात तोडून टाकले. (बालकाण्ड, श्लोक १७) त्यानंतर

ततच्छिन्नभुजां श्रांतां अभ्यासे परिगर्जतीम् ।
सौमित्रिरकरोत्क्रोधात् हृतकर्णाग्रनासिकाम् ॥ १८ ॥

'तेव्हा ती हाततुटकी ताटका थकून जाऊन लक्ष्मणासमीप गर्जना करू लागली असता सुमित्रापुत्र लक्ष्मणाने रागारागाने तिचे कान व नाक कापून काढले.' हा लक्ष्मणाचा पराक्रम तिरस्कारार्ह आहे. हाततुटकी व म्हणून असमर्थ झाल्यावर त्या स्त्रीचे नाक व कान कापणे हे कृत्य शूरास शोभत नाही. आमच्या आर्यस्मृतीप्रमाणे स्त्रीचीं अशी विटंबना करणे अगदी गर्ह्य आहे. लक्ष्मणाची संस्कृती याप्रमाणे आर्यसंस्कृतीहून भिन्न होती हे दिसून येते. रामाने लक्ष्मणाचा निषेध केला नाही यावरून हे कृत्य त्यास पसंत होते. याप्रमाणे रामही लक्ष्मणाच्याच अनार्य संस्कृतीत वाढलेंला होता. शूर्पणखेचे नाककान कापून लक्ष्मणाने रामाच्या संमतीने हाच पराक्रम गाजविल्याचे पुढे घडले आहे. यावरून ही त्यांची युद्धनीतीच असावी.

घोर तपश्चर्येत मुले

आता पुढे बालकांडाच्या ५७ व्या सर्गात विश्वामित्राच्या तपाचे वर्णन आहे.

स दक्षिणां दिशं गत्वा महिष्यासह राघव।
ततप परमं धोरं विश्वामित्रो महातपाः ॥ २ ॥
फलमूलाशनो दान्तः चचार परमं तपः ।
अथास्य जज्ञिरे पुत्रः सत्यधर्मपरायणाः ॥ ३ ॥

अर्थ : महातपस्वी विश्वामित्र आपल्या पत्नीसह दक्षिण दिशेस गेला आणि हे रघुवंशजा रामा, तेथे फारच भयंकर तपश्चर्या करू लागला. (२). फलमूले भक्षण करून त्या जितेंद्रिय विश्वामित्राने उत्कृष्ट तपश्चर्या केली. नंतर सत्य व धर्म यांविषयी तत्पर असे पुत्र झाले. (३).

इंद्रिये दमन करणारा जितेंद्रिय, तपस्वी अनेक पुत्र होईपर्यंत तप करतो हे आमच्या आर्य कल्पनेला अमान्य आहे. आमच्याकडील साध्या अनुष्ठानांतही व्रतस्थ राहावे लागते. स्वस्त्रीसंग देखील करावयाचा नाही. यज्ञातही तसेच. मग सिद्धी प्राप्त करून घेण्याच्या उद्देशाने केलेल्या तपात इंद्रियांचे पूर्ण दमन केलेच

अनुक्रमणिका

पाहिजे. येथे तर चार पुत्र विश्वामित्राला झाले तरी त्याचे तप चालूच आहे. ही कल्पना आर्यांची नसून इजिप्शन आहे. एकूण रामायणातील विश्वामित्रही तिकडचाच.

अयोध्याकांड सर्ग ६, श्लोक १ ते ४ यात राम नारायणाचे ध्यान करू लागला (श्लोक १). नंतर आज्यस्थाली घेऊन नारायण देवतेला उद्देशून प्रज्वलित अग्नीमध्ये आज्याचा होम केला (श्लोक २). शेष राहिलेले आज्य प्राशन करून आपणास प्रिय असलेली गोष्ट सिद्धीस जाण्याविषयी त्याने ईश्वराची प्रार्थना केली आणि नारायण देवतेचे चिंतन करीत करीत तो राम देवगृहात दर्भास्तरणावर सीतेसह वाङनियम व आत्मसंयमन करून पडला. (श्लोक ३।४).

तूप पिण्याची चाल कुणाची ?

अग्नीत आहुती देण्याच्या तुपातील अवशिष्ट तूप पिण्याची रूढी आर्यात नाही. ते सर्व तूप मागाहून होमात घालावे—लागते. रामायणात सांगितलेली चाल परदेशाची आहे. कोणत्याही यज्ञ वगैरे विशेष कृत्यात तुपाचे हवन सांगितले आहे. पण अवशिष्ट तूप यजमानाने प्राशन करणे हा विधी आम्हास तरी कोठे आढळलेला नाही. फक्त वाजपेययज्ञात यजमानावर हुतशेष आज्याने विधिपूर्वक अभिषेक करण्यात येतो असे सांगितले आहे. विवाहहोम हा बहुतेकांच्या माहितीतील आहे. यात अवशिष्ट राहिलेले तूप व लाह्या यांचे अखेर हवन केले जाते. शेष राहिल्या आज्याचे प्राशन करणे ही चाल आर्यांची नव्हे.

The Sacrifices (in ancient Egypt) were of animals and vegetables, with libations of wine, and burning of incense. (पहा Encyclopoedia Britanica IXth edition Vol. VII, page 719)

पुराण इजिप्तात होम हा पशूच्या मांसाचा आणि वनस्पतीचा करीत. त्याबरोबर मद्यही थोडे ओतीत व धूप जाळीत. यज्ञात मद्याचा उपयोग आमच्याकडील सोमरसासारखाच देवाच्या नावाने थोडे अग्नीत टाकावयाचे व बाकीचे ऋत्विजांनीं पिऊन टाकावयाचे, असा प्रघात होता.

रामायण ग्रंथ बुद्धोत्तर कालात तयार झाला. बुद्धाच्या शिकवणीने यज्ञातील हिंसा व सोमासारखे उन्मत्त करणारे म्हणजे अंगावर येणारे पेय नाहीसे झाले. मद्यसेवनही बंद झाले होते. मग त्याचा नैवेद्य सोडणे व अवशिष्ट पिणे ही चाल इकडे नव्हतीच. यामुळे तिकडील काव्याचे रूपांतर करताना मद्याच्या बदला तूप हवन केले गेले, असे वर्णन करावे लागले व त्याबरोबर अवशिष्ट तूप पिण्याचा प्रसंग रामावर आला.

अयोध्याकांड सर्ग ३५, श्लो. ९

'यथावयो हि राज्यानि प्राप्नुवन्ति नृपक्षये ।
इक्ष्वाकुकुलनाथेस्मिंस्तं लोपयितुमिच्छसि'॥ ९ ॥

'राजाच्या मरणानंतर वयाच्या क्रमाला अनुसरून त्यांच्या पुत्रांना राज्ये प्राप्त होत असतात; परंतु हा इक्ष्वाकुकुलाचा अधिपती दशरथ जिवंत असतानाच त्या क्रमाचा लोप करण्याची तू इच्छा करीत आहेस.' हे वचन सुमंत्र प्रधान कैकेयीस उद्देशून बोलत आहे. राजपुत्रांनी आपल्या वयाच्या क्रमाने राज्यावर बसावे,

याविषयीचा अयोध्येचा कायदा सुमंत्रासारखा जबाबदार मंत्री पुढे ठेवीत आहे, तेव्हा तो त्या कालचा व त्या देशाचा संप्रदाय असलाच पाहिजे. वाली–सुग्रीव यांच्या राज्यातही तीच चाल होती.

राज्याचा वारसा कुणाकडे जावा?

त्यांचा बाप मेल्यावर थोरला भाऊ वाली बापाबरोबर युवराज होता तो राजा झाला व त्याचा धाकटा भाऊ सुग्रीव यास युवराजपद मिळाले. वालीला रामाने मारल्यावर युवराज सुग्रीव हा राजा झाला व वालीचा पुत्र अंगद यास युवराजपद मिळाले.

आपल्या वयाच्या क्रमाने राजपुत्रांनी बापाच्या गादीवर बसावे अशी इक्ष्वाकुवंशाची परंपरा सुमंत्र सांगतो, ती कैकेयीला कबूलच आहे. (पहा, अयोध्याकांड सर्ग ८, श्लो. १६).

भरतश्चापि रामस्य ध्रुवं वर्षशतात्परम् ।
पितृपैतामहं राज्यमवाप्स्यति नरर्षभः ॥

अर्थ : पुरुषश्रेंष्ठ भरतालाही रामाने शंभर वर्षे राज्य केल्यावर पितृपितामहादी परंपरेने चालत आलेले राज्य निःसंशय मिळेल.

आर्यांच्या स्मृतिग्रंथाप्रमाणे राजाच्या पश्चात त्याच्या ज्येष्ठ पुत्राला वारसा येतो. तसा पुत्र असल्यास तो राजा होतो. मयत राजाच्या धाकट्या भावास गादी मिळण्याचा हक्क नाही. पण रामाच्या कुलातील वारसाची पाल अगदी भिन्न. भावांना वयाच्या क्रमाने राज्यप्राप्ती व्हावयाची. राम वनवास संपवून परत आल्यावर त्याला राज्याभिषेक झाला तेव्हा लगेच भरतास युवराजपद मिळाले. म्हणजे रामाच्या पश्चात भरत राजा व्हावयाचा हे निश्चित होते. यावरून राम हा निःसंशय आर्यांहून भिन्न अशा संस्कृतीचा असला पाहिजे.

राजा दशरथ मरण पावला, तेव्हा त्याच्या चार पुत्रांपैकी कोणीही जवळ नव्हते. (पहा, अयोध्याकांड सर्ग ६६)

तैलद्रोण्यां तदामात्याः संवेश्य जगतीपतिम् ।
राज्ञः सर्वाण्यथादिष्टाः चक्रुः कर्माण्यनन्तरम् ॥ १४ ॥
न तु स कालनं राज्ञो विना पुत्रेण मंत्रिणः ।
सर्वज्ञाः कर्तुमीषुस्ते ततो रक्षति भूमिपम् ॥ १५ ॥

अर्थ : तदनंतर तेलाने भरलेल्या एका कढईमध्ये अमात्यांनी त्या भूपतीला निजविले आणि वसिष्ठादिकांची आज्ञा झाल्यावर राजाच्या सर्व पुढल्या कर्माची व्यवस्था ते करू लागले (१४). त्या सर्वज्ञ मंत्र्यांना पुत्रांवाचून राजाचे प्रेत नेणे योग्य न वाटल्यामुळे ते त्या भूपतीला तेलाच्या कढईत ठेवून रक्षण करीत बसले (१५).

अनुक्रमणिका

ममीकरणाचा स्पष्ट पुरावा

पुत्र जवळ नाही म्हणून प्रेतरक्षण करून १२। १३ दिवस ठेवणे हा आर्यांचा संप्रदाय नाही. या आर्यावर्तात हजारो राजे होऊन गेले. सर्वांचेच पुत्र मरणसमयी जवळ असतात असे नाही. पण रामायणाखेरीज इतर कोणत्याही ग्रंथात तेलाने भरलेल्या कढईत प्रेत ठेवल्याचे उदाहरण नाही. जास्त वेळ प्रेत ठेवावयाचेच नाही ही आमची चाल. मुलगा जवळ असो–नसो. राजघराण्यातील कोणी तरी इसम और्ध्वदेहिक कर्म करणारा नेमलेलाच असतो. पण राम व रामायण ही दोन्हीही अनार्य संस्कृतीची व त्यांच्या देशात प्रेताची ममी करण्याचा संप्रदाय होता. राजांच्या ममीकरणाकरिता तेलात प्रेत ठेवणे हा पहिला पर्याय. (पहा– 'Religious Life in Ancient Egypt' by W.M. Flinders Petrie, p. 136)

The period of dealing with the body is variously recorded, depending on changes of custom and differences of rank. The kings of the earliest dynasties had an interregnum of 45, 60 or 52 days, apparently for the ceremonies. In Genesis the period is put at 40 days embalming and, in all, 70 days' mourning. Later in the tale of Setna, the body is placed in the 'Good House' till the 16th day, (apparently salted or spiced) then rapped till the 35th day, (the long process of bandaging) and laid out till the 70th day – that is mourning.

P.137 – In the preparation of the mummy, opening of the body was essential. This was done by a long slit, usually on the left side, from the hip upto the ribs. The whole of the viscera and lungs were removed for separate embalming and only the heart was left. The interior of the body was coated with resins and perfumes and then sewn up again, after which it was placed in the brine bath for some weeks. A simpler method was to inject a large quantity of cedar oil before placing in the brine; this allowed of a slow and inoffensive dissolution of the viscera, which were discharged with the oil afterwards; only skin and the bone were left. The cheapest method was merely to remove the viscera and soak in brine. The salt bath, if used concentrated, would remove the water from the tissues and as well as prevent decomposition. The muscles were, however, not hardened by the salt, but were partly reduced to pulp. In the XXI dynasty it became usual to replace this by stuffing. The mouth and nose, were packed with soft soap of butter and soda. The viscera, after soaking in salt, were then made up into parcels with bandages. In early times they were laid on a shelf in the tomb in jars.

In the new kingdom, the object in view was to retain the muscles of the body in a sound condition by saturation, with oils, even though shrunken, and some of the royal mummies are marvellously life–like'

हा उतारा पुष्कळच लांब झाला आहे; पण ममीकरणाच्या कृतीची माहिती वाचकांस व्हावी म्हणून तो दिला आहे. या उताऱ्याचा थोडक्यात सारांश :

अनुक्रमणिका

'प्रेताची व्यवस्था होण्यास मयताच्या दर्जाप्रमाणे दीड दोन महिने लागत. पुढे पुढे तर एकंदर ७० दिवस लागत व तोपर्यंत दुसरा राजा केला जात नसे.

'प्रेताच्या डाव्या अंगास कुल्यापासून बरगडीपर्यंत एक लांब चीर पाडून त्यातून आतडी, काळीज, फुफ्फुसे वगैरे काढून ती स्वतंत्रपणे मसाल्यात घालीत. रक्ताशय काढला जात नसे. शरीराच्या आतल्या भागाला सुगंधमिश्रित राळेचे लिंपण देत व ती चीर पुन्हा शिवून टाकीत. नंतर ते शरीर मिठाच्या पाण्यात बुडवून ठेवीत. मिठाच्या पाण्यात ठेवण्याअगोदर बरेचसे तेल शरीरात ओतणे ही सोपी युक्ती होती. या पद्धतीत आतली आतडी व इतर अवयव मंद गतीने पण घाण न सुटता तेलाबरोबर द्रव होऊन बाहेर येत व कातडी आणि हाडे तेवढी शिल्लक राहात असत. कमी खर्चाची पद्धती म्हणजे कोथळ्यातील आतडी वगैरे सर्व इंद्रिये काढून घेऊन मिठाच्या पाण्यात बुडवून ठेवणे ही होय पाण्यात मिठाचे प्रमाण जास्त ठेवल्यास त्वचेतील ओलावा नाहीसा होऊन कुजण्याची क्रिया बंद होत असे. मिठाने स्नायू घट्ट न होता त्यांचा चुरा होई २१ व्या वंशात शरीरात मसाला भरण्यास सुरुवात झाली. नाक व तोंड ही लोणी व सोडा यांच्यापासून केलेल्या लबलबीत साबणाने बंद करीत...नवीन राज्यात स्नायू सुरक्षित राखण्याच्या उद्देशाने प्रेत तेलात बुडवून ठेवीत...यामुळे शरीर आकसले जाई. काही राजांच्या ममी आश्चर्य करण्यासारख्या अगदी ताज्या राहिल्या आहेत.'

महाभारत व पुराण आणि वेंदातील ब्राह्मणे यांत राजांच्या मरणाच्या पुष्कळ कथा आहेत. पण प्रेत तेलात ठेवण्याचा प्रकार वाचनात व ऐकण्यात दशरथाशिवाय दुसरा कुणाचा नाही. यावरून ही पद्धत आमच्याकडे नसल्याने दशरथ व त्याचे पुत्र इजिप्शन संस्कृतीचे होते असे अनुमान होते.

दशरथाच्या मरणानंतर राज्यावर कोणास बसवावे यासंबंधाने दरबार भरविण्यात आला. तेथे मोठे विद्वान ब्राह्मण अमात्यांसह जमले. ते वसिष्ठमुनींकडे तोंड करून बसले आणि राजकार्यासंबंधाने वेगवेगळी बोलणी बोलू लागले. (अयोसर्ग ६७. श्लो. ४). ते म्हणाले, 'महाराज दशरथ स्वर्गवासी झाला आहे; राम अरण्यात गेला आहे; तेजस्वी लक्ष्मणही रामाबरोबर चालता झाला आहे. (६) आणि उभयता शत्रुतापन भरत—शत्रुघ्न केकय देशातील राजधानीमध्ये रमणीय राजवाड्यात आपल्या आजोळी आहेत.' (७)

'इक्ष्वाकूणामिहाद्यैव कश्चिद्राजा विधीयताम् ।
अराजकं हि नो राष्ट्रं विनाशं समवाप्नुयात्' ॥ ८ ॥

'इक्ष्वाकू वंशजांपैकी आजच्या आज कोणी तरी राजा करावा. कारण हे आपले राष्ट्र असेच अराजक राहू दिले असता नाश पावेल. अराजक राष्ट्र कसे नाश पावते याविषयी विस्तार केल्यावर ते म्हणाले—

'स नः समीक्ष्य द्विजवर्य वृतं नृपं विना राष्ट्रमरण्यभूतम् ।
कुमारमिक्ष्वाकुसुतं तथान्यं त्वमेंव राजानमिहाभिषेचय' ॥ ३८ ॥

अर्थ : 'हे द्विजश्रेष्ठ वसिष्ठमुनी, आपण आमच्या म्हणण्याकडे लक्ष द्या आणि इक्ष्वाकु कुलातील एखाद्या राजपुत्राला अथवा दुसऱ्या कोणाला आपण आज ह्या राज्याचा अभिषेक करा. कारण राजाविना हे राष्ट्र अरण्यवत् झालेले आहे.' (३८).

अनुक्रमणिका

वसिष्ठाला ही सूचना पसंत पडली नाही. दशरथाने भरताला राज्य दिलेले आहे. तेव्हा त्याला आणा असे ते म्हणाले व सर्वांना तो विचार पसंत पडला.

पण या प्रसंगावरून एक राजा मेल्यावर राज्यावर कोणी यावे यासंबंधाने अयोध्येच्या राज्यातील लोकांचे कायदे काय होते ते दिसते.

१. एक राजा मेल्यावर त्याच्या घराण्यातील मंत्री व उपाध्यायवर्ग यांना पसंत पडेल त्या जवळच्या वा दूरच्या राजपुत्राला किंवा दुसऱ्या कोणालाही राजा केला तरी चाले.

२. आपल्या मागे कोणी राजा व्हावे हे मरणापूर्वी सिंहासनस्थ राजाने ठरविल्यास तो राजा होई. राजाच्या ज्येष्ठ पुत्राला वारस मानला जात नसे.

ज्येष्ठ पुत्रच गादीवर बसावा असा इक्ष्वाकूंचा नियम आहे असा श्लोक भरताच्या तोंडी घातला आहे. (पहा सर्ग ७४, श्लोक २२).

'सततं राजपुत्रेषु ज्येष्ठी राजाभिषिच्यते ।
राज्ञामेतत्समं तत्स्यादिक्ष्वाकूणां विशेषतः'॥

अर्थ : 'राजकुमारांमध्ये जो श्रेष्ठ असेल त्यालाच नेहमी राज्याभिषेक होत असतो; ही गोष्ट सर्व राजांना सारखीच लागू असून इक्ष्वाकू कुलातील राजांमध्ये तर विशेषेकरून हा नियमच आहे.'

आर्यांशी विसंगत आचार

परंतु हा आचार वसिष्ठांना व इतर दरबाऱ्यांना माहीत नव्हता व तो त्यांना मान्य नव्हता असे वर दाखविलेच आहे. इतकेच नव्हे, तर दशरथाच्या शवाचे दहन झाल्यावर सर्व राज्यकार्यधुरंधर पुरुष एकत्र जुळून भरताला राज्य स्वीकारण्याचा आग्रह करू लागले. (सर्ग ७९, श्लो. १) ते म्हणतात –

'त्वमद्य भव नो राजा राजपुत्र महायशः ।
संगत्या नापराध्नोति राज्यमेतदनायकम्'॥ ३ ॥

अर्थ : 'हे महाकीर्तिमान राजपुत्रा, तू आमचा राजा हो. तू राजा होणे पित्याच्या आज्ञेशी जुळत असल्यामुळे तुझ्याकडे काही दोष येणार नाही. सांप्रत या राजाला कोणी नायक नाहीं.' (३). यावरून त्या देशाचा आचार दिसून येत आहे व तो आर्यांच्या विचारांशीं व नियमांशी अगदीच विरुद्ध आहे. यावरून भरताच्या देशात आर्यस्मृती प्रमाण नसून त्यांच्या स्वतंत्र स्मृती असाव्यात.

प्रेतसंस्कारांतही अनार्यत्व

दशरथाच्या प्रेतयात्रेत –

शिबिकामिश्च यानैश्च यथार्ह तस्य योषितः ।
नगरान्निर्ययुस्तत्र वृद्धैः परिवृतास्तथा ॥

(सर्ग ७७ श्लोक १९)

प्रसव्यं चापि तं चक्रुः ऋत्विजोग्निचितं नृपम् ।
स्त्रियश्च शोकसंतप्ताः कौसल्याप्रमुखास्तदा ॥ २० ॥
ततो रुदन्त्यो विवशा विलाप्य च पुनः पुनः ।
यानेभ्य सरयूतीरमतेरुर्नुपांगनाः ॥ २२ ॥
कृत्वोदकं त भरतेन सार्ध न्पांगनामंपिुरोहिताश्च।
पुरं प्रविश्याधुपरीतनेत्रा भूमौ दशाहं व्यनयन्त दुःखम् ॥ २६॥

अर्थ : योग्यतेप्रमाणे पालख्यांतून व रथांतून बसून वृद्धांनी परिवेष्टित असलेल्या त्यांच्या स्त्रिया नगरांतून तेथे निघून गेल्या (१९). अश्वमेघात यज्ञ केलेल्या त्या राजाला ऋत्विजांनी उलट्या प्रदक्षिणा घातल्या व कौसल्याप्रभृती स्त्रिया त्याच्याकरिता शोकाकुल झाल्या (२०). हे भाषांतर शास्त्रीबुवांचे आहे. ते चूक दिसते. चक्रुः या क्रियापदाला ऋत्विजः व स्त्रियश्च अशी दोन पदे कर्त्यांच्या स्थानी आहेत. म्हणजे स्त्रियांनीही शोकाकुल होऊन त्याला उलट्या प्रदक्षिणा घातल्या असा सरळ अर्थ होतों. बायकांनी प्रदक्षिणा घातल्या की नाही, हा मुद्दा गौण आहे. त्या स्मशानात गेल्या होत्या व 'नंतर शोकाधीन होऊन रडत असलेल्या त्या राजस्त्रिया वारंवार विलाप करून सरयूचे तीरी आपआपल्या वाहनातून खाली उतरल्या. (२२) राजाची उदकक्रिया करून अश्रूंनी नेत्र भरून आलेले ते मंत्री व पुरोहित आणि राजस्त्रिया भरतासह वर्तमान नगरामध्ये परत आले आणि दहा दिवसांपर्यंत भूमीवर पडून त्याने त्यांचे अशौच काढिले.' (२३). या शेवटच्या वाक्याचेही भाषांतर चुकीचे दिसते. एकटा भरत भूमीवर निजला नाही तर त्याच्याबरोबर मंत्री, पुरोहित व राजस्त्रिया यांनीही तसेच केले असे श्लोकात आहे.

राजस्त्रिया या स्मशानयात्रेबरोबर होत्या. त्यांनी प्रेताला इतरांबरोबर उलट्या प्रदक्षिणा घातल्या व शरयु नदीत उतरून त्यांनी मृताला उदक सोडले. हा आभार आर्यांमध्ये नाही. 'भार्या गृहद्वारि' घरच्या दरवाजातच भार्येने नवऱ्याच्या प्रेताचा निरोप घ्यावयाचा हा आमचा आचार.कौसल्यादी राजस्त्रियांनी पाळलेला आचार आर्यांचा नव्हे.

आश्वलायन गृह्यसूत्रात विधवेने स्मशानात जाऊन पतीच्या शवासंनिध निजावयाचे व 'उदीर्ष्वनार्य' हा मंत्र म्हणून दिराने किंवा घरच्या दासाने तिला उठवून परत आणावयाचे हा विधी सांगितला आहे. तसेही या ठिकाणी झालेले नाही. रामायणात वर्णिलेला प्रकार आश्वलायन गृह्यसूत्राच्या विधीशी विसंगत आहे. अनार्य आहे. आणखी याशिवाय अनेक गोष्टी आर्यसंस्कृतीशी विरुद्ध आढळतील.

अनुक्रमणिका

१७ रामायणकर्ता वाल्मिकी

ओकांच्या गीर्वाण लघुकोषाच्या 'विशेष नामकोष' या भागात वाल्मीकीविषयी माहिती थोडक्यात पुढीलप्रमाणे दिली आहे.:

वाल्मीकी रामायणकर्ता प्रख्यात ऋषी (१) मातापितरांनी तपार्थ वनात जाताना यास सोडून दिले. (२) किरातांनी याला उचलून चोरीचा धंदा करण्यास लाविले. हा धनुर्विद्येत निपुण होता. (३) एकदा एका महर्षीची गाठ पडून त्याने स्त्रीपुत्रादिक तुझ्या पापाचा वाटा घेणार नाहीत अशी खात्री पटविल्यावर हा विरक्त झाला व अंगावर वारूळ (वल्मीक) वाढेपर्यंत याने तप केले. (४) याचां आश्रम तमसा तिरी होता. (५) एका क्रौंचाला व्याधाने मारिले, तेव्हा दयेने श्लोकरूप वाणी याच्या तोंडातून निघाली. नंतर ब्रह्मदेवांच्या सांगण्यावरून याने रामायणकाव्य रचिले. (६) रामाने सीतेचा त्याग केल्यावर याने तिला पाळले व तिला कुश, लव हे पुत्र झाल्यावर त्याचे सर्व शिक्षण यानेच केले. (७) नंतर त्याने त्या तिघांना रामाकडे पोहोचविले.

यातील (१), (२) व (३) ही कलमें रामायणाबाहेरील ग्रंथातील आहेत. रामायणात या विधानांचा उल्लेख नाही. वाल्मीकीसंबंधाने खुद्द रामायणात सांगितलेल्या वरच्या ४, ५, ६ व ७ या कलमांचा व इतर बाबींचा या लेखात विचार होईल.

राम व वाल्मीकी समकालीन नव्हते

मुद्दा १ : वाल्मीकी व राम समकालीन होते काय? ते समकालीन होते असे काव्यातील विधानावरून दिसते. बालकांडाच्या पहिल्या सर्गाच्या दुसऱ्या श्लोकात –

'कोन्वस्मिन्सांप्रतं लोके गुणवान्कश्च वीर्यवान् ?

इत्यादी प्रश्न वाल्मीकीने नारदास तीन श्लोकांनी केला आहे व त्याचे उत्तर ७–१९ या तेरा श्लोकांनी नारदाने दिले आहे. प्रश्नात साप्रत असा निर्देश आहे व त्याला अनुसरून उत्तर आहे. यापुढे नारदाने रामचरित्र २८ ते ८९ या श्लोकांनी वर्णिले आहे व त्यात सर्व क्रियापदांचे प्रयोग भूतकाली आहेत. यावरून नारदास इतका रामाचा इतिहास माहीत झाल्यावर त्याची व वाल्मीकीची भेट झाली आहे. यापुढील म्हणजे ९० ते ९७ या आठ श्लोकांतील सर्व क्रियापदे भविष्यकाळी आहेत. यावरून राम हयात होता असे दिसते. यावरून राम व वाल्मीकी समकालीन होते असे म्हणता येईल. पण रामायण हे काव्य बुद्धकालानंतर लिहिले गेले असे अंतर्गत पुराव्यावरून दिसते. याचा विचार पुढे करण्यात येईल.

मुद्दा २ : राम व वाल्मीकी या एकाच आर्यावर्तातील होते काय? प्रथम वाल्मीकीला रामाची काहीच माहिती नव्हती. नारदाने थोडक्यात रामचरित्र त्यास सांगितले. यावरून ते एकाच देशातील नसावेत असे अनुमान होते. एका आर्यावर्तातील असते तर एवढ्या मोठ्या पराक्रमी राजाची थोडीतरी माहिती वाल्मीकीला झाली असती. ब्रह्मदेवाच्या वरातही असे आहे. म्हणजे नारदकथेचा विस्तारच त्याने करावयाचा आहे. स्वतःची माहिती त्याला नाही.

अनुक्रमणिका

'वृत्त कथय रामस्य यथाते नारदाच्छ्रुतम्

तमसा नदीचा घोटाळा

मुद्दा ३ : वाल्मीकीचा आश्रम जिच्या काठी होता ती तमसा कोठे होती? रामाच्या कथेत तमसेचा पहिला उल्लेख अयोध्याकांडात ४५ व्या सर्गात आढळतो. राम वनवासास जाताना त्याचा. पहिला मुक्काम तमसेवर झाला असे पुढच्या सर्गाच्या आरंभीच सांगितले आहे. रामाकरिता जरी वेगवान घोडे जुंपलेला रथ होता, तरी अयोध्यावासी ब्राह्मणांदिकांबरोबर तो चालत गेला असे वर्णन आहे. त्यावरून रथही माणसाच्या गतीइतका सावकाश चालला होता असे दिसते. यावरून अयोध्येपासून तमसेचे अंतर फारसे नसावे. तमसा नदी ते रथानेच उतरून गेले आहेत. नदीचे वर्णन असे आहे.

'शीघ्रगामाकुलावर्ता तमसामतरन्नदीम् ।'

(अयोध्या. स. ४७, श्लो. २८)

'वेगाने वाहणारी व घोटाळा करणाऱ्या भोवऱ्यांनी युक्त असलेली तमसा नदी उतरून गेला.' यावरून नदीची खोली फारशी नव्हती. ती उथळ होती असे दिसते. ही तमसा भागीरथीसच मिळाली होती असे बालकांड सर्ग २ श्लोक ३ वरून दिसते. तेथे म्हटले आहे 'जान्हव्यास्त्वविदूरताः ॥' तमसा उतरून गेल्यावर सूर्योदय झाला. पुढे कोसल देश ओलांडून राम पुढे गेला. प्रथम वेदश्रुतिनामक नदी उतरून तो दक्षिण दिशेस वळला आणि नंतर गोमतीही त्याने ओलांडली. ही नदी सागराला जाऊन मिळाली असे वर्णन आहे. (सागरंगयाम्) ही प्रत्यक्ष सागरास मिळाली असा अर्थ घेता येईल. पण गोमती नदी गंगेला मिळून पर्यायाने सागराला मिळाली असा अर्थ घ्यावा लागेल. यानंतर त्याने स्पंदिका नदी ओलांडली व पुढे त्यास गंगा नदी श्रृंगवेरपुरावर दिसली. तेथे नावेने गंगा नदी उतरून राम दक्षिणेकडे गेला. भरतही याच मार्गाने गेला व परत आला आहे. या वेळी भरतास तमसा लागल्याचा उल्लेख नाही. पण ती नदी पायउतार असल्यामुळे महत्त्वाची नाही म्हणूनही उल्लेख करण्याची जरुरी पडली नसेल. एकंदरीत तमसा ही लहानशी नदी सरयू व भागीरथी यांच्या बेळक्यात भागीरथीच्या उत्तरेकडून येऊन तिला मिळाली होती असे दिसते.

ही अयोध्येच्या जवळच असली पाहिजे. तसे असेल तर वाल्मीकीचा आश्रम अयोध्येपासून फार दूर नसल्याने वाल्मीकीचे आगमन अयोध्येत वारंवार व्हावयास पाहिजे होते. पण दशरथाच्या कारकीर्दीत किंवा रामराज्याभिषेकाच्या वेळी इतर ऋषी आले त्या वेंळीही वाल्मीकी आला नाही ही गोष्ट संशय उत्पन्न करण्यासारखी आहे.

भौगोलिक माहितीतील विसंगती

तमसेचा व वाल्मीकी–आश्रमाचा उल्लेख उत्तरकांडात सर्ग ४६ यात आहे. हा प्रसंग रामाच्या आज्ञेने लक्ष्मणाने सीतेला वाल्मीकीच्या आश्रमाजवळ सोडण्याचा आहे. सीतेला रथावर घालून लक्ष्मण निघाला तो राम ज्या वाटेने वनवासास गेला त्याच वाटेने गेला असावा. कारण त्याने एक रात्र गोमती नदीच्या तीरावर एका आश्रमात काढली आहे.

अनुक्रमणिका

ततो वासमुपागम्य गोमतीतीर आश्रमे ॥

(उ. कां. स. ४६, श्लो. १९)

रथाने एका दिवसात ते गोमतीतीराला आले व पुढे अर्धा दिवस रथ चालल्यावर ते गंगेच्या काठाला पोचले. तेथे नावेने गंगा उतरून पलीकडच्या किनाऱ्यावर गेल्यावर तेथे लक्ष्मणाने सीतेला सोडले व लक्ष्मण परत गेला. सीता तेथेच रडत बसलेली मुनिकुमारानी पाहिली. त्यांनी वाल्मीकीस कळविल्यावर ते आले व त्यांनी सीतेला धीर देऊन आपल्या आश्रमात नेले. यावरून वाल्मीकीचा आश्रम अयोध्येपासून दीड दिवसाच्या रथाच्या वाटेवर व गंगा नदीच्या पलीकडच्या तीरावर होता असे दिसते. तमसा तेथेच असली पाहिजे. याच कांडाच्या ६५ व्या सर्गात वाल्मीकी आश्रमात शत्रुघ्न एक रात्र वस्तीस राहिल्याचा उल्लेख आहे. (पहा श्लो. ४) शत्रुघ्न जरा सावकाश गेला असावा; कारण त्याने वाटेत दोन रात्री काढल्या असे सांगितले आहे.

द्विराममंतरे शूरः उष्य राघवनंदनः ।
वाल्मीकेराश्रमंपुण्यं अगच्छद्वासमुत्तमम् ॥ २ ॥

या ठिकाणी गंगा उतरल्याचा उल्लेख नाही. पण तो अध्याहृत घ्यावा लागेल.

वनवासास जाताना ज्या तमसेवर राम एक रात्र राहिला, ती तमसा नदी अयोध्येच्या जवळच होती. उत्तरकांडातील तमसा रथाने दीड दिवसाच्या वाटेवर असून भागीरथीच्या तीरास होती. या दोन तमसा निरनिराळ्या घ्यावयाच्या का एक घ्यावयाची? पहिली गंगेच्या उत्तर तीरास होती तर दुसरी दक्षिण तीरास एक अयोध्येजवळ तर दुसरी दीडदोन दिवसांच्या वाटेवर. असा तमसेसंबंधाने व वाल्मीकी–आश्रमासंबंधाने घोटाळा आहे.

शिवाय राम व वाल्मीकी हे एकदेशी नव्हते हे बालकांडाच्या पहिल्या सर्गावरून स्पष्ट आहे. तमसा दोन ठिकाणी होती. म्हणजे भागीरथीच्या उत्तरतीरावर असे अयोध्याकांडात सांगितले आहे व ती भागीरथीच्या दक्षिणतीरावर होती असे उत्तरकांडात आहे. यावरून वाचकांचा घोटाळाच होत असून वाल्मीकी हा रामाच्या राज्याजवळ राहणारा होता ही गोष्ट विश्वसनीय दिसत नाही.

आद्यकवीचा मान कुणाचा?

मुद्दा ४ : वाल्मीकी हा संस्कृत भाषेतील आद्यकवी समजला जातो हे विश्वसनीय आहे काय?

रामायणाच्या बालकांडाच्या दुसऱ्या सर्गात क्रौंचवधाची कथा वर्णिली आहे व 'मा निषाद प्रतिष्ठां त्वम्' अशी शापवाणी वाल्मीकीच्या तोंडून निघाली आहे.

'पादबद्धोऽक्षरसमः तंत्रीलयसमन्वितः ।
शोकार्त्तस्य प्रवृत्तो मे श्लोको भवतुनान्यथा ॥

(बा. कां. २)

अनुक्रमणिका

चरणबद्ध अक्षरांनी सम (छंदःशास्त्रोक्त अक्षररचना दोषरहित) आणि वीणा लावून वाद्यांसह गाण्यास योग्य असा जो श्लोक शोकाकूल झालेल्या माझ्या तोंडून (सहज) बाहेर पडला तो अकीर्तिरूप न होता कीर्तिरूप होवो असे ते शिष्याला म्हणाले. स्नान करून आश्रमात आल्यावर ब्रह्मदेव मुनीच्या भेटीस आले. त्यांना वाल्मीकींनी तो श्लोक म्हणून दाखविला. ब्रह्मदेव म्हणाले,

'श्लोक एवास्त्वयं बद्धोनात्रकार्या विचारणा ।
मच्छंदादेव ते ब्रह्मन् प्रवृत्तेयं सरस्वती ॥'

'हा तू ग्रथित केलेला श्लोक यशोरूपच होईल याविषयी संशय घेण्याचे प्रयोजन नाही. कारण, हे ब्रह्मन्, माझ्या इच्छेनेच तुझ्या ठिकाणी ही सरस्वती प्रवृत्त झाली आहे.' नंतर नारदाकडून ऐकलेली रामकथा वर्णन करण्यास वाल्मीकीला ब्रह्मदेवाने सांगितले काव्यामध्ये श्लोकबद्ध करण्यास आज्ञा देऊन 'राम, लक्ष्मण, सीता, राक्षस इत्यादींचे प्रसिद्ध अथवा अप्रसिद्ध, इतरांना माहीत नसलेले, सर्व माहीत होईल. यासंबंधाने तुझी वाणी यत्किंचितही असत्य होणार नाही,' तसा वरही दिला.

पण येथे रामायण हे पहिले काव्य व वाल्मीकी हा आद्यकवी असे सांगितलेले नाही. संस्कृत वाङ्मयात मात्र रामायण हे आद्यकाव्य समजले जाते. त्यापूर्वी पद्यमय रचना केवळ वेदातच होती असे लिहिलेले आढळते. पण रामायण हा ग्रंथ बुद्धकालानंतर लिहिलेला आहे. यात बुद्धास चोर म्हटले आहे. दशरथाच्या अश्वमेघ यज्ञात

ब्राह्मणा भुंजते नित्यं नाथवन्तश्च भुंजते ।
तापसा भुंजते चापि श्रवणाश्चैव भुंजते ॥

असा बालकांड सर्ग १४, श्लोक १२ वा आहे. यात बुद्ध भिक्षूही त्या यज्ञात पुख्खा झोडीत होते असे आहे. यावरून बुद्धकालानंतरचे रामचरित्र आहे हे उघड आहे. त्यापूर्वी पुराणे होती. याच कांडाच्या ९ व्या सर्गांचा पहिला श्लोक आहे, त्यात

श्रूयतां तपुरावृत्तं पुराणे च मया श्रुतम् ॥

असे सांगितले आहे. तसेच सुंदरकांडात सर्ग २६, श्लोक १२ पुढीलप्रमाणे आहे.

लोकप्रवादः सत्योऽयं पण्डितैः समुदाहृतः ।
अकाले दुर्लभो मृत्युः स्त्रिया वा पुरुषस्य वा ॥

अर्थ : 'स्त्रीला अथवा पुरुषाला वेळ आल्यावाचून मृत्यू दुर्लभ आहे ही जी पंडितांनी लिहून ठेवलेली म्हण ती अगदी खरी आहे,' असे सीता म्हणते. या श्लोकाचा उत्तरार्ध छंदोबद्धच आहे. पण यावर अशी शंका घेण्यात येईल की, म्हणी सर्वच छंदोबद्ध नसतात ही म्हण गद्यमय असून वाल्मीकीने ती श्लोकबद्ध केली असेल. ही शंका खरी आहे व म्हणून दुसरा निरुत्तर पुरावा देणे जरूर आहे. याच कांडाच्या ३४ व्या सर्गातील ६ या श्लोक पहा :

अनुक्रमणिका

कल्याणी बत गाथेयं लौकिकी प्रतिभाति मां ।
एति जीवन्तमानंदो नरं वर्षशतादपि ॥

या श्लोकार्धाला गाथा म्हटले आहे. याचा अर्थ गाण्यालायक पद्य म्हणजे छंदोबद्ध अशी ही म्हण होती. तिला लौकिकी असेही विशेषण दिले आहे. यावरून सीतेच्या कालापूर्वी लौकिकी गाथा बऱ्याच होत्या व राजकन्येच्या शिक्षणात त्यांचाही समावेश होत होता असे दिसते. हा काल वाल्मीकीच्या पूर्वीचाच असला पाहिजे.

रामायणाविषयी मोठी भूल

यावरून सध्याची समजूत रामायण हे पहिलेच काव्य व वाल्मीकी हा आद्य कवी अशी आहे ती खरी नाही. कोणी तरी ती गप्प उठविली व आमचे लोक भोळसटपणाने ती खरी मानीत आले. या प्रसंगाने भोळसटांच्या एका समचुतीचा परामर्श घेणे योग्य होईल. रामावतारापूर्वीच वाल्मीकींनी ब्रह्मदेवप्रसादाने रामायण लिहिले व नंतर त्याप्रमाणे घडून आले असे काही मानतात. भाऊशास्त्री लेल्यांसारख्यांची ही समजूत होती व भाषांतरात ही समजूत मधून मधून झळकते. ही समजूत खरी मानावी तर रामायणकार वाल्मीकी व ज्याच्या आश्रमात सीता प्रसूत झाली तो वाल्मीकी हे भिन्न काळचे असल्याने भिन्नच मानावे लागतील व मग वाल्मीकीने रामायण रचून लवकुशांस ते पढविले या म्हणण्याची संगती राहणार नाही. पण बालकांडाच्या चौथ्या सर्गाच्या पहिल्या श्लोकात वाल्मीकींनी संपूर्ण उत्तरकांडासह काव्य रचले व ते लवकुशांना पढविले (श्लोक ६) असे स्पष्ट वर्णिले आहे. तेव्हा रामावतारापूर्वी हे काव्य भविष्य म्हणून केले हा समज निराधार आहे. वाल्मीकी हा संस्कृत भाषेतील आद्य कवी नव्हे. रामायणकाराविषयी ही एक भूल आहे.

ब्रह्मदेवाच्या वरामुळे त्याने रामायण काव्य लिहिले असा उल्लेख वाल्मीकीच्या कल्पनेचाच आहे. असले प्रसाद व वर मिळाल्याचे उल्लेख बहुतेक ग्रंथांतून आढळतात. आपल्या ग्रंथाची महती वाढवावी व त्याची चहा व्हावी या उद्देशाने ग्रंथकार म्हणून मोठ्या ऋषीचे नाव व त्याला मिळालेला वर याचे कथन करण्यात येते. चिकित्सकाने असल्या गोष्टीवर विश्वास ठेवणे योग्य नाही.

मुद्दा ५. वाल्मीकी ऋषी पूर्वी चोऱ्या, दरवडे वगैरे घालीत होता. त्याला उपरती झाल्यावर त्याने अंगावर वारूळ (वल्मीक) वाढेपर्यंत तप केले. म्हणून त्यास वाल्मीकी असे नाव पडले असे सांगण्यात येते. यात तथ्य किती आहे?

वल्मीक शब्दावर कोटी ?

रामायणात ही कथा सांगितलेली नाही. वल्मीक शब्दावरून कोणी तरी ही कोटी केली असावी व एकदा कोणत्या तरी ग्रंथात ती दडपून दिली म्हणजे आमचे लोक तिला खरी मानण्यास तयार असतात. वारूळ वाढेपर्यंत उघड्यावर स्थिर राहणे शक्य आहे की नाही हे थोड्या विचारांती समजून येईल. अयोध्याकांडाच्या ५६ व्या सर्गात चित्रकूट पर्वतावर वाल्मीकी ऋषीच्या आश्रमाशेजारी रामाने आपली पर्णकुटी बांधल्याचा उल्लेख आहे. पहा :

अनुक्रमणिका

अभिगम्याश्रम सर्वे वाल्मीकिमभिवादयत् ॥ १६ ॥

या श्लोकाच्या भाषांतरावर भाऊशास्त्री लेल्यांची टीप पुढीलप्रमाणे आहे. 'हे वाल्मीकी मुनी रामायण ग्रथित करणाऱ्या प्राचेतस वाल्मीकी मुनीहून भिन्न होते असे टीकाकार म्हणतात व हे त्यांचे म्हणणे काही अंशी संभवत आहे. रामायणकाराचा आश्रम भागीरथी व तमसा संगमावर होता. हा दुसरा वाल्मीकी चित्रकूट पर्वतावर राहत होता म्हणून हे दोघें समकालीन असले तरी भिन्नच असले पाहिजेत. यानेही अंगावर वल्मीक वाढेपर्यंत तप केले असे म्हणणे नाही. प्रत्येकास नाव असते त्याप्रमाणे यालाही वाल्मीकी असे नाव मिळाले इतकेच म्हणता येईल. रामायणकाराचेही नाव असेच मिळालेले असावे. मग कोणी तरी वाल्मीकी शब्दावर कोटी करून अंगावर वल्मीक वाढले म्हणून नाव पडले असे ठोकून दिले असावे.

मुद्दा ६ : वाल्मीकी हा दशरथाचा मित्र होता असे लक्ष्मण सीतेस सांगत आहे यात सत्य किती आहे? उत्तरकांडात ४७ व्या सर्गाचा १६ वा श्लोक

राज्ञो दशरथस्यैव पितुर्मे मुनिपुंगवः ।
सखा परमको विप्रो वाल्मीकिः सुमहायशाः ॥

असा आहे. तसा तो दशरथाचा मित्र असला तर लक्ष्मणाने वाल्मीकीकडे नेऊन सीतेचा त्यांच्या हवाली करावयास पाहिजे होती. तसे त्याने केले नाही. सीतेला गंगेपार पोचवून तो तसाच तातडीने नावेने परत आलेला आहे. वाल्मीकीने सीतेला आश्रमात नेले तेव्हा 'तू दशरथांची सून, रामाची आवडती पट्टराणी व जनक राजाची कन्या आहेस, तुझे स्वागत असो' असे म्हटले. दशरथ माझा मित्र आहे असे तो म्हणत नाही. तसा तो मित्र असता तर या वेळी तसे सांगणे योग्य झाले असते. पुढें सर्ग ६५ यात शत्रुघ्न वाल्मीकीच्या आश्रमात गेल्याची हकीगत आहे. वाल्मीकीच्या भाषणात यासंबंधी उल्लेख होणे योग्य होते. केवळ औपचारिक स्वागत केले आहे.

स्वमाश्रममिमं सौम्य राघवाणां कुलस्थ वै ।
आसनं पाद्यमर्घ्य च निर्विशंकः प्रतीच्छ मे ॥

राजांचा व राजपुत्रांचा गौरव असाच करावा लागतो. दशरथाशी मित्रत्व असते तर या ठिकाणी उल्लेख करण्यास पाहिजे होता.

दशरथाचे व वाल्मीकीचे संबंध

बारा वर्षांनी अयोध्येस परत जाताना पुन्हा वाल्मीकीच्या आश्रमात शत्रुघ्नाने एक रात्र वस्ती केल्याची कथा ७१ व्या सर्गात आहे. तेथेही दशरथाच्या मित्रत्वाचा उल्लेख नाही.

वाल्मीकीचा आश्रम फार तर दीड दिवसाच्या वाटेवर असल्याने तो दशरथाचा मित्र असता तर यज्ञाच्या, रामविवाहाच्या व रामास राज्याभिषेक करण्याच्या वेळी त्यास आमंत्रण गेले असते व ते त्या त्या प्रसंगी आले असते. दशरथाने पुत्रप्राप्तीकरता अश्वमेघ केला. त्या प्रसंगी देशोदेशींचे कवी व यज्ञकर्मांत

अनुक्रमणिका

पारंगत असे ऋत्विज आणले. शूद्र व श्रमण यांचीही चंगळ चालली होती. दशरथ राजा सुमंत नामक मंत्र्याला म्हणाला,

सुमंत्राबाह्य क्षिप्रं ऋत्विजो ब्रह्मवादिनः ।
सुयज्ञं वामदेवं च जाबालिमथ काश्यपम् ॥ ५ ॥
पुरोहितं वसिष्ठं च ये चान्यें द्विजसत्तमाः ॥

वाल्मीकी दशरथाचा मित्र असता तर त्याची आठवण दशरथास झाली असती व सुमंत्राने त्यास आमंत्रण दिले असते. पण तसे झालेले नाही. जनकाकडे जातेवेळीही त्याची आठवण झाली नाही. रामाच्या यौवराज्य–अभिषेकाच्या पूर्वी जी सभा भरविल्याचा उल्लेख अयोध्याकांड सर्ग १ मध्ये आहे. त्या वेळीही वाल्मीकीची कोणास आठवण झाली नाही.

मोठमोठ्या समारंभांस वाल्मीकी गैरहजर

रावणवध करून राम अयोध्येला आला. त्या वेळीही त्याची आठवण कोणी केली नाही व उत्तरकांडाच्या पहिल्या सर्गात चारही दिशेस राहणारे ऋषी रामाचे अभिनंदन करण्यास आपण होऊन आले त्यांची नावे दिली आहेत, त्यांतही वाल्मीकीचे नाव नाही. यावरून वाल्मीकी ही दशरथाचा मित्र होता ही लक्ष्मणाने निव्वळ थाप मारली असे दिसते.

मुद्दा ७. हे काव्य कसे प्रकट झाले ?

कुशीलवौ की कुशलवौ ?

बालकांडाच्या तिसऱ्या सर्गात वाल्मीकीनी आपल्या महाकाव्यात कोणते कोणते विषय आणले त्याची जंत्री दिली असून चवथ्या सर्गात काव्याचा विस्तार २४००० श्लोकांचा केला, असे नमूद केले आहे. हे पठण करून सभेमध्ये सभ्यांच्या कानावर घालण्यास कोण समर्थ आहे असा विचार करीत असता दोन कुशीलवांनी ते काम पत्करले. 'मुनिवेशौ कुशीलवौ' असे चौथ्या सर्गाच्या ४ थ्या श्लोकात आहे. शास्त्रीबुवांनी याचे भाषांतर कुश व लव असे केले आहे, पण या दोन पदांचा द्वंद्व समास कुशलवौ असा होईल. कुशौलवौ होणार नाही. कुशलवौ असे घातल्यास छंदोभंग होतो अशी अडचण येते. कुशीलव या शब्दाचे कोषात ५ अर्थ दिले आहेत. १ वाल्मीकी, २ नट, ३ भाट, ४ बातमीदार व ५ याचक. यांतील पोवाडे किंवा काव्य गाणारे भाट असा अर्थ प्रस्तुत ठिकाणी युक्त होईल. हे ते काव्य ठिकठिकाणी गाऊ लागले. एकदा ऋषिसमुदायात काव्यगायन झाल्यावर त्या निष्कांचन ऋषींनी प्रसन्न होऊन कसे कसे बक्षीस दिले, याचे सुंदर व मनोवेधक वर्णन २० ते २४ श्लोकात सुरस केले आहे.

रावणवध करून सीतेला. घेऊन पुष्पक विमानाने राम अयोध्येकडे निघाला. बरोबर बिभीषण व सुग्रीव सपरिवार घेतले. अयोध्येजवळील नन्दिग्रामापासून मोठी मिरवणूक निघून रामाने अयोध्याप्रवेश केला व पुढे दुसरे दिवशी रामाला वसिष्ठाने अभिषेक केला. 'जो किरीट मस्तकी असताना पूर्वी मनूला अभिषेक झाला होता तो दैदीप्यमान तेजाने युक्त असलेला. ब्रह्मदेवाने पूर्वी निर्माण केलेला. व रत्नांनी

अनुक्रमणिका

शृंगारलेला किरीट वसिष्ठांनी हातामध्ये घेतला. त्या मनूच्या वंशामध्ये क्रमाक्रमाने जे राजें होऊन गेले त्यांनाही तोच किरीट असताना अभिषेक झाला होता.'

आर्यांच्या पद्धतीत अभिषेक आहे, किरीट नाही.

इजिप्तच्या पहिल्या वंशाचा राजा मेना याने उत्तर व दक्षिण इजिप्तची राज्ये केली. म्हणून तो दोन्ही राज्यांचे मुकुट घाली व पुढे त्याने दोन्हींचा एकच मुकुट केला. रामेसिस हा १९ व्या वंशातील पराक्रमी राजा होता. तोही संयुक्त इजिप्तचा राजा असल्याने मेनाचा संयुक्त मुकुट धारण करी.'

यानंतरच्या दरबारात सर्वांना त्यांच्या त्यांच्या कामगिरीबद्दल बक्षिसे देण्यात आली व बिभीषण आणि सुग्रीव आपआपल्या परिवारासह आपल्या राज्यावर परत गेले. नंतर परमोदार रामाने मोठ्या आनंदाने सर्व राज्य चालविले भरताला युवराज नेमले. 'राजकुमार रामाने पौंडरीक अश्वमेध आणि विशेषतः वाजिमेध वारंवार करून इतरही नाना प्रकारचे यज्ञ केले. (वाजिमेध म्हणजेच अश्वमेध पण येथे निराळे कथन आहे.) (यु. कां. सर्ग १३८, श्लो. ९४) रघुवंशज रामाने दहा हजार वर्षे राज्य करून उत्कृष्ट अश्व आणि विपुल दक्षिणा यांनी युक्त असे दहा अश्वमेध केंले. (९५). त्याने नानाप्रकारचे यज्ञ केले असे पुन्हा ९७ वे श्लोकात सांगितले आहे. ९८ व्या श्लोकापासून १०४ पर्यंत रामराज्यांतील सुख वर्णिले आहे.

काव्यगायनाचे विशेष महत्त्व

कुशीलवांनी ते अयोध्येत रस्तोरस्ती गायिले व ते रामाच्या नजरेस पडले त्यांना घरी आणवून व आपण सोन्याच्या सिंहासनावर बसून सर्व भाऊ व मित्रमंडळासह ऐकून सर्व संतुष्ट झाले असे वर्णन चौथ्या सर्गात असून पाचव्यापासून रामायणकथेस प्रारंभ झाला आहे. म्हणजे पहिले चार सर्ग प्रस्तावादाखल आहेत.

सिंहगडवरच्या तानाजी मालुसऱ्याच्या पराक्रमाचा पोवाडा शाहीर अगीनदासाने गाइला. ते वर्णन या वर्णनाशी जुळते आहे उत्तम गायकांकडून गावविल्याशिवाय काव्याची वाहवा होत नाही. कवी आपल्या काव्यविषयासाठी जी पार्श्वभूमी तयार करितो ती अक्षरशः खरी असतेच असे नाही. कोणा तरी राजाच्या राजधानीत हे काव्य प्रथम गाइले गेले व मग त्या राजाने आपल्या दरबारात ते ऐकले हे असे झाले असेल. पण वाल्मीकी व राम हे एकदेशी नव्हते, असे पहिल्याच सर्गावरून स्पष्ट होत असल्याने काव्य ऐकणारा राजा भरताग्रज राम असणे शक्य नाही कोणा तरी दुसऱ्या राजाचे दरबारात प्रथम काव्यगायन झाले असेल. त्याचे जागी रामाचे नाव घातले असेल.

रामकथा गायनाची हकीगत उत्तरकांडात ९३ व्या सर्गात पुन्हा दिली याहे. रामाने गोमती तीरावर अश्वमेध केला. त्यावेळी जमलेल्या जनसंमर्दात रामायण गाण्यास वाल्मीकीने आपले दोन शिष्य पाठविले. राजा राम याने रामायण ऐकावे ही वाल्मीकीची इच्छा होती असे श्लोक ९ वरून दिसते.

यदि शब्दा पयेद्रामः श्रवणाय महीपतिः ।
ऋषीणां उपविष्टानां यथायोगं प्रवर्तताम् ॥

अनुक्रमणिका

असे तो सांगतो. त्याप्रमाणे रामापुढे ते गाइले गेले.

बालकांडाच्या तिसऱ्या–चौथ्या सर्गात हे काव्य अयोध्येत व राजवाड्यात गाइले असे आहे व उत्तरकांडात ते गोमती तीरी यज्ञमंडपात गाइले गेले असे वर्णन आहे. याप्रमाणे जागेसंबंधाने महत्त्वाचा फरक पडत आहे. यामुळे रामापुढे खरोखर गाइले की नाही हाच संशय आहे. रामायणकाव्य बुद्धधर्माच्या ऱ्हासकाली रचिले गेले असल्याने ते रामकाली गाणेच शक्य नाही. या दृष्टीने या कथेकडे पाहिल्यास सीतेच्या दोन पुत्रांनी हे काव्य गाइले हे विधान विश्वासार्ह ठरत नाही. यावरून ज्या आश्रमात सीता प्रसूत झाली तो आश्रम रामायणकार वाल्मीकीचा नसून दुसऱ्या कोणा वाल्मीकीचा असेल.

मिसरमधील काव्याशी विलक्षण साम्य

मल्लादि व्यंकटरत्नम् यांच्या मते वाल्मीकी हे नावही मिसरचेच, बाल हे तेथील प्रमुख देवतेचे नाव. मिष्की हे विशेषण महा या अर्थी. महाबाल अशा अर्थाच्या नावाचा कवी होता. त्याने आपल्या भाषेत आपल्या पराक्रमी राजाचे चरित्र काव्यात गाइले. त्या काव्याची प्रत हिंदुस्थानातील कवीस मिळाल्यावर त्या आधाराने कोणी कवीने मूळ मिसरी कवीच्याच नावाने संस्कृत भाषेत रूपांतर केले असावे. ही कथा आर्यावर्तात घडली असे दाखविण्यासाठी इकडील नद्यांची, पर्वतांची, देशांची व भारत वगैरे पूर्वीच्या ग्रंथात आलेली पुष्कळशा ऋषींची नावे दडपून दिली आहेत. हिंदी वाल्मीकीस हिंदुस्थानच्या भूगोल व स्थितीचीही चांगली माहिती नसल्याने सर्व घोटाळा उडाला आहे, असेही थोडेसे लक्ष देऊन चिकित्सक बुद्धीने वाचणाऱ्यास समजून येईल.

रामायणात आर्य संस्कृतीशी विसंगत अशा काही चाली व असे विचार आले आहेत ते मूळ काव्यातील असावेत असे अनुमान होते. महाराष्ट्र शारदा एप्रिल, १९३७

अनुक्रमणिका

१८ रामाच्या एकपत्नित्वाचे थोतांड

रावणवध करून सीतेला घेऊन पुष्पक विमानाने राम अयोध्येकडे निघाला. बरोबर बिभीषण व सुग्रीव सपरिपार घेतले. अयोध्येजवळील नन्दिग्रामापासून मोठी मिरवणूक निघून रामाने अयोध्याप्रवेश केला व पुढे दुसरे दिवशी रामाला वसिष्ठाने अभिषेक केला. 'जो किरीट मस्तकी असताना पूर्वी मनूला अभिषेक झाला होता तो दैदीप्यमान तेजाने युक्त असलेला, ब्रह्मदेवाने पूर्वी निर्माण केलेला व रत्नांनी शृंगारलेला किरीट वसिष्ठांनी हातामध्ये घेतला. त्या मनूच्या वंशामध्ये क्रमाक्रमाने जे राजे होऊन गेले त्यांनाही तोच किरीट असताना अभिषेक झाला होता.

आर्यांच्या पद्धतीत अभिषेक आहे. किरीट नाही.

इजिप्तच्या पहिल्या वंशाचा राजा मेना याने उत्तर व दक्षिण इजिप्तची राज्ये केली. म्हणून तो दोन्ही राज्यांचे मुकुट घाली व पुढे त्याने दोनींचा एकच मुकुट केला. रामेसिस हा १९ व्या वंशातील पराक्रमी राजा होता. तोही संयुक्त इजिप्तचा राजा असल्याने मेनाचा संयुक्त मुकुट धारण करी.

यानंतरच्या दरबारात सर्वांना त्यांच्या त्यांच्या कामगिरीबद्दल बक्षिसे देण्यात आली व बिभीषण आणि सुग्रीव आपआपल्या परिवारासह आपल्या राज्यावर परत गेले. नंतर परमोदार रामाने मोठ्या आनंदाने सर्व राज्य चालविले. भरताला युवराज नेमले. 'राजकुमार रामाने पौंडरीक अश्वमेध आणि विशेषतः वाजिमेध वारंवार करून इतरही नाना प्रकारचे यज्ञ केले. (वाजिमेध म्हणजे अश्वमेध. पण येथे निराळे कथन आहे). (यु. कां. सर्ग १२८, श्लो. ९४) रघुवंशज रामाने दहा हजार वर्षे राज्य करून उत्कृष्ट अश्व आणि विपुल दक्षिणा यांनी युक्त असे दहा अश्वमेध केले (९५). त्याने नाना प्रकारचे यज्ञ केले असे पुन्हा ९७ व्या श्लोकात सांगितले आहे. ९८ व्या श्लोकापासून १०४ पर्यंत रामराज्यातील सुख वर्णिले आहे.

भाविकांचे भाबडे वर्णन

'राम राज्य करीत असता, स्त्रियांना अकाली वैधव्य येत नसे; सर्पजन्य व व्याधिजन्य भय नव्हते; कोणी चोर नव्हता, कोणावरही अनर्थ गुदरला नाही व बालमृत्यू नव्हते. सर्व वृद्ध होऊन मरत. सर्व आनंदयुक्त, धर्मनिष्ठ व रामाकडे लक्ष देऊन परस्परांच्या हिंसेपासून पराङमुख होते. राम राज्य करीत असताना प्रजाजन रोग व शोक यांनी रहित आणि हजारो पुत्रांनी युक्त असून हजारो वर्षे वाचत असत. पर्जन्य योग्य वेळी पडून धान्य व फळे भरपूर असत. राम राज्य करीत असताना प्रजाजन स्वकर्मावर संतुष्ट असत; सर्व धर्मनिष्ठ होते, सद्‌गुणी होते.' इत्यादी रामराज्याचे वर्णन आपण वाचतो व भाविक लोक मान डोलवितात पुष्कळसे यज्ञ केलें व ऋत्विजांना भरभक्कम दक्षिणा दिल्या, यामुळे तो वर्ग संतुष्ट झाला असेल. पण इतरांसाठी रामाने काय केले हे या ठिकाणी सांगितलेले नाही. उत्तरकांडात शंबूकाची कथा आली आहे. त्यावरून सर्व वर्णांनी आपआपली कामे करावी, पण उच्चवर्णीयाचे कर्म इतराने करणे योग्य नाही, या भिक्षुकी दंडकाचे पालन तो करीत होता म्हणून तो वर्ग रामाचे गोडवे गात होता असे म्हणावे लागते.

ही स्तुती वाल्मीकीची नाही, मागाहून कोणी तरी घुसडली आहे असा पुरावा याच सर्गाच्या १०५ व्या श्लोकातच आहे :

अनुक्रमणिका

आदिकाव्यमिदं आर्षं पुरा वाल्मीकिना कृतम् ।
श्रृणोति यं इदं कार्व्य पुरा वाल्मीकिना कृतम् ॥ ११० ॥

पुढच्याच श्लोकात

श्रृण्वंति ये इदं काव्यं पुरा वाल्मीकिना कृतम् ॥

असे आहे. वाल्मीकी मुनीने पूर्वी केलेले हे काव्य असे तीन वेळा सांगितले आहे. यावरून हे श्लोक तरी वाल्मीकीचे नाहीत हे स्पष्ट आहे: जसे हे श्लोक घुसडले गेले तसेच इतर घुसडले असतील. हा पुराव्यांचा अर्थ रामजन्मापूर्वी असा काही भाविक करतात व वाल्मीकीने पुढे होणारे अगोदर अंतर्ज्ञानाने जाणून लिहिले असेही ठासून सांगतात.

पण बालकांडाच्या पहिल्याच सर्गावरून हा भाविकपणा निराधार आहे असे होते. नारदाने रामाची कथा सांगण्यापूर्वी वाल्मीकीस त्याच्याविषयी काहीच माहीत नव्हते. स्तुतिपाठकांच्या असल्या श्लोकांवरून रामराज्याची कल्पना करणें चुकीचे होईल.

राम कसा वागत होता, राज्यकारभाराकडे त्याचे कितीसे लक्ष होते, त्याची राहणी कशी होती, या गोष्टींवर प्रकाश पडेल तर रामराज्याची काही तरी कल्पना येईल. उत्तरकांडात याविषयी थोडेसे वर्णन आहे, त्याचा विचार करू.

सुधारणा नको असणारा राम

अगस्ती ऋषीकडून रावणपराक्रमाचा, पूर्वीचा वगैरे इतिहास ऐकल्यानंतर सुग्रीव–बिभीषण–हनुमानादी मित्रांचा रामाने निरोप घेतला व ते आपआपल्या घरी गेले. राज्याभिषेकापासून एक महिन्याचा सबंध काळ पाहुण्यांच्या सरबराईत गेला. नंतर पुष्पक विमानास रजा दिली व ते कुबेराकडे पाठविले. ते बिभीषणास दिले नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. विमानविद्या त्या वेळी अवगत होती असे त्यावरून म्हणावयाचे असल्यास ती फक्त राक्षस व यम यांच्यात होती. रामाच्या राज्यात विमान बांधणारे व चालविणारे कोणी नव्हते व या विमानकलेची महती रामाजवळ मुळीच नव्हती, असे दिसते. कलाकौशल्यास आश्रय व नवीन नवीन शोधांस उत्तेजन देण्याची आवश्यकता रामास भासली नाही. तशी भासली असती तर त्याने पुष्पक विमानासारखी आणखी विमाने बांधली असती. 'सुधारणा नको. आहे ते कायम राखावयाचे,' हे भिक्षुकी तत्त्व मान्य करणारा राम होता असे यावरून अनुमान होते.

ते पवित्र पुष्पक विमान गुप्त झाले असता भरत हात जोडून रघुनंदन रामास म्हणाला : (उत्तरकांड सर्ग ४१, श्लोक १७)

'हे वीरा, तू राज्य करू लागल्यापासून अमानुष प्राणीही वारंवार वाचायुक्त असल्याचे दृष्टोत्पत्तीस येते.' (श्लोक १८)

अनुक्रमणिका

या वेळी रामराज्याभिषेक झाल्यापासून एक महिना गेला होता व राम पाहुण्यांच्या गडबडीत होता. म्हणजे त्याच्या राज्यकारभाराचे कार्य म्हणून पशुपक्ष्यांना मनुष्यवाणी मिळाली असे नसून, केवळ राम राज्यावर आला त्याचाच हा प्रभाव आहे असे या कवीला भासवावयाचे आहे. रामायणात असल्या भाकडकथांची रेलचेल आहे व त्या कथा सत्य आहेत असा अंधविश्वास ठेवणारे विद्वान म्हणविणारेही या देशात पुष्कळ आहेत. कै. भाऊशास्त्री लेले हे यांपैकी एक होते. त्यांनी या श्लोकाच्या भाषांतरावर एक टीप दिली आहे. 'एखाद्या विशिष्ट राजाच्या पुण्यप्रभावामुळे अमानुष प्राण्यांना मनुष्यवाचा पुरातनकालीही प्राप्त होती असे ह्यावरून दिसते.' रामायण हे खरोखर एक काल्पनिक काव्य, त्यात खऱ्या इतिहासाचा अंश फार थोडा, हे आमच्या लोकांच्या मनावर ठसल्याशिवाय आमच्यातील भोळेपणा कमी होणार नाही व यासाठीच रामायणादी ग्रंथांची छाननी करणे हे सत्यशोधकाचे काम आहे. भोळेपणाच्या धुंदीत आमच्या राष्ट्राची चिकित्सक बुद्धी मूर्च्छित झाली आहे. भोळेपणाचे विष उतरल्याशिवाय आम्ही शुद्धीवर येणार नाही.

उ. कां. स. ३९, श्लोक २९

एवं तेषां ययौ मासो द्वितीयः शिशिरः सुखम् ।
वानराणां प्रहृष्टानां राक्षसानां च सर्वशः ॥

याचे भाषांतर भाऊशास्त्री करतात— 'ह्याप्रमाणे आनंदित झालेल्या त्या सर्व वानरांचा व राक्षसांचा थंडीचा दुसराही महिना सुखाचा गेला.' या भाषांतरातील 'ही' या शब्दावरून हे पाहुने दोन महिने राहिले होते असे भाऊशास्त्र्यांचे मत दिसते. पण २७ व्या श्लोकात

मासः साग्रो ययौ तदा

संपूर्ण महिना लोटून गेला असे आहे. ४१ व्या सर्गाच्या १९ व्या श्लोकात भरत म्हणतो,

'अनामयश्च मर्त्यानां साग्रो मासो गतो ह्ययं' ॥

'हा पूर्ण महिना लोटून गेला तरी मर्त्यजनांना आरोग्य असून' इत्यादी.

रामाचा अभिषेक झाल्यापासून एक महिना गेला असे यावरून दिसते. भरताचा हा 'रपोट' पुष्पक विमानाची रवानगी झाल्याबरोबर दिला गेला आहे. पहा,

एवमंतर्हिते तस्मिन्पुष्पके सुकृतात्मनि।
भरतः प्रांजलिर्वाक्यमुखाच रघुनंदनम् ॥ १७ ॥

त्याच दिवशी सकाळी सुग्रीवबिभीषणाची पाठवणी झाली. म्हणून ही पाहुणेमंडळी एकच महिना होती, असे होते. यावरून शास्त्रीबुवांच्या 'ही' शब्दाला आधार नाही व भाषांतरही थोडे सुधारावे लागेल. शिशिरऋतूचा दुसरा महिना सुखावह गेला. यावरून त्याचा असा सरळ अर्थ केल्यास ऋतूच्या पहिल्या महिन्याच्या शेवटी रामाला राज्याभिषेक झाला असे होते. भरताने रामाच्या कारकीर्दीच्या पहिल्या महिन्याचे वर्णन मोठे भपकेदार केले आहे. तो म्हणतो :

अनुक्रमणिका

अवास्तव स्तुतिपाठ

'हा पूर्ण महिना लोटून गेला तरी मर्त्य जनांना आरोग्य असून, हे राघवा, जीर्ण झालेल्या प्राण्यांनाही मृत्यू येत नाही (१९). हे राजा, स्त्रियांना निरोगी मुले होत आहेत, अमृततुल्य उदक पाडणारा पर्जन्य वेळेवर वृष्टी करीत आहे (२१). आणि त्याचप्रमाणे हे राजा, नगरातील व देशातील लोक 'अशा प्रकारचा राजा आम्हाला नेहमी असो,' असे नगरात बोलत आहेत.' (२२). याप्रमाणे भरताने उच्चारलेले अत्यंत मधुर शब्द ऐकून नृपश्रेष्ठ राम आनंदित झाला (२३).

भरताच्या म्हणण्याप्रमाणे एक महिन्याच्या मुदतीत राजाची कर्तबगारी कितीशी लोकांच्या लक्षात येणार? कितीशा स्त्रियांना निरोगी मुले होणार? शिशिरऋतूचे ते दिवस होते. त्यात अमृततुल्य उदक पाडणारा पर्जन्य वेळेवर किती वृष्टी करणार व नगरातील लोक तरी काय म्हणून रामाची तारीफ करणार? पण भरत रामास ही अविश्वास ठेवण्यासारखी गोष्ट सांगतो व राम ती खरी मानतो हे मोठे आश्चर्य आहे. भरतासारखे भरमसाट स्तुतिपाठक होते व ही स्तुती खरी नाही असे थोड्याशा विचाराअंती समजेल. असे असताही रामासारख्या सुज्ञ व पराक्रमी राजाला उघड उघड खोटी स्तुती मानवते. हा रामाचा पहिला महिना पाहुण्यांच्या गडबडीत गेल्याकारणाने त्याला राज्यकारभाराकडे लक्ष्य देण्यास न फावणे साहजिक आहे. पण त्यानंतर तरी त्याची दिनचर्या कशी होती ते पाहू.

सर्ग ४२, श्लोक २७ यात

पूर्वाण्हे धर्मकार्याणि कृत्या धर्मेण धर्मवित् ।
शेष दिवसभागार्धं अन्तःपुरगतोऽभवत् ॥

धर्मवेत्ता राम पूर्वाण्हसमयी धर्मकार्ये यथाविधी उरकल्यानंतर दिवसाच्या अवशिष्ट राहिलेल्या अर्ध्या भागामध्ये अंतःपुरात जात असे. सीतेचीही दिनचर्या पुढच्याच श्लोकात दिली आहे.

सीतापि देवकार्याणि कृत्वा पौर्वाण्हिकानि वै ॥
श्वश्रूणामकरोत्पूजां सर्वासामविशेषितः ।
अभ्यगच्छत्ततो रामं विचित्रा भरणांवरा ॥

सीताही सकाळची देवकार्ये आटोपून सर्व सासवांची एकसारखी पूजा केल्यानंतर विचित्र भूषणे व रत्ने धारण करून रामाकडे जात असे. येथे ३५० सासवांची ती पूजा करी का मुख्य तिघींचीच करी हे मोघम आहे.

अंतःपुरातील रामाचा कार्यक्रम

अंतःपुरात गेल्यावर रामाचा व्यवसाय याच सर्गाच्या पहिल्या २६ श्लोकांत वर्णिला आहे. पुष्पक विमानास परत पाठविल्यावर राम अशोक वनात शिरला (सर्ग ४२ श्लोक १). हे वन इंद्राच्या नंदनवनासारखे किंवा कुबेराच्या चैत्ररथासारखे रामाचे वन होते (१५). तेथे राम उत्तम आसनावर बसला आणि

अनुक्रमणिका

सीतामादाय हस्तेन मधुमैरेयकं शुचि ।
पाययामास काकुत्स्थः शचीमिव पुरंदरः ॥ ८ ॥

शचीचा हात धरणाऱ्या इंद्राप्रमाणे सीतेचा हात धरून त्या ककुत्स्थकुलोत्पन्न रामाने मैरेय संज्ञक शुद्ध मद्य तिला पाजले. (१८). यावरून इंद्रलोकात व अयोध्येत नवराबायकोचा दारू पिण्याचा समारंभ चालत असे, असे दिसते.

मांसानि च सुमृष्टानि फलानि विविधानि च ।
रामस्याभ्यवहारार्थं किंकराः तूर्णमाहरन् ॥ १९ ॥

उत्कृष्ट रीतीने तयार केलेली मांसे आणि नाना प्रकारची फळे रामाच्या आहाराकरिता सेवक सत्वर घेऊन आले (१९). राम स्वतः मांस खाणारा व मद्य पिणारा होता. यासाठी त्याच्या भक्तांनी त्यास मद्य-मांसाचा नैवेद्य दाखविणे व स्वतः सेवन करणे उचित होय. वैष्णवांनी या दोन्ही पदार्थांची बंदी केली ते बुद्धाच्या शिकवणीमुळे. पण हे रामाच्या मूळच्या संप्रदायाला विरुद्ध आहे. यापुढे रामाच्या विलासाचे मजेदार वर्णन आहे.

उपानृत्यं च राजानं नृत्यगीतविशारदाः ।
अप्सरोरगसंघाश्च किन्नरी–परिवारिताः ॥ २० ॥
दक्षिणा रूपवत्यश्च स्त्रियः पानवशं गताः ।
उपानृत्यंत काकुत्स्थं नृत्यगीतविशारदाः ॥ २१ ॥
मनोभिरामा रामस्ताः रामो रमयतां वरः ।
रमयामास धर्मात्मा नित्यं परमभूषितः ॥ २२ ॥

अर्थ : नृत्य व गायन यांत निपुण असलेल्या अप्सरा, उरग व किन्नरी यांचे समुदाय रामासमीप येऊन नृत्य करू लागले (२०). मद्यपानाने मस्त झालेल्या, परंतु नृत्यगायनात निपुण असलेल्या कुशल व रूपवती स्त्रियाही त्या काकुत्स्थ रामासमीप नृत्य करू लागल्या (२१). आणि क्रीडा करणाऱ्यांमध्ये श्रेष्ठ असलेला तो धर्मात्मा रामही उत्कृष्ट रीतीने भूषित झालेल्या त्या मनोहर स्त्रियांना नेहमी आनंद देऊ लागला (२२). भिन्न भिन्न देशांच्या सुंदरसुंदर गाननर्तनकुशल स्त्रियांच्या घोळक्यात राम असे. स्वतः उंची मद्य पीत असे, सीतेलाही पाजी आणि या सुंदर तरुणीही मद्यप्राशनाने उल्लू होत. या ठिकाणी रामाला 'रमयतां वरः' म्हणजे क्रीडा करणाऱ्यांमध्ये श्रेष्ठ असे विशेषण योजिले आहे. उत्तम नटलेल्या त्या रमांना राम रमवीत असे, असे वर्णन केले आहे. शास्त्रीबुवा सभ्यपणाने 'आनंद देऊ लागला' असे भाषांतर करतात. २४ व्या श्लोकात सीतेसंबंबाधानेही 'रमयामास' याच क्रियापदाचा प्रयोग आहे. ३२ व्या श्लोकात वर्णिलेल्या स्त्रिया रामाच्या विवाहित होत्या का सीतेच्या सखीवर्गातील म्हणजे दासीवर्गातील होत्या हे स्पष्ट नाही. कसेही असले तरी, राम एकपत्नीव्रत कडकडीतपणे पाळत होता असे वाल्मीकी सांगत नाही.

हृष्टाः खलु भविष्यंति रामस्य परमाः स्त्रियः ॥

हा अयोध्याकांडातील ८ व्या सर्गातील १२ वा श्लोक येथे आठवतो. तेथे रामाच्या श्रेष्ठ स्त्रिया असे म्हटले आहे. यावरून बापाप्रमाणेच रामाला बहुत विवाहित स्त्रिया होत्या असे दिसतें. यावरून उत्तरकांडात

अनुक्रमणिका

रामाच्या विलासगृहातील स्त्रिया त्याच्या धर्मपत्न्या असाव्यात असे अनुमान निघेल. रामाला एकच पत्नी होती असा ज्यांचा आग्रह असेल त्यांना राम विवाहबाह्य संबंध ठेवीत असे असे कबूल करणे भाग आहे. एकंदरीत रामावर एकपत्नीव्रत लादणे हा एक त्याच्या भक्तांचा जुलूम आहे.

बरे, हा क्रम एखाद्या दिवशीचा नव्हता तर हा दररोजचा होता. पहा :

स तया सीतयासार्धमासीनो विरराज ह ।
अरुंधत्या इवासीनो वसिष्ठ इव तेजसा ॥ २३ ॥
एवं रामो मुदायुक्तः सीतां सुरसुतोपमाम् ।
रमयामास वैदेहीमहन्यहनि देववत् ॥ २४ ॥
तथा तयोर्विहरत्तोः सीताराघवायेश्चिरम् ।
अन्यक्रामच्छुभः कालः शैशिरो भोगदः सदा ॥ २५ ॥
प्राप्तयोर्विविधान्भोगान् अतीतः शिशिरागमः ॥ २६ ॥

अर्थ : त्या सीतेसहवर्तमान बसलेला तो राम तेजाने अरुंधतीसहवर्तमान असलेल्या वसिष्ठाप्रमाणे दिसू लागला (२३). अशा रीतीने आनंदयुक्त झालेला राम देवकन्यातुल्य असलेल्या त्या सीतेला देवाप्रमाणे प्रत्यही रमवू लागला (२४). याप्रमाणे ते सीताराम पुष्कळ वेळपर्यंत क्रीडा करीत असताना सर्वदा भोग देणारा शुभ शीतकाल निघून गेला (२५). ते उभयता नाना प्रकारचे भोग भोगीत असताना हिवाळा निघून गेला (२६). म्हणजे शिशिरऋतू संपला.

खुषमस्कऱ्यांचा गराडा

हा रामाचा विलास बरीच रात्र होईपर्यंत चालत असला पाहिजे. यावरून दिवसाच्या पहिल्या भागात धर्मकृत्यांत वेळ घालविल्यावर अपराण्हकाळी तो अंतः पुरात जाई व ख्यालीखुशालीत मांस खाणे, दारू पिणे, पाजणे, नृत्यगायन वगैरेत आपला काळ घालवी. राज्यकारभाराकडे लक्ष देण्यास त्यास वेळ मिळत असे, असे रामायणावरून दिसत नाही. ते काम युवराज भरत याजकडे सोपविले होते व 'सब अच्छा है, आपली स्तुती प्रजाजन करतात' असा रिपोर्ट त्याच्याकडून वारंवार आल्याने राम समाधानात असावा.

याप्रमाणे बराच काल चैनीते घालविल्यावर

अपत्यलाभो वैदेहि त्वय्ययं समुपस्थितः ॥

असे त्याला दिसले. तुझे डोहाळे काय आहेत असे त्याने विचारले. यावर सीता हास्य करून रामास म्हणाली, 'हे राघवा, पवित्र तपोवने अवलोकन करण्याची आणि फळे व मुळे भक्षण करून गंगातीरी वास्तव्य करीत असलेल्या महातेजस्वी ऋषींच्या चरणासमीप तपोवनामध्ये एक रात्र तरी वास्तव्य करावे ही माझी उत्कट इच्छा आहे.' (३२,३३ , ३४). राम म्हणाला, 'ठीक आहे, हे वैदेही, स्वस्थ रहा; तू उद्या निःसंशय जाशील.' नंतर तो मित्रांच्याबरोबर मधल्या चौकात गेला.

अनुक्रमणिका

राजे लोकांच्या भोवती यज्ञयाग करणारे भिक्षुक व गाणेबजावणे, नाच वगैरे करणाऱ्या विलासवती स्त्रिया आणि खुषमस्करे यांचा गराडा असतो असे आपण आजही पाहतो. राम हा या नियमास अपवाद नव्हता. त्याचा पूर्वाण्हाचा सगळा वेळ धर्मकृत्ये करविण्यात भिक्षुक व उपाध्याय वर्ग घेत असे. अपराण्हाचा सगळा वेळ अंतःपुरात विलासवतींच्या घोळक्यात आनंदात जात असे. रामाभोवती खुषमस्करेही कमी नव्हते. दहांची नावे वाल्मीकीने ४३ व्या सर्गात दुसऱ्या श्लोकात दिली आहेत.

अंतःपुरात बायकांच्या गराड्यातून निघून मधल्या चौकात आल्यावर

तत्रोपविष्टं राजानं उपासंते विचक्षणाः ।
कथानां बहुरूपाणां हास्यकाराः समंततः ॥ १ ॥

दुसऱ्या श्लोकात दहांची नावे दिल्यावर

एते कथां बहुविधाः परिहाससमन्विताः ।
कथयंति स्म संहृष्टाः राघवस्य महात्मनः ॥ ३ ॥

अर्थ : समयसूचक असे खुषमस्करे लोक नानाप्रकारच्या गोष्टी राजा बसला असताना सांगून त्याची सर्व प्रकारे सेवा करीत असत (१). हे खुषमस्करे लोक आनंदाने महात्म्या रामाला नाना प्रकारच्या गोष्टी सांगत असत (३). मुळात या लोकांना हास्यकार असे म्हटले आहे. त्यांचा धंदा राजाला हसविणे, करमणूक करणे. खऱ्याखोट्याचा विचार त्यांनी केलाच पाहिजे असे नाही. एकदा काही गोष्ट निघाली असता राम म्हणाला, 'हे भद्रा, नगरामध्ये व देशामध्ये काय चालले आहे? माझ्यासंबंधाने लोक काय बोलत आहेत? त्याचप्रमाणे सीता, भरत, लक्ष्मण, शत्रुघ्न, माता कैकेयी यांच्यासंबंधानेही लोक काय बोलत असतात?' राजे वनामध्ये असोत अथवा राज्यावर असोत; लोक त्यांना नाही ना काही तरी नावे ठेवीतच असनात. ४ । ५ । ६ त भद्राने रामाला' पसंत पडेल असेच स्तुतिपूर्ण सांगितले रामाने आग्रह केला – 'जे काय असेल ते सर्व तू काही एक शिल्लक न ठेवता इत्यंभूत कथन कर. माझ्यासंबंधाने बरेवाईट काय बोलतात ते ऐकल्यावर लोकदृष्टीने शुभ असलेली कृत्ये मी करीन व अशुभ असलेली करणार नाही. तू काही भीती मनात न बाळगता कुटाळ लोक देशामध्ये माझ्यासंबंधाने काय बोलतात ते मला निर्भयपणे व निःशंकपणे कथन कर.' (श्लो. ९ । १० । ११). भद्राने उत्तर दिले, 'समुद्रामध्ये सेतुबंधन हे दुष्कर कृत्य रामाने केले; हे कृत्य देवदानवांच्या हातून झालेले वृद्धांच्यासुद्धा ऐकण्यात नाही. अजिंक्य रावणाचा सैन्य व वाहने यांसह वध करून व राक्षसांबरोबर वानर व ऋक्ष ताब्यात आणले. संग्रामामध्ये रावणाचा वध करून सीता घेऊन, क्रोध मागे सारून त्याने तिला पुन्हा घरी आणले. परंतु सीतेच्या संभोगापासून त्या रामाच्या मनाला काय बरे सुख वाटत असेल? जिला पूर्वी रावणाने बलात्काराने अंकावर घेऊन हरण करून नेले (१७) इतकेच नव्हे, परंतु पूर्वी लंकेत नेल्यानंतर अशोक वनामध्ये नेऊन ठेविले असता जी राक्षसांच्या अधीन झालेली होती, तिला राम दूषण कसे देत नाही? (१८) आता स्त्रियासंबंधाने असला प्रकार आम्हालाही सहन होऊ लागेल. कारण, जसे राजा करू लागतो तसे लोकही त्याला अनुसरून वागू लागतात (१९). अशी नानाप्रकारची भाषणे, हे राजा, नागरिक जन सर्व नगरामध्ये व देशामध्ये तुझ्यासबंधाने करीत असतात.' (२०). हे ऐकून राम फार कष्टी झाला व आपल्या सुहृदाना म्हणाला, 'हे काय आहे हे आपण मला सांगा.' ते म्हणाले, 'भद्र सांगत आहे याप्रमाणे हे निःसंशय खरे आहे.'

अनुक्रमणिका

कीर्तीची हाव सुटली

मित्र निघून गेल्यावर रामाने आपणे तीन भाऊ बोलावून आणले (सर्ग ४४). ते येऊन रामाच्या चरणी मस्तक ठेवून तिघेही स्वस्थ उभे राहिल्यावर राम अश्रू ढाळू लागला (१८). नंतर बाहूंनी त्यांना आलिंगून त्यांना आसनावर बसण्यास रामाने सांगितले व तो म्हणाला, 'तुम्ही माझे सर्वस्व व जीवित आहा; आणि हे राजपुत्रहो, तुम्हीच संपादन केलेले राज्य मी प्रतिपालन करीत आहे (२०). तुमची बुद्धी परिपक्व झाली असून शास्त्रतात्पर्यही तुम्ही जाणले आहे व त्याप्रमाणे तुम्ही वागतही आहा. यास्तव, हे राजपुत्रहो, तुम्हीं सर्व मिळून मी काय म्हणत आहे याचा विचार करा.' (२१).

पुढे सर्ग ४५ मध्ये राम आपला हुकूम लक्ष्मणास सांगतो. 'सीतेविषयी माझ्यासंबंधाने लोक काय बोलत आहेत हे तुम्ही ऐका (२). नगरातील व देशातील लोकांचा फारच मोठा अपवाद आहे ते माझी निंदा करीत आहेत व ती निंदा माझ्या मर्माचा भेद करीत आहे (३). हे सौम्य (लक्ष्मण), निर्जन अरण्यामध्ये रावणाने सीता कशी हरण करून नेली व त्याचा वध मी कसा केला हे तू जाणतच आहेस (५). त्या ठिकाणी राहिलेली सीता अयोध्येला मला कशी नेता येईल ही शंका मला तेथेच आली होती. तेव्हा खात्रीकरिता सीता अग्नीमध्ये प्रविष्ट झाली (६). हे लक्ष्मणा, देवांच्या सन्निध हव्य नेणाऱ्या अग्नीने व आकाशामध्ये संचार करणाऱ्या वायूने मैथिली निष्पाप असल्याचे तुझ्या समक्षच सांगितले आहे (७). आणि सर्व ऋषी व देव यांचे सन्निध सूर्यचंद्रांनीही पूर्वी जनककन्या निष्पाप असल्याचे कथन केले आहे (८). याप्रमाणे देव आणि गंधर्व यांचे सन्निध आचरणाने शुद्ध झालेली सीता लंकाद्वीपामध्ये महेंद्राने माझ्या हाती दिला (९) आणि यशस्विनी सीता शुद्ध असल्याची माझ्या मनामध्ये खात्री आहे. तेव्हा सीतेला घेऊन मी अयोध्येस आलो.' (१०).

लोकांत चाललेली निंदा रामाला असह्य झाली व कीर्ती मिळविण्याची हाव सुटली.

'अकीर्तिर्निंद्यते देवैः कीर्तिर्लोकेषु पूज्यते ।
कीर्न्यथं तु समारभः सर्वेषां सुमहात्मनाम्' ॥ १३ ॥

'देवही अपकीर्तीची निंदा करीत असतात; कीर्तीची लोकांमध्ये प्रशंसा होत असते आणि सर्वही महात्मे कीर्ती संपादन करण्याकरिताच खटपट करीत असतात (१३). हे पुरुषश्रेष्ठही, लोकापवादरूप भयाला भिऊन मी जीविताचा अथवा तुमचाही त्याग करीन; मग जनककन्येची गोष्ट पाहिजे कशाला? (१४). तस्मात् सांप्रत शोकसागरात पडलेल्या मला तुम्ही अवलोकन करा. यापेक्षा अधिक दुःखदायक अशी कोणतीही गोष्ट प्राप्त झाल्याचे दिसत नाही (१५). तस्मात् हे लक्ष्मणा, उद्या सकाळी सुमंत्र सारथी ज्याच्यावर आहे अशा रथावर आरूढ होऊन तू सीतेला वर घे आणि या देशाच्या हद्दीपलीकडे सोडून दे (१६). गंगा सोडून गेल्यावर तमसा नदीचे तीरी महात्म्या वाल्मीकी मुनींचा दिव्य आश्रम आहे (१७) तस्मात् हे रघुनंदना लक्ष्मणा, तेथे निर्जन प्रदेशामध्ये हिला सोडून देऊन तू सत्वर परत ये. हे माझे म्हणणे अमलात आण (१८). सीतेसंबंधाने याच्या उलट तू मला काहीही सांगू नकोस. तस्मात् हे लक्ष्मणा, याविषयी काही एक विचार न करता तू चालता हो (१९). तू याला आड येशील तर मला अतिशय दुःख होईल. यास्तव मी आपल्या पायांची व जीविताची तुम्हांला शपथ घातली आहे (२०). माझ्या भाषणाविरुद्ध जे कोणी माझी समजूत करण्याकरिता कसल्याही प्रकारचे भाषण करतील त्यांच्या योगाने इष्ट असलेल्या गोष्टीचा विघात होत असल्यामुळे ते माझे सर्वदा शत्रू समजले जातील (२१). तुम्ही जर माझ्या आज्ञेप्रमाणे वागत असाल तर मला मान द्या; सीतेला येथून घेऊन जा. हे माझे म्हणणे कर (२२). 'गंगातीरी असलेले आश्रम

अनुक्रमणिका

अवलोकन करण्याची माझी इच्छा आहे' असे तिने मला पूर्वीच सांगितले आहे. यास्तव ही तिची इच्छा परिपूर्ण होऊ दे' (२३). याप्रमाणे त्यांना सांगितल्यानंतर ककुत्स्थकुलोत्पन्न रामाचे नेत्र अश्रूंनी भरून आले आणि भ्रात्यांनी परिवेष्टित असलेला तो धर्मात्मा गृहामध्ये प्रविष्ट झाला (२४).

न्यायदानाची अजब पद्धत

पुढील ४६ व्या सर्गात लक्ष्मणाने सीतेला वनात नेऊन सोडल्याची कथा आहे. सीतेचा त्याग रामाने केला अशी जी ही हकीगत आहे, तिच्याविषयी जरा जास्त विचार भरणे योग्य आहे.

बायकांच्या गराड्यातून बाहेर आल्यावर रामाचा वेळ खुषमस्कऱ्यांच्या संगतीत मजेने जात असे. या लोकांना हास्यकार म्हटले आहे. राजाला हसविणे हा यांचा धंदा. यासाठीच यांची नेमणूक केलेली व हे काम जो जास्त करील त्याला जास्त बक्षीस. आजही हे लोक आजच्या राजाभोवती आहेतच. राजाची मर्जी राखून त्याला काय आवडेल व कसे बोलणे असता त्याची तब्येत खूष होईल हे यांना चांगले अवगत असल्याने त्यांच्यावर गैरमर्जी होण्याचे प्रसंग फार क्वचित. त्याप्रमाणे रामाच्या आग्रहावरून भद्राने त्याच्या सेतूचे व पराक्रमाचे वर्णन करून सीतेसंबंधी लोकांचे बोलणे सांगितले. रामाला दुःख झाले व 'हे काय आहे हे आपण मला सांगा' असे तो आपल्या सुहृदांना म्हणाला. 'भद्र सांगत आहे याप्रमाणे हे निःसंशय खरे आहे.' असे त्यांनी उत्तर दिले.

रामाने आपल्या तीन भावांस ताबडतोब बोलावून आणले व त्यांची तारीफ करून 'तुम्ही सर्व मिळून मी काय म्हणत आहे याचा विचार करा' असे राम त्यास म्हणाला. पुढील सर्गात राम त्यास सर्व हकीगत सांगतो व सीतेला राज्याबाहेर वाल्मीकीच्या आश्रमाजवळ सोडून देण्याचा हुकूम एकदम लक्ष्मणास देतो. भावांना विचार करण्यास वेळ देत नाही. भावांचे म्हणणे ऐकूनही घेत नाही. आपल्या हुकमाच्या विरुद्ध बोलण्याची बंदी करतो. आपल्या पायाची व गळ्याची शपथ घालतो. कोणी विरुद्ध बोलल्यास त्याला शत्रू समजले जाईल अशी धमकीही देतो. हा एक रामराज्याचा अजब नमुना आहे. कोणाकडून तरी बातमी ऐकावयाची, तसल्याच गप्पीदासाकडून तिची सत्यता पटवून घ्यावयाची. आरोपीस तर मुळीच विचारावयाचे नाही. त्याचा बचाव काय आहे याकडे पाहावयाचे नाही. आरोपीच्यातर्फे कोणी बोलणार असेल त्याचे तोंड बंद करावयाचे. मुळीच काही ऐकणार नाही अशी प्रतिज्ञा करून फक्त शिक्षा अमलात आणण्याचे काम त्यांना सांगावयाचे ही रामराज्याची न्यायदानपद्धती आहे! लक्ष्मण व भरत यांची रामावरची बंधुप्रीती अवर्णनीय. पण राम त्यांना कसे वागवितो पहा. त्यांचा विचार मुळीच घेत नाही. त्यांना इतर शिपायांपेक्षाही वाईट रीतीने वागवितो. त्यांचे म्हणणेही त्याला ऐकण्यास नको. एकंदरीत 'मी करीन तो कायदा' हे रामराज्याचे मुख्य तत्त्व दिसते. पुढे शंबूकाच्या कथेतही हेच आहे.

रामाने सर्व भावांस बोलावून आणून 'तुम्ही माझे सर्वस्व व जीवित आहा. तुम्हीच संपादिलेले राज्य मी प्रतिपालन करीत आहे. तुमची बुद्धी परिपक्व झाली असून शास्त्रतात्पर्यही तुम्ही जाणले आहे व त्याप्रमाणे तुम्ही वागतही आहा. तुम्ही सर्व मिळून मी काय म्हणत आहे याचा विचार करा.' असे म्हटल्यावर त्यांचा विचार ऐकावयाचाही नाही हे वाल्मीकीचे वर्णन मोठे चमत्कारिक व रामास महत्त्व न आणता लघुत्व आणणारेच आहे.

अनुक्रमणिका

लोकापवादाला आपण भितो. तो खरा असो, खोटा असो, तो टाळण्याचीच पर्वा आपण करतो, दुसऱ्या कशाचीही कदर आपण बाळगीत नाही, असे राम म्हणतो. (पहा उत्तरकांड सर्ग ४५, श्लोक १४)

'अप्यह जीवितं जह्यां युष्मान्वा पुरुषर्षभाः ।
अपवादभयाद्भीतः किं पुनर्जनकात्मजाम्' ॥

'लोकापवादरूप भयाला भिऊन मी जीविताचा अथवा तुमचाही त्याग करीन; मग जनककन्येची गोष्ट पाहिजे कशाला?' यावरून रामाच्या दृष्टीने सीतेची किंमत भावांपेक्षा पुष्कळच कमी होती. जनकात्मजेची काय बिशाद; तुम्हाला देखील मी सोडीन, पण लोकापवाद मला सहन होणार नाही, असे हा धीरपुरुष म्हणतो. रामाच्या दृष्टीने स्त्रीची—विशेषतः जी अगदी शुद्ध आहे अशी रामाची खात्री आहे अशा सीतेची—काही किंमत नव्हती. हे रामायणातले वचन भवभूतीला पसंत पडले नाही व त्याने उत्तररामचरितम् नाटकात

स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि ।
आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा ॥

हा श्लोक रामाच्या तोंडी घातला आहे. त्यात स्नेह, दया आणि सुख यांपेक्षाही जानकीची योग्यता जास्त आहे. स्नेह याचा संबंध भावांशी किंवा मातेशी लावला पाहिजे. यांच्यापेक्षाही सीता जास्त मानतो असे अपि पदाने भवभूती दाखवीत आहे. पण उत्तरकांड लिहिणाऱ्या वाल्मीकीच्या दृष्टीने भावापुढे सीतेची काय पर्दा?

स्मृतिविरुद्ध आचरण

रामाला सत्याची बिलकुल पर्वा नव्हती. केवळ लोकांना खूष करण्याची इच्छा. सीता शुद्ध आहे ही मनाची खात्री. पण लोक तिला अपवित्र समजतात तर तिचा त्याग केलाच पाहिजे असे ठरवून, दुसऱ्या कोणाला बोलण्याची संधी न देता, सीतेला तो आपल्या राज्याच्या बाहेर ती गर्भिणी असताही तिच्या संरक्षणाची किंवा योगक्षेमाची पर्वा न करता घालवून देत आहे. स्वतःची स्त्री व्याभिचारिणी ठरली तरी तिच्या जन्मभर तिला केवळ अन्नवस्त्र तरी दिलेच पाहिजे, असा स्मृतींचा नियम राम धुडकावून लावीत आहे (पाहा मनु अ. ११).

विप्रदुष्टां स्त्रियं भर्ता निरुंध्यादेकवेश्मनि ।
यत्पुंसः परदारेषु तद्यैनां चारयेद्व्रतम् ॥ १७७ ॥
साचेत्पुनः प्रदुष्येत्तु सदृशेनोपयंत्रिता ॥
कृच्छ्रं चांद्रायणं चैव तदस्याः पावनं स्मृतम् ॥ १७८ ॥

अर्थ : व्यभिचारिणी स्त्रीला एका घरात प्रतिबंधात ठेवून परकीय स्त्रीशी गमन करणाऱ्या पुरुषाला जे प्रायश्चित्त सांगितले आहे ते तिच्याकडून आचरवावे (१७७). ती आपल्या जातीच्या पुरुषाबरोबर पुन्हा व्यभिचार करील तर तिच्या शुद्धीसाठी तिच्याकडून चांद्रायण व्रत करवावे (१७८).

सीता शुद्ध आहे अशी रामाची खात्री होती. यासाठी तिला शिक्षा करणेच गैर. लोकांच्या समजुतीप्रमाणे ती दोषी होती असे मानले, तरी स्मृतीच्या शासनाप्रमाणे तिचा अशा गर्भावस्थेत त्याग करणे

असे अधर्म्य कृत्य रामासारख्याने का करावे कळत नाही. आमचे स्मृतिकार या व्यभिचारदोषाच्या बाबतीत बरेच उदार आहेत याज्ञवल्क्य स्मृतीचे वचन या बाबतीत लक्षात ठेवण्यासारखे आहे. (अध्याय १, श्लोक ७०।७१।७३ पाहा).

हृताधिकारां मलिनां पिंडमात्रोपजीविनीम् ।
परिभूतामधः शय्यां वासयेद्व्यभिचारिणीम् ॥ ७० ॥

व्यभिचारिणी स्त्रीचे घरातील सर्व अधिकार काढून घेऊन, मलीन, फाटकी वस्त्र देऊन, जीव जगण्याइतके अन्न देऊन तिला आदर न दाखविता जमिनीवर निजावयास लावावे (७०). पण ही शिक्षा कायमची नव्हती. स्त्री एकदा भ्रष्ट झाली की ती जन्मभर भ्रष्ट झाली असे पूर्वीचे ऋषी मानीत नसत. स्त्री ही स्वभावतः पवित्रच आहे असे त्यांचे मत होते. पाहा पुढचाच श्लोक :

सोमः शौचं ददावासां गंधर्वाश्च शुभां गिरम् ।
पावकः सर्वमेध्यत्वं मेध्या वै योषितो ह्यतः ॥ ७१ ॥

चंद्राने स्त्रियांना शांच गंधर्वाने मधुर वाणी आणि अग्नीने सर्व प्रकारची पवित्रता दिली आहे. म्हणून स्त्रिया पवित्र आहेत (७१). यामुळे ७० व्या श्लोकात दिलेल्या शिक्षेचा अवधी ७२ व्या श्लोकार्धात सांगितला आहे. पाहा :

व्यभिचारांदृतौ शुद्धिर्गर्भे त्यागो विधीयते ॥

अर्थः व्यभिचारिणी स्त्री ऋतुकालानंतर व परपुरुषापासून गर्भवती झालेली स्त्री संतान उत्पन्न झाल्यावर शुद्ध होते (७२). सीता रावणापासून गर्भार राहिली असती तरी तिला प्रसूतीपर्यंत दूर ठेवणे धर्मशास्त्राप्रमाणे योग्य झाले असते. पण रामायणात सांगितल्याप्रमाणे निष्ठूरपणे त्याग करणे आर्यसंस्कृतीच्या विरुद्ध आहे. यावरून राम हा आर्यावर्तातील राजा नसावा असा संशय येतो येथील असता तर त्याने स्मृतीला प्रमाण मानून सीतेसंबंधाने अन्याय केलाच नसता. तो इजिप्तचा राजा होता असे मल्लादो व्यंकटरत्नम् म्हणतात ते खरे असावे असे या सीतात्यागावरून दिसू लागते.

Social Life in Ancient Egypt by W. M. Flinders Petrie p.93 : for adultery the punishment was a thousand lashes to the man and loss of nose to the woman.

व्यभिचारी पुरुषास एक हजार फटके व व्यभिचारिणीस नाक कापणे ही शिक्षा पुराण इजिप्त देशात असे. तेथील वहिवाटीप्रमाणे सीतेला हद्दपारीची सौम्य शिक्षा दिली असावी असे अनुमान होते.

सीतात्यागाच्या कामी रामाने जे मनोदौर्बल्य दाखविले आहे त्याचाही विचार करणे जरूर आहे. राजा ही मोठी विभूती आहे. सर्व देवमय तो आहे. त्याचे मुख्य काम न्याय देणे हे आहे. राजा कालस्य कारणम् असे महाभारत सांगते पण रामायणात राजा अगदी दुर्बल दाखविला आहे. सीता निर्दोष आहे ही त्याची खात्री आहे. लक्ष्मणही तसेच जाणतो. पण राम आपल्या भावाचा सल्ला घेत नाही. तो घेण्याचा काही उपयोग नाही असा त्याचा भाव दिसतो. तीन भावांनीही त्यास काही हरकत घेतली नाही. यावरून राम व

त्याचे तीन भाऊ कोणत्या तरी श्रेष्ठ शक्तीने मूढ झाले असावेत. आमच्या आर्याच्या स्मृतिशास्त्रांप्रमाणे राजा असहाय नाही. त्याच्याकडे सर्व न्याय देण्याचे अधिकार असतात. धर्मशास्त्राप्रमाणे त्याने न्याय दिला पाहिजे हे खरे, पण न्याय–अन्याय पाहण्याची जबाबदारी त्याच्यावर आहे. हा चालू सीतात्याग प्रकरणी राम फक्त लोकापवादाला भीत आहे. न्याय–अन्याय तो पाहत नाही. सीता निरपराध ही खात्री असताही केवळ लोकानुरंजनाकरिता तो पाप करीत आहे. यावरून राम हा आर्यवंशीय व मन्वादिधर्मशास्त्र आचरणारा दिसत नाही. हा कामी आपणास इजिप्तच्या प्राचीन चाली रीतींपासून काही मदत होते काय हे पाहणे योग्य होईल:

Social Life in Ancient Egypt by W. M. Flinders Petrie, page 37. 'The powers of the king were strictly limited. He could not do any public business, condemn or punish any man to gratify his own humour or revenge, or for any other unjust cause; but was found to do according as the laws had ordered in every particular case... In the VIth dynasty a queen was tried by a judge, who wrote the report with another judge, the king taking no part, and not appearing to act in the case. He may probably have given judgement finally, in this case as in other serious cases, but the examination and condemnation of criminals was entirely a matter of legal procedure.'

The theory of a divine kingship was thus greatly limited.

इजिप्तच्या राजाचे अधिकार पूर्णपणे मर्यादित होते. कोणताही जानपद व्यवहार करणे. आपल्या लहरीखातर किंवा सूड उगविण्यासाठी किंवा अन्यायाने कोणा इसमाला शिक्षा करणे त्याला शक्य नव्हते. प्रत्येक कामी कायदा काय आहे हे पाहून त्याप्रमाणे हुकूम देणे त्याला भाग होते ... सहाव्या वंशातील एका राणीची चौकशी एका न्यायाधीशापुढे झाली होती व त्याचा निकाल त्याने दुसऱ्या एका न्यायाधीशाच्या मदतीने लिहिला. या चौकशीत राजाने कोणताही भाग घेतला नाही व या कामी काहीच केले नाही. इतर कोणत्याही महत्त्वाच्या खटल्याप्रमाणे या कामीही अखेरचा हुकूम त्यालाच द्यावा लागला असेल. पण आरोपीची चौकशी करणे व निकाल देणे ही कामे कायद्यात सांगितल्या पद्धतीनेच झाली पाहिजेत.

स्मृतीत आज्ञा दिली असेल त्याप्रमाण प्रजेला न्याय देणे हे आर्य राजाचे काम ही जवाबदारी त्यावर. कायद्यांत सांगितल्याप्रमाणे न्यायाधीशांनी निकाल द्यावा. अन्याय झाला तरी राजाने तिकडे पाहावयाचे नाही अशी पद्धती इजिप्शन राजांची. सीतेला राज्यातून हाकून देण्याच्या कामी रामाने आर्यराजासारखे वर्तन केले नाही. इजिप्शन राजाच्या पद्धतीने वर्तन केले आहे. यावरूनही राम इजिप्तचा राजा असावा असे दिसते.

रामराज्याविषयी लोकांच्या समजुतीला रामायणाचा फारसा आधार नाही असे दिसून येईल.

उत्तरकांडाच्या ५३ व्या सर्गात प्रजेची गाऱ्हाणी राजाने ऐकली पाहिजेत अशाविषयी ४,५,६ श्लोक आहेत. यांत राम म्हणतो, 'हे विनयसंपन्न लक्ष्मणा, नागरिकजनांची कार्ये मी करीत नसल्याला आज चार दिवस झाले. परंतु त्याची माझ्या मनाला फार रुखरुख लागून राहिली आहे (४). हे पुरुषश्रेष्ठा, अमात्य, पुरोहित व मंत्री यांना निमंत्रण करा आणि कामकाज असलेल्या पुरुषांना व स्त्रियांना बोलवा (५). जो राजा प्रजेचे काम प्रत्यही पाहात नाही तो वायुसंचार रहित घोर नरकामध्ये पडतो यांत संशय नाही (६). सातव्या

श्लोकापासून नृग राजाची कथा राम हा लक्ष्मणास सांगत आहे. यावरून ही कथा घालताना कवीने कथेची प्रस्तावना म्हणून रामाच्या तोंडी हे श्लोक घातले असावेत. वास्तविक पाहता राज्यकारभाराचे सर्व काम युवराज भरत याजकडे सोपविले होते व रामाकडे धर्मकृत्ये राहिली होती. असा हा श्रमविभाग उभयतांमध्ये झालेला असावा.

नृगराजाची व तदनुषंगाने इतर कथा सांगण्यात ६ सर्ग खर्च पडले आहेत व या कथेचा उपसंहार ५९ व्या सर्गात केला आहे. 'हे सर्व मी तुला कथन केले. आता नृगराजाप्रमाणे आपणाला दोष लागू नये एतदर्थ सर्व कार्यार्थी जनांची आपण भेट घेऊ.' हे राम बोलत असताच उजाडले (श्लोक २३).

सेवकांचा तुटवडा का ?

लक्ष्मण हा दिवस मध्यावर आल्यावेळी अयोध्येत पोचला व तो ताबडतोब रामाकडे गेला असे ५२ व्या सर्गाच्या आरंभास सांगितले आहे. लक्ष्मणाचे समाधान केल्यावर रामाने नृगराजाची व इतर कथा सांगितल्या व कथा संपल्याबरोबर उजाडले. एकंदरीत ही रामलक्ष्मणाची बैठक सहा प्रहर चालली होती. रात्री निद्रा कोणीच घेतली नाही.

धर्मकृत्ये करून राम कचेरीत लोकांच्या तक्रारी ऐकण्यास बसला व लक्ष्मणास म्हणाला, 'हे महापराक्रमी, हे सुमित्रेचा आनंद वाढवणाऱ्या लक्ष्मणा, तू बाहेर जा आणि कार्यार्थी लोकांशी बोलण्याचा उपक्रम कर.' लक्ष्मण दरवाजावर गेला. अर्जदारांस पुकारले. पण 'आज माझे काम आहे' म्हणून कोणीही तेथे लक्ष्मणाला कळविलें नाही. येथे अशी शंका येते, की अर्जदाराला पुकारण्यास रामाजवळ कोणीच नव्हते म्हणून त्याने आपल्या सावत्र भावाला ते काम सांगावे ? रामराज्यात सर्व गोष्टींची विपुलता असून सेवकांचाच तुटवडा पडावा हे आश्चर्य आहे. सीतेला पोचविण्यास लक्ष्मण गेला. सारथी सुमंत्र हा मंत्री. महाराणी सीतेला वाटेत एक रात्र काढावयाची होती. तिच्याबरोबर एखादी दासीही नाही. बरे, घोड्यांची नोकरी करावयास व त्यांस चंदीवैरण देण्यास एखादा मोतद्दारही बरोबर नाही. ते काम प्रधान मंडळातील एकाने तरी करावे किंवा राजपुत्र लक्ष्मणाने करावे. येथेही रामाच्या राजवाड्यात अर्जदारांस बोलावण्याचे काम लक्ष्मणास करावे लागत आहे ही हकीगत प्रक्षिप्त सर्ग ११ तील आहे.

अर्जदार नसण्याचे कारण दिले आहे ते असे, : 'राम राज्य करीत असताना मानसिक व शारीरिक दुःखांचा अभाव असून पृथ्वी सर्व औषधींनी संपन्न व पक्व धान्यांनी युक्त होती (८). बाल, तरुण अथवा मध्यम वयांतील असा कोणीही मरत नव्हता. सर्व काही कारभार धर्माने चालला होता; आणि कसल्याच प्रकारचा उपद्रव नव्हता. यामुळे रामाचे कारकीर्दीत कोणी अर्जदारच दृष्टोत्पत्तीस येत नसे.'

कुत्र्याचे प्रदीर्घ प्रवचन

लक्ष्मणाने हात जोडून रामाला तसे सांगितले. राम प्रसन्न झाला आणि त्याला म्हणाला, 'तू पुनरपि जा आणि अर्जदारांची चौकशी कर.' पुन्हा पाठवून लक्ष्मणावर बेभरंवसा करण्याचे काही कारण नव्हते. शिवाय राम म्हणतो, 'उत्तम प्रकारे राजनीति चालविल्यामुळे कोठेही अधर्म होत नाही; आणि राजभीतीमुळे सर्व परस्परांचे रक्षण करीत आहेत (१२). तूही लक्षपूर्वक प्रजेचे रक्षण कर. मग लक्ष्मण गेला व त्यास एक कुत्रा आढळला. रामाचा हुकूम झाल्यावर कुत्रा राजसभेत आला.

अनुक्रमणिका

या प्रसंगी कुत्र्याने राजधर्मावर एक प्रवचन झोडले आहे. हा पुढील सर्ग प्रक्षिप्त म्हणून प्रसिद्ध आहे व त्यावर तिलक नामक टीकाही नाही. असे हे तीन सर्ग आहेत. रामाच्या राज्यव्यवस्थेविषयी विचार करताना यांना नजरेआड करणे बरे झाले नसते.

६१ व्या सर्गाच्या प्रारंभास वसंत ऋतूतील रात्र प्राप्त झाली असे सांगितले आहे. म्हणजे राम व लक्ष्मणाचा संवाद दुपारपासून संध्याकाळपर्यंत चालला होता व तेच संभवनीय आहे. पण ५९ व्या सर्गाच्या शेवटी उजाडले असे आहे. हा मोठा विसंवाद आहे.

६१ व्या सर्गात ऋषींनी लवणासुराच्या जुलमाविरुद्ध तक्रार केली आहे. त्याच्या पारिपत्याचे काम शत्रुघ्नाकडे देण्यात आले.

७३ व्या सर्गात शंबुकाची कथा आली आहे.

देशातील एक वृद्ध द्विज आपला मेलेला मुलगा घेऊन राजाच्या द्वाराशी आला. त्याने बहुत शोक केला. 'कधी अनृत भाषण केल्याचे, कधी हिंसा केल्याचे अथवा कोणत्याही प्राण्याला मी कधी दुःख दिल्याचे स्मरत नाही. तेव्हा कोणाच्या बरे पातकामुळे हा माझा पुत्र अगदी बाल असताच पितृकार्य केल्याशिवाय आज यमसदनी गेला आहे?' पुढे तो म्हणतो, 'ज्या अर्थी रामाच्या देशात राहणाऱ्या बालकांना मृत्यू येत आहे त्या अर्थी रामाच्याच हातून काही तरी मोठे पातक घडले आहे यात संशय नाही (१०). कारण इतर राजांच्या देशांत राहणाऱ्या बालकांना मृत्यूचे भय नाही. तस्मात् हे राजा, मृत्यू पावलेल्या या बालकाला तू जिवंत कर' (११). त्या ब्राह्मणाने रामाला अनेक दूषणे दिली आहेत. रामाने सभा भरविली (सर्ग ७४). वसिष्ठासह आठ ब्राह्मण येऊन त्यांनी रामाला आशीर्वाद दिले. मंत्री व पौरजन येऊन तेही बसले. हा द्विज धरणे घेऊन बसला आहे वगैरे सर्व काही रामाने निवेदन केले. तेव्हा नारदाने भाषण केले. तो म्हणाला, 'पूर्वी कृतयुगामध्ये ब्राह्मणच तपस्वी होते; त्या वेळी कसाही प्रसंग आला तरी ब्राह्मणेतर तपस्वी नसे (१०). तदनंतर त्रेतायुग प्राप्त झाले व त्या युगामध्ये मानव काहीसे देहाभिमानी झाले. पूर्वसंचित तपाने युक्त असे क्षत्रिय या युगात उत्पन्न झाले. या त्रेतायुगात ब्राह्मण व क्षत्रिय तप करीत व वैश्य, शूद्र त्यांची सेवा करीत. पुढे द्वापारयुगात वैश्यही तप करू लागले. कलियुगात शूद्रही तपश्चर्या करतील. पण रामराज्यात एक शूद्र तप करीत आहे त्याचा नाश कर.

विद्याप्रसार रामराज्यात नको

रामाने पुष्पक विमानात बसून त्याचा शोध केला. प्रथम पश्चिम, नंतर उत्तर व पूर्व दिशांना शोधल्यावर दक्षिण दिशेस शैव पर्वताच्या उत्तरेस मोठे सरोवर लागते. त्याच्या तीरी अधोमुख होऊन लोंबकळत असलेला एक तपस्वी आढळला. रामाने त्याला धन्यवाद दिला व तू कोणत्या योनीमध्ये उत्पन्न झाला आहेस व तुझा उद्देश काय वगैरे विचारले. त्याने उत्तर दिले– 'मी शूद्र योनीत जन्मलो व देवलोक संपादन करण्याच्या इच्छेने मी तप करीत आहे.' हे बोलताच रामाने खड्गाने त्याचे शिर तोडले. यावरून वर्णव्यवस्था जन्मावर येऊन बसली व गुणकर्मांची महती राहिली नाही, त्या काळी ही शंबुकाची कथा लिहिली गेली असे अनुमान होते.

अनुक्रमणिका

तपासारखे चांगले कृत्य शुद्ध भावाने देखील शूद्राने करता कामा नये; त्यायोगाने ब्राह्मणांची मुले मरतात अशा समज रामाचा झालेला होता व तो भिक्षुकी वृतीने भारलेला असल्याने त्याला स्वतःची विचारशक्ती राहिलेली नव्हती. जवळचे ब्राह्मण सल्लागार जसे समजावतील त्याप्रमाणे करावे एवढेच रामाचे काम व म्हणूनच रामराज्याची भरभक्कम स्तुती हिंदुस्थानातील जे जे प्राचीन किंवा अर्वाचीन राजे झाले त्यांपैकी जे ब्राह्मणांस नमून राहिले व त्यांच्या आज्ञा ज्यांनी पाळल्या त्यांची वाखाणणी पूर्वी झाली व अजून होत आहे. जे स्वतःच्या बुद्धीने वागले व वागतात त्यांची निंदाच ऐकू येते. तप म्हणजे ज्ञान या ज्ञानाचा प्रसार ब्राह्मणेतरांत न व्हावा, अशी मुख्य खटपट आहे व हेच रामराज्याचे लक्षण आहे.

सर्व माणसांना विद्येचे दार खुले पाहिजे, पण रामराज्यास हे वावडे आहे. स्वार्थी लोक रामराज्याचे गोडवे का गातात, हे यावरून उघड होत आहे.

अनुक्रमणिका

१९ सीता चरित्र

सीता ही जनक राजाची पाळलेली मुलगी जनक विश्वामित्रास तिची हकीगत सांगतो, ती अशी :

अथ मे कृषतः क्षेत्रं लांगलादुत्थिता ततः ।
क्षेत्रं शोधयता लब्धा नाम्ना सीतेति विश्रुता ॥ १३ ॥

बालकांड, सर्ग ६६.

भूतलादुत्थिता सा तु व्यवर्धत ममात्मजा ।
वीर्यशुल्केति मे कन्या स्थापितेयमयोनिजा' ॥ १४ ॥

'मी जमीन नांगरीत असता नांगरातून एक कन्या प्राप्त झाली व ती नांगरापासून निघाली म्हणून सीता या नावाने प्रसिद्ध झाली (१३) भूतलातून निघालेली माझी कन्या वाढू लागली. तेव्हा वीर्यशुल्का (हे त्र्यंबक चाप सज्ज करण्याला समर्थ असे ज्याचे वीर्य असेल त्यालाच ही द्यावयाची असे.) म्हणून मी ही अयोनिसंभव कन्या रक्षण केली (१४). पुढे भूतलापासून उत्पन्न झालेली माझी कन्या मोठी होऊ लागली असता हे मुनिश्रेष्ठ, राजांनी येऊन तिला मागणी घातली (१५). परंतु नुसती मागणी घालणाऱ्या त्या सर्व राजांपैकी मी एकालाही आपली वीर्यशुल्का कन्या दिली नाही (१६). तदनंतर हे मुनिश्रेष्ठ, सर्व राजे आपआपल्या सामर्थ्याचा अदमास पाहण्याकरिता एकत्र जमून मिथिलेस आले (१७). तेव्हा त्यांच्यासमोर त्र्यंबक चाप ठेवले असता ते उचलण्यास किंवा तोलण्यास ते समर्थ झाले नाहीत' (१८). जनकाने मुलगी देण्याचे नाकारल्यावर त्या राजांनी मोठ्या रागाने मिथिला नगरीस वेढिले व फार पीडा केली. 'एक वर्ष वेढा पडल्यावर सर्व साधने संपून गेल्यावर मी दुःखित झालो. मी तपश्चर्येने देवगणांना प्रसन्न केल्यावर त्यांनी चतुरंग सैन्य दिले. त्यांच्या हल्ल्यापुढे ते अल्पवीर्य पापी राजे अमात्यांसह पळून गेले. रामाने धनू सज्ज केल्यास मी त्याला सीता देईन.' (२६).

सर्ग ३१ श्लोक ९ यात या धनुष्याचे सामर्थ्य सांगितले आहे.

नास्य देवा न गंधर्वा नासुरा न च राक्षसाः ।
कर्तुमारोपणं शक्ताः न कथंचन मानुषाः ॥

देव, गंधर्व, दैत्य व राक्षस यांपैकी कोणीही त्या धनुष्याला प्रत्यंचा चढविण्यास समर्थ नाहीत. मग मानव तर सर्व प्रकारे नाहीतच नाहीत (९). मग असल्या धनुष्याला प्रत्यचा लावण्याचा पण घालणे म्हणजे अशक्य पण लावणे हे जनकास समजावयास पाहिजे. याचा अर्थ आपली मुलगी कोणासच द्यावयाची नाही; कुंवार ठेवावयाची असा त्याचा हेतू होता काय, अशी शंका येते. रामाच्या शरीरशक्तीचे वर्णन करण्याच्या हेतूने कवीने जनकाच्या पदरी मूर्खपणा बांधला आहे.

पाच हजार धिप्पाड व उंच पुरुषांनी कशा तरी ती आठ चाकी धनुष्याची पेटी ओढून आणली. ती लोखडी होती. पेटीतच धनुष्याची पूजा होत असे. यावरून ती पेटी उघड्या मैदानात नसून वाड्याच्या एका भागात असावी. जनक, विश्वामित्र, राम, लक्ष्मण व इतर राजवाड्यातच बसले होते. तेथे पेटी आणली. या पाच हजारांना पेटी ओढण्याच्या कामी जागा कशी मिळाली याची कल्पना होत नाही. हे वर्णन निव्वळ खोटे

अनुक्रमणिका

व बनावट आहे असे वरवर विचार करणाऱ्यासही पटेल. रामाने ते धनू सहज उचलले, सज्ज केले व ओढले, तेव्हा ते मोडले. राजाने सीता रामास देण्याचे ठरविले व दशरथास आणण्यास रथातून मंत्री पाठविले.

वाटेत तीन रात्री काढून चौथे दिवशी दूत अयोध्येस पोहोचले. त्यांनी दशरथ राजास जनकाचा संदेश सांगून मिथिलेस जाण्याविषयी विनंती केली. राजा आपल्या ज्येष्ठ पुत्राच्या विवाहास दुसऱ्याच दिवशी निघाला; जणू काय एखाद्या अरण्यात राहणाऱ्या ऋषीसारखा कमंडलू व कृष्णाजिन घेऊन त्यास जायचे आहे! एवढ्या मोठ्या राजाच्या घरचे लग्न; ह्यात अगोदर वाटाघाट मुळीच नव्हती. अकस्मात बोलावणे आलेलं. पण दुसऱ्याच दिवशी दशरथ निघाला. इतक्या घाईचे कारण दिसत नाही.

राम–लक्ष्मणाला आपल्या मुली देण्याचा निश्चय जनकाने केल्यावर दशरथाकडे दूत पाठविले. त्यांच्याबरोबर दशरथ आला. यात सात दिवस निघून गेले. दशरथाचे स्वागत झाले. यानंतर जनकास आपल्या भावाची आठवण होते हे आश्चर्य आहे.

या प्रसंगी वसिष्ठांनी दशरथाची वंशावळ सांगितली आहे. अव्यक्त, ब्रह्मा, मरीची, कश्यप, विवस्वान् व मनु–प्रजापती असे क्रमाने एकमेकांपासून झाले. मनूचा पुत्र इक्ष्वाकू. इक्ष्वाकुश्च मनोः सुतः । तमिक्ष्वाकुमयोध्यायां राजानं विद्धि पूर्वकम्॥ (बा. कां. सर्ग ७०–२१). तोच इक्ष्वाकू अयोध्येतील पहिला राजा होय. यावरून मनू हा अयोध्येचा राजा नव्हता असे होते पण युद्धकांड सर्ग १२८ यात

ब्रह्मणा निर्मितं पूर्वं किरीट रत्नशोभितम् ।
अभिसिक्तः पुरा येन मनुस्तं दीप्ततेजसम् ॥

असे आहे यावरून मनूलाच मुकुट घातला होता. म्हणजे तो पहिला राजा म्हणावा लागेल. अशा प्रकारचे गैरमेळ जागोजाग आढळतात. जनकाची वंशावळ शबल ब्रह्मापर्यंत सापडली नाही. त्याने निमी राजापासून वंश सांगण्यास आरंभ केला. जनक व दशरथ यांच्या वंशावळी इतर पुराणांतून आहेत. पण त्यांना व रामायणातील वंशावळींना मेळ पडणे कठीण आहे.

सीता व शिवधनू ह्या दोन जनकावर आपत्तीसारख्याच होत्या असे दिसते. सांकाश्याचा राजा सुधन्वा हा मिथिला नगरीला वेढण्यास आला. 'अत्युत्कृष्ट त्र्यंबक चाप व कमलनयना सीता ही मला द्यावी' म्हणून त्याने जनकाला निरोप पाठविला. (बा. कां. सर्ग ७१, श्लो. १५, १६,१७) ती न दिल्यामुळे युद्ध झाले. त्यात सुधन्वा मारला गेला. जनकाने आपला भाऊ कुशध्वज यास त्याचे सांकाश्य नगरीने राज्य दिले (श्लोक १९). कुशध्वजाला राज्यावर बसवून किती वर्षे झाली होती हे सांगितलेले आढळत नाही. पण बराच वर्षे झाली असावीत असे वाटते. म्हणजे सीता वयात येऊन बरीच वर्षे लोटली होती.'

लग्नाच्या समारंभात सीतेचे वर्णन फक्त 'सर्वाभरणभूषिताम्' असे केले आहे.

विवाहप्रसंगी सीता व राम यांची वये

विश्वामित्राबरोबर राम गेला तेव्हा त्याचे वय साडेपंधरा वर्षाचे होते. ऊनषोडश असे सांगितले आहे. सोळाला कमी. म्हणजे विवाहाच्या वेळी त्याला सोळा वर्षे पुरी झाली नसावीत असे दिसते. या वर्णनात

सीता केवढी होती ते सांगितले नाही. पण अरण्यकांड सर्ग ४७, श्लोक १० मध्ये सीता रावणास आपली हकीगत सांगतात. म्हणते –

'मम भर्ता महातेजा वयसा पंचविंशकः अष्टादशहि वर्षाणि मम जन्मनि गण्यते' ॥

रामाला वनात जावे लागले त्या वेळी लग्नाला १२ वर्षे होऊन गेली होती व तेव्हा रामाचे वय २५ वर्षांचे व माझे १८ वर्षांचे होते. यावरून विवाहाच्या वेळी सीता सहा वर्षाची व राम तेरा वर्षाचा होता असे तिचे म्हणणे आहे. तिच्या सांगण्याप्रमाणे रामाचे वय १३ वर्षांचे; पण इतरत्र ते सोळा वर्षांचे सांगितले आहे.

सांकाश्य नगरीचा राजा सुधन्वा याने सीतेला मागणी घातली त्या वेळी सीता प्रौढ असली पाहिजे सहा वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलीकरिता लढाई करण्यास येणारा सुधन्वा व वर्षभर मिथिलेस वेढा घालून बसणाऱ्या राजास वेड्यात काढावे लागेल. जनक जी हकीगत सांगत आहे त्यावरून सीता यौवनदशेत आल्याला पुष्कळच वर्षे झाली पाहिजेत कारण सुधन्व्याच्या स्वारीनंतर अनेक राजांनी एकमनाने केलेली स्वारी व घातलेला वेढा या गोष्टी घडल्या आहेत. यावरून सीता सहा वर्षांची होती हे कथन अगदीच टाकाऊ आहे. बालकांड सर्ग ७७ यात दशरथाने चारही सुनांसह अयोध्येत प्रवेश केल्याची हकीगत आहे. त्यात

मंगलालापनैर्होमैः शोभिता क्षौम वाससः ।
देवतायतनान्याशु सर्वास्ताः प्रत्यपूजयत् ॥ १२ ॥
अभिवाद्याभिवाद्यांश्च सर्वाः राजसुतास्तवा ।
रेमिरे मुदिताः सर्वाः भर्तुभिः मुदिता रहः ॥ १३ ॥

आशीर्वाद प्राप्त झालेल्या व गृहप्रवेशनीय होम झाल्यामुळे कल्याणसंपन्न होऊन क्षोमवस्त्र परिधान केलेल्या सर्वही राजकन्यांनी देवस्थानांना सत्वर प्रणाम केले (१२). पूज्यांना अभिनंदन करून त्या सर्वही राजकन्या आनंदित झाल्या आणि भर्त्यासहवर्तमान त्या एकांतामध्ये आनंद पावू लागल्या (१३). यावरून त्या चांगल्या वयात आलेल्या कमीत कमी सोळा वर्षांच्या असाव्यात. सुधन्वा व राजाचे टोळके सीतेच्या प्राप्तीकरिता लढाईस निरनिराळ्या प्रसंगी आले होते. या गोष्टी विचारात घेतल्यास सीतेचे वय पुष्कळच मोठे असावे असे वाटते.

रामाच्या वनवासाची हकीगत सांगताना त्या वेळी आपली वये किती होती हे सांगण्याची सीतेस आवश्यकताही नव्हती. यावरून अरण्यकांडातील सर्ग ४७ यातील वयाचा श्लोक व त्यापुढील निव्वळ रामाच्या स्तुतीचा श्लोक हे कोणीतरी घुसडून दिलेले असावेत. हे गाळून वाचल्यास कथेचा संदर्भही चांगला लागतो. पाहा :

इति ब्रुवाणां कैकयी श्वशुरो मे स पार्थिवः ।
अयाचतार्थैरन्वर्थैर्न च यांचा चकार सा ॥ ९ ॥
कामार्तश्च महाराजाः पिता दशरथः स्वयम् ।
कैकेय्याः प्रियकामार्थ तं रामं नाभ्यषेचयत् ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

विवाहानंतर पित्याने दिलेली भार्या म्हणून रामाला सीता प्रिय झाली होती य तिच्या अंगच्या गुणाने आणि तिच्यां ठिकाणी असणाऱ्या सौंदर्यरूप गुणामुळे त्याचे प्रेम अधिकच वृद्धिंगत होत होते (बा. कां सर्ग ७७ श्लोक २५). सीतेकडे रामाच्या मनाचा जितका ओढा असे त्यापेक्षा सीतेच्या मनाचा रामाकडे दुप्पट ओढा असे आणि देवतांची बरोबरी करणारी व मूर्तिमंत लक्ष्मीप्रमाणे असलेली ती जनककन्या मैथिली सीता रामाच्या अंतःकरणातील अभिप्राय आपल्या अंतःकरणाने स्पष्टपणे फारच जाणत असे. (परंतु, रामाला तिच्या अंतःकरणातील अभिप्राय तितका स्पष्ट रीतीने कळत नसे. कारण सीतेला जितका रामाचा ध्यास असे तितका रामास सीतेचा ध्यास नसे.) (२७।२८). कंसातील स्वभावविश्लेषण भाऊशास्त्र्यांचे आहे. सीता अनन्यगतिक होती. राम तसा नसावा. त्याला दुसऱ्या बायका असाव्यात असा ध्वनी वाल्मीकीच्या काव्यात या ठिकाणी निघत आहे. राम हा एकपत्नी असता तर सीतेवर त्याची जास्त प्रीती राहती.

पुढे रामाला यौवराज्याभिषेक करण्याची सर्व तयारी झाली असता कैकेयीने दशरथाला वचनाच्या कैचीत धरून त्याच्याकडून रामाला बोलावून आणिले. राम बापापुढे उभा राहिला. दशरथाला काही बोलवेना. कैकेयीने सर्व हकीगत सांगून 'राजाचे वचन तू पुरे कर' असे बजाविले. राम म्हणाला, 'बापाची आज्ञा पाळण्यास मी तयार आहे. पण भरताला अभिषेक करण्याविषयी राजाने स्वतः मला सांगितले नाही हे एक दुःख माझ्या मनात आहे.' तो पुढे कैकैयीस म्हणतो :

'अह हि सीतां राज्यं च प्राणानिष्टान्धनानि च ।
हृष्टो भ्रात्रे स्वयं दद्यां भरताय प्रचोदितः' ॥

अ. कां. स. १९,७

'किं पुनर्मनुजेंद्रेण स्वयं पित्रा प्रचोदितः ॥'

'फक्त तू जरी मला सांगितलेस तरी सीता, राज्य, प्रिय प्राण व संपत्ती मीं आनंदाने भ्रात्या भरताला देईन (७). मग बापाने आज्ञापिल्यावर तर करीनच करीन.' आपली धर्मपत्नी भरताला देण्याविषयीचा रामाचा उद्‌गार विचार करण्यासारखा आहे. तेथे राज्य, प्रिय प्राण व संपत्ती यांचा निर्देश करण्याअगोदर सीतेचे उदक भरताच्या हातावर सोडण्यास राम तयार आहे. या प्रकारचा उल्लेख हाच एक रामायणात आहे असे नाही. दुसरे अनेक असे उल्लेख प्रसंगाने आले आहेत. त्या काळची एक सामाजिक चाल—सर्वमान्य चाल—या ठिकाणी सूचित होते. रामाने सीता भरताला दिल्यास तिचा उपभोग त्याने घेणे क्रमप्राप्तच आहे व तसे करणे कोणाच्याही दृष्टीने गैर नाही, असेही यावरून होत आहे. इतकेच नव्हे तर त्या काळच्या समजुतीप्रमाणे भावाची बायको पत्नीकल्प मानली जात होती.

दशरथाला काहीच बोलवेना. तेव्हा राम म्हणाला,

'अनुक्तोप्यत्रभवता भवत्या वचनादहम् ।
वने वस्यामि विजने वर्षाणीह चतुर्दश' ॥ १९, २३ ॥

'येथे असलेल्या थोर पित्याने जरी सांगितले नाही तरी तुझ्या सांगण्यावरून निर्जन वनामध्ये चौदा वर्षांपर्यंत वास्तव्य करीन.' पुढे तो म्हणाला, 'मातेचा निरोप घेऊन सीतेची समजूत घालीपर्यंत तू धीर धर. नंतर आजच्या आज भव्य दंडकारण्यात चालता होईन.'

अनुक्रमणिका

राम वनवासाला निघाला ही बातमी राणीवशात कळून मोठा हाहाकार झाल्याचे वर्णन वाल्मीकीने केले आहे. ही बातमी ३४७ राण्यांना कळली, पण कौसल्येला कळली नाही, असे वाल्मीकी ठासून सांगतो हेच आश्चर्य! सर्ग २० मध्ये पहिल्या ६ श्लोकात राजपत्न्यांच्या विलापाचे वर्णन आहे व त्याच सर्गाच्या २४ व्या श्लोकात कौसल्या रामास म्हणते :

'सत्यप्रतिज्ञं पितरं राजानं पश्य राघव ।
अद्यैव त्वां स धर्मात्मा यौवराज्येभिषेक्ष्यति' ॥ २४ ॥

'हे राघवा, तुझा पिता भूपती कसा सत्यवचनी आहे तो पाहा! तो धर्मात्मा आजच तुला यौवराज्याचा अभिषेक करील.' आता तू येथेच भोजन करून राजदर्शनाला जा, असेही ती म्हणाली. गेल्या सबंध रात्रीत कैकेयीच्या महालात काय काय खलबते झाली याची या पट्टराणीला व ज्येष्ठ पुत्राच्या आईला दादही नाही. यावरून तिला कडक कैदेत ठेवले होते काय, असा संशय येतो. रामालादेखील तिच्या अज्ञानाचे आश्चर्य वाटले. तो म्हणतो, 'हे देवी, खरोखरीच तुला काही माहीतच नाही काय? हे एक मोठे भय तू, विदेहराजकन्या आणि लक्ष्मण यांच्या दुःखाकरिता उपस्थित झाले आहे. मी दंडकारण्यात जाणार. महाराज भरताला यौवराज्य देत असून मला गरिबाला दंडकारण्यात हाकून लावीत आहेत!' (२७).

कौसल्येला काहीच बातमी लागली नव्हती. यावरून ती कडक कैदेत असावी असे जे अनुमान केले त्यास पुढील हकीगतीने बळकटी येत आहे.

श्लोक १२। १३. (हे पुत्राचे शब्द ऐकून) कुऱ्हाडीने तोडलेली सालवृक्षाची फांदी जशी वनामध्ये पडते तशी स्वर्गातून च्युत झालेल्या देवतेप्रमाणे ती राजपत्नी कौसल्या एकाएकी भूमीवर पडली. रामाने तिला उठविले.

उपावृत्योत्थितां दीनां वडवामिव वाहिताम् ।
पांसुगुंठितसर्वांगी विममर्श च पाणिना ॥ ३४ ॥

पूर्वी भार वाहून थकवा आल्यावर त्याचा परिहार करण्याकरिता भुमीवर लोळून उठलेल्या घोडीप्रमाणे सर्वांग धळीने भरलेल्या त्या दीन मातेला त्याने हाताने स्पर्श केला. पट्टराणीला ज्या ठिकाणी ठेवले होते. तेथे किती धुरळा होता, पाहा. तिचे सर्वांग धुळीने भरले होते. रामाने हाताने धूळ झाडली त्या कामाला त्याला एखादा रुमाल किंवा अंगावरील उपरणेही मिळाले नाही. झाडलोट करून जागा स्वच्छ ठेवण्यास तिच्याकडे माणसेही नसावीत म्हणून तर इतकी धूळ तेथे साचली. गरीब बिचारी कौसल्या!

राजवाड्यात इतकी धूळ साचली होती ही कल्पना खरी वाटत नाही. पण धुरळयात लोळून उठून अंग झाडणाऱ्या घोडीची उपमा कवीस सुचल्यावर ती काव्यात घालण्याचा मोह त्यास आवरला नसावा व म्हणून असले नादान वर्णन त्याने केले आहे.

कौसल्येचा निरोप घेऊन राम आपल्या राहण्याच्या जागी सीतेकडे गेला. अयोध्येच्या दरबारात कोणास कोणी कसलीही बातमी द्यावयाची नाही असाच दंडक दिसतो कैकेयीच्या महालात काय राजकारण चालले आहे याची वार्ता कौसल्येस नाही, रामास नाही, मग सीतेस कोठून असणार? राजाने

अनुक्रमणिका

रामास बोलावून आणले व कैकेयीने त्याला चौदा वर्षे वनवासाला धाडले तरी त्याची दाद कौसल्येस नाही व सीतेसही नाही, राम तिला भेटेपर्यंत.

वैदेही चापि तत्सर्व न शुश्राव तपस्विनी ।
तदेव हृदि तस्याश्च यौवराज्याभिषेचनम् ॥ —सर्ग २६ । ३ ॥

इकडे बिचाऱ्या सीतेने यातले काहीच ऐकले नव्हते आणि रामाला यौवराज्याचा अभिषेक होणार हेच तिच्या मनात घोळत होते. तिचे वर्णन करताना मात्र वाल्मीकी तिला 'अभिज्ञा राजधर्माणाम्' असे शिफारसपत्र देतात. पण कोठे काय चालले आहे याची बातमी काढणे हा राजधर्मापैकी एक महत्त्वाचा धर्म आहे, त्याकडे तिचे दुर्लक्ष झाले आहे. या ठिकाणी रामाचे मुख शोकाने निस्तेज झालेले पाहूनही सीतेला या स्थितीचा अंदाज आला नाही, इतकी ती भाबडी दाखविली आहे. ती विचारते, 'हे प्रभो, या प्रसंगी हे काय? हे रघुवंशज, आज चांगला गुरुपुष्ययोग आहे आणि या योगावर आपणाला राज्याभिषेक होणार असे विद्वान ब्राह्मण सांगत आहेत. तेव्हा आपणाला खिन्न होण्याचे कारण काय? शेकडो शलाकांनी युक्त असलेल्या व उदकाच्या फेसासारख्या शुभ्र छत्राने आपले मनोहर मुख झाकून गेलेले आज कोठे दिसत नाही. चंद्र आणि हंस याप्रमाणे दिसणाऱ्या विंझोण्यांचा वारा आज आपल्या कमलासारख्या मुखावर घातला जात नाही. हे पुरुषश्रेष्ठ, बोलके भाट, वंशस्तावक व स्तुतिपाठक हेही आनंदित होऊन मंगल शब्दांनी आपली स्तुती करीत असल्याचे आज दृष्टोत्पत्तीस येत नाही. वेदपारंगत ब्राह्मण राज्याभिषेक झालेल्या आपल्या मस्तकी मध व दही यथाविधी घालीत नाहीत आणि सर्व मंत्रिमंडळ, मुख्य मुख्य सभानायक व नगरवासी आणि देशातील लोक आपल्या मागोमाग जाण्याची इच्छा करीत नाहीत!' इत्यादी सीतेचा विलाप वाल्मीकी वर्णितात. या ठिकाणी सीता फारच भाबडी, बावळट व भोळी दाखविली आहे. आदल्या रात्रीपासून तिला व रामाला समंत्रक उपवास करविला होता. पाहा :

इत्युक्त्वा स तदा रामं उपवासं यतव्रतः ।
मंत्रवत्कारयामास वैदेह्याः सहितं शुचिः ॥ ५, २१.

अभिषेक उभयतांस व्हावयाचा असे असल्यास आपणास राजवाड्यात का नेले नाही ही शंका तिला येण्यास पाहिजे होती. पण ती जे प्रश्न रामास करीत आहे त्यावरून ती फार भोळी व भाबडी दिसत आहे.

नंतर रामाने सीतेला कैकेयीच्या वराची हकीगत सांगितली.'निर्जन मनात जाण्यास सिद्ध झालेला मी तुला भेटण्याकरिता आलो आहे.'

यापुढे सीतेने भरताजवळ कसे वागावे याविषयी रामाची शिकवण विचार करण्यासारखी आहे. माझी आई आहे तिच्या आज्ञेत वागून चौदा वर्षे काढ, असे सांगणे स्वाभाविक होते व कोणीही तशी अपेक्षा करील. किंवा आपला बाप जनक याच्याकडे माहेरी रहा, असे सांगणेही योग्य होते. पण राम हा अवतारी थोर पुरुष. त्याचा उपदेश काही औरच होता. तो म्हणतो :

'भरतस्य समीपे ते नाहं कथ्यः कदाचन ।
ऋद्धियुक्ता हि पुरुषा व सहंते परस्तवम् ॥
तस्मान्न ते गुणाः कथ्या भरतस्याग्रतो मम ॥

अनुक्रमणिका

अहं ते नानुवक्तव्यो विशेषेण कदाचन ।
अनुकूलतया शक्यं समीपे तस्य वर्तितुम् ॥
तस्मै दत्तं नृपतिना यौवराज्यं सनातनम् ।
स प्रसाद्यस्त्वया सीते नृपतिश्च विशेषतः ।

अयोध्याकांड सर्ग २६, श्लो. २४ ते २७.

अर्थ : 'भरताजवळ तू माझी कधीही प्रशंसा करीत जाऊ नकोस. वैभवसंपन्न पुरुषांना दुसऱ्याची स्तुती सहन होत नाही. तस्मात् भरतापुढे तू माझ्या गुणांची प्रशंसा करीत जाऊ नकोस. माझ्यासंबंधाने तू विशेषसे काही एक बोलत जाऊ नकोस. भरताच्या मर्जीप्रमाणे वागून त्याच्या समीप राहणे तुला शक्य आहे. राजाने त्याला यौवराज्य अक्षय दिले आहे! हे सीते, त्याची व विशेषतः राजाची कृपा तुला संपादन केली पाहिजे.' या ठिकाणी याच कांडाच्या १९ व्या सर्गाच्या ७ व्या श्लोकाची आठवण होते. तेथे भरताला राज्याबरोबर सीताही देण्याची रामाची तयारी आहे असे दाखविले आहे. येथे सीतेला राम भरताजवळ राहून त्याची मर्जी सांभाळण्यास सांगत आहे. तरुण व सुंदर स्त्रीने राजाजवळ राहून त्याची मर्जी संपादावयाची म्हणजे काय करावयाचे हे स्पष्ट सागण्याची जरूर नाही.

याच्यापुढेच रामाच्या तोंडी पुढील श्लोक घातलेले आढळतात :

'हे कल्याणी, हे निष्पाप सीते, मी वनात गेल्यानंतर तू व्रते व उपवास करीत राहत जा (२९). पहाटेस उठून देवांचे यथाविधी पूजन करीत जा आणि माझ्या पित्या दशरथाला वंदन करीत जा (३०). माझी माता कौसल्या वृद्ध झाली असून दुःखाने कृश झाली आहे तेव्हा धर्म हीच गोष्ट मनामध्ये आणून तू तिची मानमान्यता ठेवणे योग्य आहे (३१).' आपल्या बापाचा व आईचा सन्मान ठेवण्याचे सांगण्याची आवश्यकता रामाला का वाटली ध्यानात येत नाही. रामाला सीतेची खरी परीक्षाच झाली नसावी पुढे ३३ व्या श्लोकात 'प्राणापेक्षाही मला प्रिय असे जे भ्राते भरत व शत्रुघ्न त्यांना विशेषतः तू आपल्या भ्रात्याप्रमाणे अथवा पुत्राप्रमाणे समजून त्यांच्यावर लक्ष ठेवीत जा' असे सांगणे हे पूर्वीच्या सांगण्याला व या ३३ व्या श्लोकापुढील ३४ व्या श्लोकात सांगितले आहे त्याला विसंगत आहे. या श्लोकात राम सीतेला सांगतो, 'भरताच्या मर्जीबाहेर तू कधीही वागत जाऊ नकोस. कारण तो आपल्या देशाचा व कुलाचा राजा आहे.' रावणवध झाल्यानंतर सीतेला रामाने आणविली, तेव्हाही तू मला नकोस, तुला पाहिजे तर भरताजवळ, शत्रुघ्नाजवळ लक्ष्मणाजवळ, सुग्रीवाजवळ किंवा बिभीषणाजवळ रहा असे उदार मनाने सांगितले आहे. एकंदरीत रामाजवळ सीतेची फारशी प्रतिष्ठा नाही.

रामाने कौसल्येचा निरोप घेतला, तेव्हा सीतेला बरोबर नेण्याचा त्याचा विचार नव्हता. ती अयोध्येतच राहणार अशी त्याची खात्री म्हणून तिचा चांगल्या प्रकारे सांभाळ कर असे त्याने आईला सांगावे अशी अपेक्षा करणे योग्य आहे. राम तसे करीत नाही. यामुळे कौसल्याही सीतेचे नाव काढीत नाही. मागे बायकोची काय व्यवस्था हेही ती विचारीत नाही. यावरून त्या काळच्या आचाराप्रमाणे आपल्या नवऱ्याच्या पश्चात त्याच्यापेक्षा धाकट्या भावाजवळ त्याच नात्याने राहावयाचे ही गोष्ट सर्वमान्य व विहित अशी होती; म्हणून राम सीतेला सांभाळण्याविषयी कौसल्येस काहीच सांगत नाही व तीही काही बोलत नाही. राम मात्र आपण गेल्यावर भरताजवळ कसे वागावे हे सीतेला शिकवीत आहे. त्या वेळच्या लोकांच्या समजुती व आचार ही लक्षात घेतली तर रामाचे, पूर्वी कैकेयीजवळचे 'सीता व राज्य भरताला देतो' हे भाषण, भरताची मर्जी सांभाळून रहा हा सीतेला उपदेश, युद्धकांडातील सीतेचा स्वीकार न करता भरतादींजवळ राहण्याची

अनुक्रमणिका

शिफारस, यांची संगती लागते. आजच्या कल्पनेप्रमाणेच रामाचे विचार व आचार होते, अशी ज्यांची समजूत, त्यांना मात्र या रामाच्या भाषणातील संगती लागणे कठीण. अशांपैकीच कोणा अलीकडच्या बनावट वाल्मीकीने वर दिलेले व्रत उपवास करून राहण्याचे व भरतशत्रुध्नाला भावाप्रमाणे व पुत्राप्रमाणे समजण्याचे श्लोक रचून मधोमध ठेवून दिलेले दिसतात. कारण त्यातील विचाराची मागच्या पुढच्या शिकवणीशी संगती लागत नाही.

रामाचा उपदेश सीतेला मुळीच पसंत पडला नाही. ती वनात जाण्यास तयार झाली. हा २७ वा सर्ग फार वाचनीय व मननीय आहे. रामाच्या मनात तिला नेण्याचे नव्हते; म्हणून २८ या सर्गात तो तिच्यापुढे वनवासातील दुःखाचे भेसूर चित्र ठेवीत आहे.

तरीही सीता डगमगली नाही. तिने आपला आग्रह कायम ठेवला व शेवटी जीव देण्याची धमकी दिली. ती म्हणाली, 'मला आपण वनात नेले नाही तर मी विष सेवीन, अग्नीत शिरेन किंवा पाण्यात उडी घेईन. कसेही करून मी जीव देईन.' तरीही राम तिला नेण्याचे कबूल करीना, तेव्हा मग तिने रामाची निंदा करण्याचे आरंभिले. ती त्याला भ्याड ठरविते पुरुषवेषात तू खरोखरी स्त्री आहेस असे बजाविते ती म्हणते 'हे रामा, पुरुषरूप धारण करणारा आणि वस्तुतः स्त्री असलेला जावई मिळविल्याने माझ्या बापाला काय वाटले असेल?' (३० । ३).

पुढे ती चिडून बोलते,

'स्वयं तु भार्यां कौमारीं चिरमध्युवितां सतीम्।
शैलूष इव मां राम परेभ्यो दातुमिच्छसि' ॥

सर्ग३०. ८.

'तरुण, कुमारी, पुष्कळ दिवस सहवासात असलेली आणि सती अशी मी आपली भार्या असताना, हे राम, स्त्रीवर उपजीविका करणाऱ्या (भाडखाऊ) प्रमाणे आपण मला परपुरुषाला देण्याची इच्छा करीत आहात?' पुढल्या श्लोकात ती म्हणते, 'ज्याच्या मर्जीप्रमाणे वाग म्हणून मला शिकविता व ज्यामुळे आपला राज्याभिषेक बंद पडला त्याची मर्जी आपणच सांभाळा व त्याची आज्ञा पाळा.' इतके झाल्यावर सीतेला बरोबर घेणे रामाला भाग पडले. सीता आनंदाने निघाली. या प्रसंगी सीतेने आपले तेज व पतिभक्ती फार उत्तम प्रकारे दाखविली आहे. यात ६ व्या श्लोकात सीतेने आपली तुलना सावित्रीबरोबर केली आहे.

द्युमत्सेनसुतं वीरं सत्यवन्तमनुव्रता ।
सावित्रीमिव मां विद्धि त्वमात्मवशवर्तिनीम् ॥

सीतेने वल्कले नेसून रामाबरोबर जावे का आपल्या नेहमीच्या वस्त्रभूषणांसह जावे याविषयी बरीच चर्चा झाली आहे. सीतेने वल्कल नेसून जावे ही कैकेयीची इच्छा. तिने वल्कले आणली, पण सीतेस ती नेसता येईनात. सीतेने या कामी काही हरकत घेतली नाही. पण वसिष्ठ व दशरथ या वेळी कैकेयीच्या विरुद्ध गेले व सीतेबरोबर चौदा वर्षांना पुरतील अशी वस्त्रे व दागिने देण्यात आले.

अनुक्रमणिका

सीता येईल ती आपत्ती सोसण्यास तयार झाली आहे. न्याय–अन्याय याचा विचार ती करीत नाही व त्यासंबंधी प्रश्नही कोणास विचारीत नाही. पांडव वनवासास जाणाच्या वेळी द्रौपदीने आपले तेज दाखविले व कायद्याचे बिकट प्रश्न घालून आपणास अनुकूल असा निर्णय मिळविला. व्यासांची स्त्रीरत्नविषयीची कल्पना उदात्त होती. वाल्मीकींने सीता नेभळट दाखविली आहे. तिची पतिभक्ती व पतिप्रेम उत्कट आहे. पण पती चुकत अस्ल्यास त्यास बोध करून मार्गावर आणण्याचे चातुर्य व धीटपणा जो द्रौपदीच्या ठिकाणी दिसतो तो सीतेत नाही. नवरा वल्कले नेसतो म्हणून आपणही वल्कलेच नेसली पाहिजेत असा सीतेचा निश्चयही नाही. सासऱ्याचा वस्त्रासंबंधी निकालही ती मान्य करीत आहे शृंगवेरपुराजवळ भागीरथी नावेने उतरून जाताना आपण तिघांनी सुखरूप परत यावे म्हणून सीता भागीरथी नदीत नवस करीत आहे. ब्राह्मणभोजने, लक्ष गाईचे दान, वस्त्रांचे दान वगैरे देऊन शिवाय

'सुराघटसहस्त्रेण मांसभतौदनेन च ।
यक्ष्ये त्वां प्रीयतां देवि पुरी पुनरुपागता' ॥

सर्ग ५२, श्लोक ८९.

'हे देवी, मी अयोध्यानगरीला परत आले म्हणजे सहस्त्र घट मद्य आणि मांसमिश्र ओदन यांचा तुला बली देईन; गंगे, तू मला प्रसन्न हो,' असा नवस करीत आहे. वाल्मीकीच्या मताने हे सुरा व मांसपदार्थ देवता व त्यांचे पुजारी यास फार आवडते होते व त्यांस प्रसन्न करून घ्यावयाचे झाल्यास सुरा व मांस देण्याच्या कामी हात आखडता घेण्यात येऊ नये. महाभारतातील वीर मद्य पीत व मांस सेवन करीत. पण त्यांची दैवते सहस्त्र घट मद्याचा फन्ना पाडणारी नव्हती. त्यांच्या टिकाणीं नेमस्तपणा होता. महाभारत व रामायण या संस्कृती एक नसून बऱ्याच बाबींत भिन्न आहेत.

सीता, राम, लक्ष्मण यांचा आहारही बराच जबर दिसतो. वनवासाच्या तिसरे दिवशी भागीरथी उतरल्यावर वत्स देशात जाऊन संध्याकाळच्या भोजनासाठी रामलक्ष्मणाने चार मृगांची शिकार केली. त्यांत तीन हरणे, ऋष्य, पृषत व महारुरू नावाची चवथा डुक्कर होता. इतके मास तिघांत खपले कसे असे कोणास वाटेल. पण वाल्मीकी सांगतो त्यावर विश्वास ठेवता येईल, त्यांनी ठेवावा. महारुरू एकटाच तिघांना खपण्यासारखा नाही असे थोड्या विचारांती दिसून येईल.

चौदा वर्षे पुरेल इतक्या वस्त्रांचा गठ्ठा रथात अलंकारांसह दिला होता. शृंगवेरपुरावर तो नावेत घातला असेल. पण नावेतून उतरल्यावर त्या वस्त्रांचे काय झाले? तो बोजा लक्ष्मणाने का रामाने वाहिला, का तो सीतेलाच उचलावा लागला, हे वाल्मीकीने सांगितल्याचे आढळत नाही पण यमुना उतरतेवेळी तयार केलेल्या तराफ्यावर 'सीतेची वस्त्रे व भूषणे, कुदळ व पेटी' चढविल्याचा उल्लेख आहे. हा तराफा दोघांनी पलीकडे ओढून नेला असावा. कारण यमुनेपार पाण्याचा ओघ तोडीत जावयाचे आहे. प्रयाग येथे भरद्वाजाश्रमासंन्निध एखादी नावहि नसावी हे चमत्कारिक आहे. यमुनेलाही सीता नवस करते. पण यमुनेची किंमत गंगेच्या मानाने शेकडा दहा टक्केपेक्षांही कमीच आहे भागीरथीवर लक्ष गाईंच्या दानाचे उदक सोडले तर येथे यमुनेवर फक्त एक हजार गाईंच्या दानाचे. तेथे १००० घट मद्य तर तेथे फक्त १०० घटच.

राम चित्रकुटावर पोहोचल्याचे ऐकल्यावर सुमंत्र अयोध्येस परत गेला. तेथे त्याने रामाचा निरोप राजास सांगिला. लक्ष्मणाचा निरोप बराच तेजस्वी आहे. तो बापावर बराच चिडलेला दिसतो 'हे महाराजा, बिचारी जनककन्या तर भुताने झपाटल्याप्रमाणे निरोप वगैरे सांगण्याचे सर्व काही विसरून दुःखाचे सुस्कारे

टाकीत उभी राहिली होती (सर्ग ५८। ३४) व पूर्वी कधीच अशा संकटांचा अनुभव नसल्यामुळे त्या दुःखाने रडत असलेली ती यशस्विनी राजकन्या मला काहीच बोलली नाही.'

३६ । ३७ व्या श्लोकातही सीतेचे रडेच आहे. सीता स्वभावाने मऊच आहे. कडकपणा तिच्या ठिकाणी नाही. पण ६० व्या सर्गात श्लोक १४ । १५ हे (ग्राम, नगर, वृक्ष, वगैरेंबद्दल विचारण्यासंबंधाने) 'तिने (सीतेने) केलेले भाषण ऐवढेच काय ते मला स्मरत आहे. कैकेयीसंबंधाने ती काय बोलली हे मला आठवत नाही,' असे सुमंत्र म्हणाला (१४). याप्रमाणे सारथी कौसल्येला सांगत असताना कैकेयीसंबंधाचे सीतेचे बोलणे अवधान न राहिल्यामुळे एकाएकी त्याच्या तोंडात आले होते. तोंडापुढे आलेले शब्द एकाएकी नाहीसे करून कौसल्यादेवीला आल्हादकारक असे मधुर भाषण तो तिच्याशी करू लागला (१५) असे दिले आहे. यावरून सीता काही कठोर बोलली असावी असे अनुमान होतें. पण ५२ व्या सर्गात शृंगवेरपुरात नावेवर चढताना रामाने त्याच्याबरोबर अयोध्येस निरोप पाठविला आहे. त्या प्रसंगी लक्ष्मण किंवा सीता काहीच बोलली नाहीत. रामानेच सुमंत्रास सांगितले, 'कौसल्येला सीतेचा, माझा व आर्य लक्ष्मणाचा माझ्या वचनावरून प्रणिपात कळीव' असे ३१ व्या श्लोकात दिले आहे. इंगुदी वृक्षाखाली वस्ती केल्यावेळीही लक्ष्मणाने सुमंत्राबरोबर काही निरोप पाठविला नाही. ५२ व्या सर्गातील रामाने सांगितलेला निरोप व रामाचा म्हणून सुमंत्राने कळविलेला निरोप यात शब्दाचा फरक आहे, पण आशय बहुतेक तोच आहे. सुमंत्र दरबारी माणूस तो रामाच्या निरोपाची सुनावणी बरोबर करतो. लक्ष्मणाने व सीतेने त्याच्याबरोबर निरोप दिलेलाच नव्हता, पण आपल्या मनातील डाचत असलेले विचार सुमंत्राने लक्ष्मणाचा निरोप म्हणून सांगितले असावेत.

११८ व्या सर्गात सीता व अनसूया यांचा संवाद आहे. यात आरंभी पातव्रत्यावर प्रवचन आहे. पुढे श्लोक २७ पासून सर्ग अखेरपर्यंत सीता आपला इतिहास सांगते. यात ३२ व्या श्लोकात

अवाप्तो विपुलामृद्धिं मामध्याप्य नराधिपः ।

म्हणजे मी त्याला प्राप्त झाल्यावर त्याची मोठी अभिवृद्धी झाली; अशी पाय गुणाची असता रामाकडे आल्यावर त्याला वनवास, रावणाने नेल्यावर त्याचा कुळक्षय व पुन्हा अयोध्येस आल्यावर तिला व दुसऱ्यास सुख नाही अशी अवस्था व्हावी हे आश्चर्य आहे.

पसिसंयोगसुलभं वयो दृष्ट्वा तु मे पिता ।
चिंतामभ्यगमद्दीनो वित्तानाशादिवाधनः ॥ ३४ ॥

पतीबरोबर संसार करण्याला योग्य वयानी झाल्यावर माझा बाप चिंताक्रांत झाला. नंतर त्याने स्वयंवर करण्याचे ठरवून राजाना आमंत्रण करून आणले (११८, ४१). तेव्हा जडपणामुळे पर्वतप्राय असलेले ते श्रेष्ठ धनुष्य अवलोकन करताक्षणी ते तोलण्याविषयी असमर्थ असलेले राजे त्याला नमस्कार करून जाऊ लागले (श्लो. ४३). पण राजा जनक म्हणतो, 'त्या राजांनी संगनमत करून माझ्या नगरीला एक वर्ष वेढा दिला.' सीता त्या सेळी सोळा वर्षांची तरी असावी. तेव्हा वर्षभर वेढा आपल्याकरिता म्हणून पडल्याची गोष्ट घडली असल्यास ती विसरणे संभवनीय दिसत नाही. राजे नमस्कार करून जाणे व त्यांनी वेढा देऊन लढाई करणे या गोष्टी परस्परविरुद्ध आहेत. आता प्रश्न येतो तो हा राजा जनक विश्वामित्र

अनुक्रमणिका

वगैरेंच्या पुढे एक दांडगी थाप देतो, का सीता अनसूयेला एक कल्पित कथा सांगते, का या वरुणाच्या चापाची गोष्टच कपोलकल्पित आहे? सीता म्हणते,

महायज्ञे तदा तस्य वरुणेन महात्मना ।
दत्तं धनुर्वरं प्रीत्या तूणी चाक्षय्यसायकौ ॥ ११८।३८ ॥

या ठिकाणी तस्य हे पद जनकाला उद्देशून आहे. कारण पूर्वीच्याच श्लोकात 'तस्य बुद्धिरिय जाता' या ठिकाणी जनकाला उद्देशून निःसंशय आहे. पण ३९ व्या श्लोकाच्या भाषांतरात भाऊशास्त्री लेले यांस विसंगती दिसल्याने समन्वय लावण्याच्या बुद्धीने त्यांनी 'माझ्या पित्याचा पूर्वज जो देवराज त्याला' असे पदरचे दडपून दिले. येथे या चापासंबंधाने गैरमेळ आहेत. ते चाप कोणाला दिले ? देवराजाला का सीतेचा बाप जो जनक त्याला? दोन अक्षय्य भात्यांची गोष्ट जनक बोलतच नाही. सीता तेवढी ते दिले असे सांगते.

नमस्कार करून राजे गेले. याला बराच काळ लोटल्यावर (सुदीर्घस्य तु कालस्य – अयो. कां. ११९।४४) राम आला व त्याने धनुष्य मोडले. सुदीर्घ काल म्हणजे १०। १५ वर्षे तरी गेली पाहिजेत. वर्षे दहा धरली तरी त्या वेळी सीता कमीत कमी २६ वर्षांची होती असे होते. राम तर ऊनषोडशवर्षी म्हणजे १६ वर्षांपेक्षा कमी. सीतेच्या हिशेबाने तर १३ वर्षांचाच होता. राजेलोकांमध्ये अशा विषम वयाच्या वधुवरांची लग्ने होतात. त्यात आश्चर्य मानण्यासारखे काही नाही.

या प्रसंगी अनसूयेने सीतेला दिव्य, श्रेष्ठ माला, वस्त्र, भूषणे, उटी आणि मूल्यवान अनुलेपन ही दिली. माला, उटी व अनुलेपन, भूषणे व वस्त्रे नेहमी ताजी राहणारी होती.

येथपर्यंत सीतेची बाल–अयोध्याकांडातील हकीगत आली आहे.

रामाला १४ वर्षे दंडकारण्यात पाठवावे अशी कैकेयीची मागणी होती. (अयोध्याकांड सर्ग ११, श्लो. २६). वत्स देश सोडल्यावर त्यांस घोर अरण्यांतून जावे लागले व प्रयाग येथे गंगा–यमुना संगमासंनिध भरद्वाजाश्रमास राम गेला तेव्हा भरद्वाज त्या प्रदेशाचे

अवकाशो विविक्तोयं महानद्योः समागमे ॥ (अयो. कां. ५४ । २२)

'महानद्यांच्या संगमावर असलेला हा प्रदेश जनशून्य आहे' असे वर्णन करतात. यावरून त्या अरण्यास दंडका म्हणत असावे. याप्रमाणे दंडकारण्याची उत्तर सीमा गंगायमुना ही होती. दक्षिण सीमा वाटेल तितकी खाली खेचावी.

चित्रकूटही याच अरण्यात होता. तेथून राम दक्षिणेकडे निघाला. हे तिघे विराध राक्षसाच्या वनात आले (अरण्यकांड २।४). लक्ष्मण पुढे, सीता मध्ये व राम मागे याप्रमाणे त्यांचा चालण्याचा क्रम असे. तिघांना पाहून राक्षस त्यांच्याकडे धावला. सीतेला कमरेशी धरून व उचलून घेऊन तो तेथून पलीकडे गेला. 'अंगेनादाय वैदेहीमपक्रम्य' (२।१०). दोघांच्या मध्ये असलेल्या सीतेला त्याने उचलून नेले. हा सीतेवर पहिला अत्याचार होय. रामलक्ष्मणांस या प्रसंगी काही करता आले नाही. सीता भयभीत होऊन वाऱ्याने हलणाऱ्या केळीप्रमाणे थरथर कापू लागली. 'सीता प्रवेपितोद्वेगात् प्रवाते कदली यथा' (२।१५).

अनुक्रमणिका

इतक्यात ती शुभ जानकी विराधाच्या अंकावर बसलेली पाहून शोकाने म्लानवदन झालेला राम लक्ष्मणाला म्हणाला :

तां दृष्ट्वा राघवः सीतां विराधांकगतां शुभाम् ।
अब्रवील्लक्ष्मणं वाक्यं मुखेन परिशुष्यता ॥ २ । १६ ॥

या वेळी राम घाबरून गेला होता व त्याचे तोंडही कोरडे पडले होते. 'बा सौम्य लक्ष्मणा, जनककन्या लहानपणापासून सुखात वाढलेली व सद्वर्तनी असलेली अशी माझी भार्या सीता विराधाच्या अंकावर असलेली तू अवलोकन कर' (२, १७). रामाच्या मनात भरतमातेसंबंधाने जे किल्मिष डाचत होते ते या प्रसंगाने बाहेर येत आहे :

'यदभिप्रेतमस्मासु प्रियंवरवृतं च यत् ।
कैकेय्यास्तु सुसंवृत्तं क्षिप्रमद्यैव लक्ष्मण ॥
या न तुष्यति राज्येन पुत्रार्थे दीर्घदर्शनी ॥ १९ ॥
यथाहं सर्वभूतानां प्रियः प्रस्थापितो वनम् ।
अद्येदानीं सकामा सा या माता मध्यमा मम' ॥ २० ॥

'हे लक्ष्मणा, वनामध्ये आम्हाला जे दुःख व्हावे म्हणून कैकेयीला वाटत होते ते व वर प्राप्त करून जे प्रिय करून घ्यावयाचे होते ते, हे सर्व तिचे अभिलाषित आजच तिला मिळाले! ती मोठी दूरदर्शी असल्यामुळे आपल्या पुत्राला राज्य प्राप्त झाले, ऐवढ्यानेच तृप्त होत नसून ते त्याला चिरकाल मिळण्याकरिता आमच्या नाशाची इच्छा करीत आहे. आज सर्वांना प्रिय अशा मला वनात पाठवून देऊन ती माझी मधली आई कृतकृत्य माली.' (१८, १९, २०). आणखी राम म्हणतो :

'परस्पर्शात्तु वैदेह्याः न दुःखतरमस्ति मे ।
पितुर्विनाशात्सौमित्रे स्वराज्यहरणात्तथा'॥ २१ ॥

'बा लक्ष्मणा, जरी माझ्या पित्याचा नाश झाला आहे व मी आपल्या राज्यापासून भ्रष्ट झालो आहे, तरीसुद्धा विदेह राजकन्या सीतेला दुसऱ्याने स्पर्श केलेला पाहून जे दुःख होते त्यापेक्षा जास्त दुसरे कसलेही दुःख मला होत नाही.' रामाचे असे दीनवाणे भाषण ऐकून लक्ष्मण रागावून चार श्लोकांचे भाषण करिता झाला. पण विराधाच्या अंगावर जाऊन सीतेस सोडविण्याची बुद्धी एकासही होत नाही हे आश्चर्य! विराधच ओरडून त्याला म्हणाला, 'अरे, तुम्ही कोण आहात व कोणीकडे जाणार हे मला सांगा. तेव्हा रामजी म्हणाले, 'आम्ही इक्ष्वाकु कुलामध्ये उत्पन्न झालो असून क्षत्रिय असता काही कारणामुळे वनामध्ये सचार करीत आहोत. आता तू कोण आहेस व या दंडकारण्यात संचार का करीत आहेस हे जाणण्याची आमची इच्छा आहे.' (अरण्य. ३, श्लोक १–३). विराधाने आपले व आपल्या आईबापाचे नाव सांगून तपाने ब्रह्मदेवाला प्रसन्न करून आपण अवेध्य, अच्छेद्य व अभेद्य झालो आहो असेही तो म्हणाला. इतके होईपर्यंत राम स्वस्थ होता. त्याने क्रुद्ध होऊन त्याच्यावर सात बाण सोडले. सीतेला खाली ठेवून तो शूल घेऊन रामलक्ष्मणावर धावला. ते त्याच्यावर शरवृष्टी करीतच होते. तो अवेध्य असल्याने ते बाण आपोआप गळून पडू लागले. आपण अवेध्य आहो असे त्याने पूर्वीच बजावले असता राम व लक्ष्मण त्याला शराने विद्ध करण्याचाच मार्ग अवलंबीत होते हे आश्चर्य आहे. मी अच्छेद्य आहे असे त्याने सांगितले असताही दोघेजण

अनुक्रमणिका

तलवारींनी वार करू लागले (अरण्य. ३।२०). नंतर त्या दोघांना उचलून घेऊन विराध पळू लगला तेव्हा राम लक्ष्मणाला म्हणाला, 'या मार्गाने हा राक्षस आपणाला पाहिजे तितके दूर घेऊन जावो. ज्या मार्गाने हा राक्षस चालला आहे तोच आपला मार्ग आहे.' (२२, २३). रामलक्ष्मणाला खांद्यावर घेऊन तो दंडकारण्याकडे तोंड करून निघाला. तो घोर वनात प्रविष्ट झाला (२६).

विराधासारखे वाहन मिळाल्यामुळे रामलक्ष्मणांस मौज वाटली असेल; पण बिचारी सीता एकटीच तेथे राहिली रामाने सात बाण सोडल्यावेळी विराधाने तिला खाली जमिनीवर ठेविली होती. पहा :— विद्धोन्यस्थे वैदेहीम् (श्लो. १३). ती उच्च स्वराने आक्रोश करू लागली. 'सत्वनिष्ठ, सुशील व पवित्र असलेल्या या दाशरथी रामाला लक्ष्मणासह विराध नेत आहे. आता मला अस्वले, वाघ व चित्ते खाऊन टाकतील. हे राक्षसश्रेष्ठा, तू मला ने आणि या काकुत्स्थांना सोड.' (अरण्य. सर्ग ४, १ ते ३)

तस्यास्तद्वचनं श्रुत्वा वैदेह्या रामलक्ष्मणौ ।
वेगं प्रचक्रतुर्वीरौ वधे तस्य दुरात्मनः ॥ ४ ॥

हा सीतेचा आक्रोश ऐकल्यावर रामलक्ष्मण जागे झाले व विराधाला मारण्याचा विचार त्यांच्या डोक्यात आला तेव्हा रामाने उजवा व लक्ष्मणाने डावा असे विराधाचे दोन्ही हात फोडले (५). मग तो खाली पडला. त्याला खळग्यात पुरले.

सीतेचा रामाला सुंदर उपदेश

नवव्या सर्गात सीतेचे रामाशी भाषण विचार करण्यासारखे आहे. ती म्हणते, 'कामापासून तीन व्यसने उत्पन्न होतात. १) खोटे बोलणे. २) परस्त्रीसेवन. ३) वैर नसताही क्रूरपणा धरणे. यांतील पहिली दोन आपणाठायी नाहीत. तिसरे मात्र संभवत आहे. यासाठी आपण आता दंडकारण्यात निघाला आहा ते बंद ठेवावे.' (पण चित्रकूट सुटल्यापासूनच दंडकारण्याचा आरंभ झाला आहे असे पूर्वी आले आहे. एकंदरीत दंडकारण्य निश्चित नाही. ते दक्षिणेस खाली खाली पसरत आहे.) ती म्हणते, 'दंडकारण्यात जाणे मला पसंत नाही (सर्ग ९, श्लोक १३). वनचर राक्षसांना पाहून त्यांच्यावर आपण बाण सोडणारच.' शस्त्र हातात असेल तर क्रुर बुद्धी उत्पन्न होते, अशाविषयी सीता एक पुराणकथा सांगते. 'काष्ठाला अग्नी लागला की काष्ठ जळावयाचेच, त्याचप्रमाणे शस्त्रधाऱ्याच्या मनाला विकार होणारच. वैरावाचून राक्षसांचा वध करण्याची बुद्धी आपणास न होवो. अपराधावाचून राक्षसांचा वध लोकांना संमत होणार नाही (श्लोक २५). वनात राहणाऱ्या जितेंद्रिय आर्तजनांचे रक्षण हे वीर क्षत्रियांच्या धनुष्याचे काम आहे. आपण येथे देशधर्म पाळावा. क्षात्रधर्म अयोध्येस परत गेल्यावर आचरावा. राज्य टाकल्यावर वनात मुनिवृत्तीने आपण राहाल तर माझ्या सासूसासऱ्याला आनंद होईल.'

अक्षया तु भवेत्प्रीतिः श्वश्रूश्वशुरयोर्मम ।
यदि राज्य हि संन्यस्य भवेस्त्वं निरतो मुनिः ॥ २९ ॥

(पण सीतेचा सासरा अगोदरच मेलेला होता याचा विसर कसा पडला?) ती पुढे सांगते, 'नित्यं शुचिमनिः सौम्य चर धर्म तपोवने' (३२). 'आपण आपली मती नेहमी शुद्ध ठेवून तपोवनात धर्माचरण करा.' सीतेचे सांगणे आपण मुनिधर्माने कोणाशीही वैर न धरता राहू; म्हणजे आपणास कसलाही त्रास होणार नाही.

अनुक्रमणिका

रामाचा कुरापती स्वभाव

यावरून राम हा राक्षसांबरोबर काहीतरी कुरापत काढीत असे, असे दिसते. कोणाचीही निष्कारण कुरापत काढल्यास तो भांडणास येणारच. चित्रकूटावरील मुनींचीही रामासंबंधाने अशीच तक्रार होती. पहा, अयोध्याकांड सर्ग ११६, श्लोक १ :

प्रतियाते तु भरते वसन्रामस्तदा वने ।
लक्षयामास सोद्वेगं अथौत्सुक्यं तपस्विनाम् ॥

भरत परत गेल्यावर राम वनामध्ये वास्तव्य करू लागला असता तपस्वी लोक दुसरीकडे जाण्याकरिता भयभीत होऊन उत्सुक झाले आहेत असे त्याच्या दृष्टीस पडले ते आपसात कुजबुजत. तेव्हा रामाने त्यास विचारले, 'माझ्याकडून किंवा लक्ष्मण किंवा सीता यामुळे आपणांस काही त्रास होत आहे काय?' त्यांनी 'नाही' म्हणून उत्तर दिले. पण ते आणखी म्हणाले :

'त्वन्निमित्तमिदं तावत्तापसान्प्रतिवर्तते
रक्षोभ्यस्तेन खंविग्नाः कथयति मिथः कथाः' १० ॥

'तुझ्यामुळे राक्षसांपासून हे भय तपस्वी लोकांना प्राप्त झालेले आहे आणि यामुळे ते तपस्वी उद्विग्न होऊन आपआपसात बोलत आहेत.' रावणाचा कनिष्ठ भ्राता खर, त्याला तुझे येथे राहणे सहन होईनासे झाले आहे (श्लोक १२)

'त्वं यदाप्रभृति ह्यास्मिन्नाश्रमे तात वर्तसे ।
तदाप्रभृति रक्षांसि विप्रकुर्वति तापसान्' ॥ १३ ॥

'बा रामा' तू जेव्हापासून या आश्रमात राहत आहेत, तेव्हापासून या राक्षस तापसांना त्रास देत आहेस.' बरेचसे ऋषी आश्रम सोडून गेले यावरून रामच राक्षसांची काही खोडी काढीत असावा. चित्रकूटापर्यंत दंडकारण्य असून खर तेथील अधिकारी होता. पण रामाने, रावणाची बहीण खराची बायको, तिला नाककान कापून विद्रूप करीपर्यंत खराने रामाबरोबर तंटा काढला नव्हता. रामानेच याप्रमाणे तंटा उकरून काढला. सीतेला हे रामाचे वर्तन पसंत नव्हते म्हणूनच ती सांगते, 'तपोवनात तपस्व्याप्रमाणे राहा.' पण रामाला हा उपदेश पसंत पडला नाही. राक्षसांपासून मुनीना त्रास होत आहे व ते माझ्यापासून रक्षण याचीत आहेत, तेव्हा माझे कर्तव्य केले पाहिजे असे बोलून रामाने तिच्या भाषणाबद्दल तारीफ केली. पण आपण तिची काय किंमत करतो हे बजावण्यास रामजी डरले नाहीत :

'अप्यहं जीवितं जह्यां त्वां वा सीते सलक्ष्मणाम् ।
न तु प्रतिज्ञा संश्रुत्य ब्राह्मणेभ्यो विशेषतः ' ॥

(अरण्य, १०।१८)

'हे सीते, मी आपल्या जीविताचा अथवा लक्ष्मणासह तुझा त्याग करीन; परंतु केलेली प्रतिज्ञा आणि त्यातून ब्राह्मणाशी केलली प्रतिज्ञा मी फिरविणार नाही.' सीतेला सोडण्यास तयार असलेल्या रामाने तिचा अपराध नाही अशी खात्री असताना अखेर तिला टाकलीच. पण त्या वेळी प्रतिज्ञापालनाचा प्रश्नही नव्हता.

अनुक्रमणिका

ठिकठिकाणच्या आश्रमांत कोठे तीन, कोठे चार, पाच, सहा, सात, आठ, दहा, बारा महिने व कोठे दीड वर्ष असा मुक्काम करून रामाने दहा वर्षे काढिली. यानंतर रामाला अगस्तिदर्शनाची इच्छा होऊन राम तिकडे गेला. अगस्तीचे स्त्रियांविषयी मत बरेच हीन आहे. तो प्रथमतः सीतेची तारीफ करतो व तिचे वर्तन खुलून दिसावे म्हणून एकंदर स्त्रीजातीची निंदा करीत आहे. तो म्हणतो :

'एषा हि प्रकृतिः स्त्रीणामासृष्टे रघुनंदन ।
समस्थमनुरज्यंते विषमस्थं त्यजति च ॥ ५ ॥
शतह्रदानां लोलत्वं शस्त्राणां तीक्ष्णता यथा ।
गरुडानिलयोः शैघ्र्यमनुगच्छति योषितः ॥ ६ ॥

'हे रघुनंदना, पतीचे यथास्थित असले म्हणजे त्याचे मनोरंजन करावयाचे आणि त्याला विपन्नावस्था आली असता त्याची पर्वा करावयाची नाही हा सृष्टीच्या आरंभापासून स्त्रियांचा स्वभाव आहे (५). विद्युल्लतेचे चांचल्य, शस्त्रांचा तीक्ष्णपणा आणि गरुड व वायू यांची त्वरा (अनुक्रमे एके ठिकाणी न राहण्यात, फार दिवसांचे प्रेमबंधन तोडून टाकण्यात आणि निंद्य कार्य करण्याला प्रवृत्त होण्यात) स्त्रिया स्वीकारीत असतात.' (अरण्यकांड सर्ग १३।५–६). नंतर त्या आश्रमापासून दोन योजनांवर असलेला पंचवटीचा प्रदेश राहण्यास योग्य आहे असे त्यास अगस्तीने सांगितले.

जटायूची वंशावळ कशासाठी ?

पंचवटीस जाताना वाटेत त्यांना जटायू भेटला. तो आपली वंशावळ सांगत आहे. याचा बाप अरुण. कश्यपाला तामेच्या पोटी पाच कन्या झाल्या. त्यांतील सर्वात धाकटी शुकी. तिची नात विनता. विनतेचा अरुण. अरुणापासून श्येनीला झालेला पुत्र जटायू. अरुण हा शुकीचा पणतू. श्येनी ही शुकीची थोरली बहीण. पक्ष्यांमध्ये ही नाती पाहण्याचे कारण नाही. पण सृष्ट्युत्पत्तीसंबंधाने थापा कशा मारल्या जातात याचा हा मासला आहे.

जटायू रामास म्हणतो :

'सोह वाससहायस्ते भविष्यामि यदीच्छसि ।
सीतां च तात रक्षिष्ये त्वयि याते सलक्ष्मणे'॥ १४ । ३४ ॥

'तुझी इच्छा असल्यास निवासस्थानामध्ये मी तुला सहाय्य करणारा होईन आणि बा रामा, लक्ष्मणासह तू बाहेर गेल्यावर मी सीतेचे रक्षण करीत जाईन.' ही जटायूची मदत रामाने स्वीकारिली. पहा :

स तत्र सीतां परिदाय मैथिलीं सहैव तेनातिबलेन पक्षिणा ।
जगाम तां पंचवटी सलक्ष्मणो रिपून्दिधक्ष्यन् स वनानि पालयन् ॥ ३६ ॥

मिथिल राजकन्या सीता रक्षणाकरिता जटायूच्या स्वाधीन करून तपोवनाचे रक्षण करण्याकरिता राक्षसशत्रूचा वध करण्याच्या उद्देशाने त्या अतिबलाढ्य पक्ष्याला बरोबर घेऊनच तो राम लक्ष्मणासह त्या पंचवटीकडे गेला (३६).

अनुक्रमणिका

रामाने दाखविलेल्या जागी लक्ष्मणाने आश्रम बांधला. नंतर त्याने पुष्पपूजा व वास्तुशांती यथाविधी केल्यावर रामाला त्याने आश्रमस्थान दाखविले (सर्ग १५, २५). वडील बंधूबरोबर लक्ष्मण आला तो दास म्हणून आला का बंधू म्हणून आला अशी शंका येते. आश्रमासारखे मोठे काम करतानाही राम त्यास कोणतीही मदत देत नाही. भिंती त्यानेच घालाव्या, छप्पर त्यानेच तयार करावयाचे, जमीनही त्यानेच करावयाची, पूजेला लागणारी फुले आणण्याचे व वास्तुशांत करण्याचेही श्रम राम घेत नाही (अयोध्याकांड सर्ग ५७). यात चित्रकूट पर्वतावर वास करण्याच्या वेळीही रामाच्या आज्ञेने लक्ष्मणाने पर्णकुटी तयार केली व पुन्हा हुकूम झाल्यावर वास्तुशांती करण्याकरिता हरण मारून आणून तो भाजून तयार केला. तेथेही राम त्याला काहीच मदत देत नाही. यावरून लक्ष्मण हा रामाचा दास म्हणून बरोबर आला असावा असे वाटते. रामाला तरी त्याच्या कष्टाबद्दल त्याची कीव आल्याचे दिसत नाही. पंचवटीची पर्णकुटी पाहून रामाला पराकाष्ठेचा हर्ष झाला, त्याने लक्ष्मणाला दृढ आलिंगन दिले. त्याची पाठ थोपटली व त्याची तारीफ केली. तेथे राहात असता शरदऋतू संपून हेमंत सुरू झाला. तेथे नदीवर स्नान करून येऊन बसला असता शूर्पणखा आली. तिची चेष्टा करून अखेर तिचे नाक व कान ही कापून टाकली. तिने आपली फिर्याद प्रथमतः खराकडे नेली. त्याने चौदा राक्षस पाठविले. १४००० राक्षसांसह खर व दूषण यांचाही वध केला.

नंतर अकंपनाने ती बातमी रावणास कळवली. रावण स्वतः रामाबरोबर लढण्यास तयार झाला. परंतु अकंपनाने त्यास सांगितले की,

'न हि रामो दशग्रीव शक्यो जेतुं रणे त्वया ।
रक्षसां वापि लोकेन स्वर्गः पापजनैरिव' ॥

अरण्यकांड ३१ । २७

'रामाला जिंकणे हे तुझ्याकडून शक्य नाही. पण मी रामवधाचा उपाय सांगतो तो ऐक. सीता म्हणून त्याची एक अतिसुंदर व जगतामध्ये उत्कृष्ट भार्या आहे. ती नेहमी तरुण राहणारी आहे. तिच्या अवयवांची ठेवण सारखी व रेखलेली आहे आणि रत्नांनी ती भूषित झालेली असून सर्व स्त्रियांमध्ये उत्कृष्ट आहे (२९). देवांगना, गंधर्वस्त्री, अप्सरा अथवा नागकन्या यांतही तिच्यासारखी कोणी नाही. मग मनुष्यजातीची स्त्री तिच्यासारखी कोठून असणार?' (३०)

तस्यापहर भार्यां त्वं तं प्रमथ्य महावने ।
सीतया रहितो रामो न चैवहि भविष्यति' ॥ ३१ ॥

'तेव्हा कोणत्यातरी उपायाने महावनात त्याचे उच्चाटन करून तू त्याची भार्या हरण कर. सीतेचा विरह झाला असता राम जिवंत राहाणार नाही.' (३१) रावणाला ही गोष्ट पसंत पडली. तो मारीचाकडे गेला. मारीचाने बोध करून सीतेला पळवून नेण्याचा विचार सोडून दे व आपल्या भार्येच्या ठिकाणी रममाण हो असे सांगितले (३१–४९). रावण हे ऐकून लंकेस परत गेला.

शूर्पणखेने लंकेस जाऊन रावणाशी चिडून कठोर भाषण केले व शेवटी रामलक्ष्मणांचे वर्णन करून सीता कशी सुंदर आहे हे सांगितले. 'ती सीता तुला भार्या योग्य असून तूही तिला पती उत्कृष्ट आहेस (३४। १९) सीता तुझी भार्या व्हावी म्हणून मी तिला आणण्यास उद्युक्त झाले असता क्रूर लक्ष्मणाने मला विरूप करून टाकले.' (३४ । २१) याप्रमाणे शूर्पणखेने रावणाची उठावणी केली.

अनुक्रमणिका

रावणाने आपला विचार सचिवांपुढे मांडून त्यांची संमती मिळविली. अशी संमती मिळविताना शूर्पणखेवर जो अत्याचार रामलक्ष्मणांनी केला होता त्यावर बराच जोर दिलेला दिसतो. नंतर रावणाने चार गर्दभांचा रथ या वेळी पसंत केला व त्यावर आरूढ होऊन तो समुद्र तरून गेला. पुढे मारीच आश्रमास पोहोचला. तेथे मारीचाने पुन्हा येण्याचे कारण विचारले.रामाने काय काय केले हे सांगून रामाविषयी तो म्हणाला, 'त्या सैन्याचा वध करणारा तो राम क्षत्रियांना कलंक लावणारा, दुःशील, कर्कश, तीक्ष्ण, मूर्ख, लुब्ध, अजितेंद्रिय, (११) धर्माचा त्याग केलेला व अधर्मनिष्ठ असून प्राण्यांच्या अहिताविषयी तत्पर आहे व त्यानेच अरण्यामध्ये वैरावाचून केवळ शक्तीच्या जोरावर, (१२) कर्ण व नासिका यांचा अपहार करून माझी भगिनी विरूप केली आहे. तेव्हा देवकन्येसमान असलेल्या त्याच्या सीता नामक भार्येला जनस्थानातून (१३) मी पराक्रमाने घेऊन येणार आहे. त्याविषयी तू मला सहाय्य हो' (१४). मारीचाने त्याला कसले सहाय्य द्यावे हेही रावण येथेच सांगून टाकत आहे.

सुवर्णमृगाची बनावट कल्पना

'रौप्यबिंदूंनी युक्त असा तू एक सोन्याचा अद्‌भुत मृग हो आणि त्या रामाच्या आश्रमामध्ये सीतेच्या पुढे चालू लाग (१८) म्हणजे मृगरूप धारण केलेल्या तुला अवलोकन करताक्षणी सीता 'हा मृग धरा' म्हणून भर्त्याला आणि लक्ष्मणाला निःसंशय सांगेल (१९). असे तिने सांगितल्यानंतर ते तुझ्या मागोमाग गेले म्हणजे शून्य झालेल्या त्या आश्रमामध्ये जाऊन चंद्रप्रभा हरण करणाऱ्या राहूप्रमाणे काही एक अडथळा न येता सीतेला मी सुखाने हरण करून नेईन (२०). तदनंतर भार्येचा अपहार झाल्यामुळे राम कृश झाला असता मी अंतःकरणामध्ये कृतकृत्य होऊन अनायासाने गुप्तपणे रामावर प्रहार करीन' (२१).

मारीच रामाला फार भीत होता. त्याने रामाच्या पराक्रमाचे वर्णन करून रावणाला अविचार न करण्याचा बोध केला. रावणाला हा उपदेश पसंत पडला नाही. त्याने मारीचाला तेच सुवर्णमृग होण्याचे काम सांगितले. पण यावेळी 'हा सीते, हा लक्ष्मण,' असा ध्वनी काढण्यास सांगितले. सीता एकट्या रामाला मृगासाठी पाठवील व लक्ष्मणास बाहेर काढण्यासाठी 'हा सीते, हा लक्ष्मण' अशी आरोळी द्यावयाची होती (सर्ग ४० । २१) हे काम केल्यास अर्धे राज्य तुला देतो अशी रावणाने लालूच दाखविली व काम करण्याचे नाकबूल केल्यास त्याला तत्काळ ठार मारण्याची भीती घातली (सर्ग ४० । २६). मारीच भीतीने निघाला व रावणाच्या सांगण्याप्रमाणे त्याने केले. सुवर्णमृगासाठी सीतेने रामास पाठविले. 'हा सीते, हा लक्ष्मण' अशी आर्तवाणी ऐकून लक्ष्मणाची जाण्याची इच्छा नसताही दुरुतरे बोलून त्यास रामाच्या सहाय्यास पाठविले व आश्रमात एकटी राहिली. तिचे रावणाने जबरदस्तीने हरण केले. रावण पराक्रमाने सीतेस घेऊन जाणार होता; पण सुवर्णमृगाच्या कथेत त्याचा पराक्रम मुळीच नाही.

ही सुवर्णमृगकथा हरदासी थाटावर मनोरंजक असली तरी ती अगदीच बनावट व काल्पनिक आहे. या कथेसाठीच मारीचास आणले आहे. रामलक्ष्मण नेहमीच शिकारीस जात. ते गैरहजर आहेत अशी संधी साधून रावणाने जबरदस्तीने सीतेला नेले आहे. कथानकात वैचित्र्य आणण्यासाठी ही चित्रमृगाची कथा रचून सीतेच्या पदरी पोरकटपणा, उतावीळपणा वगैरे दोष बांधले आहेत. सीताहरणापर्यंत कथाभाग वर्णिल्यावर ही कथा काल्पनिक मानण्यासाठी उपलब्ध असलेला पुरावा मांडण्यात येईल.

महाराष्ट्र—शारदा : जून व जुलै, १९३७

अनुक्रमणिका

२० वाल्मीकी रामायणातील विमानविहार

'वाल्मीकी रामायणातील विमान–विहार' या मथळ्याचा श्री. गजानन गणेश भावे यांचा लेख सह्याद्री मासिकाच्या जुलै, १९३६ च्या अंकात प्रसिद्ध झाला, त्यावर पुढील दोन अंकांत काही पत्रव्यवहारही झाला. सदरचे लेख अलीकडेच माझ्या नजरेस पडले.

आमच्या देशात विमानविद्या पूर्वी होती काय, हा एक प्रश्न आहे. याचे ठाम उत्तर देणे कठीणच असले तरी त्यासंबंधी उपलब्ध असलेला पुरावा निर्विकार व निःपक्षपाती बुद्धीने तपासून काय तो निर्णय देणे युक्त होईल.

'संस्कृत भाषेत विमान शब्दाचे अनन्यसाधारण अस्तित्व'आहे याचा भावे यांना अभिमान वाटत आहे, ते योग्यच आहे. जुन्या ग्रीक, रोमन अतवा स्कांडिनेवियन वाङमयातील देवदूत आकाशमार्गाने संचार करीत. पण त्यांचे साधन एखादे यान नसून त्यांस पक्ष्याप्रमाणे उडण्यास पंख असत हे आहे.

आकाशमार्गाने पक्षी फार जलद व अगदी कमी श्रमात प्रवास करतात; माणसास तसे करता येत नाही ही गोष्ट सर्वांच्या अनुभवाचीच होती. पक्ष्याप्रमाणे उडता आहे पाहिजे ही मनुष्याची आकांक्षा असल्यामुळे व देंव हे मानवांपेक्षा श्रेष्ठ व सामर्थ्यवान मानले गेल्याने त्यांना आकाशातून संचार करता येतो, अशा कल्पना सर्वत्र आढळतात. ग्रीक, रोमन वगैरेंनी देवांना पंख आहेत व त्यांच्या साहाय्याने ते आकाशातून संचार करीत अशी कल्पना केली. हिंदी आर्यांनी आपल्या दोन मुख्य देवांस म्हणजे ब्रह्मदेव व विषणू यांच हंस व गरुड असे दोन पक्षीच वाहनासाठी कल्पिले. या वाहनांवर बसून हे देव आकाशभ्रमण करतात अशी हिंदूंची समजूत आहे. यापेक्षा कमी दर्जाचे देव व गंधर्व यांस आकाशातून संचार करणारी वाहने म्हणजे विमाने पुरविण्यात आली असे दिसते.यहुदी, ख्रिस्ती व इस्लाम मतांप्रमाणे देवदूत (Angels) यांना चित्रात पंख दाखविले जातात.

कल्पनेच्या भराऱ्या

यासंबंधी विचार करता पहिली कल्पना पंख आहेत अशी. त्यात हंस, गरुड हे पक्षी प्रत्यक्ष वाहन होते अशी सुधारणा झाली. त्यापुढचा पल्ला म्हणजे वाटेल तिकडे फिरणारे विमान. कल्पनेच्या भरारीत हिंदी आर्यांनी या कामी इतरांवर सरशी केली यात संशय नाही. रामायणात मात्र शंकर व ब्रह्मदेव यांनाही विमानातून आणले आहे. इंद्र याचे आवडते वाहन म्हणजे ऐरावत व उचैःश्रवा घोडा. पण सीतेच्या अग्निदिव्याच्या वेळी इंद्रालाही विमानातून यावे लागले आहे. फार तर काय, दशरथासारखा माणूस मेल्यावर चौदा वर्षांनी पूर्वीचा देह घेऊन सदर प्रसंगी विमानातून आला आहे. एकंदरीत त्यावेळी विमानांची खूप गर्दीच गर्दी कल्पिली आहे.

विमान या शब्दाची उत्पत्ती उघड आणि स्पष्ट आहे. वि म्हणजे पक्षी. त्याच्या गतीसारख्या गतीचे. पाखरांच्या गतीकडे लोकांचे लक्ष पूर्वीपासूनच आहे. ज्या पोकळीत पक्षी उडतात तिला 'वियत्' असे नाव वि=पक्षी यावरूनच पडलेले आहे.

विमान शब्दाचे ओकांच्या कोषात सात अर्थ दिलेले आहेत :

अनुक्रमणिका

(१) अपमान, (२) परिमाण, (३) विमान, आकाशयान, (४) रथ इत्यादी वाहन, (५) घोडा, (६) सात मजली वाडा, (७) राजवाडा. यांतील पहिल्या दोन अर्थांचा विचार करण्याचे कारण नाही.

विमान हा शब्द रामायणात जेथे जेथे आला आहे त्यातील बहुतेक स्थळे श्रीयुत भावे यांनी आपल्या लेखात संग्रहित केली आहेत. विमान शब्दाचा अर्थ सात मजली वाडा असा कोषकार देतात. पण श्री. भावे हे त्याचा अर्थ गच्ची असा करतात व या गच्च्या आकाशयानांच्या 'लँडिंग प्लेसीस' असतील अशी कल्पना करतात. सात मजली वाडा या अर्थाने विमान शब्दाचा प्रयोग मेघदूत व भागवत या ग्रंथांत रा. ओक यांस आढळला आहे व तो त्यांनी आपल्या कोषात दिला आहे.

गच्ची या अर्थी विमान शब्दाचा प्रयोग कोणत्याही कोषात किंवा पुराणग्रंथात श्री. भावे यांस आढळला नाही. 'परंतु रामायणात मात्र अयोध्या, लंका इत्यादी नगरींच्या वर्णनात 'विमानगृहशोभिताम्' अशी वाक्ये आली आहेत व ती गच्च्यांना अनुलक्षूनच असावीत असे वाटते' असा तर्क श्री. भावे हे करतात. कारण या गच्च्यांचा उपयोग विमाने उतरण्याची जागा म्हणून श्री. भावे यांस करावयाचा आहे व त्यासाठी विमान शब्दाचा गच्ची हा अर्थ त्यांना ओढून ताणून लावण्याची स्फूर्ती झाली आहे.

'पुष्पकेतर विमाने' या मथळ्याखाली श्री. भावे लिहितात, 'लंकेत पुष्पक विमानाव्यतिरिक्त आणखीही विमाने होती; परंतु ती विमाने सर्वगामी नसून मर्यादित शक्तीचा असल्यामुळे त्याचा ग्रंथात प्रामुख्याने उल्लेख नाही.' या म्हणण्याला आधार त्यांना देता येत नाही.

राक्षसाना आकाशसंचाराचे सामर्थ्य होते व याचा उपयोग रामायणात अनेक वेळा केलेला आढळतो. पण एवढ्यावरून हे राक्षस लहान लहान विमानांच्या सहाय्याने आकाशातून उडून जात, असे म्हणणे कल्पनाशक्तीला मोठा ताण आहे. सबंध रामायणात पुष्पक विमानाशिवाय दुसऱ्या कोणत्याही विमानाचा प्रत्यक्ष उल्लेख तर नाहीच, पण अप्रत्यक्षही आढळला नाही.

एक दाणा म्हणजे रास नव्हे

एक घर म्हणजे गाव नव्हे, एक झाड म्हणजे अरण्य नव्हे व एक दाणा म्हणजे रास नव्हे असे श्रेष्ठ म्हणतात. म्हणूनच एका विमानाचा उल्लेख आहे म्हणून तो, त्या काली विमानविद्या माहीत हाती. विमाने सर्वत्र फिरत होती, असे अनुमान करण्यास आधार आहे असे म्हणता येत नाही.

पुष्पक विमान कोणी, कसे तयार केले व ते रावणाकडे कसे आले याची कथा पाहिली म्हणजे त्या काली दुसरी लहानमोठी विमाने असणे किती अशक्य आहे हे दिसून येते. ही कथा श्री. भावे यानीच आपल्या लेखात उद्धृत केली आहे. 'स्वर्गात विश्वकर्म्याने ते ब्रह्मदेवाकरिता तयार केले, ब्रह्मदेवाकडून कुबेराने ते तपःसामर्थ्याने संपादिले व कुबराला जिंकून ते राक्षसेश्वर रावणाने लंकेत, हरण करून नेले.' असले विमान करण्याचे सामर्थ्य फक्त विश्वकर्म्यालाच होते असा रामायणकाराचा स्पष्ट उल्लेखच आहे. मानवी शक्तीला व बुद्धीला ते सामर्थ्य नसल्यामुळेच रावणाला ते आपल्या थोरल्या भावाकडून दंडेली करून मिळवावे लागले. त्याला ते आपल्या कारागिराकडून तयार करता येण्यासारखे नव्हते. तसे करता आले असते तर त्याने पुष्पकाच्या तोडीची अनेक विमाने बाधविली असती. कुबेरासारख्या धनाढ्यालाही आपल्या धनसामर्थ्याने ते तयार करवता आले नाही. त्याला ते ब्रह्मदेवाकडून तपःसामर्थ्याने मिळवावे लागले. रामासारख्या

अनुक्रमणिका

सुसंस्कृत व संपत्तिमान आर्यदेशाच्या राजाला पुष्पक विमानाच्या कामगिरीचा अनुभव आला असताही तसली विमाने बांधण्याची इच्छा झाली नाही. यावरून असले विमान बांधणे व चालवणे, हे मानवी बुद्धीच्या व शक्तीच्या आटोक्याबाहेरचे आहे, अशक्य कोटीतील आहे, असीच समजूत त्या काली असली पाहिजे.

विश्वकर्म्याशिवाय इतरांना विमान तयार करता येत नसल्याने दुसरी लहान विमाने लंकेत किंवा अयोध्येत असण्याचा संभव नाही. कारण त्यांचा उल्लेख कोठेच आलेला नाही. अशी विमाने खरोखरच उपयोगात असती तर त्यांचा उल्लेख येणे अनिवार्य होते. दशरथ राजा मरण पावला व पुत्रांपैकी कोणीही जवळ नव्हता. अशा प्रसंगी भरत–शत्रुघ्नाला तातडीने आणविणें जरूर होते. या वेळी अयोध्येत विमाने असती तर भरतास आणण्यास पाठविलेले दूत घोड्यावर बसून कंटाळवाणा ३–४ दिवसांचा प्रवास न करता एक दिवसातच गिरिव्रज नगरास पोहोचले असते व भरतही तातडीने एकाच दिवसात अयोध्येस पोहोचला असता. त्याचा लवाजमा मागाहून आला असता. पण तसे न करता इतरांबरोबर भरतही जमिनीवरून चालतच आला आहे. वाटेत भरतास सात रात्री घालवाव्या लागल्या असे वर्णन आहे. यावरून त्या वेळी अयोध्येत तरी विमाने मुळीच नव्हती असे अनुमान निर्विवाद निघते.

लंकेतही पुष्पकाशिवाय दुसऱ्या विमानाचा उल्लेख नाही. यामुळे त्या काळी आर्यावर्तात किंवा कोठेही विमानांची वाहतूक सरसहा होत होती असे म्हणण्यास आधार नाही.

वस्तुस्थिती का कविकल्पना ?

रामायणातील विमानाचे उल्लेख वस्तुस्थिती दाखविणारे आहेत का ती कवीची निव्वळ कल्पना आहे याचाही विचार करणे अप्रस्तुत नाही.

कल्पनाशक्तीला स्वैर सोडून कळसूत्री लाकडी घोड्याची गोष्ट 'अरेबियन नाइट' मध्ये आलेली आहे. पंचतंत्रातही तसल्या वाहनाचा उपयोग केल्याचा उल्लेख एका कथेत आहे. जूल्स व्हर्न या कादंबरीकराने विमानोड्डाण–साधनाने पृथ्वीप्रदक्षिणा करून पैज जिंकल्याची कथा लिहिली आहे. त्या वेळेस विमानविद्येस नुकतीच सुरुवात झालेली होती. कविकल्पनेला मर्यादा नसते. कवीने निर्माण केलेल्या सृष्टीत सत्यावर आधारलेले वर्णन किती आहे, याची छाननी केल्याशिवाय ग्रंथात वर्णिलेले सर्वच खरे मानणे म्हणजे निव्वळ भोळेपणा आहे.

रावणाच्या संग्रहास असलेल्या पुष्पक विमानाखेरीज सीतेच्या अग्निदिव्याच्या वेळी आलेले देव विमानातून आल्याचा उल्लेख आहे.

राजा कुबेर, पितरांसहवर्तमान यम, देवराज सहस्रनयन इंद्र, जलाधिपती वरुण, तीन नेत्रांनी युक्त असलेला श्रीमान् वृषध्वज महादेव आणि सर्व जगताचा उत्पादक व ब्रह्मवेत्त्यांमध्ये श्रेष्ठ ब्रह्मदेव हे सर्वही सूर्यतुल्य तेजस्वी विमानांमध्ये आरूढ होऊन व एकत्र जुळून लंकेमध्ये आल्यानंतर रामाजवळ आले. (युद्धकांड सर्ग ११०, श्लोक २, ३, ४). या वेळी या देवांची सहा व दशरथ असून आलेले सातवें अशी सात विमाने तेथे आली होती असे लिहिले आहे. यांतील इंद्र व कुबेर यांना विमाने होती, असे अमरकोषावरून म्हणता येते. पण यम, वरुण, महादेव व ब्रह्मदेव यांना आकाशगमन करण्यात विमाने होती, असा उल्लेख इतरत्र कोठेही आढळला नाही. कुबेराच्या विमानाचे नाव पुष्पक होते, असे अमरकोषात आहे. पण

अनुक्रमणिका

सीतादिव्याच्या वेळी व पूर्वीही पुष्कळ वर्षे ते विमान कुबेराच्या वहिवाटीस नसून रावणाने बळकाविले होते. मग या वेळी कुबेराला दुसरे विमान कोठून मिळाले, ही शंका राहतेच. त्याप्रमाणे इतर देवांना मिळालेली विमाने कोठून आली व कोणी तयार केली याचाही उलगडा होत नाही.

सृष्टीचा उत्पन्नकर्ता, पालनकर्ता व संहारकर्ता सर्वशक्तिमान, सर्वज्ञ असा अनादी एक ईश्वर आहे, हे मान्य केले तरी ब्रह्मदेव, विष्णू व शंकर हे तीन देव स्वतंत्र आहेत, त्यांचे लोक निराळे आहेत, त्यांची पृथक् वाहने आहेत, त्यांना बायका व मुले आहेत, वगैरे गोष्टी काल्पनिक आहेत, म्हणून हे देव काल्पनिक विमानातून आले, असेच म्हणावे लागते. पुराणकाली विमानविद्या अस्तित्वात होती, या गोष्टीच्या शाबितीकरिता असल्या काल्पनिक विमानांचा पुरावा उपयोगी पडण्यासारखा नाही. दशरथाच्या विमानाचीही तीच गोष्ट आहे. चौदा वर्षापूर्वी मेलेला माणूस मर्त्य देहाने पुन्हा मृत्युलोकात आला व त्याने राम–लक्ष्मणाला आपल्या मांडीवर घेऊन सीतेच्या पावित्र्याचा निर्वाळा दिला, ही गोष्ट आजच्या ज्या विद्वानांना खरी वाटते ते धन्य आहेत! सीतेने अग्निदिव्य केले व त्या प्रसंगी हजर असलेल्या देवांनी व दशरथाने ती पवित्र आहे, अशी खात्री केली वगैरे गोष्टी राम, लक्ष्मण, बिभीषण व त्याचे मंत्री आणि सुग्रीव व त्याचे नोकर यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिलेंल्या होत्या हे खरे असेल तर त्या त्यांनी अयोध्यावासी जनांस सांगितलेल्या असल्या पाहिजेत. परंतु हा प्रत्यक्ष पाहिलेला साक्षीपुरावा त्यांस बिलकुल पटला नाही व त्यांनी काहूर उठविल्यामुळे सीतेचा त्याग करणे रामास भाग पडले. यावरून देवांचे आगमन, दशरथाची व त्यांची विमाने या सगळ्या गोष्टी त्या काळी विश्वसनीय वाटत नव्हत्या असेच दिसते.

पुष्पक विमान

आता, राहता राहिले एकच पुष्पक विमान. हे जरी खरे होते, का ही कविकल्पनाच आहे याची छाननी करणे जरूर आहे. हे विमान स्वर्गात विश्वकर्म्याने ब्रह्मदेवाकरिता तयार केले. ब्रह्मदेवाकडून कुबेराने ते तपःसामर्थ्याने संपादले. कुबेराला जिंकून राक्षसेश्वर रावणाने ते लंकेत हरण करून नेले.

रामायणात ब्रह्मदेव वारंवार येत आहे. त्या मानाने वाल्मीकीच्या मते विष्णू व शंकर हे कमी दर्जाचे दिसतात. पुढील काळच्या पुराणात ब्रह्मदेवाचा भाव पुष्कळच उतरला आहे व तो पूजार्हही राहिला नाही. पण ब्रह्मदेव वगैरे देव काल्पनिक असल्यामुळे त्यांच्याकरिता बनविलेले पुष्पक विमान हीही कल्पना दिसते. पण हे देव खरे मानले तरी पुष्पक विमानाचे अस्तित्व पटणे कठीण आहे. या विमानाचे वर्णन उत्तरकांड सर्ग १५ श्लोक ३६ । ४० यात दिलेले आहे.

त्या कुबेराला जिंकल्यानंतर त्या राक्षसाधिपतीने त्याचे जयप्रद पुष्पक विमान घेतले (३६). ते विमान सुवर्णस्तंभांनी परिवेष्ठित होते. त्याच्या द्वारांना वैदूर्य रत्ने व हिरे लावलेले होते; सर्वदा सफल असलेले वृक्ष त्या ठिकाणी होते (३७). मनाप्रमाणे वेग व इच्छेप्रमाणे गती व रूप धारण करणाऱ्या त्या आकाशगामी विमानाला रत्नजडित सुवर्णाचे जिने होते; त्यातील बसावयाच्या जागा उत्कृष्ट सुवर्णाच्या केलेल्या होत्या (३८) कधीही नाश न पावणारे व सर्वदा मनाला व दृष्टीला सुखावह होणारे ते विमान देवांनाच बसण्यास योग्य होते; अनेक आश्चर्यकारक गोष्टी यामध्ये होत्या; अनेक प्रकारच्या चितारी कामामुळें ते सुंदर झाले होते. ब्रह्मदेवाने सर्व प्रकारच्या भोग्य वस्तूंसह ते मनोहर व अनुपम विमान निर्माण केले होते. त्यात शैत्य नव्हते; उष्णही नव्हते आणि सर्व ऋतूंमध्ये ते शुभ विमान सुखावह होते (३९।४०). बसणाऱ्याच्या इच्छेप्रमाणे गमन करणारे होते (कामगन्) (४१).

अनुक्रमणिका

हे वर्णन वाचून थोडा विचार केल्यास हे विमान निव्वळ काल्पनिक असले पाहिजे असे दिसून येईल. एखाद्या महाराजाच्या खास महालाची सजावट जशी करण्यात येते, त्याप्रमाणेच या आकाशयानाचीही आहे. सोन्याचे खांब, दारांना वैदूर्य रत्ने व हिरे यांचे जडावाचे काम, मोत्यांच्या सरांचे आच्छादन हे अलंकार तर होतेच. पण सर्वदा सफल असलेले वृक्ष त्या विमानात होते असे म्हणणे म्हणजे ते विमान एकाद्या बागेतील सात मजली बागेची कवी समजला की काय अशी शंका येते. कारण आकाशयानात अशी बागेची सोय करणे मोठे चमत्कारिक दिसते. विमान शक्य तितके जड करण्याकडे विशेष लक्ष दिले आहे. रत्नजडित सुवर्णाचे जिने व बसावयाच्या जागा उत्कृष्ट सुवर्णाच्या होत्या असे सांगितले आहे. एकंदरीत मुख्य गोष्ट विमानाची प्रेरक शक्ती व ते चालविण्याचे ज्ञान त्यावरूनच अशा विमानांची वस्तुस्थिती ठरवावयाची. या प्रेरक शक्तीचे वर्णन इतर वर्णनाबरोबर सुंदरकांडाच्या आठव्या सर्गात आहे. तेथेही त्या विमानाला सुवर्णाच्या खिडक्या व उत्कृष्ट रत्नांचे जडावकाम यांचा उल्लेख आहेच. या सातव्या श्लोकांत प्रेरकशक्ती सांगितलेली आहे. 'कुंडलाच्या योगाने ज्यांची मुखे सुशोभित झालेली आहेत आणि पापणीही न हलणारे असे विशाल व तारवटलेले डोळे सांगितले नसते तर मोठ्या शक्तीचे इंजिन हे त्याची प्रेरकशक्ती म्हणता आली असती; परंतु या दागिन्यांनी व तारवटलल्या डोळ्यांमुळे खरोखरीचे राक्षस ते विमान उचलून नेत होते, असाच कवीच्या सांगण्याचा आशय दिसतो. पुढल्या म्हणजे ९ व्या सर्गांतही या पुष्पकाचे वर्णन आले आहे. त्यातही सोने व रत्ने यांच्या कामाच्या वर्णनाची पुनरुक्ती आहे. या सर्व गोष्टींवरून ते विमान केवळ कविकल्पनाच होती असे दिसते.

काल्पनिक विमानाची काल्पनिक वासलात

ब्रह्मदेवाकरिता विश्वकर्म्याने तयार केलेले विमान पराकाष्ठेंच्या तपश्चर्येने कुबेराला मिळाले होते, तर कुबेराला जिंकणाऱ्या रावणाच्या ताब्यात ते का जावे कळत नाही. त्याला वाहून नेणाऱ्या राक्षसांनी जबरदस्तीने घेऊन जाणाऱ्यांची आज्ञा का पाळावी हेही कळत नाही. शिवाय रावणाबरोबर झालेल्या युद्धात कुबेराने या विमानाचा उपयोग केल्याचे वर्णन नाही. निदान पराजय झाल्यावर या विमानातून दूर जाण्याचे त्यात सुचले नाही हेही आश्चर्यच आहे. यावरून त्या विमानाच्या अस्तित्वाबद्दलच शंका येते हे विमान रावणाजवळ खरोखर असते तर सीतेला जबरदस्तीने घेऊन जाण्याच्या वेळी गाढवांनी ओढण्याच्या रथात बसून न नेता रावण या विमानातून आला असता व मग जटायूबरोबरची झटापट टळली असती. सुग्रीवाच्या मोठ्या सैन्यासह राम लंकेवर येत असता त्याच्यावर टेहेळणी करण्यास किंवा त्यांच्यावर हल्ला करण्यास या विमानाचा केव्हाही उपयोग केलेला नाही. असल्या अमोघ वाहनाचा युद्धात अनेक प्रकारे उपयोग करता येण्यासारखा होता तरीही रावणाने एक वेळही त्याचा उपयोग केलेंला नाही.

यावरून असले वाहन केवळ कविकल्पनाच दिसत आहे. रामासारख्या सुसंपन्न व सुधारलेल्या राजाला तसले विमान आपल्या संग्रही ठेवण्याची इच्छा झाली नाही. हीही गोष्ट लक्षात घेणे जरूर याहे. ते कुबेराकडे परत पाठविण्याची कल्पना तर और आहे. कुबेराला जिंकून रावणाने ते आपल्या मालकीचे केले असल्याने व त्याचा उपभोग बहुत वर्षे घेतला असल्याने कुबेराची मालकी त्या विमानावर राहिली नव्हती. ते विमान रावणाच्या सर्व संपत्तीबरोबर व पत्नी परिवाराबरोबर बिभीषणाच्या मालकीचे झाले होते. वास्तविक पाहता ते बिभीषणाकडे परत करावयास पाहिजे. पण काल्पनिक विमानाची वासलात काल्पनिक रीतीने व्हावयाची यात आश्चर्य कसले?

अनुक्रमणिका

विमानविद्या आर्यावर्तात केव्हा तरी खरोखर होती असे म्हणण्यास रामायणात तरी विश्वसनीय पुरावा नाही. सीतेच्या अग्निदिव्याच्या वेळी देव विमानातून आले व त्यांनी सीता शुद्ध असल्याची ग्वाही दिली, ही गोष्ट त्यावेळच्या अयोध्यावासी जनांसच विश्वसनीय वाटली नाही. म्हणून त्या वेळी विमाने नव्हती असेच सिद्ध होते. राम पुष्पक विमानानें लंकेहून अयोध्येंस आल्याचा उल्लेख आहे. पण ते विमान मनुष्यकृत नव्हते, विश्वकर्म्याने केलेले होते असे वर्णन असल्याने या एका विमानाच्या गोष्टीने विमानविद्येचे अस्तित्व विश्वसनीय दिसत नाही.

पूर्वजांच्या योग्यतेविषयी अभिमान असावा; पण तो अभिमान साधार असावा. केवळ कविकल्पनेवरच आधारलेला असल्यास पूर्वजांचा सन्मान होत नाही व वंशजांच्या अकलेची किंमत होते. विचाराला पटेल त्यावर विश्वास ठेवावा. विचाराला न पटेल त्याचा त्याग करणे हेच उचित

सह्याद्री : ऑक्टोबर, १९४०

अनुक्रमणिका

२१ वाल्मीकी आणि होमर

वाल्मीकी हा हिंदू आर्यांचा आद्य महाकवी आहे. याचे एकच महाकाव्य रामायण. हे सुविख्यात आहे. या काव्यात अयोध्येच्या दरबारातील खठपटी, रामाचा वनवास, सीतेचे त्याच्याबरोबर जाणे, सीतेला रावणाने जबरींने नेणे, सुग्रीवाची मैत्री संपादणे, लंकेवर स्वारी, सीतेचे अग्निदिव्य, अयोध्येत राज्याभिषेक, सीतेचा त्याग व तिचा वाल्मीकीच्या आश्रमात वास इत्यादी प्रसंगाचे रसभरित वर्णन आहे.

होमर हा यवन (ग्रीक) देशीय आर्यांचा महाकवी होता. याची दोन काव्ये प्रसिद्ध व सर्वमान्य आहेत, एक इलीयड व दुसरे ओडेसी. यांतील पहिले फार प्रसिद्ध आहे नि त्याची निरनिराळ्या भाषांतून गद्य व पद्य अशी भाषांतरे झाली आहेत. फार प्राचीन काळी ट्रॉय या शहरास पडलेल्या वेढ्याचे व त्यातील उभय पक्षींच्या वीरांचे वर्णन करणारे इलीयड हे काव्य आहे. पण त्याचा आरंभ वेढ्याच्या तिसऱ्या वर्षापासून होतो. नायक—नायिका व खलनायक यांच्या संबंधावर आधारलेली या काव्याची कथा नाही. पण युद्धाचे कारण मात्र त्यामुळे उद्‌भवले आहे.

स्पार्टाचा राजा मेनेलेअस याच्याकडे ट्रॉयचा राजपुत्र पारीस हा पाहुणा म्हणून बरेच दिवस राहिला. तेथे त्याची व मेनेलेअसची पत्नी हेलन इची ओळख होऊन प्रेम जडले आणि अखेर ही आषुकमाषुकेफरारी झाली व ट्रॉयला पोहोचली. सर्व यवन राष्ट्रांना या प्रकाराची मोठी चीड आली व त्यांनी फौज जमवून ट्रॉयला वेढा घातला. ट्रॉयचा राजा व पारीस यांनीही आपले मित्र व सगेसोयरे यांचे सैन्य जमवले व उभय लष्करात मोठे तुंबळ युद्ध बारा वर्षे चालले होतें. अखेर ट्रॉयचा पाडाव होत नाही असे दिसल्यामुळे एक कपटयुक्ती योजिली गेली. वेढा उठवून ग्रीक सैन्य निघून चालले. त्यांनी एक लाकडाचा केलेला मोठा घोडा मागे ठेवला होता व एक इसम जखमा झालेला तेथे पडला होता. त्याच्या सांगण्यावरून तो घोडा शहरात नेला. पुढे रात्री सर्व ट्रॉयवासी विजयोन्मादात बेहोष असता घोड्याच्या पोटात दडलेल्या सैनिकांनी बाहेर येऊन ट्रॉयचे दरवाजे उघडले माणि ग्रीक सैन्य आत घेतले. या प्रकारे ट्रॉयचा पाडाव झाला. पण आज आपणास या महाकाव्याचा विचार करावयाचा नाही.

होमर कवीचे दुसरे काव्य ओडेसी हे आहे. ओडेसिअस म्हणून एक नामांकित वीर ट्रॉयच्या युद्धात लढत होता; त्याचे पराक्रम इलीयड या काव्यात वर्णिले आहेत. ते युद्ध संपल्यावर सर्व योद्धे आपापल्या देशांस परत निघाले, तसा ओडेसिअसही निघाला. पण एका देवतेच्या कोपामुळे त्याच्या मार्गात अनेक विघ्ने आली. त्याला पुष्कळ ठिकाणी लढावे लागले. अशा रीतीने बारा वर्षे झगडून अखेर तो आपल्या घरी पोहोचला.

ट्रॉयचे युद्ध संपल्यावर योग्य वेळी तो घरी पोहोचला नाही व त्याची खुशालींही कळेना. यामुळे त्याची पतिव्रता स्त्री पेनेलोपी ही फार काळजीत पडली ओडेसिअस मरण पावला अशीही बातमी पसरली व ती बहुतेकांस खरी वाटली. पेनेलोपी सुंदर व सद्‌गुणी असल्याने तिची प्राप्ती व्हावी म्हणून ठिकठिकाणचे राजपुत्र तिच्या गावात तळ देऊन बसले व 'मला वर, मला वर!' अशी याचना प्रत्येकजण करू लागला. सर्वांनी भीड घातली म्हणून पेनेलोपी कंटाळली. एका देवीच्या स्फूर्तीने तिने त्या सर्व वीरांना एक अट घातली व ती पुरी करणाऱ्यास आपण वरू असे सांगितले. तिच्या नवऱ्याचे म्हणजे ओडेसिअसचे एक धनुष्य शस्त्रागारात होते, ते तिने आणून त्यांच्यापुढे ठेवले व सांगितले की, 'याला जो कोण दोरी चढवील व बाण सोडील त्याला आपण नवरा म्हणून पसंत करू.'

अनुक्रमणिका

त्याप्रमाणे एका नेमल्या दिवशी त्या सर्वांनी आपापल्या पाळीप्रमाणे धनुष्यावर प्रत्यंचा चढविण्याचा प्रयत्न केला; पण कोणासही धनुष्य सज्ज करता आले नाही. कर्मधर्मसंयोगाने ओडेसिअस त्याच वेळी भिकाऱ्याच्या वेषात त्या ठिकाणी येतो. तो धनुष्यास चटदिशी दोरी चढवून ते सज्ज करतो व पेनेलोपीच्या हातचे बाण घेऊन त्या खजील झालेल्या उर्मट राजांना मारून टाकतो.

रामायण आणि ओडेसी या दोन्ही काव्यांतं एका प्रसिद्ध धनुष्यावर दोरी चढवण्याचा पण लावण्यात आला असे वर्णिले आहे. तो पण जो जिंकील त्याला एक सुंदर स्त्री आपला पती म्हणून वरणार असा संकेत केला आहे. ही एकच गोष्ट दोन महाकवींनी कसकशी रंगवली आहे हे पाहणे पुष्कळ उद्‌बोधक होईल.

ओडेसीमधील कथा अगदी साधी व सहजसुंदर आहे. दुसरा नवरा करायचाच तर तो पहिल्या नवऱ्याइतका तरी बलवान पाहिजे. त्याचे सामर्थ्य ओडेसिअसइतके तरी पाहिजे. ते अजमावण्याचे साधन म्हणून त्याच्या धनुष्यास दोरी चढवणे ही कसोटी तिला सुचते व घरात असलेले त्याचे धनुष्य ती पुढे करते. आलेल्या वरांना दोरी चढवण्याचे सामर्थ्य असत नाही. ते पराभूत होऊन शरमिंदे होतात. ओडेसिअस धनुष्य सज्ज करून त्यांना मारतो.

आता रामायणातील दोरी चढवण्याचा प्रसंग कसा वर्णिला आहे ते पाहू. विदेह देशाचा जनक राजा यज्ञाकरिता जमीन नांगरीत असता त्याला एक नुकतीच उपजलेली बालिका सापडते. तिला तो आपली मुलगी म्हणून वाढवितो. ती मोठी झाल्यावर ती 'वीर्यशुल्का' आहे असे जाहीर करतो. आपल्या बलाची खात्री करून देणे हेच जिचे शुल्क ती वीर्यशुल्का. त्याप्रमाणे बलाची परीक्षा करण्यासाठी त्याने संग्रही असलेल्या शिवधनुष्याची योजना केली. अनेक देशांचे राजे येऊन त्यांनी त्या धनुष्यावर दोरी चढवण्याचा प्रयत्न केला. पण त्यात कोणासही यश आले नाही. पुढे जनकाने यज्ञ आरंभिला. त्या निमित्ताने विश्वामित्राने राम–लक्ष्मणांस विदेह नगरीस नेले. तेथे धनुष्य पाहण्याची इच्छा रामाने दर्शविली. त्या निमित्ताने ते आणल्यावर रामाने धनुष्य उचलून त्यावर दोरी चढवली याप्रमाणे पण जिंकल्यामुळे रामास सीतेची प्राप्ती झाली. रामाने धनुष्याची दोरी जास्त खेचल्याने अखेर ते शिवधनुष्य मोडून गेले!

पेनेलोपीचा पण अगदी स्वाभाविक असल्याने चांगला वठला आहे. तिच्या नवऱ्याचे धनुष्य घरातच होते. रामायणातील धनुष्य हे जनकाचे नेहमी वापरण्याचे नव्हते. ते वंशपरंपरेने त्याच्याकडे असलेले शिवधनुष्य होते.

या कथेतील जनकाच्या वर्तनाविषयी विचार करू. जनक हा सीतेचा जनक बाप नव्हे; तर तो केवळ पालनकर्ता आहे जनकाला औरस मुलगीही आहे. तसेच त्याच्या भावाच्याही दोन मुली आहेत. या तीन व पालक मुलगी सीता या चौघींची लग्ने दशरथाच्या चौघा मुलांबरोबर झाली; पण जनक आपल्या औरस मुलीस 'वीर्यशुल्का' ठरवून तिच्यासाठी पण ठेवीत नाही; ते महत्त्व पालक मुलगी सीता हिला देतो व पुढे तिचा विवाह दशरथाचा ज्येष्ठ पुत्र व राज्याचा भावी अधिकारी असा जो राम त्याच्याशी होऊ देतो व आपल्या पोटच्या मुलीस रामाचा धाकटा भाऊ व त्याचा सेवक असा जो लक्ष्मण त्याची भार्या करतो. कोणता बाप असे होऊ देईल? पोटच्या मुलीला उत्तम स्थळ मिळावे असे कोणताही बाप इच्छील. पाळलेल्या मुलीस दुय्यम स्थान मिळायचे.

पण रामायणात हा क्रम व्यवहारास सुटून दाखवला आहे. यावरून तो अविश्वसनीय वाटतो.

अनुक्रमणिका

आता आपण विचार करू.

'यज्ञभूमीपासून उत्पन्न झालेली माझी कन्या वाढीला लागली. तेव्हा वीर्यशुल्का (म्हणजे हे त्र्यंबक—चाप सज्ञ करण्याला समर्थ असे ज्याचे वीर्य असेल त्यालाच ही द्यायची) म्हणून मी ही अयोनिसंभव कन्या रक्षण करून ठेविली.' (बालकांड ६६। १४)

हा पण जनकाने केव्हा केला हे सांगितलेले नाही. सीता लहान असतानाच हा पण केलेला दिसतो. पुढे ही कन्या मोठी झाल्यावर पुष्कळ राजांनी तिला मागणी घातली; ती वीर्यशुल्का असल्यामुळे कोणाचीही मागणी जनकाने मान्य केली नाही. तेव्हा ते सर्व राजे मिथिला नगरीस आपल्या सामर्थ्याचा अदमास पाहण्यासाठी आले. त्यांच्यापुढे शिवधनुष्य आणून ठेवले असता त्यांपैकी कोणीही ते उचलण्यास किंवा तोलण्यास समर्थ झाला नाही. 'राम जर हे धनुष्य सज्ञ करील तर अयोनिसंभव सीता मी त्याला देईन.' (६६।२६).

परंतु असा पण करण्याचे योग्यसे कारण दिसत नाही. जनकाकडे धनुष्य होते ते कोणालाही उचलता येण्यासारखे नव्हते व ही सापडलेली कन्या होती; म्हणून कसा तरी हा पण जुळवून दिला आहे असे दिसते. ६७ व्या सर्गातील ९ व्या श्लोकात, हे धनुष्य कोणालाही उचलण्यासारखे नव्हते असे म्हटले आहे. 'सर्व देवगण, असुरांसहवर्तमान राक्षस, मोठमोठे योद्धे आणि यक्ष व किन्नर आणि महोरग यांपैकी कोणीही हे धनु सज्ञ करण्यास समर्थ नाहीत.' 'कानापर्यंत हे धनुष्य ओढण्याचे, ते सज्ञ करण्याचे, त्याला बाण लावण्याचे, प्रत्यंचा ओढण्याचे सामर्थ्य मानवाच्या ठिकाणी कोठून असणार?' (१०).

मोठमोठ्या देवांना व राक्षसांना जे काम होण्यासारखे नव्हते, ते माणसाकडून अपेक्षिणे शहाणपणाचे नाही; म्हणून शिवधनुष्य सज्ञ करण्याचा पण लावण्यात जनकाचा उद्देश या मुलीला नवराच मिळू नये व ती आपल्याकडे जन्मभर राहावी असा असावा असेही म्हणता येईल. याप्रमाणे हा पण सुसंगत नाही. कोणालाही अशक्य असा पण लावणारा जनक मूर्ख तरी असावा किंवा मुलीला जन्मभर कुमारी ठेवू इच्छिणारा निर्दय बाप तरी असावा, असे म्हणणे भाग पडते.

हे धनुष्य जनकाच्या ताब्यात कसे आले याचा विचार करू.

पूर्वी दक्षयज्ञनाशाच्या समयी वीर्यवान रुद्र सहज ते धनुष्य वाकवून रागारागाने देवांची धूळदाण उडवून म्हणाला, (६६—९) 'हे देवहो, मी आता तुमची मस्तके तोडून टाकतो.' तेव्हा ते सर्व देव अगदी दीन झाले व शंकराला प्रसन्न करून घेऊ लागले. शंकरही त्यांच्यावर प्रसन्न झाले आणि त्या सर्व महात्म्यांना ते धनुष्य त्यांनी देऊन टाकले (१०—११). ते महात्मा देवाधिदेवाचे—शंकराचे श्रेष्ठ धनुष्य आम्रच्या समर्थ पूर्वजांपाशी ठेव म्हणून त्यावेळी ठेवले आहे (१२).

मोठ्या प्रयत्नांनी व प्रयासाने मिळविलेली धनुष्यरूपी मोठ्या योग्यतेची वस्तू देवांनी आपल्याजवळ का ठेविली नाही असा पहिला प्रश्न उभा राहतो. ते ठेवण्यास लायक अशी जागा स्वर्गात नव्हती काय? का दक्षाच्या घरापासून स्वर्गात त्या धनुष्याला नेण्याने सामर्थ्य देवांना नव्हते? देवरात नामक निमीच्या ज्येष्ठ पुत्राला तरी ते आपल्या राज्यात आणण्यास कसे शक्य झाले? थोरांनी दिलेली वस्तू थोडे दिवस तरी चांगल्या प्रकारे सांभाळावी लागते. तशी ती सांभाळली गेली नाही तर थोर आपला अपमान समजतात. येथे

अनुक्रमणिका

तर देवांनी ते धनुष्य मिळाल्याबरोबर देवराताकडे ठेवण्यास दिले आहे हे चमत्कारिक दिसते! असे अनेक प्रश्न उत्पन्न होतात. त्यांचे समाधानकारक उत्तर मिळणे कठीण आहे.

बरे, हा दक्ष कोण? दक्षप्रजापतीच्या कन्यांपासून सृष्टीची उत्पत्ती पुराणात सांगितली आहे. हे खरे मानले तर दक्ष–यज्ञाच्या वेळी गजबजलेली राज्ये अस्तित्वात कोठून येणार? मग हा देवरात – राजा जनकाचा पूर्वज –त्यावेळी हजर होता हे कसे संभवनीय आहे?

दक्षाची कन्या सती ही शंकराची भार्या होती. दक्ष व त्याचा जावई शंकर यांचे वाकडे आले. दक्षाने यज्ञ आरंभिला. जावई शंकर याला बोलाविले नव्हते. पण सती आमंत्रणाशिवाय नवरा 'नका नको' म्हणत असता, बापाच्या घरी गेली. बापाने तिचा अपमान केला. तिने रागाने यज्ञकुंडात उडी घेऊन प्राण दिला. हे वर्तमान शंकराला समजल्यावर तो क्रुद्ध झाला व त्याने येऊन यज्ञाचा विध्वंस केला. सती पुढे हिमालयकन्या झाली व तिने पुन्हा शंकराला वरीले. यावरून दक्षयज्ञविध्वंसनाचीं कथा फार पुरातन आहे. त्या काळी पृथ्वीवर मनुष्यवस्ती झाली होती की नाही याचीच शंका आहे!

हा देवरात तरी कोण? निमीचा ज्येष्ठ पुत्र देवरात म्हणून ख्यात राजा होता असे (६६–८) श्लोकात आहे. पुढे ७१ व्या सर्गात जनकाने आपले पूर्वज वर्णिले आहेत. त्यांत पहिले नाव निमीचे दिले आहे. निमी हा कुणाचा पुत्र हे सांगितलेले नाही, यावरून निमी हा राज्यसंस्थापक असावा. त्याचा पुत्र मिथी व त्याचा पुत्र जनक, त्याचा उदावसू, त्याचा नंदिवर्धन, त्याचा सुकेतू, त्याचा देवरात. हा देवरात निमीपासून सहावा होतो व ६६ व्या सर्गात तो निमीचाच ज्येष्ठ पुत्र सांगितला जातो, असा गैरमेळ आहे.

याप्रमाणे ज्या धनुष्यास सज्ञ करण्याचा पण ठरविला होता ते धनुष्यच अगोदर संशयित आहे. ते देवरात याजजवळ ठेवल्याची गोष्टही संशयितच. ही अव्यवहार्यही आहे. अशी स्थिती असल्याने धनुरर्भंगाचा पण ही गोष्ट सत्यसृष्टीतील नसून काल्पनिकच आहे असे दिसते.

होमर कवीची कथा तशी नाही. तेथील पणास कारण आहे. मृत नवऱ्या इतका तरी बलवान वर हुडकण्यासाठी तो पण आहे. जनकाचा पण तसा नाही. त्याला अशक्य काम करणारा जावई पाहिजे आहे. होमरच्या काव्यातील धनुष्य पेनेलोपीच्या नवऱ्याचेच होते. येथ धनुष्य आहे ते शंकराचे आहे नि ते जनकाच्या हाती कसे आले ही गोष्ट उघड उघड कल्पित आहे. धनुष्याची दोरी चढवून बाण मारण्याचा पणा होमर कवीने वर्णिला आहे. पण दोघांच्या वर्णनात विशेष ध्यानात ठेवण्यासारखा फरक आहे. एकाची गोष्ट साहजिक, साधी व व्यवहार्य आहे. दुसऱ्याची गोष्ट अस्वाभाविक, अव्यवहार्य व गुंतागुंतीची आहे असे वाटते. या अव्यवहार्यतेवरून सीता ही जनकाने पाळलेली मुलगी होती की ती निव्वळ काल्पनिकच आहे, असाही संशय उत्पन्न होण साहजिक आहे.

प्राचीन काळी हिंदी व युनानी आर्यांतील विद्वानांमध्ये फार अगत्याचे संबंध होते. म्हणून रामायणातील धनुर्भगाची कथा वाचल्यावर होमरने ओडेसीत तशा प्रकारचा प्रसंग वर्णिला, का ओडेसीतील धनुष्याला दोरी लावण्याच्या पणाची कथा लिहिली असा संशय उत्पन्न होत आहे.

तया गृहीतं च मृगांगनाभ्यः ॥
ततो गृहीतं च मृगांगनाभिः ॥

अनुक्रमणिका

मनोहर : डिसेंबर, १९४५

अनुक्रमणिका

२२ करू नये थट्टा, भल्याभल्यांसी लागला बट्टा

कोणी विद्वान शास्त्री ताक मागण्यास गेला असता सर्व रामायणाचे सार एका श्लोकात त्याने सांगितले. त्याला एकश्लोकी रामायण म्हणतात. तो श्लोक –

आदौ रामतपोवनाभिगमनं हत्वा मृगं कांचनम् ।
वैदेहीहरणं जटायुमरणं सुग्रीव संभाषणम् ॥
वालीनिर्दलनं समुद्रतरणं लंकापुरीदाहनम् ।
पश्चाद्रावणकुंभकर्णहननं एतद्धि रामायणम् ॥

राम वनवासाला गेला व चौदा वर्षांनी परत येऊन राज्यावर बसला. या श्लोकामध्ये कांचनमृगाचा वध व वैदेहीचे हरण व त्यामुळे घडून आलेल्या रावणकुंभकर्णमरणापर्यंतच्या गोष्टी घालून रामायण महाकाव्य वाल्मीकीने रचिले. वैदेहीहरण झाले नसते तर पुढील सर्व हकीगत घडली नसती. वैदेहीहरणाच्या पूर्वी दिलेली कांचनमृगाला मारणे ही बाब अगदीच क्षुल्लक आहे. वैदेहीहरणाला सोपे जावे म्हणून रामलक्ष्मणाला बाजूला काढण्यासाठीच कांचनमृगाची युक्ती योजलेली होती. सीताहरणाची कल्पना रावणाला सुचवून त्याची त्या कामी उठावणी त्याची बहीण शूर्पणखा हिने केली होती व त्याचे कारण तिने नाककान कापून केलेली विटंबना हे आहे. म्हणून ही गोष्ट पुढील तंट्याचे मूळ आहे.

शूर्पणखा दंडकारण्यात रहात असता राम तिच्या नजरेस पडला. त्याचे सुंदर रूप पाहून ती मोहित झाली व असला नवरा आपणास असावा अशी इच्छा तिला झाली. ती रामाकडे येऊन 'माझा पती हो' असे म्हणाली. येथपर्यंत तिच्याकडून काही अपराध झालेला नाही. तिची मागणी रामात अयोग्य वाटली. त्याच वेळी तिला स्पष्ट तसे सांगून वाटेस लावणे योग्य होते. तसे न करता तिच्याशी थट्टा करण्याची हुक्की श्रीरामचंद्रास आली. तो म्हणाला, 'मला बायको असल्याने मी तुला पत्करली तर तुला सवतीच्या जाचात राहावे लागेल. यासाठी मला नवरा करण्याचा विचार तू सोडून दे. हा माझा भाऊ लक्ष्मण अविवाहित आहे, याची बायको हो.'

लक्ष्मणाला अनेक बायका होत्या, असे असतानाही रामाने तो अविवाहित आहे असे निव्वळ खोटे सांगितले. एकवचनी रामाच्या तोंडून असत्य भाषण निघणे त्याच्या कीर्तीस हानिकारक असल्याने कै. लेलेशास्त्र्यांना कसेसेच वाटले व रामाची तरफदारी करण्याच्या हेतूने त्यांनी पुढील टीप दिली :

लक्ष्मणाचा विवाह झाला असूनही तो अविवाहित आहे असे रामाने शूर्पणखेला सांगितले आहे; परंतु राम तिच्याशी थट्टेने बोलू लागले असे आरंभीच सांगितले आहे व थट्टेने केलेले असत्य भाषण दोषास्पद होत नाही.' कारण

'न नर्मयुक्तं वचनं, हिनस्ति न स्त्रीषु राजन्न विवाहकाले ।
प्राणात्यये सर्वधनापहारे पचानृतान्या हुरपातकानि' ॥

असे वचन आहे.

अनुक्रमणिका

ती बिचारी भाबडी लक्ष्मणाकडे जाऊन 'मी श्रेष्ठ स्त्री तुझ्या रूपाला योग्य अशी भार्या आहे. तू माझ्यासहवर्तमान सर्व दंडकारण्यामध्ये सुखाने संसार करशील' असे म्हणाली. (अरण्यकांड, सर्ग १८, श्लोक ७). लक्ष्मणाने दादाचेच अनुकरण करून थट्टा आणखी पुढे चालविली. तो म्हणाला, 'रक्तकमलासारख्या वर्णाने युक्त तू, मज दासाची भार्या होऊन दासी बनण्याची का बरे इच्छा करीत आहेस? कारण मी आपल्या भ्रात्याच्या तंत्राने राबणारा परतंत्र आहे. तेव्हा, हे विशालनयने, निर्मल कांतीने युक्त असलेली तू, उत्कृष्ट विषयवासनेने युक्त असलेल्या आर्य रामाची कनिष्ठ भार्या होऊन कृतकृत्य व आनंदित हो. कुरूप, ओबडधोबड, कृशोदरी, दुराचरणी आणि वृद्ध अशा ह्या भार्येचा त्याग करून हा तुझाच उपभोग घेईल. कारण, हे श्रेष्ठ स्त्रिये, हे सुंदरी, हे श्रेष्ठ रूप टाकून देऊन कोण बरे विचक्षण पुरुष मनुष्यजातीतील स्त्रियांवर मन ठेवील?' (श्लोक ९–१२.).

ही थट्टा आहे असे समजण्याचे चातुर्य तिच्या ठिकाणी नव्हते. तिला हे लक्ष्मणाचे बोलणे खरेच वाटले. तेव्हा ती सीता आणि राम पर्णशालेत बसली होती तेथे जाऊन म्हणाली, 'विरूप, दुराचारिणी, ओबडधोबड, पोट खबदाडीला गेलेली आणि वृद्ध अशी जी ही भार्या तिचा स्वीकार करून तू मला बहुमान देत नाहीस. तेव्हा मी आज या मनुष्यजातीच्या स्त्रीला तुझ्यासमक्ष भक्षण करून टाकीन आणि याप्रमाणे सवत नाहीशी झालेली मी तुझ्याबरोबर सुखास येईल त्याप्रमाणे संचार करीन. (श्लोक १५, १६) शूर्पणखा अगदीच भाबडी व मूर्ख. लक्ष्मणाने सीतेसंबंधाने उच्चारलेलेच शब्द तीही उच्चारते.

एतां विरूपामसतीं करालां निर्णतोदरीम् ।
भार्यां वृद्धां परित्यज्य त्वामेदैव भजिष्यति॥

(श्लोक ११), तिच्या भाषणात या श्लोकातील पहिला अर्ध व भार्या वृद्धा ही पदे कायम आहेत. परित्यज्य याबदल 'अवष्टम्य' असा शब्द असून 'न मां त्वं बहुमन्यसे' हा चौथा चरण आहे. पढवलेल्या पोपटासारखी ती बोलत आहे. रामाला सीता नकोशीच आहे अशी तिची समजूत करून दिलेली आहे.

शूर्पणखा सीतेच्या अंगावर धावून येऊ लागली असता क्रुद्ध झालेला राम लक्ष्मणाला दटावून म्हणाला, 'हे लक्ष्मणा, क्रूर आणि दुष्ट लोकांबरोबर कधीही थट्टा करू नये. हे सत्त्वस्थ लक्ष्मणा, (आपल्या थट्टमुळे) ही राक्षसी कशीतरी जीव धरून असलेल्या सीतेला भक्षण करण्यास प्रवृत्त झाली आहे. आधीच कुरूप, दुराचारिणी, अतिशय मत्त आणि तुंदिल असलेल्या ह्या राक्षसीला हे पुरुषश्रेष्ठा लक्ष्मणा, तू विरूप करून टाक.' (श्लोक १९।२०). याप्रमाणे रामाने सांगितले असता क्रुद्ध झालेल्या महाबलाढ्य लक्ष्मणाने रामासमक्षच खड्ग उपसून तिचे कान व नाक ही छेदून टाकली (श्लोक २१).

थट्टेला सुरुवात श्रीरामचंद्रानीच केली व त्या निमित्ताने लक्ष्मण अविवाहित आहे असे खोटेच सांगितले. लक्ष्मणाने ती थट्टा पुढें चालविली. ही थट्टा इतकी वाहावली की, पतिव्रता म्हणून नावाजलेली ती 'असती' म्हणजे दुराचरणी आहे असे बोलण्याचे धैर्य लक्ष्मण करीत आहे. ही थट्टा तिला खरीच वाटली. ती सीतेच्या अंगावर धावली. हा परिणाम आपल्या थट्टेचा आहे हे रामाने ओळखून तिला हाकून देण्यास लक्ष्मणास आज्ञा करणे योग्य झाले असते; पण तसे न करता त्या एकट्या असहाय्य स्त्रीला विरूप करण्याचा हुकूम केला. लक्ष्मण काय ! दादाच्या हुकमाचा चाकर. त्या बहाद्दराने तलवारीने तिचे कान व नाक छाटून तिला विरूप केले (श्लोक. २१). या रामलक्ष्मणाच्या कृत्याचा तीव्र निषेध करणेच योग्य आहे. स्त्रीवर हत्यार चालवून या दशरथपुत्रांनी आपल्या श्रेष्ठ आर्यसंस्कृतीला य नीतिमत्तेला काळिमा लावलेला आहे.

अनुक्रमणिका

शूर्पणखा ही रावणाची म्हणजे थोर मानधन राजाची बहीण होती. तिची थट्टा करणे हे गैरच; पण तिचे कान व नाक कापून तिला विरूप करणे अगदी निंद्य आहे.

तिने आपली झालेली अप्रतिष्ठा आपल्या भावास कळवून सीतेला जबरीने आणण्याचे काम त्याने हाती घ्यावे म्हणून त्याची उठावणीं केली. रावणाला ही कल्पना पटली. पण तो सनदशीर वागणारा राजा, त्याने त्या कार्याविषयी सचिवांचे अनुमोदन घेतले आणि कार्य करण्याचा निश्चय करून मारीच–आश्रमाला निघाला. मारीचास रावण आपला बेत सांगतो, 'त्या सैन्याचा वध करणारा तो राम क्षत्रियांना कलंक लावणारा, दुःशील, कर्कश, तीक्ष्ण, मूर्ख, लुब्ध, अजितेंद्रिय, धर्माचा त्याग केलेला व अधर्मनिष्ठ असून प्राण्यांच्या अहिताविषयी तत्पर आहे व त्यानेच अरण्यामध्ये वैरावाचून केवळ शक्तीच्या जोरावंर कर्ण व नासिका यांचा अपहार करून माझी भगिनी विरूप केली आहे. तेव्हा देवकन्येसमान असलेल्या त्याच्या सीतानामक भार्येला जनस्थानातून मी पराक्रमाने घेऊन येणार आहे ह्याविषयी मला तू सहाय्य हो.' (अरण्यकांड, सर्ग ३६, श्लोक ११ – १४).

प्रथमतः रामाने शूर्पणखेची थट्टा केली व या मस्करीची कुस्करी होऊन तिचे कान व नाक कापून आर्यसंस्कृतीस काळिमा लावला. कसलेही वैर नसताना केलेल्या बहिणीवरील अत्याचाराने चिडून रावणाने सीतेला जबरीने उचलून नेले. तिला सोडविण्याच्या प्रयत्नात जटायूला मरण आले. तिचा शोध लावण्यासाठी व लंकेवर स्वारी करण्याच्या कामी वानरसैन्याची मदत जरूर होती. वानरांचा बलवान राजा वाली हा रावणाचा मित्र होता. त्याच्याकडून मदत मिळणे अशक्य होते. या लढाईत राक्षसांबरोबरील युद्धात वानरसैन्याचा मोठा संहार होणार. तो करू देणारा राजा आपल्याशी उपकारबद्ध पाहिजे. म्हणून सुग्रीवाबरोबर संभाषण म्हणजे वाटाघाट करावी लागली. परिणामी वालीला मारून, सुग्रीवाला राज्य देऊन पुढील सर्व प्रकार रावण कुंभकर्णवधापर्यंत करावे लागले. या कामी वालीचा वध अन्यायाने केल्याने रामाच्या कीर्तीस कलंक लागला. सुग्रीवाचे उदाहरण बिभीषणाने गिरविले व आपल्या भावाविरुद्ध लढाईत साहाय्य केले, इत्यादी सर्व प्रकार रामाने केलेल्या शूर्पणखेच्या थट्टेचे परिणाम होत. एका कवीने म्हटले आहे –

करूं नये थट्टा । भल्याभल्यांसि लागला बट्टा ॥
थट्टा रावणाने केली । लंका सोन्याची जाळली ॥

सदरचा कवी रावणाच्या थट्टेची नोंद करून तिच्यामुळे लंका जळून गेली असे वर्णितो. पण राम हा विष्णूचा अवतार ठरल्यावर त्याच्या थट्टेचा उल्लेख करण्याचे धैर्य सदर कवीस झाले नाही. शूर्पणखेची जी थट्टा केली तिचा परिणाम किष्किंधा व लंका या दोन्ही बलाढ्य राज्यांची नासाडी उडण्यात झाला. त्यांचे पराक्रमी राजे व वीर नाहीसे झाले व त्या राज्यावर बसविलेली बाहुली परतंत्र झाली. रामालाही याचा परिणाम भोगावा लागला. सीतेने अग्निदिव्य केले तरी तिच्यावरचा लोकांप्रवाद कमी झाला नाही व रामाला तिचा त्याग करणे भाग पडले व उभयतांचे आयुष्य दुःखातच गेले. म्हणून कवी म्हणतात,

करूं नये थट्टा । भल्याभल्यांसि लागला बट्टा ॥

स्त्री : जून, १९३५

अनुक्रमणिका

२३ दिवेकरशास्त्री X भास्करराव जाधव

फेब्रुवारी, १९३८ च्या 'पुरुषार्था' तील अंकात 'ब्रह्मचारी हनुमान' या मथळ्याचा व एप्रिल १९३८ च्या अंकात 'रामायणाचे महत्त्व' या मथळ्याचा असे दोन लेख आले आहेत. पंडित सातवळेकरांनी वाटेल तसे भरमसाट हल्ले दुसऱ्यावर करावे व करवावे; पण त्यावर उत्तर पाठविल्यास ते छापण्यास मासिकात जागा नाही असे बिनदिक्कत सांगावे हाच पंडितजींस 'पुरुषार्थ' वाटतो.

'सत्यवादी' पत्रातील चर्चा मुद्द्यांस धरून दिवेकरशास्त्रीनी सुरू केलीच नव्हती. कोठले तरी उतारे देऊन त्या आधारे रामायण ग्रंथाचे व आर्य संस्कृतीचे महत्त्व त्यांनी प्रतिपादले. 'मुद्दे काढा' बसे त्यांनी मला आव्हान दिले. माझ्या लेखात मुद्दे काढूनच विवेचन केले असल्याने शास्त्रीबुवांच्या मुद्दे काढण्याच्या आरोळीस मूकत्वाने उत्तर देणे हेच बरोबर होते. आता शास्त्रीबुवा 'ब्रह्मचारी हनुमान' असा मुद्दा काढून वाद करीत आहेत हे अभिनंदनीय आहेत.

'दोन भिन्न भूमिका' या मथळ्याने शास्त्रीबुवा लिहितात, 'वाल्मीकी कवीने रामायण हे आदिकाव्य, एक पवित्र पावनी कथा जगामध्ये सदैव असावी, उत्कृष्ट आदर्श लोकांपुढे रहावा या दृष्टीने लिहिली आहे. रामायणातील वाल्मीकीने रेखाटलेली सर्व पात्रे एकापेक्षा एकेक सरस, उच्च, पवित्र आणि थोर अशी दाखविली आहेत. तत्कालीन समाजात जी उत्कृष्ट ध्येये व जे आदर्श असावेत असे लोकांना वाटे, ते सर्व वाल्मीकीने रामायणामध्ये दाखविले आहेत.

एकपत्नीव्रताचा उल्लेख रामायणात नाही

मारुतीचे ब्रह्मचर्य व रामाचे एकपत्नीव्रत ही ध्येये व आदर्श लोकांपुढे ठेवावीत असा वाल्मीकीचा रामायण लिहिण्यात हेतू होता असे शास्त्रीबुवांच्या लिहिण्यावरून दिसते. रामायणात भावाभावांच्या तीन जोड्यांचे बंधुप्रेम आदर्श म्हणून मांडले आहे. पहा, रामलक्ष्मण, रामभरत, भरतशत्रुघ्न तसेच राक्षसांतही रावणकुंभकर्ण यांचे बंधुप्रेम आहे. वालीसुग्रीव, बिभीषण, रावण व कुबेर या बंधूंच्या जोडीतील वैरही दाखविले आहे. रामाच्या पितृभक्तीचेही उज्ज्वल वर्णन आहे. इत्यादी गोष्टी आदर्श म्हणून दाखविण्याचा वाल्मीकीचा उद्देश स्पष्ट आहे. सीतेचे पतिव्रत्यही नावाजण्यासारखे वर्णिले असल्याने सीतेविषयीची पूज्यबुद्धी वाढतच जाते. म्हणून तोही एक आदर्श म्हणून मांडला आहे असे म्हणता येईल. परंतु दीर्घ ब्रह्मचर्य व एकपत्नीव्रत ही आदर्श म्हणून मांडल्याची कल्पना दिवेकर शास्त्र्यांसारख्यांनी केली आहे; पण तिला आधार दाखविणे त्यांना कठीण पडत आहे. रामायणाच्या पहिल्याच सर्गात श्लोक ८ ते २० पर्यंत तेरा श्लोकांनी रामाच्या झाडून साऱ्या गुणांचे वर्णन केले आहे व हे सर्व गुण स्पृहणीय असेच आहेत. पण त्यांत रामाच्या एकपत्नीव्रताचा स्पष्ट उल्लेख तर कोठेही आढळत नाही, पण ज्या वाक्यावरून तसे अनुमान काढता येईल असा अप्रत्यक्ष उल्लेखही नाही.

तत्कालीन समाजात जी उत्कृष्ट ध्येये व जे आदर्श असावेत असे लोकांना वाटे, ते सर्व रामायणामध्ये वाल्मीकीने दाखविले आहेत असे शास्त्रीबुवा म्हणतात. पण स्त्रीसुखपराङ्मुख ब्रह्मचर्याची महती रामायणात आढळत नाही. रामायणात दाखविलेले. सर्व पुरुषऋषीसुद्धा सपत्नीक आहेत. म्हणजे पत्नीविरहित कोणी असेल तर तो अपवाद. असा अपवाद कोणी असल्यास त्याबद्दल स्पष्ट कथन केलेच

अनुक्रमणिका

पाहिजे अशी अपेक्षा कोणीही करील. तसा स्पष्ट उल्लेख नसल्यास इतरांसारखाच मारुतीही सपत्नीक असावा असे अनुमान कोणीही काढील.

हनुमानाच्या ब्रह्मचर्याचा अर्थ काय ?

दशरथाच्या ३५० राण्या होत्या असे स्पष्ट सांगितले आहे. भरतास अनेक भार्या होत्या व लक्ष्मणासही होत्या असे स्पष्ट उल्लेख रामायणात आहेत. रामाला एकच बायको असती तर, तसे स्पष्ट कथन रामायणात केले गेले असते. तद्भावी रामही इतरांसारखाच म्हणजे बहुपत्नीक असावा असे अनुमान काढणेंच सरळपणाचे होईल. पण रामभक्त शास्त्रीबुवांना हा सरळपणा मान्य नाही. त्याला इलाज नाही. अनेक बायका करणे हा त्या काळचा सदाचार होता.

हीच गोष्ट हनुमानाच्या स्त्रीसुखपराङ्मुखत्वाची. हनुमान वेदवेत्ता या यौगिक अर्थाने ब्रह्मचारी होता ही गोष्ट मी प्रथमापासून कंठरवाने सांगत आहे. पण स्त्रीसुखपराङमुख रूढार्थाने तो ब्रह्मचारी असता व हा गुण आदर्श म्हणून लोकांपुढे मांडण्यात वाल्मीकीचा इरादा असता तर त्याने स्पष्ट सांगावयास पाहिजे होते. तसे सांगितले नसल्याने प्रथमदर्शनीच हनुमान हा स्त्रीसुखपराङमुख नव्हता, म्हणून तो इतरांसारखाच सपत्नीक होता असे अनुमान निघते. याच्या उलट ज्याचे मत असेल त्याच्यावर शाबितीचा बोजा आहे हे उघड आहे. सर्व पुरुष स्त्रीसुखलोलुप असतात. हनुमान पुरुष होता म्हणूनच तो स्त्रीसुखलोलुप असावा असे अनुमान निघते. आता 'सर्व पुरुष स्त्रीसुखलोलुप असतात' या विधानास शास्त्रीबुवा हरकत घेतील असे वाटते. पण पुरुष शब्द त्यांचे समाधान करील अशी आशा आहे. यावरून इतर पुरुषांसारखाच हनुमान होता असे वाल्मीकीस मान्य होते असे दिसते. कारण तसे वास्मीकीस मान्य नसते तर तसे स्पष्ट कथन करणे भाग होते.

अपवादाचे स्पष्ट कथन का नाही ?

हनुमान स्त्रीसुखपराङमुख ब्रह्मचारी होता हे शाबीद करण्याचा बोजा शास्त्रीबुवांवर असून ते त्याबद्दल पुरावा मुळीच आणीत नाहीत. हनुमान हा कोणत्या अर्थाने ब्रह्मचारी होता हे मी दाखविल्यावर तो रूढार्थाने म्हणजे स्त्रीसुखपराङमुख ब्रह्मचारी नव्हता असे अनुमान काढण्यास अनुकूल अशी जी जी स्थळे मला आढळली तीही मी स्थळे मांडली आहेत. या स्थळांवर काहीतरी टीका करून. 'खोडून काढली' असा वितंडवाद केल्याने जे विधान सिद्ध करण्याचा बोजा शास्त्रीबुवांच्या शिरावर आहे, ते विधान शाबीत होत नाही, हे स्पष्टपणे शास्त्रीबुवांच्या नजरेस आणण्याची परवानगी घेतो.

वयात येऊन विद्याभ्यास पुरा झाल्यावर गृहस्थाश्रम स्वीकारणे स्वाभाविक असल्याने तसा स्वीकार कुणी विशेष कारणाकरिता केला नसल्यास तसे स्पष्ट कथन केले पाहिजे. अशा स्पष्ट कथनाच्या अभावी गृहस्थाश्रमस्वीकार कवीस मान्यच आहे असे गृहीतच आहे. रामायणात वाल्मीकीनी हनुमान याने स्त्रीसंग्रह केला नाही असे कोठेही सांगितलेले नाही. लोकांत मात्र तसा प्रवाद आहे. पण त्यास वाल्मीकी रामायणात आधार नाही. दिवेकरशास्त्री यांसही तो दाखविता येत नाही.

रामायणाचा अभ्यास करताना अशा प्रकारचा उल्लेख कोठेच आढळला नाही, तेव्हा या उलट म्हणजे मारुतीस स्त्रिया होत्या अशाविषयी उल्लेख सापडतो काय याचा शोध केला. आजच्या लोकसमजुतीत

अनुक्रमणिका

राम व हनुमान याचा सबंध कितीही जिव्हाळ्याचा असला तरी खुद्द वाल्मीकीच्या मते हनुमान हा सुग्रीवाचा सेवक प्रथमपासून अखेरपर्यंत आहे. रामाच्या हातून वालीचा खून करवून सुग्रीवास राज्य मिळवून देण्याच्या कामी हनुमानाने मोठीच कामगिरी बजाविली आहे. रामाचे काम सीता परत आणण्याचे. तेथेही हनुमानाने फार पराक्रम दाखविला आहे. रामाला अभिषेक झाल्यावर व बक्षिसे वाटल्यावर हनुमान सुग्रीवाबरोबर परत गेला आहे. यामुळे हनुमानाच्या स्त्रियांचा उल्लेख स्पष्टपणाने येण्याची आवश्यकताच भासली नाही. अनुमान काढण्यास सबळ असे अप्रत्यक्ष उल्लेख मिळतात काय याचा शोध केला. तेव्हा तसे तीन उल्लेख आढळले, ते मी माझ्या मूळच्या लेखात दिले आहेत. यावरच शास्त्रीबुवांनीं आपली लेखणी चालविली आहे व त्यांच्या समजुतीप्रमाणे या तीन उल्लेखांचा धुव्वा उडविला आहे. शास्त्रीबुवांची टीका पोचट आहे हे मी पुढे दाखविणार आहे; पण या तिन्ही उल्लेखांतून जाधव म्हणतात त्याप्रमाणे निःसंशय अनुमान निघत नाही असे सिद्ध झाले तरी त्यावरून हनुमान स्त्रीसुखपराङ्मुख ब्रह्मचारी होता हे सिद्ध होत नाही हे कोणीही कबूल करील. स्पष्ट कथनाअभावी माणसाची नैसर्गिक प्रवृत्ती जी स्त्रीसंग्रह ती हनुमानाच्या ठायी होती, हे अनुमान कायमच राहणार.

शास्त्रीबुवांजवळ पुरावा नाही

आता शास्त्रीबुवांच्या खंडनाचा विचार करू. लक्ष्मण किष्किंधेत गेला तेव्हा अंगदाने त्याचे स्वागत करून त्यास राजमार्गाने नेले. त्या राजमार्गावर दहा अमात्यांची घरे होती. त्या दहांची नावे सांगितली आहेत. त्यात हनुमानाचा उल्लेख आहे. त्या घराच्या वर्णनात 'स्त्रीरत्नैः शोभितानि च' असे म्हटले आहे. यावरून मारुतीच्याही घरात स्त्रीरत्ने होती असे अनुमान होते, कारण 'मारुतीच्या घराखेरीज' असा अपवाद सांगितलेला नाही. शास्त्रीबुवा म्हणतात, 'पूर्वसंदर्भ बघितला तर असे दिसते की हे मध्येच आलेले वर्णन अप्रस्तुत आहे. हा सर्गच प्रक्षिप्त असावा असे दिसते.' प्रतिपक्षाचा पुरावा खोटा पाडण्याची शास्त्रीबुवांची कल्पना अजब आहे. हा सर्ग प्रक्षिप्त म्हटल्यास मागचे पुढचे बरेच सर्ग प्रक्षिप्त म्हणावे लागतील याची जाणीव शास्त्रीबुवांस आहे. म्हणून प्रक्षिप्तपणावर जोर देण्याचा विक्षिप्तपणा त्यांनी केला नाही. ते म्हणतात, पण प्रक्षिप्त न मानला तरी त्यावर मारुतीच्या वाड्यात लक्ष्मणाला ज्या स्त्रिया दिसल्या त्या त्याच्या बायकाच होत्या हे कशावरून? ब्रह्मचर्य पाळणाऱ्या मनुष्याचा मठच असतो व तेथे कोणतीही स्त्री दृष्टीस पडत नसते अशी समजूत असल्यास ती चुकीची आहे.. .आत्या, काक्या, माम्या, मावशा, वडील बहिणी अशा अनेक नात्यानी घरामध्ये स्त्रिया असू शकतात, वगैरे ...' इतर नवांच्या घरात स्त्रीरत्ने होती, त्यातील काहीतरी त्यांच्या त्यांच्या उपभोग्य स्त्रिया होत्या हे शास्त्रीबुवांस नाकारता येणार नाही. मारुतीच्या घरच्या स्त्रियांविषयी अपवाद म्हणून स्पष्ट कथन नसल्याने या स्त्रीरत्नातील काहीतरी त्याच्या उपभोग्य स्त्रिया असाव्यात असे अनुमान निघणारच. आत्या, काक्या, माम्या असाव्या असा संशय काढताना मारुतीच्या घरात स्त्रीरत्ने होती ही गोष्ट शास्त्रीबुवांना मान्य करावी लागली आहे. इतर नऊ वाड्यांत जर काही भोग्य स्त्रिया असल्या तर याही वाड्यात त्या का नसाव्यात, ह शास्त्रीबुवांनी दाखविले पाहिजे. इतर नऊ वाड्यांतील सर्वच स्त्रीरत्ने त्या त्या सरदारांच्या उपभोग्य होत्या असे विधान करणे धाडसाचे व चुकीचे होईल गंमत पाहण्यास घरातील मोलकरणी दासीपासून सर्वच येणार. त्यात नात्यातील बायकाही असणे साहजिक आहे. पण मारुतीच्या वाड्यात मात्र सारीच स्त्रीरत्ने. नात्यातील स्त्रिया होत्या व त्यात त्याच्या भोग्य कोणी नव्हत्या हे शाबीत करण्याचा बोजा शास्त्रीबुवांवर आहे; पण तसा त्यांच्याजवळ पुरावा नाही.

अनुक्रमणिका

तर्कट व निराधार विधान

शास्त्रीबुवांची वाद करण्याची पद्धती और आहे. शास्त्रीबुवांना मारुतीचे स्त्रीसुखपराङ्मुख ब्रह्मचर्य शाबीत करावयाचे आहे. त्याच्या वाङ्यात स्त्रीरत्ने होती हे त्यांना कबूल आहे. तेव्हा मारुती ब्रह्मचारी असल्याने त्याच्या मठातील स्त्रिया आत्या, काक्या वगैरे होत्या असे विधान ते करतात. पण या ठिकाणी मारुतीचे ब्रह्मचर्य शाबीत धरून आपण आपले म्हणणे पुढे करतो ही गोष्ट शास्त्रीबुवा नजरेआड करीत आहेत. शास्त्रीबुवांचे तर्कट पुढीलप्रमाणे आहे : मारुतीच्या घरात स्त्रीरत्ने होती. मारुती ब्रह्मचारी होता. म्हणून त्या स्त्रीरत्नांतील कोणीही त्याची भोग्यस्त्री नव्हती. यामुळे असलेल्या स्त्रिया त्याच्या नात्यातील आत्या, काक्या, माम्या असल्या पाहिजेत म्हणून भोग्य स्त्रियांच्या अभावी मारुती ब्रह्मचारी होता हे सिद्ध आहे.' हा तर्क नसून तर्कट आहे, कारण यात प्रमेय हेच प्रमाण केले आहे.

आणखी एक निराधार विधान शास्त्रीबुवा करतात ते पाहू. 'मारुती ही रामायणातील एक प्रधान विभूती आहे. या विभूतीचे वर्णन पुष्कळ ठिकाणी आलेले आहे. मारुती जर खरोखरीच गृहस्थाश्रमी असता तर तसे वर्णन कोठे तरी अन्यत्र येणे संभवनीय होते. पण तो ब्रह्मचारीच होता म्हणून मारुतीच्या स्त्रिया, त्याची मुले यांचा कोठेच उल्लेख आलेला नाही.'

मारुतीचे वर्णन बालकांडात जन्म झाल्यावेळी आलेले आहे. नंतर किष्किंधा कांडात ऋष्यमूक पर्वतावर त्याची गाठ पडते. तेथे मारुतीच्या बायकामुलांचा उल्लेख येण्याचा संभवच नाही, कारण सुग्रीवाबरोबर तो हद्दपारीत असतो. पुढे किष्किंधेस गेल्यावरही राजस्त्रियांचा जसा उल्लेख आला तसा त्याच्या स्त्रियांचा येणे सभंवनीय नाही. पुढे सुंदरकांडात सीताशोध आहे. तेथे किंवा युद्धकांडातही घरच्या बायकामुलांचे नाव निघणे संभवनीय नाही. फक्त अयोध्येस परत जातेवेळी किष्किंधेस उतरून ताराप्रभृती सुग्रीवाला प्रिय असलेल्या भार्या आणि इतर वानराधिपतींच्या स्त्रिया विमानात घेतल्या आहेत; त्यात मारुतीच्या कबिल्याचे नाव येण्याचे कारण नव्हते. इतर वानराधिपतींच्या स्त्रियांत त्यांचा अंतर्भाव होत आहेच. यावरून पाहता शास्त्रीबुवांचा 'मारुती जर खरोखरीच गृहस्थाश्रमी असता तर तसे वर्णन कोठे तरी अन्यत्र येणे संभवनीय होते या विधानास आधारच नाही. अमुक प्रसंगाने हा उल्लेख यावयास पाहिजे होता असे शास्त्रीबुवांस सांगता येत नाही. म्हणून मारुतीच्या स्त्रियांचा उल्लेख नाही म्हणून तो ब्रह्मचारी असे म्हणणे शुद्ध तर्कटच आहे. सुग्रीवाचे दुसरे नऊ प्रधान होते, त्यांच्याही बायकांचा व मुलांचा उल्लेख नाही, म्हणून तेही ब्रह्मचारी असे शास्त्रीबुवा प्रतिपादणार काय?

पाहते कोण ? मारुती की वाल्मीकी ?

रावणाच्या निजलेल्या स्त्रियांत सुरतक्रीडानिपुण कोण हे त्याने ओळखले म्हणून तो स्त्रीसुखज्ञाता होता असे मी काढलेले अनुमान चुकीचे आहे असे दाखविण्यासाठी शास्त्रीबुवा पुढील चलाखी करतात. 'रावणाच्या अंतःपुरात मारुतीला काय दिसले हे वाल्मीकी सांगत आहे. मी काय पाहिले हे मारुती सांगत नाही, हे प्रथम लक्ष्यात घेतले पाहिजे' कवी आपणास योग्य दिसेल त्याप्रमाणे वर्णन करतो. येथे मारुतीच्या जे दृष्टीस पडले त्याचा अर्थ त्याला कळला की नाही हा मुद्दा आहे.

'रताविरतसंसुप्तं' अशा स्थितीतल्या स्त्रिया त्याने पाहिल्या. त्या तशा आहेत की नाही हे त्याला समजले असल्यास रतिक्रियेत तो अनुभवी असला पाहिजे हे उघड आहे. नूपुरांचा आवाज प्रशांत होऊन

अनुक्रमणिका

मेखला ध्वनी मारुतीच्या कानी आला, यातील रहस्य त्याला कळले की नाही ही महत्त्वाची गोष्ट आहे. मारुतीने काय पाहिले व ऐकले हे वाल्मीकीने सांगितले आहे. या ठिकाणी या गोष्टीचे रहस्य मारुतीला समजले असा ध्वनी स्पष्ट आहे. थोर कवींच्या काव्यात ध्वनीचे महत्त्व फार आहे.

साहित्यशात्रात ध्वनीची योग्यता वर्णिलेली आहे. स्पष्ट तर सांगावयाचे नाही, पण सहृदय वाचकाला तर समजावे अशी महाकवीची कोठे कोठे शैली आढळते. हे जे प्रकार मारुतीच्या पाहण्यात व ऐकण्यात आले यांचे मर्म त्याला कळले नाही असे वाल्मीकी सांगत नाहीत. त्यावरून त्याला सर्व कळले असा ध्वनी त्यांना इष्ट होता हे उघड आहे. भरताने हनुमानाला सोळा कन्या दिल्या त्या त्याने नाकारल्या नाहीत. यावर शास्त्रीबुवांचा तर्क तो वानर होता म्हणून त्याला मानुषी कन्या देणे गैर. पण भरतास तो वानर हे मागाहून कळले म्हणून त्या कन्या देण्याचे व्यर्थ झाले वगैरें प्रतिपादन हास्यास्पद आहे. रामायणात वानरांना कितीही लांब शेपट्या लावल्या तरी त्यांना मानवरूप धारण करता येत होते असे स्पष्ट आहे याचा अर्थ ते मानव होते हाच होतो. म्हणून शास्त्रीबुवांच्या विवरणाची जास्त चर्चा करण्यास नको. कृष्णाने अस्वलाच्या कन्येशी विवाह केल्याचे ज्यांच्या मनास पटते त्यांना वानराने १६ मानुषी कन्या स्वीकारणे अशक्य का वाटावे समजत नाही.

स्वीकारणे अशक्य का वाटावे समजत नाही

वाल्मीकीचे काळी ब्रह्मचर्याला महत्त्व अतिशय होते. मारुतीचे चित्र तो ब्रह्मचर्याचा आदर्श म्हणूनच त्याने रंगविलेले आहे, 'असे शास्त्रीबुवा अगदी निव्वळ खोटे सांगतात. असे चित्र वाल्मीकीने कोठेच रंगविलेले नाही. ब्रह्मचर्याला अतिमहत्त्व होते हे ही विधान खोटे आहे. तसे महत्त्व वाल्मीकीने मुळीच दाखविलेले नाहीं. शास्त्रीबुवांचे खोटे लिहिण्याचे धाष्टर्य अजब आहे.

एकपत्नीव्रताचा विचार

आता रामचंद्राच्या एकपत्नीव्रताविषयी विचार करू.

रामाचा बाप दशरथ व रामाचे भाऊ भरत आणि लक्ष्मण यांना बहुत बायका होत्या असे स्पष्ट कथन रामायणातच असल्याने कुलाचाराप्रमाणे रामही बहुपत्नीक असावा असा सकृद्दर्शनी तर्क होती. या उलट राम हा एकपत्नीक असता तर ती गोष्ट त्या काळी क्वचितच नजरेस येणारी असल्याने त्याचा उल्लेख स्पष्टपणे करणे वाल्मीकीस योग्य वाटले असते व तसा त्याने करणे जरूर होते. बहुपत्नीकत्व वाईट, एकपत्नीव्रत चांगले असा आदर्श बहुजनापुढे ठेवण्याची इच्छा वाल्मीकीस असती तर त्या महाकवीने कोणत्या तरी मिषाने हा उपदेश स्पष्ट मांडला असता. पण तशाप्रकारे एकपत्नीव्रताचे गोडवे कोठेंही आढळत नाहीत. यावरून राम एकपत्नीक होता तसे मानण्यास वास्तविक आधार नाही. पण पुष्कळ लोकांचा तसा समज आहे. रामायणात शोध करताना रामाच्या बहुपत्नीकत्वाबद्दल एक स्पष्ट व काही अस्पष्ट पुरावे मिळाले. त्यांचा उल्लेख मी माझ्या लेखात केलेला आहे.

रामाची सीतेवर जितकी प्रीती होती तिच्या दुप्पट सीतेची रामावर होती. सीतेला राम हा एकच पती असल्याने सीतेची प्रीती रामावर जास्त असणे स्वाभाविक आहे. पण तिच्या निमपटीने रामाचे सीतेवर प्रेम असल्याने रामाच्या प्रीतीत कोणी तरी स्त्रिया वाटणीदार होत्या असा अनुमानास जागा राहते.

अनुक्रमणिका

शास्त्रीबुवा म्हणतात, 'रामाला जर अनेक स्त्रिया असत्या, तर त्यांचा उल्लेख वाल्मीकीनें केलाच असता.' हे विधान मान्य करण्यासारखे नाही. भरत व लक्ष्मण यांच्या एकेक स्त्रीशिवाय बाकीच्यांचा तरी उल्लेख कोठे केला आहे? कथेच्या ओघात ज्यांचे नाव सांगणे जरूर पडते त्यांचेच नाव देण्याची वहिवाट आहे, इतरांची नावे सांगण्यात येत नाहीत. याच कारणाने शास्त्रीबुवांचे असलेच एक विधान असमंजस आहे. ते विचारतात, 'सीतास्वयंवराचे वर्णन जसे आलेले आहे तसे रामाच्या इतर विवाहाचे वर्णन कोठे आलेले नाही. विस्तृत राहिले पण अतिसंक्षिप्त तरी उल्लेख हवा होता. पण तसा उल्लेख कोठेही नाही.'

आडमुठेपणाचा वाद

भरत व लक्ष्मण यांसही अनेक बायका होत्या. पण रामाच्या विवाहाबरोबर झालेल्या त्यांच्या विवाहाचे वर्णन आहे. पण त्यांतल्या अनेक पत्नींच्या विवाहाचा अतिसंक्षिप्तही उल्लेख कोठे नाही, हेही शास्त्रीबुवास कबूल करावे लागेल. मग रामाच्याच इतर विवाहांचा उल्लेख नाही यात आश्चर्य कसले? भरत–लक्ष्मणाच्या इतर विवाहांचा उल्लेख नाही म्हणून शास्त्रीबुवा त्यांस एकपत्नीच ठरविणार काय?

रामाबरोबर जाण्याचा हट्ट सीतेप्रमाणे इतर स्त्रियांनी घेतला असेही उल्लेख नाहीत म्हणून दुसऱ्या बायका नाहीत असे अनुमान शास्त्रीबुवा वाचकवर्गावर लादीत आहेत. पण सीतेची बहीण उर्मिला ही लक्ष्मणाची बायकोही नवऱ्याबरोबर गेली नाही. लक्ष्मणाच्या इतर स्त्रियाही गेल्या नाहीत. मग रामाच्या इतर स्त्रिया गेल्या नसल्या तर त्यात आश्चर्य कसले? सीतेने बरोबर जाण्याचे तसे कारण नव्हते. तिला नेण्याची रामाची इच्छाही नव्हती. ती आपण होऊन हट्टाने गेली. इतर स्त्रिया गेल्या नाहीत म्हणून त्यांच्याविषयी आदर कमी होण्याचे कारण नाही. उर्मिलेविषयीचा आदर कमी झाला असे शास्त्रीबुवा म्हणतील असे वाटत नाही. यापुढे

हृष्टाः खलु भविष्यंति रामस्य परमाः स्त्रियः ।

या श्लोकाचा विचार शास्त्रीबुवांनी केला आहे. या श्लोकातील 'रामस्य परमाः स्त्रियः' या पदावरून रामाला अनेक स्त्रिया होत्या असा संशय भारताचार्य कै. चिंतामण वैद्य यांसही आला होता असे कबूल करितात. पण दिवेकर शास्त्र्यांचे मत त्यांच्या विरुद्धच आहे. शास्त्रबुवांच्या अंगी विनोदबुद्धी नकळत आहे 'न देखे रवि तें देखे कवि. अशी म्हण आहे.पण जे कवीच्या मनातही नाही ते शास्त्रीबुवांस कळते. ते म्हणतात, 'परंतु हा श्लोक मंथरेच्या तोंडचा आहे. तो भविष्यकालाला उद्देशून आहे. वर्तमानकालाला उद्देशून नाही.' शास्त्रीबुवा कमाल केलीत! हा आपला तर्क अगदी नवीन व अजब आहे! तिलक टीकाकारासही हा सुचला नाही. त्यानी परमाः या विशेषणावर कसरत करून परमाः स्त्रियः याचा अर्थ सीतासख्या असा केला. आपणास साधा अर्य विवाहीत स्त्रिया हा मान्य आहे पण आपले म्हणणे हे वर्तमानकालास उद्देशून नाही, भविष्यकालास अनुसरून आहे. शास्त्रीबुवांचा हा शोध अपूर्व आहे.

कमाल केलीत शास्त्रीबुवा!

पण या अजब शोधाविषयीही शास्त्रीबवांना खात्री वाटत नाही म्हणून त्यांचा हनुमानाच्या वाड्यातील आत्या, काक्या, माम्या इत्यादी नात्या–गोत्यातील स्त्रिया हा अर्थ येथेही घ्यावा अशी ते शिफारस करतात. ते म्हणतात, 'परमाः स्त्रिया यांतील परमाः अर्थ श्रेष्ठ, वैभवसंपन्न असाही होऊ शकेल आणि रामपक्षाच्या श्रेष्ठ

अनुक्रमणिका

स्त्रियांना म्हणजे नात्या–गोत्यातील स्त्रियांना आनंद होईल असा अर्थ त्यातून निघतो.' शास्त्रीबुवांना वाटेल तो अर्थ त्यातून काढता येईल. इतके दिवस कवी निरंकुश होते, आता त्यांच्या लिखाणाचा अर्थ आपल्या सोयीसाठी करणारे शास्त्रीबुवांसारखे वाचक निरंकुश होऊ पाहत आहेत!

अरण्यकांड सर्ग ९ यातील ५।६ या श्लोकांतून आपणाला अभिप्रेत असा अर्थ मूळ श्लोकांवर जबरदस्ती करून शास्त्रीबुवा काढू पाहत आहेत.

रामाची पट्टराणी सीता. तो म्हणते की, 'परस्त्रीचा अभिलाष हा धर्मनाशक असल्यामुळे तुला कसा होणार? फार काय पण तुझ्या मनातसुद्धा ही गोष्ट येणे शक्य नाही.' रामाला अनेक उपपत्न्या असल्या तर सीता असे म्हणाली नसती. शास्त्रीबुवांचा हा तर्क खरोखरीच तर्कट आहे. दुसऱ्यांच्या स्त्रियांचा अभिलाष न करणारा एकपत्नीकच असला पाहिजे असे म्हणता येणार नाही. अनेक धर्मपत्न्या व उपपत्न्या असूनही तो सद्वर्तनी असणे शक्य आहे. स्वदारानिरत तू आहेस असे पुढच्याच श्लोकात आहे. या ठिकाणीही दारा म्हणजे एकच असा अर्थ काढता येणार नाही. सीता रामाची पट्टराणी होती हे शास्त्रीबुवांस कबूल आहे; पण सीतेस पट्टराणी म्हटल्याने दुसऱ्या हलक्या दर्जाच्या राण्या आहेत असे सुचविले जाते, ही गोष्ट शास्त्रीबुवा नजरेआड करीत आहेत.

सीतेला रावणाने नेल्यावर तिच्याकरिता रामाने शोक केला. यावर शास्त्रीबुवा म्हणतात, 'रामाला जर अनेक बायका असत्या तर सीतेकरिता इतके ढळढळा रडण्याचे कारण नव्हते.' हाही तर्क अजब आहे. सीता ही विशेष आवडती बायको असून तीच एकटी रामाबरोबर वनातील कष्ट सोसण्यास तयार झाली व अशा रीतीने तिचा एकटीचा सहवास रामाला तेरा वर्षे घडला. यामुळे तिच्याकरिता रडणे व शोक करणे साहजिक आहे. ही गोष्ट शास्त्रीबुवांस कळत नाही असे नाही; पण कोठूनतरी अट्टाहासाने रामाला अनेक बायका नव्हत्या हे त्यांना सिद्ध करावयाचे आहे. शहाजहान बादशहाला अनेक राण्या होत्या; तथापि अर्जमंदबानूवर त्याचे अतिशय प्रेम होते, तिच्या मरणामुळे त्याने फार शोक केला व तिच्याचकरिता ताजमहालसारखी कबर बांधली. या तीव्र शोकाच्या पुराव्यावर शास्त्रीबुवा एकपत्नीव्रताचे सर्टिफिकेट त्याच्या पदरी बांधणार काय?

माझे अंतःपुर शून्य झाले असा शोक करणे व

ममापिभावः सीतायां सर्वथा विनिवेशितः ।

यातील अपि व सर्वथा ही पदे महत्त्वाची आहेत असे सांगणे यावरून एकपत्नीत्व कसे सिद्ध होते कळत नाही. अनेक बायकाचा दादलाही त्यातील विशेष आवडत्या बायकोच्या चिरवियोगाने असाच शोक करील. यावरून आपल्या आवडत्या मताच्या सिद्धीकरिता कोणता तरी कल्पित मुद्दा पुढे करण्याशिवाय शास्त्रीबुवांस दुसरा मार्ग दिसत नाही. यांतील पुढील पुरावाही असाच कवडीमोल आहे. शास्त्रीबुवा म्हणतात, 'रामाच्या मागे जर अनक बायकांचे लटाबर असते तर सीतेच्यापुढे इंद्र व अयोध्या यांची पर्वा नाही, असे उद्‌गार काढले नसते आणि माझेही प्रेम सर्वथैव सीतेवरच आहे असे तो म्हणाला नसता. अनेक स्त्रिया रामाच्या प्रेमाच्या विभाग वाटेकरणी असताना जर तो असे म्हणेल, तर तो एक खोटे बोलणारा मनुष्य आहे असे ठरेल. पण राम खोटे बोलतही नाही तर स्वतःला सीतेशिवाय दुसरी भार्या नाही असेच म्हणत आहे.

अनुक्रमणिका

अनेक भार्यांत प्रेमाची वाटणी

वाहवा शास्त्रीबुवा, कमाल केलीत! राजाला अनेक भार्या असल्यास यांच्यामध्ये प्रेमाची वाटणी करणे शक्य नसते. काही नावडत्या असतात. आवडती एखादीच असते. दशरथाची प्रीती जितकी कैकेयीवर होती तितकी कौसल्येवर नव्हती. बाकीच्या ३४७ ची गोष्टच सांगण्यास नको.

यापुढील शास्त्रीबुवांनी दिलेले कि कांड सर्ग ३०। ४, सु. कांड १५।५२, मारुतीचा विचार यावरून त्यांनी काढलेले अनुमान दोषपूर्ण आहे. रामाने सीतेचा अगदी ध्यास घेतला म्हणून तो एकपत्नी असला पाहिजे हे शास्त्रीबुवांचे ठासून सांगणे हास्यास्पद आहे. यापेक्षा विस्तृत खंडनाची आवश्यकता नाही. उत्तरकांडातील

मनोभिरामा रामास्ता रामो रमयतांवरः ।
रमयामास धर्मात्मा नित्यं परमभूषितः ॥ ४२ ॥ २२

या श्लोकाचा विचार शास्त्रीबुवांस करावा लागला आहे. रमयामास हे क्रियापद असून राम हा कर्ता व मनोभिरामा परमभूषिता रामाः ह्या रमविल्या गेल्या आहेत. रमयामास या क्रियापदाचा प्रयोग पुढे सीतेसंबंधानेही आहे हे खरे असे शास्त्रीबुवा कबूल करतात. पण धातूनांम अनेकार्थत्वात् या वचनाधारे दोन ठिकाणी आलेल्या रमयामास या क्रियापदाचा अर्थ निरनिराळा करावा असे प्रतिपादन करतात. रम् धातूचे अनेक अर्थ आहेत हे खरे आहे; पण या ठिकाणी जो अर्थ करावयाचा तो कालप्रसंग व संगती पाहून लावावयाचा असतो. येथे रामांना रामाने रमविले आहे. त्या रामाही मनहरण करण्यासारख्या रूपवती व नट्टापट्टा केलेल्या अशा आहेत. रामही क्रीडा करणाऱ्यांमध्ये श्रेष्ठ असलेला त्या मनोहर स्त्रियांना रमवू लागला. या प्रसंगी रम् धातूचा अर्थ कोणता योग्य हे व्यवहारज्ञ पुरुषास सहज कळेल. पण आमच्या शास्त्रीबुवांस राम एकपत्नी होता. हे सिद्ध करावयाचे आहे. हा श्लोक तर त्यांच्या मार्गात मोठा अडथळा आला. तेव्हा सुपीक डोक्यातून त्यांनी अजब सबब काढली. 'तो राम त्या सर्व मनोहर स्त्रियांना (म्हणजे नृत्य व गान करणाऱ्या अप्सरांना व किन्नर स्त्रियांना उत्तेजन देऊन 'वाहवा, ठीक आहे, बहोत अच्छा आहे' असे म्हणून) आनंद देऊ लागला.' कंसातील अजब शोध शास्त्रीबुवांचा पेटंट आहे. आम्हीही शास्त्रीबुवांस 'शाब्बास' असे म्हणतो. रम् धातूचे प्रसंगानुसार अनेक अर्थ होतात. शरीरसंभोग करणे हा एकटाच अर्थ नाही. याबद्दल शास्त्रीबुवांनी दोन कॉलमभर आधार दिले आहेत. पण त्यांची आवश्यकता नाही. अनेक अर्थ कोषातच दिले असल्याने त्याबद्दल वाद नाही. वाद वरील 'रामास्ता रमयामास' या श्लोकातील रमयामास या पदाच्या अर्थाबद्दल आहे आणि तो अर्थ प्रसंग, काळ, वेळ, कर्ता, कर्म यांच्या अनुरोधाने लावावयाचा आहे.

जनानखान्यांतले अजब प्रकार

सीतेच्या समक्ष रामाचा विलास चालला होता म्हणून त्यात गैर काही नसावे या मुद्द्यावरही विशेष जोर देण्याचे कारण नाही. राजेलोकांच्या जनानखान्यात काय प्रकार चालतात, याची थोडीदेखील माहिती ज्याला आहे तो या शास्त्रीबुवांच्या मुद्द्याला योग्य ती किंमत देईल.

अनुक्रमणिका

रामाच्या अश्वमेधात सुवर्णमयी पत्नी होती, मानव शरीरधारी यज्ञपत्नी नव्हती. रामाच्या अनेक पत्न्या असत्या तर त्यांतील एक यज्ञपत्नी झाली असती; जानकीची सुवर्णप्रतिमा करण्याची जरूर नव्हती. यावरून राम एकपत्नी होता असा शेवटचा बाण शास्त्रीबुवा सोडीत आहेत.

आमच्या यज्ञकांडात यजमानपत्नीचे फार महत्त्व आहे. तिने काही कृत्य करावयाचे आहे. कोणतेही श्रौतसूत्र पाहिल्यास यजमानपत्नी ही केवळ शोभेची स्त्री नव्हे. विधुराला यज्ञाचा अधिकारच नाही; मग अश्वमेधाचा कोठून असणार? पत्नीविरहित यज्ञ करणारा हा आमचा वेदमान्य असणाऱ्या आर्यसंस्कृतीचाच नव्हे असे निःशंक सांगावे. राम रोज हवन करीत होता असे वचन आहे. याचा अर्थ तो अग्निहोत्र पाळीत होता. पण आमच्या अग्निहोत्रात पत्नीचे महत्त्व मोठे आहे. नवऱ्याच्याबरोबर किंवा त्याच्या गैरहजेरीत ती आहुती देते. रामाच्या आहुतीच्या वेळी सीता हजर नसे. अन्य देवतांच्या पूजेत गुंतलेली असे वर्णिले आहे. राम हवन करून शिल्लक राहिलेले तूप पिऊन टाकी इत्यादी गोष्टीं लक्षात घेतल्यास रामाचे अग्निहोत्र व अश्वमेध यज्ञ हे आमच्या संस्कृतीचे नाहीत. रामाची अग्निउपासना पत्नीनिरपेक्ष होती. म्हणून सुवर्णाची प्रतिमा शोभेकरिता ठेवली असती तरी तेवढ्यावरून एकपत्नीत्व सिद्ध होत नाही. आमच्या श्रौताप्रमाणे जिवंत यज्ञपत्नी अवश्य आहे. रामाच्या संस्कृतीप्रमाणे ती हजर असणेही जरूर नाही. म्हणून या सुवर्णमूर्तीच्या कथेने एकपत्नीकत्व मानण्याची आवश्यकता नाही.

हनुमानाचे स्त्रीसुखपराङ्मुख ब्रह्मचर्य व रामाचे एकपत्नीत्व हे आदर्श वाल्मीकीला दाखवावयाचे नव्हते. तसे दाखविणे हा त्याचा उद्देश असता तर ह्याप्रमाणे स्वतंत्र विधाने त्याने केली असती. तसे विधान कोठेही केलेले नाही. यावरूनच ब्रह्मचर्यपालन व एकपत्नीत्व हे वाल्मीकीचे आदर्श नाहीत हे स्पष्ट आहे.

रामायणात ठिकठिकाणी जे उल्लेख आले आहेत त्यांवरून मारुतीचा पत्नीपरिवार होता व रामही बहुपत्नीक असावा यास बळकटी येते असे मी दाखविलेच आहे. या मी दिलेल्या उदाहरणांची छाननी करून मी करतो तसा त्यांतून अर्थ निघत नाही असे शास्त्रीबुवा म्हणतात. पण शास्त्रीबुवा म्हणतात त्याप्रमाणे ब्रह्मचर्य व एकपत्नीत्वही त्यांतून त्यांस काढून दाखविता येत नाही. असे असताही या दोन मुद्द्यांवर त्याचा अट्टाहास आहे. सुज्ञ वाचक याचा निवाडा करतीलच.

महाराष्ट्र—शारदा : जून, १९३८

अनुक्रमणिका

२४ आणखी काही आक्षेप

यंदाच्या वसंत व्याख्यानमालेत ता. १५ मे रोजी माझे 'वाल्मीकीकृत रामायण' या विषयावर व्याख्यान [सदर व्याख्यानाचा विस्तृत वृत्तांत पुणे येथील दैनिक 'ज्ञानप्रकाश'ने ता. १० व ३० जून आणि ८ व २२ जुलै, १९३७ या अंकातून प्रसिद्ध केला आहे.] झाले. त्यावर जी भाषणे झाली त्यांना तेथेच उत्तरे दिली; परंतु अध्यक्ष रा. रा. करंदीकर यांच्या भाषणावर त्या वेळी मला बोलणे शक्य नव्हते. ते भाषण ता. २१ मे च्या केसरीच्या अंकात प्रसिद्ध झाले आहे. तसेच ता. २५ मे व ता. ४ जूनच्या अंकांतही त्याचसंबंधाने लेख आले आहेत. या सर्वांना यथामती थोडक्यात उत्तर देत आहे.

रामाला सुग्रीवाचे साह्य सीताशुद्धीकरिता पाहिजे होते व पुढील लढाईतही वानरसैन्याची त्यास जरुरी होती. यासाठी रामाने सुग्रीवाचा शोध काढून त्याच्याशी सख्य केले. वालीने रामाचा अपराध केला नसताही रामाने सुग्रीवास राज्य मिळावे म्हणून वालीचा खून केला ही गोष्ट किष्किंधाकांडात स्पष्ट आलेली आहे. सुग्रीवास राज्याचा लोभ होताच. त्यासाठी परक्याची मदत त्याने घेतली हे गैरशिस्त झालेले आहे. सुग्रीवाची बायको वालीने काढून घेतली ही गोष्ट त्या काळच्या आचाराप्रमाणे सर्वमान्य होती. रावणाने वालीबरोबर अग्निसाक्षिक सख्य केल्याची कथा उत्तरकांड सर्ग ३४ यात आहे. त्यात ४२ वा श्लोक

ततः प्रज्वालयित्वाग्नि तौ उभौ हरिराक्षसौ ।
भ्रातृत्वमपसंपन्नौ परिष्वज्य परस्परम् ॥

असा आहे. ४४ व्या श्लोकात रावण सुग्रीवासारखा एक महिना राहिला.

स तत्र मासमुषितः सुग्रीव इव रावणः ।

सुग्रीवासारखा याच्या अर्थाचा विस्तार ४१ व्या श्लोकात आहे. पहा :

'दाराः पुत्राः पुरं राष्ट्रं भोगाच्छादनभोजनम् ।
सर्वमेवाविभक्तं नौ भविष्यति हरीश्वर' ॥ ४१ ॥

अर्थ :— 'हे वानराधिपते, दारा (लग्नाची बायको) पुत्र, नगर, राष्ट्र, भोग्यवस्तू, आच्छादन, भोजन हे सर्व आपले सामाईक असो.' अग्निसाक्षिक सख्य करून जो भाऊ मानला त्याला जर या मित्राच्या बायकोचा उपभोग घेता येई तर सख्या भावाला तो अधिकार असलाच पाहिजे, हे उघड आहे. वाली व सुग्रीव यांचे भांडण राज्याबद्दल होते. बायकोबद्दल नव्हते.

बिभीषणाला राज्यलोभ सुटला व म्हणून तो रामाकडे आला व आपल्या भावाचा त्याने द्रोह केला.

नाशिकजवळ गेल्या दहा वर्षांत दोनदा बर्फ पडले. या आधारावर रा. करंदीकर व मोडक यांनी माझ्या टीकेवर कोरडे ओढले आहेत. माझी टीका बर्फ पडून सर्व प्रदेश पांढरा दिसण्याबद्दल आहे. या बर्फपातास हिमवर्षाव म्हणतात. नाशकास तसे हिम पडले नव्हते. पाण्याचे बर्फ झाले. यास इंग्रजीत frost

अनुक्रमणिका

म्हणतात. किष्किंधाच विंध्याद्रीच्या उत्तरेस होती, तर पंचवटी नाशकाजवळची असणेच शक्य नाही. म्हणून या बर्फाच्या वादात काही हशील नाही.

आता रा. वाटवे यांच्या आक्षेपांचा विचार करू. 'राम आणि सीता पंचवटी मुक्कामी असताना रावणाने सीतेचे हरण केले व तिला बळजबरीने आपल्या राज्यात तो घेऊन गेला. त्या अर्थी ती पवित्र नसावी अशी चव्हाट्यावर बसणाऱ्या मंडळींनी शंका प्रदर्शित केली.' असे वाटवे म्हणतात, ही गोष्ट खरी असती तर राज्याभिषेक होण्याच्या वेळीच अडथळा आला असता. त्याच वेळी सीता भ्रष्ट आहे, तिला अभिषेक करू नका असे लोक म्हणाले असते. पण त्या वेळी हरकत आली नाही. पुढे सीता गर्भार आहे असे कळल्यावरच केवळ चव्हाट्यावरच नव्हे तर सर्व ठिकाणी गवगवा झालेला आहे. बरे, तो गवगवा साधा रावणाच्या घरी राहण्याबद्दलचा नव्हता. वाल्मीकीच्या आश्रमाजवळ सीतेस सोडून देताना लक्ष्मण सीतेला म्हणतो, 'ते लोकापवाद, हे देवी, तुझ्यापुढे मी उच्चारणेही योग्य नाही. यावरून हे लोकापवाद सीतेला लंकेतच काही दिवस गेले असा लोकांचा समज झाला होता, त्यासंबंधी असले पाहिजेत.

'सीतेच्या पावित्र्याबद्दल शंका घेता येईल असे एखादे वाक्य श्री. जाधवरावांनी दाखवावे' असे आव्हान रा. वाटवे देतात. सीता पवित्र आहे असेच मी माझ्या व्याख्यानात सांगितले. अग्निदिव्याच्या वेळी सीता आपल्या शुद्ध मनाची ग्वाही देत आहे. शरीर पवित्र राहिले असे ती म्हणत नाही. उलट ती म्हणते, 'शरीर माझ्या स्वाधीन नसताना मी पराधीन स्त्री काय बरे करणार?' यावरून शरीर भ्रष्ट झाले नाही तसे ती म्हणत नाही हे स्पष्ट आहे. या दिव्याच्या वेळी अग्नीही काय सांगत आहे ते पहा. (युद्धकांड, सर्ग ११८) 'हे रामा, ही तुझी सीता. हिचे ठिकाणी दोषाचा संपर्क नाही (५). वाणीने, मनाने, बुद्धीने व दृष्टीने हिने तुज सद्वृत्ताचे उल्लंघन केले नसून हिचे वर्तन उत्कृष्ट आहे (६). राक्षसीच्या बंदोबस्तात असतानाही हिचे चित्त तुझ्याकडेच होते... शुद्ध अंतःकरणाने युक्त असलेल्या या निष्पाप सीतेचा स्वीकार कर. हिला उद्देशून तू काही एक भाषण करू नकोस, अशी माझी तुला आज्ञा आहे.' (१०). वाणीने, मनाने, बुद्धीने व दृष्टीने हिने सद्वृत्ताचे उल्लंघन केले नाही असे अग्नी सांगतो. पण यात शरीराने ती शुद्ध आहे हे कथन नाही. शरीर पराधीन असल्याने भ्रष्ट झाले असल्यास त्याबद्दलची जबाबदारी सीतेवर नाही असा अग्नीचा आशय व तो योग्यच आहे. योगवासिष्ठातही रामाला या तत्त्वाचा उपदेश केलेला आहे.

मनः कृतं कृतं लोके न शरीरकृतं कृतम् ॥

योगवासिष्ठसारात रंगनाथस्वामी यावर व्याख्यान करताना सांगतांत : 'मनेंचि अतिशये पापपुण्य। परदाराभिलाषी जरी मन। तरी तया नरकी पतन। शरीरगमन न करितांही॥ तेचि मन जरी स्वस्वरूपी लीन। जाल्या घडे अधर्माचरण। तरी ते शरीरकृत न करी पतन। नाही मन म्हणऊनिया॥' (१४०, १४१ मनोलय प्रकरण).

आपले मन पवित्र असून ते हमेशा रामाच्याच ठिकाणी असल्याने आपण निष्पाप अशी सीतेची समजूत. अग्नी व वाल्मीकी या उभयतांस हे तत्त्व मान्य होते व ते तिला अपाप ठरवितात. यामुळेच वाल्मीकी सीतेला 'पतिव्रते' असे संबोधितो. लक्ष्मण सीतेला निर्दोषी म्हणतो.

येथे श्री. करंदीकर व मोडक यांच्या मते 'रावणवध व सीताप्रसूती यांमध्ये १६।१७ महिन्यांचा काल गेला' याचा विचार करू. सुग्रीवादी पाहुणे कोणत्या महिन्यात गेले व ते अयोध्येत किती दिवस राहिले होते

अनुक्रमणिका

हे प्रथम पाहिले पाहिजे. उत्तरकांड, सर्ग ३९ यात २८ वा श्लोक 'रामही वानर, राक्षस आणि ऋक्ष यांसहवर्तमान क्रीडा करू लागला' या अर्थाचा आहे. पुढील श्लोक

'एवं तेषां ययौ मासौ द्वितीयः शिशिरः सुखम् ।
वानराणां प्रहृष्टानां राक्षसाणां च सर्वशः'॥ २९ ॥

कै. भाऊशास्त्री याचे भाषांतर 'याप्रमाणे आनंदित झालेल्या त्या सर्व वानरांचा व राक्षसांचा थंडीचा दुसराही महिना सुखावह गेला' असे करतात. येथे 'दुसराही' या पदाने ते दोन महिने राहिले होते असे शास्त्रीबुवांचे मत आहे. याच सर्गाच्या २७ व्या श्लोकात 'याप्रमाणे तेथे वास्तव्य करीत असताना जरी त्यांचा संपूर्ण महिना लोटून गेला तरी रामभक्तीमुळे त्या सर्वांनाही एका क्षणासारखा भासला' असे आहे. तो महिना शिशिर ऋतूचा दुसरा म्हणजे फाल्गुन होता असे २९ व्या श्लोकात आहे असे माझे म्हणणे आहे. परंतु याप्रमाणे ते अयोध्येत एक महिना राहिले का दोन महिने राहिले या फरकास मोठेसे महत्त्व नाही. वादाकरिता दोन महिने मी कबूल करतो. कसेही असले तरी सुग्रीवादी शिशिर ऋतूच्या अखेरीस म्हणजे फाल्गुनात गेले हे निश्चित आहे. यानंतर पुढल्याच सर्गात त्यांची पाठवणी झाली आहे. पुढल्याच सर्गात त्याच दिवसाच्या अपराहणकाळी पुष्पक विमान आले, त्याला कुबेराकडे पाठविले व नंतर लागलीच राम अशोक वनात प्रवेशला आहे. ४२ व्या सर्गात सीता–राम यांच्या विहाराचे वर्णन आहे. त्या सर्गाच्या २५।२६ श्लोकात शिशिर ऋतू संपल्याचे सांगितले आहे. हा शिशिर ऋतू वानरराक्षसांच्या पाहुणचाराचा का त्यानंतरच्या एक वर्षाच्या अखेरचा? श्री. करंदीकर व मोडक २५ व्या श्लोकातील चिरं या काडीचा आधार घेऊन मध्ये एक सबंध वर्ष गेले असे प्रतिपादितात. 'चिरं' याचा अर्थ लेले शास्त्रीबुवांनी 'पुष्कळ वेळपर्यंत' असा केला आहे. यावरून एक वर्ष आणि एक किंवा दोन महिने असा अर्थ घेतला पाहिजे असे नाही. एक किंवा दोन महिन्यांच्या काळालाही चिरं म्हणता येते. सीतेला हाकून दिल्यावर ती पाच महिन्यांच्या आत प्रसूत झाली आहे यात वाद नाही. पण राज्याभिषेकानंतर १।२ महिन्यांतच तिला रानात पाठविली का आणखी १२ महिन्यांनी पाठविली यांत मतभेद आहे. सीता जवळजवळ बारा महिने लंकेत होती ही गोष्ट सर्वांस माहीत होती. लंकावास हेच दूषण प्रबळ मानले गेले असते तर तिला अभिषेक करतेवेळीच हरकत यावयास पाहिजे होती. पण तशी आली नाही. पुढे दोन महिने सुग्रीवादिक होते त्या सुमारास ही तक्रार आली नाही. पण पुढे एक वर्षाने सीता गरोदर आहे असे कळल्यावर लोकक्षोभ व्हावा हे आश्चर्य आहे. गर्भ राहिला नसता तर लोकात गवगवा झाला नसता असे श्री. करंदीकर व मोडक याचे मत दिसते. पण गर्भ निर्विवाद रामाचा आहे असे दिसत असताही लोकांनी गवगवा करणे संभवत नाही. गर्भ लंकेहून निघण्यापूर्वीचा आहे असे मानण्यास जागा असेल तरच लोकापवाद पसरेल. केवळ लंकेत सीता राहिली एवढाच अपवाद असता तर त्याचा उच्चारर सीतेपुढ करण्यास लक्ष्मणास संकोच वाटण्याचे कारण नव्हते. पण तो म्हणतो, 'तुझ्यापुढे मी उच्चारणेही योग्य नाही.'

'खरोखरच सीता ६॥ महिन्यांच्या आत बाळंत झाली असती तर लोकांत नुसती कुजबूज न होता उघड जाहिराती लागल्या असत्या व सीतेलाही तोंड दाखविण्यास जागा राहिली असती' असे करंदीकर म्हणतात. चव्हाटे, बाजार, रस्ते, वने आणि उपवने यांमध्ये लोक या विषयाची चर्चा करीत होते असे भद्र सांगतो. ही कुजबूज म्हणता येत नसून उघड जाहिराती लागल्यासारखीच स्थिती होती. सीतेला तोंड दाखविण्यास जागा नव्हती हेच तिच्या पुढील वर्तनावरून दिसत आहे. जाताना ती कोणाही सासूचा निरोप घेत नाही; म्हणजे सासूला तोंड दाखविणे तिला योग्य वाटले नाही. तिच्याबरोबर एकही दासी दिली

अनुक्रमणिका

नव्हती. यावरूनही कोणत्या स्थितीत तिचा त्याग केला हे उघड होत याहे. लंकेतून निघाल्यापासून १७ महिन्यांचा काळ गेला असता तर सीतेच्याविरुद्ध ब्रही काढण्यास कोणासच जागा राहती ना.

याच मुद्द्यावर श्री. मोडक यांनी ता. ४ जूनच्या अंकात १।२ जास्त पुरावे मांडले आहेत. त्यांचा विचार करू. वेळेवर पाऊस पडतो या ७ व्या मुद्द्यावर ते म्हणतात, 'राज्याभिषेक व हे भरताचे भाषण यांत कमीतकमी एक पावसाळा खास गेला होता.' पुढे ९ व्या मागे मोजणे या शीर्षकाखाली म्हणतात, 'सीतात्यागापूर्वी रामाचा एक तरी पावसाळा अयोध्येत गेला होता.' याला आधार काय तर ६ व्या मुद्द्याच्या विवरणात उत्तरकांडातील ४१ व्या सर्गातील १७।२१ श्लोक उद्धृत केले आहेत. या तीन श्लोकांत भरत रामास सांगतो, 'पर्जन्य वेळच्यावेळी पडतो व त्याने पिके उत्तम वाढतात.' यावरून एक तरी पावसाळा गेला असला पाहिजे असा श्री. मोडकांचा निश्चय झाला आहे. श्रीयुत मोडकांनी उद्धृत केलेला पहिला श्लोकार्ध

अनामयो मनुष्याणां 'त्वयि वीर प्रशासति' ।

असा आहे. भाऊशास्त्री लेले यांनी प्रकाशिलेल्या महाराष्ट्र तात्पर्यसहित प्रतीत हा श्लोकार्ध

अनामयश्च मर्त्यानां 'साग्रो मासो गतोह्ययम्' ।

असा दिला आहे. श्री. मोडकांच्या पाठातील 'त्वयि वीर प्रशासति' हा पाद त्या श्लोकाच्या पूर्वीच्या श्लोकाच्या पूर्वार्धातच असल्याने पुन्हा तो चरण येणे योग्य दिसत नाही. 'हा पूर्ण महिना लोटून गेला तरी' असा पाद तेथे असल्याने राज्याभिषेकानंतर एक महिन्यानेच भरताचा रपोट रामाकडे रुजू झाला असे होत आहे. यावरून श्री. मोडकांच्या सबंध वर्षास अवसर नाही. सतरा महिन्यांतून बारा बाद करून पाचच महिने राहात आहेत. फार तर अकरा बाद होऊन सहा महिने राहतील. 'एकतरी पावसाळा लोटल्याखेरीज काले वर्षति पर्जन्यः हे म्हणणे मूर्खालाच शोभेल' असे श्री. मोडक म्हणतात; पण त्या भाषणातच 'साग्रो मासो गतोह्ययम्' असे स्पष्ट कथन असल्याने श्री. मोडकांच्या तर्कास जागा राहत नाही. राजाची तारीफ करताना दरबारी लोक तर्कशास्त्राची फारशी पर्वा करीत नाहीत हा अनुभव कोणत्याही दरबारात मिळण्यासारखा आहे.

वाल्मीकीच्या आश्रमाजवळ सीतेला सोडली त्या वेळी ती लक्ष्मणाला म्हणते,

निरिक्ष्यमाद्य गच्छत्वं ऋतुकालातिवर्तिनीम् ।

व यावर मोडक यांनी विवरण केले आहे. पण सर्ग ४२।३० यात

अपत्यलाभो वैदेहि त्वय्ययं समुपस्थितः ।

असे रामच सांगत आहे व नंतर त्याने तिचे डोहाळे विचारून ते पुरविण्याचे वचन दिले आहे. तेव्हा सीतेला काही दिवस गेले आहेत ही गोष्ट लक्ष्मणास नवीनच कळावयाची राहिली होती असे नाही. सीता या प्रसंगी लक्ष्मणाला जे जे बोलली त्यातील काही वाक्ये महत्त्वाची व विचारणीय आहेत.

अनुक्रमणिका

याहं शुद्धसमाचारा त्यक्ता नृपतिना सती ॥ ४८। ४ ॥
जानासि च यथा शुद्धा सीता तत्त्वेन राघव ।
भक्त्याच परयायुक्ता हिताच तव नित्यशः ॥ १२ ॥

आपण आचरणाने शुद्ध आहे, पतिभक्त आहे असे सीता म्हणत आहे व ते सर्वथैव खरे आहे. ती मनाने शुद्ध आहे. शरीराने नसल्यास तो तिचा अपराध नव्हे.

कौसल्या ही दशरथाची बहीण नसून ती दोघे एका कुळातीलही नव्हती असे श्री. मोडक म्हणतात. राजकन्येशिवाय इतर मुलीस देशाच्या नावाने ओळखीत नाहीत हे श्री. मोडकांनी ध्यानात ठेवावे. सगोत्र विवाहाची बंदी अलीकडची आहे. पूर्वी ब्राह्मणक्षत्रियादींमध्ये सख्या बहिणीपासून संतती होत असे असा आचारधर्म होता व बुद्धधर्मी प्रदेशात तो अगदी अलीकडेच बंद झाला आहे. पूर्वीची उदाहरणे आहेत. त्यांतील कृप व कृपीचे एक उदाहरण मासल्याकरिता श्री. मोडकांपुढे ठेवतो.

अनुक्रमणिका

भास्करराव विठोजीराव जाधव

जीवनपट

१८६७	ता. १७ जून, सोमवार रोजी नागाव येते जन्म
१८८८	मॅट्रिक परीक्षा पहिल्या नंबरने उत्तीर्ण
१८९२	बी. ए. पहिला वर्ग
१८९३–९४	एल्फिन्स्टनचे फेलो
१८९४	एम. ए. पहिला वर्ग
१८९५	कोल्हापुरास असिस्टंट सरसुभे म्हणून नेमणूक
१८९७	एलएल. बी.
१९०१	'मराठा दीनबंधु' पत्र सुरू
१९०४–१८	कोल्हापूर नगरपालिकेचे सर्वाधिकारी
१९०७	धारवाड येथील मराठा शिक्षण परिषदेचे स्वागताध्यक्ष व प्रणेते
१९११	पुणे येथे भरलेल्या मराठा विद्यार्थी संघाच्या पहिल्या संमेलनाचे अध्यक्ष
१९११–१२	सत्यशोधक समाजाची स्थापना
१९१३	अर्बन बँकेची स्थापना
१११७	कोल्हापूर नगर वाचन मंदिराचे अध्यक्ष
१९१९	पार्लमेंटरी कमिशनपुढे साक्ष
१९२१	कोल्हापूर दरबारातून सेवानिवृत्ती. मुंबई कायदे कौन्सिलात सरकारतर्फे नियुक्ती व ब्राह्मणेतर पक्षाची स्थापना
१९२३	मुंबई इलाख्याचे शिक्षणमंत्री
१९२६	विधिमंडळाचे लोकनियुक्त सभासद
१९२८–३०	मुंबई इलाख्याचे शेतकी, अबकारी या खात्याचे मंत्री
१९३०–३१	गोलमेज परिषदेस आमंत्रण. दोन परिषदांना हजर
१९३१–३४	मध्यवर्ती विधिमंडळात निवड
१९३५	मुंबई साहित्यसंमेलनाचे स्वागताध्यक्ष
११४५–४६	कोल्हापुरास मंत्रिपदावर नेमणूक
१९५०	कोल्हापुरास भरलेल्या सत्यशोधक समाज परिषदेचे प्रवर्तक
१९५०	ता. २६ जून, सोमवार रोजी कोल्हापूर येथे मृत्यू

अनुक्रमणिका

२५ जीवनवृत्त

सत्यशोधक समाजाची प्रतिष्ठा वाढविण्याच्या कामी, मराठा समाजाची संघटना करून त्यांच्यात जागृती निर्माण करण्यासाठी आणि समाजात जे सामाजिक अन्याय रूढ झाले होते ते नष्ट करण्याकरिता महाराष्ट्रात ज्यांचे श्रम कारणीभूत झाले त्यांत थी. भास्कररराव जाधव यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. प्रतिकूल परिस्थितीतून त्यांनी शिक्षण संपादन केले व सर्व परीक्षा सन्मानपूर्वक उत्तीर्ण झाले. मुंबई इलाख्याचे पहिले मराठा मंत्री होण्याचा मान त्यांनी मिळविला. सहकारी चळवळीसारख्या उपयुक्त चळवळीचे ते प्रणेते आहेत. बहुजनसमाजावर गतानुगतिकतेमुळे जे संस्कार झाले व ज्यामुळे त्याची प्रगती खुंटली ते आपल्या बुद्धिवादी विचारसरणीने नाहीसे करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. किंबहुना त्यांनी जे जे केले ते ते बहुजनसमाजाची उन्नती व्हावी, त्याचे योग्य स्थान त्यास प्राप्त व्हावे या तळमळीने केले. त्यांचे साहित्य, राजकारण, औद्योगिक चळवळी, कोणतीही बाब घेतली तरी त्यात त्यांचा हा हेतू अगदी स्पष्टपणे प्रतिबिंबित झालेला दिसतो. एकप्रकारे भास्कररराव जाधवांचे चरित्र म्हणजे गेल्या चार तपांतील बहुजनसमाजाच्या विकासाचा इतिहास होय असे म्हटले तर फारशी अतिशयोक्ती होणार नाही.

महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांमधील कार्यकर्त्या व्यक्तींना आत्मचरित्र लिहिण्याचे अगत्य अजूनही वाटत नाही. त्यामुळे इतरांनी आपल्या दृष्टिकोनातून लिहिलेली त्यांची चरित्रे वाचकांना वाचावी लागतात. एक थोर सत्यशोधक, मराठा समाजातील निरलस कार्यकर्ते व समाजातील अन्यायामुळे ज्यांचे लिखाण उत्स्फूर्त झाले असे एक व्यासंगी लेखक या नात्यांनी श्री. भास्कररराव जाधव यांचा लौकिक आहे. राजकारण, समाजकारण, शिक्षण, साहित्य, उद्योगधंदे इत्यादी क्षेत्रांतील त्यांची कामगिरी मार्गदर्शक नि लक्षात राहावी अशी आहे. अशांचे आत्मचरित्र म्हणजे त्या कालचा एक चालताबोलता इतिहासच असतो. श्री. भास्कररराव जाधव यानाही शेवटी शेवटी स्वतः संबंधी लिहून ठेवण्याची ओढ लागली असावी असे दिसते. त्यानी आपल्या बालपणीच्या हकीगती लिहिल्या आहेत त्या तशाच पुढे देण्यात आल्या आहेत.

थोडा पूर्व इतिहास

'कोल्हापूर येथे आपल्या मालकीचे घर असावे म्हणून शाहूपुरीत जागा मिळवून तीवर १९०१ साली घर बांधले. कामावर देखरेख आमचे वडील तीर्थरूप विठोजीराव यांची होती. घरास 'जदुबन' असे नाव ठेवून ते घराच्या पुढील अंगास मराठीत व इंग्रजीत खोदवून त्याखाली अनुक्रमे शक व सन ही खोदविण्यात आली. आमच्या तीर्थरूपांकडून समजलेली घराण्याची माहिती पुढील पिढीकरिता येथे लिहीत आहे.

आमचे आजे नागोजीराव. त्यांचे वडील चंद्ररराव. त्यांचे जनक शिवाजीराव. शिवाजीराव व चंद्रोजीराव यांच्याबद्दल हकीगत समजली नाही. नागोजीराव यांनी फलटणीत नोकरी केली. गळ्यात अडकविण्याचा रेशमी बाण आमच्या घरात होता. ठासून भरण्याच्या बंदुकीच्या उपयोगी नियमितच दारू एक बारापुरती देणारी बाटलीही असे. ते प्रथमतः महाड तालुक्यातील बिरवाडी गावी येऊन राहिले. तेथे त्यांनी भोसले घराण्यातील गहिना नावाच्या मुलीशी लग्न केले. तिचे नाव उमाबाई असे ठेवले होते. तेथे त्यांनी काही जमीनही खरेदी केली. त्यांना दोन पुत्र व दोन कन्या अशी अपत्ये होती. ज्येष्ठ कन्या लहानपणीच वारली. विठोजीराव हे ज्येष्ठ पुत्र. त्याचे लग्न १०।११ वर्षांच्या वयास केले होते; पण ती मुलगी थोड्याच काळात मरण पावली. दुसरा विवाह विसाव्या वर्षी झाला.

अनुक्रमणिका

नागोजीराव यांस सही करण्यापुरते लिहिता येत असे. पण आपल्या मुलास विद्या मिळाली पाहिजे याविषयी त्यांना आस्था होती. म्हणून त्यांनी बिरवाडी सोडली व महाडास येऊन राहिले. तेथे त्यांनी नव्या पेठेत जागा घेऊन घर बांधले व चांभारखिंडी आणि महाड कसब्याच्या काकरतळें भागात शेतजमीन घेतली. नागोजीराव हे उंचेपुरे, अंगाने जाडजूड व वर्णाने गोरे असे होते. त्यांचा आवाज भरदार असून बोलणे गोड असे. यामुळे महाडास राहण्यास आल्यावर थोड्याच दिवसांत त्यांची छाप पडून ते बरेच लोकप्रिय झाले व गावातल्या प्रतिष्ठितांत त्यांची गणना होऊ लागली ते हरहुन्नरी होते. शिलाईचे काम त्यांना उत्तम प्रकारचे येत असे. पटवेगिरीचे व रफूचे कामही त्यांना चांगले येई. मोत्यांची परीक्षाही चांगली असे. मोती विकण्याकरिता ते पुष्कळ फिरत.

'महाडास वीरेश्वराचे देवस्थान प्रसिद्ध आहे. सरकारातून त्या देवस्थानास बरीच मोठी रक्कम दरसाल मिळते. देवस्थान चिरेबंदी बांधीव असून बरेच मोठे आहे. देवळाच्या आतील व बाहेरील भिंती टाकीने चांगल्या घडविल्या आहेत. देवळाच्या गाभाऱ्याशिवाय बाहेर बसण्याची एक मोठी जागा आहे. इतके दगडी बांधकाम झाल्यावर देवळापुढे विस्तीर्ण असा मंडप आहे. त्याची लांबीरुंदी ६० x ४० पेक्षा कमी नाही. सभामंडपाच्या शेवटी उंच चौथऱ्यावर मोठ्या बैलाच्या आकाराचा असा नंदी आहे. सभामंडपास माडी असून तेथे बायकांना बसण्याची सोय आहे. महाशिवरात्रीपासून उत्सवास सुरुवात होते. उत्सव बरेच दिवस चालतो. उत्सवात निरनिराळ्या ठिकाणच्या हरिदासांची कीर्तने, पुराणिकांची पुराणे व अनेक नायकिणींची नाचगाणी होत. जत्राही मोठी भरते. त्या दिवसात कपड्याची व भांड्यांची मोठमोठी दुकाने लागत असत. त्यांतील बरीचशी दुकाने मोठमोठ्या पेठांतून येत आणि या व अनेक जिनसांचा व्यापार लाखो रुपयांचा चाले. पण तालुक्यातील आपटे या गावी आलेला पनवेलचा शिंग्या आपण येत्या महाडाच्या जत्रेत नवीन शिंग खरेदी करू असे मजजवळ बोलल्याचे आठवते. पनवेल हे गाव मुंबईपासून सुमारे ४० मैलांवर आहे व महाडपासून सुमारे ७५ मैलांवर आहे. यावरून त्या काळी महाडच्या जत्रेचे व तेथील उत्सवाचे महत्त्व लक्षात येईल.'

'या उत्सवात हरदास व गुणीजन यांची हजेरी लावणे, त्याची गाणी व कीर्तने करविणे, त्यांचा देवस्थानाकडून योग्य सन्मान करविणे. अशा समारंभास हजर राहणाऱ्या थोर व प्रतिष्ठित मंडळींस त्यांच्या दर्जाप्रमाणे योग्य जागी बसविणे, समारंभात गडबड न होईल अशी व्यवस्था करणे हे काम किती महत्त्वाचे आहे हे सांगण्यास नकोच. असे महत्त्वाचे काम उपरी असताही नागोजीरावाना मिळाले होते व हे काम त्यांचेकडे आमरण राहिले. त्यांच्या पश्चात् आमचे वडील विठोजीराव यांनी बरीच वर्षे चालविले. नोकरीनिमित्ताने दुसऱ्या गावी गेल्यावर ते काम करण्यास दुसऱ्या माणसाची नेमणूक झाली. हे काम केवळ उत्सवातच करावे लागे असे नाही. देवळात कीर्तने व इतर सभा केव्हाही झाल्या तरी त्यांची व्यवस्था नागोजीरावच करीत. त्या काळी नाटके, लळिते वगैरे देवळाच्या सभामंडपात होत. त्या काळी बायका बसण्याच्या भागात गडबड झाल्यास, मुले रडल्यास नागोजीरावांची 'गप्प' म्हणून आरोळी ऐकल्याबरोबर शांतता होई व बायकांची भांडणे थांबत असे आमच्या आईकडून मी अनेक वेळा ऐकले आहे.'

'महाडची व्यापारी पेठ त्या काळी फार मोठी होती देशावरील भुसारमाल व कापड याचा व्यापार मोठ्या प्रमाणावर चालत असे. सुगीच्या दिवसात मालाने लादलेले दोनदोन तीनतीन हजार बैल रोज येत. असा क्रम सहासात महिने चालत असे. महाड ही एक मोठी उतारपेठ होती. हा माल महाड बंदरातून मुंबई व इतर प्रांतात जात असे. फिट्जिराल्ड घाट बांधल्यावर गाड्यांची वाहतूक सुरू झाली व बैलांचे तांडे कमी होत चालले. तरी माझ्या लहानपणी पाचपाचशे बैलांवरून माल येई हे मी पाहिले आहे. गाड्या सुरू

अनुक्रमणिका

झाल्यावर काही वर्षांनी बैलाची वाहतूक अगदी बंद पडली व तळावर हजार हजार गाड्या आलेल्या दिसत असत.'

'मराठी राज्याच्या ऐन अमदानीत महाड हे बंदर सातारा व पुणे या दोन राजधान्यांनासारखेच महत्त्वाचे होते. यामुळे तेथील व्यापार मराठी राजवटीपासूनच भरभराटीचा होता. पुष्कळ मारवाडी व गुजराथी व्यापारी कायम वस्ती करून महाडात मराठेशाहीपासून राहिले आहेत आणि हे कापडाचा व्यापार मोठ्या प्रमाणावर करीत. नागपूरच्या पेठेतीलही माल आणला जाई आणि तो बहुधा उंटावरून येत असे. असे दहादहा, वीसवीस उंट लादून एकएका व्यापाराचा माल येई. माझ्या लहानपणीदेखील असे उंट मी पाहिले आहेत. बहुतेक सर्व पेठांचा माल महाडचे व्यापारी आणीत असत व महाड येथे हा व्यापार फार मोठ्या प्रमाणावर चाले.'

'मारवाडी व गुजर व्यापारी कापड खरेदी करण्याकरिता दूरदूरच्या पेठांत स्वतः जात किंवा विश्वासू गुमास्ते पाठवीत. शुभ मुहूर्तावर निघण्याचे महत्त्व त्या वेळी फार असल्यामुळे ज्योतिष्याकडून ती वेळ काढून त्या वेळी निघणे प्रवासाच्या दृष्टीने शक्य नसल्यास त्या शुभ वेळी प्रस्थान काढून कोणत्या तरी दुसऱ्याच्या घरी ठेवण्याची वहिवाट असे. प्रस्थान काढून ठेवण्यात आमचे घर विशेष पसंत असे. बाहेर देशी जाणाऱ्या गाड्या रात्री आठ वाजल्यावर निघत असत. प्रवासास निघणारा माणूस त्या वेळी घराबाहेर पडून आमच्या घरी येऊन ठेवलेले प्रस्थानाचे वस्त्र घेऊन जात असे व त्या वेळी एक नारळ प्रस्थान देणाऱ्या बाईच्या हातात ठेवीत असे. ही वहिवाट आमची आई तेथे होती तोपर्यंत चालू राहिली.'

'महाडास आल्यावर नागोजीरावांनी मुलास तेथील सरकारी शाळेत घातले. विठोजीराव व त्यांचा धाकटा भाऊ गणपतराव आणि त्यांची बहीण गंगाबाई इतकी मुले त्यांना होती. ही तीन्ही मुले शाळेत जात असत. विठोजीराव व गणपतराव यांची बुद्धी कुशाग्र असल्यामुळे त्यांची अभ्यासात चांगलीच प्रगती झाली व ती हुषार मुले आहेत असे सर्व म्हणू लागले. त्या वेळी शाळा तपासणीदार अधिकारी युरोपिअन असत व त्यांच्या नजरेस एकदा हुषार विद्यार्थी पडल्यास ते त्याचा पुढील अभ्यास व्हावा म्हणून द्रव्यद्वारा मदत करीत. यामुळे आपली हुषारी दिसावी अशी पुष्कळांची इच्छा असे.'

'विठोजीराव शाळेत असताना इन्स्पेक्टर येण्याचा दिवस आला. ह्या मुलाची हुषारी साहेबाच्या नजरेस आल्यास तो त्याच्या पुढील इंग्रजी शिक्षणाची तजवीज करील व हा कुणबटाचा पोरगा पुढे मामलेदार, मुन्सफही होईल; त्याच्यापुढे ब्राह्मण कारकुनास वाकून रामराम करावा लागेल अशी भीती पडल्यामुळे ही आपत्ती टाळण्याकरिता शिक्षकवर्गाने विचार करून विठोजीरावास फर्माविले की, तू उद्या शाळेत येऊ नकोस. या कारणाने विठोजीरावास शाळेत येता आले नाही व त्यामुळे त्यांची हुषारी इन्स्पेक्टरच्या नजरेस आली नाही. पुढे मास्तरानी काहीतरी दोष लावून विठोजीरावांस शाळेतून काढून टाकले. यानंतर महाडापासून ३।४ मैलावरील 'नाते' या गावच्या शाळेत ते जाऊ लागले. इतके दूर जाऊन परत येण्याचे श्रम त्याना पुढे झेपेनात व तेथील शिक्षणही कनिष्ठ दर्जाचे होते. त्यामुळे त्यांनी शाळा सोडली. याप्रमाणे शिक्षणाची सोय नाहीशी झाल्याकारणाने १५ वर्षाच्या वयास विठोजीरावानी घर सोडले व ते बेळगावकडे पायीच निघाले. अनंत कष्ट करून आपले पोट भरून त्यानी काही शिक्षण मिळविले. मग बांधकामाची माहिती करून घेतली. पूल, घर वगैरेचे प्लान काढणे व बांधकाम करून घेणे ते जाणत व करीत.'

अनुक्रमणिका

'विठोजीरावांना विसावे वर्षे लागल्यावर त्यांच्याकरिता वधूशोधन सुरू झाले मोती विकण्याकरिता नागोजीराव जवळच्या प्रांतातून फिरत. त्यांना नागाव, तालुके अलिबाग येथील गोविंदराव चव्हाणांची मुलगी पसंत पडली. सन १८५९–६० सुमाराची ही गोष्ट आहे त्या वेळी नागोजीरावानी चव्हाणास आपला निश्चय सांगितला. ते म्हणाले, 'मुलाचे पहिले लग्न मी त्याच्या दहावे वर्षी ज्योतिष्यांचे मत घेऊन, सगळे गुण जमवून त्यांच्या मताने योग्य अशा वधूशी केले. पण ती मुलगी एक वर्षाचे आतच वारली. माझा आता ज्योतिषशास्त्रावर विश्वास राहिलेला नाही; म्हणून मुलीची पत्रिका मी पहाणार नाही व माझ्या मुलाचीही दाखविणार नाही. आपला हा प्रीतिसंबंध जुळवावा अशी माझी इच्छा आहे. गोविंदरावानीही ती गोष्ट कबूल केली आणि हा विवाह उभयपक्षी श्रेयस्कर झाला. ह्या वेळेपासूनच लग्नकार्य जुळविणेच्या प्रसंगी गेल्या ९० वर्षांत आमच्या घराण्यात ज्योतिष्याचा सल्ला घेण्यात आलेला नाही. प्रवासास जातेवेळीही शुभ मुहूर्त पाहाण्याचे खूळ आमचे घरात नाही.'

माझा जन्म व शिक्षण

'आमच्या वडिलांचे लग्न नागाव येथे झाले. लग्नानंतर पाच वर्षांनी आमची थोरली बहीण साळूबाई ही जन्मली. तिच्या पाठीवर तीन वर्षांनी सन १८६७ साली जून महिन्याच्या १७ तारखेस सोमवारी ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमा शके १७८९ ह्या दिवशी माझा जन्म झाला. हे दोन्ही जन्म नागाव येथेच झाले. आम्ही दोघेही नातवंडे नागोजीरावाची मोठी आवडती होतो. मी तीन वर्षांचा असतानाच त्यांचा नवज्वराने अंत झाला. त्यापूर्वी दररोज संध्याकाळी ते आम्हाला काहीतरी खाऊ देत याची मला आठवण आहे.'

'सन १८६६ सालाच्या सुमारास आमचे चुलते गणपतराव यांचा क्षयाने अंत झाला. त्याचे वडील बंधूवर (विठोजीरावांवर) फार प्रेम होते व तसेच आमच्या आईवरही होते. आमचे वडील विठोजीराव त्या वेळी येऊ शकले नाहीत. मरणापूर्वी बरेच वेळा 'मी दादांच्या पोटी येईन' असे म्हणत असत. ही गोष्ट पुष्कळांना माहीत होती व मरणानंतर स्नान घालताना ठकूबाई बागडे या म्हाताऱ्या बाईने 'तू पुन्हा पोटी येणार असे म्हणतोस तर मी आता खूण करत्ये ती घेऊन ये,' असे म्हणून पाणी तापविण्याच्या भांड्याच्या तळाची मशी आपल्या बोटावर घेऊन प्रेताच्या डाव्या कानशिलावर खूण केली. पुढे एकदोन वर्षांनी माझा जन्म झाला आणि खूण केल्या जागी काळा डाग माझ्या डाव्या कानशिलावर आईला दिसून झाला याचे सर्वाना फार आश्चर्य वाटले. मी मोठा झाल्यावर त्या डागाबद्दल वारंवार बोलणे निघे व ठकू बागडेनेही खूण केल्याचे माझ्यासमक्ष अनेक वेळा सांगितले आहे. अशा प्रकारच्या डागाला 'लासे' म्हणतात. हे लासे जन्मापासूनचे असते'

'मी पाच वर्षांचा झाल्यावर मला शाळेत घातले. शाळा खासगी होती. ती पिंगळे या नावाच्या गृहस्थाने आमच्या शेजारच्या मारुतीच्या देवळात काढली होती. पाटीपूजन वगैरे होऊन वडील मला शाळेत ठेवून घरी गेले. थोड्याच वेळाने पंतोजीने छडीचा प्रयोग मजवर केला. त्याबरोबर मी रडत रडत घरी आलो व त्या शाळेत जाणार नाही असे आईवडिलांस बजाविले.'

'बाबाजी लिंबाजी शिर्के हे आमच्या वडिलांचे दोस्त. त्यांचे वडील पेन्शनर सुभेदार मेजर होते. बाबाजीराव हे हुन्नरी, बोलण्याचालण्यात हुशार होते व त्यांचा मजवर लोभ होता. त्यांनी मला विचारले. 'मी शाळा काढतो; तू माझ्या शाळेत येशील का?' मी त्याना सांगितले, 'तुम्ही मला केव्हाही मारणार नाही आणि माझा धडा झाल्याबरोबर मला बाहेर जाऊ देईन असे कबूल कराल तर मी तुमच्या शाळत येईन.'

अनुक्रमणिका

‘याप्रमाणे कबुली मिळाल्यावर मी त्यांच्या शाळेत जाऊ लागलो. त्यानी मला ममतेने शिकविले. मुळाक्षरे, बाराखड्या व इतर उजळणीही यांचे धडे रोज सकाळी एक व संध्याकाळी एक असे तयार करी. संध्याकाळी परवचा म्हटला जाई. याप्रमाणे सहा महिन्यांत सारी उजळणी, ओटकी, एकोत्री व रेघांचे गणित हेसुद्धा तयार झाले. पुढे बाबाजीराव आजारी पडले व शाळा बंद झाली. मग मी सरकारी शाळेत दुसऱ्या इयत्तेत दाखल झालो.

‘तेथे पंढरीनाथ सुदामे ब्राह्मण गृहस्थ हेडमास्तर होते. ते सुधारक मताचे होते. त्या काळी ‘सुधारक’ ही एक शिवी होती. ते फार उदार मताचे असून माझ्यावर त्यांचे प्रेम होते. ते आमच्या वडिलांचे मोठे स्नेही होते. सरकारी शाळेत माझा अभ्यास इयत्तेप्रमाणे चालत असे. पंढरीनाथांना महार वगैरे अस्पृश्यांनी शिकावे असे फार वाटे. म्हणून त्यानी त्यांची मने वळवन काही मुले शाळेत आणली. गावामध्ये याबद्दल मोठा गवगवा झाला व इतर मुले शाळेत येईनात. वडिलाच्या सांगण्यावरून मी मात्र शाळेत जात असे. इतर काही थोडी मुले येत. थोड्याच दिवसात डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर आले व त्यानी महारमांगांच्या मुलांकरिता निराळी शाळा देववून, शाळा पूर्वीप्रमाणेच चालावी अशी योजना केली. पंढरीनाथ सुदामे यांच्या भावाचे दोन मुलगे त्यांच्याकडे शिकण्यासाठी होते. त्यांतील धाकटा सीताराम सखाराम सुदामे ह्याची व माझी चांगलीच गट्टी जमली. आम्ही बरोबरच शिकत होतो. श्री. पंढरीनाथ सुदामे याची मते इतकी उदार व प्रगत होती की, त्यानी आपल्या एका बालविधवा सुनेस शिक्षण देऊन स्वावलंबी केले होते.’

‘या सुमारास फिट्‌जिराल्ड घाट तयार झाला व महाडहून महाबळेश्वरास गाडीतून येण्याजाण्यास सुरुवात झाली.’

‘नेक नामदार फिट्‌जिराल्ड गव्हर्नरसाहेब हे महाडहून दरसाल महाबळेश्वरी जाऊ लागले. दासगावला लांचने उतरता येत असे. तेथून महाबळेश्वर फक्त ४१ मैल; म्हणून काही दिवस हा रस्ता महाबळेश्वराकरिता जवळचा होता.’

‘आमच्या आईबरोबर नागावास गेल्या वेळी ३–४ महिने मी तेथील शाळेत जात असे. बाणकोटचा धक्का बाधण्याच्या कामावर आमच्या वडिलांची नेमणूक झाल्याकारणाने मी थोडे दिवस तेथील शाळेत गेलो. पुढे ते काम पुरे होऊन त्यांची नेमणूक हरणईस झाल्यावर तिकडे मी गेलो. व तेथील शाळेत काही महिने मी चौथीत होतो. तेथून राजापूरला नळाचे पाणी आणण्याच्या कामावर वडिलांची नेमणूक झाली, तिकडे त्यांचेबरोबर जावे लागले. धरणाचे काम चालू होते तोपर्यंत शाळेत जाण्यास सवड झाली नाही. परंतु ते काम पुरे झाल्यावर आम्ही गावाजवळ राहण्यास आलो. तेव्हा रोज सकाळी गावात शाळेस जावे; दुपारी तेथे लेलेबाईच्या खाणावळीत जेवावे व संध्याकाळी मुक्कामाला परत यावे असा क्रम उन्हाळ्याचे २–३ महिने चालला होता. पण पुढे आम्ही गावातच राहायला गेल्याकारणाने खाणावळीचा त्रास चुकून दोन्ही वेळा घरचे जेवण मिळू लागले. या वेळी माझे वय ११ वर्षांचे होते व मी ५ व्या इयत्तेत शिकत होतो.’

‘राजापुराहून आम्ही महाडास परत आलो. वडील काम पुरे होईपर्यंत मागे राहिले. आम्ही भाड्याचा मचवा केला होता. त्यात सर्व सामान भरून आम्हीही त्यात बसलो. मचवा खारब्यांचा होता. सर्व खलाशी एका कुटुंबातील होते. त्याच्या घरी त्यांनी एक दिवस मूक्काम केला. आम्हालाही तेथेच उतरावे लागले.

अनुक्रमणिका

घरचे मुख्य पुरुष दोन भाऊ होते व त्यांच्या कुटुंबात लहानमोठी ८५ मंडळी होती. आमच्या आईला त्या कुटुंबाच्या एकोप्याविषयी फार आदर वाटला.'

'तेथून निघून जैतापुराहून आम्ही समुद्रात आलो व उत्तर दिशेकडे जाऊ लागलो. परंतु उत्तरेकडून जोराचा वारा असल्याने आमची गती फारच मंद झाली व २ दिवसांत आम्ही रत्नागिरीपर्यंतच पोहोचलो. ओकून ओकून आमचे फार हाल झाले. तेव्हा आमच्या आईने मचवा रत्नागिरीस घेण्यास सांगितले तेथे आम्ही सर्व उतरलो व आगबोटीने बाणकोटपर्यंत जाऊन पुढे लाँचने दासगावास उतरून महाडास गेलो. सामान मचव्याने मागाहून ८–१० दिवसांनी आले. या प्रवासात जें अनुभव आले त्यात आमच्या आईचा करारीपणा व हिंमत ही चांगलीच दिसून आली.'

'घरी आल्यावर मी महाडच्या शाळेत जाऊ लागलो. ६ ही इयत्ता ही अखेरची असून ती परीक्षा पास झाल्यावर सरकारी नोकरीत प्रवेश होई; पण त्या परीक्षेस बसण्यास १८ वर्षे पुरी व्हावी लागत. माझा सगळा अभ्यास झाला होता. पण वय केवळ १२ वर्षांचे! यामुळे परीक्षेस बसता येईना. माझ्याबरोबरीची मुले परीक्षेला बसून पास होऊन नोकरीलाही लागली; पण मला एकाच वर्गात तोच तोच अभ्यास घटवीत रखडावे लागले'

'या सुमारास पंढरीनाथ सुदामे यांनी आपल्या घरी गणपतीचा उत्सव नवीन धर्तीवर मोठया थाटाने केला. मुलांचा मेळा तयार करून त्यांच्याकडून पदे म्हणवून घेतली जात. गणपतीपुढे रोज काही ना काही कार्यक्रम होत असे. हा सगळा प्रकार लोकांना अगदी नवीन होता. अनंतचतुर्दशी विसर्जनाच्या वेळेस गणपतीमागून खुद्द हेडमास्तर, इतर सर्व शिक्षक मंडळी व गावातील काही प्रमुख प्रतिष्ठित गृहस्थ अशी मिरवणूक राजाच्या तळ्यावरून निघून वीरेश्वराच्या देवळावरून नदीवर राजाच्या घाटावर गेली. हा उत्सव महाडात बराच गाजला. परंतु दुसरी गणेशचतुर्थी येईपर्यंत पंढरीनाथांची बदली भिवंडी येथे झाली. त्यामुळे तसा उत्सव महाडकरांस पुन्हा पाहावयास मिळाला नाही.'

'सन १८९३ साली श्री. टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव पुणे येथे सुरू केला. त्यापूर्वी बारा–तेरा वर्षे पंढरीनाथांनी उत्सव महाडास सुरू केला होता ही गोष्ट विसरता कामा नये.'

'मराठी सहावी इयत्ता पास होऊन तलाठी होण्याची आकांक्षा, वय कमी असल्यामुळे पुरी करता येईना व इंग्रजी शिक्षणाची सोय त्या वेळी महाड येथे नव्हती. हा पेच पंढरीनाथ सुदामे यांच्या बदलीने सुटला. त्यांनी भिवंडीस जाताना आपला पुतण्या सीताराम यास बरोबर घेतलेच, परंतु मी व गणपती अर्जुना भोजने या दोन मराठे मुलांस व पर्वते नावाच्या एका ब्राह्मण मुलासही नेले. हा प्रवास आम्हा सर्वांना फार गमतीचा वाटला. नागोठण्यापर्यंत बैलगाडीने, तेथून धरमतरीपर्यंत मचव्याने व धरमतरीहून मुंबईपर्यंत आगबोटीने, तेथून कल्याणपर्यंत आगगाडीने व भिवंडीपर्यंत टांगा, होडी व टांगा अशा रीतीने, पुरा झाला. त्या वेळी मुंबई बघावयास मिळाली नाही व आगगाडीचा प्रवास रात्री झाल्याने त्याचीही काही कल्पना आली नाही.'

'भिवंडीच्या शाळेत ३–४ महिने काढल्यावर आमच्या वडिलांस राईमुरधेकडे नोकरी लागल्याने मी तिकडे गेलो. पुढे मला इंग्रजी शिकण्यासाठी मामांच्या घरी ठेवण्यात आले. 'मुगभाट प्रायव्हेट इंग्लिश स्कूल' या शाळेत इंग्रजी शिकण्यास सुरुवात झाली. सीताराम सुदामे हा सहावी इयत्ता पास होऊन

अनुक्रमणिका

पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजमध्ये गेला व पुढे त्याने नगर जिल्ह्यात शिक्षकाची नोकरी धरली. गणपती भोजने हाही सहावी इयत्ता पास होऊन त्याने महाड येथे शिक्षकाची नोकरी पत्करली. पर्वते याचे काय झाले ते कळले नाही.'

'मुगभाट प्रायव्हेट इंग्लिश स्कूलमधून मी खेतवाडीतील विल्सन हायस्कूलमध्ये शिकण्यास गेलो. तेथून अलिबागच्या शाळेत गेलो. आमच्या थोरल्या मामांची दोन मुले माझ्याबरोबर शिकत होती. पुढे नागाव येथे राहून आम्ही अलिबागच्या शाळेत रोज जात असू. त्या वेळी साखर व अलिबाग या दरम्यान पूल नव्हता. तरीही खाडी ओलांडावी लागे. इंग्रजी शाळेच्या विद्यार्थ्यांना तरीची 'फी' पडत नसे. ही सवलत शिक्षणास उत्तेजन देणारी होती. यापुढे वर्ष दीड वर्ष शिक्षण बंद पडले होते. प्रकृती चांगली नव्हती हे एक व शिवाय वडिलांची नोकरी डहाणू व जव्हार यांच्या मध्यावर एका खेडेगावी होती, त्यामुळे जवळची पुस्तके वाचून वेळ काढावा लागे. हा मधला काळ संपवून वडील मुंबईस येऊन कामाठीपुऱ्यात राहिले. तेथे एका सद्‌गृहस्थाच्या वशिल्याने फणसवाडीच्या सरकारी शाळेत तिसऱ्या इयत्तेच्या ज्युनियर क्लासमध्ये नाव घातले. माझा तिसऱ्या इयत्तेचा अभ्यास झाला होता. पण सीनियर क्लासमध्ये घेण्याचे हेडमास्तरनी नाकारले. पण तिसऱ्या इयत्तेत मला एकंदर सहाच महिने काढावे लागले. मी क्लासमध्ये दाखल होऊन २–३ दिवस झाल्यावर एज्युकेशनल इन्सपेक्टर परीक्षा घेण्यास आले, तेव्हा क्लासेस बदलून सीनियरची मुले ज्युनियर तिसरीच्या वर्गात, तिसरीच्या ज्युनियर वर्गातील मुले दुसरीच्या सीनियर वर्गात अशा रीतीने सर्व मुलांची पिछेहाट केली व परीक्षा सुरू झाली. मी तिसरीच्या ज्युनियर वर्गातच राहिलो. परीक्षेत मी सर्व विषयांत पास होऊन माझा नंबर बराच वर आला. तेव्हा हेडमास्तरनी मोठ्या खुषीने मला वरच्या वर्गात घातले त्या वेळी जगन्नाथ शंकरशेटची शाळा व फणसवाडीची शाळा अशा दोन मराठीतून इंग्रजी शिकविणाऱ्या शाळा गिरगावात असत. तिसऱ्या इयत्तेची परीक्षा एल्‌फिन्स्टन हायस्कूलमध्ये होत असे व पास झालेल्या मुलांना चोथ्या इयत्तेत घेत असत. यामुळे या दोन शाळांची मोठी स्पर्धा लागून राहिली होती. जगन्नाथ शंकरशेट शाळेचे हेड मास्तर, प्रख्यात लेखक विनायक कोंडदेव ओक हे होते. फणसवाडी शाळेचे हेडमास्तर प्रख्यात शांताराम मंगेश धुमे हे होते. हे शांताराम एम. डी. अशी आपली सही करीत असत. या दोन मास्तरांची स्पर्धा कोणाची मुले जास्त पास होतात व वरचा नंबर पटकावतात यांत लागली होती. चांगली मुले आपल्या शाळेत यावीत असे प्रयत्न दोन्ही शाळांतून चालत व शिक्षणही कसून देण्यात येई. शांताराम धुमे हे हेडमास्तर झाल्यापासून फणसवाडी शाळेचा दर्जा वर चढला होता व तिच्यातीलच मुले जास्त पास होत व वरचा नंबर पटकावीत. परीक्षा नेहमीप्रमाणे एल्‌फिन्स्टन हायस्कूलात झाली. मराठी शाखेतील या दोन शाळा, गुजराती शाळा व गुजराती शाखेतील दोन तीन शाळा अशा सर्व मुलांची परीक्षा एकदा झाली तीत माझा पहिला नंबर लागला व एल्‌फिन्स्टन हायस्कूलच्या चौथ्या इयत्तेच्या ज्युनियर वर्गात माझा प्रवेश झाला व मला फीही एकच रुपया ठरली.'

'आमचे वडील नोकरीसंबंधाने पुन्हा काठेवाड (सौराष्ट्र) मधील वळा नामक एका लहान संस्थानात मुख्य ओव्हरसिअर म्हणून गेल्याकारणाने, शिक्षणात व्यत्यय येतो की काय अशी भीती पडली. याच वेळी कामाठीपुऱ्यात व्यंकू बाळ या नावाचे एक मोठे बिल्डिंग कांट्रॅक्टर होते व स्वामी रामय्या व्यंकय्या अय्यावारू हे त्यांचे एक भागीदार होते. सदर रामय्या स्वामी यांची आमच्या वडिलांशी दाट मैत्री होती. ते आमच्या वडिलांस मोठ्या भावासारखा मान देत. त्यांनी मला आपल्या घरी ठेवून घेतले. ते कामाठीपुऱ्यात ८ व्या गल्लीत राहत असत. तेथून धोबी तलावावरील एल्‌फिन्स्टन हायस्कुलात रोज पायाने जावे लागे.'

अनुक्रमणिका

'एल्फिन्स्टन हायस्कूलात चोथ्या, पाचव्या इयत्तेच्या प्रत्येक क्लासात दरमहा तीन रुपयांची व सहाव्या आणि सातव्या इयत्तेत दरमहा चार रुपयांची स्टायपेंड मिळत असे. एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये मी साडेचार वर्षे होतो; तेवढ्या मुदतीत फक्त दोन वेळा ही स्टायपेंड मिळाली नाही. एक वेळ मी तापाने सात–आठ दिवस आजारी होतो. दुसऱ्या वेळेस आमची आई महाडास फार आजारी होती म्हणून तिकडे जावे लागले. माझ्याबरोबर स्पर्धा करणारा चिंतामण पांडुरंग बापट या नावाचा मुलगा होता. १८८७ च्या जून महिन्यात आम्ही दोघेही सातव्या इयत्तेच्या ज्युनियर वर्गामध्ये गेलो. परीक्षेला फक्त पाच महिन्यांचा अभ्यास होता. अभ्यास बरोबर होणार नाही म्हणून मी परीक्षेला बसण्याचे धाडस केले नाही. बापट याने ते धाडस केले व तो पासही झाला. पण त्याचा नंबर फार खाली आला व त्याला पुढील परीक्षांत सेकंड क्लासही कधी मिळाला नाही. एक–दोन गोतेही मिळाले. अशा तऱ्हेने एकंदरीत त्याचे नुकसान झाले. त्याचा माझा स्नेह त्याच्या मरणापर्यंत टिकला. सांगली संस्थानात त्याने मोठी जबाबदारीची नोकरी केली व नावही कमविले.'

मॅट्रिक व पुढील शिक्षण

श्री. भास्करावांच्या वरील आत्मपर निवेदनावरून कोणत्या बिकट आणि प्रतिकूल परिस्थितीत त्यानी शिक्षण संपादन केले याची कल्पना येते. भास्करावांचे वडील विठोजीराव याना कामानिमित्त मुंबई व इतर ठिकाणी वास्तव्य करावे लागे. स्वतः उपजत हुशार, कसबी व हरहुन्नरी असूनही केवळ आपणास शिक्षण नसल्यामुळे आपण मागे पडलो याची तीव्र जाणीव त्याना होती. मागासलेल्या वर्गाची होत असलेली शैक्षणिक, धार्मिक व सामाजिक कुचंबणा त्याना अतिशय प्रखरतेने जाणवे. तेव्हा आपल्याला जे शिक्षण मिळू शकले नाही ते आपल्या मुलांना मिळवून द्यायचे असा त्यांचा निर्धार होता. १८८८ सालच्या मॅट्रिक परीक्षेत भास्करराव पहिल्या नंबराने उत्तीर्ण झाले व त्यांच्या वडिलांनी जी महत्त्वाकांक्षा बाळगली होती ती एकप्रकारे सफल झाली. श्री. भास्करावांच्या शिक्षणास उशिरा सुरुवात झाल्यामुळे मॅट्रिक होण्यास इतका वेळ लागला. ही परीक्षा सुरू होण्याच्या अगोदर दोनच दिवस त्यांचा दोन वर्षांचा आवडता धाकटा भाऊ यशवंत हा वारला होता. मॅट्रिक परीक्षेच्या वेळी त्यांची जगन्नाथ शंकरशेटची संस्कृत स्कॉलरशिप केवळ तीन गुणांनी हुकली. ते व इतर काही विद्यार्थी ज्या ठिकाणी परीक्षेस बसले होते त्या ठिकाणी संस्कृतची प्रश्नपत्रिका वाटण्यास पंधरा मिनिटे उशीर झाला होता व विद्यार्थ्यांच्या तक्रारीवरून परीक्षक प्रो. जिनसीवाले यानी ठराविक वेळ संपल्यानंतर पंधरा मिनिटे जास्त वेळ देण्यात येईल असे अभिवचन दिले होते. तथापि तेथील सुपरवायझरनी ठराविक वेळेसच सर्व उत्तरपत्रिका गोळा केल्या व भास्करावांचा एक दहा गुणांचा प्रश्न राहून गेला होता.

आपल्या मॅट्रिकच्या पुढील शिक्षणासंबंधी श्री. भास्करराव स्वतःच लिहितात, 'मॅट्रिक पास झाल्यावर मी विल्सन कॉलेजात गेलो. तेथे १५ रु. ची स्कॉलरशिप व डेक्कन मराठा असोसिएशनकडूनही तेवढीच स्कॉलरशिप मिळत असे मॅट्रिकच्या वर्गात असल्यापासून वडिलांनी गिरगावात बिऱ्हाड केले होते. त्यांच्याजवळ मी राहत असे. प्रीव्हियस व फर्स्ट बी. ए. या परीक्षा पहिल्या वर्गात विल्सन कॉलेजमधून झाल्या. त्या वेळी विल्सन कॉलेज हे हल्ली ज्या ठिकाणी विल्सन हायस्कूल आहे तेथे भरत असे व नंतर त्याच वर्षी ते चौपाटीवरील नवीन इमारतीत गेले. १८९२ साली मी एल्फिन्स्टन कॉलेजात गेलो व तेथून बी. ए. ची परीक्षा पास झालो. १८९३ व ९४ साली मी दक्षिणा फेलो होतो, तेव्हा दरमहा ६० रु. मिळत असत. पहिल्या वर्षी इंग्रजी शिकविण्याचे काम माझ्याकडे होते व दुसऱ्या वर्षी गणित हा विषय होता. पहिल्या वर्षी फर्स्ट एलएल. बी. ची टर्म भरून परीक्षेस बसून पास झालो. दुसऱ्या वर्षी सेकंड एलएल. बी. ची टर्म

अनुक्रमणिका

भरण्यास सुरुवात केली. आमचे प्रिन्सिपॉल हॉथानंथ्वेट मोठे कडक शिस्तीचे होते. ते दर शनिवारी एम. ए. चा क्लास गणित विषयाचा घेत असत. बी. ए. झाल्यावर फेलोशिपच्या दोन वर्षांत गलांडे हे माझे सहाध्यायी होते. तेही गणित विषय घेऊन फर्स्ट क्लासमध्ये पास झाले होते. आमचा दोघांचा विचार एम. ए. चा अभ्यास करावयाचा नव्हता; परंतु शनिवारच्या क्लासला जाण्यापुरते वाचावे लागे. १८९४ सालच्या एम. ए च्या परीक्षेस मी फॉर्म भरला नव्हता; परंतु गलांडे यानी आपला फॉर्म भरला असे कळल्यावर मीही आपला फॉर्म युनिव्हर्सिटीला दिला व अभ्यासाला सुरुवात केली. पुढे मी पास झालो व गलांडे पडले.'

एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये भास्कररराव दोन वर्षे फेलो होते त्या सुमारास दक्षिण विभाग कमिशनरच्या कचेरीत हेडक्लार्कची जागा रिकामी झाली होती. त्या जागेचा पगार रु. १९५ होता. त्या वेळच्या कमिशनरनी एल्फिन्स्टनचे प्रिन्सिपॉल यांस पत्र पाठवून त्यांच्या कॉलेजमधील एखाद्या हुशार पदवीधराची शिफारस करण्यास लिहिले होते. प्रिन्सिपॉलनी श्री. मोबेदजी व श्री. भास्कररराव या दोघांची नावे सुचविली होती. श्री. मोबेदजी हे त्या वेळी एम. ए. प्रथम श्रेणीत पास झाले होते व भास्कररराव बी. ए. असून फेलो होते. श्री. मोबेदजी एम. ए. म्हणून त्यांची निवड झाली. पुढे ते कलेक्टरच्या हुद्द्यावरून रिटायर झाले.

बडोद्याचे श्रीसयाजीराव महाराज यांनाही भास्कररावांची शैक्षणिक प्रगती माहीत झाली होती. त्यांच्यासारखा मनुष्य आपल्या संस्थानात यावा ही इच्छा महाराजांना होती. त्यानी श्री. खासेराव जाधव यांच्यामार्फत श्री. भास्कररावांकडे विचारणा केली. श्री. भास्कररराव यांस अधिक शिक्षणाकरिता ते विलायतेस पाठविण्यास तयार होते. मात्र विलायतेहून परत आल्यावर भास्कररावांनी बडोदे संस्थानातच नोकरी केली पाहिजे अशी अट होती. ही अट भास्कररावांना पसंत नसल्याने त्यानी महाराजांस नकार दिला. त्या वेळेस त्यांचा विचार कोठेच नोकरी करण्याचा नव्हता, तर एलएल. बी. होऊन स्वतंत्र धंदा करावा व समाजसेवा करावी असा त्यांचा हेतू होता. त्याचप्रमाणे रामायण महाभारतादी ग्रंथांचे अध्ययन करून त्यांवरील आपले विचार लोकांपुढे मांडावेत असा त्यांचा हेतू होता. आपले हे विचार त्यानी १८९३–९४ सालच्या दैनंदिनीत नोंदले आहेत. त्या वेळी काही वर्षे ते आपली रोजनिशी लिहीत असत.

कोल्हापुरास आगमन

१८९४ साली ते एम. ए. झाले व एलएल. बी. च्या अभ्यासाकरिता मुंबईस राहिले होते. विठोजीराव त्या वेळेस सुरतेस नोकरी करीत होते. याच वेळी कोल्हापूरचे श्रीशाहू छत्रपती यांस अधिकारसूत्रे मिळाली होती व त्यांची इच्छा आपल्या प्रजेमध्ये शिक्षणाचा प्रसार करावा अशी होती. संस्थानातील ब्राह्मण व प्रभूवर्गाशिवाय इतर वर्गांत शिक्षणाचा प्रसार झाला नव्हता. आपल्या राज्यात मागासलेल्या वर्गातील अधिकारीवर्ग निर्माण झाल्याशिवाय आपल्या प्रजेच्या कल्याणाचे व उन्नतीचे कोणतेही प्रयत्न सफल होणार नाहीत याची जाणीव महाराजांना होताच त्यानी सुशिक्षित मराठा व तत्सम वर्गातील लायक तरुणांचा संग्रह करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे महाराजानी त्या वेळचे आपले हुजूर चिटणवीस श्री रघुनाथराव सबनीस (नंतरचे दिवाण सर रघुनाथराव सबनीस) यांच्यामार्फत भास्कररावांबरोबर पत्रव्यवहार सुरू केला. पहिल्या दोनतीन पत्रांस भास्कररावानी उत्तरही दिले नाही. शेवटी त्याना एक रजिस्टर पत्र पाठवून निदान महाराजांस भेटण्यास तरी या म्हणून विनंती केली होती. महाराज इतके आपुलकीने बोलावीत आहेत तर त्याना नुसते भेटून यावे, अवमान करू नये अशी विठोजीरावांनी आज्ञा केली त्याप्रमाणे भास्कररराव १८९५ च्या जुलै अगर ऑगस्ट महिन्यात कोल्हापूरला गेले. आगाऊ कळविले असल्यावरून स्टेशनवर सरकारी

अनुक्रमणिका

गाडी घेऊन श्री. बळवंतराव दिलवर आले होते. खास पाहुणे म्हणून भास्कररावांची व्यवस्था नव्या वाड्यावर केली होती. दोन–तीन दिवसांनंतर ही श्रीशिवछत्रपतींची गादी आहे व येथे राहिल्यास मराठा समाजाची सेवा करण्याची संधी मिळेल असे सांगण्यात आले. श्री. भास्कररावांच्या मनात बहुजनसमाजाच्या सेवेच्याच विचारांचे प्राबल्य झाले होते. मागासलेपणामुळे आपल्या समाजाचे कसे नुकसान होत आहे, हे त्यांस दिसत होते व तसा त्याना अनुभव आला होता. आपल्या वडिलांना ते हुशार असताही शिक्षणास का व कसे मुकावे लागले याचीही त्यांना पूर्ण जाणीव होती. तेव्हा होता होईल तेवढे स्वतंत्रच राहावे असा विचार त्यांचे मनात होता व सध्या एल. एल. बी. चा अभ्यास चालू आहे तेव्हा ती परीक्षा झाल्यावर पाहू असे सांगून ती वेळ मारून नेण्याचा त्यानी प्रयत्न केला. पण श्रीशाहूमहाराज कसले खट! त्यानी सांगितले की, 'तुमची आम्ही असिस्टंट सरसुभे म्हणून दरमहा रु.१५० वर नेमणूक केली आहे व परीक्षेकरिता तुम्हास तीन महिन्यांची भर पगारी रजा दिली असून तो सर्व पगार तुम्हास आगाऊ मिळण्याची व्यवस्था होईल.' शाहूमहाराजांची ही आत्यंतिक कळकळ पाहून अशा धन्याच्या हाताखाली समाजसेवेची संधी खात्रीने मिळेल असे त्यांस वाटले तर नवल नाही. अशा रीतीने भास्करराव यांचा कोल्हापूरशी संबंध जडून आला.

एलएल. बी. ची शेवटची टर्म भरून आल्याबरोबर भास्करराव आपल्या कामावर हजर झाले. या नोकरीवर रुजू होण्याच्या वेळच्या परिस्थितीसबंधी लिहिताना भास्करराव म्हणतात, 'कै. राजाराम खंडेराव वैद्य हे सरसुभे होते. ते खालसामध्ये नावाजलेले पेन्शनर डेप्युटी होते. त्यानी मला रेव्हिन्यू कामाची माहिती दिली व मला चांगल्या प्रकारे वागविले. १८९६ च्या जूनमध्ये त्यानी आपले काम सोडले व त्यांचे जागी श्री. रघुनाथ व्यंकाजी सबनीस, त्या वेळचे हुजूर चिटणीस यांची नेमणूक झाली. त्यांच्याही हाताखाली मला काम करण्यास मिळाले. १८९७ साली एलएल. बी. च्या परीक्षेस जाऊन आलो. तेव्हा प्लेगची साथ असल्यामुळे क्वारंटाईनमध्ये बरेच दिवस बसावे लागेल असे वाटत होते. परंतु कोल्हापुराहून तातडीने हुकूम गेल्यामुळे माझी सुटका एका दिवसातच झाली. मला फर्स्ट क्लास मेजिस्ट्रेटचे अधिकार देण्यात आले व डिस्ट्रिक्ट ऑफिसरच्या जागी नेमणूक झाली. १८९८ च्या डिसेंबरच्या २ तारखेस बापूसाहेबाचा जन्म कोल्हापुरास झाला. पुढे पाच–सहा दिवसांनी गोविंदराव मुंबईस परीक्षा देऊन उदगावच्या क्वारंटाईनमध्ये एक दिवस राहून किणीच्या क्वारंटाईनमध्ये त्याला आणले. माझा मुक्काम त्याच वेळी तेथे ठेवल्यामुळे त्याची जेवणाची सोय झाली. किणीस आल्यावर त्याची माझी भेट झाली, तेव्हा त्याने मोठ्या उत्सुकतेने विचारले, 'बाळ माझ्याइतके काळे आहे काय?'

'वडगांवची प्लेग कामगिरी, १८९९ सालची दुष्काळ कामगिरी, १९०१ च्या खानेसुमारीची स्पेशल कामगिरी वगैरे माझेकडे आल्या होत्या. १९०२ साली श्रीशाहूमहाराज किंग एडवर्डच्या राज्यारोहणाप्रित्यर्थ विलायतेस गेले होते. त्या वेळी सरसुभे यांचा चार्ज माझ्याकडे आला होता. १९०८ साली श्रीमंत राजकन्या आक्कासाहेब महाराज यांच्या विवाहासाठी काशीहून काही पंडित आणण्याकरिता मी श्री. गुंडोपंत पिशवीकराना बरोबर घेऊन गेलो होतो व गागाभट्ट वंशातील एक पंडित व आणखी काही पंडित घेऊन आलो. नंतर राजकन्येंचा विवाह मोठ्या थाटाने झाला. १९०९ साली श्रावण महिन्यात तीर्थरूप विठोजीराव यांचे देहावसान झाले. आम्ही दोघेही बंधू जवळ नव्हतो. मी तर संध्याकाळी त्यांची परवानगी घेऊन बेळगावास गेलो होतो. ते त्या दिवशी संध्याकाळी फिरूनही आले होते; पण रात्री घटसर्पाचा विकार होऊन पहाटेस प्राणोत्क्रमण आले. नातू जवळ होता. १९१० च्या एप्रिलच्या ४ तारखेस श्री. आक्कासाहेब महाराज यांस पुत्ररत्न (सध्याचे श्रीछत्रपती शहाजी महाराज) झाले. पुढे दोन दिवसांनी ता. ६ ला आमच्या घरात दुसऱ्या मुलाचा जन्म झाला. त्याचे नाव विठोजीराव–बाबासाहेब असे ठेविले.

अनुक्रमणिका

श्री. भास्कररावानी करवीर दरबारात १८९५ ते १९२१ अशी सव्वीस, वर्षे नोकरी केली. त्या अवधीत असिस्टंट सरसुभे, डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, असिस्टंट जज्ज, नायब दिवाण, सरसुभे, म्युनिसिपालिटीचे सर्वाधिकारी वगैरे जागांवर काम केले. त्याच वेळेस श्री. बापूसाहेब महाराज याच्या आग्रहावरून सीनियर कागल जहागिरीत जज्जाचेही काम विनावेतन केले. त्या उभयतांचा स्नेह असल्याकारणाने वेतनाचा प्रश्न आला नाही. याशिवाय वरचेवर स्पेशल कामगिऱ्या निघत असतच.

कोल्हापूरचे दुसरे शिल्पकार

म्यु. पा. चे सर्वाधिकारी या नात्याने श्री. भास्कररावांची कोल्हापूर शहरची सेवा अत्यंत अमोल अशी झाली. तीबद्दल श्री. जे. पी. नाईक यानी लिहिलेल्या 'कोल्हापूर नगरपालिकेचा इतिहास' या पुस्तकातील उतारा देणे अप्रस्तुत होणार नाही. श्रीं. नाईक 'सर्वाधिकाऱ्यांचा काल' या ७ व्या प्रकरणात लिहितात,

'इ. स. १८८९ ते १९०४ या कालात नगरपालिकेत फार अव्यवस्था माजल्यामुळे ती बरखास्त करून सर्व अधिकार श्री. भास्करराव जाधव यांस देण्यात आले. १९०४ ते १८ पर्यंत ते सर्वाधिकारी होते. नगरपालिकेचा कारभार त्यांच्याकडे देण्यात आल्यानंतर खळबळ उडणे अपरिहार्य होते. त्या वेळी नगरपालिकेत ब्राह्मण समाजाचे प्राधान्य होते. कारण त्या वेळी ब्राह्मण हेच बव्हंशी सुशिक्षित असल्यामुळे नगरपालिकेसारख्या सार्वजनिक कार्यात त्यांचेच प्राबल्य असल्यास त्यात नवल नाही. यामुळे नगरपालिका बरखास्त करून तिचा अधिकार एका मराठा जातीतील पदवीधराकडे दिला ही गोष्ट तत्कालीन ब्राह्मण समाजाला अपमानास्पद वाटली व केवळ जातीच्या अभिमानामुळे प्रेरित होऊन त्यांनी या घटनेविरुद्ध खळबळ उडविण्याला प्रारंभ केला. त्यांनी अनेक सभा भरविल्या व दरबारकडे अर्ज व शिष्टमंडळे पाठविली. पण हा जातीय अभिमानाने प्रेरित होऊन झालेला विरोध फार काळ टिकणे शक्य नव्हते. श्री. भास्करराव जाधव यांनी अविश्रांत परिश्रमाने व असामान्य कर्तव्यतत्परतेने नगरपालिकेत इतके स्पृहणीय स्थित्यंतर घडवून आणले की, त्यांच्या नेमणुकीविरुद्ध पुढे कोणालाही आक्षेप घेण्याला जागा राहिली नाही. इतकेच नव्हे तर दरबारने घडवून आणलेली घटनाच इष्ट आहे, असे सर्वांना लौकरच वाटू लागले व या नेमणुकीबद्दलचा विरोध हळूहळू कमी होत गेला.

श्री. भास्करराव यानी प्रारंभी नगरपालिकेच्या अंतर्गत व्यवस्थेकडे लक्ष पुरविले व पुढीलप्रमाणे सुधारणा केल्या :

१. वसूल रकमेची स्वतंत्र पावती देणे.

२. जमाखर्चाच्या पद्धतीत सुधारणा करून मासिक, त्रैमासिक व वार्षिक जमाखर्च ४८ तासांत कोणालाही उपलब्ध केले.

३ वसूल बाकीचे दोन वर्षांचे थकलेले काम पुरे करून कर व वसुली या विषयीची माहिती कोणालाही व केव्हाही मिळण्याची व्यवस्था केली.

४. थकबाकीच्या वसुलीत सुधारणा केल्याने न. पा. च्या उत्पन्नात भर पडली.

अनुक्रमणिका

५. लोकांचे अर्ज, तक्रारी व इतर प्रकारची शिल्लक राहिलेली कामे ताबडतोब निकालात काढली.

६. न. पा. चे रेकॉर्ड व्यवस्थित लावले. या कागदपत्रांच्या आधारे १८५४ त १९०६ पर्यंतचा न. पा. चा सुसंगत असा इतिहास लिहिला.

श्री. जाधवराव यांच्या कामाची पद्धत प्रशंसनीय होती ते दररोज सकाळी घोड्यावरून गावात फिरत व कोठे काही दोष आढळल्यास ते तत्काळ दूर करण्याची दक्षता घेत. त्यांनी शहरसुधारणेचा एक कार्यक्रम पुढे ठेवला. तो त्यांच्याच शब्दांत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे :

'या अवस्थेत पुढील कालात कोल्हापूर शहराच्या गरजा काय होतील हे सांगणे अशक्य आहे. शहर व नगरपालिका यांची चांगल्या प्रकारे प्रगती होत आहे. व्यापाराची वाढ होत आहे. जीवनातील राहणीचा दर्जा वाढला आहे. शहरातील शिक्षणात अपेक्षेइतकी नसली तरी पुष्कळ वाढ झाली आहे. यामुळे नवीन गरजा वाढत आहेत व त्या पुरविण्याची आवश्यकता भासत आहे. म्हणून सर्व काळात उपयुक्त ठरेल अशा सुधारणेची योजना तयार करणे अशक्य आहे. तथापि माझ्या मते आजच्या आवश्यक गरजा पुढीलप्रमाणे आहेत :

१. आरोग्याची सुधारणा.
२. नगररचनेतील सौंदर्याची वाढ.
३. सार्वजनिक सुखसोयी.

यासाठी खालील गोष्टी करणे आवश्यक आहे :

१. चांगल्या पद्धतीवर ड्रेनेजचे काम पुरे करणे.
२. गलिच्छ वस्ती व उपद्रवकार उद्योग शहराबाहेर नेणे.
३. शहराबाहेर घरे बांधण्यास उत्तेजन देणे.
४. प्रकार व मोकळी हवा मिळण्याकरिता बांधकामाचे नियम करणे.

नगररचनेच्या व लोकांच्या सुखसोयीच्या दृष्टीने उपयुक्त असा हा कार्यक्रम आपल्यापुढे ठेवून तो तडीस नेण्याबाबतीत श्री. जाधवराव यानी अतोनात श्रम घेतले.

त्यांच्या कारकीर्दीत पुढीलप्रमाणे महत्त्वाच्या गोष्टी झाल्या :

१. फेरिस मार्केट: या प्रेक्षणीय इमारतीने नागरिकांच्या सोयीत व नगराच्या सौंदर्यात चांगली भर घातली. कर्नल फेरिस यानी नगरपालिकेची प्रशंसनीय प्रगती घडवून आणल्यांमुळे त्यांचे एखादे स्मारक नगरपालिकेने करणे उचित होते.

२. भंग्यांचा संप : पूर्वी भंग्यांवर कसलेही नियंत्रण नव्हते. ते वाटेल तसे काम करीत. तेव्हा शिस्तीसाठी नियम केल्यामुळे भंग्यांनी पगार कमी व काम जास्त या सबबीवर संप केला. पण श्री.

जाधवरावांनी मुंबईहून तत्काळ नवीन भंगी आणवून तो संप मोडला. त्यामुळे नोकरवर्गावर चांगला वचक बसला.

३. प्लेगच्या कालातील सोयी : श्री. जाधवराव यांनी प्लेगच्या दिवसांत फार मोठी कामगिरी केली. १९०४–०५ साली प्लेगचे फार मृत्यू होत. त्या वेळी गोरगरिबांस प्रेते जाळण्याची फार मोठी पंचाईत पडे. त्यातच लाकडाच्या व्यापाऱ्यांनी लाकडाचा दर भरमसाट वाढविला. त्यामुळे प्रेते जाळणे अशक्य झाले व लोक ती पुरू लागले. म्हणून श्री. जाधवराव यांनी लाकडाचे दर निश्चित केले व प्रेते जाळण्याची व्यवस्था सुलभ केली. स्मशानाचा रस्ता चांगला केला. स्मशानातच लाकडे मिळण्याची व्यवस्था केली व प्रेते जाळण्यासाठी व लोकांना उभे राहण्यासाठी दोन शेडस् बांधल्या. सारांश, याप्रमाणे भूतदयात्मक बुद्धीने त्यानी बहुमोल कामगिरी करून लोकांचा दुवा घेतला.

४. अर्बन बँक : श्री. जाधवराव यांच्या कारकीर्दीतील एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'अर्बन को–ऑपरेटिव्ह सोसायटी' या संस्थेची स्थापना ही होय. सन १९११–१२ साली महाराष्ट्रात सार्वत्रिक बँका बुडण्याची जणू काही एक साथच आली होती. त्यामुळे लोकांचा बँकेवरचा विश्वास उडत चालला होता. तथापि लोकांना कर्ज मिळण्याच्या बाबतील एखाद्या बँकेची जरुरी होतीच म्हणून श्री जाधवराव यानी बँक असे न म्हणता 'अर्बन को–ऑपरेटिव्ह सोसायटी' असे नाव देऊन १९१३ साली ही संस्था स्थापन केली. पुढे या सोसायटीचे महत्त्व फार वाढले.

त्यांच्या कारकीर्दीत घडून आलेल्या शाहूपुरीच्या वसाहतीच्या भरभराटीकडे अंगुलीनिर्देश करावा लागेल. ही वसाहत जरी १८९६ मध्ये कल्पिली गेली तरी श्री. भास्करारावांच्या वेळेपर्यंत तिच्याकडे कुणी फारसे लक्ष दिले नाही. असिस्टंट सरसुभे म्हणून काम करीत असतानाच त्यांस शाहूपूरी वसाहत कमिटीचे सभासद नेमले. शहराबाहेर येऊन वसाहत करणे लोकांस पसंत नव्हते. वसाहत करणाऱ्यास उत्तेजन मिळावे म्हणून निरनिराळ्या सवलती ठेवल्या गेल्या शिवाय सर रघुनाथराव सबनीस, भास्कररराव जाधव यांच्यासारख्या अधिकारी मंडळींनी लोकांस उदाहरणादाखल स्वतः वसाहतीत जागा घेतल्या. भास्कररावांनी ही वसाहत वाढविण्यासाठी बरेच प्रयत्न केले व त्यात यश येऊन १९२० पर्यंत या वसाहतीची फारच वाढ झाली. सध्या ती व्यापाराची मोठी उतारपेठ झाली आहे.

येथवर केलेल्या विवेचनावरून श्री. जाधवराव यांची चौदा वर्षांची कारकीर्द म्हणजे नगरपालिकेच्या इतिहासातील दुसरे सुवर्णयुग आहे असे म्हणता येईल. कोल्हापूर शहरात रा. ब. माधवराब बर्वे यांच्यानंतर इतके स्पृहणीय काम कोणी केलेले नव्हते. म्हणून श्री. जाधवराव यांना कोल्हापूरचे दुसरे शिल्पकार (The Second Builder of Kolhapur) असे म्हणता येईल व त्याच्या महत्कार्याबद्दल कोल्हापूरची जनता त्यांची सदैव ऋणी राहील.'

संस्थानची नोकरी म्हणजे त्यातील प्रजेची सेवा हे श्री. जाधवराव यांचे ध्येय होते. मागासलेल्या वंर्गात शिक्षणप्रसार करणे, त्यांच्यात स्वत्वाची जाणीव उत्पन्न करणे, त्यांची मानसिक गुलामगिरी नष्ट करणे, त्याच्या राहणीचा दर्जा वाढविणे इत्यादी उद्दिष्टे त्यानी आपणासमोर ठेवली होती व तदनुसार त्यांनी आपल्या परीने अनंत श्रम घेतले. श्रीशाहूमहाराजांसारख्या राष्ट्रपुरुषाच्या सान्निध्यात त्यानी आपल्या नोकरीचा तसा उपयोग करून घेतला. मराठा समाजात शिक्षणाचा प्रसार होण्याकरिता वसतिगृहाची फार मदत होईल हे महाराजांच्या ध्यानी येताच व्हिक्टोरिया मराठा बोर्डिग सुरू झाले. बरीच वर्षे त्याची व्यवस्था

अनुक्रमणिका

श्री. जाधवरावांकडेच होती. तसेच अस्पृश्य, प्रभू, जैन, लिंगायत, मुसलमान इत्यादी वर्गासाठी वसतिगृहे सुरू करण्यात श्री. जाधवरावांनी पुढाकार घेतला. श्री. आण्णा बाबाजी लठ्ठे यांस कोल्हापूर सोडावे लागल्यामुळे जैन बोर्डिंगवर एकप्रकारे गंडांतरच आले होते. त्या वेळी श्री. जाधवरावांनी व्यवस्थापक मंडळाचे प्रमुखत्व स्वीकारून ते ऊर्जितावस्थेस आणले.

अस्पृश्यांबद्दल अनुकंपा त्याना पूर्वीपासूनच होती. स्पृश्यास्पृश्य असा भेद त्यानी कधीही पाळला नाही. त्यांच्यावरील सामाजिक अन्याय दूर व्हावेत यासाठी सतत प्रयत्न केले. त्यांना संस्थानात व बाहेरही नोकऱ्या देवविल्या. गावोगावी त्यांच्यासाठी पाणी पुरवठ्याच्या व इतर अडचणींची समक्ष पाहणी केली. श्रीशाहूमहाराजानी सर्व महारांच्या वतनी जमिनी पुढें रयतावा करून दिल्या.

वर्तमानपत्राशिवाय लोकजागृती होत नसते हे तत्त्व ओळखून श्री. जाधवरावांनी 'मराठा दीनबंधू' या नावाचे एक वर्तमानपत्र सुरू करून ते स्वतः नुकसान सोसून २–३ वर्षे चालविले. त्या वेळी मागासलेल्या वर्गात विद्येचा प्रसार अगदीच कमी असल्याने भरपूर आश्रयाशिवाय ते चालविणे शक्य नव्हते.

अशा तऱ्हेची निरनिराळी कार्ये चालू असतानाच कोल्हापुरात 'राजोपाध्ये प्रकरण' फार गाजले राजोपाध्ये हे छत्रपतींची धार्मिक कार्ये उरकणारे भटजी. त्यासाठी त्यांना वंशपरंपरागत इनाम होते. तथापि ते छत्रपतींसह सर्व मराठ्यांना शूद्र म्हणून लेखीत असल्याने त्यांची धार्मिक कार्ये क्षत्रियांस साजतील अशी वेदोक्त पद्धतीने न करता पुराणोक्त करीत असत. शाहूमहाराजांस अर्थातच ते अपमानकारक वाटले व आपली सर्व धार्मिक कार्ये वेदोक्त पद्धतीनेच झाली पहिजेत अशी त्यांनी राजोपाध्यांस आज्ञा केली व अवज्ञा झाल्यास उत्पन्न जप्त होईल असेही बजावले. राजोपाध्यांनी ते नाकारले; तेव्हा त्यांचे उत्पन्न जप्त करणे भाग पडले. या कामात श्री जाधवरावांनी निरनिराळे ग्रंथाधार काढून छत्रपती हे क्षत्रियच आहेत व त्यांचे धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीनेच झाले पाहिजेत, राजोपाध्ये हे छत्रपतींचे नोकर असून त्यांची आज्ञा पाळणे हे राजोपाध्यांचे कर्तव्यच आहे; तेव्हा कर्तव्यच्युतीबद्दल शिक्षा करणे ही छत्रपतींच्या अधिकारातील गोष्ट आहे असे पूर्णपणे सिद्ध केले. यासाठी त्यांस निरनिराळ्या ठिकाणी प्रवास करून आधार जमवावे लागले. राजोपाध्ये प्रकरण म्हणजें बहुजनसमाजाच्या जागृतीची नुसती सुरुवात होय. शाहूमहाराजांसही 'ब्राह्मण्य' म्हणजे काय त्याची पूर्ण कल्पना आली.

पहिली मराठा शिक्षण परिषद

मराठा समाजात शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी जागृती करणे अवश्य होते. त्यासाठी श्री. जाधवराव यानी अनेक लेख लिहिले. निरनिराळ्या पुढाऱ्यांच्या गाठी घेऊन अशा संघटित प्रयत्नांची किती आवश्यकता आहे ते प्रतिपादले. या प्रयत्नांमुळे पहिली मराठा शिक्षण परिषद धारवाड येथे १९०७ मध्ये श्री खासेराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आली. ती भरविण्यापूर्वीचा इतिहास त्या परिषदेचे स्वागताध्यक्ष या नात्याने श्री. भास्करारावानी आपल्या भाषणात सांगितला आहे. त्या वेळची कार्यकर्ती मंडळी स्वार्थत्यागी, समाजाचे कल्याण पाहणारी, निरपेक्ष व स्वतःचा बडेजाव न सांगणारी अशी होती. वास्तविक धारवाड परिषदेचा स्वागताध्यक्ष तेथील रहिवासी असणेच योग्य होते; परंतु त्या मंडळींनी भास्कररावांस अत्यंत आग्रह करून स्वागताध्यक्ष केले. यावरूनच भास्कररावांच्या निरपेक्षपणाची कल्पना येईल. या परिषदेत श्री. भास्कररावांना सेक्रेटरी म्हणून निवडले. दुसरी परिषद नाशिक येथे भरविण्याचे ठरले होते. ती तयारी करण्यासाठी 'दीनबंधू' पत्राचे मालक रा. बिर्जे हे तेथे जाऊन राहिले. पण दुर्दैवाने

अनुक्रमणिका

त्यांचा वळी कॉलऱ्याने घेतला. परिषदेवर हे मोठेच संकट आले. कॉलऱ्याच्या साथीमुळे नाशकास परिषद भरविणे अशक्य झाले. परंतु काही झाले तरी सुरू केलेल्या उपक्रमात खंड पडू नये या इच्छेने श्री. भास्कररावं मुंबईस गेले व तेथील प्रमुख मराठा मंडळींस भेटून तेंथे दुसरी परिषद भरविण्याचे निश्चित केले. देवास मोठ्या पातीचे तुकोजीराव महाराज यांस अध्यक्ष नेमिले होते. पण ऐनवेळी ते येऊ न शकल्यामुळे श्री. खासेराव जाधव यासच पुन्हा अध्यक्ष व्हावे लागले.

तिसरी परिषद अमरावतीस भरण्याचे ठरले. प्रथमपासूनच म. शि. परिषदेचा व कोल्हापूरचा जिव्हाळ्याचा संबंध होता. श्री. भास्कररावं हे स्वागताध्यक्ष व सेक्रेटरी होते. श्रीशाहूमहाराजांनी धारवाडच्या परिषदेस देणगीही दिली होती. या वेळी एक निराळीच परिस्थिती निर्माण झाली. देवासचे महाराज श्री. तुकोजीराव यांचे नाव अध्यक्ष म्हणून जाहीर झाले; परंतु बडोदेकर मंडळींना कोल्हापूरचे पुढारीपण पसंत नव्हते व त्या दृष्टीने त्यांनी धोरण आखले. बडोद्यापैकी फक्त श्री. खासेराव जाधव यांचाच परिषदेशी निकट संबंध होता. अध्यक्ष निवडण्याच्या अधिकारावरून बडोदा व कोल्हापूर असे पक्ष पडले व शेवटी श्रीतुकोजीराव महाराज हे न आल्याने बडोद्याचे श्री. संपतराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली हे अमरावतीचे अधिवेशन पार पडले.

या वेळी राजकीय वातावरण बरेच गरम झाले होते व त्यातच म. शि. प. च्या या अधिवेशनात बडोदेकरांच्या धोरणामुळे मामुली स्वरूपाचा राजनिष्ठेचा ठराव येऊ शकला नाही. यामुळे म. शि. प. वर अल्पवयातच सरकारी अवकृपा होण्याची चिन्हे दिसू लागली, तेव्हा परिषदेच्या हिताच्या दृष्टीने राज्यकर्त्यांचा दृष्टिकोन स्वच्छ राहावा या दृष्टीने शाहूमहाराजांनी दुसरी परिषद भरवावी अशी श्री. भास्कररावांस आज्ञा केली. शिवाय कोल्हापूरकर मंडळींस व खुद्द श्रीशाहू महाराजांस व्यक्तिशः वैषम्य वाटण्यासारख्या गोष्टी अमरावतीच्या परिषदेत घडल्या होत्या. तेव्हा त्यांचा अशा तऱ्हेचा दृष्टिकोन बनणे साहजिक होते. भास्कररावांचा तर यात व्यक्तिशः अपमान झाला होता; कारण श्रीतुकोजीराव यांस अध्यक्ष करण्यात त्यांचाच पुढाकार होता. परंतु त्यांना दुसरी परिषद भरविणे इष्ट वाटले नाही. कारण त्यांच्यापुढे दुसराच महत्त्वाचा प्रश्न उभा होता. राजनिष्ठेचा ठराव गाळला गेला या गोष्टीला त्यानी मुळीच महत्त्व दिले नाही. परंतु एकंदर सर्वसाधारण मराठा समाजाच्या दृष्टीने दुसरी निराळी परिषद भरविणे ही गोष्ट अत्यंत अनिष्ट होती. यामुळे मराठा समाजात कायमची दुफळी व वैयक्तिक वैमनस्य माजले असते. हा दृष्टिकोन त्यानी श्रीशाहूछत्रपतीना समजावून दिला व छत्रपतींनीही मराठा समाजाचे कल्याण लक्षात घेऊन आपला आग्रह सोडला व हे उपस्थित झालेले वादळ शमले. यावरून श्री. भास्कररावं समाजाचे कल्याण दृष्टीपुढे कसे ठेवीत असत हे स्पष्ट होईल.

पहिल्या महायुद्धाच्या वेळीही भास्कररावं यांची कामगिरी प्रशंसनीय अशी झाली. साम्राज्य सरकारचा पराभव झाल्यास त्याचे दूरवर परिणाम हिंदुस्थानास भोगावे लागतील याची जाणीव सर्व जाणत्या लोकांस होती. यासाठीच महात्माजीही सरकारास आपण होऊन साह्य करण्यास पुढे सरसावले. सर्व संस्थानिकांनीही आपापली जबाबदारी उचलली. अशा वेळी श्रीशाहूमहाराजांचा पाय सर्वांपुढे होता हे लिहावयास नकोच. कोल्हापूरचे छत्रपती म्हणजे मराठ्यांचे आधिदैवत! त्यात शाहूमहाराजांसारखा राष्ट्रपुरुष गादीवर! तेव्हा मराठा समाजावर त्यांचे केवढे प्रभुत्व होते ते न लिहिताही कळण्यासाखे आहे. ब्रिटिश अमदानीत अनेक वर्षे शांततेत गेल्याकारणाने मराठा समाजातील लढाऊ वृत्तीचा लोप झाला की काय, अशी शंका येण्याइतका तो समाज थंड होता. साम्राज्य सरकार मराठ्यांची योग्यता ओळखून होते. त्यानी श्रीशाहूमहाराजांच्या साहाय्याने मराठ्यांची लढाऊ वृत्ती जागृत केली. मराठा पलटणींनी

अनुक्रमणिका

रणांगणावर कसे शौर्य गाजविले याचा इतिहास सर्वांस माहीत आहेच. पहिल्या महायुद्धात 'कुतलअमारा' चा वेढा अतिशय संस्मरणीय असा झाला. या किल्ल्यात जनरल टोनशेंडच्या हुकमतीखालील ६००० मराठा फौज—इतर फौजेबरोबर—वेढली गेली व अन्नाचा तुटवडा पडल्याने कुमक येईपर्यंत किल्ला कसा लढवावा याची पंचाईत पडली. सर्व तऱ्हेचा झाडझाडोरा खाऊन झाला होता व घोडे मारून खाल्ल्याशिवाय दुसरा इलाज शिल्लक राहिला नाही. मराठा पलटणींनी धर्मब्राह्म म्हणून घोड्याचे मांस खाण्याचे नाकारले. सरकार मोठ्याच पंचाईतीत पडले व त्यानी श्रीशाहूमहाराजांस. मराठा पलटणींचे मन वळविण्यास विनंती केली. महाराजांनी ताबडतोब भास्कररावांचा सल्ला घेतला. त्यांनी क्षत्रियांस घोड्याचे मास निषिद्ध नाही व छत्रपतींची आज्ञा हीच धर्माज्ञा आहे असे पुराणातून व इतिहासातून दाखले काढून दिले. त्याप्रमाणे महाराजांनी एक आज्ञापत्र तयार करून 'परत आल्यावर मी तुम्हास माझ्या पंक्तीला घेईन' असे मराठा पलटणींना आश्वासन दिले. त्या वेळी महाराजांची ही आज्ञा खरी आहे हे पटण्यासाठी श्री. भास्कररावांनी त्या पलटणीत असलेले आपले आप्त सुभेदार दत्ताजीराव खानविलकर (नंतर ले. कर्नल) व हवालदार पांडुरंगराव देसाई (नंतर सुभेदार) यांस स्वदस्तुरची पत्रे दिली. ते आज्ञापत्र व ती पत्रे विमानातून किल्ल्यात टाकण्यात आली. मराठा पलटणींनी त्या आज्ञेनुसार घोड्याचे मांस खाल्ले. वेळेवर मदत न येऊ शकल्यामुळे 'कुतल—अमारा' पडला व त्या शूर सेनेस शत्रूच्या कैदेत जावे लागले. महायुद्ध संपल्यावर जेव्हा या मराठा पलटणी परत मायदेशी आल्या त्या वेळी शाहूमहाराजांनी दिलेल्या वचनाप्रमाणें मोठ्या समारंभाने त्यांचेबरोबर सहभोजन केले. यावरून छत्रपती हे मराठ्यांचे धर्ममार्गदर्शक होते हे सिद्ध झाले. या विषयावर श्री. भास्कररावांनी पुढे काही लेखही लिहिले.

संस्थानी वातावरात त्यांचा निभाव लागणार नाही, असे त्यांचा इष्टमित्रांस नेहमी वाटे. पण प्रथमपासूनच त्यांनी आपले कामात सचोटी, सत्यप्रियता, राजनिष्ठा व लोकसेवा यांचा असा काही दर्जा करून ठेवला, की छत्रपतींपासून तो त्यांच्या प्रजाजनापर्यंत त्यांच्या चारित्र्याविषयी, प्रामाणिकपणाविषयी व न्यायप्रियतेविषयी सर्वांची पूर्ण खात्री होती.

कामाशिवाय राजवाड्यावर अंमलदारांनी जाऊन यावयाचे अशी प्रथा संस्थानांतून असे. या प्रथेला श्री. जाधवराव व फारच मोजकी मंडळी अपवाद असत. महाराजांनी बोलाविल्याशिवाय अगर कामाशिवाय ते राजवाड्यावर जात नसत. बरोबर एकादे पुस्तक अगर वर्तमानपत्र असायचे. भेटीस वेळ असेल तर त्याचे वाचन चालू असायचे. ही गोष्ट छत्रपतींच्या लक्षात येताच तेच स्वतः जाधवरावांच्या बंगल्यावर येत व त्यांना घेऊन जात. काम संपल्यावर परत आणून सोडीत.

महाराजांनी श्री. जाधवरावांची पारख बरोबर केली होती. प्रत्येक महत्त्वाच्या कामात ते त्यांचा सल्ला घेत असत. हिंदुस्थान सरकाच्या संस्थान खात्यातील व मुंबई सरकारशी संबंध असलेल्या कामगिरीवर त्यांचीच नेमणूक होई. या कामी जी तसलमात वापरण्यात येई तिचा जमाखर्च ते नियमितपणे सादर करीत. श्रीशाहूमहाराजांचा भास्कररावांवर किती विश्वास होता हे पुढील पत्रावरून दिसून येईल.

Camp Rukadi,
Monday, 18—2—17

My dear Jadhavrao,

अनुक्रमणिका

Let me thank you for helping me with daring and moral courage on Sunday. I do not know what I could have done without you. I wish many my officers could help me like this. Again thanking you for the zeal and courage you showed.

Yours very sincerely,
Shahu Chhatrapati.

सातारा येथे वकिली

कोल्हापूर दरबारच्या नोकरीतून मुक्त होऊन १९२१ साली जाधवराव वयाच्या चोपन्नाव्या वर्षी सातारा येथे वकिली करण्यासाठी आले. सर्वसाधारण हिंदी माणसाचे हे वय म्हणजे विश्रांतीचे. पण सदैव काम आणि व्यासंग यात व्यग्र असलेल्या व्यक्तीस स्वस्थ बसणे शक्य नसते. नियमित दिनचर्या व निर्व्यसनीपणा यामुळे त्यांची प्रकृती निकोप राहून काम करण्याचा उत्साह व व्यासंगी वृत्ती कायम होती.

कायद्याची परीक्षा देऊन तेवीस वर्षे झालेली. तेव्हा पुनः वकिली आणि तीही एका जिल्हा कोर्टात करण्याची पाळी आली. तथापि नेहमीच्या अभ्यासु वृत्तीने त्यांनी कायद्यांच्या पुस्तकांची तात्काळ उजळणी करून आपल्या वकिलीचा थोड्याच काळात चांगला जम बसविला. श्री. रघुनाथराव राणे व श्री. आत्माराम भिकाजी आचरेकर या दोघा तरुणांस मदतीस घेतले.

वकिली करताना जाधवरावानी केवळ पैशाकडे दृष्टी कधीही ठेवली नाही. पक्षकाराची बाजू खरी असून त्याचेवर अन्याय होत आहे असे दिसले तरच ते वकीलपत्र घेत. त्यांचे पक्षकार नेहमी शेतकरी व मागासलेल्या वर्गांतीलच लोक असत. त्या वेळी सर्वत्र ब्राह्मणी वर्चस्व असे. अंमलदार ब्राह्मण, वकील ब्राह्मण व वादीप्रतिवादीही ब्राह्मण अगर शेटसावकार असायचे. अशा परिस्थितीत गरीब शेतकऱ्यास अगर इतर गरिबांस न्याय मिळणे कठीण जाई. चांगला वकील मिळणे तर अशक्यच. तेव्हा पैशाच्या दृष्टीने जाधवरावांना कितपत लाभ होत असेल याची कल्पनाच केलेली बरी. मोबदल्याच्या बाबतीत पक्षकाराच्या ऐपतीवर व प्रामाणिकपणावर ते विश्वास टाकीत. कित्येकदा फीचे पैसे बुडत, पण त्याकडे त्यांनी दुर्लक्षच केले.

तीस वर्षांपूर्वी सातारा जिल्ह्यात वाहतुकीची साधने फारच अपुरी होती. मोटार सर्व्हिस फार तुरळक व फक्त काही तालुक्यांच्या गावांना. राजकीय व सामाजिक जागृती करण्यासाठी जाधवरावांना जिल्हाभर खेडोपाडी दौरे काढावे लागले. मिळेल ते वाहतुकीचे साधन व जरूर तर घोड्यावरून वा पायी जावयाचे, व्याख्याने द्यावयाची, चर्चा करावयाच्या, स्थानिक पुढाऱ्यांना मार्गदर्शन करावयाचे ही कामे त्यांनी उत्साहाने, कार्यनिष्ठेने व निरलसपणे केली. त्यामुळे भास्करररावांचे नाव खेडोपाडी व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत पोहोचले. बहुजनसमाज खडबडून जागा झाला; त्याला आपल्या संख्यासामर्थ्याची जाणीव झाली; शिक्षणाचे व एकीचे महत्त्व पटले.

१९१९ मध्ये हिंदुस्थानास डोमिनियन स्टेटस देण्याकरिता जी पार्लमेंटरी कमिटी बसली होती, त्या वेळेपासून श्री जाधवरावांच्या राजकारणास खरी सुरुवात झाली असे म्हणावयास हरकत नाही. या घटनेचे महत्त्व शाहूमहाराज पूर्णपणे जाणून होते व मागासलेल्या वर्गाचा प्रतिनिधी जर तेथे गेला नाही तर त्या वर्गाचे फार नुकसान होईल याबद्दल त्यांना शंका नव्हती. यासाठी महाराजांनी जाधवरावांस पाठविण्याची

अनुक्रमणिका

सरकारकडे खटपट केली व त्याप्रमाणे ते विलायतेस गेले. तेथे त्यांनी हिंदुस्थातातील बहुजनसमाज म्हणजे काय याची माहिती तेथील लोकांस, विशेषतः लेबर पार्टीच्या सभासदांस करून दिली व मागासलेल्या वर्गांचे प्रतिनिधी न आल्यास बहुजनसमाजाचे नुकसान होईल असे त्यांस पटविले. या बाबतीत त्यांची मुख्य प्रधान मि. रॅमसे मॅक्डोनाल्ड यांचेशी चर्चा झाली. त्या वेळी मॅक्डोनाल्ड म्हणाले की, मागासलेल्या वर्गाने दुसऱ्याच्या मदतीवर अवलंबून न राहता स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे. मजूर पक्षाने कोणाच्या मदतीची अपेक्षा केली नाही. आज तो आपल्या पायावर उभा आहे. त्यांच्या म्हणण्यावर आशय असा की, मजूर पक्षाकडून विशेष मदतीची अपेक्षा करू नये. जाधवरावांनी सांगितले की, 'तुमचे म्हणणे खरे आहे. परंतु मी जरी स्वतःच्या पायावर उभा राहिलो तरी माझ्या मुलाला कार्यक्षम करण्याची जबाबदारी माझेवर राहतेच व तशी मदत करणे हे माझे कर्तव्यच ठरेल. हिंदुस्थानातील बहुजनसमाज अतिशय मागासलेला आहे. त्यास आता कोठे स्वत्वाची जाणीव होत आहे. असा स्थितीत इंग्लंडच्या सत्ताधारी मजूर पक्षाचे हिंदुस्थानातील बहुजनसमाजास साह्य करणे हेच कर्तव्य ठरते. 'इंग्लंडमध्ये केवळ मराठ्यांच्याकरिताच खास जागा मागणे एकंदर धोरणाच्या हिताचे दिसेना. तेव्हा मराठे व तत्सम जातीकरिता त्यांनी तेथे वकिली केली. त्यांच्या खटपटीमुळे मागासलेल्या वर्गास कायदेमंडळात काही जागा मिळाल्या व तेथे बहुजनसमाजाचे तुरळक प्रतिनिधी दिसू लागले.

ब्राह्मणेतर पक्षाची स्थापना व मंत्रिपद

१९२२ साली मुंबई सरकारने त्यांना लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सरकारी सभासदत्व दिले. तेथील प्रत्येक ठरावावर बहुजनसमाजाच्या वतीने सभागृहास त्यांनी माहिती दिली. त्या कौन्सिलमध्ये ब्राह्मणेंतर सभासदांची संख्या अत्यंत थोडी होती. तरीसुद्धा त्यांना पक्षसंघटनेची कल्पना देऊन पुढील निवडणुकीची रूपरेखा आखून दिली.

१९२३ सालची मुंबई कौन्सिल निवडणूक फार महत्त्वाची झाली. सुधारणेचा हप्ता मिळाला, त्यांतील काही खाती लोकनियुक्त मंत्र्यांच्या स्वाधीन केली गेली. कॉंग्रेस पक्षही फारच मोठ्या प्रमाणावर संघटित झाला होता. सत्यशोधक समाज चळवळ व प्रसार यामुळे ब्राह्मणवर्गाचा अत्यंत कडवा विरोध व राग निर्माण झाला. ब्राह्मणेतर उमेदवारास व विशेषतः जाधवरावांना विरोध करून निवडणुकीत यशच मिळू द्यावयाचे नाही असा चंग बांधला गेला. खुद्द सातारा जिल्ह्यात श्री भाऊसाहेब सोमण व रा. ब. रावजी रामचंद्र काळे हे 'जुने आणि जाणते' वकील व अत्यंत वजनदार व्यक्ती यांना उभे करण्यात आले. जाधवराव व खा. ब. कूपर हे ब्राह्मणेतर पक्षातर्फे उभे राहिले.

बहुजनसमाजाने आपले इमान राखले. श्री. सोमण, जाधवराव व खा. ब. कूपर या क्रमाने यशस्वी उमेदवार निवडून आले. मागासलेल्या वर्गात राजकीय हक्कांची जाणीव होऊ लागली व याचा परिणाम म्हणचे कायदेमंडळात ब्राह्मणेतर पक्षाची स्थापना. या निवडणुकीत ब्राह्मणेतर पक्षाचे तेरा सभासद निरनिराळ्या जिल्ह्यांतून निवडून आले. जाधवरावांनी त्यांची पक्षसंघटना करून सरकारास या पक्षास मान्यता देणे भाग पाडले. साहजिकच या पक्षाचे नेतृत्व जाधवरावांच्याकडे आले. पक्षनेते या नात्याने सरकारने त्यांना 'शिक्षण व आरोग्य' मंत्री नेमले.

पक्षाचे सभासद अगदीच अनभिज्ञ व काही तर तरुण. तेव्हा अशा लोकांची संघटना टिकवायची हे अवघड काम होते. परंतु या पक्षाने परिस्थितीच्या मानाने पुष्कळच व चांगले काम केले. त्यांचाच पुढारी

अनुक्रमणिका

मंत्रिमंडळात असल्याने नेहमी या पक्षाला सरकारशी सहकार्य करावे लागे. परंतु बहुजनसमाजाच्या हिताच्याविरुद्ध एखादी गोष्ट घडत असली तर या पक्षाने सरकारच्या विरुद्धही मत दिले आहे. अशा रितीने मागासलेल्या वर्गांचे हित या पक्षाने पाहिले. संख्या लहान, त्यांत पुढारलेल्या वर्गांतील लोकांचा विरोध; अशा स्थितीत सरकारशी मिळते घेण्याशिवाय गत्यंतर नव्हते. या पक्षावर नोकरीच्या मागे लागणारा पक्ष अशी टीका होत असे. परंतु त्यांत वैषम्य वाटण्यासारखे काहीच नाही. सर्व नोकऱ्या वरिष्ठ जातीतील लोकांच्या हाती, त्यामुळे सर्व सत्ता त्यांच्याच हातात तेव्हा मागासलेल्या वर्गाचे नुकसान सहजासहजी करता येत असे. कोणतीही नोकरी ही आपली मत्ता आहे अशी कोणती कल्पना पुष्कळ ब्राह्मणांची होती. यांचे एक ठळक उदाहरण देता येईल. १९२७ साली श्री. सी. रा. तावडे यांची पुणे ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल म्हणून नेमणूक झाली. त्यावर एका ब्राह्मण गृहस्थानी 'अरेरे, एक ब्राह्मण कुटुंब बुडाले!' असे उद्‌गार काढले. या गृहस्थांचे रा. तावडे यांच्याशी शत्रुत्व होते असे नाही. त्यांनी त्यांना कधी पाहिलेही नाही. परंतु नोकरी ही पुढारलेल्या वर्गाचीच मत्ता आहे असा त्यांचा प्रामाणिक समज होता, म्हणून असे उद्‌गार त्यांच्या तोंडातून आले. यावरून समाजाची मनोरचना कशी होती हे स्पष्ट होईल. अर्थात् जर मागासलेल्या समाजाला वर यायचे होते तर त्याला सत्ता मिळाल्याशिवाय ते शक्य नव्हते. तेव्हा त्या समाजात अधिकाधिक नोकऱ्या मिळणे हे समाजहिताच्या दृष्टीने योग्यच होते. म्हणून ब्राह्मणेतर पक्ष केवळ नोकरीच्याच मागे लागला अशी टीका व्यर्थ आहे. नोकरी मिळवणे हे पक्षाचे साध्य नव्हते, तर साधन होते. यामुळे बहुजनसमाजाचा अधिकारी वर्गाबरोबर जास्त संबंध आला व एकंदर प्रगतीच्या दृष्टीने ते योग्यच होते.

जाधवरावांच्या या नेमणुकीने बहुजनसमाजात जरी चैतन्य नि उत्साह निर्माण झाला तरी ब्राह्मणवर्गातून, वृत्तपत्रांतून त्यांच्यावर टीकेचा, उपहासाचा, कुचेष्टेचा नुसता वर्षाव झाला. 'भास्कऱ्या दिवाण झाला' या ध्रुवपदाची अनेक पद्ये रचली जाऊन ती जाहीर मेळ्यांच्या कार्यक्रमांतून गायली जाऊ लागली. अनेक तऱ्हेची व्यंगचित्रे प्रसिद्ध झाली. परंतु जाधवरावांनी असल्या प्रकाराची व अपप्रचाराची दखलसुद्धा घेतली नाही. इतके जरी प्रकार चालू झाले, तरी त्यांनी अधिकाराच्या जोरावर कोणीही ब्राह्मणावर अन्याय केला नाही. ज्याची बाजू जरी असेल मग तो कोणत्याही जातीचा असला तरी त्याच्यासारखा न्याय मिळे. त्या वेळी गोऱ्या नोकरशाहीचा वरचष्मा फार असे. गोऱ्या चिटणिसा (सेक्रेटरी) ला सरळ गव्हर्नर पर्यंत जाता येत असल्याने त्याच्या वरिष्ठ मंत्र्याची फार कुचंबणा होई. जाधवरावांनी आपल्या गोऱ्या चिटणिसाची मिजास कधीच चालू दिली नाही.

जी खाती त्यांच्याकडे होती त्यांची त्यांनी समग्र माहिती करून घेतली. सर्व इलाखाभर दौरे काढले व प्रत्येक प्रकरणाचा स्वतः अभ्यास व चौकशी करून ते निकालात काढले. सरकारी वरिष्ठ नोकऱ्यांतून ब्राह्मणेतर उमेदवारांना शिरकाव मिळावा यासाठी अहर्निश खटपट केली. कौन्सिलपुढे येणारे कोणतेही बिल किंवा ठराव असेल त्याचा सांगोपांग विचार व अभ्यास करून आपल्या पक्षाचे मत ते ठरवीत. ब्राह्मणेतर पक्षाचे संख्याबल लहान असल्याने कित्येक लोकहिताच्या बिलांबाबत त्यांना सरकारी व मुसलमान सभासदांच्या गटांचे साहाय्य घ्यावे लागे.

१९२६ साली पुन्हा कौन्सिल निवडणूक झाली. याच सुमारास ब्राह्मणेतर पक्षात फाटाफूट सुरू झाली. सातारा जिल्ह्यातर्फे जाधवराव पुन्हा निवडणुकीस उभे राहिले. याही खेपेस विरोध काही कमी नव्हता. रा. ब. रा. रा. काळे कराडचे वकील श्री. लक्ष्मणराव देशपांडे व खा. ब. कपूर हे उभे होतेच. शिवाय खास मराठ्यांकडून जाधवरावांना विरोध होऊन मते फुटावी यासाठी सातारा येथील एक तरुण

अनुक्रमणिका

वकील श्री. रा. बा. शिंदे यांना उभे करण्यात आले. श्री. आचरेकर हे कोल्हापूर दरबारच्या नोकरीत होते. तेही रजा घेऊन निवडणुकीस उभे राहिले. त्यांना कोल्हापूरची मदत होती व तिकडच्या मोटरी जाधवरावांस मिळू नयेत अशा खटपटी झाल्या. सातारा जिल्ह्यातील मतदारांवर कोल्हापुरातील त्यांच्या नातेवाईकांकडून दडपण आणण्याचे प्रयत्न झाले. परंतु साताऱ्याने जाधवरावांना पहिल्या नंबराने निवडून दिले व त्यांच्या सेवेचा गौरव केला.

याच निवडणुकीत पुणे जिल्ह्यातून श्रीमंत खासेसाहेब पवार (नंतर ज्यूनिअर देवासाधिपति) हे निवडून आले. त्यांना ब्राह्मणेतर पक्षाने नेता निवडून मंत्रिपद त्यांच्या पदरात पडावे अशी पक्षातील काही सभासदांची मनीषा व खटपट होती. दुही निर्माण झाल्यामुळे ब्राह्मणेतर पक्षास दिवाणपदास मुकावे लागले.

थोड्याच अवधीत श्रीमंत खासेसाहेब यांनी राजकारणातून अंग काढून घेतले. व पक्षात पुन्हा एकी झाली.

दिवाणपदावर नसतानाही जाधवरावांनी कौन्सिलमध्ये पहिल्याप्रमाणेच नरलसपणे काम सुरू ठेवले. ज्या मतदारांनी निवडून दिले, त्यांची बाजू जोरदारपणे पुढे मांडावयाची, त्यांच्या हिताला बाधक अशा कोणत्याही बिलास, ठरावास व कायद्यास कसून विरोध करावयाचा यात अंतर पडू दिले नाही.

१९२८ साली पक्षात एकी झाल्यावर त्यांची पुन्हा दिवाणपदावर नेमणूक झाली. या खेपेस. 'शेतकी, अबकारी व जंगल' ही खाती त्यांच्याकडे सोपविण्यात आली. दिवाण असतानादेखील त्यांचे लेखन, वाचन व व्यासंग सुरूच असे. या वेळची त्यांची विशेष उल्लेखनीय कामगिरी म्हणजे इम्पीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रीसर्चची स्थापना करण्यात घेतलेला पुढाकार ही होय. मंत्रिपदावरून निवृत्त झाल्यानंतरही अनेक वर्षे ते त्याचे सभासद होते. कामातून सवड काढून मराठा शिक्षण परिषद, डेक्कन मराठा असोसिएशन, श्रीशिवाजी मराठा सोसायटी, श्रीशिवछत्रपती स्मारक समिती, सत्यशोधक समाज वगैरे संस्थांची कामे ते पहातच होते.

१९३० सालच्या निवडणुकीत जाधवराव दिल्ली येथील लेजिस्लेटिव्ह असेंब्लीसाठी मध्यविभागा (पुणे, सातारा, सोलापूर, नगर, खानदेश वगैरे जिल्हे) तर्फे उभे राहून निवडून आले. मुंबई कौन्सिलमधील ब्राह्मणेतर पक्षाची सूत्रे त्यांनी पक्षाचे उपनेते सर सिद्धाप्पा टोटाप्पा कंबळी यांच्याकडे सोपविली.

असेंब्लीच्या कामासाठी दिल्ली व सिमला येथे त्यांचे बराच काल वास्तव्य झाले. तेथील हिंदुस्थान सरकारातील एक्झिक्युटिव्ह कौन्सिलर्स, व्हाईसरॉय, इतर वरिष्ठ सनदी अधिकारी व असेंब्लीतील प्रख्यात पुढारी यांच्याशी त्यांचा स्नेह झाला. श्री. नियोगी यांच्या नेतृत्वाखाली स्थापना झालेल्या डेमोक्रॅटिक पक्षाचे ते उपनेते होते. आर्मी बिलाच्या चर्चेच्या वेळी सरकारच्याविरुद्ध मत दिल्यास त्यांच्या द्वितीय चिरंजिवाचे नुकसान होणार हे स्पष्ट दिसत असूनही त्यांनी तसे मत दिले व नुकसान पत्करले. परंतु मोहाला ते बळी पडले नाहीत.

१९३१ साली पहिल्या व दुसऱ्या गोलमेज परिषदेसाठी त्यांची प्रतिनिधी म्हणून निवड झाली व ते दोनदा विलायतेस गेले.

अनुक्रमणिका

राजकारणाचा ओघ वेगळ्या दिशेने वळताच जाधवरावांनी आपले वेगळे कार्यक्षेत्र निवडले. सहकारी चळवळीशी त्यांचा फार पूर्वीपासून संबंध होताच. या कालात त्यांनी विमा कंपन्या व बँका यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास केला.

१९३७ साली जाधवराव पुन्हा राजकारणात पडण्याचा योग आला होता. मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीसाठी परळ विभागातर्फे ते निवडणुकीस उभे राहिले. पण त्यात त्यांना यश आले नाही.

१९३०—३१ नंतर अखिल हिंदुस्थानच्या राजकारणाला निराळे वळण लागले. महात्मा गांधींच्या प्रभावी नेतृत्वाखाली कांग्रेस संघटना बलिष्ठ होऊन इतर लहान पक्ष निष्प्रभ झाले. लिबरल पक्षासारखा जुना व प्रसिद्ध विद्वान पुढाऱ्यांचे नेतृत्व लाभलेला पक्ष जिथे हतप्रभ झाला तेथे ब्राह्मणेतर पक्षासारख्या नवीन व अनभिज्ञ पक्षाचा काय पाड? दुसरेही महत्त्वाचे कारण होते नि ते म्हणजे महाराष्ट्राच्या पाचवीस पूजिलेली आपसातील दुही! १९३० सालानंतर या पक्षास एकत्र संघटित ठेवू शकणारा पुढारीही निर्माण झाला नाही. तेव्हा राजकीय पक्ष म्हणून ब्राह्मणेतर पक्षाची इतिश्री क्रमप्राप्तच होती. ब्राह्मणेतर पक्ष कालांतराने जरी नाहीसा झाला तरी त्यामुळे जाधवरावांचे राजकारण अयशस्वी झाले असे म्हणता येणार नाही. त्यांची दूरदृष्टी इतरांस नव्हती. मागासलेल्या वर्गाचा शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही व ती जबाबदारी घेण्यास लायक होण्याच्या आधी राजसत्ता हाती आली तर बहुजनसमाजाचा तरणोपाय नाही हे त्यांचे मत आज उत्कटतेने खरे ठरले आहे.

सत्यशोधक समाज

बालपणापासून श्री. जाधवरावांस सत्यप्रियता व सत्यशोधनाची आवड होती. त्यातच कै. रामय्या व्यंकय्या अय्यावारू, रा. ब. लोखंडे इत्यादी मंडळींकडून त्यांस म. ज्योतिबा फुले याच्या सत्यशोधक तत्त्वज्ञानाची ओळख झाली. त्यांनी म. फुलेंच्या लिखाणाचे परिशीलन, अभ्यास व चिंतन केले. धार्मिक गुलामगिरीमुळे जातिभेद, वर्णव्यवस्था, अंधश्रद्धा इत्यादी गोष्टी निर्माण होऊन बहुजनसमाज दारिद्र्याच्या, अज्ञानाच्या व वैचारिक अपंगतेच्या गर्तेत खितपत पडला असून त्याला वर काढण्यासाठी प्रथम मानसिक व धार्मिक गुलामगिरी नष्ट झाली पाहिजे हा जो संदेश महात्मा फुल्यांनी दिला त्यात श्री. जाधवरावांस आपल्या सत्यशोधनाच्या उर्मीचे साफल्य सापडले. ब्राह्मणी वर्चस्वाचा व विषमतेचा त्यांच्या वडिलांस झालेला त्रास त्यांस प्रत्यक्ष माहीत होता. अर्धातच महात्मा फुले यांच्या तत्त्वज्ञानातच बहुजनसमाजाचे खरे कल्याण आहे हे त्यास ताबडतोब पटल्यास नवल नाही. एकादी गोष्ट पटली की, त्यात हिरिरीने, आत्मीयतेने आणि निष्ठेने पडावयाचे हा त्यांचा स्वभावविशेष होता. तदनुसार त्यांनी १९११—१२ साली कोल्हापुरास सत्यशोधक समाजाची स्थापना केली. नंतर काही दिवसांनी त्यांना श्री. आण्णा बाबाजी लठ्ठे व प्रो. महादेव गणेश डोंगरे हे सहकारी लाभले. समाजाचे मूलभूत सात नियम तयार करून १९११ सालीं श्री. रामय्या व्यंकय्या यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे पहिली सत्यशोधक समाज परिषद भरविली. हे समाजाचे कार्य त्यांनी अगदी अखेरपर्यंत चालू ठेवले. कारण बहुजनसमाज जबाबदारी स्वीकारण्यास पात्र होण्यासाठी त्यांची मानसिक, आर्थिक व शैक्षणिक उन्नती झाली पाहिजे हे त्यांचे ठाम मत होते.

सत्यशोधक समाजाच्या चळवळीमुळे जी जागृती झाली तिच्यामुळे मागासलेल्या वर्गास माणुसकीची जाणीव होऊन पुढारलेल्या वर्गाविषयी जो न्यूनगंड त्यांच्या ठिकाणी निर्माण झाला होता, त्यावरच आघात

अनुक्रमणिका

झाला. त्या अनुषंगाने ब्राह्मणेतर चळवळही फोफावली. या सर्वांगीण जागृतीस सत्यशोधक समाजाची चळवळ कारणीभूत झाली यात शंका नाही.

सामाजिक सुधारणा आधी की राजकीय सुधारणा आधी हा वाद आता जरी नाममात्र राहिला असला तरी इतिहासाने या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. धार्मिक व मानसिक गुलामगिरी नाहीशी झाल्यावर राजकीय गुलामगिरी टिकाव धरू शकत नाही. यासाठी मनावरचे धार्मिक दडपण प्रथम गेले पाहिजे. हे काम सत्यशोधक समाजाने केले. दुसरी गोष्ट म्हणजे राजकीय सत्ता मिळण्याआधी बहुजनसमाजात शिक्षणाचा प्रसार होणे महत्त्वाचे आहे, नाहीतर सर्व सत्ता गोऱ्या नोकरशाहीऐवजी पुढारलेल्या व पैसेवाल्या लोकांच्या हाती जाऊन बहुजनसमाज तसाच गुलामगिरीत खितपत राहील असे जाधवरावांचे ठाम मत होते. हे मत आता प्रकर्षाने खरे ठरू पहात आहे. इंग्रज गेल्याबरोबर सर्व सत्ता पुढारलेल्या व पैसेवाल्या लोकांच्या हाती गेली असून आजचे आमचे लोकप्रिय म्हणवून घेणारे राज्यकर्ते प्रजेपासून पार दुरावले आहेत. जनतेच्या हिताचे कायदे होत नाहीत. शिक्षणाच्या वगैरे च्या सोयी पूर्वीच्या राजवटीत होत्या त्या आता नाहीशा झाल्या आहेत. शिक्षण ही श्रीमंतांची चैनीची वस्तू झाली असून मागासलेल्या वर्गांस ती एक दुर्मिळ वस्तू झाली आहे. शिक्षण इतके महागडे झाले आहे की, सामान्य माणसाला ते आपल्या मुलाबाळांस द्यावयाची शक्ती राहिली नाही. ही वस्तुस्थिती पहिली म्हणजे जाधवरावांचे मत किती अचूक होते हे ध्यानात येईल. यासाठीच त्यांनी राजकीय आकांक्षेकडे थोडेफार दुर्लक्ष करून समाजाची मानसिक गुलामगिरी कशी नाहीशी होईल व त्यात शिक्षणाचा प्रसार कसा वाढेल याकडे जास्त लक्ष दिले. हे त्यांचे मत कितीही अचूक असले तरी त्यात नेत्रदीपक भपका नसल्याने त्यांची कामगिरी तितकीशी आकर्षक वाटली नाही. शिवाय त्यांच्या समाजसेवेत बुवाबाजी न जाहिरातबाजी यांस बिलकुल थारा मिळाला नाही. मानसिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी त्यांनी आमरण कष्ट केले. तेव्हा आपल्या राजकारणात वा समाजकारणात बुवाबाजीच्या स्वरूपाची गुलामगिरी आणणे त्यांना पसंत पडणे शक्य नव्हते. जे मनाला पटले त्याप्रमाणे करायचे, मग ते लोकांस आवडो अगर न आवडो. आपण सर्वज्ञ आहोत, आपण म्हणू तेच खरे असा हेका त्यांनी कधीच धरला नाही. बुवाबाजीची त्यांना किती विलक्षण चीड होती याचे एक क्षुल्लक दिसणारे असे उदाहरण देता येईल. कोल्हापूरला नोकरी धरल्यानंतर ते विंचवाचे विष उतरविण्याचे प्रयोग करीत. त्यामुळे पुष्कळ लोकांचा समज झाला की, जाधवरावांस मंत्रविद्या अवगत आहे. त्यांनी पुष्कळ सांगून पाहिले की, यात मंत्रतंत्र काही नाही, तुमचा समज अगदी चुकीचा आहे. मी मंत्रतंत्र जाणत नाही. पण लोकांची अंधश्रद्धा इतकी बसली की, ते ही गोष्ट मानावयास तयार होईनात. कोणत्याही तऱ्हेने ही अंधश्रद्धा नाहीशी होत नाही हे पाहिल्यावर त्यांनी विंचू उतरण्याचे सोडून दिले. मित्राप्तेष्टांनी त्याना सांगून पाहिले की, लोकांना जर तुमच्यावरील अंधश्रद्धेमुळे गुण येत असेल तर तुम्ही त्यांचे दुःख का कमी करू नये? त्या वेळी ते म्हणाले की, विंचवाच्या विषापेक्षा हा धर्मभोळेपणा फार घातक आहे. तो ठेवून उपयोगी नाही. ही गोष्ट तें सत्यशोधक समाजाच्या चळवळीत पडण्यापूर्वी अनेक वर्षे आधीची आहे. यावरून अंधश्रद्धेवरील त्यांचे विचार स्पष्ट होतात.

पहिल्या सत्यशोधक परिषदेतील ठराव, भाषणे वगैरे सर्व काम श्री. जाधवराव यांच्याच मार्गदर्शनाखाली झाले. त्या वेळी सत्यशोधक समाज म्हणजे सामान्य लोकांची ब्राह्मणद्वेषाची चळवळ मानले जाई. यामुळे या चळवळीत काम करण्यास मराठा जातीतील नामांकित माणसे राजी नसत. पदवीधर लोकही या चळवळीपासून दूर रहात. अशा बिकट प्रसंगी भास्करराव जाधव एम. ए. एल्एल्. बी. झालेला विद्वान गृहस्थ समाजातील सामान्य माणसांच्या पंक्तीत जेवावयास बसतो हे पाहून सर्व मंडळीस आश्चर्य, आनंद व अभिमान पाटू लागला.

अनुक्रमणिका

एके काळी गाजलेले कुलकर्णी लीलामृत हे पुस्तक भास्करराव जाधव, लठ्ठें, डोंगरे, सबनीस यांच्या खटपटीने कोल्हापुरास प्रसिद्ध झाले. कोल्हापुरांतील सत्यशोधक समाजाच्या चळवळीमुळे तेथे विरुद्ध पक्षात भयंकर खळबळ माजली. जाधव, लठ्ठे, डोंगरे यांना पायबंद घातल्यावाचून ही चळवळ बंद पाडणे शक्य नाही हे हेरून त्या पक्षाने महाराजांपर्यंत तक्रारी नेल्या. याचा परिणाम असा झाला की, उक्त तिघाही व्यक्तींनी १९१४ त सत्यशोधक समाजाचे राजिनामे दिले. याबाबत कोल्हापुराबाहेरील लोकांत गैरसमज होऊ नयें म्हणून भास्कररावांनी श्री. मुकुंदराव पाटलांना पाठविलेल्या ता. १४।१०।१४ च्या पत्रात ते म्हणतात, 'सत्यशोधक समाजाचे काम कोल्हापुरात तूर्त तरी चालविणे अतिशय कठीण झाल्याने आम्हांस तसे प्रसिद्ध करावे लागले. गांवोगावी जाऊन सभा भरवून उपदेश करण्याचे काम बंद ठेवावे लागले आहे. सत्यशोधक समाजासंबंधाने आमची कोणाचीही आस्था कमी झालेली नाही. परिषद किंवा मोठी सभा कोठे भरल्यास पूर्वीप्रमाणेच हजर राहून काम करण्याचा मी प्रयत्न करीन.' ते संकटास डगमगून काम टाकून देणारे गृहस्थ नव्हते. रंग पालटणारेही नव्हते. त्यांचे विचार दूरगामी आणि दृढ असत. त्यामुळेच त्यांना आपल्या धोरणाची धरसोड केल्याचा पश्चाताप करण्याचा किंवा त्या पश्चातापावर शहाणपणाचा मुलामा चढविण्याचा प्रसंगच आला नाही. त्यांच्यामागे दिवाणपदासारखी जबाबदारीची कामे असताही ते वेळ काढून, सत्यशोधक मताचे लेख, पत्रके वगैरे लिहीत असत. समाजसेवेची आत्यंतिक तळमळ त्यांना अखेरपर्यंत होती. शेवटी विकलांग होऊन अंथरुणावर खिळले तरीही सत्यशोधक समाज परिषद भरवून ती पार पाडण्याकडे त्यांनी आपले सर्वस्व केंद्रित केले होते ही गोष्ट सर्वांना विदितच आहे. त्यांच्यासारख्या सुशिक्षित, व्यासंगी विद्वान सत्यशोधक चळवळीस लाभल्याने त्या चळवळीस एक प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त झाली. सत्यशोधक समाजाविषयीची त्याची निष्ठा वरकरणी अथवा हंगामी नव्हती. ती त्यांच्या जीवनाशी एकरूप झाली होती. म्हणूनच जाधवराव म्हणजे सत्यशोधक समाज असे समीकरणच पडले.

काही ब्राह्मण स्नेही

श्री. जाधवराव ब्राह्मणांचे द्वेंष्टे होते असा त्यांच्याबद्दल गैरसमज पसरविण्यात आला आहे. परंतु ते ब्राह्मणांचा ते ब्राह्मण म्हणून कधीच द्वेष करीत नसत. ब्राह्मणांतील पुष्कळ व्यक्तींबद्दल त्यांना आदर होता व पुष्कळ ब्राह्मण सद्गृहस्त त्यांचे खास मित्र होते. त्यांच्या स्वतःच्या इंग्रजी शिक्षणाची सुरुवात पंढरीनाथ सुदामे या ब्राह्मण शिक्षकाच्या हातून झाली हे त्यांच्या आत्मनिवेदनात आलेच आहे. श्री. पंढरीनाथांबद्दल ते अतिशय आदराने बोलत असत. एल्फिन्स्टन हायस्कूलमधील एक शिक्षक श्री. नरहर बाळकृष्ण जोशी यांचे भास्कररावांवर त्यांच्या हुषारीमुळे फार प्रेम होते. त्यांच्याशी भास्कररावांची दाट मैत्री झाली होती. श्री. जोशी त्यांच्याकडे येऊन पाहुणचार घेत. ते सरकारी नोकरीतून मुक्त झाल्यावर काही दिवस सौराष्ट्रात शिक्षकाचे काम करू लागले. त्यानंतर ते श्री. विष्णुपंत विजापूरकर यांनी स्थापन केलेल्या समर्थ विद्यालयात येऊन दाखल होण्याकरिता कोल्हापुरास आले. तेव्हा त्यानी भास्कररावांचा सल्ला घेतला. श्री. भास्कररावांनी त्यांना सांगितले की, 'आपला स्वभाव मला माहीत आहे व समर्थ विद्यालयाच्या चालकांस मी ओळखतो. आपला संबंध या विद्यालयाशी फार काल टिकेल असे मला वाटत नाही.' व तसेच धडले. श्री जोशी यांस त्यांच्या आप्तेष्टांनी समर्थ विद्यालय सोडण्याची कारणे प्रसिद्ध करावीत असा सल्ला दिला. श्री. जोशी यांस तसे करणे पसंत पडले नाही. तथापि खासगी माहितीकरिता म्हणून त्यांनी एक २५–३० पानी टिप्पण तयार करून प्रथम श्री. भास्करराव यांच्याकडे पाठविले व ते पाहून झाल्यावर पुण्यास पाठविण्यास सांगितले. यावरून श्री. जोशी हे भास्कररावांस,जरी ते त्यांचे विद्यार्थी होते तरी, किती मान देत असत हे दिसून येईल

अनुक्रमणिका

श्री. जाधवराय एल्फिन्स्टन कॉलेजचे फेलो असताना काशीचे एक विद्वान पंडित दुर्गाप्रसाद यांचा मुक्काम काही महिने मुंबईत होता. श्री. भास्करराव दररोज त्यांचेकडे जाऊन निरनिराळ्या विषयांवर चर्चा करीत असत. ही चर्चा संस्कृतमध्ये चालत असे; कारण पंडितजीस मराठी अगर इंग्रजी येत नसे व भास्करररावांना हिंदी येत नव्हते. सदर पंडितजी एक प्रख्यात ज्योतिषी होते व त्यांचेकडे मोठमोठे लोक येत असत. श्री. भास्करररावांचा त्यांच्याशी दाट स्नेह जुळला होता तरी त्यानी स्वतःचे भविष्याबद्दल पंडितजीना काहीही विचारले नाही. पंडितजीना फार आश्चर्य वाटले. तसे त्यानी बोलूनही दाखविले. श्री. भास्करररावानी 'आपला ज्योतिषावर विश्वास नाही म्हणून स्वतःबद्दल विचारण्याचे काही कारण नव्हते' असे स्पष्टपणे सांगितले. नंतर पंडितजीनी एक प्रश्नकुंडली स्वतः मांडून (कारण भास्करररावानी जन्मतिथी दिली नव्हती) त्यांची एक मोठी जन्मपत्रिका तयार करून दिली.

सुरतेस त्यांचे वडील रहात होते, त्यांच्या शेजारीच श्री. बाळशास्त्री म्हणून एक विद्वान पंडित रहात असत. ते तेथे शास्त्रार्थ सांगत व पुष्कळ विद्यार्थ्यांस संस्कृत शिकवीत असत. ते दोन्ही डोळ्यांनी आंधळे होते, परंतु त्यांची स्मरणशक्ती फार तीव्र होती. मे महिन्याच्या सुटीत श्री. भास्करररावानी त्यांचेकडे सिद्धांत कौमुदीचा अभ्यास केला.

वेदशास्त्रसंपन्न आर्यांभट साधले हे भास्करररावांचे वेदांताचे गुरु. त्यांचेवर भास्करररावांचे निस्सीम प्रेम होते व ते त्यांस गुरुजी म्हणत असत. गुरुजींचा मुक्काम भास्करररावांकडे महिनोमहिने असे. त्यांचेजवळ त्यानी वेदांतसूत्रे, दशोपनिषद, बृहत् योगवासिष्ठ वगैरे संस्कृत ग्रंथ व विवेकसिंधु, परमामृतासारखे मराठी वेदांतपर ग्रंथ याचे सूक्ष्म अध्ययन केले. गीतेमध्ये वेदांत फार कमी आहे, तेव्हा वेदांतासाठी वरील ग्रंथांचे अध्ययन करणे अवश्य आहे असे गुरुजी यांचे मत होते. ईशमांडुक्य क छांदोग्य उपनिषदे श्री. भास्करररावांना मुखोग्दत होती. श्री. भास्करराव मिनिस्टर असतानाही ऑफिस बंद झाल्यावर ठाकूरद्वारला जितेकरांच्या चाळीव गुरुजींच्या बिऱ्हाडी तास दोन तास घालविल्याशिवाय त्यांचा एकही दिवस गेला नाही.

मूळचे कुरुंदवाडचे व नंतर सांगलीस स्थायिक झालेले श्री. वे. शा. सं. बाबाशास्त्री वाटवे हे एक विद्वान गृहस्थ व नामांकित वैद्य होते. आयुर्वेदाच्या पाठाप्रमाणे ते औषधे तयार करीत असत. तेही भास्करररावांचे आमरण स्नेही होते. ते स्वतः अतिशय कर्मठ होते तरी ते भास्करररावांकडेच उतरत असत व त्यांची स्वतंत्र अशी व्यवस्था ठेविली जात असे. श्री. बाबा वाटवे यांनी 'कल्पित कलिवृत्तादर्श पुराण' या नावाचा एक संस्कृत ग्रंथ लिहिला होता. त्याचे हस्तलिखित त्यांनी प्रथम भास्कररांवांकडे शुद्धीकरणास दिले व नंतर तो छापला. श्री. बाबाशास्त्री यांच्या मरणानंतर त्यांचे पुत्र श्री. भास्करशास्त्री यानीही जुनाच ऋणानुबंध चालू ठेवला होता.

सांगलीचे प्रख्यात राजवैद्य आबासाहेब सांभारे यांचाही भास्करररावांशी असाच अकृत्रिम स्नेह होता. ते कोल्हापूरला आले म्हणजे त्यांचा मुक्काम जाधवरावांच्या बंगल्यावरच असायचा. ते अतिशय निःस्पृह होते.

सुप्रसिद्ध प्रो. राजारामशास्त्री भागवत यांचा श्री. भास्करररावांशी फार स्नेह होता. त्यांचा पत्रव्यवहार नेहमी चाले व ते 'मराठा दीनबंधू' साठी लेखही पाठवत असत. व्याख्यानासाठी ते कोल्हापूरला आले असताना दरबारकडून त्यांची सर्व व्यवस्था ठेवण्यात आली होती. परंतु ते दरबारचे पाहुणे म्हणून न राहता भास्करररावांकडे उतरले.

अनुक्रमणिका

महाड येथील प्राथमिक शाळेत श्री. गोपाळराव जोशी या नावाचे शिक्षक होते. त्यांचे चिरंजीव श्री. पी. जी. जोशी हे एरंडोल येथे प्रसिद्ध वकील आहेत. श्री. जाधवराव मिनिस्टर असताना श्री. पी. जी. जोशी मुंबई कायदेमंडळाचे सदस्य होते व ते ब्राह्मणेतर पक्षावर नेहमी कडक टीका करीत असत. श्री. भास्करराव खानदेशात दौऱ्यावर गेले असताना त्यांनी एरंडोल पेये जाऊन श्री. गोपाळराव जोशीना अचानक भेट दिली. आपला एक काळचा विद्यार्थी एवढ्या मोठ्या पदास चढूनही आपणास विसरला नाही हे पाहून श्री. जोशांना काय वाटले असेल त्याची कल्पनाच केलेली बरी. पी. जी. जोशी जरी राजकारणातील प्रतिस्पर्धी होते तरी त्यांचा व जाधवरावांचा घरोबा तुटला नाही. त्यांचे सहाध्यायी गलांडे हेही त्यावेळी एरंडोलासच रहात असत. त्यांचीही श्री. जाधवरावांनी भेट घेतली. त्यांच्या चिरंजिवास पूर्व खानदेशात नोकरी लागली, त्यावेळी जोशी व गलांडे यांस मुद्दाम जाऊन भेटण्यास बजाविले.

मुंबईचे हायकोर्ट वकील श्री. केशव आपा पाध्ये यांच्याशी तर भास्करारावांचा ४० वर्षांचा स्नेह होता. सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांवर नेहमी बालंटे यायची व लग्नप्रसंगी भटजीस न बोलविल्याकारणाने भिक्षुक वर्गात खूपच खळबळ उडे. आपल्या हक्कावर गदा येत आहे असे दावेही कोर्टात लागले, तेव्हा श्री. पाध्ये वकील यांनी हे दावे कोर्टात लढविले व भटजींच्या हक्कावर गदा येत नाही असे कोर्टाचे निवाडे दिले.

१९१८ साली श्री. श्रीपादशास्त्री हसूरकर आपला अभ्यास आटोपून सांख्यासागर. वेदांतरत्न, न्यायतीर्थ वगैरे पदव्या पटकावून आले. त्यांची व जाधवराव यांची वेदांतावर खूप चर्चा चाले. श्रीपादशास्त्री त्या वेळी नेहमी म्हणत की, आबासाहेबांकडून (भास्करराव) वेदांतासंबंधी फारच शिकण्यासारखे आहे व आपण त्यांचेकडून पुष्कळच शिकलो.

अशी उदाहरणे शेकड्यांनी व हजारोंनी देता येण्यासारखी निघतील. सांगायचे तात्पर्य हेच की, जाधवराव ब्राह्मणांचे द्वेष्ट मुळीच नव्हते. पण ब्राह्मणशाहीचे ते पक्के विरोधक होते. एका जातीने दुसऱ्या जातीवर धार्मिक, सामाजिक अन्याय करावा हे त्यांस खपत नव्हते. याच तत्त्वानुसार क्षात्रजगद्गुरूंच्या निर्मितीस व्यक्तिशः त्यांनी कधीच पाठिंबा दिला नाही. कारण एका भिक्षुकशाहीऐवजी दुसरी निर्माण करणे हे त्यांच्या तत्त्वाच्या विरुद्ध होते.

औद्योगिक कामगिरी

राजकारणनिवृत्ती ठरविल्यानंतर भास्करारावांनी मुंबई यथे 'आराम' नावाची इमारत बांधून तेथे वास्तव केले. वय सत्तरीच्या घरात आलेले. तथापि काम करण्याचा उत्साह कमी झाला नव्हता. वयाच्या मानाने प्रकृती सुदृढ होती. यानंतर त्यांनी व्यापार हे कार्यक्षेत्र निवडले.

ज्याप्रमाणे समाजाला शिक्षणाची व मानसिक गुलामगिरी नष्ट होण्याची जरुरी होती त्याप्रमाणेच समाजाची आर्थिक परिस्थिती सुधारण्याची आवश्यकता होती हे श्री. भास्करराव जाधव यांनी जाणले होते. यासाठी सहकारी चळवळीवर त्यांचा अत्यंत विश्वास होता व ती चळवळ कोल्हापूर संस्थानात प्रथम त्यांनी सुरू केली. ज्यांत समाजहित आहे व ज्यायोगे समाजाची प्रगती होईल असे त्यांना वाटे त्या त्या गोष्टी प्रत्यक्षात उतरविण्याचा ते शिकस्तीचा प्रयत्न करीत असत. सहकारी चळवळीचे महत्त्व पटताच त्यांनी कोष्टी लोकांची एक सहकारी संस्था स्थापन करून त्यांच्याकडून हातमागावर खादी काढविली. या हातमागावरील खादीचे कपडे ते स्वतः पुष्कळ वर्षे वापरीत असत. त्यांनी त्या वेळी परदेशी कापड मुळीच

अनुक्रमणिका

वापरले नाही, असे म्हणण्यास हरकत नाही. महात्मा गांधींच्या चळवळीत खादीला प्राधान्य दिले गेले व खादीचे महत्त्व त्या वेळी लोकांस पटून ती वापरणे हे देशभक्तीचे एक ठळक लक्षण मानले जाऊ लागले. श्री. भास्करराव महात्माजींच्या खादी चळवळीआधी कित्येक वर्षे खादी वापरीत असत हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

सहकारी चळवळ त्यांनी चालू केली व अखेरपर्यंत ती त्यांनी चालविली. कोणताही नवा उपक्रम सुरू करायचा म्हटले की आपल्या देशात त्यात अनेक अडचणी निर्माण होतात. पुढे त्याची उपयुक्तता जनतेस पटली म्हणजें त्याचा प्रसार सुगम होतो. भास्करररावांनी सुरू केलेली सहकारी चळवळ पुढे चांगली फोफावली. याचे श्रेय भास्कररावांना देणेच वाजवी ठरेल.

१९३०–३१ साली गोलमेज परिषदेकरिता जाधवराव विलायतेस गेले तेव्हा त्यांनी इंग्लंड व स्कॉटलंड येथील अनेक सहकारी संस्थांना मुद्दाम भेटी देऊन त्यांच्या कामकाजाची माहिती घेतली होती. परदेशातील औद्योगिक चळवळीकडे त्यांचे कटाक्षाने लक्ष असे. त्यांचे चिरंजीव कर्नल विठोजीराव जपानमधून परत आल्यावर तिकडील औद्योगिक विकासाची माहिती घेऊन श्री. जाधवरावांनी मच्छीमारीसंबंधी 'को–ऑपरेटिव्ह फिशरिंग इन जपान' या मथळ्याखाली बॉंबे को–ऑप. क्वॉर्टर्लीमध्ये एक माहितीपूर्ण लेख लिहिला होता.

बॉंबे प्रॉ. को–ऑ. बँकेचे ते पुष्कळ वर्षे डायरेक्टर होते. को–ऑ इन्स्ट्ट्यूटचे ते अध्यक्ष होते. सहकारी चळवळीचे ते एक तज्ज्ञ म्हणून समजले जात होते. ग्वाल्हेर संस्थानात सहकारी चळवळीबाबत नेमलेल्या समितीचे ते एक सदस्य होते. मराठा शि. प. तर्फे स्थापन झालेल्या मराठा एज्युकेशनल को–ऑ. सोसायटीचे ते प्रमुख संस्थापक असून मुंबई मराठा मार्केट पीपल्स को–ऑ. बँक ही त्यांच्याच देखरेखीखाली स्थापन झाली. या बँकेच्या व्यवहारात त्यांनी जातीने लक्ष घालून ती ऊर्जितावस्थेत आणली व तिचे कार्यकर्ते तयार केले. ता. २३।४।१९३९ रोजी तिच्या संचालक मंडळावरून निवृत्त होताच बँकेने त्यांचा फारच मोठा सत्कार करून त्यांना मानपत्र अर्पण केले. अखेरपर्यंत ते बँकेच्या सल्लागार मंडळावर होते.

आज औद्योगिक क्षेत्रात महत्त्व प्राप्त झालेल्या व भरभराटीस चढलेल्या अनेक संस्थांचे जाधवराव संस्थापक व प्रणेते होते. अशा संस्थांत कोल्हापूरच्या कोल्हापूर स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक (आता कोल्हापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल का–ऑप. बँक), शेतकरी सहकारी संघ, कोल्हापूर को–ऑपरेटिव्ह होलसेल सोसायटी, कोल्हापूर को–ऑप. ॲग्रिकल्चरल इम्प्लीमॅट सोसायटी व बॉंबे प्रॉव्हिन्शीयल को–ऑप. मॉर्केटिंग सोसायटी, बॉंबे प्रॉव्हिन्शीयल को–ऑप. लँड मॉर्गेज बँक, बॉंबे को–ऑप. इन्श्यु. सोसायटी या संस्थांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

सहकारी चळवळीचे शिक्षण देणारी एकही संस्था नाही ही उणीव लक्षात घेऊन जाधवरावांनी करवीर इलाखा सहकारी मंदिर ही संस्था स्थापन केली व एक फार मोठी उणीव दूर केली.

या कालात भास्कररावांचा इतर बँकांशीही संबंध आला. इंटरनॅशनल बँक ऑफ इंडियाच्या पहिल्या संचालक मंडळाचे ते अध्यक्ष होते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मुंबई प्रांताच्या संचालक मंडळावरही त्यांनी काम केले होते.

अनुक्रमणिका

विभा क्षेत्रातही भास्कररावांचे लक्ष होतेच. इंडियन ग्लोब, वॉर्डन, विक्रम वगैरे विमा कंपन्यांच्या संचालक मंडळांचे ते अध्यक्ष व अनेक वर्षे डायरेक्टर होते.

पुण्याच्या डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनने भास्कररावांना विद्यार्थीदशेत काही अल्पकाल शिष्यवृत्ती दिली होती. या संस्थेबद्दल त्यांना सदैव कृतज्ञता वाटत असे. या शिष्यवृत्तीची त्यांनी अनेकपटींनी फेड केली. या संस्थेचे ते अनेक वर्षे सेक्रेटरी, अध्यक्ष व शेवटी विश्वस्त होते. या संस्थेबाबतच्या कृतज्ञतेंचे प्रतीक म्हणून त्यांच्या कुटुंबियांपैकी अनेक व्यक्ती या संस्थेच्या तहहयात सभासद आहेत.

त्याचप्रमाणे मराठा भ्रातृमंडळ, श्रीशिवाजी मराठा सोसायटी या संस्थांशी त्यांचा सुरुवातीपासून सतत संबंध होता. या सर्व शैक्षणिक व सामाजिक चळवळींचा प्रभाव अखिल महाराष्ट्र, वऱ्हाड येथे पडून अनेक शिक्षणसंस्था व वसतिगृहे अस्तित्वात आली. शिक्षणाचा प्रसार बहुजनसमाजात अशा प्रकारे होऊ लागला व त्याचा परिपाक म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील यांची रयत शिक्षणसंस्था व मुंबईची बॉंबे एज्युकेशन लीग (आता मराठा मंदिर) या संस्था होत. या संस्थांशी श्री. भास्कर्राव यांचा अत्यंत निकटचा संबंध होता.

मुंबईच्या मोशन पिक्चर सोसायटीचे ते काही वर्षे अध्यक्ष होते.

कोल्हापूरच्या नगर वाचनमंदिराशी त्यांचा घनिष्ट संबंध होता. ज्या इमारतीत सध्या हे वाचनालय आहे ती इमारत भास्कररावांच्या देखरेखीखाली बांधण्यात आली. प्रा. राजारामशास्त्री भागवत वगैरेंची व्याख्याने या संस्थेमार्फत होण्यास जाधवरावांचेच परिश्रम कारणीभूत आहेत. संस्थेचा वृत्तांत प्रसिद्ध करण्यासाठी जी समिती नेमण्यात आली होती त्यात भास्कररावांचा समावेश करण्यात आला होता. संस्थेचे ते उपाध्यक्ष व अध्यक्षही होते. त्यांच्या कारकीर्दीत संस्थेत अनेक उपयुक्त सुधारणा झाल्या.

साहित्यविषयक कार्य

जाधवरावांचा पिंड साहित्यिकाचा नसला तरी विचाराची बुद्धिवादी बैठक नि समाजातील अन्यायाबद्दलची स्वाभाविक चीड यांमुळेच त्यांनी लेखन केले. ते तळमळीतून उत्स्फूर्त झाले असल्याने वाचकांवर त्याचा इष्ट तो परिणाम घडून आला. समाजात पूर्वी घर करून राहिलेल्या अनेक समजुतींना व कल्पनांना त्यांच्या लिखाणाने धक्के दिले व त्यामुळेच त्यांचे लेखन सदैव खळबळ माजविणारे झाले. 'रामायणा' वर त्यानी एक छोटासा लेख लिहिला नि त्याने एवढी खळबळ माजविली की, त्यांचे अक्षरशः रामायण झाले. 'रामायणा' चे संशोधन आणि अभ्यास आपण कोणत्या दृष्टिकोनातून केला याची कल्पना प्रस्तुत ग्रंथात श्री. जाधवरावांनी अनेकदा दिली आहे. याच विषयावर व्याख्यान देताना त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली होती. ते म्हणाले, 'मी सत्यशोधक आहे. सत्याचा शोध करीत राहायचे ही एक मला खोड लागली आहे. 'बाबावाक्यं प्रमाणम्' अशी माझी मनोवृत्ती काही दिवस होती. या वृत्तीने लहानपणी भाबडेपणाने पुराणे वाचली, देवळात जाऊन श्रवणही केली. पण पुढे इंग्रजी विद्येशी परिचय होऊ लागला आणि पूज्य रामय्या व्यंकटय्यासारख्या विचारवंतांचे उदाहरण डोळ्यांसमोर आल्याने कोणत्याही गोष्टीची छाननी करावी अशी इच्छा होऊ लागली. भोळ्याभाबड्या बहुसंख्य अशा अडाणी लोकांची धर्मश्रद्धा कायम आहे. धर्मभोळेपणा आमच्या लोकांत पद्धतशीरपणे पसरविण्यात आला आहे. तो कायम राहावा म्हणून

अनुक्रमणिका

हरदास, भजनी मंडळे, नाटककार, सिनेमावाले वगैरेंचे प्रयत्न चालू आहेत. धर्मग्रंथांत सांगितलेल्या गोष्टींची चिकित्सा मुळीच करावयाची नाही, त्यांतील खरे–खोटे, संभवनीय–असंभवनीय यांचा विचार करता कामा नये ही भावना झाल्यामुळे जे लिहिले असेल ते भक्तिभावाने खरे मानावयाचे अशी सवय लागून आमची विचारशक्ती नष्ट झाली. पुष्कळच वर्षे न वापरलेल्या शस्त्रावर जशी तांब चढते तशी स्थिती आमच्या बुद्धीची झाली आहे. धर्माचे दडपण झुगारून दिल्याशिवाय आमच्या प्रगतीच्या वाटा मोकळ्या होणार नाहीत ग्रहणे कशी लागतात याची उपपत्ती समजली असूनही आजचे काही विद्वान ग्रहणात स्नान करून जप करीत आहेत; ग्रहण सुटण्यासाठी राहूकेतूच्या नावे दाने देत आहेत; म्हणून आम्हाला प्रथम बुद्धिस्वातंत्र्य मिळविले पाहिजे. आमच्या धर्मग्रंथांचा अभ्यास जिज्ञासू बुद्धीने करणे देशोन्नतीच्या दृष्टीने आवश्यक आहे.

त्यांनी जे लेखन केले ते या भूमिकेवरूनच केले. आपले मत अगर विचारसरणी व्यक्त केली असता बहुजनसमाजाचे हित होईल त्याची प्रगती होईल, त्याची ज्ञानलालसा वाढेल ही आत्यंतिक तळमळच त्यांना लेखनास उद्युक्त करी. आपणास जे पटेल तेच बोलायचे हा त्यांचा स्वभाव त्यांच्या साहित्यातही उत्कटतेने–आढळतो जे प्रामाणिकपणे त्यांना वाटले ते कुणाचीही पर्वा न करता धैर्याने त्यांनी मांडले. म्हणूनच त्यांच्या निखाणात मौलिकता अधिक आहे.'

त्यांचे साहित्य फारच थोडे आहे. पण त्याचे सामर्थ्य जबरदस्त आहे. याचमुळें साहित्यिकांतही ते मान संपादू शकले. संस्कृतचा गाढ व्यासंग आणि संशोधक वृत्ती यांचा प्रत्यय बहुतेक त्याच्या लिखाणात प्रकर्षाने येतो. या त्याच्या गुणांचा गौरव, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या बत्तिसाव्या वार्षिक समारंभाचे अध्यक्षस्थान त्यांना देऊन करण्यात आला. या प्रसंगी त्यांनी जे भाषण केले ते आजही वाखाणले जात आहे. सामान्यपणे अशा अध्यक्षपदावरून चार साहित्यविषयक गप्पा मारल्या जातात असा अनुभव आहे. ही भाषणे थोड्याच कालावधीनंतर बहुधा विसरली जातात. परंतु भास्कररावांनी 'मराठे व त्यांची भाषा' या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण, मार्गदर्शक, संशोधनपर व नवे विचार मांडणारे बहारदार भाषण केले व एक नवीन प्रथा पाडली असे म्हटले तर ते खास अतिशयोक्तीचे ठरणार नाही. हे भाषण मुळातूनच वाचले पाहिजे. मराठ्यांचा इतिहास, त्यांच्या चालीरीती, इतर प्रांतांपेक्षा महाराष्ट्रात दिसून येणारी वैशिष्ट्ये, मराठ्यांची नावे, मराठ्यांचे देव, मराठ्यांची भाषा इत्यादी अनेक विषयांची सोपपत्तिक व साधार चर्चा या प्रबंधात करण्यात आली आहे. या व्याख्यानाच्या संशोधनपर स्वरूपामुळे त्यास महत्त्व प्राप्त झाले असून त्या विषयावरील अधिकारी वाङ्मय म्हणून अजून त्याचा निर्देश केला जातो.

व्यक्तिगत मतांत ते पुरोगामी होते. श्री. र. धों. कर्वे यांच्या कार्याविषयी व ध्येयनिष्ठेविषयी त्यांना फार आदर व कौतुक वाटे. 'समाजस्वास्थ्य' मासिकात त्यांचे लेख प्रसिद्ध होत व त्या मासिकाचे ते प्रथमपासून नियमित वाचक व वर्गणीदार होते. 'र. धों.' नी सुरू केलेले कार्य हे अत्यंत उपयुक्त असून त्यात समाजाचे कल्याण आहे, असे त्यांचे स्पष्ट मत होते.

भास्कररावांचे स्फुट लेखनही बरेच आहे. ऐतिहासिक, पौराणिक व सामाजिक अशा विविध विषयांवर त्यांनी लेखन केले. संस्कृतज्ञ असूनही अगदी सोपी पण परिणामकारक मराठी भाषा ते लिहीत व बोलत. भाषा सोपी असण्याकडे त्यांचा कटाक्ष असे. सोपी भाषा कशी असावी असे त्यांचे एक स्नेही गु. बाबर यांनी त्यांना विचारले. तेव्हा ते म्हणाले की, तुम्ही आपला लेख प्रथम आपल्या बायकोस वाचून दाखवा. तिला जे शब्द समजणार नाहीत त्यांच्याऐवजी तिला समजतील असे शब्द वापरा म्हणजे तुमची भाषा आपोआप सोपी होईल. विषयाची तयारी, तर्कशुद्ध मांडणी, मुद्देसूदपणा व विचारांची सखोलता ही त्यांच्या

अनुक्रमणिका

लेखनवक्तृत्वाची वैशिष्ट्ये होत. महाराष्ट्रात सर्वत्र त्यांची अनेक जाहीर व्याख्याने झाली आहेत त्यात पुणे येथील श्री. चित्रावशास्त्री यांच्याशी झालेला जाहीर वाद फारच गाजला.

१९३५ साली श्री. वि. स. खांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईस भरलेल्या साहित्य संमेलनाचे भास्करराव स्वागताध्यक्ष होते.

'तर्खडकर प्राइझ' साठी जी निवड समिती होती तिचे भास्करराव बरीच वर्षे सभासद होते.

श्री. भास्करराव‌ांनी लिहिलेल्या लेखांपैकी काही महत्त्वाचे नि निवडक लेख व ते कोठे प्रसिद्ध झाले हे पुढे देत आहोत. जिज्ञासूंनी ते लेख अवश्य वाचावेत. म्हणजे श्री. जाधवराव यांचे अनेक लेखनविशेष, त्यांची विशिष्ट शैली व समाजहिताची दृष्टी यांचा वाचकांना उत्कृष्ट परिचय घडेल.

१. मराठे व त्यांची भाषा : विविधज्ञानविस्तार, ऑगस्ट–सप्टेंबर, १९३१.
२. एकलिपी : ज्ञानमंदिर
३. श्रीशंकराचार्यांचे जगद्‌गुरुत्व : ज्ञानमंदिर, १ ऑगस्ट, १९३५
४. जगद्‌गुरू श्रीशंकराचार्य : ज्ञानमंदिर, १५ मार्च, १९३५
५. वेदोत्पत्तीवर नवा प्रकाश : महाराष्ट्र शारदा, ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर १९३७, जानेवारी, १९३८
६. महादेव : किर्लोस्कर, जानेवारी, १९४४

पुनश्च करवीर

१९४० माली श्रीराजाराम छत्रपती महाराज निवर्तल्यानंतर कोल्हापूरला रीजन्सी कौन्सिलची कारकीर्द सुरू झाली. १९४५ च्या सुरुवातीस मि. ए. एन. मिचेल, ओ. बी. ई., आय. सी. एस, हे रीजन्सी कौन्सिलमध्ये पंतप्रधान होते. कौन्सिलचे एक मंत्री रा. ब. डॉ. पी. सी. पाटील यांची कारकीर्द संपल्यावर त्यांच्या जागी रेव्हेन्यू मिनिस्टर म्हणून येण्यासाठी पंतप्रधाननी जाधवरावाना पाचारण केले. त्या पत्रास असेही लिहिलें की, 'आपण करवीर दरबारचे एक जुने व अनुभविक अधिकारी असल्याने बाल छत्रपतींच्या नव्या राजवटीची घडी बसविण्यासाठी दरबार आपणास पाचारण करीत आहे.

एप्रिल १९४५ मध्ये जाधवराव रीजन्सी कौन्सिलमध्ये रेव्हेन्यू मिनिस्टर म्हणून दरमहा पंधराशे रुपये पगार व दोनशे रुपये वाहनभत्ता यावर दाखल झाले. तेथील काम त्यांना अपरिचित नव्हतेच. शिवाय मुंबई इलाख्यात दोनदा मंत्रिपदावर काम केल्याचा अनुभव होताच. आपल्या खात्याची सूत्रे हाती घेताच सर्व शिलकी कामे प्रथम निकालात काढली. तत्पूर्वीच्या राजवटीत ज्यांच्याबाबत धडधडीत अन्याय झाले होते त्या व्यक्तींना शक्य ती कायदेशीर मदत देऊन त्यांची प्रकरणे रीजन्सी कौन्सिलमध्ये धसाला लाविली.

रीजन्सी कौन्सिलच्या बैठकीपूर्वी त्या बैठकीत पुढे येणाऱ्या सर्व कामांबाबत कागदपत्रे वाचून त्यावर ते टीपा तयार करीत व नंतर आपली मते प्रतिपादन करीत. याच कालात त्यांचे चिरंजीव कोल्हापूर स्टेट फोर्सचे कमांडंट होते. त्यांच्याविषयी जे ठराव रीजन्सी कौन्सिलपुढे आले त्या ठरावांवर मत देण्याचे त्यांनी नाकारले. आपल्या निःस्पृहपणास बाध येईल अशा सर्व गोष्टी ते कटाक्षाने टाळीत.

अनुक्रमणिका

१९४६ च्या ऑगस्टमध्ये त्यांची नजर अधू होऊ लागली. आपणास ऑफिसात समाधानकारक काम करता येत नाही असे वाटताच त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्या वेळचे कोल्हापूरचे पंतप्रधान सर ऑस्टिन व पोलिटिकल एजंट कर्नल हार्वे यांनी त्यांना कामावर राहण्याचा फार आग्रह केला; पण कामात ढिलाई किंवा चुकारपणा हा त्यांच्या मनाला मानवण्यासारख्या नसल्याने सप्टेंबर १९४६ पासून त्यांनी काम सोडले.

रामराम पाव्हणं

जवळजवळ पाऊण शतक सतत वाचन–लेखन यांत मग्न असलेल्या, ज्ञानार्जन हाच नाद, व्यासंग हेच व्यसन आणि तत्त्वचिंतन हाच छंद केलेल्या व्यक्तीच्या मनाला अधू दृष्टीमुळे वाचन बद होताच किती यातना झाल्या असतील! पण भास्कररावांनी आपल्या मनाची, नेहमीच्या आयुष्यविषयक तत्त्वज्ञानाने तयारी केली. आपल्या बंगल्यात होणारा आपला वावर कोणाच्याही मदतीशिवाय करता यावा याचा त्यांनी सराव केला. जन्मभर स्वतःची कामे स्वतः केलेली, ती अंधत्व आल्यावर दुसऱ्याकडून करवून घ्यावयाची ही कल्पना त्यांना सहन झाली नाही. नजर उतरली तरी स्वावलंबनाची हिंमत उतरली नाही. शेवटच्या आजारापर्यंत सर्व विधी, कपडे बदलणे, आपले टाइम–पीस रोज रेडिओबरोबर लावून त्यास चावी देणे, आपले दाढींचे सामान वापरून, धुऊन, पुसून ठराविक जागी ठेवणे वगैरे बाबतींत ते पूर्ण स्वावलंबी होते. स्वतः वाचण्याचे बंद होताच दुसऱ्याकडून वाचून घेण्याचे सुरू केले. हे वाचन करण्यास मराठी चौथीत असलेल्या नातीपासून थोरापर्यंत कोणीही चाले. कोणी उच्चार चुकीचा केला तर थांबवून शांतपणे दुरुस्त उच्चार सांगत.

या कालात घराव्यतिरिक्त एकच विरंगुळ्याची जागा म्हणजे सर र. व्यं. सबनीस यांचा 'श्रीराजाराम प्रसाद.' तेथे रोज संध्याकाळी दोन अडीच तास बैठक. सरसाहेबांच्या माडीवर पोहोचेपर्यंत पाच वळणे व एक गोल जिना असे. पण भास्करराव तो सरावाने न अडखळता जात व येत. दोघांचा पंचावन्न वर्षांचा स्नेह. एकाच मालकाच्या सेवेत दोघांनी पाव शतक घाळविले. दोघेही संस्कृताचे प्रेमी. संस्थानी बुजबुजाटात नोकरी करूनही दोघे अपहार, अन्याय आणि अभिलाष यांपासून अलिप्त राहिलेले श्रीशाहूछत्रपतींचे हे शेवटचे दोन शिलेदार जुन्या आठवणी रंगवीत काव्यशास्त्रविनोदात मग्न होऊन आयुष्याचा संध्याकाल व्यतीत करीत असत.

१७ सप्टेंबर, १९४८ रोजी सरसाहेबांनी या जगाचा निरोप घेतला. भास्कररावांचा अखेरचा समवयस्क स्नेही आणि घराबाहेरील एकमेव विसाव्याची जागा गेली.

त्र्याऐंशीवे वर्ष वयाला लागलेले, पण एक दृष्टी सोडून बाकी भास्कररावांची प्रकृती चांगली होती. गच्चीत नियमित फेऱ्या घालणे व ठराविक आसनांचा व्यायाम १९५० च्या पंधरा मेपर्यंत सुसूत्रतेने चालू होता.

१६–१७ मेची रात्र. पहाटे अडीच वाजता भास्कररावांना पक्षघाताचा पहिला झटका आला. डावी बाजू लुळी पडली. वाचा अडखळू लागली. शक्य असलेले सर्व वैद्यकीय उपाय सुरू झाले. त्या वेळी त्यांची पुतणी डॉ. सौ. सरल भोसले ही कोल्हापूरच्या दवाखान्यात लेडी डॉक्टर होती. तिने जातीने शुश्रुषा केली. तिला नोकरी सांभाळून शुश्रूषा करणे शक्य नव्हते. तेव्हा भास्कररावांची डॉक्टर कन्या राजकोटहून आल्यावर तिने शुश्रुषा आपल्या हातात घेतली. अशा विकलावस्थेत त्यांच्या मनात तळमळ कसली तर

अनुक्रमणिका

त्यांच्याच प्रेरणेने ता. २८ मे रोजी भरणारी सत्यशोधक समाज परिषद! त्या परिषदेसाठी स्वतःचे भाषण तसल्या अवस्थेत लिहवून घेतले. त्याचा मथळा 'रामराम पाव्हणं' असा होता. जणू काही आपल्या बरोबर खांद्यास खांदा लावून काम केलेल्या सहकाऱ्यांचा त्यांना व्यक्तिशः शेवटचा निरोप घ्यायचा होता. स्वतःस परिषदेला जाता येणे शक्य नव्हते म्हणून चिरंजिवांना पाठवून ते भाषण वाचले गेले भाषण वाचले जात असताना सारा श्रोतृवंद गहिवरून आला. समाजसेवेची ही तळमळ आणि तत्त्वनिष्ठेची ही परिसीमा!

जूनच्या पहिल्या तारखेस त्यांच्या सर्वात कनिष्ठ कन्येचे लग्न ठरले होते. स्वतःची ही अवस्था पाहून सर्व कुटुंबात काळजीचे आणि चिंतेचे वातावरण पसरले आहे असे दिसताच त्यांनी सर्वांना सांगितले की, या लग्नात विघ्न येणार नाही. त्याप्रमाणे कार्य पार पडले.

उतार वयात पक्षघाताचा झटका म्हणजे किती यातना व किती क्लेश! पण ते त्यांनी वीरवृत्तीच्या कठोरतेने सहन केले. सर्व उपाय निमूटपणे करवून घेतले.

जूनच्या दुसऱ्या व तिसऱ्या आठवड्यात त्यांच्या स्थितीत अनुकूल असा फरक दिसून आला. वाणी पुष्कळच सुधारली; डावा हात व पाय त्यांना वर उचलता येऊ लागला. सर्वांना आशा वाटली. पण विधिघटना वेगळी होती.

भास्करराव एखाद्या तत्त्वज्ञासारखे जगले आणि तत्त्वज्ञासारखीच त्यांनी हा देह सोडण्याची तयारी केली. सर्वांना जवळ बोलावून 'मी माझ्या आयुष्यातील सर्व जबाबदाऱ्या संपविल्या आहेत. माझी कसलीही इच्छा अतृप्त राहिलेली नाही. माझ्यासाठी रडण्यासारखे मी काही करून ठेविले नाही. माझ्या अवसानानंतर कसल्याही तऱ्हेचा धार्मिक विधी करायचा नाही. अस्थी पंचगंगेतच सोडायच्या,' असे खऱ्या सत्यशोधकासारखे उद्‌गार काढले.

पंचावन्न वर्षे जिने त्यांच्या आयुष्याची सोबत केली, संसार उभा करून तो पतीला झळ न लागू देता केला त्या सहचारिणीला त्यांनी तितक्याच संथपणाने सांगितले, 'तुझ्या आणि माझ्या सर्व जबाबदाऱ्या संपल्या आहेत. आपल्या दोघांच्या भाग्यासारखं भाग्य कोणाचं आहे? आपली सर्वच मुलं गुणी, प्रेमळ व आज्ञाधारक आहेत. यापरत तुला काय पाहिजे? माझ्यासाठी दुःख करायचं नाही.'

यानंतर त्यांनी संसारातून मन काढून घेतले. निरवानिरवीची अशी कोणतीही गोष्ट काढली नाही. जरुरीपुरते बोलत, पण कशात जीव गुंतला आहे असे त्यांनी दर्शविले नाही.

शनिवार ता. २३ जूनपासून त्यांना उचकी सुरू झाली. कोणत्याही उपायाने ती बंद होईना. तीन दिवसरात्र उचकी सहन केली.

सोमवार ता. २६ जून रोजी रात्री ९-४० वाजता जमलेल्या सर्वांकडे एकवार पाहिले. उजवा हात वर करून 'आशीर्वाद' हा शब्द उच्चारला आणि त्या महान विभूतीने या नश्वर जगाचा त्याग केला.

अनुक्रमणिका

व्यक्तिविशेष

श्री. जाधवराव यांच्या स्वभावाचे परिशीलन केल्याशिवाय त्यांच्या सर्व कार्याचे स्वरूप समजणार नाही. लहानपणापासून त्यांचा स्वभाव शांत, काहीसा अबोल व परक्या व्यक्तीस घुमा वाटण्यासारखा असे जात्याच ज्ञानसंपादनाकडे जबरदस्त ओढा असल्यामुळे मिळेल तो सारा वेळ ते विद्यार्जनात व्यतीत करीत. त्यांची मनोरचना पूर्वीपासून तत्त्वप्रधान होती. आपले कांम, अखंड वाचन-लेखन, यांत ते कायावाचामनेकरून सर्वस्वी गुंतलेले असत. सरकारी काम सांगोपांग आणि कसोशीने करून बाकीचा वेळ वाचनात जाई. भेटीत आलेल्या व्यक्तींशी कामापुरते, मुद्द्यास धरून व बेतशीर बोलत. याव्यतिरिक्त कधी मित्रमंडळींचा, गप्पाष्टकांचा अड्डा नाही, क्लब जिमखाना नाही की पत्ते, गंजिफांची चक्की नाही. घरात काही पाहणे, व्यवस्था करणे, किंवा धोरण आखणे या दृष्टीने संसार असा त्यांनी केलाच नाही. १९०५ सालापर्यंत महिन्याचा पगार कचेरीतील शिपाई त्यांच्या वडिलांकडे आणून देई. त्यांच्यानंतर घरचा सर्व कारभार 'मोठ्या आई'—त्यांच्या मातोश्री १९१५ पर्यंत पाहत. त्यानंतर त्यांच्या पत्नी 'मानीसाहेब' या गृहव्यवस्था पाहत. त्यात भास्कररावानी कधीही लक्ष घातले नाही किंवा मतभेद दर्शविला नाही. आपला ठराविक पोषाख – मलमलचा पटका, बंद कॉलरचा कोट, सदरा, इराफ विजार, पायांत वहाणा अगर स्लिपर किंवा शू हा बाहेर जाण्याचा व घरात धोतर व खादीचा अगर ट्विलचा सदरा व वहाणा त्यांनी अखेरपर्यंत कायम ठेवला. मिनिस्टर झाले तरी या पोषाखात बदल झाला नव्हता. फक्त १९१९ साली विलायतेत काही सूट वापरले, पण दुसऱ्या खेपेस म्हणजे १९३० व १९३१ साली विलायतेतही आपला हिंदी पोषाख कायम ठेवला.

श्री. भास्करराव यांचा पिंडच तत्त्वज्ञान्याचा होता. तत्त्वांची केवळ पोपटपंची त्यांनी कधीही केली नाही तर ते त्याप्रमाणे वागले. जसे बोलायचे तसे चालावयाचे हा त्यांचा बाणा असे. दुसऱ्यावर काही उपकार केले तर त्याची वाच्यता चुकूनसुद्धा व्हायची नाही. पी. सी. पाटील, मुकुंदराव पाटील वगैरे अनेक सद्गृहस्थांना ज्या सरकारी पदव्या मिळाल्या त्यांचे बव्हंशी श्रेय भास्कररावांना आहे. पण या गोष्टीची जाणीव त्यांनी केव्हाच करून दिली नाही. कालांतराने या गोष्टी उजेडात आल्या. त्याचप्रमाणे दुसऱ्याने केलेल्या उपकाराबद्दलही चकार शब्द तोंडातून निघायचा नाही. १९०६ साली काही मत्सरग्रस्त लोकांनी त्यांच्यावर मारेकरी घातले होते. आयुष्याची दोरी बळकट म्हणूनच ते त्यातून वाचलें. परंतु या उपकाराबद्दल कधीदेखील कोणाबद्दल त्यांनी एक अवाक्षरही काढले नाही. पुढे अनेक वर्षांनी मुंबईस मिनिस्टर असताना जरी या कृतीबद्दल सूड घेणे त्यांना सहजशक्य झाले होते तरी दया भाकल्यावर उदार अंतःकरणाने त्यांनी क्षमा केली. या एकाच प्रसंगावरून त्यांच्या क्षमाशील वृत्तीची चांगलीच कल्पना येईल. साधी राहणी व उच्च विचारसरणी हे त्यांचे वैशिष्ट्य होते.

रोज सकाळी १० व सायंकाळी ८-८॥ वाजता जेवायचा त्यांचा प्रघात होता. जेवतानाही वृत्तपत्राचे वाचन चालूच असायचे. कोणी पाहुणे पंक्तीला असले तरच वाचन बंद. खाण्यापिण्याबाबत कसलाही चोखंदळपणा नसे. फक्त तिखट त्यांना वर्ज्य असे. मात्र परक्या ठिकाणी तिखट जेवण्याची पाळी आली तर जेवतही असत. यजमानास अडचणींत टाकीत नसत. चहा, कॉफी वगैरे पेये ते कधीच घेत नसत. विलायतेतही या नियमाला अपवाद केला नाही. निरसे दूध, गोड ताक व लिंबाचे सरबत ही यांची नेहमीची पेये. धूम्रपान अगर मद्यपान कधीही केले नाही. नियमित व्यायाम व आहार, थंड पाण्याचे स्नान, निर्व्यसनीपणा व शांत मनोवृत्ती यामुळे त्यांचे आरोग्य शेवटपर्यंत उत्तम स्थितीत राहिले. लहानपणी जरी त्यांची प्रकृती अशक्त होती तरी व्यायामाने त्यांनी आपले शरीर चांगले कमाविले होते.

अनुक्रमणिका

एक न्यायप्रिय, निःपक्षपाती, शांत पण शिस्तप्रिय अधिकारी असा त्यांचा लौकिक होता. कोणत्याही खात्यांत नेमणूक होताच प्रथम तेथील नोकरवर्गांत वक्तशीरपणापासून कामसूपणापर्यंत शिस्त लावायची, त्यांना काम शिकवायचे व सामान्य जनतेच्या सुखसोयींकडे त्यांना लक्ष द्यावयास लावायचे असा त्यांचा प्रघात होता. न्यायखात्यांत अगर महसूल खात्यात 'जाधवरावांनी दिलेला निकाल वरिष्ठ कोर्टात अगर हुजूर अपिलात फिरणे कठीण असा लौकिक त्यांनी संपादन केला होता. त्यांच्या न्यायप्रिय व निःपक्षपाती स्वभावाचेच हे द्योतक होते. नोकर निवडतानादेखील ते त्याच्या जातीपेक्षा गुणाकडेच अधिक पाहत. ब्राह्मण उमेदवार ब्राह्मणेतर उमेदवारापेक्षा लायक असेल तेव्हा त्यांनी ब्राह्मणांचीच निवड केल्याची कैक उदाहरणे दाखविता येतील.

असिस्टंट सरसुभे व सरसुभे असताना वार्षिक दौऱ्याच्या वेळी खेडोपाडी जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीची व पिकांची पाहणी करीत! खेडेगावातील बाजारचे दिवशी ते बाजारची पाहणी करीत. त्या वेळी पट्टेवाला बरोबर घेत नसत. त्यामुळे खेडेगावच्या लोकांना कोणी सरकारी आले आहेत याची जाणीव होत नसल्याने ते आपापले व्यवहार नेहमीप्रमाणे दचकता करीत. ह्यामुळे जाधवरावांना लोकांचे नित्याचे व्यवहार सहज पाहावयास मिळत. केवळ खात्यातील चौकशीवर अवलंबून न राहता प्रत्येक प्रकरणी स्वतः चौकशी करून निर्णय देत. यामुळे ज्याप्रमाणे त्यांना परिस्थितीचे यथायोग्य ज्ञान होत असे, त्याचप्रमाणे लोकांचा विश्वास त्यांना संपादन करता आला.

आपल्या हाताखालील नोकरांवर ते कसली बंधनें लादीत नसत. त्यांची राजकीय मते भिन्न असली तरी त्याबद्दल त्यांचा विरोध नसे.

बालपणापासूनच राष्ट्रीय दृष्टिकोनातून पाहण्याची त्यांना सवयच लागली होती. समाजाचे आणि पर्यायाने राष्ट्राचे हित करीत असताना त्यात स्वतःचे अनहित होत असले तरी ते त्याची पर्वा करीत नसत. ते एल्फिन्स्टन कॉलेजचे फेलो असताना डॉ भांडारकर युनिव्हर्सिटीचे व्हाईस चॅन्सेलर होते व मुंबईचे त्या वेळेचे गव्हर्नर लॉर्ड हॅरिस हे चॅन्सेलर होते. त्यांची मुदत संपली होती व ह्याच चेंन्सेलरच्या अध्यक्षतेखाली पदवीदान समारंभ व्हावा म्हणून नेहमीच्या तारखेच्या आधी ८ दिवस समारंभाची तारीख ठरविण्यात आली. त्यां वेळी काही पदवीधर विद्यार्थ्यांना हे कृत्य पसंत नव्हते आणि त्यांनी त्या अवेळी भरणाऱ्या पदवीदान समारंभावर बहिष्कार घालण्याचे ठरविले. भास्करराव‌ही या बहिष्कारात सामील होते.

जाधवराव मिनिस्टर असताना एकदा सर्जन जनरलची जागा खाली झाली तीवर कर्नन कुकडे यांचा हक्क होता. गोऱ्या चिटणिसाने कारकुनी करून ती जागा आपल्या सजातीय आय. एम. एस्. ला. मिळण्याची खटपट चालू केली व यासाठी रजा रद्द करवून त्याला बोलविण्यात आले व मिनिस्टरच्या सहीचा हुकूम काढण्याची घाई केली. जाधवरावांनी त्या प्रकरणाचा चांगला अभ्यास केला व सर्जन जनरलच्या जागेवर कर्नल कुकड्यांचीच नेमणूक झाली पाहिजे असे प्रतिपादले. हे प्रकरण गव्हर्नरपर्यंत गेले. परंतु चिटणिसाच्या कारकुनीस यश न येता क. कुकड्यांची नेमणूक झाली. त्याचप्रमाणें प्रो. ताकाखाव यांची L. E. S. मध्ये नेमणूक झाली. ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये डॉ. नाडगीर, डॉ. उगन, डॉ. दलाल वगैरे नामांकित डॉक्टरांस पहिले हिंदी प्रोफेसर म्हणून नेमिले. अशी अनेक उदाहरणे आहेत. प्रत्येक ठिकाणी जाधवरावांची राष्ट्रीय वृत्ती सदैव जागरूक असे.

अनुक्रमणिका

जाधवरावांनी चिटणिसाची कारकुनी चालू दिली नाही हे खरे असले तरी त्याला अगर आपल्या हाताखालील मोठा अधिकाऱ्यास कमीपणा येईल असे ते काही करीत नसत. त्यामुळे त्यांचा नोकरवर्गावर वचक राहूनही कोणाही अधिकाऱ्याला हीनगंड उत्पन्न होत नसे व त्याभुळे कामकाज चांगले चाले. अशा वेळी ते कोणालाही कमीपणा न येईल असे युक्तीप्रयुक्तीचे धोरण राखीत.

मि. बलुच हे मुसलमान गृहस्थ शेतकी खात्यात मोठ्या जागेवर होते व त्यांच्यावर काही तोहमत येऊन त्यांना सस्पेंड केले होते. श्री. जाधवरावांनी त्यांच्या प्रकरणाचा नीट अभ्यास केला, तेव्हा त्यांना आढळून आले की या प्रकरणात अन्याय झालेला आहे. त्यांनी सेक्रेटरीस पटवून दिले की, जर शेतकी खात्याचे डायरेक्टर (मि. टी. एफ. मेन) यांस थोडे जरी कायद्याचे ज्ञान असते तर त्यांनी समजून उमजून अशी बेकायदा गोष्ट केली नसती. ताबडतोब मि. बलुच यांस नोकरीवर बोलावून कोणासही कमीपणा न येता हे प्रकरण मिटले. अशाच रोतीने जंगल खात्याचे अधिकारी मि. दत्त यांचेही प्रकरण निकालात निघाले. यापेक्षाही जास्त मनोरंजक असे प्रकरण रा. ब. पी. सी. पाटील यांच्या बाबतीत होऊन नाजूक परिस्थिती उत्पन्न झाली होती. आणि विशेष म्हणजे जाधवराव व पाटील हे दोघेही मराठा असल्यामुळे पाटलांच्यासारखा निकाल लागल्यास त्यांच्यावर वशिलेबाजीचा आरोप होणे अगदी साहजिकच होते. त्या वेळी श्री. पाटील हे प्रोफेसर ऑफ ॲग्रिकल्चर इकॉनॉमिक्स (शेतकी अर्थशास्त्राचे प्रोफेसर) होते. त्या वेळचे शेतकी खात्याचे डायरेक्टर डॉ. एच. एच मॅन यांनी शेतकी–अर्थशास्त्र या विषयासाठी रा. ब. पाटील यांस पुण्याच्या आसपासच्या पिकांच्या उत्पादनखर्चाबाबत खरी माहिती व आकडे गोळा करण्यास सांगितले. रा. ब. पाटील यांनी मोठ्या मेहनतीने ही माहिती गोळा करून शेतीमुळे शेतकरी केवळ नुकसानीतच अधिकाधिक जात आहे असे सिद्ध केले. शेतकी खात्याने हे पत्रक १९२७ चे १४९ वे पत्रक म्हणून प्रसिद्ध केले. डॉ. मॅननी त्या पत्रकास प्रस्तावनाही लिहिली. पुढे डॉ. मॅन यांचे जागी मि. टी. एफ. मॅन हे डायरेक्टर झाले. बार्डोलीच्या चळवळीत कांग्रेस पुढाऱ्यांनी या पत्रकाचा चांगलाच उपयोग करून घेतला व जमीन महसूल कमी करण्याबाबत जोराची चळवळ सुरू केली. अशा तऱ्हचे पत्रक शेतकी खात्याने प्रसिद्ध करणे अत्यंत चुकीचे आहे असे मि. मेन यांचे मत झाले व त्यांनी ताबडतोब या पत्रकाचा प्रसार न करण्याचा हुकूम काढला. यावर रा. ब. पाटील यांनी मेनसाहेबाची समजूत काढण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. हे पुस्तक म्हणजे शास्त्रीय संशोधन असून शेतकी अर्थशास्त्राचे प्रोफेसर म्हणून ज्या खऱ्या गोष्टी आपल्या नजरेस आल्या त्याच त्यात दाखविल्या आहेत असे सांगितले. परंतु मेनसाहेबानी ते न ऐकता उलट काही अपमानास्पद शब्द काढले. साहजिकच रा. ब. पाटील यांस सरकारकडे तक्रार करावी लागली. जाधवरावांनी ही केस त्या खात्याचे सेक्रेटरी मि. बेल याच्याकडे चौकशीसाठी दिली व काही महत्त्वाचे मुद्दे काढून त्यांवर त्यांचे मत सांगितले. मि. बेल हे एक रेव्हिन्यू खात्यातील अनुभवी असे सनदी नोकर होते.

रा. ब. पाटील यांचे संशोधन शास्त्रीय व अचूक होते असे श्री. जाधवराव व मि. बेल यांस आढळून आले. शिवाय मि. मेन यांनी रा. ब. पाटलांसारख्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यास विनाकारण बोल लावला असे मि. बेल यांस वाटले. तेव्हा जाधवरावांनी स्वतः निकाल न देता मि. बेल यांसच तसे करण्यास सांगितले. सरकारने मि. मेन यांस रा. ब. पाटील यांची माफी मागावयास लावली आणि रा. व. पाटलांस आपले संशोधन अद्ययावत करण्यास सांगून ते एका नवीन पत्रिकेत घालावयास सांगितले व मि. मेन यांनी ज्या पत्रकास बंदी घातली होती ते प्रसिद्ध करण्याचा आग्रह धरू नये अशी रा. ब. पाटलांस विनंती केली. अशा रीतीने मि. मेन यांची नाचक्की टळली. या प्रसंगाने श्री. जाधवराव यांचा चतुरस्रपणा दिसून आला. आपल्या सेक्रेटरीला या महत्त्वाच्या प्रकरणाचा निकाल देण्याची संधी देऊन त्यांच्यावरील आपला विश्वास

अनुक्रमणिका

दाखविला, रा. ब. पाटील यांस न्याय मिळाला, मि. मेन यांची नाचक्की टळली व रा. ब. पाटील हे मराठा म्हणून त्यांच्या वतीने निकाल दिला गेला अशी ओरड करण्यास विरोधकांस संधी मिळाली नाही

आपणास जे प्रामाणिकपणे वाटते ते बोलून दाखविण्यास श्री. जाधवराव कचरत नसत. ते शेतकीमंत्री असताना व्हॉईसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलबरोबर काही प्रश्नांबाबत चर्चा करावयास त्याना जावे लागले शेतकी तज्ज्ञ म्हणून रा. ब. पाटील त्यांच्याबरोबर गेले. लॉर्ड विलिंग्डन हे व्हाईसरॉय होते. तेव्हा गार्डन पार्टीच्या वेळी व्हाईसरॉय त्यांना म्हणाले की, 'देशात शांतता नांदावयास काय केले पाहिजे?' जाधवरावांनी तत्काळ त्यांना उत्तर दिले की, 'Your Excellency, unless and until the people control the Revenue and Finance portfolios they will not rest.' हे उत्तर ऐकल्याबरोबर आजूबाजूचे लोक अगदी चकित होऊन गेले. कारण तोपर्यंत कोणीही अशा तऱ्हेचे स्पष्टोद्‌गार व्हाईसरॉयसमोर काढण्यास धजले नव्हते.

वशिलेबाजी श्री. जाधवरावांना पसंत नसे. अशा कामी ते कुणाचाही मुलाहिजा ठेवीत नसत. ते मंत्री असताना युरोपियन लोकांचे प्रस्थ फार असे. सामान्यपणे हिंदी मंत्रीसुद्धा हाताखालच्या युरोपियन गृहस्थास मान देत व त्याचा शब्द शक्यतो उचलून धरीत. जाधवराव यास अपवाद होते. ते मंत्री असताना फारब्रदर नावाचा एक युरोपियन व्हेटर्नरी खात्याचा मुख्य (सुपरिटेंडेंट) होता. ही जागा डायरेक्टरची व्हावी अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. त्याने त्या दिशेने प्रयत्न केले व वारंवार भेटून जाधवरावांना या बाबतीत गळ घातली. पण जाधवरावांनी 'तशी वेळ अद्याप आली नाही' असे सांगितले. तथापि त्याने आपले निवेदन चालूच ठेवले. तेव्हा श्री. जाधवराव यांनी एक वृत्तपत्र घेतले आणि फारब्रदरकडे पूर्ण दुर्लक्ष करून ते वाचू लागले. त्या प्रसंगी तेथे हजर असलेल्या काही गृहस्थांना श्री. जाधवराव यांनी एक युरोपियनाशी असे वागावे याचे आश्चर्य वाटले. त्यांपैकी एकाने जाधवरावांचे सेक्रेटरी श्री. जोशी, आय. सी एस. यांना तसे बोलून दाखविले 'तेव्हा जोशी म्हणाले, 'मेहरबानी समजा, जाधवरावांनी त्याना हाकून लाविले नाही!'

पूर्वी कोल्हापूर संस्थानात पंचवीस–तीस रुपये पगारदार अंमलदारास राव साहेब व दीड–दोनशे रुपये पगारदार अंमलदारास रावबहादूर म्हणावयाची (व कागदोपत्री लिहिण्याची) प्रथा असे. त्याप्रमाणे जाधवरावांना रावबहादूर असे संबोधिले जाई. तथापि सरकारमान्य कोणत्याही पदवीचा त्यांनी केव्हाही स्वीकार केला नाही. एखादा अपवाद सोडून मुंबई सरकारचे सर्व एक्झिक्युटिव्ह कौन्सिलर्स व दिवाण यांना 'सरकी' मिळाली. त्याच क्रमानुसार जाधवरावांना 'नाईटहुड' मिळण्याबद्दल दोन वेळा गव्हर्नरने शिफारस करण्याचे ठरविले; पण दोन्ही वेळा त्यांनी हा मान साभार नाकारला. याबद्दल त्यांच्या एका रावबहादूर स्नेह्यांना अगदी मनापासून वाईट वाटले व मुद्दाम भेट घेऊन ते म्हणाले, 'काय हे नामदारसाहेब! अहो, नाईटहुडसाठी लोक जीव टाकतात आणि पाण्यासारखा पैसा खर्चतात अन् तुम्ही ही चालून आलेली पदवी नाकारताहात!' भास्करारावांनी शांतपणे उत्तर दिले, 'अहो रावबहादूर, तुम्ही म्हणता ते खरे आहे पण मी 'मिस्टर' असताना पदव्यांसाठी इतरांची शिफारस करू शकतो हे काय कमी आहे?'

मुंबईचे गव्हर्नर, व्हॉईसरॉय व इतर मोठमोठ्या ऑफिसरांच्या व भास्कररावांच्या ओळखी होत्या व काहींशी तर दाट स्नेह होता. क्लब, बार, जिमखाना रेसेस, पार्ट्या, मेजवान्या वगैरे वर्तुळात अशा पुष्कळ ओळखी होतात व वाढतात; पण जाधवराव यांपैकी 'छंदात आणि फंदात' नसताना वरील सर्व वरिष्ठ अंमलदारांनी त्यांच्याशी स्नेह ठेवून पत्रव्यवहार करावा, यावरून जाधवरावांच्या विद्वत्तेची आणि कर्तृत्वाची बूज त्यांना होती असे दिसून येते.

अनुक्रमणिका

विधिमंडळाच्या निवडणुकीच्या वेळी इतर उमेदवार सामान्यपणे आचरणात आणीत असलेल्या मार्गांचा ते कधीच अवलंब करीत नसत. ते मतदारांना स्वच्छच सांगत, 'माझी आजपर्यंतची लोकसेवा, माझी मते आणि मागासलेल्यांसाठी मी जे तुमचा प्रतिनिधी म्हणून कौन्सिलात काम करणार ते लक्षात घेऊन आम्हाला तुमची मते द्या. मतदारांस नेण्यासाठी मोटारी, टांगे यांची सोय करणे मला शक्य नाही. तेव्हा तुम्हास तुमचा प्रतिनिधी पाहिजे असेल तर घरच्या बैलगाड्या घेऊन मतदान करण्यास गेले पाहिजे.' या उद्‌गारांत त्यांचा स्वभाव स्पष्ट प्रतिबिंब होत असे व जनता त्यांना निवडून देई.

विधिमंडळात उत्तरे देताना श्री जाधवरावांच्या भाषणात कधीच पाल्हाळ नसे. अगदी मुद्देसूद, जरुरीपुरते उत्तर ते देत. एखाद्या सभासदाने उपप्रश्न विचारून उपहास करण्याचा प्रयत्न केल्यास ते असे काही सोचदार, मर्मभेदक नि उदारक उत्तर देत की विचारणारा शरमिंदा व्हावा. पुष्कळाना लांबलचक भाषणे करण्याचीं मुद्द्यास बगल देऊन बाद करण्याची हाव असते. श्री. जाधवराब पार्लमेंटरी शिस्तीचे भोक्ते असल्याने ते जरी कमी बोलत तरी त्यात आशय खूप व माहिती विपुल असे.

शिक्षणमंत्री असताना श्री. जाधवरावांनी, एका शाळेला भेट दिली. त्या वेळी तेथील हेडमास्तरांनी फारच उत्तम सरबराई ठेवली व शेरेबुक पुढे करून चांगला शेरा मागितला. श्री. जाधवरावांनी 'चिवडा चांगला होता, पेढेही उत्तम खव्याचे होते' अशा तऱ्हेचा शेरा दिला. मास्तरांचे तोंड पहाण्यालायक झाले. परत आल्यावर श्री जाधवरावांचे बरोबर गेलेल्या मित्राने असा शेरा देण्याचे कारण विचारले तेव्हा ते म्हणाले, 'अहो, शिक्षणमंत्र्याने नुसता चिवडा खाऊन मास्तरांना अपेक्षेप्रमाणे शेरा दिला असता तर डेप्युटी इन्स्पेक्टरला अगर इन्स्पेक्टरला आपले खरे मत व्यक्त करता आले असते का? मास्तराने आपल्या अकलेप्रमाणे चांगले डोके लढविले होते.' यावरून आपल्या हाताखालील अगदी लहानशा अधिकाऱ्याची सुद्धा आपल्यामुळे कुचंबणा होऊ नये याबद्दल ते जपत असत असे दिसून येईल.

इन्स्पेक्टरच्या हुद्द्यावर असलेली एक पार्शी बाई सरकारी कामानिमित्त श्री. जाधवराव यांच्या घरी भेटावयास आली. त्या वेळी भास्करारावांनी एक चड्डी व एक दंडके एवढाच पोषाख केला होता व त्या पोषाखातच तिची भेट घेतली. अनेकांना हे कसेसेच वाटले व त्यांच्या एका स्नेह्यांनी तसे बोलूनही दाखविले. तेव्हा जाधवराव म्हणाले, 'अगोदर सूचना देऊन ती आली असती तर मी व्यवस्थित पोषाख करून तिची भेट घेतली असती. तिला जर तशी आवश्यकता वाटली नाही तर मी तरी औपचारिकपणा कशाला पाळू?'

प्रो. दस्तूर इतिहास हा विषय शिकवीत असत. त्या वेळची इतिहास शिकविण्याची पद्धत म्हणजे तारखा, सन व घडलेली हकीकत समजावून सांगणे. अशी असे. काही दिवस श्री. जाधवरावांना तो विषय शिकवावा लागला. तो शिकविताना त्यांनी विद्यार्थ्यांना निराळीच दृष्टी दिली व रूढ पद्धत बदलली त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर तो विषय ठसला व त्याचे दीर्घकाल ठसे राहिले. त्या वेळच्या विद्यार्थ्यांना ग्रीसचा इतिहास असे. तो शिकविताना जाधवराव त्या देशाशी आपल्या देशाची तुलना करून विद्यार्थ्यांना विषय समजावून देत. पाट्रिशियन व प्लेब्स यांसंबंधी माहिती देताना आपल्याकडील ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद हा तसाच कसा आहे हे ते मोठया मार्मिकपणे विशद करीत. समाजातील रूढ अन्यायाविरुद्ध जेथे जे शक्य होते तेथे तेथे विरोध दर्शविला व इतरांच्या मनात तो निर्माण करण्याचा प्रयत्न केला याचे हे उत्कृष्ट प्रत्यंतर आहे.

अनुक्रमणिका

श्री. जाधवराव यांना एखादी गोष्ट पटली की, कुणाचीही पर्वा न करता, होणाऱ्या निंदेस न जुमावता ते तिचा उघड प्रचार करीत व स्वतः शक्य तेथे भाग घेत. तमाशा हे शिक्षणाचे उत्कृष्ट माध्यम आहे याची त्यांना जाणीव होती. सत्यशोधकी चळवळीच्या कामी या हत्याराचा प्रभावी उपयोग करून घेण्यात आला होता. तथापि तत्कालीन प्रतिष्ठित लोक सत्यशोधकी तमाशास जाण्यास कचरत असत. श्री. जाधवराव अगदी उघडपणे जात असत. त्यांचे मनोधैर्य काही वेगळेच होते. आपल्या मुलीच्या लग्नाच्या वेळी त्यांनी विवाहमंडपात सत्यशोधकी तमाशे करविले होते. आपले उद्दिष्ट ज्या मार्गाने साध्य होईल तो मार्ग अवलंबविण्यास ते मुळीच माघार घेत नसत. अजून तमाशास जाण्यास समाजातील प्रतिष्ठित लोक धजत नाहीत. मग त्या वेळी लग्नसमारंभात सत्यशोधकी तमाशा करावयास केवढे मानसिक बल पाहिजे होते याची कल्पनाच केलेली बरी. आपल्या मताबद्दल दृढ विश्वास असल्याचेच हे द्योतक होय.

आंतरजातीय विवाहास त्यांचा पाठिंबा होता व तसे विवाह व्हावेत याकरिता ते सदैव सहाय्य करीत. श्री. गोविंद चिमणाजी भाटे यांनी एका मराठा मुलीबरोबर विवाह केला तेव्हा श्री. जाधवराव यांनी कन्यादान केले.

जाधवरावांच्या साध्या नि सरळ आयुष्यात पैज मारणे हा प्रकार नव्हताच. तथापि एक पैज स्वीकारून त्यांनी ती जिंकली. तो प्रकार असा :

१९३० साली तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड अर्विन यांच्याकडे जाधवरावांना मेजवानीचे आमंत्रण होते. त्या वेळी कायदेभंगाची चळवळ जोरावर असून कॉंग्रेस पक्षाच्या सर्व प्रसिद्ध पुढाऱ्यांच्या धरपकडी सुरू होत्या. त्यावर बोलणे सुरू होऊन संभाषणाचा ओघ त्या वेळचे लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे अध्यक्ष श्री. विठ्ठलभाई पटेल यांच्याकडे वळला. लॉर्ड अर्विननी विचारले, 'मिस्टर जाधवराव, तुमचे काय मत आहे? मिस्टर विठ्ठलभाई पटेल यांना अटक होईल की नाही?' जाधवरावांनी उत्तर दिले, 'मी विठ्ठलभाईना जितके ओळखतो त्यावरून ते अटक करून घेणार नाहीत असे मला वाटते.' लॉर्डसाहेब म्हणाले, 'असे कसे शक्य आहे? सर्वच प्रसिद्ध कॉंग्रेसमन अटकेत जात आहेत. मी पैज लावून सांगतो, विठ्ठलभाईना अटक खात्रीने होणार.' जाधवराव उद्‌गारले, 'मी स्वीकारतो ही पैज.' लॉर्डसाहेबांनी ए. डी. सी. ला बोलाविले व ही पैज त्यास लिहून घेण्यास सांगितले. थोड्याच दिवसांनी विठ्ठलभाई पटेल विलायतेस निघून गेले व त्यांना अटक झाली नाही. राजमुकूट शिक्क्याचे एक पाकीट कोल्हापूरच्या पत्त्यावर आले व त्यातून एक पाच रुपयाची नोट व लॉर्ड अर्विनच्या सेक्रेटरीच्या सहीचे 'नामदार व्हाईसरॉय यांच्या आज्ञेनुसार हे पैजेचे पैसे पाठवीत आहे,' असे पत्र आले.

श्री. जाधवराव दिवाण झाले व त्यांना दरमहा चार हजार रुपये पगार मिळू लागला. तथापि त्यांचा स्वभाव, राहणी, पोषाख, व्यासंग, शांत वृत्ती, स्थितप्रज्ञता यांत कसलाही फरक पडला नाही. युरोपियनाशी नित्य संबंध येणारे त्या वेळचे लोक घरी काटे, चमचे वापरींत. श्री. जाधवरावांनी या सुधारणा घरी आणल्या नाहीत. उलट पूर्वीचीच पद्धत चालू ठेवली.

अखेरची पंचवीस वर्षे भास्करराव आपल्या मुलांशी व कुटुंबियांशी अत्यंत खेळीमेळीने वागले. पूर्वी गृहकार्यात लक्ष द्यावयास त्याना फुरसतच मिळत नसे. पण पुढे पुढे त्यांच्या स्वभावात बदल होत गेला व त्याची त्यांना जाणीवही होती. सकाळी दहा व रात्री आठच्या ठोक्यांना जेवणारे भास्करराव मुलांच्यासाठी दुपारी दीड व रात्री दहापर्यंत आपणहून थांबू लागले. तत्पूर्वीच्या नोकरी व राजकारणाच्या कालात त्यांच्या

अनुक्रमणिका

विनोदास अवसर नव्हता; पण अखेरच्या वीस वर्षांत त्यांच्या संभाषणात विनोद हा महत्त्वाचा भाग झाला. आधीच समाधानी वृत्ती आणि त्यात सत्त्वशील व संसारदक्ष पत्नी नि गुणी मुले यांची भर पडल्यावर त्यांचा संसार (स्वतः न करताही) सुखाचा व समृद्धीचा झाला यात नवल नाही. कोल्हापुरात जाधवरावांचे कुटुंब ही एक 'संस्था' आहे व कित्येक घरांतून या कुटुंबाची उदाहरणे देण्यात येतात.

भास्कररावांचे वडील विठोजीराव व मातुश्री लक्ष्मीबाई यांस साळूताई, भास्करराव, कृष्णाबाई, चंद्राबाई, गोविंदराव, यशवंतराव व लहानपणीच वारलेल्या दोन मुली अशी एकंदर ८ अपत्ये झाली. त्यांचे धाकटें बंधू श्री. गोविंदराव हे फर्स्ट क्लास सबसज्ञ म्हणून रिटायर झाले. त्यानीही आपली नोकरी अत्यंत निःस्पृहपणे करून भास्कररावांचाच कित्ता गिरविला. त्यांनी ज्या ज्या ठिकाणी नोकरी केली तेथील सामान्य जनतेने त्यांना दुवाच दिला. प्रसंगी वरिष्ठांचा रोष पत्करूनही त्यांनी गरिबांना न्यायदान केले.

भास्कररावांना मातृसुख बराच काल (त्यांच्या वयाच्या शहात्तराव्या वर्षापर्यंत) लाभले. त्यांच्या मातोश्री श्री. लक्ष्मीबाई यांचे शिक्षण त्या कालात होण्याची काहीच शक्यता नव्हती पण त्यांच्या घराशेजारी एक शाळा होती, तेथे रोज 'पर्वचा' चाले. तो ऐकून सर्व उजळणी, तोंडचे हिशेब व व्यवहारात उपयुक्त अशी गणिते त्यानी आत्मसात केली. त्या शेजारच्या मुलांकडून धुळाक्षरे शिकल्या व छापील मराठी मजकूर त्या वाचू लागल्या. हे वाचन त्यांनी १९२५ सालापर्यंत म्हणजे वयाच्या ऐंशीव्या वर्षापर्यंत चालू ठेवून बहुतेक सर्व उपलब्ध वाङ्मय व नियतकालिके वाचून काढली. तरी पण त्यांना लिहायला आले नाही. लहानपणापासून संसाराची स्वतंत्र जबाबदारी त्यांनी पार पाडली होती. त्यांचा स्वभाव अत्यंत मानी, शिस्त कडक परंतु अंतःकरण प्रेमळ होते. कोणाच्याही उपयोगी पडायला त्यांचे पाऊल पुढे असे. मोठ्याई ऊर्फ बडीमा जुन्या पिढीतल्या असूनही भास्कररावांच्या पुरोगामी विचारांना, सत्यशोधक समाज मतांना व जातिभेद विच्छेदनाला त्यांनी केव्हाही विरोध केला नाही. आपल्या घरची सर्व धार्मिक कृत्ये, लग्नकार्ये वगैरे त्यांनी मराठा पुरोहितांकडून करवून घेतली. आपल्या नातीला (डॉ. ताराबाई) उच्च शिक्षणासाठी विलायतेला पाठविण्यासाठी पहिला पुढाकार त्यांनी घेतला. त्यांनी १५ नातवंडे व २५ परतवंडे पाहिली. त्या वयाच्या सत्त्याण्णवाव्या वर्षी ता. ८ मे, १९४३ रोजी कोल्हापूर येथे मरण पावल्या. शेवटपर्यंत त्यांची प्रकृती निकोप होती.

भास्कररावांचे कौटुंबिक जीवन जितके प्रदीर्घ तितकेच सुखाचे गेले आहे. त्यांची वृत्ती संसारी माणसासारखी नसल्याने त्यांनी गृहव्यवस्थेत कधी मन घातले नाही किंवा ढवळाढवळ केली नाही. १९१२ सालापासून आजतागायत गृहव्यवस्थेची संपूर्ण धुरा त्यांच्या पत्नीनी—मानीसाहेब यांनी—वाहिली. आपल्या व्यासंगी, सदैव कामात व्यग्र असणाऱ्या व तत्त्वशील पतीला घरातील प्रमेये व कटकटी यांपासून त्यांनी सदैव अलिप्त ठेवले. ही पत्नीची योग्यता भास्कररावांनी सदैव जाणली. १९४६ साली मार्च महिन्यात भास्करराव—भागीरथीबाई यांच्या विवाहास पन्नास वर्षे पूर्ण झाली. हा विवाह—सुवर्ण—महोत्सव त्यांच्या सर्व निकटच्या आप्तांनी मोठ्या थाटाने व उत्साहाने, जाधव कुटुंबाशी ज्यांचा घरोबा व ऋणानुबंध बरोबर पन्नास वर्षांचा होता त्या सर र. व्ये. सबनीस यांना बोलावून साजरा केला. त्या दिवशी भास्कररावांचे करवीरातील सर्व स्नेही, ऋणानुबंधी दरबारचा जुना व तत्कालीन नोकरवर्ग व इतर प्रतिष्ठित नागरिक यांनी येऊन या दांपत्याचे अभिनंदन व अभीष्टचिंतन केले. त्यांच्या मुलामुलींनी व आप्तेष्टांनी यानिमित्त जी रक्कम जमविली त्यात तितकीच भर घालून लोकोपयोगी संस्थांना मदत देण्यात आली. कौटुंबिक जीवनाचे हे एक अनामिक, अभिनव नि आदर्श उदाहरण म्हणून नमूद करण्यासारखे आहे. त्यात गृहजीवनाचा आनंद आहे, त्याचप्रमाणे त्याची अनुकरणीय स्मृती आहे.

अनुक्रमणिका

भास्कररराव यांच्या कौटुंबिक जीवनात त्यांना जे सौख्य व स्वास्थ्य लाभले त्याचे सर्व श्रेय त्यांच्या सुशील पत्नी श्री. मानीसाहेब उर्फ भागीरथीबाई यांनाच द्यावे लागेल. अगदी लहानपणी श्री. मानीसाहेब यांनी विवाहबद्ध होऊन जाधव घराण्यात प्रवेश केला. श्री. भास्कररराव जाधव यांचा सर्व वेळ विद्याव्यासंग राज्यकारभार, सामाजिक व राजकीय चळवळी यांतच जात असे. संसारात लक्ष घालण्यास त्यांना वेळ सापडणे कठीण होते, त्यामुळे कुटुंबांतील सर्व प्रकारची जबाबदारी श्री. मानीसाहेब यांच्यावरच पडत असे. संसारातील इतर बाबींबरोबरच मुलांचे शिक्षण व मुलांना योग्य वळण देणे इत्यादी महत्त्वाच्या गोष्टी मानीसाहेबांनी आपल्या पतीच्या इच्छेनुसार पार पाडल्या. श्री. जाधवरावांच्या कट्टर सत्यशोधकी मतांना विरोधी असे काहीही घरी होऊ द्यावयाचे नाही याची त्या खबरदारी घेत. यावरून त्यांची संसारकुशलता दिसून येते. श्री. भास्कररराव यांचे खाण्यापिण्याकडे विशेष लक्ष नसे. नेमलेल्या वेळी ताटात येईल ते, ठराविक तेवढेच खावयाचे असा त्यांचा रिवाज होता. एखादा जिन्नस आवडतो तो आजच्या जेवणाला करा असे त्यांनी कधीही सांगितले नाही किंवा मेजवानीच्या बेळी एखादा पदार्थ आवडीने त्यांनी जादा खाल्ला असे कधीही झाले नाही. श्री. भास्कररराव निरीश्वरवादी होते तर श्री. मानीसाहेबांचा ईश्वरावर विश्वास आहे. कौटुंबिक संभाषणातून व वादविवादांमधून श्री. भास्कररराव आपला निरीश्वरवाद अट्टाहासाने मांडीत, परंतु आपल्या विद्वान पतीच्या मताशी विसंगत असे मानीसाहेब केव्हाच वागल्या नाहीत. निधनापूर्वी एक महिना श्री. भास्कररराव आजाराने अंथरुणावर खिळून पडले होते. आपला अंतकाल जवळ आल्याची त्यांना पूर्ण कल्पना होती. आपल्या पत्नीना हाक मारून ते वारंवार सांगत, 'बाईसाहेब माझा आजार बरा होण्यासाठी देवाला नवस किंवा उपवास करू नका.' अशा प्रसंगीही श्री. मानीसाहेबांनी आपल्या पतीच्या मताविरुद्ध कोणतीच गोष्ट केली नाही, यातच मानीसाहेबांच्या जीवनाचा श्रेष्ठपणा दिसून येतो. या पतिपत्नींचा पन्नास वर्षांचा जीवनसंसार आदर्श असा आहे. श्री. मानीसाहेबांच्या तोंडून त्यांचा दीर्घकालीन संसारपटातील गोष्टी ऐकताना कोणाचेही मन रंगून जाईल अशा त्या आठवणी मनोहर आहेत. त्यांचा संग्रह करून प्रसिद्ध करण्यात आला तर मराठी साहित्यात एक मौल्यवान भर पडेल. आदर्श पत्नी व आदर्श माता या दोन्ही नात्यांनी आपले कर्तव्य कुशलतेने पार पाडून त्यांनी जाधव घराण्याचा लौकिक वाढविण्यास आपल्या पतीला जोड दिली यात वाद नाही.

भास्कररावांना आपल्या सुखाचा भरपूर लाभ झाला. चार मुलगे व चार मुली असा त्यांचा परिवार आहे. थोरले चिरंजीव हिंदूराव उर्फ बासूसाहेब इन्कमटॅक्स ऑफिसर आहेत. दुसरे ले. क. विठोजीराव लष्करात आहेत. तिसरे अप्पासाहेब कोल्हापूर येथे साऊंड इंजिनिअर असून चौथे मेजर आनंदराव हेही लष्करात आहेत. थोरल्या कन्या सौ. सत्यवतीबाई तावडे (प्रि. सी. रा. तावडे M. A. T. Ed. B. E. S. (1) retired यांच्या पत्नी), दुसऱ्या डॉ. ताराबाई या राजकोट येथे स्वतंत्र वैद्यकीय व्यवसाय, दवाखाना व प्रसूतिगृह चालवितात. तिसऱ्या सौ. सुलभाबाई माने (श्री. पांडुरंगराव माने, B. E.A. M. I. E. B. S. E (I) एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर मुंबई यांच्या पत्नी), व चौथ्या सौ. मीराबाई शिंदे (श्री. शंकरराव बी. शिंदे, B. A. असि. फायर सुपरिंटेंडेंट, पुणे लष्कर यांच्या पत्नी) या होत.

भास्कररराव वेदांताचे नुसते जडाभ्यासी नव्हते. या वेदाध्ययनामुळे त्याची वृत्ती अतिशय शांत झाली होती व ती कशानेही ढळली नाही. दुःखाघाताने ते कधी खचून गेले नाहीत आणि सुखाच्या वेळीही त्यांची शांत वृत्ती कधी ढळली नाही.१९२६ साली 'तुम्हास मिनिस्टर नेमता येत नाही' हे वृत्त जितक्या शांत चित्ताने त्यांनी ऐकले तितक्याच शांत वृत्तीने १९२६ साली त्यांना मिनिस्टर नेमल्याचे वृत्त त्यांनी ऐकले. १९२६ साली त्यांना मिनिस्टर नेमले नाही हे जाहीर झाल्याबरोबर त्याच दिवशी त्यांच्या एका खानदेशी तथाकथित

अनुक्रमणिका

मित्राने मिनिस्टर न नेमलेल्याबद्दल फोनवरच त्यांचे अभिनंदन केले. त्यावेळी जाधवरावांनी उलट त्या मित्राची मनीषा पूर्ण झाल्याबद्दल त्याचे अभिनंदन केले व तेही अगदी शांत चित्ताने!

याच वृत्तीच्या बळावर एकीकडे प्रत्यक्ष मृत्यूशी झगडत असता ते सत्यशोधक समाज परिषद भरविण्याची खटपट करीत होते. आपणास शक्य होती ती देशसेवा नि समाजसेवा आपण प्रामाणिकपणे केली याचे समाधान त्यांना लाभले होते म्हणूनच कोणतीही विवंचना त्यांना राहिली नव्हती. एक न्यायप्रिय अधिकारी, प्रामाणिक देशभक्त, व्यासगी लेखक, निरलस कार्यकर्ता, आदर्श नि चारित्रसपन्न सद्‌गृहस्थ म्हणून त्याची कीर्ती अमर आहे. आपल्या जीवनाने समाजकार्याचे एक अनुकरणीय उदाहरण त्यांनी घालून दिले. एखाद्या विषयाची आत्यंतिक तळमळ लागली म्हणजे माणूस केवढे कार्य करू शकतो याचे जाधवरावांचे आयुष्य म्हणजे एक प्रात्यक्षिक आहे.

अनुक्रमणिका

२००३

मुद्रण स्थळ - शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - १

अनुक्रमणिका

२००३

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - ४११ ००१.

अनुक्रमणिका